A-C. Fa

# THE FACTORIES ACT, 1948

WITH

MAHARASHTRA FACTORIES RULES, 1963

AMENDMENTS AND ADAPTATIONS UPTO 31-3-1989

# कारखाने अधिनियम १९४८

आणि

## महाराष्ट्र कारखाने नियम १९६३

३१-३-१९८९ पर्यंतच्या दुरुस्त्या व सुधारणा

टीका-टिप्पणी न्यायालयीन निकालांसह संपादित

नारायण धोंडोपंत उपासनी

किंमत ८० रुपये

गो. य. राणे

टिळक रोड, पु

---

ंची पुस्तके

ाने)

| | |
|---|---|
| ा नोकरी | रु. १८-०० |
| | रु. २०-०० |
| | रु. १५-०० |
| ा] अधिनियम ो] | रु. २५-०० |
| | रु. ३५-०० |
| | रु. ३५-०० |
| | रु. ५०-०० |
| यम | रु. २०-०० |
| | रु. १५-०० |
| | रु. १५-०० |
| | रु. २०-०० |

kheeland global .com

प्रकाशन

१ ०३०.

# अनुक्रमणिका


| प्रकरण | प्रकरणाचे नाव | कलमे | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | प्रारंभिक | १ ते ७ | १ |
| २ | निरीक्षकीय कर्मचारी | ८ ते १० | ११ |
| ३ | आरोग्य | ११ ते २० | ४१ |
| ४ | सुरक्षितता | २१ ते ४१ | २१ |
| ५ | सुखसोयी | ४२ ते ५० | ४३ |
| ६ | प्रौढ व्यक्तींचे कामाचे तास | ५१ ते ६६ | ४७ |
| ७ | तरुण व्यक्तीला कामावर लावणे | ६७ ते ७७ | ५९ |
| ८ | वार्षिक वेतनी रजा | ७८ ते ८४ | ६५ |
| ९ | विशेष उपबंध | ८५ ते ९१ | ७१ |
| १० | शास्ती आणि कार्यपद्धति | ९२ ते १०६ | ७८ |
| ११ | अनुपूरक उपबंध | १०७ ते १२० | ८६ |
| | ( पुस्तकात पान ८६ वर प्रकरण १० असे छापले आहे ते प्रकरण ११ वाचावे. ) | | |

| प्रकरण | प्रकरणाचे नाव | नियम | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | प्रारंभिक | १ ते १५ | ९३ |
| २ | निरीक्षक कर्मचारी वर्ग | १६ ते १८ | १०६ |
| ३ | आरोग्य | १९ ते ५६ | १०९ |
| ४ | सुरक्षितता | ५७ ते ७३ | १२६ |
| ५ | ,, | ७४ ते ८० | १६४ |
| | ,, | ८१ ते ९२ | १७३ |
| ६ | प्रौढ व्यक्तींचे कामाचे तास | ९३ ते १०२ | १८० |
| ७ | तरुण व्यक्तींना कामावर लावणे | १०३ ते १०४ | १८३ |
| ८ | वार्षिक वेतनी रजा | १०५ ते ११३ | १८४ |
| ९ | विशेष उपबंध | ११४ ते ११६ | १८६ |
| १० | अनुपूरक उपबंध | ११७ ते १२६ | २७९ |
| ११ | नमुने | | |

छपाई चालू आहे लौकरच प्रसिद्ध होत आहे

# मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८

(सन १९५९ चा क्रमांक ३)

भारताचे मा. पंतप्रधान राजीव गांधी यांनी
सुचविलेल्या सुधारणा व दुरुस्त्या

आणि

लोकसभेतील या विषयावरील त्यांच्या भाषणासह

गो. य. राणे प्रकाशन टिळक रोड पुणे ४११ ०३०

…च प्रसिद्ध होत आहे

# …त अधिनियम

# …५८

…चा क्रमांक ३)

…न राजीव गांधी यांनी
…ारणा व दुरुस्त्या

…आणि

…ावरील त्यांच्या भाषणासह

…टिळक रोड पुणे ४११ ०३०

# कारखाने अधिनियम १९४८

२३ सप्टेंबर १९४८

कारखान्यातील मजुरांचे नियमन बळकट करणारा अधिनियम

ज्यापेक्षा, कारखान्यातील मजुरांचे नियमन अधिक दृढतर व्हावे व त्यांत सुधारणा व्हावी असे आवश्यकतेवरून अधिनियम करण्यात येत आहे, येणे प्रमाणे–

व प्रसिद्ध होत आहे

# त अधिनियम

५८

ना क्रमांक २)

न राजीव गांधी यांनी
ारणा व दुरुस्त्या

आणि

ावरील त्यांच्या भाषणासह

टिळक रोड पुणे ४११ ०३०

# कारखाने अधिनियम १९४८

२३ सप्टेंबर १९४८

कारखान्यातील मजुरांचे नियमन बळकट करणारा अधिनियम

ज्यापेक्षा, कारखान्यातील मजुरांचे नियमन अधिक दृढतर व्हावे व त्यांत सुधारणा व्हावी असे वाटल्यावरून अधिनियम करण्यात येत आहे, येणे प्रमाणे--

## प्रकरण १

## प्रारंभिक

१. संक्षिप्त संबोधन, व्याप्ती आणि प्रारंभ – (१) या अधिनियमास कारखाने अधिनियम १९४८ असे संबोधण्यात येईल.

[1] [(२) सर्व भारतात याची व्याप्ती राहील.]

[1] [× × ×]

(३) दि. १ एप्रिल १९४९ या दिवसापासून अमलात येईल.

२. अर्थांतरण – विषयात आणि संदर्भात विरोध नसेल तर या अधिनियमात-

(अ) 'प्रौढ' म्हणजे, ज्याच्या वयास अठरा वर्षे पूर्ण झाली आहेत असा इसम.

(ब) 'युवक' म्हणजे ज्याच्या वयास पंधरा वर्षे पूर्ण झाली आहेत पण अठरा वर्षे पूर्ण झालेली नाहीत असा इसम.

[1] [(ब ब) 'दिनदर्शक वर्ष' म्हणजे बारा महिन्यांचा कालावधी, ज्याचा प्रारंभ कोणत्याही वर्षी जानेवारीच्या पहिल्या दिवसापासून होतो.]

(क) 'मूल' म्हणजे ज्याचे वयाची पंधरा वर्षे पूर्ण झाली नाहीत असे मूल.

(ड) 'तरुण इसम' म्हणजे जो मूल नाही व युवक नाही.

(इ) 'दिवस' म्हणजे, ज्याची सुरुवात मध्यरात्रीपासून होते असा चोवीस तासांचा कालावधी.

(फ) 'आठवडा' म्हणजे शनिवार मध्यरात्रीपासून ज्याची सुरुवात होते किंवा मुख्य कारखाने निरीक्षक यांना विशिष्ट क्षेत्रासाठी असे लेखी मान्य केले असेल असा इतर दिवशी मध्यरात्री पासून ज्याची सुरुवात होते असा सात दिवसांचा कालावधी.

(ग) 'शक्ति' म्हणजे विद्युत-शक्ती, किंवा शक्तीचा यांत्रिक उत्पादनाचा इतर प्रकार जो की मानव किंवा जनावरनिर्मित नाही.

(ह) 'मूलगतिजनित्र' म्हणजे, कोणतेही इंजिन, मोटार किंवा इतर यंत्र, ज्यांमुळे शक्तीची निर्मिती किंवा पुरवठा होतो.

(आय) 'परिवर्तनीय यंत्रणा' म्हणजे, कोणतेही गतिचक्र, वर्तुळी कप्पा, कप्प्याची योजना, संक्रमक, चकती, पट्टा किंवा इतर साधनसामग्री किंवा शक्तीला

चालना मिळून त्याचे परिवर्तन होते किंवा कोणत्याही यंत्रणेने किंवा साधनाने शक्तीचा पुरवठा होतो.

(ज) 'यंत्रणा' यांत मुख्य चलन, रूपांतर किंवा इतर कोणतेही साधन की ज्यामुळे शक्तीचे जनन, रूपांतर, परावर्तन होते किंवा लागू होते.

(के) 'निर्मिती प्रक्रिया' म्हणजे–

(i) कोणतीही वस्तू किंवा उपयोग, विनियोग विक्री व विल्हेवाट करणे या हेतूने तयार करणे, फेरफार करणे, कलाकुसर घडविणे, घासणे, स्वच्छ करणे, बांधणे, मोडणे, वितळविणे किंवा घडविणे.

[(ii) तेल, पाणी, मैला आणि इतर द्राव भरणे, उपसणे, वाहून नेणे,]

(iii) शक्तीचे जनन, रूपांतर आणि वहन

[(iv) छपाईसाठी मुद्रिते जुळविणे, ठसविणे, शिळा मुद्रण, छाया मुद्रण पद्धत किंवा तत्सम मुद्रण किंवा पुस्तक बांधणी ]

(v) जहाजांची भांडयांची बांधणी, पुनर्बांधणी दुरुस्ती, पुनर्जोडणी-घासणी, [किंवा]

(vi) शीतगृहात कोणत्याही वस्तूंचे रक्षण व साठवण इत्यादी क्रिया प्रक्रिया)

(ल) 'कामगार' म्हणजे निर्मिति-प्रक्रियेशी निगडीत असणाऱ्या निर्मिती कार्यासाठी, तदनुषंगिक कार्यासाठी, निर्मिति-प्रक्रियेच्या जागेत, यांत्रिकी भागाचे साफ सफाईसाठी वेतनावर असो वा नसो, [प्रत्यक्षपणे किंवा कोणत्याही मध्यस्थामार्फत निर्मिती प्रक्रियेच्या अधीन] [पण केंद्रीय दल इत्यादींचा सदस्य त्यांत समाविष्ट नाही] असा इसम.

(म) 'कारखाना' म्हणजे कोणतीही जागा, त्याच्या परिसरासह.

(i) जेथे दहा किंवा अधिक कामगार काम करतात किंवा संपलेल्या बारा महिन्यांतील कोणत्याही दिवशी काम करीत होते व शक्तीच्या सहाय्याने किंवा सामान्यपणे निर्मिती प्रक्रिया केली जाते असा कोणताही भाग, किंवा

(ii) जेथे वीस किंवा अधिक कामगार काम करतात किंवा संपलेल्या बारा महिन्यांतील कोणत्याही दिवशी काम करीत होते आणि शक्तीच्या सहाय्या-शिवाय किंवा सामान्यपणे निर्मिती प्रक्रिया केली जाते असा कोणताही भाग पण [खाण अधिनियम १९५२ (सन १९५२ चा क्रमांक ३५)] च्या अधीन असणाऱ्या कार्यकृतींचा किंवा [केंद्रीय इत्यादी दलाचे फिरते पथक, रेल्वेचे हॉटेल, उपहार गृह किंवा खाद्यगृह यांचा त्यांत समावेश नाही.

चालना मिळून ज्याचे परिवर्तन होते किंवा कोणत्याही यंत्रणेने किंवा साधनाने शक्तीचा पुरवठा होतो.

(ज) 'यंत्रणा' यांत मुख्य चलन, रूपांतर किंवा इतर कोणतेही साधन की ज्यामुळे शक्तीचे जनन, रूपांतर, परावर्तन होते किंवा लागू होते.

(के) 'निर्मिती प्रक्रिया' म्हणजे–

(i) कोणतीही वस्तू तिचा उपयोग, विनियोग विक्री व विल्हेवाट करणे या हेतूने तयार करणे, फेरफार करणे, कलाकुसर घडविणे, घासणे, स्वच्छ करणे, बांधणे, मोडणे, वितळविणे किंवा पकविणे.

[4] [ (ii) तेल, पाणी, मैला आणि इतर द्राव भरणे, उपसणे, वाहून नेणे, ]

(iii) शक्तीचे जनन, रूपांतर आणि वहन

[5] [ (iv) छपाईसाठी मुद्रिते जुळविणे, ठसविणे, शिला मुद्रण, छाया मुद्रण मुद्रण किंवा तत्सम मुद्रण किंवा पुस्तक बांधणी ]

(v) जहाजांची मांडण्यांची बांधणी, पुनर्बांधणी दुरुस्ती, पुनर्जोडणी-घासणी, [6] [किंवा]

[7] (vi) शीतगृहात कोणत्याही वस्तूंचे रक्षण व साठवण इत्यादी किंवा प्रक्रिया )

(ल) 'कामगार' म्हणजे निर्मिति–प्रक्रियेशी निगडीत असणाऱ्या निर्मिती कार्यासाठी, तदनुषंगित कार्यासाठी, निर्मिति–प्रक्रियेच्या जागेत, यांत्रिकी भागाचे साफ सफाईसाठी वेतनावर असो वा नसो, [8] [ प्रत्यक्षपणे किंवा कोणत्याही मध्यस्थामार्फत निर्मिती प्रक्रियेच्या अधीन ] [9] [ पण केंद्रीय दल इत्यादींचा सदस्य त्यांत समाविष्ट नाही ] असा इसम.

(म) 'कारखाना' म्हणजे कोणतीही जागा, त्याच्या परिसरासह.

(i) जेथे दहा किंवा अधिक कामगार काम करतात किंवा संपलेल्या बारा महिन्यांतील कोणत्याही दिवशी काम करीत होते व शक्तीच्या सहाय्याने किंवा सामान्यपणे निर्मिती प्रक्रिया केली जाते असा कोणताही भाग, किंवा

(ii) जेथे वीस किंवा अधिक कामगार काम करतात किंवा संपलेल्या बारा महिन्यांतील कोणत्याही दिवशी काम करीत होते आणि शक्तीच्या सहाय्या-शिवाय किंवा सामान्यपणे निर्मिती प्रक्रिया केली जाते असा कोणताही भाग पण[10] [ खाण अधिनियम १९५२ ( सन १९५२ चा क्रमांक ३५ ) ] च्या अधीन असणाऱ्या कार्यकुलांचा किंवा [11] [ केंद्रीय इत्यादी दलाचे फिरते पथक, रेल्वेचे हॉटेल, उपहार गृह किंवा खाद्यगृह यांचा त्यांत समावेश नाही.

[११] [स्पष्टीकरण– या सदराच्या कारणास्तव कामगारांच्या संख्येच्या गणने-साठी दिवसभरात निरनिराळ्या पाळ्यांत/विभागांत नेमलेल्या सर्व कामगारांचा अंतर्भाव केला पाहिजे. ]

( न ) 'कब्जेदार' म्हणजे कारखान्याच्या व्यवहारावर ज्याचे निरंकुश नियंत्रण आहे असा कार्यकारी प्रतिनिधी, कारखान्याचा कब्जेदार समजला पाहिजे.

[१२] [परंतु असे की दुरुस्तीखाली असलेल्या किंवा ज्यावर देखभालीचे काम चालू असेल अशा भाड्याने देण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या गोदीतील नांगरलेल्या जहाजाच्या बाबतीत ]–

( १ ) गोदीचा मालक हा खाली नमूद केलेल्या बाबींच्या कारणास्तव कब्जेदार असल्याचे समजले पाहिजे.

( अ ) कलम ६, कलम ७, कलम ११ किंवा कलम १२,

( ब ) कलम १७ गोदीत व त्याच्या परिसरात योग्य व पुरेशा प्रकाशाच्या देखभालीसाठी पुरविला जात असेल त्या संबंधात

( क ) कलम १८, कलम १९, कलम ४२, कलम ४६, कलम ४७ किंवा कलम ४९ अशा दुरुस्तीच्या व देखभालीच्या कामावर नेमलेल्या कामगारांचे संबंधात–

( २ ) कलम १३, कलम १४, कलम १६, किंवा कलम १७ ( या परंतु-कातील अन्यथा तरतुदी रजित करून ) किंवा प्रकरण ४ कलम २७ व्यतिरिक्त, किंवा कलम ४३ कलम ४४ किंवा कलम ४५, प्रकरण ६, प्रकरण ७, प्रकरण ८ किंवा कलम १०८, कलम १०९ किंवा कलम ११० ने किंवा खाली तरतुदीलेल्या, त्या कोणत्याही बाबीच्या कारणास्तव जहाजाचा मालक, किंवा त्याचा प्रति-निधी किंवा गुमास्ता किंवा दुसरा अधिकारी किंवा अशा मालकाबरोबर, प्रतिनिधीबरोबर, गुमास्त्याबरोबर किंवा अधिकाऱ्याबरोबर करार केलेला कोणीही इसम.

( अ ) प्रत्यक्षपणे त्याने, किंवा त्याने त्याच्या कोणाही प्रतिनिधीमार्फत नेमलेला कामगार

( ब ) अशी दुरुस्ती व देखभालीच्या कामाद्वारे वापरात असलेली यंत्र-सामग्री, प्रकल्प किंवा जागा यांचे बाबतीत–

[ असा मालक, प्रतिनिधी, गुमास्ता किंवा अधिकारी असलेल्या कोणताही इसम. ]

(ओ) 'कार्यकारी प्रतिनिधी' यास इंडियन कंपनीज ॲक्ट १९१३ ( सन १९१३ चा क्रमांक ७ ) यांत जो अर्थ आहे तो.

(पी) 'विहित' म्हणजे या अधिनियमाखाली राज्य शासनाने केलेल्या नियमान्वये विहित केलेले

(क्यू) [× × ×]

(र) जेव्हा त्याच प्रकारचे काम कामगारांच्या दोन किंवा अधिक गटाकडून दिवसाच्या निरनिराळ्या काळात केले जाते तेव्हा कामगारांच्या अशा गटास 'विभाग' असे म्हटले जाते व अशा काळास 'पाळी' असे म्हटले जाते.

३. दिवसाच्या वेळेस निर्देश – या अधिनियमात दिवसाचे वेळेस निर्देश म्हणजे ग्रीनिच वेळेपेक्षा साडेपाच तास पुढे असलेला भारतीय प्रमाण वेळेचा निर्देश.

परंतु असे की भारतीय प्रमाण वेळ जेथे पाळली जात नाही अशा कोणत्याही क्षेत्रासाठी राज्य शासनाने नियम करावेत.

(अ) क्षेत्रीय मर्यादा स्पष्ट करणे.

(ब) स्थानिक क्षेत्रात सर्वसाधारणपणे जी वेळ पाळली जाते ती स्थानिक वेळ व्याख्यित करणे.

(क) क्षेत्रात असलेल्या सर्व किंवा कोणत्याही कारखान्यास अशी वेळ पाळण्याबाबत परवानगी देणे.

[४. वेगवेगळी खाती, स्वतंत्र कारखाना असल्याचे किंवा दोन किंवा अधिक कारखाने मिळून एकच कारखाना असल्याचे जाहीर करण्याची शक्ती – या संबंधात कब्जेदाराने अर्ज केल्यावरून राज्यशासनाने लेखी आदेशान्वये असा आदेश द्यावा, की या अधिनियमाचे सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनास असे जाहीर करावे की कब्जेदाराच्या कारखान्याची वेगवेगळी खाती किंवा विभाग अर्जात स्पष्ट केले असेल तसे, स्वतंत्र कारखाना किंवा कब्जेदाराने अर्जात स्पष्ट केले असेल तसे दोन किंवा अधिक कारखाने मिळून एक स्वतंत्र कारखाना असल्याचे समजले पाहिजे. ]

५. सार्वजनिक आणीबाणीमध्ये वगळण्याची शक्ती – सार्वजनिक आणीबाणीच्या कोणत्याही प्रकरणी [राज्य शासनाने कार्यालयीन राजपत्रात अधिसूचित करून, या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदीतून, (कलम ६७ शिवाय) अशा कालावधीसाठी आणि त्यांना योग्य वाटेल अशा शर्तींच्या अधीन कोणताही कारखाना, किंवा वर्ग किंवा कारखान्याचा प्रकार वगळावा.

परंतु असे की एका वेळेस तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी काढेल अशी अधिसूचना असता कामा नये.

[स्पष्टीकरण – या कलमाच्या कारणावरून 'सार्वजनिक आणीबाणी' म्हणजे युद्धामुळे असो, बहिर्गत आक्रमणामुळे किंवा अंतर्गत अस्थिरतेमुळे असो,

भारताची किंवा त्याच्या कोणत्याही क्षेत्रीय भागाची सुरक्षितता गंभीर धोक्यात आलेली असते.]

**६. कारखान्याची मान्यता, परवाना आणि नोंदणी** – [२१][राज्य] शासनाने नियम करावेत.

[२२][(अ) या अधिनियमाच्या कारणास्तव मुख्य निरीक्षक किंवा राज्य शासन यांना कोणत्याही कारखान्याचा वर्ग किंवा प्रकार याचा नकाशा सादर करण्यास भाग पाडणे.]

[२३][(अ अ) राज्य शासन किंवा मुख्य निरीक्षक यांची कारखान्याची जागा मिळविण्याची आणि कोणत्याही कारखान्याची किंवा त्याच्या वर्गाची किंवा कारखान्याच्या प्रकाराची इमारत बांधणीची किंवा विस्तारीत करण्याची लेखी पूर्वपरवानगी घेण्यास भाग पाडणे.]

(ब) अशा परवानगीसाठी अर्जाचा विचार करण्याच्या कारणास्तव नकाशे आणि स्पष्टता सादर करण्यास भाग पाडणे.

(क) असे नकाशे आणि स्पष्टता यांचे स्वरूप विहित करणे आणि कोणी ते प्रमाणित करावेत.

(ड) कारखान्याची किंवा त्याच्या वर्गाची किंवा कारखान्याच्या प्रकाराची नोंदणी आणि परवाना घेण्यास भाग पाडणे आणि अशा परवान्यासाठी व नोंदणी-साठी आणि परवान्याच्या नूतनीकरणासाठी शुल्क विहित करणे.

(इ) कलम ७ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे नोटीस दिल्याशिवाय परवाना किंवा त्याचे नूतनीकरण न करण्यास भाग पाडणे.

(२) पोटकलम १ चे [२४][सदर (अ अ) खाली निर्देश केल्याप्रमाणे परवानगीसाठी, सदर (ब) खालील नियमाने आवश्यकता असणारे नकाशे व स्पष्टता जोडून अर्ज केल्यावर राज्य शासनास किंवा मुख्य निरीक्षकास नोंदणी करून पाठविल्यावर असे पाठविल्याच्या तारखेपासून तीन महिन्याच्या कालावधीत अर्जदारास काही कळविण्यात आले नाही तर अशा अर्जात मागितलेली परवानगी मंजूर केली असल्याचे समजले पाहिजे.

(३) जेव्हा [२५][राज्य] शासन किंवा मुख्य निरीक्षक जागेची परवानगी देण्याचे, बांधण्याचे किंवा कारखान्याच्या विस्ताराचे किंवा नोंदणी करण्याचे, कारखान्याचा परवाना देण्याचे नाकारील, तेव्हा अर्जदाराने अशा नाकारण्याच्या तारखेपासून तीस दिवसांचे आत, केंद्र शासनास, जर निर्णय राज्य शासनाचा असेल तर आणि इतर कोणत्याही प्रकरणी [२६][राज्य] शासनास आवाहन करावे.

**स्पष्टीकरण** – कोणतेही भांडे किंवा यंत्र किंवा विहित केलेल्या अशा मर्यादित केवळ बदल्याच्या कारणास्तव, कोणत्याही यंत्रात किंवा भांड्यात काही आधिक्य केल्याच्या कारणास्तव, [ जर असा बदल किंवा आधिक्य भांड्याच्या किंवा यंत्राच्या सभोवतालची सुरक्षेसाठी आवश्यक अशी किमान मोकळी जागा कमी होणार नाही, किंवा उष्णता, धाक किंवा धूळ यांच्या प्रसारणास विपरीतता येऊन आरोग्याला घातक होणार नाही. ] असा बदल या कलमाच्या अर्थानुसार कारखान्याचा विस्तार झाल्याचे समजले जाता कामा नये.

**७. कब्जेदाराने द्यावयाची नोटीस** – ( १ ) कारखाना म्हणून कोणतीही जागा ताब्यात घेण्यापूर्वी किंवा वापरात घेण्यापूर्वी कब्जेदाराने निदान पंधरा दिवस आधी मुख्य निरीक्षकास–

( अ ) कारखान्याचे नाव व स्थलदर्शक.

( ब ) कब्जेदाराचे नाव आणि पत्ता

११ [ ( ब ब ) कलम ९३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जागेच्या किंवा इमारतींच्या त्याच्या परिसरासह मालकाचे नाव आणि पत्ता. ]

( क ) कारखान्याशी संबंधित पत्रव्यवहार ज्या पत्त्यावर पाठवावयाचा, तो पत्ता

( ड ) निर्मितिप्रक्रियेचे स्वरूप.

( i ) या अधिनियमाच्या प्रारंभीच्या दिवशी अस्तित्वात असणाऱ्या कारखान्याच्या बाबतीत संपलेल्या बारा महिन्यांच्या काळात चालू असलेल्या निर्मिती प्रक्रियेचे स्वरूप.

( ii ) इतर सर्व कारखान्यांच्या बाबतीत पुढील बारा महिन्यांत चालू करावी असलेल्या निर्मिती प्रक्रियेचे स्वरूप.

३१ [ ( इ ) कारखान्यात बसविलेल्या किंवा बसवावयाच्या एकूण अश्वशक्तीची क्षमता; यात स्वतंत्रपणे उभ्या केलेल्या स्थिर भांड्याच्या अश्वशक्तीची क्षमता समाविष्ट केली जाता कामा नये. ]

( फ ) या अधिनियमाच्या कारणास्तव कारखान्याच्या व्यवस्थापकाचे नाव.

( ग ) कारखान्यात नेमणे असलेल्या नोकरांची संख्या.

( ह ) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिवशी अस्तित्वात असणाऱ्या कारखान्याच्या बाबतीत संपलेल्या बारा महिन्यांच्या कालावधीतील कोणत्याही तारखेची नेमलेल्या कामगारांची दैनंदिन सरासरी संख्या.

( आय ) जसा विहित केला असेल असा इतर तपशील.

(२) प्रथमतः या अधिनियमाच्या कक्षेत येतील अशा सर्व आस्थापनांच्या बाबतीत कब्जेदाराने मुख्य निरीक्षकास पोट कलम (१) मध्ये स्पष्ट केलेला तपशील नमूद केलेली नोटीस या अधिनियमाच्या प्रारंभीच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत पाठविली पाहिजे.

(३) वर्षाच्या एकशेऐंशी पेक्षा सर्वसाधारणपणे कमी नाही अशा काळात कारखान्यात निर्मितिप्रक्रिया चालू करण्यापूर्वी, असे काम सुरू करण्यापूर्वी [११] [ निदान तीस दिवस आधी पोट कलम (१) मध्ये स्पष्ट केलेला तपशील नमूद केलेली नोटीस कब्जेदाराने मुख्य निरीक्षकास पाठविली पाहिजे.]

(४) जेव्हा जेव्हा नवीन व्यवस्थापकाची नियुक्ती केली जाईल, तेव्हाँ कब्जेदाराने [१०] [ निरीक्षकास अशा इसमाने कामाची सूत्रे हाती घेतल्यापासून सात दिवसांच्या आत लेखी नोटीस पाठविली पाहिजे व मुख्य निरीक्षकास त्याची प्रत पाठविली पाहिजे. ]

(५) व्यवस्थापक म्हणून इसमास हुद्दा दिलेला नाही अशा कोणत्याही कालावधीत, किंवा हुद्दा असलेला इसम कारखान्याचे व्यवस्थापन करीत नसेल अशा कोणत्याही कालावधीत, कोणीही इसम व्यवस्थापक म्हणून काम करीत असल्याचे आढळेल किंवा असा इसम न आढळेल, तेव्हा कब्जेदार स्वतः या अधिनियमाचे कारणास्तव व्यवस्थापक असल्याचे समजले गेले पाहिजे.

---

१. अॅडॉप्टेशन ऑफ लॉज ऑर्डर १९५० अन्वये
२. वरील प्रमाणे 'जम्मू आणि काश्मीर' हे शब्द वगळले.
३. सन १९५४ चा क्रमांक २५ अन्वये
४. सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये
५. सन १९५४ चा क्रमांक २५ अन्वये
६. सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये
७. वरील प्रमाणे
८. वरील प्रमाणे
९. वरील प्रमाणे
१०. सन १९५४ चा क्रमांक २५ अन्वये
११. सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये
१२. वरील प्रमाणे
१३. वरील प्रमाणे
१४. अॅडॉप्टेशन ऑफ लॉज ऑर्डर १९५० अन्वये
१५. इंडियन कंपनीज अॅक्ट १९५६ ( १९५६ चा क्रमांक १ )
१६. अॅडॉप्टेशन ऑफ लॉज ऑर्डर १९५० अन्वये



१७. सन १९५४ चा क्रमांक २५ अन्वये
१८. वरील प्रमाणे
१९. सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये
२०. अॅडॉप्टेशन ऑफ लॉज ऑर्डर १९५० अन्वये
२१. सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये
२२. वरील प्रमाणे फेर क्रमांक
२३. वरील प्रमाणे
२४. वरील प्रमाणे
२५. सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये
२६. सन १९४९ चा क्रमांक ४० अन्वये
२७. सन १९५४ चा क्रमांक २५ अन्वये

भाष्य – ( कलमे १ ते ७ ब )

शिपीकामात यंत्रांच्या मदतीने शिवलेल्या कपड्याची दुरुस्ती करणे, ही निर्मिती प्रक्रियेचा एक भाग समजला जातो. प्रत्यक्ष कापड शिवण्यात शक्तीचा वापर करण्यात आला नसला तरी शिपी कामाचे जागेत शिवलेल्या कापडाची दुरुस्ती जर शक्तीचा वापर करून केली जात असेल तर दुरुस्ती, हा निर्मिती प्रक्रियेचा भाग असल्याचे या अधिनियमाखाली आंध्र प्रदेश हायकोर्टाने ठरविले आहे. ( इ. एस. आय कार्पोरेशन वि. एस्पायर टेलर्स आणि इतर १९८५ (२) लेबर लॉ नोट्स १०१ )

बांधकाम करणाऱ्या कंपनीने, बांधकामाचे जागेवर तात्पुरत्या उभारलेल्या शेडमध्ये ड्रिलिंग व वेल्डिंगची कामे जरी शक्तीच्या मदतीने चालू ठेवली असतील तरीही त्यास 'कारखाना' ही संज्ञा प्राप्त होत नाही. त्यासाठी कंपनीची प्रमुख व महत्त्व निर्मिती प्रक्रिया बांधकामाच्या जागेत असली पाहिजे. (सायमन कॉर्पोरेशन इंडिया लि. वि. गुजरात राज्य १९८० एपी एल. १२८) 'कारखाना' ही संज्ञा प्राप्त होण्यासाठी–

(१) जागेवर, २० किंवा अधिक इसमांची वेतनावर नेमणूक झालेली असली पाहिजे.

(२) निर्मिती प्रक्रियेचे काम जागेवर शक्तीच्या सहाय्याने होत असले पाहिजे.

या दोन बाबींचे अस्तित्व प्रस्थापित झाले पाहिजे. ( अपवाद कलम ८५ च्या तरतुदींचा ) एस. के. विश्वास वि. ई. एस. आय. कार्पोरेशन १९७९ (३८) एफ. एल आर. २१७ )

हॉटेलमध्ये विजेवर निरनिराळे अन्नपदार्थ भाजले/शिजवले जातात व त्यासाठी विजेवर वापरता येणारी भांडी उपयोगात आणली जातात. ही निर्मिती

कलम २ (के) च्या व्याख्येच्या व्याप्तीत येते व असे हॉटेल 'कारखाना' या संज्ञेत येते. ( पुना इंडस्ट्रियल हॉटेल लि. वि. आय. सी. मरीन १९८० लेबर अँड इंडस्ट्रियल केसेस १०० )

पेट्रोल पंपावर टाकीतील पेट्रोल शक्तीच्या सहाय्याने पंपाने उपसले जाण्याची प्रक्रिया 'निर्मिती' प्रक्रियेत येते व त्यास 'कारखाना' ही संज्ञा प्राप्त होते. ( वेटने ऑटो सर्व्हिसेस वि. इ. एस. आय. कार्पोरेशन १९८१ ए. पी. एस. ४६ )

कारखाने अधिनियम खालील नोंदणी आणि मुंबई दुकाने आणि आस्थापना अधिनियम खालील व्यावसायिक आस्थापना म्हणून केलेली नोंदणी यात फरक असून दोनही उपक्रम वेगवेगळे आहेत तरीही वेगवेगळी नोंदणी प्रत्येक अधिनियमाखाली झालीच पाहिजे असे नाही. प्रत्येक अधिनियमात कामगारांच्या लाभाच्या काही तरतुदी शक्तीच्या आहेतच व त्याप्रमाणे त्यांचे पालन करण्याची सक्तीची तरतूद निर्वाच्यापर बंधनकारक आहे ( एस. पी. केमिकल्स अँण्ड डाईज ट्रेडिंग एम्प्लॉईज युनियन वि. एस. पी. केमिकल्स अँण्ड डाईज ट्रेडिंग लि. १९८६ (१) एल एल जे ४९० )

काही हॉस्पिटलमध्ये 'कपडा-खाते' म्हणून एक वेगळे खाते असते. हॉस्पिटलमध्ये चालणाऱ्या कामाचा एक तदनुषंगिक भाग आहे. जरी हे काम निर्मिती प्रक्रियेशी तत्सदृश प्रक्रियेचे असले, तरी 'कारखाना' या संज्ञेत येत नाही व हॉस्पिटल किंवा हॉस्पिटलचे 'कपडा खाते' ( Linen Department ) यांस 'कारखाना' ही संज्ञा प्राप्त होत नाही. डॉ. पी. एल. एल. सुंदर राव वि. इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीज १९८५ लेबर अँण्ड इंडस्ट्रियल केसेस ५५५ )

इंग्रजी 'ऑक्युपायर' या शब्दाचे मराठी भाषांतर महाराष्ट्र शासनाने 'भोगवटादार' असे केले आहे. या पुस्तकात काही ठिकाणी 'कब्जेदार' तर काही ठिकाणी 'ताबेदार' असे संदर्भानुसार केले आहे. याकडे कृपया लक्ष द्यावे ही विनंती प्रत्येक कारखान्यात ऑक्युपायर असा हुद्दा व त्या हुद्द्यास अनुरूप अशी कर्तव्ये करणारा व अनुरूप अशा शक्तींचा वापर करणारा इसम असलाच पाहिजे, असा या अधिनियमाचा कटाक्ष आहे. ज्या कारखान्यात असा इसम नेमलेला नसेल तेथे मालक हाच ऑक्युपायर असतो आणि ती कंपनी असेल तर कंपनीचे सर्व विद्यमान संचालक विद्यमान काळी ऑक्युपायर असतात. त्याप्रमाणे कंपनीचा व्यवस्थापक हाही ऑक्युपायर असल्याचे समजले जाते. ( ओरीएंट पेपर मिल्स वि. चीफ इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीज १९७९ लेबर अँण्ड इंडस्ट्रियल केसेस ७४६; ज्योती स्विच गीअर्स लि. वि. चीफ इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीज १९७७ ( ३४ ) एफ एल आर ३५४ )

---



# प्रकरण २

## निरीक्षकीय कर्मचारी

८. निरीक्षक – (१) [1] [ राज्य ] शासनाने, कार्यालयीन राजपत्रात अधिसूचित करून, या अधिनियमाचे कारणास्तव विहित अर्हता धारण करीत असतील अशा इसमांची नियुक्ती करावी आणि त्यांस योग्य वाटेल अशी स्थलसीमा नेमून द्यावी.

(२) [1] [ राज्य ] शासनाने, कार्यालयीन राजपत्रात अधिसूचित करून मुख्य निरीक्षक म्हणून कोणाही इसमाची, की जो या अधिनियमाखाली असलेल्या मुख्य निरीक्षकाच्या शक्तींबरोबर निरीक्षकास असलेल्या शक्तींचाही सर्व राज्यभर वापर करील-नियुक्ती करावी.

[2] [( २ अ ) [1] [ राज्य ] शासनाने, कार्यालयीन राजपत्रात अधिसूचित करून अतिरिक्त मुख्य निरीक्षक, सह निरीक्षक आणि उपमुख्य निरीक्षक म्हणून मुख्य निरीक्षकास मदत म्हणून आणि अशा अधिसूचनेत स्पष्ट केले असेल त्या मुख्य निरीक्षकाच्या शक्तींचा वापर करण्यासाठी योग्य वाटतील तितक्या इसमांची नियुक्ती करावी.]

[( २ ब ) प्रत्येक अतिरिक्त मुख्य निरीक्षकाने, सह-मुख्य निरीक्षकाने, उपमुख्य निरीक्षकाने आणि पोट कलम ( २ अ ) खाली नियुक्ती केलेल्या प्रत्येक अधिकाऱ्याने, ज्याने त्याची नियुक्ती केली आहे त्या अधिसूचनेत स्पष्ट केलेल्या मुख्य निरीक्षकाच्या शक्तींबरोबरच निरीक्षकाच्या शक्तींचाही सर्व राज्यभर वापर केला पाहिजे.]

( ३ ) पोट कलम ( १ ), पोट कलम ( २ ), [1] [ पोट कलम ( २ अ ) ] किंवा पोट कलम (५) खाली ज्या इसमाची नेमणूक केली आहे त्याने, ज्याचे कारखाना किंवा त्यांची प्रक्रिया यांची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हितसंबंध आहेत किंवा त्यांत चालू असलेल्या व्यवहाराशी किंवा यंत्र किंवा त्याची तजद यांची प्रत्यक्ष अप्रत्यक्ष हितसंबंध आहेत त्याने पदधारण पुढे चालू ठेवता कामा नये.

( ४ ) प्रत्येक जिल्हा दंडाधिकारी, त्याच्या जिल्ह्याचा निरीक्षक राहील.

( ५ ) [1] [ राज्य ] शासनाने, वरीलप्रमाणे अधिसूचनेने त्यांस योग्य वाटेल अशा लोक अधिकाऱ्यांची या अधिनियमाच्या सर्व वा काही प्रयोजनास्तव त्यांना नेमून दिलेल्या स्थलसीमेसाठी अनुक्रमे अतिरिक्त निरीक्षक म्हणून नियुक्ती करावी.

(६) ज्या क्षेत्रात एकापेक्षा अधिक निरीक्षक असतील तेथे ' [राज्य] शासनाने वरील प्रमाणे अधिसूचनेने, निरीक्षकाने वापरावयाच्या ज्या शक्ती आहेत त्या आणि ज्यांना अशा विहित नोटिसा पाठवावयाच्या आहेत ते निरीक्षक जाहीर करावेत.

(७) ' [प्रत्येक मुख्य निरीक्षकास, अतिरिक्त मुख्य निरीक्षकास, सह निरीक्षकाने, उप निरीक्षकास आणि या कलमाखाली नियुक्ती केलेल्या प्रत्येक इतर अधिकाऱ्यास इंडियन पीनल कोड १८६० (सन १८६० चा क्रमांक ४५) च्या अर्थान्वये लोकसेवक असल्याचे समजले पाहिजे आणि राज्य शासन या संबंधात स्पष्ट करील त्या अधिकाऱ्याचे ते कार्यालयीन अनिष्ठ अधिकारी म्हणून राहिले पाहिजेत.

९. निरीक्षकांच्या शक्ती – यासंबंधात केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीन निरीक्षकाने, त्यास ज्या स्थानिक क्षेत्रासाठी नेमले असेल, त्या स्थानिक क्षेत्रात–

(अ) जो शासकीय नोकरीत आहे किंवा कोणत्याही स्थानिक किंवा इतर लोकाधिकारी अशा मदतनिसासह जसे त्यास योग्य वाटेल त्या, कारखान्यासाठी वापरात असलेल्या किंवा वापरात असल्याच्या प्रयोजनास्तव विश्वास असेल त्या कारखान्यात प्रवेश करावा.

(ब) जागेचे, प्लँटचे आणि यंत्रांचे परीक्षण करावे, कोणतेही विहित पुस्तक आणि कारखान्याशी संबंधित असा कोणताही दस्त दाखल करण्यास भाग पाडावे आणि जागेवर अथवा अधिनियमाच्या कारणास्तव व आवश्यक वाटेल त्या कोणत्याही इसमाचे निवेदन घ्यावे.

(क) या अधिनियमाच्या कारणास्तव विहित तरतुदींच्या पालनासाठी अशा इतर शक्तींचा वापर करावा.

परंतु असे, की या कलमाखाली कोणत्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी किंवा स्वतःच दोषी असल्याचा कोणताही पुरावा देण्यासाठी कोणाही व्यक्तीवर सक्ती केली जाता कामा नये.

१०. प्रमाणाधिकारी शस्त्रवैद्य – (१) या अधिनियमाच्या कारणास्तव अर्हताप्राप्त वैद्यकीय व्यवसायीस राज्य शासनाने अशा क्षेत्र मर्यादित किंवा अशा कारखान्यात किंवा गट किंवा कारखान्याच्या प्रकारात जसे नेमून दिले असेल तसे नेमणूक केली पाहिजे.

(२) प्रमाणाधिकारी शस्त्रवैद्याने राज्य शासनाच्या संमतीने कोणाही अर्हताप्राप्त वैद्यकीय व्यवसायास या अधिनियमाखालील कोणत्याही शक्तीचा



वापर करण्यासाठी अशा कालावधीसाठी स्पष्ट करून राज्य शासनास योग्य वाटेल त्या अटींच्या अधीन प्राधिकृत करावे आणि अशा प्राधिकृतता केली जाईल तेव्हा या अधिनियमान्वये प्रमाणाधिकारी शस्त्रवैद्याला केलेला निर्देश कोणत्याही अर्हताप्राप्त शस्त्रवैद्याला निर्देश केला असल्याचे समजले गेले पाहिजे.

(३) जो कारखान्याचा कब्जेदार आहे, किंवा त्यात आहे किंवा यातील कोणत्याही प्रक्रियेत किंवा व्यवसायात किंवा कोणत्याही हक्कात किंवा त्याशी संबंधित असणाऱ्या यंत्रणेत किंवा अन्यथा कारखान्यातील नेमणुकीत प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे हितसंबंधित आहे किंवा झाला आहे अशा इसमास प्रमाणाधिकारी शस्त्रवैद्य म्हणून प्रमाणाधिकारी शस्त्रवैद्याच्या शक्तींचा वापर करण्यासाठी किंवा अशा शक्तींचा वापर चालू ठेवण्यासाठी नेमले अथवा प्राधिकृत करण्यासाठी नेमले अथवा प्राधिकृत केले जाता कामा नये.

परंतु असे की राज्य शासनाने, लेखी आदेशाने आणि आदेशात स्पष्ट केलेल्या अटींच्या अधीन कोणत्याही इसमास किंवा इसमांच्या वर्गास, कोणत्याही कारखान्याच्या किंवा त्याच्या गटाच्या संबंधात या पोटकलमाच्या तरतुदींपासून मुक्त करावे.

(४) प्रमाणाधारी शस्त्रवैद्याने या संबंधात विहित केले असेल, अशी कर्तव्ये बजावली पाहिजेत.

(अ) या अधिनियमाखाली तरुण इसमाची परीक्षा घेणे व प्रमाणित करणे.

(ब) जे इसम कारखान्यात अशा धोक्याच्या कामात किंवा विहित केले असेल अशा प्रक्रियेत काम करीत असतील त्यांची परीक्षा घेणे.

(क) कोणत्याही कारखान्यासाठी किंवा त्याच्या वर्गासाठी विहित केले असेल अशा वैद्यकीय पर्यवेक्षणीय शर्तींच्या वापरात जेव्हा,

(i) निर्मिती प्रक्रियेच्या स्वरूपाच्या असल्याबद्दल विश्वास ठेवता येईल किंवा त्यातून उद्भवणाऱ्या कामाच्या इतर अटींच्या स्वरूपाच्या असल्याबद्दल आजारीपणाच्या प्रकरणी,

(ii) निर्मिती प्रक्रियेच्या कामात बदल झालेल्या कारणामुळे किंवा त्यात वापरलेल्या महत्तमतेमुळे किंवा कोणतीही नवी निर्मिती प्रक्रिया सुरू केल्याच्या कारणामुळे किंवा निर्मिती प्रक्रियेत कोणतीही नवी महत्तमता वापरात आणल्यामुळे निर्मिती प्रक्रियेत नेमलेल्या कामगारांच्या आरोग्याला इजा पोहोचणे संभवनीय असेल;

(iii) कोणत्याही कामासाठी नेमलेल्या तरुण इसमाच्या किंवा तरुण होणाऱ्या इसमांच्या आरोग्यास इजा पोहोचणार असेल;

स्पष्टीकरण – या कलमात 'अर्हताप्राप्त वैद्यकीय व्यवसायी' म्हणजे इंडियन मेडिकल डिग्री ॲक्ट १९१६ (१९१६ चा क्रमांक ७) किंवा ५ इंडियन मेडिकल कौन्सिल ॲक्ट १९३३ (१९३३ चा क्रमांक २७) यांतील सूचीत स्पष्ट केल्या प्रमाणे प्राधिकाऱ्याने मंजूर केलेली अर्हता धारण करीत असलेला इसम.

---

१. ॲडॅप्टेशन ऑफ लॉज, ऑर्डर्स १९५० अन्वये
२. सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये
३. वरील प्रमाणे
४. वरील प्रमाणे
५. वरील प्रमाणे

भाष्य (कलम ८ ते १०)

कारखान्याचा निरीक्षक म्हणून ज्याची नेमणूक करावयाची त्याचे नाव व ती नेमणूक राजपत्रात राज्य शासनाने प्रसिद्ध केले पाहिजे. ज्याच्या नेमणुकीत विशिष्ट स्थानिक क्षेत्राचा उल्लेख नसेल त्यास सर्व राज्यांत निरीक्षकासाठी विहित केलेली कर्तव्ये बजावता येतील व निरीक्षकासाठी विहित केलेल्या शक्तींचा वापर करता येईल. (पी. एस. दुबे वि. उत्तर प्रदेश राज्य १९७८ (२७) एफ. एल आर. ३२४) याच दाव्यात असाही एक निर्णय आहे, की कारखाना निरीक्षकाने मॅजिस्ट्रेटकडे केलेली तक्रार ही क्रिमिनल प्रोसीजर कोडच्या कलम १९० प्रमाणे कायदेशीर तक्रार आहे.

---

## प्रकरण ३

## आरोग्य

११. स्वच्छता – (१) प्रत्येक कारखाना स्वच्छ ठेवला पाहिजे आणि गटारे, संडास किंवा इतर उपद्रवी प्रदूषणापासून मुक्त ठेवले पाहिजेत; विशेषतः–

(अ) दररोज साफसफाई करून किंवा कोणत्याही परिणामकारक पद्धतीने, माळा, कामगारांची बाके, जिना, पाण्यायेण्याच्या वाटा यांवरील धाणीची आणि धुळीची साठवण काढून टाकली पाहिजे.

(ब) प्रत्येक कामगाराची जागा निदान आठवड्यापासून एकदा धुऊन संसर्ग-नाशके वापरून जेथे आवश्यकता असेल तेथे, किंवा इतर कोणत्याही परिणामकारक पद्धतीने, स्वच्छ ठेवली पाहिजेत.



(३) प्रत्येक कारखान्यात–

(अ) प्रकाशाच्या स्थानापासून प्रत्यक्षपणे अथवा गुळगुळीत किंवा पॉलिश केलेल्या भागावरील परिवर्तनामुळे डोळ्यांवर प्रकाशाची तिरीप येऊ नये म्हणून.

(ब) ज्या योगे कोणत्याही कामगाराच्या डोळ्यांवर ताण पडेल किंवा कोणत्याही कामगाराला अपघात होण्याचा धोका निर्माण होईल इतक्या प्रमाणात सावल्या होऊ नये म्हणून, शक्य असेल तेथवर परिणामकारक तरतूद केली पाहिजे.

(४) '[राज्य] शासनाला कारखान्यासाठी किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्यासाठी किंवा कोणत्याही वस्तुनिर्माण प्रक्रियेसाठी भरपूर व योग्य अशा प्रकारचे प्रमाण विहित करता येईल.

१८. पिण्याचे पाणी – (१) प्रत्येक कारखान्यात तेथे कामावर लावलेल्या सर्व कामगारांना योग्य व सोयीस्कर असेल अशा ठिकाणी पिण्यास सर्वस्वी योग्य अशा पाण्याचा भरपूर पुरवठा करण्याची परिणामकारक व्यवस्था केली पाहिजे व ती चालू ठेवली पाहिजे.

(२) अशा सर्व ठिकाणी 'पिण्याचे पाणी' असे सुवाच्य अक्षरात व कारखान्यात कामावर लावलेल्या बहुसंख्य कामगारांना समजणाऱ्या भाषेत लिहिले पाहिजे. आणि असे कोणतेही ठिकाण, मुख्य निरीक्षकाने कमी अंतर ठेवण्यास लेखी मान्यता दिलेली नसेल तर कोणत्याही धुण्याची जागा, मुत्री अगर शौचकूप या पासून वीस फूट अंतराच्या आत असता कामा नये.

(३) ज्या कारखान्यात सामान्यपणे अडीचशे पेक्षा अधिक कामगार कामावर लावण्यात येतात अशा प्रत्येक कारखान्यात, उन्हाळ्यात पिण्याचे पाणी परिणामकारक साधनांनी थंड करण्याची व त्याचे वाटप करण्याची तरतूद केली पाहिजे.

(४) राज्यशासनाला सर्व कारखान्यांच्या किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्यांच्या संबंधात, पोट कलम (१), (२), (३), यांच्या उपबंधांचे पालन करवून घेण्याबाबत आणि कारखान्यांतील पिण्याच्या पाण्याचा पुरवठ्याची व वाटपाची तपासणी विहित केलेल्या प्राधिकाऱ्याकडून करवून घेण्याबाबत नियम करून घेता येतील.

१९. शौचकूप व मुत्र्या – (१) प्रत्येक कारखान्यात–

(अ) सोयीस्कर ठिकाणी व कामगार कारखान्यात असेपर्यंत सर्व वेळी त्यांना तेथे जाता येईल अशा विहित केलेल्या प्रकारच्या पुरेशा शौचकूपांची व मुत्र्यांची तरतूद करता आली पाहिजे.

(ब) पुरुष कामगारांसाठी व स्त्री कामगारांसाठी निरनिराळ्या जागांची सोय केली पाहिजे.

(क) अशा सोयीच्या ठिकाणी पुरेसा प्रकाश व खेळती हवा असली पाहिजे आणि कोणत्याही शौचकूपाकडे किंवा मुतारीकडे जाण्याचा मार्ग, मुख्य निरीक्षकाने विशेषरीत्या लेखी सूट दिली नसेल तर, कोणत्याही कामाच्या खोलीला जोडून असता कामा नये; तर तो मध्ये असलेल्या मुक्त जागेतून किंवा उघडे व हवा असलेल्या वाटेने जोडलेला असला पाहिजे.

(ड) अशी सोयीची सर्व ठिकाणे ही सर्व वेळी साफ व स्वच्छ स्थितीत ठेवली पाहिजेत.

(इ) सफाईगारांना कामावर ठेवले पाहिजे. शौचकूप, मुताऱ्या व धुण्याच्या जागा स्वच्छ ठेवणे हे त्यांचे प्रमुख काम असेल.

(२) ज्या कारखान्यात सामान्यपणे अडीचशेपेक्षा अधिक कामगार कामावर लावले असतील, अशा प्रत्येक कारखान्यात–

(अ) सर्व शौचकूप व मुताऱ्या विहित केलेल्या आरोग्यकारी नमुन्याच्या असल्या पाहिजेत.

(ब) शौचकूपांच्या व मुताऱ्यांच्या जमिनी व जमिनीपासून तीन फूट उंचीपर्यंतच्या आतील भिंती व सॅनिटरी ब्लॉक्स हे त्यांचा पृष्ठभाग गुळगुळीत, पॉलिश केलेला व अभेद्य होण्यासाठी झिलई दिलेल्या फरशीचे किंवा अन्य प्रकारचे बनविले असले पाहिजेत.

(क) पोटकलम (१) च्या खंड (ब) व (ड) च्या उपबंधास हानी न पोचवता, अशा रीतीने तयार केलेल्या जमिनी, भिंतीचे भाग, लावलेले ब्लॉक्स आणि शौचकूपांतील व मुताऱ्यांतील सॅनिटरी पॅन्स स्वच्छ करणाऱ्या पदार्थांनी किंवा जंतुनाशकाने किंवा या दोन्ही पदार्थांनी दर सात दिवसाच्या मुदतीत कमीत कमी एकदा तरी धुतली पाहिजेत किंवा स्वच्छ झाली पाहिजेत.

(३) [1] [राज्य] शासनाला, कोणत्याही कारखान्यात, सामान्यपणे तेथे कामावर लावण्यात येणाऱ्या पुरुष व स्त्री कामगारांच्या संख्येच्या प्रमाणात तरतूद करावयाच्या शौचकूपांची व मुताऱ्यांची संख्या विहित करता येईल आणि तेथे कामावर लावलेल्या कामगारांच्या आरोग्याच्या दृष्टीने कारखान्याच्या आरोग्य रक्षणाच्या संबंधात, कामगारांच्याबाबत असलेली बंधने धरून त्यास आवश्यक वाटतील अशा अधिक बाबींची तरतूद करता येईल.

२०. थुंकपात्रे – (१) प्रत्येक कारखान्यात सोयीस्कर ठिकाणी पुरेशी थुंकपात्रे ठेवण्याची तरतूद केली पाहिजे आणि ती स्वच्छ व आरोग्यप्रद स्थितीत ठेवली पाहिजेत.



(२) [1] [राज्य] शासनाला, कोणत्याही कारखान्यात तरतूद करावयाच्या थुंकपात्रांचे नमुने व संख्या व त्यांची जागा विहित करण्याबाबत नियम करता येतील व त्यांना ती पात्रे स्वच्छ व आरोग्यप्रद स्थितीत ठेवण्यासंबंधीच्या अधिक बाबींची तरतूद करता येईल.

(३) कोणत्याही व्यक्तीने थुंकण्यासाठी पुरविलेल्या थुंकपात्राव्यतिरिक्त कारखान्याच्या जागेत इतर ठिकाणी थुंकता कामा नये. आणि हा उपबंध व त्याच्या उल्लंघनाबाबतची शास्ती असलेली सूचना कारखान्याच्या जागेत ठळक दिसेल अशा योग्य ठिकाणी लावली पाहिजेत.

(४) पोट-कलम (३) चे उल्लंघन करून जो कोणी थुंकेल तो पाच रुपयांहून अधिक नसेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

१. ॲडॅप्टेशन ऑफ लॉज ऑर्डर १९५० अन्वये.

प्रकरण ४

## सुरक्षितता

२१. यंत्र सामग्रीला कुंपण घालणे – (१) प्रत्येक कारखान्यात–

(एक) मूलगतिजनकाचा प्राईम मूव्हरचा–प्रत्येक फिरता भाग व मूल गतिजनकाला जोडलेले प्रत्येक गतिचक्र (फ्लाय व्हील) मग मूल गतिजनक किंवा गतिचक्र इंजिनगृहात असो वा नसो;

(दोन) प्रत्येक पाणचक्की (वॉटरव्हील) व जलचक्र/(वॉटर टरबाईन) यांचे अधिजल (हेडरेस) व अवजल (टेलरेस)

(तीन) उत्थय यंत्राच्या (लेथ) बरच्या भागा पलीकडच्या स्टॉक बारचा कोणताही भाग; आणि–

(चार) पुढील भागांना मजबूत बांधणीचे कुंपण घातले असता ते कारखान्यात कामावर लावलेल्या प्रत्येक व्यक्तीस जितके सुरक्षित झाले असते तितक्या सुरक्षित स्थितीत असल्याखेरीज किंवा त्यांची तशी ठेवणी असल्याखेरीज, पुढील भाग म्हणजे–

(अ) विद्युतजनक (जनरेटर), गतियंत्र (मोटर) किंवा चक्रवर्ती परिवर्तक रोटरी कन्व्हर्टर यांचा प्रत्येक भाग

(ब) पारेषण यंत्रसामग्रीचा प्रत्येक भाग आणि

(क) इतर कोणत्याही यंत्रसामग्रीचा प्रत्येक धोकादायक भाग;

योग्य मजबूत बांधणीच्या संरक्षक साधनाचे कुंपण घातले पाहिजे आणि ¹[अशा प्रकारे कुंपण घातलेले यंत्रसामग्रीचे भाग चालू असताना किंवा वापरण्यात येत असताना ही साधने जागच्या जागी राहिली पाहिजेत.]

¹[परंतु, यंत्रसामग्रीचा कोणताही भाग उपरोक्त प्रमाणे सुरक्षित राहील अशा स्थितीत किंवा अशा बांधणीचा आहे किंवा कसे हे ठरविण्याकरिता, कारणा-करता जेव्हा यंत्रसामग्री चालू असताना तिची तपासणी करणे, किंवा अशा तपासणीचा परिणाम म्हणून यंत्रसामग्री चालू असताना पट्टे चढवणे किंवा सरकवणे, यंत्रांना तेल देणे, किंवा ती बरोबर बसविणे आवश्यक असेल तेव्हा अशी तपासणी किंवा काम, [कलम २२, पोट-कलम (१)] च्या उपबंधानुसार करण्यात किंवा पार पाडण्यात येते तेव्हा अशी कोणतीही घटना विचारात घेता कामा नये.]

(२) [राज्य] शासनाला, नियमांद्वारे कोणतीही विशिष्ट यंत्रसामग्री किंवा तिचा भाग याबाबत, त्यास आवश्यक वाटेल अशी कोणती खबरदारी घ्यावी ते विहित करता येईल किंवा कामगारास सुरक्षितता प्राप्त करून देण्यास, विहित करण्यात येईल अशा शर्तीस अधीन राहून कोणतीही विशिष्ट यंत्रसामग्री किंवा तिचा भाग यास या उपबंधापासून सूट देता येईल.

२२. चालू असलेल्या यंत्रावर किंवा यंत्राजवळ काम करणे – (१) कोण-त्याही कारखान्यात कलम २१ मध्ये उल्लेख केलेल्या यंत्राचा कोणताही भाग, ते यंत्र चालू असताना तपासणे आवश्यक होईल किंवा अशा तपासणीचा परिणाम म्हणून ते यंत्र चालू असताना ¹[कलम २१ चे पोटकलम (१) च्या परंतुकात निर्देशिल्याप्रमाणे] कोणतेही पट्टे चढविणे किंवा सरकविणे, त्यास तेल देणे किंवा ते बरोबर बसविणे आवश्यक होईल तेथे त्या प्रसंगी खास प्रशिक्षण मिळालेल्या किंवा त्याचे नाव, याबाबत विहित केलेल्या नोंदवहीत नोंदवले असेल अशा प्रौढ पुरुष कामगाराने घट्ट बसणारे कपडे घालून अशी तपासणी केली पाहिजे किंवा असे काम पार पाडले पाहिजे. किंवा अशा प्रकारच्या कामात असताना–

(अ) अशा कामगाराने जर पट्ट्याची रुंदी सहा इंचाहून कमी नसेल आणि पट्ट्याचा जोड (बेल्ट-जॉइंट) वादीने बांधलेला नसेल किंवा तो पट्ट्याशी सम-पातळीत नसेल तर त्याने चालू असलेल्या कप्पीच्या भोवती पट्टा बसविला कामा नये.

(ब) यंत्र-सामग्रीला कुंपण घालण्यासंबंधीच्या या अधिनियमाच्या इतर कोणत्याही उपबंधास हानी न पोचवता, कोणताही फिरता दांडा (शाफ्ट), चाती, चाक किंवा पिनियन यावर बसविलेला प्रत्येक पोचखिळा (सेट स्क्रू), बोल्ट व कळ



आणि अशा कामगारांना इतर प्रकारे ज्याच्याशी संपर्क येण्याचा संभव असेल असे सर्व कंटक चक्र (स्पर), सर्पिल यंत्र (वर्म) किंवा इतर गतिमान दंतुर किंवा घर्षण गतिचक्र यांत, असा संपर्क होऊ नये म्हणून मजबूत कुंपण घालण्यात आले पाहिजे.

¹[(२) कोणत्याही स्त्रीस किंवा तरुण व्यक्तीस मुळवतिजनत्र किंवा कोणतीही धारेचण यंत्रसामग्री चालू असताना, मुळवतिजनत्राचा किंवा कोणत्याही धारेचण यंत्रसामग्रीचा कोणताही भाग साफ करण्याची, त्यात तेल घालण्याची किंवा तो बरोबर बसविण्याची परवानगी देता कामा नये. किंवा कोणत्याही यंत्राचा कोणताही भाग साफ करताना, त्यात तेल घालताना किंवा तो बरोबर बसविताना त्या स्त्रीस किंवा तरुण व्यक्तीस त्या यंत्राच्या किंवा कोणत्याही संलग्न यंत्राच्या कोणत्याही भागापासून इजा होण्याचा धोका असेल, तर तो भाग साफ करण्याची, त्यात तेल घालण्याची किंवा तो बरोबर बसविण्याची परवानगी देता कामा नये.]

(३) ×[राज्य] शासनाला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कोणत्याही विशिष्ट कारखान्यात किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्यात यंत्राचे विशिष्ट भाग, ते चालू असताना कोणत्याही व्यक्तीकडून साफ केले जाण्यास, त्यांना तेल दिले जाण्यास किंवा ते बरोबर बसविण्यास मनाई करता येईल.

२३. धोक्याच्या यंत्रावर तरुण व्यक्तीस कामावर लावणे – (१) कोण-त्याही तरुण व्यक्तीने, ज्या यंत्रास हे कलम लागू आहे अशा यंत्राच्या संबंधात उत्पन्न होणारा धोका आणि घ्यावयाची खबरदारी यांविषयी तीस संपूर्ण शिक्षण मिळाल्याशिवाय आणि–

(अ) त्या यंत्रावर काम करण्याचे पुरेसे प्रशिक्षण मिळाल्याशिवाय, किंवा

(ब) त्या यंत्राचे संपूर्ण ज्ञान व अनुभव असलेल्या व्यक्तीची तिच्यावर योग्य ती देखरेख असल्याशिवाय,

अशा कोणत्याही यंत्रावर काम करता कामा नये.

(२) पूर्ववर्ती आवश्यकतांचे पालन केल्याशिवाय ×(राज्य) शासनाच्या मते तरुण व्यक्तींनी ज्यावर काम करता कामा नये अशी धोक्याच्या स्वरूपाची यंत्रे म्हणून राज्य शासन जी यंत्रे विहित करील अशा यंत्रांना हे पोट-कलम (१) लागू असेल.

२४. वीज यंत्रे बंद करण्यासाठी स्टार्टिंग गियर लावणे – (१) प्रत्येक कारखान्यात–

कारखान्यांच्या व्यवस्थापकावर लेखी आदेश बजावून त्याद्वारे त्याच्या मते ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, त्या उपाययोजना त्यात विनिर्दिष्ट करता येतील व विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपूर्वी त्या अंमलात आणण्यास भाग पाडता येईल.

१६. अति-गर्दी – ( १ ) कोणत्याही कारखान्यातील, कोणत्याही खोलीत, कामावर लावलेल्या कामगारांच्या आरोग्यास धोकादायक होईल इतकी गर्दी होऊ देता कामा नये.

( २ ) पोटकलम ( १ ) च्या सर्वसाधारणतेस हानी न पोचवता या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस अस्तित्वात असलेल्या कारखान्याच्या कामाच्या प्रत्येक खोलीने, कामावर लावलेल्या प्रत्येक कामगारासाठी कमीत कमी तीनशे पन्नास घनफूट आणि या अधिनियमास प्रारंभ झाल्यानंतर बांधलेल्या कारखान्यातील कामाच्या प्रत्येक खोलीत कामावर लावलेल्या कामगारांसाठी कमीत कमी पाचशे घनफूट जागा असली पाहिजे. आणि या पोटकलमाच्या प्रयोजनासाठी खोलीच्या जमिनीच्या पातळीपासून चौदा फुटांहून अधिक उंचीवर असलेली कोणतीही जागा हिशेबात घेतली जाणार नाही.

( ३ ) जर मुख्य निरीक्षक, लेखी आदेशाद्वारे, तसे करण्यास सांगेल, तर कारखान्याच्या कामाच्या प्रत्येक खोलीत, या कलमाच्या उपबंधानुसार त्या खोलीत जास्तीत जास्त किती कामगार कामावर लावता येतील त्यांची संख्या विनिर्दिष्ट करणारी सूचना कारखान्याच्या अशा प्रत्येक खोलीत लावली पाहिजे.

( ४ ) कोणत्याही कामाच्या खोलीच्या संबंधात, या कलमाच्या उपबंधाचे पालन करणे, त्या खोलीत कामावर असलेल्या कामगारांच्या आरोग्याच्या दृष्टीने अनावश्यक आहे अशी मुख्य निरीक्षकाची खात्री झाली तर, त्यास लेखी आदेशाद्वारे कोणत्याही शर्ती घालणे योग्य वाटेल अशा शर्तींस अधीन राहून अशा कोणत्याही खोलीच्या बाबतीत, या खोलीच्या उपबंधापासून सूट देता येईल.

१७. प्रकाश योजना – ( १ ) कारखान्यातील ज्या भागात कामगार काम करत असतील किंवा जात-येत असतील अशा प्रत्येक भागात भरपूर योग्य प्रकारच्या कृत्रिम व नैसर्गिक प्रकाशाची किंवा दोन्ही प्रकारच्या प्रकाशांची तरतूद केली पाहिजे व ती चालू पाहिजे.

( २ ) प्रत्येक कारखान्यातील खोल्यांत स्वच्छ प्रकाश येण्यासाठी काचेच्या सर्व खिडक्या व गवाक्षे यांचे आतील व बाहेरील असे दोन्ही पृष्ठभाग स्वच्छ ठेवले पाहिजेत. आणि कलम १९ चे पोटकलम ( २ ) अन्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या उपबंधाचे पालन करणे शक्य असेल तेथवर, ती अडथळा होणार नाहीत अशा रीतीने मोकळी ठेवली पाहिजेत.



(क) कोणत्याही विनिर्माण क्रियेमुळे जेव्हा जागा, ओलसर होणे असंभवनीय असेल तेव्हा ती आर्द्रता गटारीने काढून टाकता येईल अशा तरतुदीने निकालून केले पाहिजे.

(ड) सर्व अंतर्गत भिंती आणि विभाजके, सर्व छते आणि खोल्यांची छपरे आणि भिंती, परिसर, जिना व पायवाटांची छपरे–

( i ) जेव्हा ती [ धुता येईल अशा जलरंगाने रंगविलेली नसतील तेव्हा रंगविलेली ] पाच वर्षांच्या कालावधीत निदान एकदा तरी रंगविली पाहिजेत रोगण लिंपित व पुनर्लिंपित केली पाहिजेत.

[ i अ ] जेव्हा ती धुता येईल अशा जलरंगाने रंगविलेली असतील तेव्हा तीन वर्षांच्या कालावधीत निदान एकदा तरी त्यांची पुन्हा रंगविली पाहिजेत आणि सहा महिन्यांच्या कालावधीत निदान एकदा धुतली पाहिजेत. ]

( ii ) जेव्हा ती रंगविली असतील, रोगण लिंपित असतील किंवा पृष्ठभाग मजबूत केलेली असेल तेव्हा विहित केले असेल अशा पद्धतीने चौदा महिन्यांच्या कालावधीत निदान एकदा स्वच्छ केले पाहिजे.

(iii) इतर कोणत्याही प्रकरणी चुना-सफेदी, रंगसफेदी केली पाहिजे आणि चुना सफेदी किंवा रंगसफेदी चौदा महिन्यांच्या कालावधीत निदान एकदा केली पाहिजे.

¹[ (ड अ) सर्व दारे, खिडक्या, चौकटी आणि इतर लाकडी किंवा धातु चौकटीची कामे आणि तख्ते रंगवून किंवा रोगण लिंपण केल्या पाहिजेत आणि असे रंगविणे किंवा रोगण लिंपण पाच वर्षांच्या कालावधीत निदान एकदा केले पाहिजे. ]

(इ) अशा कार्यवाहीच्या पूर्ततेच्या तारखा विहित पुस्तकात नोंदविल्या पाहिजेत.

(२) ¹[कोणत्याही कारखान्यात किंवा त्याच्या भागात किंवा कोणत्याही कारखान्याच्या भागात] चालू असलेल्या कार्यकृतीच्या स्वरूपाच्या दृष्टीने जर पोट नियम (१) च्या तरतुदींची पूर्तता करणे कर्मचाऱ्यास शक्य नसेल तर¹ [राज्य सरकारने] अशा कारखाना किंवा त्याचा गट किंवा त्याचा भाग त्या पोट-कलमाच्या कोणत्याही तरतुदींपासून आदेशान्वये मुक्त ठेवावा आणि कारखाना स्वच्छ ठेवण्यासाठी दुसरी कोणतीही पर्यायी पद्धत स्पष्ट करावी.

१४. प्रदूषणे व टाकाऊ पदार्थ यांची विल्हेवाट – ¹(१) प्रत्येक कारखान्यात, त्यात केल्या जाणाऱ्या निर्मिति-प्रक्रियेमुळे होणारा टाकाऊ पदार्थ आणि प्रदूषणे यांची विल्हेवाट अशी लावली पाहिजे की ती निरपद्रवी झाली पाहिजेत.

(२) ' [ राज्य ] शासनाने पोटकलम (१) खाली व्यवस्था करणारे नियम विहित करावेत. किंवा त्या व्यवस्थेच्या पूर्ततेसाठी पोटकलम (१) अन्वये विहित केलेले अशा अधिकाऱ्याने संमत केले पाहिजेत.

१३. खेळती हवा आणि उष्णतामान – (१) प्रत्येक कारखान्यात, प्रत्येक कर्मशालेत हवा खेळती राहावी आणि निर्वाहित राखण्यासाठी परिणामकारक आणि योग्य अशा तरतुदी केल्या पाहिजेत–

(अ) स्वच्छ हवा खेळती राहील अशी पुरेशी व्यवस्था केली पाहिजेत, आणि

(ब) कामगारांच्या आरोग्याला हितावह असेल व इजा, उपद्रव यांना प्रतिबंध करता येईल असे उष्णतामान राखले पाहिजे;

आणि विशेषतः–

(i) भिंती आणि छत अशा वस्तूंची आणि साधनांची असावीत की उष्णतामानात वाढ होऊ नये पण व्यवहारतः कमीत कमी असेल असे ठेवावे.

(ii) जेव्हा कारखान्यात कामाचे स्वरूप असे असेल, की अती उष्णतामानामुळे उत्पादनात परिणाम होणार असेल किंवा होण्यासारखा असेल तेव्हा त्यापासून कामगारांचे संरक्षण होईल असे व्यवहारतः पुरेसे असेल असे उष्णतामान कामाच्या जागी राहील व अतिरिक्तता दूर ठेवील की ज्यामुळे किंवा अशा इतर पद्धतीने उष्णभाग समशीतोष्ण राहील.

(२) '[राज्य] शासनाने पुरेशा हवामानाची आणि कोणत्याही कारखान्यात किंवा त्याच्या भागात किंवा त्याच्या भागात राखत हवामानाची पातळी विहित करावी आणि स्पष्ट केले असेल असे हवामान अशा ठिकाणी अशा पद्धतीत निर्वाहित केले पाहिजे असा आदेश द्यावा.

(३) '[राज्य] शासनास असे वाटल्यास की कोणत्याही कारखान्यात किंवा त्याच्या भागात, अतिरिक्त उष्णतामान अशा पद्धतीने कमी करता येणे शक्य होते की जसे चुना-सफेदी, फवारा किंवा आवरण आणि चाळण वगैरेच्या भिंतींना, छपराला, खिडक्यांना किंवा हवेसाठी पोकळी ठेवून, दुहेरी छपर ठेवून किंवा दुसऱ्या इतर पद्धतीने छपरांची पातळी राखून किंवा छतांना आवरण घालून हवामान राखता येते, अशी किंवा इतर पद्धत कारखान्यात अनुसरावी. असे विहित करावे.

१४. धूळ आणि धूम – (१) ज्या कारखान्यात चालविण्यात येणाऱ्या वस्तू निर्माण प्रक्रियेमुळे तेथे काम करणाऱ्या कामगारांना उपायकारक किंवा त्रासदायक होण्याचा संभव असेल अशा स्वरूपात व अशा प्रमाणात कोणत्याही प्रकारची धूळ किंवा धूम किंवा इतर अशुद्ध पदार्थ निर्माण होत असेल किंवा मोठ्या प्रमाणात



कोणत्याही प्रकारची धूळ साचत असेल अशा प्रत्येक कारखान्यातील कोणत्याही कामाच्या खोलीत, की धूळ, धूम किंवा अशुद्ध पदार्थ श्वासाबरोबर आत जाऊ नये किंवा साचू नये म्हणून परिणामकारक उपाययोजना केली पाहिजे. आणि या कारणासाठी कोणतेही बहिःसर्जक उपकरण आवश्यक असेल तर धूळ, धूम किंवा इतर अशुद्ध पदार्थ उत्पन्न होणाऱ्या जागेच्या शक्य तितक्या जवळ त्या बहिःसर्जक उपकरणाची योजना केली पाहिजे किंवा जागा शक्य तितकी बंद असली पाहिजे.

(२) कोणत्याही कारखान्यात कोणतेही स्थिर अंतर्ज्वलन एंजिन त्यापासून निर्माण होणारी अशुद्ध हवा खुल्या हवेत सोडण्याची व्यवस्था केल्याखेरीज चालविता कामा नये आणि कोणत्याही खोलीत, तेथे काम करत असलेल्या कामगारांना अपायकारक होण्याचा संभव असेल अशा, अंतर्ज्वलन एंजिनापासून उत्पन्न होणारा धूम साचू न देण्याविषयी परिणामकारक योजना केलेली असल्याखेरीज कारखान्यातील कोणत्याही खोलीत दुसरे कोणतेही अंतर्ज्वलन एंजिन चालविता कामा नये.

१५. कृत्रिम आर्द्रीकरण – (१) ज्या कारखान्यात हवेची आर्द्रता कृत्रिम रीतीने वाढविण्यात येत असेल अशा सर्व कारखान्यांच्या संदर्भात पुढील गोष्टींसंबंधी ' [ राज्य ] शासनाला नियम करता येतील–

(अ) आर्द्रतेची प्रमाणे विहित करणे.

(ब) हवेची आर्द्रता कृत्रिम रीतीने वाढवण्यासाठी उपयोगात आणावयाच्या पद्धतींचे विनियमन करणे.

(क) हवेची आर्द्रता निश्चित करण्यासाठी विहित केलेल्या कसोट्या करीवर लावून त्याची नोंद ठेवण्याविषयी निदेश देणे.

(ड) कामाच्या खोल्यात पुरेशी हवा खेळती राहण्यासाठी व हवा थंड ठेवण्यासाठी ज्या पद्धतींचा अवलंब करावयाचा, त्या पद्धती विहित करणे.

(२) ज्या कोणत्याही कारखान्यात हवेची आर्द्रता कृत्रिम रीतीने वाढविण्यात येत असेल त्या कारखान्यात, त्या प्रयोजनासाठी वापरावयाचे पाणी, सार्वजनिक पाणी पुरवठ्यातून किंवा पिण्याच्या पाण्याच्या इतर ठिकाणातून घेतले पाहिजे किंवा ते अशा रीतीने वापरण्यापूर्वी परिणामकारकरीत्या शुद्ध केले पाहिजे.

(३) आर्द्रता वाढविण्यासाठी कारखान्यात वापरण्यात येणारे जे पाणी पोट-कलम (२) अन्वये परिणामकारकरीत्या शुद्ध केले पाहिजे, ते परिणामकारकरीत्या शुद्ध करण्यात येत नाही असे निरीक्षकास दिसून येईल तर, त्यास

(अ) पारेषण यंत्रसामग्रीचा भाग असलेला, मजल्या बसविलेल्या व सुट्या कप्प्यांकडे व कप्प्यांपासून दूर, वाहक पट्टे हलविण्यासाठी योग्य स्ट्राईकिंग गियर किंवा इतर कार्यक्षम यांत्रिक साधने यांची तरतूद केली पाहिजे; ती चालू ठेवली पाहिजेत, किंवा त्यांचा उपयोग केला पाहिजे. आणि पक्क्या बसविलेल्या कप्प्यांवर पट्टा पाठीमागे सरकण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने अशा स्ट्राईकिंग गियरची किंवा यांतील साधनांची रचना केली पाहिजे, ती अशा ठिकाणी बसविली पाहिजेत व ती अशा रीतीने चालू ठेवली पाहिजेत.

(ब) यंत्र चालविणारे पट्टे जेव्हा वापरात नसतील तेव्हा चालू असलेल्या दांड्यावर ते बसविता किंवा फिरविता कामा नयेत.

(२) प्रत्येक कारखान्यात कामाच्या प्रत्येक खोलीत, निकडीच्या प्रसंगी, चालू असलेल्या यंत्र सामग्रीतील वीज बंद करण्यासाठी योग्य साधनांची तरतूद केली पाहिजे व ती चालू ठेवली पाहिजे.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी चालू असलेल्या कारखान्यांच्या बाबतीत या पोट-कलमाचे उपबंध हे कामाच्या ज्या खोल्यांत वीज ही शक्ती (पॉवर) म्हणून वापरण्यात येत असेल, केवळ अशाच खोल्यांना लागू होतील.

'(३) जेव्हा वीजप्रवाह अनवधानाने 'बंद' ऐवजी 'चालू' होऊ शकतो ते साधन की कारखान्यात ज्या साधनापासून वीजप्रवाह वाहत असतो, ते साधन यंत्रसामग्रीमुळे वा इतर यंत्रणेमुळे होणाऱ्या अपघाताला प्रतिबंध व्हावा म्हणून, बंद कुलुपात बंदिस्त ठेवले पाहिजे.

२५. स्वयंचलित यंत्रे – कोणत्याही कारखान्यातील स्वयंचलित यंत्राचा कोणताही फिरता भाग व त्यावर वाहून नेण्यात येणारे कोणतेही सामान, तो भाग ज्या जागेवरून जात असेल ती जागा वर, कोणतीही व्यक्ती ती कामावर असताना किंवा अन्यथा त्या जागेवरून जाण्याचा संभव असेल अशी जागा असेल तर यंत्राचा भाग नसलेल्या कोणत्याही कायम स्वरूपाच्या बांधकामापासून अठरा इंच अंतराच्या बाहेर किंवा आंत फिरू देता कामा नये.

परंतु, मुख्य निरीक्षकास, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी उभारलेले जे यंत्र या कलमाच्या आवश्यकतेनुसार नसेल अशा एखाद्या यंत्राच्या बाबत, सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यास ज्या शर्ती लादणे योग्य वाटेल अशा शर्तींवर कशा देण्यास परवानगी द्यावी.

२६. नवीन यंत्रसामग्रीला आवरण घालणे – (१) विजेच्या चालणाऱ्या आणि अधिनियमाच्या प्रारंभानंतर कोणत्याही कारखान्यात उभारलेल्या सर्व यंत्रांतील,



(अ) कोणताही फिरता दांडा (शाफ्ट), चाती (स्पिंडल), चक्र (व्हील) किंवा पिनियन यावर बसविलेल्या प्रत्येक पेचखिळा (सेट स्क्रू), बोल्ट किंवा कळ (की) खोका टळेल अशा रीतीने आत बसविली पाहिजे. तीवर आवरण घातले पाहिजे किंवा ती इतर रीतीने सुरक्षित ठेवली पाहिजे.

(ब) चालू असताना ज्यांना वारंवार बसविणे आवश्यक नसते अशा कंटक चक्र (स्पर) सर्पिल यंत्र (वर्म) व इतर प्रकारचे दंतुर किंवा घर्षण गतिचक्र (गियर) यांस ते पूर्णपणे आवरण घातल्याप्रमाणे सुरक्षित राहातील अशा जागी नसेल, तर आवरण घातले पाहिजे.

(२) जी कोणी व्यक्ती, '(पोटकलम (१) च्या उपबंधानुसार किंवा पोट कलम (३) अन्वये केलेल्या कोणत्याही नियमानुसार) नसणारी विजेच्या सहाय्याने चालणारी कोणतीही यंत्रसामग्री कारखान्यात उपयोग करण्यासाठी विकील किंवा भाड्याने देईल किंवा विक्रेत्याचा किंवा भाड्याने देणाऱ्याचा अभिकर्ता म्हणून विकाऊ्यास किंवा भाड्याने द्यावयास लावील किंवा विकण्यासाठी किंवा भाड्याने देण्यासाठी मिळवील ती व्यक्ती तीन महिने पर्यंतची कारावासाची शिक्षा किंवा पाचशे रुपये दंडाची शिक्षा देण्यास पात्र होईल.

'(३) राज्य शासनास, कोणत्याही विशिष्ट यंत्राच्या किंवा विशिष्ट वर्गाच्या किंवा प्रकारच्या यंत्रावर इतर कोणत्याही धोक्याच्या भागाच्या संदर्भात, तरतूद करावयाचे आणखी सुरक्षिततेचे प्रकार विनिर्दिष्ट करणारे नियम करता येतील.)

२७. कॉटन ओपनरजवळ स्त्रिया व मुलांस कामावर लावण्यास प्रतिबंध – कोणत्याही स्त्रीस किंवा मुलांस कापूस दाबणी कारखान्याच्या कोणत्याही भागात कॉटन ओपनर चालू असेल त्या भागात कामावर लावता कामा नये.

परंतु, कॉटन ओपनरचे भरणद्वार (फीड एण्ड) ज्या खोलीत असेल ती खोली व निर्गत द्वार (डिलीव्हरी एण्ड) यांच्यामध्ये छपरापर्यंत किंवा कोणत्याही विशिष्ट बाबतीत निरीक्षक लेखी विनिर्दिष्ट करेल अशा ठिकाणी अशा उंचीपर्यंत पोहोचणारे विभाजन घातलेले असेल तर, भरणद्वार, विभाजनाच्या ज्या बाजूस असेल त्या बाजूकडे स्त्रिया व मुले यांना कामावर लावता येईल.

२८. उच्चालन यंत्रे व लिफ्ट – (१) प्रत्येक कारखान्यातील–

(अ) प्रत्येक यंत्र व लिफ्ट ही–

(एक) चांगल्या यांत्रिक रचनेची, मजबूत साहित्याची व पुरेशी बळकट असली पाहिजेत.

(दोन) ती ज्या तऱ्हेने ठेवली आहेत किंवा ठेवण्यात आली पाहिजेत त्यांची प्रत्येक सहा महिन्यांच्या मुदतीत कमीत कमी एकदा सक्षम व्यक्तीने संपूर्ण तपासणी केली पाहिजे. आणि अशा प्रत्येक तपासणीचा विहित करण्यात येईल असा असणारी एक नोंदवही ठेवली पाहिजे.

(ब) प्रत्येक उच्चलन यंत्राचा व लिफ्टचा मार्ग, दरवाजे असलेले कुंपण घालून वाजवी प्रमाणात सुरक्षित केला पाहिजे. आणि उच्चलन यंत्राची किंवा लिफ्टची व प्रत्येक कुंपणाची अशी रचना केली पाहिजे की त्यायोगे उच्चलन यंत्राचा, किंवा लिफ्टचा कोणताही भाग व कोणतेही कायम स्वरूपाचे बांधकाम किंवा फिरता भाग यामध्ये कोणतीही व्यक्ती वा वस्तू सापडता कामा नये;

(क) प्रत्येक उच्चलन यंत्राचा लिफ्टचा सुरक्षित कामाचा भार त्यावर स्पष्टपणे लिहिण्यात यावा, आणि अशा भारापेक्षा अधिक भार त्यावरून वाहून नेता कामा नये;

(ड) व्यक्तींना नेण्यासाठी उपयोग करण्यात येणाऱ्या प्रत्येक उच्चलन यंत्राच्या पिंजऱ्याला (केज) ज्या बाजूकडे उतरण्याची सोय असेल त्या प्रत्येक बाजूला दरवाजा केलेला असला पाहिजे;

(इ) उच्चलन यंत्रामधून किंवा लिफ्टमधून बाहेर पडण्याच्या जागी पिंजरा असल्याशिवाय दरवाजा उघडू शकणार नाही आणि दरवाजा बंद असल्याखेरीज पिंजरा हलू शकणार नाही, अशी सोय करून घेण्यासाठी खंड (ब) किंवा खंड (ड) मध्ये उल्लेख केलेल्या प्रत्येक दरवाज्याला आतून कुलूप लावण्याचे किंवा इतर कार्यक्षम साधन जोडलेले असले पाहिजे.

(२) व्यक्तींना नेण्यासाठी उपयोग करण्यात येणाऱ्या आणि अधिनियमाच्या प्रारंभानंतर कारखान्यात उभारलेल्या किंवा पुनर्रचना केलेल्या उच्चलन यंत्रांना व लिफ्टना पुढील आणखी आवश्यक बाबी लागू असतील.–

(अ) जेथे पिंजरा दोरखंडावर किंवा साखळदंडावर चालत असेल तेथे, पिंजऱ्याशी समतोल राखणाऱ्या वजनाशी कमीत कमी दोन दोरखंड किंवा दोन साखळदंड असले पाहिजेत आणि प्रत्येक दोरखंड किंवा साखळदंड त्याला जोडलेल्या भागासह पिंजऱ्याचे वजन किंवा कमाल भार नेण्याइतका असला पाहिजे;

(ब) दोरखंड, साखळदंड किंवा त्याला जोडलेले भाग तुटल्यास त्याप्रसंगी, पिंजरा व त्यातील कमाल भार सांभाळण्यास समर्थ असणाऱ्या कार्यक्षम भागांची/साधनांची तरतूद केली पाहिजे व ती साधने सुस्थितीत ठेवली पाहिजेत.

(क) पिंजरा जास्त वेगाने जाण्यास प्रतिबंध करण्यासाठी कार्यक्षम स्वयं-चलित साधनाची तरतूद केली पाहिजे व ते सुव्यवस्थित ठेवले पाहिजे.



(३) एखाद्या कारखान्यात या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी उभारलेले जे उच्चलन यंत्र किंवा लिफ्ट पोट-कलम (१) च्या उपबंधाचे पूर्णपणे पालन होईल अशा प्रकारचे नसेल; त्या कोणत्याही उच्चलन यंत्राचा किंवा लिफ्टचा उपयोग, मुख्य निरीक्षकास, सुरक्षिततेच्या दृष्टीने लादण्यास त्यास योग्य वाटतील अशा शर्तींवर चालू ठेवण्यास परवानगी देण्यात येईल.

(४) कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या उच्चलन यंत्राच्या किंवा लिफ्टच्या बाबतीत पोट-कलमे (१) व (२) खालील कोणतीही आवश्यक बाब अंमलात आणणे गैरवाजवी होईल असे जर राज्य शासनाचे मत होईल तर त्यास, आदेशाद्वारे अशी आवश्यक बाब, अशा वर्गाच्या किंवा प्रकारच्या उच्चालन यंत्राला किंवा लिफ्टला लागू होणार नाही असा निदेश देता येईल.

उच्चलन यंत्रे, साखळदंड किंवा दोरखंड व उचलण्याची साधने –

२९. (१) कोणत्याही कारखान्यातील उच्चलन यंत्र व लिफ्टखेरीज करून प्रत्येक उचलयंत्र आणि व्यक्ती माल किंवा सामान उचलण्याच्या किंवा उतरविण्याच्या प्रयोजनासाठी असलेला प्रत्येक साखळदंड, दोरखंड व उचलण्याचे साधन यांच्या बाबतीत, पुढील उपबंधांचे पालन केले पाहिजे–

(अ) क्रेन, विंच, मग ते कायम बसविलेले असो किंवा फिरते असो, धरून प्रत्येक उचलयंत्राचे सर्व भाग व प्रत्येक साखळदंड व दोरखंड किंवा उचलण्याचे साधन–

(एक) चांगल्या बांधणीचे, मजबूत साहित्याचे व पुरेसे बळकट व निर्दोष असले पाहिजे;

(दोन) योग्य तऱ्हेने ठेवलेले असले पाहिजे; आणि,

(तीन) प्रत्येक बारा महिन्यांच्या मुदतीत कमीत कमी एकदा किंवा मुख्य निरीक्षक लेखी विनिर्दिष्ट करील अशा मुदतीच्या अंतराने सक्षम व्यक्तीकडून पूर्णपणे तपासून घेण्यात आले पाहिजे, आणि अशा प्रत्येक तपासणीचा विहित करण्यात येईल असा तपशील असणारी नोंदवही पण ठेवलेली असावी.

(ब) कोणत्याही उचलन यंत्रावर व कोणताही साखळदंड, दोरखंड किंवा उचलण्याचे साधन यांवर, चाचणीच्या प्रयोजनासाठी असेल त्या व्यतिरिक्त, सुरक्षित कामाच्या भारापेक्षा अधिक भार लादता कामा नये. अशा सुरक्षित कामाचा भार अशा यंत्रावर स्पष्टपणे लिहिलेला असला पाहिजे व त्यावर ओळखता येण्यासाठी निशाणी असली पाहिजे व ती विहित केलेल्या नोंदवहीत रीतसर नोंदलेला असला पाहिजे. आणि जेथे असे करणे व्यवहार्य नसेल तेथे, वापरात असलेल्या प्रत्येक प्रकारच्या व आकाराच्या उचलन यंत्राचा किंवा साखळदंडाचा दोरखंडाचा किंवा

उचलण्याच्या साधनाचा सुरक्षित कामाचा भार दर्शविणारा तक्ता आवारामधील प्रमुख ठिकाणी लावला पाहिजे.

(क) कोणतीही व्यक्ती, तिला यारीचा धक्का लागण्याचा संभव असेल अशा कोणत्याही जागेत फिरत्या यारीच्या आकाराच्या मार्गावर किंवा त्या मार्गाजवळ कामावर लावण्यात आली असताना किंवा काम करीत असताना अशा जागेपासून, वीस फुटांच्या आंत यारी न पोहोचण्याची खबरदारी घेण्यासाठी परिणामकारक उपाययोजना केली पाहिजे.

(२) *[ राज्य ] शासनास, कारखान्यात वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही उत्थलयंत्राच्या किंवा कोणत्याही साखळदंडाच्या, दोरखंडाच्या किंवा उचलण्याच्या साधनाच्या संदर्भात–

(अ) या कलमात नमूद केलेल्या आवश्यक गोष्टींव्यतिरिक्त पालन केल्या पाहिजेत अशा आणखी आवश्यक गोष्टी विहित करण्याबाबत,

(ब) या कलमातील सर्व किंवा कोणत्याही आवश्यक गोष्टींचे पालन करणे राज्य शासनाच्या मते नावश्यक किंवा अव्यवहार्य असेल तेव्हा अशा सर्व कोणत्याही गोष्टीचे पालन करण्यात सूट देण्याच्या तरतुदीबाबत, नियम करता येतील.

(३) या कलमाच्या प्रयोजनासाठी, उत्थलनयंत्राची किंवा साखळदंडाची, दोरखंडाची किंवा उचलण्याच्या साधनाची प्रत्यक्ष तपासणी, तपासलेले भाग सुरक्षित असल्याबद्दल निश्चित खात्री करून घेण्यासाठी आवश्यक असल्यास इतर साधनांनी किंवा निरनिराळे भाग सुटे करून परिस्थितीप्रमाणे काळजीपूर्वक केलेली असेल तर, अशी तपासणी संपूर्णपणे करण्यात आलेली आहे, असे समजण्यात येईल.

स्पष्टीकरण – या कलमात,–

(अ) 'उत्थलनयंत्र' या संज्ञेचा अर्थ, यारी (क्रेन), क्रॅब विंच, टीगल, पुली ब्लॉक, जीनव्हील ट्रान्सपोर्टर किंवा रनवे असा होतो.

(ब) 'उचलण्याचे साधन' या संज्ञेचा अर्थ, साखळीचे ओळंबे (चेन स्लिंग्ज) दोराचे ओळंबे (रोप स्लिंग्ज) रिंग्ज, हुक्स्, शॅकल्स व स्विव्हेल्स असा होतो.)

३०. वर्तुळाकार फिरणारी यंत्रसामग्री – (१) कारखान्यातील ज्या खोलीत दळण्याची प्रक्रिया चालली असेल, त्या प्रत्येक खोलीत वापरात असणाऱ्या अशा प्रत्येक यंत्रावर किंवा त्याच्या जवळ प्रत्येक पोषण प्रस्तराची किंवा वर्धक चकाची सुरक्षित कामाची कमाल परिपक्व गती, ते चक्र ज्यावर बसविले असेल त्या दांड्याची किंवा चातीची गती किंवा असा दांडा किंवा चाती यावर सुरक्षित



कामाची परिपक्व गती येण्यासाठी आवश्यक म्हणून बसवलेल्या कप्पीचा व्यास ह्या गोष्टी दर्शविणारी सूचना कायमची लावलेली पाहिजे किंवा ठेवण्यात आली पाहिजे.

(२) पोटकलम (१) खालील सूचनांत दर्शविलेल्या गतीपेक्षा यंत्राला अधिक गती देता कामा नये.

(३) वर्तुळाकार फिरणारे प्रत्येक पात्र, पिंजरा, टोपली, गतिचक्र (फ्लायव्हील) कप्पी, चकती किंवा विजेच्या सहाय्याने चालणारे तत्सम उपकरण यांच्या सुरक्षित कामाची परिपक्व गती वाढवली जाणार नाही अशी खात्रीलायक तरतूद करण्यासाठी प्रत्येक कारखान्यात परिणामकारक उपाय योजले पाहिजेत.

३१. दाब संयंत्र – (१) कोणत्याही कारखान्यात, वस्तुनिर्माण प्रक्रियेत उपयोग करण्यात येणाऱ्या संयंत्राच्या किंवा यंत्राचा कोणताही भाग, वातावरणाच्या दाबापेक्षा अधिक दाबावर चालविण्यात येत असेल तर अशा भागाच्या सुरक्षित कामाच्या दाबापेक्षा अधिक दाबावर तो भाग चालविला जाणार नाही अशी निश्चित तरतूद करून घेण्यासाठी परिणामकारक उपाययोजना करून घेतली पाहिजे.

(२) राज्यशासनास पोट कलम (१) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे कोणत्याही अशा यंत्राची किंवा संयंत्राची तपासणी करण्याची किंवा चाचणी घेण्याची तरतूद करण्याबाबत आणि कोणत्याही कारखान्यात किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्यात या बाबत राज्य शासनाच्या मते आवश्यक असतील अशा वाबची सुरक्षिततेसाठी उपाययोजना विहित करण्याबाबत नियम करता येईल.

(३) राज्य शासनाने, त्यात स्पष्ट केलेल्या नियमाने या कलमाला शर्तीचे अधीन पोटकलम (१) मध्ये निर्देश केलेल्या तरतुदींपासून कोणताही भाग किंवा यंत्रणा मुक्त ठेवावी.

३२. जमिनी, जिने व प्रवेश मार्ग – प्रत्येक कारखान्यात–

(अ) सर्व जमिनी, पायऱ्या, जिने, मार्ग व मार्गिका मजबूत बांधणीच्या व सुस्थितीत ठेवलेल्या असल्या पाहिजेत, '(आणि अडथळ्यापासून व ज्यामुळे माणसे घसरतील त्या पदार्थापासून दूर ठेवले पाहिजे. आणि सुरक्षिततेची खात्रीलायक तरतूद करावयाची असेल तेव्हा पायऱ्या, जिने, मार्ग व मार्गिका यांचा उपयोग करताना धरावयासाठी मजबूत कठड्याची सोय केली पाहिजे.

(ब) ज्या ठिकाणी कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही वेळी काम करणे भाग असेल अशा ठिकाणी प्रवेश मार्ग सुरक्षित असण्याची व सुरक्षित राखण्याची तरतूद वाजवी रीतीने शक्य असेल तेथवर केली पाहिजे.

[१०] (क) माणूस पडू शकेल अशा जागी जेव्हा कामगारास काम करावे लागते, तेव्हा पाय घट्ट रोवण्याचे ठिकाण व आवश्यक तेथे हाताने धरण्याचे साधन, व्यवहारात: शक्य असेल त्याप्रमाणे काम करणाऱ्या इसमास सुरक्षितता असल्याशिवाय काम करू देऊ नये.

**३३. खड्डे, टबकी, जमिनीतील उघड्या जागा वगैरे –** (१) प्रत्येक कारखान्यात जमिनीत कायम बसविलेले पात्र, टबके, टाकी, खड्डा, किंवा जमिनीतील उघडी जागा, ही तिच्या खोलीमुळे, स्थितीमुळे, किंवा तीत असलेल्या वस्तूमुळे धोक्याची असेल किंवा धोक्याची होण्याचा संभव असेल तर, ती व्यवस्थितपणे झाकली गेली पाहिजेत किंवा तिला व्यवस्थितपणे कुंपण घातले गेले पाहिजे.

(२) राज्य शासनास, लेखी आदेशाद्वारे, विहित करण्यात येईल अशा शर्तीस अधीन राहून कोणतेही पात्र, टबकी, टाकी, खड्डा किंवा उघडी जागा ह्यांच्या संबंधात, कोणत्याही कारखान्यास किंवा कोणत्याही वर्गाच्या प्रकारच्या कारखान्यास या कलमाच्या उपबंधाचे पालन करण्याबाबत सूट देता येईल.

**३४. जास्ती वजनाचे ओझे –** (१) कोणत्याही कारखान्यात कोणत्याही व्यक्तीस तिला इजा होईल असे अतिवजनाचे कोणतेही ओझे उचलण्यासाठी, वाहून नेण्यासाठी किंवा हलविण्यासाठी कामावर लावता कामा नये.

(२) राज्य शासनास, कारखान्यात किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा कोणत्याही प्रकारच्या कारखान्यात किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट केलेल्या वस्तुनिर्माण प्रक्रियेत कामावर लावलेले प्रौढ पुरुष, प्रौढ स्त्रिया, पौगंड, मुले यांजकडून उचलण्यात, वाहून नेण्यात किंवा हलविण्यात येतील, अशा कोणत्याही ओझ्याची कमाल वजने विहित करण्याबाबत नियम करता येतील.

**३५. डोळ्यांचे संरक्षण –** विहित करण्यात येईल अशा कोणत्याही कारखान्यात किंवा वस्तुनिर्माण प्रक्रियेत–

(अ) अशी प्रक्रिया चालू असताना उडालेल्या कणांनी किंवा तुकड्यांनी डोळ्यांना इजा होण्याचा संभव असणे, किंवा,

(ब) तीव्र उजेडाकडे पहावे लागल्यामुळे डोळ्यांना धोका पोहोचत असेल;

अशा कोणत्याही वस्तुनिर्माण प्रक्रियेच्या बाबतीत, राज्य शासनास नियमाद्वारे त्या प्रक्रियेत किंवा तिच्या अगदी जवळ, कामावर लावलेल्या व्यक्तींच्या संरक्षणासाठी परिणामक्षम पडद्यांची किंवा योग्य गॉगल देण्याची तरतूद करण्यास भाग पाडता येईल.

**३६. अपायकारक धुमाच्या बाबतीत काळजीबाबतची खबरदारी –** (१) कोणत्याही कारखान्यात जी कोणतीही खोली, टाकी, पिप (खुंट), खड्डा, नळ, धुराडे, किंवा बंदिस्त जागा यांत, व्यक्तीच्या जीवाला धोका होईल इतक्या प्रमाणात घातक धूम असण्याचा संभव असेल अशा कोणत्याही जागेत, पुरेशा आकाराच्या मॅनहोलची किंवा बाहेर पडण्याच्या दुसऱ्या परिणामकारक मार्गाची तरतूद केली असल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीने प्रवेश करता कामा नये किंवा कोणाही व्यक्तीस प्रवेश करण्याची परवानगी देता कामा नये.

[११] (XXX)

(३) कोणत्याही कारखान्यात पोटकलम (१) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे असलेल्या कोणत्याही बंदिस्त जागेत, त्या जागेत असलेला कोणताही धूम नाहीसा करणे व तो आत न येण्याचे, शक्य असतील ते सर्व उपाय करण्यात येईपर्यंत, व–

(अ) एकतर अशा जागेत घातक धूम नसून ती जागा व्यक्तींनी प्रवेश करण्यास योग्य आहे असा अर्थाचे सक्षम व्यक्तीने, तिने स्वतः घेतलेल्या चाचणीवर आधारलेले, लेखी प्रमाणपत्र दिलेले नसेल तर, किंवा,

(ब) योग्य असा श्वसन उपकरण संच किंवा त्याचे मोकळे टोक बंदिस्त जागेच्या बाहेर उभ्या असणाऱ्या व्यक्तीने धरले आहे अशा दोराला जोडलेला पट्टा कामगाराने अंगावर घेतलेला नसेल तर,

कोणत्याही व्यक्तीने प्रवेश करता कामा नये किंवा अशा व्यक्तीला प्रवेश देण्यास परवानगी देता कामा नये.

(४) उपरोक्तप्रमाणे असलेल्या बंदिस्त जागेत कोणाही व्यक्तीने प्रवेश केला असेल त्या बंदिस्त जागेजवळ तात्काळ उपयोगासाठी योग्य असा श्वसन उपकरण संच, शुद्धीवर आणण्याचा उपकरणसंच, पट्टे व दोर, प्रत्येक कारखान्यात तयार ठेवले पाहिजेत. आणि असे सर्व उपकरण संच सक्षम व्यक्तीकडून ठराविक काळात तपासण्यात आले असले पाहिजेत. व ते उपयोग करण्यास योग्य आहेत असे प्रमाणपत्र तिने दिले पाहिजे, आणि प्रत्येक कारखान्यात, कामावर लावलेल्या पुरेशा व्यक्तींना, अशा सर्व उपकरण संचांचा उपयोग करण्याचे व श्वासोच्छ्वास पुन्हा करण्याच्या पद्धतीचे समर्पक प्रशिक्षण दिले पाहिजे.

(५) कोणत्याही कारखान्यात, कोणतीही बाष्पक भट्टी, बाष्पकाचे धुराडे, कोष्ट, टाकी, पिप, नळ किंवा बंदिस्त जागा, व्यक्तींना प्रवेश करण्यास सुरक्षित व्हावी, म्हणून तीत हवा खेळवून किंवा अन्य तऱ्हेने ती भरपूर प्रमाणात थंड करण्यात येईपर्यंत तीत कोणाही व्यक्तीला काम करण्यासाठी किंवा कोणतीही तपासणी करण्यासाठी प्रवेश करण्याची परवानगी देता कामा नये.

(६) *[राज्य] शासनास पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या मॅनहोलची किमान लांबी, रुंदी, विहित करण्याबाबत नियम करता येतील व लेखी आदेशाद्वारे

त्यास लावणे योग्य वाटतील अशा शर्तीस अधीन राहून, कोणत्याही कारखान्याला किंवा कोणत्याही वर्गाला किंवा प्रकारच्या कारखान्यांना या कलमाच्या कोणत्याही उपबंधापासून सूट देता येईल.

[12] (३६-अ) – हलवाहलवीच्या वीज प्रकाशाच्या वापरापासून सावधानता – कोणत्याही कारखान्यात–

(अ) चोवीस व्होल्टेजपेक्षा जास्त असणारा हलवाहलवीचा विजेचा दिवा, किंवा कोणतेही इतर विजेचे उपकरण, कोणत्याही खोलीत, टाकीत, पीप, नळीत, किंवा बंदिस्त जागेत वापरण्यास परवानगी देता कामा नये.

(ब) जर कोणत्याही ज्वालाग्राही वायू, ज्योत, किंवा धूळ अशा, खोलीत, टाकीत, पिप, नळीत, किंवा बंदिस्त जागेत, पेट घेणे संभवनीय असेल तेथे ज्वाला प्रतिबंध ज्योत व्यतिरिक्त इतर कोणताही दिवा वापरण्यास परवानगी देता कामा नये.

३७. स्फोटक किंवा ज्वालाग्राही धूळ, वायू वगैरे – (१) कोणत्याही कारखान्यात कोणत्याही वस्तुनिर्माण प्रक्रियेमुळे ज्वालेचा स्पर्श होताच स्फोट होण्याचा संभव असेल अशा स्वरूपाच्या व अशा प्रमाणात कोणतीही धूळ, वायू, धूम किंवा वाफ निर्माण होत असेल तर तेथे–

(अ) त्या प्रक्रियेत वापरण्यात येणाऱ्या संयंत्राला किंवा यंत्रसामग्रीला चांगल्या तऱ्हेचे कुंपण घालून,

(ब) अशी धूळ, वायू, धूम किंवा वाफ बाहेर घालवून किंवा ती साचण्यास प्रतिबंध करून,

(क) ज्यापासून ज्वलनाची शक्यता असेल अशी सर्व साधने कुंपणाच्या बाहेर ठेवून अशा स्फोट होण्याला प्रतिबंध करण्यासाठी, शक्य असतील ते सर्व उपाय केले पाहिजेत.

(२) कोणत्याही कारखान्यात, पोट कलम (१) मध्ये अशा कोणत्याही वस्तुनिर्माण प्रक्रियेमध्ये वापरण्यात येणाऱ्या संयंत्राची किंवा यंत्रसामग्रीची रचना वर उल्लेखिलेल्या संभवनीय स्फोटामुळे जो दाब निर्माण होईल, त्या दाबामुळे ते संयंत्र किंवा ती यंत्रसामग्री टिकाव धरू शकेल अशा प्रकारची नसेल तेथे संयंत्र किंवा यंत्रसामग्री यात चोकस, बंधक, व्हेन्टस किंवा इतर परिणामकारक उपकरणांची योजना करून, स्फोटाचा प्रसार व परिणाम यांना प्रतिबंध करण्यासाठी शक्य असतील त्या सर्व उपाययोजना केल्या पाहिजेत.



(३) एखाद्या कारखान्यातील संयंत्राच्या किंवा यंत्रसामग्रीच्या कोणत्याही भागात, वातावरणाच्या दाबापेक्षा अधिक दाबाखाली कोणताही स्फोटक किंवा ज्वालाग्राही वायू किंवा वाफ असेल तेथे पुढील उपबंधानुसार असेल त्याव्यतिरिक्त तो भाग उघडता कामा नये–

(अ) त्या भागाला जोडलेल्या कोणत्याही नळाच्या कोणत्याही सांध्याची खिळणी किंवा त्या भागात उघडणाऱ्या कोणत्याही मुखावरील झाकणाची खिळणी ढील करण्यापूर्वी, त्या भागातील, किंवा अशा कोणत्याही नळामधील वायूचा किंवा वाफेचा प्रवाह, निरोध झडप ( स्टॉप व्हॉल्व्ह ) किंवा इतर साधन यांची योजना करून, परिणामकारक रीतीने थांबवला पाहिजे.

(ब) उपरोक्तपणे अशी कोणतीही खिळणी काढून टाकण्यापूर्वी, त्या भागातील किंवा नळीतील वायूचा किंवा वाफेचा दाब वातावरणाच्या दाबाइतका कमी करण्यासाठी शक्य असतील तेवढे सर्व उपाय केले पाहिजेत;

(क) उपरोक्तपणे अशी कोणतीही खिळणी काढून किंवा ढील करून टाकण्यात आली असेल तेथे, यथास्थिती ती खिळणी पुन्हा नट्ट जोडण्यात किंवा बसविण्यात आली पाहिजे व ती येईपर्यंत कोणताही स्फोटक अथवा ज्वालाग्राही वायू किंवा वाफ यांना त्या भागात किंवा नळामध्ये जाण्यास प्रतिबंध व्हावा यासाठी परिणामकारक उपाय योजले पाहिजेत.

परंतु खुल्या हवेत उभारलेल्या संयंत्राच्या किंवा यंत्रसामग्रीच्या बाबतीत, या पोटकलमाचे प्रतिबंध लागू होणार नाहीत.

(४) ज्या कोणत्याही संयंत्रामध्ये, टाकीमध्ये किंवा पात्रामध्ये कोणताही स्फोटक अगर ज्वालाग्राही पदार्थ असेल किंवा पूर्वी ठेवलेला असेल त्या कोणत्याही संयंत्रामधील, किंवा पात्रामधील तो पदार्थ आणि त्यापासून निर्माण होणारा धूम नाहीसा करण्यासाठी, किंवा असा पदार्थ, किंवा त्यापासून निर्माण होणारा धूम अस्फोटक ज्वालाग्राही करण्यासाठी पुरेशा उपाययोजना केलेल्या असल्याशिवाय, कोणत्याही कारखान्यात ज्या कोणत्याही सांधावयाच्या ( वेल्डिंग ), डाग लावण्याच्या ( ब्रेझिंग ), जाळण्याच्या ( सोल्डरिंग ) किंवा कापण्याच्या ( कटिंग ) कामात उष्णता देण्याचा अंतर्भाव होतो त्या कामाकडे, त्याचा उपयोग करता कामा नये, आणि असा कोणताही पदार्थ, अशा कोणत्याही कामानंतर असे संयंत्र, टाकी, किंवा पात्र यात, तो पेट घेण्याचा धोका उद्भवणार नाही इतके ते थंड होईपर्यंत, टाकू देता कामा नये.

(५) [x][राज्य] शासनास, नियमाद्वारे, विहित करण्यात येतील अशा शर्तीस

अधीन राहून, कोणत्याही कारखान्याला, किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्यांना या कलमाच्या सर्व किंवा कोणत्याही उपबंधापासून सूट देता येईल.

**३८. आगीच्या प्रसंगी बाळगावयाची सावधगिरी –** [११][ (१) प्रत्येक कारखान्यात आगीच्या प्रसंगी बाहेर पडण्यासाठी विहित करण्यात येतील अशा मार्गाची तरतूद करण्यात आली पाहिजे. आणि कोणत्याही कारखान्यात अशी तरतूद केलेली नाही असे जर दिसून येईल तर, तो कारखाना, या कलमाच्या व तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या उपबंधानुरूप होण्यासाठी ज्या उपाय-योजनांचा अवलंब करावा असे त्याचे मत असेल त्या उपाययोजना विनिर्दिष्ट करणारा लेखी आदेश कारखान्याच्या व्यवस्थापकावर त्यास बजावता येईल व आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपूर्वी त्या उपाययोजना अंमलात आणण्यास भाग पाडता येईल.

(२) प्रत्येक कारखान्यात कोणत्याही खोलीतून बाहेर जाण्यासाठी असलेल्या दरवाजांना एखादी व्यक्ती खोलीत असताना ते आतील बाजूने सुलभ रीतीने व झटकन उघडता येणार नाहीत अशा रीतीने कुलूप लावता कामा नये. किंवा ते बंद करता कामा नयेत; आणि असे सर्व दरवाजे सरकणारे नसतील तर ते बाहेरच्या बाजूने उघडतील अशा रीतीने बनविलेले असले पाहिजे.

(३) प्रत्येक कारखान्यात, सामान्यत: वापरात असलेले बाहेर जाण्याचे मार्ग सोडून करून, आगीच्या प्रसंगी बाहेर पडण्यासाठी असलेली प्रत्येक खिडकी, दरवाजा किंवा इतर निर्गम मार्ग यावर, बहुसंख्य कामगारांना समजणाऱ्या भाषेत व पुरेशा ठळक आकाराच्या लांबवर अक्षरात तसे लिहिलेले असले पाहिजे, आणि इतर कोणतीही परिणामकारक व स्पष्टपणे कळून येणारी खूण केली पाहिजे

(४) कारखान्यात कामावर लावण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला आगीच्या प्रसंगी धोक्याची सूचना देण्यासाठी परिणामकारक व स्पष्ट ऐकू येणाऱ्या साधनाची, प्रत्येक कारखान्यात तरतूद केली पाहिजे.

(५) आगीच्या प्रसंगी बाहेर पडण्याच्या प्रत्येक मार्गाकडे जाणारी एक मोकळी वाट, कारखान्याच्या प्रत्येक खोलीतील सर्व कामगारांच्या उपयोगासाठी ठेवली पाहिजे.

(६) ज्या कारखान्यात–

(अ) तळमजल्याच्या वरील कोणत्याही जागी सामान्यत: वीस कामगारांहून अधिक कामगार कामावर लावले जातात. किंवा–



(ब) स्फोटक किंवा अत्यंत ज्वालाग्राही सामान वापरण्यात येते. किंवा साठवून ठेवण्यात येते. त्या प्रत्येक कारखान्यातील सर्व कामगारांना, आगीच्या प्रसंगी बाहेर पडण्याच्या मार्गाची माहिती आहे व अशा प्रसंगी अनुसरावयाच्या पद्धतीचे पुरेसे प्रशिक्षण देण्यात आले आहे; अशी खात्री करून घेण्यासाठी परिणाम-कारक उपाय योजले पाहिजेत.

(७) राज्य शासनास, कोणत्याही कारखान्याच्या, किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्यांच्या संबंधात आगीच्या प्रसंगी तरतूद करावयाचे बाहेर पडण्याचे मार्ग व तरतूद करावयाच्या व ठेवावी ठेवायच्या अग्निशमन उपकरण संचाचा प्रकार व संख्या विहित करण्याबाबत नियम करता येईल. [१४][(८)–]

[१५][(८) पोटकलम (१) किंवा पोटकलम (७) यात काहीही नमूद असले तरी, कारखान्यात चालू असणाऱ्या कामाचे स्वरूप, कारखान्याचे बांधकाम, आगीला किंवा सुरुंगाला विशेष जोखीम किंवा इतर कोणतीही स्थिती या संबंधात, जर तपासनीसाचे असे मत झाले की यापैकी यापासून बचावाची तरतूद विहित केली ती कारखान्यात असली तरी, ती सुरक्षिततेस पुरेशी किंवा सुलभ नाही किंवा आगीचे प्रकरणी कामगारास जलद बाहेर पडता येईल अशी नाही तर त्याने लेखी आदेशाने बचावासाठी अधिक सुविधा, सोयी, सुलभता, असे त्याने विचारात घेतले असेल तसे, लेखी आदेशात स्पष्ट केलेल्या तारखेपूर्वी पुरविण्यास भाग पाडले पाहिजे.]

(९) कारखान्यात बचावाच्या सुविधा पुरेशा सुलभ व आगीच्या प्रकरणी कामगारास जलद बाहेर पडता येईल अशा सोयी केल्या आहेत किंवा नाही असा प्रश्न जर उपस्थित झाला, तर मुख्य तपासनीस तो निर्देशित केला पाहिजे, की ज्याने संबंधित इसमांना त्यांच्या आक्षेपास प्रतिनिधित्व देण्यास त्यांना संधी दिल्या-नंतर तो सोडवावा.

(१०) मुख्य तपासनीसाच्या पोटकलम (९) खालील निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही इसमाने, त्यास निर्णय कळविलेल्या तारखेपासून तीस दिवस संपण्यापूर्वी राज्य शासनास आवाहन (अपील) करावे आणि त्याच्या आक्षेपाला प्रतिनिधित्व देण्याची आवाहकास संधी दिल्यानंतर, त्यांना योग्य वाटेल तो आवाहनाच्या संबंधी आदेश द्यावा.

**३९. सदोष भागाचे विशेष विवरण देण्यास किंवा त्यांच्या मजबुतीबद्दल तपासणी करण्यास भाग पाडण्याची शक्ती –** कारखान्यात कोणतीही इमारत किंवा इमारतीचा भाग किंवा रस्त्यांचा, सामग्रीचा किंवा संयंत्राचा कोणताही भाग, मानवी जीवितास किंवा सुरक्षिततेस धोका पोहोचेल अशा स्थितीत असल्याचे

निरीक्षकास दिसून येईल तर त्यास कारखान्याच्या व्यवस्थापकावर लेखी आदेश बजावून विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपूर्वी–

(अ) अशी इमारत, रस्ते, यंत्रसामग्री, किंवा संयंत्र यांचा सुरक्षितपणे उपयोग करता येईल. किंवा कसे हे निश्चित करण्यासाठी आवश्यक असतील असे नकाशे, विशेष विवरणे आणि इतर तपशील सादर करण्यास किंवा,

(ब) आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने अशी तपासणी करण्यास व तिचा निकाल निरीक्षकास कळविण्यास त्यास भाग पाडता येईल.

४०. इमारतींची व यंत्र सामग्रीची सुरक्षितता – (१) कारखान्यातील कोणतीही इमारत किंवा इमारतीचा भाग किंवा रस्त्याचा, यंत्र सामग्रीचा किंवा संयंत्राचा कोणताही भाग, मानवी जीवितास किंवा सुरक्षिततेस धोका पोहोचेल अशा स्थितीत असल्याचे निरीक्षकास दिसून येईल तर त्यास त्याच्या मते ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या उपाययोजना विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या तारखेपूर्वी अमलात आणण्यास भाग पाडणारा लेखी आदेश कारखान्याच्या [१] [व्यवस्थापकावर, कब्जेदारावर किंवा दोघांवर] बजावता येईल.

(२) कारखान्यातील कोणत्याही इमारतीचा किंवा इमारतीच्या भागाचा किंवा रस्त्यांच्या, यंत्र सामग्री किंवा संयंत्राच्या कोणत्याही भागाचा उपयोग केल्यामुळे मानवी जीवितास किंवा सुरक्षिततेस निकटवर्ती धोका आहे असे जर निरीक्षकास दिसून आले तर त्यास तो यथोचितरीत्या दुरुस्त करण्यात येईपर्यंत किंवा बदलण्यात येईपर्यंत त्याचा उपयोग करण्यास प्रतिबंध करणारा लेखी आदेश कारखान्याच्या व्यवस्थापकावर बजावता येईल.

[४०. अ) इमारतींचे निर्वाहन – कारखान्यातील इमारत किंवा इमारतीचा भाग नादुरुस्त स्थितीत आहे किंवा कामगारांच्या आरोग्यास आणि स्वास्थ्यास धोका पोहोचणे संभवनीय आहे असे तपासणीसाठी आढळले तर त्याने कारखान्याचा कब्जेदार किंवा व्यवस्थापक किंवा दोन्ही यावर कोणती उपाययोजना त्याचे मताप्रमाणे केली पाहिजे हे स्पष्ट करणारा लेखी आदेश बजावावा आणि आदेशात स्पष्ट केलेल्या तारखेपूर्वी ती करण्यास भाग पाडले पाहिजे.]

४०. ब) सुरक्षा अधिकारी (१) प्रत्येक कारखान्यात

(i) जेथे, एक हजार किंवा जास्त कामगार साधारणपणे नेमलेले आहेत, किंवा

(ii) जेथे, राज्य शासनाच्या मताप्रमाणे कोणतीही निर्मिति-प्रक्रिया किंवा कार्यकृती केली जात आहे किंवा कार्यकृतीमुळे शारीरिक इजा पोहोचण्याची जोखीम असेल, विषारी किंवा रोगट किंवा नेमलेल्या कामगारांच्या आरोग्यास



घातक होईल अशी कोणतीही कार्यकृती केली जात आहे तर कब्जेदाराने, राजपत्रात अधिसूचना करून राज्य शासनाने भाग पाडल्यास, त्या अधिसूचनेत स्पष्ट केले असेल तितक्या संख्येचे सुरक्षा अधिकारी नेमले पाहिजेत.

[(२) राज्य शासनाने विहित केले असेल त्याप्रमाणे सुरक्षा अधिकाऱ्यांच्या कर्तव्याच्या व अर्हतेच्या सेवेच्या शर्ती राहतील.]

४१. या प्रकरणाची पुरवणी म्हणून नियम करण्याची शक्ती – राज्य शासनास, कोणत्याही कारखान्यात किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्यात कामावर लावलेल्या व्यक्तींस सुरक्षितता प्राप्त करून देण्यासाठी; त्यास आवश्यक वाटतील अशा बाबींच्या [१०] [सुरक्षा साधनांची आणि उपायांची] तरतूद करण्यास भाग पाडण्याबाबत नियम करता येईल.

× अॅडॉप्टेशन ऑफ लॉज ऑर्डर १९५० अन्वये.

१. सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये

२. वरील प्रमाणे

३. वरील प्रमाणे

४. सन १९५४ चा क्रमांक २५ अन्वये

५. सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये

६. सन १९५४ चा क्रमांक २५ अन्वये

७. वरील प्रमाणे

८. सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये

९. अॅडॉप्टेशन ऑफ लॉज १९५० अन्वये

भाष्य (कलम २१ ते ४१)–अधिक सावधानता आवश्यक असल्याचा नियम विहित करण्याबाबत कलम २१ (२) अन्वये राज्य शासनावर जबाबदारी टाकली आहे. सुरक्षिततेची उपाय योजना करण्यास नियोक्ता चुकेल वा दुर्लक्ष करील तर इ. एस. आय कार्पोरेशन आकारणी करील तितकी रक्कम त्यास भरावी लागेल. (इ. एस. आय कार्पोरेशन वि. श्री. सीताराम मिल्स लि. १९७९ (३८) एफ. एल. आर १)

अपघात झाला म्हणजे यंत्राचा भाग त्या अपघाताला कारणीभूत आहे व तो भाग धोकादायक भाग होता असेच म्हणणे योग्य ठरत नाही. कामगाराचा निष्काळजीपणाही विचारात घेणे आवश्यक ठरते. (इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीज वि. हरीशंकर सिंघानिया १९७७ (३४) एफ. एल. आर १४५)

## प्रकरण ५ अ

## धोकादायक प्रक्रियेच्या संबंधात तरतुदी

[1] [४१.अ] स्थळमूल्य समितीची रचना – धोकादायक प्रक्रियांची कार्यकृती करणाऱ्या कारखान्यात जागा शोधण्यास परवानगी मिळावी म्हणून केलेल्या अर्जांचा विचार करण्याचे कामी सल्ला देण्याच्या किंवा अशा कोणत्याही कारखान्याचा विस्तार करण्याच्या कारणास्तव राज्य शासनाने स्थळमूल्य समितीची रचना करावी, त्यात यांचा समावेश असेल–

(अ) राज्याचा मुख्य तपासनीस, जो त्याचा अध्यक्ष असेल,

(ब) जल (प्रदूषण नियंत्रण आणि प्रतिबंधन) अधिनियम १९७४ (१९७४ चा क्रमांक ६) चे कलम ३ खाली केंद्र शासनाने जल प्रदूषण नियंत्रण आणि प्रतिबंधनासाठी नेमलेल्या केंद्रीय मंडळाचा प्रतिनिधी,

(क) हवा (प्रदूषण नियंत्रण आणि प्रतिबंधन) अधिनियम १९८१ (१९८१ चा क्रमांक १४) चे कलम ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे हवा प्रदूषण नियंत्रण आणि प्रतिबंधनासाठी असलेल्या केंद्रीय मंडळाचा प्रतिनिधी,

(ड) जल (प्रदूषण नियंत्रण आणि प्रतिबंधन) अधिनियम १९७४ (१९७४ चा क्रमांक ६) चे कलम ४ खाली नेमलेल्या राज्य मंडळाचा प्रतिनिधी,

(इ) हवा (प्रदूषण नियंत्रण आणि प्रतिबंधन) अधिनियम १९८१ (१९८१ चा क्रमांक १४) चे कलम ५ मध्ये नमूद केलेल्या हवा प्रदूषण नियंत्रण आणि प्रतिबंधनासाठी असलेल्या राज्य मंडळाचा प्रतिनिधी,

(फ) राज्यातील परिसर खात्याचा प्रतिनिधी,

(ग) भारत सरकारच्या वातावरणशास्त्र खात्याचा प्रतिनिधी,

(ह) औद्योगिक आरोग्य क्षेत्राचा तज्ञ,

(आय) राज्य सरकारच्या नगर रचना खात्याचा प्रतिनिधी,

आणि पाचपेक्षा जास्त माहीत असे इतर सदस्य की ज्यांना राज्य सरकारने नेमून घेतले आहे आणि जे,

(i) कारखान्यात चालू असणाऱ्या धोकादायक प्रक्रियेने विशेष ज्ञान असणारा शास्त्रज्ञ,

(ii) कारखान्याचे प्रस्थापन ज्याच्या अधीन असेल अशा स्थानिक प्राधिकरणाचा प्रतिनिधी, आणि,

(iii) राज्य शासनाला जो योग्य आहे असे वाटेल असे, तीन पेक्षा जास्त माहीत असे इतर–



(२) स्थळ मूल्य समितीने, धोकादायक प्रक्रियेची कार्यकृती करणाऱ्या कारखान्याच्या अर्जाचे परीक्षण केले पाहिजे आणि विहित नमुन्यात अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून नव्वद दिवसांच्या कालावधीत [*][राज्य] शासनास त्यांची शिफारस करावी.

(३) केंद्र शासनाच्या मालकीच्या आणि नियंत्रणात असलेल्या किंवा केंद्र शासनाच्या मालकीच्या आणि नियंत्रणात असलेल्या महामंडळाच्या किंवा कंपनीच्या कारखान्याच्या कोणत्याही प्रक्रियेचा जेव्हा संबंध असेल, तेव्हा केंद्र शासनाने नामनिर्देशित केलेल्या प्रतिनिधीला त्या समितीचे सदस्य म्हणून राज्य शासनाने नेमून घ्यावे.

(४) धोकादायक प्रक्रिया करीत असलेल्या कारखान्याच्या प्रस्थापनेसाठी किंवा विस्तारासाठी अर्ज केलेल्या इसमाकडून कोणतीही माहिती मागविण्याची स्थळमूल्य समितीला शक्ती आहे.

(५) धोकादायक प्रक्रिया करीत असलेल्या कारखान्याच्या प्रस्थापनेसाठी किंवा विस्तारासाठी केलेल्या अर्जास राज्य शासन जेव्हा मंजुरी देते, तेव्हा अर्जदाराने त्यापुढे जल (प्रदूषण, नियंत्रण आणि प्रतिबंधन) अधिनियम १९७४ (१९७४ चा क्रमांक) आणि हवा (प्रदूषण नियंत्रण आणि प्रतिबंधन) अधिनियम १९८१ (१९८१ चा क्रमांक १४) खाली प्रस्थापित झालेल्या केंद्रीय मंडळाची आणि राज्य मंडळाची संमती घेणे आवश्यक आहे.

४१. ब) माहितीचे प्रकटन करणे कब्जेदारावर सक्तीचे आहे–(१) धोकादायक प्रक्रिया करणाऱ्या कारखान्याच्या कब्जेदाराने विहित केलेल्या पद्धतीने धोक्याच्या माहितीचे प्रकटन केले पाहिजे; त्यात आरोग्य, धोका, आणि अशा धोक्याच्या वस्तूंची निर्मिती वस्तूंचा उपयोग, हाताळणी, प्रवाहन, साठवण आणि कारखान्यात चालू असणाऱ्या अशा इतर प्रक्रियांची माहिती, मुख्य तपासनीसास, कारखाना जेथे असेल त्या स्थानिक प्राधिकरणास आणि सान्निध्यातील सर्वसाधारण जवळील माहिती देणे यांचा समावेश आहे (२) पोटकलम (१) खाली दिलेल्या माहितीत; नाशकाचे प्रमाण, स्पष्टीकरण आणि स्वरूप आणि विल्हेवारीचे स्वरूप याच्या अचूक माहितीचा समावेश असला पाहिजे.

(४) मुख्य तपासनीसाच्या संमतीने प्रत्येक कब्जेदाराने निकडीच्या स्थळाचे आरेखन, आणि त्याच्या कारखान्यासाठी आपली नियंत्रक उपायाचा तपशील, त्यात नेमलेल्या कामगारास आणि सान्निध्यात राहणाऱ्या सर्वसाधारण जनतेस, सुरक्षा उपायांची आवश्यक योजना जेव्हा अपघात होईल तेव्हा माहीत होईल असे केले पाहिजे.

(५) कारखान्याच्या प्रत्येक कब्जेदाराने–

(अ) कारखाने (सुधारीत) अधिनियम १९८६ च्या प्रारंभी जर कारखाना धोकादायक प्रक्रियेत व्यग्र असेल, तर अशा प्रारंभापासून तीस दिवसांच्या कालावधीत आणि

(ब) प्रारंभानंतर कोणत्याही वेळी जर कारखान्याने धोकादायक प्रक्रिया करण्याचे नियोजिले असेल, तर अशी प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी तीस दिवसांच्या कालावधीत–

विहित केलेल्या नमुन्यांत आणि विहित केलेल्या पद्धतीने अशा प्रक्रियेचे स्वरूप आणि तपशील मुख्य तपासनीसास कळविला पाहिजे.

(६) पोट कलम (५) च्या तरतुदींचे उल्लंघन जर कारखान्याच्या कब्जेदाराने केले, तर अशा कारखान्यास कलम ६ खाली दिलेला परवाना, या अधिनियमाच्या तरतुदींखाली कारखान्याच्या कब्जेदारावर काहीही शिक्षा सांगितलेली असली तरी त्याचे अधीन, रद्द होण्यास पात्र ठरेल.

(७) धोकादायक प्रक्रिया करणाऱ्या कारखान्याच्या कब्जेदाराने, मुख्य तपासनीसाच्या पूर्व संमतीने कारखान्याच्या अंतर्गत जागेत वापरात प्रवाहनात आणि साठवणीत असलेल्या धोकादायक वस्तूंची हाताळणी व उपाय योजना आणि कारखान्याबाहेर नाशकांची विल्हेवाट यांचे रेखांकन आणि प्रसिद्धीकरण कामगारांमध्ये आणि सान्निध्यात राहाणाऱ्या सर्वसाधारण जनतेत विहित केलेल्या पद्धतीने केले पाहिजे.

४१. क) **धोकादायक प्रक्रियेच्या संबंधातील कब्जेदाराचे स्पष्ट दायित्व** – धोकादायक प्रक्रिया करीत असलेल्या कारखान्याच्या प्रत्येक कब्जेदाराने–

(अ) कारखान्यातील कामगारांच्या, की जे कोणत्याही रासायनिक, विषारी किंवा इतर कोणतेही इजा पोहोचविणारे पदार्थ निर्माण करणे, साठा करणे, हाताळणे किंवा परिवहन करणे आणि विहित केले असेल अशा शर्तीचे अधीन कामगारांना सुलभतेने मिळण्याजोग्या औषधांच्या नोंदी आणि कामगारांच्या आरोग्याच्या नोंदी अचूक आणि अद्ययावत यथस्थिति असे असेल तसे, यांचे निर्वाहून केले पाहिजे.

(ब) धोकादायक पदार्थांची हाताळणी करणाऱ्या अर्हताप्राप्त आणि अनुभवी इसमांना नेमले पाहिजे आणि कारखान्यात अशा हाताळणीवर पर्यवेक्षण करण्यास सक्षम इसमांना नेमले पाहिजे आणि विहित केलेल्या पद्धतीने कामाचे ठिकाणी कामगाराच्या संरक्षणासाठी आवश्यक त्या सोयी पुरविल्या पाहिजेत.



परंतु असे, की नेमलेल्या इसमांच्या अर्हता प्राप्तीचा आणि अनुभवाचा प्रश्न उपस्थित होईल तेव्हा मुख्य तपासनीसाचा निर्णय अंतिम राहील.

(क) प्रत्येक कामगाराच्या वैद्यकीय परीक्षणाची सोय केली पाहिजे–

(i) धोकादायक वस्तूंची हाताळणी करण्यास किंवा त्याचे काम करण्यास सांगण्यापूर्वी, आणि

(ii) असे काम करीत असताना आणि काम करण्याचे बंद झाल्यावर, मध्यंतराचा काळ बारा महिन्यांपेक्षा जास्त असता कामा नये, विहित केले असेल अशा स्वरूपात.

४१. ड) **चौकशी समिती नेमण्याची केंद्र शासनाची शक्ती** – (१) केंद्र शासनाने, धोकादायक प्रक्रिया करणाऱ्यांत विशेष परिस्थिती उद्भवल्याने प्रसंगी, कारखान्यात चालू असलेल्या आरोग्याच्या किंवा सुरक्षेच्या पातळीची चौकशी करण्यासाठी कोणतेही उपाय शोधण्यात किंवा कारखान्यात नेमलेल्या कामगारांच्या आरोग्याची व सुरक्षेची विहित पातळी राखण्यात चुकारपणा झाला किंवा निष्काळजीपणा झाला किंवा काय आणि अशा चुकारपणामुळे किंवा निष्काळजीपणामुळे सर्व जनतेवर विपरीत परिणाम झाला किंवा होणे संभवनीय आहे काय आणि पूर्वदक्षतेसाठी अशा कारखान्यात किंवा इतरत्र यापुढे काय उपाय योजले जावेत हे सुचविण्याच्या हेतूने चौकशी समितीची नेमणूक करावी.

(२) पोटकलम (१) खाली नेमलेली समिती अध्यक्ष आणि इतर दोन सदस्य यांची असली पाहिजे आणि समितीची कार्यकक्षा आणि तिच्या सदस्यांच्या पदधारणेचा काळ परिस्थितीनुसार गरजेप्रमाणे केंद्र शासन जसे ठरवील त्याप्रमाणे असावा.

(३) समितीच्या शिफारशी सल्ला देण्याच्या स्वरूपाच्या असल्या पाहिजेत.

४१. इ) **निकडीची प्रमाणे** – (१) सुरक्षेची प्रमाणे धोकादायक प्रक्रियेच्या किंवा त्याच्या वहाच्या संबंधात विहित केली आहेत किंवा सुरक्षेची विहित केलेली प्रमाणे अपुरी आहेत अशी केंद्र शासनाची जर खात्री झाली, तर डायरेक्टर जनरल ऑफ फॅक्टरी ॲडव्हाईस सर्व्हिस ॲण्ड लेबर इन्स्टिट्यूट्स किंवा धोकादायक प्रक्रियेच्या संबंधात पुरलेल्या बाबतीत विशेषज्ञ अशा संस्थेस, धोकादायक प्रक्रियेच्या बाबतीत योग्य अंमलबजावणी व्हावी यासाठी निकडीची प्रमाणे ठरवून द्यावीत असा आदेश द्यावा.

(२) पोटकलम (१) खाली ठरवून दिलेली निकडीची कक्षा, या अधिनियमाखाली केलेल्या नियमात समाविष्ट केल्या नसतील तर जणू अधिनियमा-

खाली केलेल्या नियमात केलेल्या आहेत असे समजून त्यांची अंमलबजावणी केली पाहिजे व त्यांना तितकाच परिणाम राहील.

**४१. फ) रासायनिक आणि विषारी स्फोटकांची परवानांकित मर्यादा –** (१) निर्मितिप्रक्रियेतील पदार्थांची रासायनिक आणि विषारी स्फोटकांची कमाल परवानांकित प्रकारणाची मर्यादा (ती प्रमाणात्मक असो वा कशीही असो) कोणत्याही कारखान्यातील त्यांचे मूल्य दुसऱ्या सूचीत दर्शविल्याइतकी राहील.

(२) केंद्र शासनाने, कोणत्याही वेळी, विशेषज्ञ संस्थेकडून किंवा त्या क्षेत्रातील तज्ज्ञांकडून मिळविलेल्या शास्त्रीय करनाल परिणाम देण्याच्या कारणास्तव त्या सूचीत योग्य ते बदल शासकीय राजपत्रातील अधिसूचनेने करावेत.

**४१. ग) सुरक्षा व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग –** (१) जेथे धोकादायक प्रक्रिया केली जाते किंवा जेथे धोकादायक पदार्थ वापरले किंवा हाताळले जातात तेथे कब्जेदाराने व्यवस्थापक आणि कामगार यांचे प्रतिनिधित्वासाठी समान सदस्य असणारी, योग्य सुरक्षेच्या व आरोग्याच्या निर्वाहणासाठी व व्यवस्थापन आणि कामगार यांच्यातील सहकार्याची वृद्धी व्हावी म्हणून आणि त्यासंबंधांत उपायांचे नियतकालीन परीक्षण व्हावे म्हणून सुरक्षा समितीची स्थापना केली पाहिजे.

परंतु असे, की राज्य शासनाने, लेखी आदेशाने आणि कारणे नमूद करण्यासाठी कोणत्याही कारखान्याच्या किंवा कारखान्यांच्या वर्गाच्या कब्जेदारास अशा कमिटीची स्थापना करण्यापासून मुक्तता द्यावी.

(२) सुरक्षा समितीची रचना, तिच्या सदस्यांच्या पदधारणेचा काळ व त्यांची कर्तव्ये आणि हक्क, जसे विहित केले असेल तसे राहातील.

**४१. ह) तात्कालीन धोक्याची ताकीद देण्याबाबत कामगारांचा हक्क –** (१) जेथे धोकादायक प्रक्रिया चालू असेल अशा कोणत्याही कारखान्यात जेथे कामगारांना नेमलेले असेल तेथे कोणत्याही अपघातामुळे त्यांच्या जीवितास व आरोग्यास तात्कालीन धोका पोहोचण्याची भीती असते किंवा संभवनीय असते तेव्हा कब्जेदारास, प्रतिनिधीस, व्यवस्थापकास किंवा कारखान्याची जबाबदारी असेल अशा, किंवा प्रत्यक्षतः संबंधित अशा इसमास किंवा सुरक्षा समितीतील त्यांच्या प्रतिनिधींमार्फत, तात्कालिक धोक्याची सूचना त्यांनी द्यावी आणि समुच्चये करून तपासनीसास ही सूचना द्यावी.

(२) अशा कब्जेदाराचे प्रतिनिधीचे व्यवस्थापकाचे किंवा कारखान्याची किंवा प्रक्रियेची जबाबदारी असणाऱ्या इसमाचे हे कर्तव्य असेल की जर त्याची अशा तात्कालीन धोक्याच्या अस्तित्वाबद्दल खात्री झाली तर तात्काळ उपाय



योजनांची कार्यवाही करावी आणि अशा कार्यवाहीचा अहवाल तावडतोब नजिकच्या इन्स्पेक्टरला करावा.

(३) जर कब्जेदार, प्रतिनिधी, व्यवस्थापक किंवा पोटकलम (२) मध्ये निर्देश केलेल्या जबाबदार इसमाने, कामगारांना भीती वाटली अशा तात्काल धोक्याच्या अस्तित्वाबद्दल खात्री वाटत नसेल तर त्याने काहीही झाले तरी नजिकच्या तपासनीसास तावडतोब ही बाब निर्देशित करावी. अशा तात्काल धोक्याच्या अस्तित्वाबद्दलच्या प्रश्नाला त्याचा निर्णय अंतिम राहील.

१) सन १९८७ चा क्रमांक २० अन्वये हे प्रकरण (कलम ४१ अ ते ४१ ह) घालण्यात आले.

भाष्य (कलम ४१ अ ते ४१ ह) – भोपाळ वायू गळतीची दुर्घटना झाली त्या अनुभवातून धडा घेऊन शासनाने हे प्रकरण या अधिनियमात घातले असावे असे स्पष्ट दिसून येते. श्रीराम फर्टिलायझर्स च्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने, कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांनाच केवळ नाही तर शेजारी वावरणाऱ्या राहणाऱ्या, कारखान्याच्या नजिक राहणाऱ्या लोकांना वायू गळतीच्या किंवा तत्सम धोक्याच्या प्रक्रियेपासून उद्‌भवणाऱ्या आपत्तीपासून संरक्षण असणे आवश्यक आहे असा आशय व्यक्त केला. धोक्यापासून संरक्षण मिळण्याच्या संबंधात आणि संदर्भात या दुरुस्तीने इन्स्पेक्टर्सना व्यापक अधिकार दिले आहेत. या व्यापक अधिकाराचे स्वरूप कडुगी जबाबदारीचे आहे. कलम ४१ ह मध्ये कामगारांच्या हक्काचे स्वरूप नमूद आहे. मात्र त्यांत 'तात्कालीन धोका' (Imminent Danger) या शब्दातील अर्थ अगम्य आहे. 'तात्कालीन धोका' याची व्याख्या नाही. त्याचे स्वरूप अधिनियमात कोठेही स्पष्ट नाही. वाद निर्माण होऊ शकेल अशी संदिग्धता या शब्दाच्या अर्थात आहे.

---

## प्रकरण ५

## सुखसोयी

४२. धुण्याच्या सोयी – (१) प्रत्येक कारखान्यात–

(अ) तेथील कामगारांच्या उपयोगासाठी पुरेशा व योग्य प्रकारच्या धुण्याच्या सोयींची तरतूद केली पाहिजे व त्या नेहमी सुस्थितीत ठेवल्या पाहिजेत,

(ब) पुरुष व स्त्री कामगारांसाठी स्वतंत्र व पुरेसा आडोसा असलेल्या जागेची तरतूद केली पाहिजे.

(क) अशा सोयी केलेल्या जागेत सोयीस्करपणे जाता आले पाहिजे व त्या जागा स्वच्छ ठेवल्या पाहिजेत.

(२) [१][ राज्य ] शासनास, कोणत्याही कारखान्याच्या किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्याच्या किंवा कोणत्याही वस्तुनिर्माण प्रक्रियेच्या संबंधात, धुण्याच्या पुरेशा व योग्य सोयींची मानके (स्टँडर्डस) विहित करता येतील.

४३. कपडे ठेवण्यासाठी व सुकवण्याच्यासाठी सोयी – [ राज्य ] शासनास, कोणत्याही कारखान्याच्या किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्यांच्या संबंधात कामाच्या वेळी घालण्यात न येणारे कपडे ठेवण्यासाठी व ओले कपडे सुकविण्यासाठी योग्य जागांची तरतूद करण्यास भाग पाडण्याबाबत नियम करता येतील.

४४. (विश्रांतीसाठी) बसण्याच्या सोयी – (१) प्रत्येक कारखान्यात, उभे राहून काम करावे लागणाऱ्या सर्व कामगारांसाठी त्यांच्या कामाच्या दरम्यान विश्रांतीची जी कोणतीही संधी मिळेल तिचा त्यांना फायदा घेता यावा म्हणून, बसण्यासाठी योग्य व्यवस्था केली पाहिजे व ती सुस्थितीत ठेवली पाहिजे.

(२) कोणत्याही कारखान्यात एखाद्या विशिष्ट वस्तुनिर्माण प्रक्रियेत लावलेले किंवा एखाद्या विशिष्ट खोलीत काम करणारे कामगार आपले काम बसलेल्या स्थितीत कार्यक्षमतेने करू शकतील असे जर मुख्य निरीक्षकाचे मत असेल तर त्यास, लेखी आदेशाद्वारे, अशा कारखान्याच्या भोगवटदारास, अशा रीतीने कामास लावलेल्या किंवा काम करीत असलेल्या सर्व कामगारांना व्यवहार्य असेल अशी बसण्याची सोय, विनिर्दिष्ट तारखेपूर्वी, करण्यास भाग पाडता येईल.

(३) [×][ राज्य ] शासनास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, पोट-कलम (१) चे उपबंध हे कोणत्याही विनिर्दिष्ट केलेल्या कारखान्यात किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्यास किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट केलेल्या वस्तुनिर्माण प्रक्रियेस लागू होणार नाहीत असे जाहीर करता येईल.

४५. प्रथमोपचाराची साधने – (१) प्रत्येक कारखान्यात सर्व कामाच्या वेळेत, तात्काळ मिळू शकतील अशा विहित वस्तू असलेल्या प्रथमोपचाराच्या पेट्या किंवा कपाटे यांची तरतूद करण्यात यावयाच्या व ठेवण्यात यावयाच्या अशा पेट्यांची किंवा कपाटांची संख्या, कारखान्यात सामान्यतः [१][ कोणत्याही एका वेळी ] कामावर लावण्यात आलेल्या दर दीडशे कामगारांसाठी एकाहून कमी असता कामा नये.

[२][ (२) प्रथमोपचाराच्या पेटीत किंवा कपाटात विहित वस्तूखेरीज काहीही ठेवता कामा नये. ]

(३) प्रत्येक प्रथमोपचाराची पेटी किंवा कपाट कारखान्याच्या कामाच्या वेळात नेहमी तत्काळ भेटू शकेल [१][ राज्य शासनाने मान्य केलेल्या प्रथमोपचाराचे



उपचार करण्याचे शिक्षण घेतलेल्या व प्रमाणपत्र धारण करणाऱ्या आणि ] अशा स्वतंत्र जबाबदार व्यक्तीच्या प्रभाराखाली ठेवली पाहिजे. ]

(४) जेथे पाचशे कामगारांपेक्षा अधिक कामगार कामावर लावण्यात येतील अशा प्रत्येक कारखान्यात विहित केलेली साधनसामग्री ठेवलेल्या आणि विहित करण्यात येईल अशा वैद्यकीय व शुश्रूषा करणाऱ्या कर्मचारी वर्गाच्या प्रभाराखाली असलेल्या विहित आकाराच्या उपचार खोलीची तरतूद केली पाहिजे व ती सुस्थितीत ठेवली पाहिजे. [१][ आणि त्या सोयी नेहमी कारखान्यात कामाचे वेळी सहज उपलब्ध होतील अशा ठेवल्या पाहिजेत. ]

४६. उपहारगृहे – [ राज्य ] शासनास, जेथे अडीचशेपेक्षा अधिक कामगार सामान्यतः कामावर लावण्यात येतील कोणत्याही विनिर्दिष्ट केलेल्या कारखान्यात भोगवटदाराने कामगारांच्या उपयोगासाठी एक किंवा अनेक उपहारगृहांची तरतूद करण्यास व ती सुस्थितीत ठेवण्यास भाग पाडण्याबाबत नियम करता येतील.

(२) पूर्ववर्ती शक्तीच्या सर्व साधारणतेस हानी न पोचवता अशा नियमात पुढील गोष्टींची तरतूद करता येईल–

(अ) ज्या तारखेपर्यंत अशा उपहारगृहाची तरतूद केली पाहिजे ती तारीख;

(ब) उपहारगृहाची रचना, जागा, फर्निचर व इतर साधनसामग्री यांचा दर्जा;

(क) त्या ठिकाणी खाण्यासाठी पुरवावयाचे पदार्थ व त्यांचे दर.

(ड) आहारगृहासाठी व्यवस्थापन समितीची रचना करणे आणि आहारगृहाच्या व्यवस्थापनेत कामगारांना प्रतिनिधित्व देणे.

[१](ड ड) आहारगृह चालविण्यात, जी खर्चाची सदरे अन्नपदार्थांच्या किंमती निश्चित करण्यात विचारात घेतली नाहीत आणि नियोक्त्याने खर्च केली नाहीत.

(इ) विहित करण्यात येतील अशा शर्तीत अधीन राहून, खंड (क) अन्वये नियम करण्याची शक्ती मुख्य निरीक्षकास देणे.

४७. निवाऱ्याच्या जागा, विश्रांतीच्या खोल्या व जेवणाच्या खोल्या – (१) जेथे सामान्यतः दीडशेपेक्षा अधिक कामगार कामावर लावण्यात येतील अशा प्रत्येक कारखान्यात कामगारांच्या उपयोगासाठी पुरेशा व योग्य निवाऱ्याच्या जागांची आणि विश्रांतीच्या खोल्यांच्या आणि तेथे कामगार घरून आणलेले जेवण घेऊ शकतील अशा व पिण्याच्या पाण्याची सोय असलेल्या सोयीस्कर जेवणाच्या खोल्यांची तरतूद केली पाहिजे व त्या सुस्थितीत ठेवल्या पाहिजेत.

परंतु, कलम ४६ उपबंधानुसार ठेवलेले कोणतेही आहारगृह, या पोट-कलमाच्या आवश्यक बाबींचा एक भाग म्हणून समजण्यात येईल.

आणखी असे की, जेथे जेवणाची खोली असेल अशा कोणत्याही कामगाराने कामाच्या खोलीत कोणतेही खाद्यपदार्थ खाता कामा नयेत.

(२) पोट-कलम (१) अन्वये तरतूद करावयाच्या निवाऱ्याच्या जागा किंवा विश्रांतीच्या खोल्या किंवा जेवणाच्या खोल्या भरपूर उजेडाच्या व हवेशीर असाव्यात व त्या थंड व स्वच्छ ठेवण्यात आल्या पाहिजेत.

(३) राज्य शासनास–(अ) या कलमान्वये तरतूद करावयाच्या निवाऱ्यांच्या जागांची किंवा विश्रांतीच्या खोल्यांची किंवा जेवणाच्या खोल्यांच्या रचना, जागा-फर्निचर व इतर साधनसामग्री यांचा दर्जा विहित करता येईल.

(ब) शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कोणत्याही कारखान्याला किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्यांना या कलमाच्या आवश्यक बाबींपासून सूट देता येईल.

४८ शिशुगृहे– (१) जेथे सामान्यतः *(तीसपेक्षा) अधिक स्त्री कामगार कामावर लावण्यात येतात अशा प्रत्येक कारखान्यात, अशा स्त्रियांना सहा वर्षांच्या खालील वयाच्या मुलांच्या उपयोगासाठी योग्य खोलीची किंवा खोल्यांची तरतूद केली पाहिजेत व त्या सुस्थितीत ठेवल्या पाहिजेत,

(२) अशा खोल्यात पुरेशा जागेची सोय असली पाहिजे व त्याला भरपूर प्रकाश व हवा खेळती पाहिजे; त्या स्वच्छ व आरोग्यदायक स्थितीत ठेवल्या पाहिजेत आणि मुले व अर्भके यांच्या संगोपनाचे शिक्षण घेतलेल्या स्त्रियांच्या प्रभाराखाली त्या असल्या पाहिजेत.

(३) ×[राज्य] शासनास, पुढील गोष्टींबाबत नियम करता येतील–

(अ) या कलमान्वये तरतूद करावयाच्या खोल्यांचे स्थान आणि त्यांची रचना, जागा फर्निचर व इतर साधनसामग्री संबंधात मानके विहित करणे,

(ब) ज्या कारखान्यास हे कलम लागू असेल त्या कारखान्यात स्त्री कामगारांच्या बालकांची काळजी घेण्यासाठी त्यांचे कपडे धुण्याच्या व बदलण्याच्या सोयी संबंधातील योग्य तरतूद करून अशा सोयींची तरतूद करण्यास भाग पाडणे,

(क) कोणत्याही कारखान्यात अशा बालकासाठी दूध किंवा उपहार किंवा दोन्ही मोफत देण्याची तरतूद करण्यास भाग पाडणे,

(ड) कोणत्याही कारखान्यात, अशा मुलांच्या मातांना जरूर त्या वेळेच्या अंतराने आपल्या मुलांना पाजण्यासाठी सवलती देणे भाग पाडणे.



४९ कल्याण अधिकारी – (१) जेथे सामान्यतः पाचशेहून अधिक कामगार कामावर लावण्यात येतात अशा कोणत्याही कारखान्याला भोगवटादाराने, विहित करण्यात येतील इतके कल्याण अधिकारी कामावर लावले पाहिजेत.

(२) ×[राज्य] शासनास, पोट-कलम (१) अन्वये कामावर लावलेल्या अधिकाऱ्यांची कर्तव्ये, अर्हता व त्यांच्या सेवेच्या शर्ती विहित करता येईल.

५०. या प्रकरणाची पुरवणी म्हणून करण्याची शक्ती राज्य शासनास –

(अ) कोणत्याही कारखान्यास किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्यांना या प्रकरणाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे, कामगारांच्या कल्याणासाठी विहित करण्यात येईल अशा पर्यायी व्यवस्थेत अधीन राहून, पालन करण्यापासून सूट देण्याबाबत,

(ब) कोणत्याही कारखान्यात किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्यात, त्या कारखान्यात कामावर लावलेल्या कामगारांच्या प्रतिनिधींचा कामगारांच्या कल्याणविषयक कार्यांच्या व्यवस्थापन मंडळात समावेश करण्यास भाग पाडण्याबाबत,

नियम करता येतील.

× ॲडॉप्टेशन ऑफ लॉज, ऑर्डर १९५० अन्वये;

१<br>
२<br>
३<br>
४ – सन १९५४ चा क्रमांक २५ अन्वये<br>
५<br>
६

७ सन १९७४ चा क्रमांक ९४ अन्वये.

भाष्य – (कलम ४२ ते ५०) कलम ४६ आणि नियम ९१ ते ९७ कारखाना संचालक आणि कॉपलर्स आणि आयुक्त आणि शासन सचिव हे कारखाना आहार-गृहात पुरविल्या जाणाऱ्या अन्न पदार्थांच्या किंमती निश्चित करणारे अंतिम अधिकारी नाहीत. (काठियावाड टाईल वर्क्स लि. वि. कमिशनर ऑफ सेक्रेटरी टू दि गव्हर्नमेंट १९८६ (२) सी. एल. आर. १३५)

प्रकरण ६

## प्रौढ व्यक्तींचे कामाचे तास

५१. आठवड्याचे तास – कोणत्याही प्रौढ कामगारास [कोणत्याही आठवड्यात अठ्ठेचाळीस तासांहून अधिक तास काम करण्यास भाग पाडता नये किंवा काम करू देता कामा नये.

५२. आठवड्याचे सुट्टीचे दिवस – (१) पुढील गोष्टी झालेल्या असल्या खेरीज कोणत्याही प्रौढ कामगारास आठवड्याच्या पहिल्या दिवशी (ज्याचा यात यापुढे उक्त दिवस असा उल्लेख केला आहे.) कारखान्यात काम करण्यास भाग पाडता नये. किंवा काम करू देता कामा नये–

(अ) त्यास उक्त दिवसाच्या लगतपूर्वीच्या किंवा लगतनंतरच्या तीन दिवसांपैकी एक संबंध दिवस सुट्टी मिळालेली असेल किंवा मिळणार असेल, आणि

(ब) कारखान्याच्या व्यवस्थापकाने उक्त दिवस किंवा खंड (अ) अन्वये द्यावयाच्या बदली दिवस यांपैकी जो आधीचा असेल त्या दिवसापूर्वी–

(एक) त्या कामगाराला उक्त दिवशी काम करण्यास सांगण्याचा आपला उद्देश असल्याची आणि त्याऐवजी द्यावयाच्या बदली दिवसासंबंधी नोटीस निरीक्षकाच्या कार्यालयात दिलेली असेल आणि–

(दोन) त्या कारखान्यात तशा अर्थाची नोटीस लावलेली असेल,

परंतु, जो बदली दिवस दिल्यामुळे संबंध दिवसाची सुट्टी न मिळता लागोपाठ दहा दिवसांहून अधिक दिवसांपर्यंत कोणत्याही कामगारास काम करावे लागेल, असा कोणताही दिवस बदली म्हणून देता कामा नये.

(२) पोट-कलम (१) अन्वये दिलेली नोटीस, निरीक्षकाच्या कार्यालयात एक नोटीस देऊन आणि उक्त दिवस किंवा रद्द करावयाच्या सुट्टीचा दिवस, या दोहोंपैकी जो आधीचा असेल त्या दिवसापूर्वी एक दिवसाहून उशिरा नाही अशा दिवशी कारखान्यात एक नोटीस लावून रद्द करता येईल.

(३) जेव्हा पोटकलम (१) मधील उपबंधानुसार कोणत्याही कामगाराने उक्त दिवशी काम केले असेल व त्या दिवसाच्या लगत पूर्वीच्या तीन दिवसांपैकी एका दिवशी त्यास सुट्टी मिळाली असेल तेव्हा तो उक्त त्याचे आठवड्याचे कामाचे तास मोजण्याच्या प्रयोजनासाठी मागील आठवड्यात समाविष्ट केला पाहिजे.

५३. भरपाई सुट्ट्या – (१) या अधिनियमाच्या उपबंधान्वये कारखान्यातील कामगाराला कलम ५२ च्या उपबंधापासून सूट देणारा आदेश दिल्यामुळे किंवा नियम केल्यामुळे, साप्ताहिक सुट्ट्यांपैकी ज्या कोणत्याही सुट्टीसाठी उक्त कलमाच्या पोट-कलम (१) अन्वये तरतूद करण्यात आली आहे अशी सुट्टी एखाद्या कामगारास देण्यात आली नसेल तेव्हा अशा रीतीने त्याचे सुट्टीचे जितके दिवस बुडाले गेले असतील तितके भरपाईचे सुट्टीचे दिवस ज्या महिन्यात त्यास सुट्ट्या देय होत्या त्या महिन्यात किंवा त्या महिन्याच्या लगेच पुढील महिन्यात त्यास दिले पाहिजेत.



(२) ज्यांच्यासाठी पोट-कलम (१) मध्ये तरतूद केलेली आहे अशी सुट्टी कोणत्या रीतीने देण्यात यावी ती रीत राज्यशासनास विहित करता येईल.

५४. दररोजचे कामाचे तास – कलम ५१ च्या उपबंधास अधीन राहून, कोणत्याही प्रौढ कामगारास कोणत्याही दिवशी नऊ तासांहून अधिक तास पर्यंत काम करण्यास भाग पाडता कामा नये किंवा त्यास काम करू देता कामा नये.

[[1] परंतु मुख्य निरीक्षकाच्या पूर्व मान्यतेस अधीन राहून, या कलमात विनिर्दिष्ट केलेले दररोजचे कामाचे कमाल तास पाळी बदलण्याच्या दृष्टीने सोयीचे व्हावे म्हणून वाढविता येतील.]

५५. विश्रांतीसाठी मध्यंतरे – [1] [(१)] प्रत्येक दिवशी कारखान्यात प्रौढ कामगारांच्या [[1] कामाच्या मुदती] अशा रीतीने ठरविण्यात याव्यात की, कोणतीही मुदत पाच तासांपेक्षा जास्त असणार नाही आणि कोणत्याही कामगारास त्याच विश्रांतीसाठी अर्ध्या तासाचे मध्यंतर मिळाल्यापासून पाच तासांहून अधिक वेळ काम करावे लागणार नाही.

[[2] (२) राज्यशासनास किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणास अधीन राहून, मुख्य निरीक्षकास लेखी आदेशाद्वारे व त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कारणासाठी, कोणत्याही कारखान्यास, एखाद्या कामगाराने मध्यंतर न घेता करावयाच्या कामाचे एकूण तास सहापेक्षा अधिक होणार नाहीत अशा रीतीने, पोट-कलम (१) च्या उपबंधापासून सूट देता येईल.]

५६. कामाच्या तासांचा विस्तार – (स्प्रेड ओव्हर) कारखान्यातील प्रौढ कामगाराच्या कामाच्या मुदती अशा ठरविण्यात याव्या की कलम ५५ अन्वये त्याच्या विश्रांतीची मध्यंतरे धरून, त्याचा विस्तार कोणत्याही दिवशी, साडेदहा तासांहून अधिक होणार नाही.

परंतु, मुख्य निरीक्षकास, लेखी विनिर्दिष्ट करण्याकरिता कामाच्या तासांचा [विस्तार बारा तासांपेक्षा] वाढविता येईल.

५७. रात्रपाळ्या – मध्यरात्रीनंतर चालू राहणाऱ्या पाळीवर एखादा कामगार काम करीत असेल तेव्हा–

(अ) कलमे ५२ व ५३ यांच्या प्रयोजनासाठी एका संपूर्ण दिवसाची सुट्टी याचा अर्थ त्या कामगाराच्या बाबतीत, त्याची पाळी संपेल त्या वेळेपासून सुरू होणारा लागोपाठ चोवीस तासांचा अवधी असा होईल.

(ब) त्याच्या बाबतीत पुढील दिवस म्हणजे अशी पाळी संपेल त्या वेळेपासून ही पाळी चोवीस तासांची मुदत असे समजण्यात येईल आणि मध्यरात्रीनंतर


क
ख

त्याने जितके काम केले असेल तितके तास आधीच्या दिवसात मोजण्यात येतील.

५८. परस्परव्यापी पाळ्यांस प्रतिबंध – (१) कोणत्याही कारखान्यात कामगारांच्या एका बदली गटाहून अधिक बदली गटांत एकाचवेळी एकाच प्रकारचे काम कामगारांना करावे लागेल अशा पाळी पद्धतीने काम चालविता येता कामा नये.

[(२) ×[राज्य] शासनास किंवा ×[राज्य] शासनाच्या नियंत्रणास अधीन राहून मुख्य निरीक्षकास लेखी आदेशाद्वारे व त्यांत विनिर्दिष्ट केलेल्या कारणाकरिता, त्यास इष्ट वाटतील अशा शर्तींवर कोणत्याही कारखान्यात किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्यास किंवा कारखान्याच्या कोणत्याही विभागास किंवा उपवर्गास किंवा त्यांतील कोणत्याही प्रवर्गाच्या किंवा प्रकारच्या कामगारास पोट-कलम (१) च्या उपबंधापासून सूट देता येईल.

५९. अतिरिक्त कामाबद्दल जादा वेतन – (१) एखादा कारखान्यातील कोणत्याही दिवशी नऊ तासांपेक्षा अधिक तास किंवा कोणत्याही आठवड्यात अठ्ठेचाळीस तासांपेक्षा अधिक तास काम करील, तेथे त्यास अतिकालीन कामाबद्दल त्याच्या नित्याच्या वेतनदराच्या दुप्पट दराने वेतन मिळण्याचा हक्क असेल.

[(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनाकरिता 'वेतनाचा सामान्य दर' या संज्ञेचा अर्थ, मूळ वेतन अधिक कामगारांना अन्नधान्य व इतर वस्तू सवलतीच्या दराने विकल्यामुळे मिळणाऱ्या फायद्या इतकी रोख रक्कम उक्त कामगारांना त्या त्या वेळी मिळण्याचा हक्क असेल असे भत्ते, असा होतो परंतु त्यात अधिलाभांशाचा समावेश होत नाही. ]

(३) कारखान्यातील कोणत्याही कामगारास उक्तकामी दराने वेतन देण्यात येत असेल तेथे, ×[राज्य] शासन संबंधित मालक आणि कामगारांचे प्रतिनिधी यांच्याशी विचारविनिमय करून, या कलमाच्या प्रयोजनाकरिता कामगारांच्या उक्तकामी सरासरी दराच्या जास्तीत जास्त शक्य होईल तितपत समतुल्य असे कामाचे समय-दर ठरवील आणि अशा रीतीने ठरविलेले दर, उक्तकामी कामगारांच्या वेतनाचे दर म्हणून समजले जातील.

परंतु असे की जो कामगार तत्समान किंवा तत्सदृश काम लगतपूर्व दिनदर्शक महिन्यात काम न करील अशा कामगाराच्या बाबतीत समयदर, अतिकालीन काम ज्या आठवड्यात त्याने केले असेल त्या आठवड्यातील प्रत्यक्ष काम केलेल्या दिवसाचे अर्जनाचे दैनंदिनी सरासरीने येणाऱ्या वेतनाइतके समान असल्याचे समजले पाहिजे.

स्पष्टीकरण – या पोटकलमाच्या प्रयोजनाकरिता प्रत्यक्ष काम केलेल्या दिवसांच्या अर्जनाचे गणन करताना असे भत्ते–पोत सवलतीच्या दराने कामगारांना



अन्नधान्य व इतर पदार्थ विकले असतील की त्या प्रचलित वेळी ज्यास कामगार पात्र असतील, त्याच्या लाभाइतपत समान रोख समावेश असेल पण त्यात कोणताही बोनस किंवा ज्या संबंधित काळात अतिकालीन कामाबद्दल जादा वेतन घेतले असेल त्यांचा ज्यात अर्जनाचे गणन करावयाचे त्यांत समावेश नाही.

[(४) कामगारास अन्नधान्य आणि इतर वस्तू सवलतीच्या दराने विकल्यामुळे मिळणाऱ्या लाभाइतकी रोख रक्कमही एका प्रमाणभूत कुटुंबाला अनुज्ञेय असलेल्या अन्नधान्याच्या व इतर वस्तूंच्या जास्तीत जास्त परिमाणाच्या आधारे विहित करण्यात येईल इतक्या वेळा संगणन केले पाहिजे.]

स्पष्टीकरण १ – 'प्रमाणभूत कुटुंब' या संज्ञेचा अर्थ कामगार, त्याची पत्नी, किंवा स्त्री कामगार असेल तर तिचा पती, आणि चौदा वर्षांखालील वयाची दोन मुले, यांचे बनलेले व एकूण तीन प्रौढ खप एकमानाची आवश्यकता असलेले कुटुंब, असा होतो.

स्पष्टीकरण २ – 'प्रौढ खप एकमान' या संज्ञेचा अर्थ चौदा वर्षांवरील वयाच्या पुरुषास लागणाऱ्या खपाचे एकमान असा होतो, आणि चौदा वर्षांवरील वयाच्या स्त्रीसाठी आणि चौदा वर्षांखालील वयाच्या मुलासाठी लागणाऱ्या खपाचे एकमान हे प्रौढ खप एकमान अनुक्रमे ८ व ६ या दराने परिगणन केले पाहिजे.

(५) ×[राज्य] शासनास–

(अ) ज्या रीतीने कामगाराला अन्नधान्य आणि इतर वस्तू सवलतीच्या दराने विकल्यामुळे मिळणाऱ्या लाभाइतकी रोख रक्कम संगणित केली जाईल, ती रीत आणि–

(ब) या कलमाच्या उपबंधाचे पालन करण्याच्या प्रयोजनास्तव कारखान्यात ठेवल्या जाव्या पाहिजेत. अशा नोंदवह्या–

या बाबी विहित करण्यासाठी नियम करता येतील.

६०. दोन ठिकाणी कामास लावण्यावर निर्बंध – विहित करण्यात येतील अशा प्रसंगाखेरीज करून, ज्या कोणत्याही दिवशी एखादा प्रौढ कामगार कोणत्याही कारखान्यात आधीच काम करीत असेल, त्यास त्याच दिवशी इतर कोणत्याही कारखान्यात काम करण्यास भाग पाडता कामा नये किंवा काम करू देता कामा नये.

६१. प्रौढ कामगारांच्या कामाच्या कालावधीची नोटीस – (१) कलम १०८, पोट कलम (२) यांतील उपबंधानुसार प्रत्येक कारखान्यात, प्रौढ कामगारांच्या कामाच्या कालावधीची नोटीस लावली पाहिजे आणि ती दिनचक ठेवली पाहिजे. उक्त नोटीसमध्ये, प्रत्येक दिवशी ज्या कालावधीत प्रौढ कामगारांना

काम करावे लागेल तो कालावधी स्पष्टपणे दर्शविण्यात आला पाहिजे.

(२) पोट कलम (१) अन्वये आवश्यक असलेल्या नोटीसमध्ये दर्शविलेल्या कालावधी, या कलमाच्या पुढील उपबंधानुसार आगाऊ ठरविण्यात आल्या पाहिजेत आणि त्या कालावधीत काम करणारे कामगार, कलमे ५१, ५२, ५४, [१][ ५५, ५६ व ५८ ] यांच्या उपबंधापैकी कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करून काम करणार नाहीत अशा त्या असल्या पाहिजेत.

(३) कारखान्यातील सर्व प्रौढ कामगारांना एकाच कालावधीत काम करावे लागणार असेल तेथे, कारखान्याच्या व्यवस्थापकाने अशा कामगारासाठी त्या कालावधी सर्वसाधारणपणे ठरविल्या पाहिजेत.

(४) कारखान्यातील सर्व प्रौढ कामगारांना एकाच वेळी काम करावे लागणार नसेल तेथे, कारखान्याच्या व्यवस्थापकाने, त्यांच्या कामाच्या स्वरूपानुसार, त्यांचे गट करून वर्गीकरण केले पाहिजे आणि प्रत्येक गटातील कामगारांची संख्या दर्शविली पाहिजे.

(५) ज्या गटाला पाळी पद्धतीने काम करावे लागणार नसेल अशा प्रत्येक गटासाठी कारखान्याच्या व्यवस्थापकाने ज्या कालावधीत त्या गटास काम करावे लागणार असेल त्या त्या वेळा ठरविल्या पाहिजेत.

(६) कोणत्याही गटास पाळी पद्धतीने काम करावे लागणार असेल आणि त्याचे बदली गट (रिले) आगाऊ ठरविलेल्या नियतकालीन पाळी बदलास अधीन राहाणार नसतील तेथे, कारखान्याच्या व्यवस्थापकाने ज्या कालावधीत त्या गटाच्या प्रत्येक बदली गटास काम करावे लागेल त्या कालावधी ठरविल्या पाहिजेत.

(७) कोणत्याही गटास पाळी पद्धतीवर काम करणे असेल आणि त्याचे बदली गट (रिले) आगाऊ ठरविलेल्या नियतकालीन पाळी बदलास अधीन राहावयाचे असतील तेथे कारखान्याच्या व्यवस्थापकाने त्या गटाच्या कोणत्याही बदली गटास त्या कालावधीत काम करावे लागणार असेल त्या कालावधी व जो बदली गट दिवसातील कोणत्याही वेळी काम करणार असेल तो बदली गट या दोन्ही गोष्टी पाळण्याच्या ज्या योजनांअन्वये कळू शकतील, ती पाळ्यांची योजना तयार केली पाहिजे.

(८) ×[ राज्य ] शासनास, पोटकलम (१) अन्वये आवश्यक असलेल्या नोटीसचे नमुने आणि ज्या रीतीने ते ठेवण्यात आले पाहिजेत ती रीत विहित करता येईल.

(९) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर काम सुरू करणाऱ्या कारखान्याच्या बाबतीत, पोटकलम (१) यांत विनिर्दिष्ट केलेल्या नोटीसच्या दोन प्रती, ज्या



दिवशी कारखान्यात काम सुरू करण्यात आले असेल त्या दिवसापूर्वी निरीक्षकास पाठविल्या पाहिजेत.

(१०) पोट कलम (१) यांत उल्लेख केलेल्या नोटीसमध्ये बदल करणे आवश्यक होईल अशा वन्हेचा, कोणत्याही कारखान्यातील, कामाच्या पद्धतीतील कोणताही प्रस्तावित बदल, बदल करण्यापूर्वी त्या संबंधीच्या दोन प्रती निरीक्षकास पाठवून कळविण्यात आला पाहिजे आणि मागील बदलाच्या तारखेपासून एक आठवडा उलटून जाईपर्यंत निरीक्षकाच्या पूर्व मंजुरीशिवाय असा कोणताही बदल करता कामा नये.

६२ प्रौढ कामगारांची नोंदवही – (१) प्रत्येक कारखान्याच्या व्यवस्थापकाने प्रौढ कामगारांची एक नोंदवही ठेवली पाहिजे व ती कामाच्या तासाच्या दरम्यान किंवा कारखान्यात कोणतेही काम चालू असेल तेव्हा सर्व वेळी निरीक्षकाला उपलब्ध झाली पाहिजे व त्यांत पुढील बाबी दर्शविल्या पाहिजेत–

(अ) कारखान्यात प्रत्येक प्रौढ कामगाराचे नाव

(ब) त्याच्या कामाचे स्वरूप

(क) त्याचा समावेश असेल असा, असल्यास, कोणताही गट

(ड) त्याचा गट पाळीपद्धतीने काम करीत असेल तेव्हा त्यास देण्यात येणारा बदली गट आणि (इ) विहित करण्यात येईल असा इतर तपशील.

परंतु असे, की कारखान्याच्या नित्याच्या कामाचा भाग म्हणून ठेवण्यात येणाऱ्या कोणत्याही हजेरी रजिस्टरवरून किंवा नोंद वहीवरून कारखान्यातील कोणत्याही किंवा सर्व कामगारांबाबतचा, या कलमान्वये जरूर असलेला तपशील मिळू शकेल असे निरीक्षकाचे मत असेल तर त्यास, लेखी आदेशाद्वारे, असे हजेरी पत्रक किंवा नोंदवही तशास नोंदीपुरती त्या कारखान्यातील प्रौढ कामगारांच्या नोंदवहीऐवजी ठेवण्यात यावी किंवा तशी नोंदवही म्हणून समजण्यात यावी असा निदेश देता येईल.

(२) [ राज्य ] शासनास, प्रौढ कामगारांच्या नोंदवहीची नमुना, ती ज्या रीतीने ठेवली पाहिजे ती रीत आणि ज्या कालावधीपर्यंत ती जपून ठेवली पाहिजे तो कालावधी या गोष्टी विहित करता येतील.

६३. कलम ६१ खालील नोटीस व कलम ६२ खालील नोंदवही या दोन्हीतील कामाचे तास जुळते असणे – कोणत्याही प्रौढ कामगारास, कोणत्याही कारखान्यात प्रौढ कामगाराच्या कामाच्या कालावधीसंबंधी त्या कारखान्यात लावून ठेवलेल्या नोटिशीनुसार आणि प्रौढ कामगारांच्या नोंदवहीत त्याच्या नावासमोर

पूर्वीच करण्यात आलेल्या नोंदीस अनुसरून असेल, त्या खेरीजकरून इतर रीतीने काम करण्यास भाग पाडता कामा नये किंवा काम करू देता कामा नये.

६४. सूट देण्याबाबत नियम करण्याची शक्ती – [राज्य] शासनास, नियम करून, ज्या ज्या व्यक्ती कारखान्यांत पर्यवेक्षकीय किंवा व्यवस्थापकीय पदे धारण करीत असतील किंवा गोपनीय स्वरूपाचे काम करण्याच्या पदावर लावलेल्या असतील त्या व्यक्ती ठरविता येतील.

[किंवा अशा नियमाने व्याख्यित केलेल्या इसमाशिवाय कोणत्याही इसमास पर्यवेक्षणीय किंवा व्यवस्थापकीय पद धारणारा इसम म्हणून किंवा कारखान्यात गोपनीय दर्जाचे काम करण्यासाठी नेमलेला इसम जर मुख्यनिरीक्षकाचे मते असा इसम पदधारण करीत आहे किंवा नेमलेला आहे असा इसम [जाहीर करण्यास] मुख्य निरीक्षक शक्ती प्रदानित आहे.] परंतु असे की व्याख्यित केलेल्या किंवा जाहीर केलेल्या कोणत्याही इसमाने, जेव्हा अशा इसमाच्या सर्वसाधारण वेतनाचे सामान्य दराने [वेतन प्रदान अधिनियम १९३६ (१९३६ चा क्रमांक ४) च्या कलम १ पोटकलम (६) मध्ये स्पष्ट केलेल्या वेळोवेळी सुधारीत केले असेल तसे, वेतनाच्या मर्यादेपेक्षा जास्त नाही.] कलम ५९ खाली जादा वेळ काम केल्याच्या संबंधात जास्त वेतन घेण्यास पात्र राहील.

(२) [राज्य] शासनास, कारखान्यातील प्रौढ कामगारासाठी नियम करून अशा नियमात विहित करण्यात येईल तेवढ्या व विहित करण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून–

(अ) निकडीच्या दुरुस्त्या करण्याच्या कामावर लावलेल्या कामगारांना कलमे ५१, ५२, ५४, ५५, व ५६ च्या उपबंधापासून,

(ब) कारखान्याच्या सर्वसाधारण कामाकरिता घालून दिलेल्या मर्यादेच्या बाहेर जाऊन जे कोणतेही पूर्वतयारीचे किंवा पुरवणीच्या स्वरूपाचे काम करण्याची आवश्यकता असेल ते काम करण्याच्या कामावर लावलेल्या कामगारास कलमे ५१ ५४, ५५ व ५६ च्या उपबंधापासून,

(क) जे काम स्वाभाविकपणेच मधून मधून खंडित होण्याइतके असेल, की कामावर असताना ज्या मध्यंतरामध्ये कामगार काम करीत नाहीत ती मध्यंतरे कलम ५५ अन्वये अगर तदनुसार आवश्यक असलेल्या विश्रांतीच्या मध्यंतराहून, सामान्यतः अधिक असतील, असे काम करण्यासाठी कामावर लावलेल्या कामगारास कलमे ५१, ५४, ५५ व ५६ च्या उपबंधापासून,

(ड) जे काम तांत्रिक कारणासाठी [×××] सतत चालू ठेवलेच पाहिजे असे कोणतेही काम करण्याच्या कामावर लावलेल्या कामगारांस, कलमे ५१, ५२, ५४, ५५ व ५६ च्या उपबंधापासून–



(इ) जे पदार्थ दररोज केले पाहिजेत किंवा पुरविले पाहिजेत असे अत्यावश्यक पदार्थ तयार करण्याच्या किंवा पुरविण्याच्या कामावर लावलेल्या कामगारांस, कलमे [५१ व ५२] च्या उपबंधापासून,

(फ) जी निर्मितिप्रक्रिया ठराविक हंगाम खेरीज करून इतर वेळी करता येणे शक्य नाही अशी प्रक्रिया करण्याच्या कामावर लावलेल्या कामगारास कलमे [५१, ५२ व ५४] च्या उपबंधापासून,

(ग) नैसर्गिक शक्तींच्या अनियमित क्रियेवर अवलंबून असणाऱ्या वेळाशिवाय इतर वेळी जी निर्मितिप्रक्रिया करता येणे शक्य नसेल अशी प्रक्रिया करण्याच्या कामावर लावलेल्या कामगारांस, कलमे ५२ व ५५ च्या उपबंधापासून

(ह) इंजिनाच्या खोल्या किंवा बाष्पगृहे यामध्ये काम करण्याच्या किंवा वीज संयंत्राचे किंवा पारेषण यंत्र सामग्रीचे काम पाहाण्याच्या कामावर लावलेल्या कामगारांस, कलमे ५१ व ५२ च्या उपबंधापासून,

(आय) वृत्तपत्रे छापण्याच्या कामावर लावलेल्या ज्या कामगारांना यंत्रसामग्री बंद पडल्यामुळे कामाशिवाय बसून राहावे लागत असेल अशा कामगारांना कलमे ५१, ५४ व ५६ च्या उपबंधापासून,

स्पष्टीकरण – या खंडातील 'वृत्तपत्र' या संज्ञेचा अर्थ सन १९८७ चा मुद्रणालये व पुस्तक नोंदणी अधिनियम, १८६७ (१८६७ चा क्रमांक २५) यात त्या संज्ञेस जो अर्थ दिला असेल, तोच असेल,

[(ज) रेल्वेच्या वाघिणींमध्ये माल चढविण्याच्या किंवा त्यांतून माल उतरविण्याच्या कामावर लावलेल्या कामगारांना, कलमे ५१, ५२, ५४, ५५ व ५६ च्या उपबंधापासून, सूट देण्याबाबत तरतूद करता येईल.

(के) जे काम [राज्य] शासनाने कार्यालयीन राजपत्रात राष्ट्रीय महत्त्वाचे काम म्हणून सूचित केले असेल अशा कोणत्याही कामावर लावलेल्या कामगारास, कलमे ५१, ५२, ५४, ५५ व ५६ च्या उपबंधापासून.

(३) कोणतीही सूट देण्याची तरतूद करण्यासाठी पोट कलम (२) अन्वये केलेल्या नियमात, कलम ६१ च्या उपबंधापासून जी कोणतीही आनुषंगिक सूट देणे [राज्य] शासनास इष्ट वाटेल अशी सूट देण्याबद्दलही ते ठरवितील अशा शर्तींना अधीन राहून, तरतूद करता येईल.

(४) ह्या कलमान्वये नियम करताना [राज्य] शासनास पोट-कलम (२), खंड (अ) खालील सूट देण्याच्या बाबीखेरीज करून, अतिकालिक कामाचे तास धरून, कामाच्या खालील मर्यादा अधिक वाढविता येणार नाहीत.

( i ) कोणत्याही दिवशी कामाचे एकूण तास दहा तासांपेक्षा अधिक असता कामा नयेत,

( ii ) विश्रांतीची मध्यंतरे धरून, कामाच्या तासांचा विस्तार ( स्प्रेड ओव्हर ) कोणत्याही एका दिवशी बारा तासांपेक्षा अधिक असता कामा नये.

परंतु असे की [ राज्य ] शासनास, पोट-कलम (२), खंड (ड) यात निर्दिष्ट केलेल्या कामगारांच्या कोणत्याही किंवा सर्व प्रवर्गांच्या संबंधात पाळी कामगारास, पुढील पाळीतील जो कामगार कामावर आला नसेल त्याच्या गैर-हजेरीत, पुढील संपूर्ण पाळीचे किंवा तिच्या भागाचे काम करणे शक्य व्हावे म्हणून खंड (एक), व खंड (दोन) अन्वये लावण्यात आलेले निर्बंध ज्या परिस्थितीत व ज्या शर्तीस अधीन राहून लागू होणार नाहीत ती परिस्थिती व त्या शर्ती, विहित करण्यासाठी नियम करता येतील.

[१८][ ( iii ) आठवड्यातील कामाच्या एकूण तासांची संख्या [१९] [ साठ ] तासांपेक्षा जास्त होता कामा नये. ]

[१८][ (iv) अतिकालिक कामाच्या एकूण कामाच्या तासांची संख्या, कोणत्याही तिमाहीसाठी पन्नासपेक्षा अधिक होता कामा नये. ]

स्पष्टीकरण – 'तिमाही' या संज्ञेचा अर्थ दिनांक १ जानेवारी, १ एप्रिल, १ जुलै अथवा १ ऑक्टोबर रोजी सुरू होणारा सलग तीन महिन्यांचा कालावधी असा होतो.

(५) या कलमान्वये केलेले नियम [१८][पाच] वर्षांपेक्षा अधिक नाही इतक्या कालावधीपर्यंत अमलात राहतील.

६५ सूट देण्याबाबत आदेश देण्याची शक्ती – (१) चालविण्यात येत असलेल्या कामाच्या स्वरूपामुळे किंवा इतर परिस्थितीमुळे कोणत्याही कारखान्यातील किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्यातील कोणत्याही प्रौढ कामगारांच्या कामाचा कालावधी ठरवून देणे गैर वाजवी आहे असे [४][ राज्य ] शासनाची खात्री होत असेल तेव्हा, त्यास, लेखी आदेशाद्वारे योग्य वाटेल त्या मर्यादेपर्यंत व त्या रीतीने आणि कामाच्या कालावधीवर यथोचित नियंत्रण चालू राहावे यासाठी इष्ट वाटतील अशा शर्तीस अधीन राहून त्या कारखान्यातील अशा कामगारांच्या संबंधात, कलमे (६) यातील उपबंध शिथिल करता येतील किंवा त्यांत फेरबदल करता येतील.

(२) [४][ राज्य ] शासनास किंवा [४][ राज्य ] शासनाच्या नियंत्रणास अधीन राहून मुख्य निरीक्षकास लेखी आदेशाद्वारे, त्यास आवश्यक वाटतील अशा शर्तीवर कोणत्याही कारखान्यातील किंवा कोणत्याही गटाच्या किंवा वर्गाच्या



किंवा प्रकारच्या कारखान्यातील कोणत्याही किंवा सर्व प्रौढ कामगारांस अपवादात्मक निकडीचे काम करणे शक्य व्हावे म्हणून त्या कारखान्याला किंवा कारखान्यांना सूट देण्याची जरूरी आहे या कारणास्तव कलमे ५१, ५२, ५४ व ५६ यांच्या उपबंधांपैकी कोणत्याही किंवा सर्व उपबंधांपासून सूट देता येईल.

[२२] (३) [ कामाच्या तासांसंबंधात ] पोटकलम (२) अन्वये दिलेली कोणतीही सूट खालील शर्तींच्या अधीन असेल, जसे–

( i ) कोणत्याही दिवसाचे कामाचे एकूण तास, बारापेक्षा जास्त असता कामा नये.

( ii ) विश्रांतीची मध्यंतरे धरून कामाच्या तासांचा विस्तार (स्प्रेड ओव्हर) कोणत्याही एक दिवशी तेरा तासांपेक्षा जास्त असता कामा नये.

( iii ) कोणत्याही आठवड्यातील एकूण कामाच्या तासांची संख्या–अतिकालीन समाविष्ट–साठ तासांपेक्षा जास्त असता कामा नये.

( iv ) सलग सात दिवसांपेक्षा जास्त दिवस आणि कोणत्याही तिमाहीत पन्नासहत्तर तासांपेक्षा जास्त अतिकालीन काम करण्यास कामगारास मुभा देता कामा नये.

स्पष्टीकरण – या पोटकलमातील 'तिमाही' या संज्ञेचा अर्थ कलम ६४ पोटकलम (४) यात जो आहे; तो–

[२२] [ (४) × × × ]

६६ स्त्रियांना कामावर लावण्यात आणखी निर्बंध – (१) कारखान्यातील स्त्री कामगारांना ह्या प्रकरणाचे उपबंध लागू करताना त्यात आणखी पुढील निर्बंधांची पुरवणी म्हणून जर घालण्यात येईल जसे.

(अ) कोणत्याही स्त्री कामगारास कलम ५४ च्या उपबंधापासून सूट देता येणार नाही.

(ब) कोणत्याही स्त्री कामगारास सकाळी ६ ते रात्री ७ पर्यंतच्या वेळेखेरीज करून इतर वेळी काम करू देण्यास भाग पाडता कामा नये किंवा काम करू देता कामा नये.

परंतु असे की [४][ राज्य ] शासनास, शासकीय राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्यांच्या संबंधात, खंड [ब] यांत घालून दिलेल्या वेळांच्या मर्यादांच्या संबंधात, बदल करता येईल, परंतु अशा बदलामुळे कोणत्याही स्त्री कामगारास रात्री १० ते सकाळी ५ च्या दरम्यान कामावर लावणे अधिकृत ठरणार नाही, अशा रीतीने ती बदल करण्यात आला पाहिजे.

(क) साप्ताहिक सुट्टीनंतर किंवा इतर कोणत्याही सुट्टीनंतर असेल त्या व्यतिरिक्त पाळ्यांमध्ये कोणताही बदल करता कामा नये.

(२) ×[ राज्य ] शासनास, नियम करून त्यांत त्यास विहित करता येईल अशा शर्तीस अधीन राहून, मासे खारवण्याच्या किंवा मासे डब्यांत भरण्याच्या ज्या कारखान्यात कोणत्याही कच्च्या मालाची हानी होऊ नये म्हणून किंवा तो खराब होऊ नये म्हणून उक्त निर्बंधांत नमूद केलेल्या तासांपेक्षा जास्त तास स्त्रियांना कामावर लावणे आवश्यक असेल अशा कारखान्यात काम करणाऱ्या स्त्रियांना पोट कलम (१) यांत नमूद केलेल्या निर्बंधापासून सूट देण्याबद्दलची तरतूद करता येईल.

(३) पोट कलम (२) अन्वये केलेले नियम एका वेळी तीन वर्षांपेक्षा जास्त नाही इतक्या कालावधीपर्यंत अंमलात राहतील.

× ॲडॅप्टेशन ऑफ लॉज, ऑर्डर १९५० अन्वये.

१. सन १९५४ चा क्रमांक २५ अन्वये
२. वरील प्रमाणे
३. सन १९४९ चा क्रमांक ४० अन्वये
४. सन १९५४ चा क्रमांक २५ अन्वये
५. वरील प्रमाणे
६. सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये
७. वरील प्रमाणे
८. सन १९५४ चा क्रमांक २५ अन्वये
९. वरील प्रमाणे
१०. सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये
११. सन १९८७ चा क्रमांक २० अन्वये
१२. सन १९५४ चा क्रमांक २५ अन्वये
१३. सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये
१४. वरील प्रमाणे
१५. वरील प्रमाणे
१६. सन १९५४ चा क्रमांक २५ अन्वये
१७. सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये
१८. सन १९५४ चा क्रमांक २५ अन्वये
१९. सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये
२०. वरील प्रमाणे
२१. वरील प्रमाणे



२२. वरील प्रमाणे
२३. वरील प्रमाणे
२४. वरील प्रमाणे
२५. वरील प्रमाणे
२६. सन १९५४ चा क्रमांक २५ अन्वये

भाष्य – ( कलम ५१ ते ६६ ) कलम ५९ च्या तरतुदीचा उद्देश असा, की जो कामगार दिवसाच्या कामाच्या विहित तासांपेक्षा किंवा कोणत्याही आठवड्यांत अठ्ठेचाळीस तासांपेक्षा जास्त तास काम करील त्यास जास्त वेळेच्या कामासाठी जादा वेतन दिले पाहिजे. जेव्हा कामगार कंपनीच्या कामासाठी त्याच्या नोकरीपेक्षा जास्त वेळ फिरतीवर असतो, तेव्हा नोकरीच्या शर्तीं अटीनुसार प्रवास भत्ता व रोजंदारी भत्ता मिळण्यास पात्र होतो. मात्र अशा कालावधीत तो जादा वेळ काम करील तरीही जादा वेळ कामासाठी जादा भत्ता मिळण्यास पात्र नसतो. (डायरेक्टर ऑफ स्टोअर्स, गुजरात एस. टी. आर. सी. वि. पी. एल. दुबे १९७८ [ ३८ ] एफ एल आर ४२० )

---

## प्रकरण ७

## तरुण व्यक्तींना कामावर लावणे

६७. अल्पवयी मुले कामावर लावण्यास मनाई – ज्या मुलांचे वय पूर्ण चौदा वर्षांचे झाले नाही अशा कोणत्याही कारखान्यांत काम करण्यास भाग पाडता कामा नये किंवा करू देता कामा नये.

६८. प्रौढ नसलेल्या कामगारांनी टोकन स्वतःबरोबर ठेवणे – ज्या मुलांचे वय चौदा वर्षे पूर्ण झाले आहे अशा कोणत्याही मुलास व पौगंडास–

(अ) जर कलम ६९ अन्वये त्यास अनुलक्षून दिलेले स्वास्थ्य प्रमाणपत्र कारखान्याच्या व्यवस्थापकाच्या ताब्यात नसेल, आणि–

(ब) असे मूल किंवा असा पौगंड, कामावर असताना अशा प्रमाणपत्राचे संदर्भ दर्शक टोकन जवळ बाळगीत नसेल, तर– कोणत्याही कारखान्यात काम करण्यास भाग पाडता कामा नये किंवा काम करू देता कामा नये.

६९. स्वास्थ्य प्रमाणपत्रे – कारखान्यात काम करण्यास योग्य असल्याबद्दल प्रमाणित करण्यात आल्यास कोणत्याही तरुण व्यक्तीस कारखान्यांत कामावर लावण्यात येईल. अशा अर्थाचे, व्यवस्थापकाच्या सहीचे, कागदपत्र सोबत जोडून, कोणत्याही तरुण व्यक्तीने किंवा त्याच्या माता-पित्याने किंवा पालकाने अर्ज केल्यानंतर, किंवा ज्या कारखान्यात काम करण्याची कोणत्याही तरुण व्यक्तीची

इच्छा असेल त्या कारखान्याच्या व्यवस्थापकाने अर्ज केल्यानंतर, प्रमाणक शल्य चिकित्सकाने, अशा व्यक्तीची वैद्यकीय तपासणी करून, ती व्यक्ती कारखान्यात काम करण्यास योग्य आहे याबद्दल खात्री करून घेतली पाहिजे.

(२) प्रमाणक शल्य चिकित्सकाला, तपासणी केल्यानंतर अशा तरुण व्यक्तीस विहित केलेल्या नमुन्यात–

(अ) अशा तरुण व्यक्तीचे चौदावे वर्ष पूर्ण झाले असून, तिला विहित केलेली शारीरिक प्रमाणे प्राप्त झाली आहेत व असे काम करण्यास ती योग्य आहे अशा प्रमाणक शल्य-चिकित्सकाची खात्री पटल्यास, मूल म्हणून कारखान्यात काम करण्यास योग्य असल्याबद्दलचे प्रमाणपत्र; किंवा

(ब) अशा तरुण व्यक्तीचे पंधरावे वर्ष पूर्ण झाले असून, कारखान्यात पूर्ण दिवसाचे काम करण्यास ती योग्य आहे अशी खात्री पटल्यास, प्रौढ म्हणून कारखान्यात काम करण्यास योग्य असल्याबद्दलचे प्रमाणपत्र देता येईल. किंवा ते नव्याने करून देता येईल.

परंतु असे, की त्या तरुण व्यक्तीने जेथे काम करण्याचे ठरविले असेल त्या जागेबाबत आणि ज्या निर्मितिप्रक्रियेत किंवा कामावर लावण्यात येईल त्या प्रक्रियेबाबत प्रमाणक शल्य चिकित्सकाला जातीने माहिती असल्याशिवाय अशा जागेची तपासणी करीपर्यंत त्याने, त्या पोटकलमान्वये प्रमाणपत्र देता कामा नये किंवा ते नव्याने करून देता कामा नये.

(३) पोट कलम (२) अन्वये द्यावयाचे किंवा नव्याने करून द्यावयाचे स्वास्थ्य प्रमाणपत्र, हे–

(अ) ते दिल्याच्या तारखेपासून फक्त बारा महिन्यांच्या कालावधीपर्यंत वैध राहील;

(ब) ज्या कामावर त्या तरुण व्यक्तीस लावण्यात येईल त्या कामाच्या स्वरूपासंबंधीच्या शर्तीस किंवा बारा महिन्यांच्या कालावधी संपण्यापूर्वी त्या तरुण व्यक्तीची पुन्हा तपासणी करण्यास भाग पाडण्याच्या शर्तीस अधीन राहून देण्यात यावे.

(४) पोट कलम (२) अन्वये दिलेले किंवा नव्याने करून दिलेले कोणतेही प्रमाणपत्र धारण करणारी व्यक्ती, त्यात नमूद केलेल्या क्षमतेचे काम कारखान्यात करण्यास यापुढे लायक नाही असे प्रमाणक शल्य चिकित्सकाचे मत होईल तर, ते प्रमाणपत्र त्याने रद्द केले पाहिजे.

(५) प्रमाणक शल्य-चिकित्सक एखादे, प्रमाणपत्र देण्याचे किंवा ते नव्याने करून देण्याचे किंवा विनंती करण्यात आल्या प्रकारचे प्रमाणपत्र देण्याचे नाकारील



किंवा प्रमाणपत्र रद्द करील त्या बाबतीत, जी व्यक्ती त्या प्रमाणपत्रासाठी किंवा ते नव्याने करून देण्यासाठी अर्ज करू शकली असती अशा कोणत्याही व्यक्तीने तशी विनंती केल्यास, प्रमाणपत्र नाकारल्याबद्दलची किंवा ते रद्द करण्याबद्दलची आपली कारणे त्याने लेखी दिली पाहिजेत.

(६) कोणत्याही तरुण व्यक्तीच्या संबंधीचे, या कलमाखालील प्रमाणपत्र, पोट कलम (३) खंड (ब) यात निर्दिष्ट केलेल्या शर्तीस अधीन राहून देण्यात आले असेल किंवा नव्याने करून देण्यात आले असेल त्या बाबतीत त्या शर्ती अन्वये असेल त्या खेरीज करून त्या तरुण व्यक्तीस कोणत्याही कारखान्यात काम करण्यास भाग पाडता कामा नये किंवा काम करू देता कामा नये.

(७) या कलमाखालील प्रमाणपत्रासाठी द्यावयाचे कोणतेही शुल्क कारखान्याच्या कब्जेदाराने दिले पाहिजे आणि ती तरुण व्यक्ती, तिचे माता-पिता किंवा पालक यांच्याकडून ती वसूल करता कामा नये.

७०. पौगंडास दिलेल्या स्वास्थ्य प्रमाणपत्राचा परिणाम – (१) ज्या पौगंडास कलम ६९, पोट कलम (२) खंड (ब) अन्वये प्रौढ म्हणून कारखान्यात काम करण्यासाठी स्वास्थ्य प्रमाणपत्र देण्यात आले असेल आणि जो कारखान्यात कामावर असताना प्रमाणपत्राचे सदर्भ दर्शक टोकन जवळ बाळगीत असेल असा पौगंड प्रकरण ६ व ७ यांच्या सर्व प्रयोजनाकरिता प्रौढ म्हणून समजण्यात येईल.

[1][× × ×]

[2][(१ अ) ज्याच्या वयास सतरावे वर्ष लागले आहे, पण प्रौढ म्हणून कारखान्यात काम करण्यास तंदुरुस्त असल्याचे प्रमाणपत्र मंजूर झाले अशा पौगंडावस्थेतील स्त्रीस किंवा पुरुषास कोणत्याही कारखान्यात सकाळी ६ आणि सायंकाळी ७ या दरम्यानच्या वेळेव्यतिरिक्त इतर वेळी काम करण्यास भाग पाडता कामा नये किंवा काम करू देता कामा नये.

परंतु असे की × [राज्य शासनाने शासकीय राजपत्रात अधिसूचित करून, कोणत्याही कारखान्याच्या किंवा वर्गाच्या किंवा प्रकाराच्या संबंधात–]

[(i) जेथे राष्ट्रीय हित उपस्थित होईल अशा गंभीर आणीबाणीच्या प्रकरणी या पोट कलमाच्या तरतुदीस सूट दिल्याचे ठरविले जावे.]

(२) ज्या पौगंडास पूर्वोक्त खंड (ब) अन्वये कारखान्यात प्रौढ म्हणून काम करण्यास स्वास्थ्य प्रमाणपत्र देण्यात आले नसेल अशा पौगंडास त्याचे वय काहीही असले तरी या अधिनियमाच्या सर्व प्रयोजनासाठी मूल म्हणून समजण्यात येईल.

(ब) स्वास्थ्य प्रमाणपत्राशिवाय कारखान्यात काम करणारी तरुण व्यक्ती त्यात नमूद केलेल्या प्रकारचे काम करण्यास योग्य नाही–

असे निरीक्षकाचे मत असेल तर त्याला वाटल्यास, त्या कारखान्याच्या व्यवस्थापकावर नोटीस बजावून त्या नोटीसमध्ये यथास्थिती अशा व्यक्तीची किंवा तरुण व्यक्तीची प्रमाणक शल्य-चिकित्सकाकडून तपासणी करण्याबद्दल मागणी करता येईल आणि अशा व्यक्तीस किंवा तरुण व्यक्तीस निरीक्षक तसा आदेश देईल तर त्या व्यक्तीची अशी तपासणी होईपर्यंत आणि कलम ६९ अन्वये यथास्थिती स्वास्थ्य प्रमाणपत्र किंवा नवीन स्वास्थ्य प्रमाणपत्र देण्यात येईपर्यंत, किंवा तिची तपासणी करणाऱ्या प्रमाणक शल्य चिकित्सकाकडून ती तरुण व्यक्ती सज्ञानाचे प्रमाणपत्र देण्यात येईपर्यंत कोणत्याही कारखान्यात कामावर लावता कामा नये.

७६. नियम करण्याची शक्ती– ४[राज्य] शासनास–

(अ) कलम ६९ अन्वये द्यावयाच्या स्वास्थ्य प्रमाणपत्राचे नमुने विहित करण्याबाबत मूळ प्रमाणपत्र हरवले असता त्याची दुसरी प्रत देण्याची तरतूद करण्याबाबत आणि अशा प्रमाणपत्रांसाठी व ती नवीन करून देण्यासाठी व त्याच्या अशा दुसऱ्या प्रतीसाठी आकारावयाचे शुल्क ठरविण्याबाबत

(ब) कारखान्यात काम करणारी मुले व पौगंड यांनी प्राप्त करावयाची शारीरिक प्रमाणे विहित करण्याबाबत–

(क) ह्या प्रकरणान्वये शल्य चिकित्सकांच्या कार्यपद्धतीचे विनियमन करण्याबाबत–

(ड) कारखान्यात तरुण व्यक्तीस कामावर लावण्याच्या संबंधात प्रमाणक शल्य चिकित्सकांनी जी इतर कर्तव्ये करणे आवश्यक आहे ती कर्तव्ये विनिर्दिष्ट करण्याबाबत आणि अशा कर्तव्याबद्दल–

आकारावयाचे शुल्क व ते ज्यांनी भरावयाचे त्या व्यक्ती ठरविण्याबाबत नियम करता येईल.

७७. अधिनियमाच्या इतर विवक्षित उपबंधास प्रतिबंध नसणे – मुलांना कामावर लावण्याबाबत अधिनियम (१९३८ चा क्रमांक २६) याच्या तरतुदींच्या भरीला या प्रकरणाचे तरतुदीमुळे त्याचे अल्पीकरण होणार नाही.

ॲडॉप्टेशन ऑफ लॉज ऑर्डर १९५० अन्वये
(१) सन १९८७ चा क्रमांक २० अन्वये वगळले
(२) सन १९८७ चा क्रमांक २० अन्वये
(३) वरीलप्रमाणे
(४) वरीलप्रमाणे
(५) सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये



# प्रकरण ८

## वार्षिक वेतनी रजा

७८. प्रकरणाची प्रयुक्ती – (१) इतर कोणत्याही अधिनियमान्वये किंवा सेवेच्या संबंधातील कोणताही निवाडा करार यांत समझोता समाविष्ट किंवा संविदा यांच्या शर्ती अन्वये कामगाराला जो कोणताही अधिकार मिळण्याचा हक्क असेल त्यास बाधा पोहोचेल अशा रीतीने या प्रकरणाचे उपबंध समजण्यात येणार नाहीत.

१[परंतु असे की सेवेसंबंधातील असा निवाडा, करार, (समझोता समाविष्ट) किंवा संविदा यांमध्ये या प्रकरणात तरतूद केलेल्या वार्षिक वेतनी रजेपेक्षा अधिक मुदतीच्या वार्षिक वेतनी रजेची तरतूद असेल तेव्हा, कामगारास, फक्त अशी अधिक मुदतीची वार्षिक रजा मिळण्याचा हक्क असेल परंतु अशी रजा, निवाडा, करार समझोता समाविष्ट किंवा सेवेच्या बाबी यांत तरतूद नसेल किंवा कमी लाभाची तरतूद असेल तेव्हा कलम ७९ ते ८२ यांचे व्यवहारतः असेल त्याप्रमाणे तरतुदी लागू होतील.]

(२) शासनाच्या प्रशासनाखाली असलेल्या २[कोणत्याही रेल्वेच्या कोणत्याही कर्मशाळेतील] ज्या कामगारांना केंद्र शासनाने मान्य केलेले रजेसंबंधीचे नियम लागू असतील त्या कामगारांना ह्या प्रकरणाचे उपबंध लागू असणार नाहीत.

७९. वार्षिक वेतनी रजा – (१) ज्याने कॅलेंडर वर्षामध्ये कारखान्यात २४० दिवस किंवा त्यापेक्षा जास्त मुदतीपर्यंत काम केले असेल अशा प्रत्येक कामगारास–

(एक) जर तो प्रौढ कामगार असेल, तर पूर्वीच्या कॅलेंडर वर्षांत त्याने काम केलेल्या प्रत्येक वीस दिवसांबद्दल एक दिवस;

(दोन) जर तो कामगार मूल असेल तर पूर्वीच्या कॅलेंडर वर्षात, त्याने काम केलेल्या प्रत्येक पंधरा दिवसांबद्दल एक दिवस या दराने परिगणन करून होतील इतक्या दिवसांची वेतनी रजा नंतरच्या कॅलेंडर वर्षांत दिली पाहिजे.

स्पष्टीकरण– १ या पोट कलमाच्या प्रयोजनासाठी

(अ) करार किंवा संविदा या द्वारा किंवा स्थायी आदेशान्वये अनुज्ञेय असलेले अपरिहार्य कामबंदीचे कोणतेही दिवस

(ब) स्त्री कामगाराच्या बाबतीत बारा आठवड्यापेक्षा जास्त नाही इतके प्रसूती रजेचे दिवस आणि—

(क) ज्या वर्षी रजा घेतली असेल त्याच्या पूर्वीच्या वर्षात अर्जित केलेले रजेचे दिवस;

२४० दिवस किंवा त्याहून अधिक दिवसांच्या मुदतीची गणना करण्याच्या प्रयोजनाकरिता त्या कामगाराने कारखान्यात ज्या दिवशी काम केले आहे ते दिवस आहेत असे समजण्यात आले पाहिजे; परंतु त्या दिवसांची तो रजा अर्जित करणार नाही.

स्पष्टीकरण २ — या पोटकलमान्वये अनुज्ञेय असलेली रजा ही, रजेच्या मुदतीत येणाऱ्या किंवा तिच्या सुरुवातीस अथवा शेवटी येणाऱ्या सर्व सुट्ट्या वगळून असेल.

(२) ज्या कामगाराची सेवा जानेवारीच्या पहिल्या तारखेखेरीज इतर दिवशी सुरू होत असेल त्यास जर त्याने कॅलेंडर वर्षातील उर्वरित एकूण दिवसांपैकी दोन तृतीयांश दिवस काम केले असेल तर, पोट कलम (१) खंड (एक) किंवा यथास्थिति खंड (दोन) यामध्ये दिलेल्या दराने वेतनी रजा मिळण्याचा हक्क असेल—

[1] [(३) जर एखाद्या कामगारास, पूर्ण एक वर्षाच्या मुदतीत, कामातून कार्यमुक्त किंवा बडतर्फ केले असेल किंवा कामातून काढले असेल तर तो किंवा त्याचा वारस किंवा नामनिर्देशक असे असेल तसे, कार्यमुक्त, बडतर्फ होण्यापूर्वी किंवा वयोनिवृत्तीमुळे कामावरून काढून टाकण्यापूर्वी किंवा मृत्यूपूर्वी जरी पूर्ण रजा मिळण्याचा त्यास त्यावरून हक्क नसेल यथा पोटकलम (१) व (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संपूर्ण मुदतीपर्यंत त्याने काम केले नसले तरीही पोट कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने वेतनी रजा मिळण्याचा हक्क राहील.]

(४) या कलमान्वये रजेचे गणन करताना, अर्धा किंवा त्यापेक्षा अधिक दिवसाच्या रजेचा भाग हा, रजेचा एक संपूर्ण दिवस म्हणून गणला जाईल व अर्ध्या दिवसापेक्षा कमी दिवसाचा भाग वगळण्यात येईल.

(५) जर एखाद्या कामगाराने कोणत्याही एका कॅलेंडर वर्षात, यथास्थिति पोट कलम (१) किंवा पोट कलम (२) अन्वये त्यास अनुमत असलेली संपूर्ण रजा घेतली नाही तर त्याने न घेतलेली कोणतीही रजा, नंतरच्या कॅलेंडर वर्षात त्यास अनुमत करावयाच्या रजेमध्ये मिळविण्यात आली पाहिजे.

परंतु असे की पुढील वर्षात जमेस करावयाच्या रजेच्या दिवसांची एकूण संख्या प्रौढ व्यक्तीच्या बाबतीत तीसपेक्षा अधिक असता कामा नये आणि मुलाच्या बाबतीत ती चाळीसपेक्षा अधिक असता कामा नये.



परंतु पुढे असे की ज्या कामगाराने वेतनी रजेकरिता अर्ज केला असेल परंतु ज्यास पोट कलम (८) व (९) यात दिलेल्या कोणत्याही योजनेनुसार अशी रजा देण्यात आली नसेल त्या कामगारास [1] [किंवा पोटकलम (१०) चे उल्लंघन करून नाकारलेली रजा] कोणत्याही मर्यादेशिवाय पुढे जमेस धरण्याचा हक्क राहील.

(६) एखाद्या कामगारास, ज्या तारखेस आपली रजा सुरू व्हावी अशी इच्छा असेल त्या तारखेच्या पंधरा दिवसांपेक्षा कमी नाही इतके दिवस, आधी, त्यास कॅलेंडर वर्षात अनुमत असलेली सर्व रजा किंवा तिचा कोणताही भाग घेण्यासाठी कोणत्याही वेळी कारखान्याच्या व्यवस्थापकाकडे लेखी अर्ज करता येईल.

परंतु असे की जर कामगार औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ (१९४७ चा क्रमांक १४) यातील कलम २ खंड (न) यात व्याख्या केल्याप्रमाणे सार्वजनिक उपयुक्ततेच्या सेवेत काम करीत असेल तर ज्या तारखेस रजा सुरू व्हावी अशी त्याची इच्छा असेल त्या तारखेच्या तीस दिवसांपेक्षा कमी नाही इतके दिवस अगोदर असा अर्ज केला पाहिजे.

परंतु पुढे असे, की कोणत्याही वर्षात जितक्या वेळा रजा घेता येईल त्यावेळा तीनपेक्षा अधिक असता कामा नयेत.

(७) जर एखाद्या कामगाराची त्यास देय असलेली वेतनी रजा आजारीपणाच्या मुदतीचा समावेश करण्यासाठी घेण्याची इच्छा असेल, तर त्याने पोट कलम (६) यात विनिर्दिष्ट केलेल्या वेळेच्या आत रजेचा अर्ज केलेला नसला तरी, त्यास अशी रजा देण्यात आली पाहिजे. आणि अशा बाबतीत कलम ८१ अन्वये अनुज्ञेय असलेले वेतन रजेसाठी केलेल्या अर्जाच्या तारखेपासून पंधरा दिवसांपेक्षा आणि सार्वजनिक उपयुक्ततेच्या सेवेच्या बाबतीत, तीस दिवसांपेक्षा उशिरा देता कामा नये.

(८) कारखान्यात काम सतत चालू राहावे याची खात्री करून घेण्यासाठी कारखान्याचा कब्जेदार किंवा व्यवस्थापक यास औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ (१९४७ चा क्रमांक १४) च्या कलम ३ अन्वये प्रस्थापित केलेल्या कामकाज समितीच्या किंवा इतर कोणत्याही अधिनियमान्वये प्रस्थापित केलेल्या तत्सम समितीच्या संमतीने किंवा कारखान्यात अशी कोणतीही कामकाज समिती किंवा तत्सम समिती नसेल तर तेथील विहित रीतीने निवडलेल्या कामगार प्रति-

निधींच्या संमतीने, ज्याद्वारे या कलमान्वये अनुज्ञेय रजेचे विनियमन करता येईल अशी योजना मुख्य निरीक्षकाकडे लेखी सादर करता येईल.

(९) पोट कलम (८) अन्वये सादर केलेली योजना कारखान्यात प्रमुख व सोयीस्कर ठिकाणी लावली पाहिजे आणि ज्या तारखेस ती अमलात येईल त्या तारखेपासून बारा महिने मुदतीपर्यंत अमलात राहील आणि त्यानंतर व्यवस्थापकास, यथास्थिति, बांधकाम समितीच्या किंवा तत्सम समितीच्या संमतीने किंवा पोट कलम (८) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कामगार प्रतिनिधींच्या संमतीने एका वेळी, पुढील बारा महिन्यांच्या मुदतीसाठी, फेरबदलानिशी किंवा त्यावाचून ती नव्याने करता येईल आणि ती नव्याने करण्यापूर्वी मुख्य निरीक्षकाकडे नूतनीकरणाबद्दलची नोटीस पाठविली पाहिजे.

(१०) ज्यामुळे पोटकलम (६) च्या उपबंधाचे उल्लंघन होत नसेल असा रजेचा अर्ज पोट कलमे (८) व (९) अन्वये त्यावेळी अमलात असलेल्या योजनेनुसार नाकारण्यात आला असेल त्या व्यतिरिक्त नाकारण्यात येता कामा नये.

(११) जर, यथास्थिती, पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये रजा मिळण्याचा हक्क असलेल्या कामगाराची नोकरी, त्यास हक्कानुसार मिळणे असलेली सर्व रजा त्याने घेण्यापूर्वी कब्जेदाराकडून संपुष्टात आणण्यात आली असेल किंवा रजेसाठी अर्ज केला असता त्यास अशी रजा देण्यात आली नसेल आणि रजा घेण्यापूर्वी त्याने नोकरी सोडली असेल तर कारखान्याच्या कब्जेदाराने न घेतलेल्या रजेबद्दल कलम ८० अन्वये देय असेल ती रक्कम त्यास दिली पाहिजे. आणि अशी रक्कम, कामगाराची नोकरी कब्जेदाराने समाप्त केली असेल त्याबाबतीत अशा रीतीने नोकरी समाप्त केल्यानंतरच्या दुसऱ्या कामाच्या दिवस संपण्यापूर्वी, आणि कामगाराने आपली नोकरी सोडली असेल त्याबाबतीत, नंतरच्या वेतनाच्या दिवशी किंवा त्यापूर्वी देण्यात आली पाहिजे.

(१२) कार्यमुक्त किंवा बडतर्फ करण्यापूर्वी देणे आवश्यक असलेल्या कोणत्याही नोटिशीच्या मुदतीची संगणना करताना एखाद्या कामगाराची न घेतलेली रजा विचारात घेता कामा नये.

८०. रजेच्या मुदतीतील वेतने – (१) [१][कलम ७८ किंवा कलम ७९ अन्वये असे असेल तसे,] कामगारास अनुज्ञेय असलेल्या रजेबद्दल, त्यास, कोणत्याही अतिकालीन कामाबद्दल मिळालेले वेतन व अधिलाभांश वगळून, परंतु महागाई भत्ता आणि त्या कामगाराला अन्नधान्य आणि इतर वस्तू सवलतीच्या दराने विकल्याने मिळणाऱ्या फायद्याइतकी रोख रक्कम धरून त्याच्या रजेच्या लगतपूर्व



महिन्यात ज्या दिवशी त्याने [१][काम केले असेल] त्या दिवसाच्या एकूण पूर्ण कालिक मिळकतीच्या दैनिक सरासरी इतक्या दराने वेतन देण्यात येईल.

[१][परंतु असे की, त्याच्या रजेच्या लगतपूर्व कोणत्याही दिनदर्शक महिन्यात ज्याने काम केले नाही अशा कामगाराचे बाबतीत, त्याने घेतलेल्या रजेच्या लगतपूर्व संपलेल्या दिनदर्शक महिन्यात त्याने प्रत्येक काम केलेल्या दिवसासाठी कोणतेही अतिकालीन कामाचे जादा वेतन किंवा बोनस वगळून पण महागाई भत्ता आणि सवलतीच्या दराने अन्नधान्य किंवा इतर पदार्थांच्या विक्रीतून मिळणाऱ्या फायद्याइतकी रोख रक्कम मिळवून पूर्ण अर्जन केले असेल त्याच्या दैनंदिन सरासरी इतके वेतन त्यास अदा केले पाहिजे.

(२) कामगाराला अन्नधान्य आणि इतर वस्तू सवलतीच्या दराने विकल्यामुळे होणाऱ्या कोणत्याही फायद्याइतकी रोख रक्कम प्रमाणभूत कुटुंबाला अनुज्ञेय असलेल्या अन्नधान्य व इतर वस्तूंच्या जास्तीत जास्त परिमाणाच्या आधारे, विहित करण्यात येईल तितक्या वेळा संगणन केले पाहिजे.

स्पष्टीकरण १– 'प्रमाणभूत कुटुंब' या संज्ञेचा अर्थ, कामगार, त्याची पत्नी किंवा स्त्री-कामगार असल्यास तिचा पती आणि चौदा वर्षांखालील व याची दोन मुले, यांचे मिळून बनलेले व तीन प्रौढ रूप एकमानांची आवश्यकता असलेले कुटुंब असा होतो.

स्पष्टीकरण २ – 'प्रौढ एकमान' या संज्ञेचा अर्थ, चौदा वर्षांवरील वयाच्या पुरुष कामगाराच्या रूपाचे एकमान असा होतो; आणि चौदा वर्षांवरील वयाच्या स्त्रीसाठी आणि चौदा वर्षांखालील वयाच्या मुलासाठी लागणाऱ्या रूपाचे एकमान हे प्रौढ रूप एकमानाच्या ०.८ व ०.६ या दराने परिगणित केले पाहिजे.

(३) *[राज्य] शासनास–

(अ) ज्या रीतीने कामगाराला, अन्नधान्य व इतर वस्तू सवलतीच्या दराने विकल्यामुळे मिळणाऱ्या फायद्याइतकी रोख रक्कम संगणित केली जाईल ती रीत; आणि

(ब) या कलमाच्या उपबंधाचे खात्रीपूर्वक पालन करण्याच्या प्रयोजनासाठ कारखान्यामध्ये ठेवल्या गेल्या पाहिजेत अशा नोंदवह्या या गोष्टी विहित करण्यासाठी नियम करता येतील.

८१. विवक्षित बाबतीत रक्कम आगाऊ देणे – प्रौढ कामगाराच्या बाबतीत चार दिवसांपेक्षा आणि मूल कामगाराच्या बाबतीत पाच दिवसांपेक्षा कमी नाही इतक्या दिवसांची रजा देण्यात आलेल्या कामगारास, त्याची रजा सुरू होण्यापूर्वी देण्यात आलेल्या रजेच्या मुदतीबद्दल देय वेतनाची रक्कम देण्यात आली पाहिजे.

**८२. देण्यात न आलेली वेतने वसूल करण्याची पद्धती** – या प्रकरणान्वये ज्या रकमा मालकाने दिल्या पाहिजेत परंतु ज्या त्याने दिल्या नाहीत (नसतील अशा कोणत्याही रकमा वेतन प्रदान अधिनियम १९३६ (१९३६ चा क्रमांक ४) च्या उपबंधान्वये विलंबित वेतने म्हणून वसूल करता येतील.

**८३. नियम करण्याची शक्ती** – × [राज्य] शासनास, विहित करण्यात येईल असा तपशील असलेल्या नोंदवह्या ठेवण्याबद्दल कारखान्याच्या व्यवस्थापकास निदेश देणारे आणि निरीक्षकांना तपासणी करण्यासाठी अशा नोंदवह्या उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करणारे, नियम करता येतील.

**८४. कारखान्यांना सूट देण्याची शक्ती** – कारखान्यातील कामगारांना लागू असलेल्या रजेच्या नियमात या प्रकरणात ज्या फायद्यांची तरतूद करण्यात आली आहे त्यापेक्षा ×[राज्य] शासनाच्या मते कमी प्रमाणात अनुकूल नसलेल्या फायद्यांची तरतूद केलेली आहे त्याबद्दल ×[राज्य] शासनाची खात्री होईल त्याबाबतीत त्यास, लेखी आदेशाद्वारे, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा शर्तीस अधीन राहून, कारखान्यास या प्रकरणाच्या सर्व किंवा कोणत्याही उपबंधापासून सूट देता येईल.

[११] [**स्पष्टीकरण** – या कलमाचे कारणास्तव, कोणत्याही रजेच्या नियमात तरतूद केलेला लाभ या प्रकरणात तरतूद केलेल्या लाभापेक्षा कमी लाभदायक आहे **किंवा नाही याच्या निर्णयासाठी, जो जास्त** लाभदायक असेल तो विचारात घेतला पाहिजे.]

× ॲडॉप्टेशन ऑफ लॉज ऑर्डर १९५० अन्वये

(१) सन १९५४ चा क्रमांक २५ अन्वये

(२) सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये

(३) ते (९) वरीलप्रमाणे

(१०) सन १९८७ चा क्रमांक २० अन्वये

(११) सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये

**भाष्य** (कलम ७८ ते ८४) नियोक्त्याने कारखाना फक्त अर्धा दिवस उघडा ठेवला असेल तर त्या अर्धा दिवसच कामगाराने काम केले असले तरीही कामगार पूर्ण दिवसाचे वेतन मिळण्यास पात्र राहातील व वर्षाच्या अर्जित रजेच्या गणनेसाठी असा अर्धा दिवस हा कामाचा पूर्ण दिवस धरला गेला पाहिजे. (एलफिन मिल्स कं. लि. वि. इंडस्ट्रियल ट्रिब्युनल १९७८ (३७) एफ एल आर २०४)

या अधिनियमात १९७६ साली झालेल्या सुधारणेमुळे नोकरीच्या संपुष्टतात



बडतर्फी, मृत्यु, वयोमान निवृत्ती यांचा समावेश झाला आहे. सुहमिड गेगी लि. वि. गुजरात राज्य १९७२ (३८) एफ एल आर १००

---

## ९ प्रकरण

## विशेष उपबंध

**८५. विवक्षित जागेला अधिनियम लागू करण्याची शक्ती** – (१) ×[राज्य] शासनास शासकीय राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून असे जाहीर करण्यास येईल की या अधिनियमाचे सर्व किंवा कोणतेही उपबंध ज्या कोणत्याही जागेत विजेच्या सहाय्याने किंवा त्याशिवाय, वस्तु निर्माण प्रक्रिया करण्यात येत असेल त्या

(एक) विजेच्या सहाय्याने काम करण्यात येत असल्यास त्यात कामावर लावलेल्या व्यक्तींची संख्या दहापेक्षा कमी असली आणि विजेच्या सहाय्यावाचून काम करण्यात येत असल्यास ही संख्या वीसपेक्षा कमी असली किंवा–

(दोन) त्या ठिकाणी काम करणाऱ्या व्यक्तींना तेथील मालकाने कामावर लावलेले नसेल परंतु असा मालकाच्या परवानगीने किंवा त्यांच्याशी करार करून, त्या काम करीत असल्या तरीही वस्तु प्रक्रिया जेथे सामान्यपणे करण्यात येत असेल अशा कोणत्याही जागेस लागू होतील.

परंतु असे की निर्मितिप्रक्रिया मालक आपल्या कुटुंबियांच्या सहाय्याने करीत नसला पाहिजे.

(२) अशा रीतीने जागा जाहीर करण्यात आल्यानंतर ती अधिनियमाच्या प्रयोजनासाठी कारखाना म्हणून समजण्यात येईल आणि मालक हा भोगवटादार म्हणून व त्यात काम करणारी कोणतीही व्यक्ती कामगार म्हणून समजण्यात येईल.

**स्पष्टीकरण** – या कलमाच्या प्रयोजनासाठी 'मालक' या संज्ञेचा अर्थ असा की जागा ज्याच्या ताब्यात आहे असा पट्टेदार किंवा गहाणदार असा आहे.

**८६. सार्वजनिक संस्थांना सूट देण्याची शक्ती** – ×[राज्य] शासनास, त्यास आवश्यक वाटतील अशा शर्तीस अधीन राहून जेथे निर्मितिप्रक्रिया करण्यात येत असेल आणि जी शिक्षण प्रशिक्षण देण्याच्या किंवा सुधारणा करण्याच्या प्रयोजनांसाठी म्हणून चालविण्यात येत असलेल्या सार्वजनिक संस्थेला संलग्न असेल अशा कोणत्याही [१] [संशोधन शिक्षण देणाऱ्या] कार्यशाळेला किंवा काम करण्याच्या जागेस या अधिनियमाच्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही उपबंधापासून सूट देता येईल.

परंतु असे की संस्थेवर नियंत्रण ठेवणाऱ्या व्यक्तींनी, संस्थेत कामावर लावलेल्या किंवा संस्थेत आणल्या किंवा तेथे राहणारी असणाऱ्या व्यक्तींच्या कामाचे तास जेवणाची मध्यंतरे आणि सुट्टया यांचे विनियमन करण्यासंबंधीची योजना ×[ राज्य ] शासनाला मंजुरीसाठी सादर केली असेल आणि योजनेतील उपबंध या अधिनियमाच्या उपबंधापेक्षा कमी अनुकूल नाहीत अशी ×[ राज्य ] शासनाची खात्री झाली असेल त्या बाबतीत करून कामाचे तास आणि सुट्टया यासंबंधीच्या उपबंधांशी कोणतीही सूट दिली जाणार नाही.

८७. धोक्याची कामे – एखाद्या कारखान्यात चालणाऱ्या कोणत्याही [ निर्मिति प्रक्रियेच्या ] कामामुळे त्या कामावर लावलेल्या कोणत्याही व्यक्तीस शारीरिक इजा, विषबाधा किंवा रोग होण्याचा गंभीर धोका आहे असे ×[ राज्य ] शासनाचे मत होईल तर ×[ राज्य ] शासनास ज्या कोणत्याही कारखान्यात किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्यात असे काम चालू असेल अशा कोणत्याही कारखान्यास किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्यास लागू होणारे नियम खालील करता येतील–

( अ ) असे '[ निर्मिति प्रक्रियेचे ] काम विनिर्दिष्ट करून ते धोक्याचे म्हणून जाहीर करणे–

( ब ) असे, '[ निर्मिति–प्रक्रियेचे ] काम करण्यास स्त्रिया, पौगंड, मुले यांना कामावर लावण्यास प्रतिबंध करणे किंवा त्यावर निर्बंध घालणे.

( क ) असे '[ निर्मिति–प्रक्रियेचे ]. काम करण्यासाठी कामावर लावलेल्या किंवा लावले जावे म्हणून प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींच्या नियतकालिक वैद्यकीय तपासणीसाठी तरतूद करणे आणि अशा कामावर नेमल्या जाण्यास योग्य म्हणून ज्यांना प्रमाणित करण्यात आले नसेल अशा व्यक्तींना कामावर लावण्यास प्रतिबंध करणे. [ आणि अशा वैद्यकीय तपासणीचे शुल्क अदा करण्यास कारखान्याच्या कब्जेदारास भाग पाडणे ]

( ड ) असे [ निर्मिति–प्रक्रियेचे ] काम करण्यासाठी नेमलेल्या ते काम चालू असेल अशा ठिकाणाच्या जवळपास कामावर लावलेल्या सर्व व्यक्तींचे संरक्षण करण्यासाठी तरतूद करणे.

( इ ) अशा '[निर्मिति–प्रक्रियेच्या] कामाच्या संबंधित कोणत्याही विनिर्दिष्ट केलेल्या साहित्याचा अथवा प्रक्रियेचा उपयोग करण्यास प्रतिबंध करणे, त्यावर निर्बंध घालणे किंवा त्याचे नियंत्रण करणे.

[ ( फ ) अतिरिक्त सुखसोयी व स्वच्छता आणि संरक्षणाची उपकरणे आणि



साधने पुरविण्याच्या आणि त्याचे प्रमाण रेखांकन करण्याच्या धोकादायक निर्मिति–प्रक्रिया व कार्यपद्धती लक्षात घेऊन या तरतुदीसाठी भाग पाडणे.]

( ग ) × × ×

८७. अ. गंभीर धोक्याच्या कारणास्तव कामावर निर्बंध घालण्याची शक्ती–( १ ) जे निरीक्षकाचे असे निदर्शनास येईल की कारखान्याची किंवा त्याच्या भागाची स्थिती अशी आहे, की त्यात नेमलेल्या इसमांना किंवा सान्निध्यात वावरणाऱ्या इसमांना इजा होईल किंवा मृत्यू होईल अशी गंभीर धोक्याची आहे तर त्याने कारखान्याच्या कब्जेदारास लेखी आदेश देऊन त्यात विशेषतः कारखान्यात किंवा त्याच्या भागात ज्यामुळे गंभीर धोका उत्पन्न होणे संभवनीय आहे त्याच्या संबंधात विचार केल्याचे स्पष्ट करून, प्रतिबंध केला पाहिजे आवश्यक तितकी किमान जोखीम पत्करून किमान संख्येने नेमावयाच्या कामगारांव्यतिरिक्त कब्जेदाराने तेथील कार्यपद्धती चालू ठेवण्यास व कामगारांना कामावर ठेवण्यास प्रतिबंध केला पाहिजे.

( २ ) पोटकलम ( १ ) खाली निरीक्षकाने दिलेला कोणताही आदेश जर मुख्य निरीक्षकाने त्यानंतर बदलविला नाही तर तीन दिवस कालावधीपर्यंत अमलात राहील.

( ३ ) पोटकलम ( १ ) खाली दिलेल्या निरीक्षकाच्या आदेशामुळे किंवा पोटकलम ( २ ) खाली दिलेल्या मुख्य निरीक्षकाच्या आदेशामुळे बाधित झालेल्या कोणत्याही इसमास न्यायकोर्टात अपील करण्याचा हक्क आहे.

( ४ ) पोटकलम ( १ ) च्या आदेशामुळे ज्या कोणत्याही इसमाच्या नोकरीवर विपरीत परिणाम झाला असेल, तो वेतन आणि इतर लाभ यांस पात्र राहील आणि त्याला पर्यायी नोकरी शक्य असेल तेथे व विहित केले असेल त्या स्वरूपात देणे हे कब्जेदाराचे कर्तव्य राहील.

( ५ ) पोट कलम ( ४ ) च्या तरतुदी, औद्योगिक विकास अधिनियम १९४७ ( १९४७ चा क्रमांक १४ ) मधील पक्षकारांच्या हक्काला बाधा न आणता राहतील.

८८. विवक्षित अपघाताबाबत नोटीस देणे – ( १ ) एखाद्या कारखान्यात एखादा अपघात होऊन त्यामुळे मृत्यू घडला असेल, किंवा ज्यामुळे इजा झालेली व्यक्ती अपघातानंतर लगेच अठ्ठेचाळीस तास किंवा त्यापेक्षा अधिक वेळपर्यंत आपले काम करण्यास असमर्थ होईल अशी कोणतीही शारीरिक इजा झाली असेल किंवा त्याबाबतीत विहित करण्यात येईल अशा कोणत्याही स्वरूपाचा अपघात झाला असेल तेथे कारखान्याच्या व्यवस्थापकाने अशा अपघाताची नोटीस, विहित करण्यात येईल अशा अधिकाऱ्याकडे व अशा नमुन्यात आणि अशा मुदतीत पाठविली पाहिजे.

[१](२) पोट कलम (१) खाली मृत्यू आल्याच्या अपघाताची नोटीस दिलेली असेल, तेव्हा ज्याला नोटीस पाठविली असेल त्या अधिकाऱ्याने त्या प्रसंगाची चौकशी, नोटीस मिळाल्यापासून एक महिन्यात केली पाहिजे आणि असा अधिकारी निरीक्षक नसेल तर निरीक्षकाने त्या मुदतीत चौकशी करण्यास भाग पाडले पाहिजे.

[२][८८ अ विशिष्ट धोक्याच्या प्रसंगांची नोटीस – जेव्हा कारखान्यात अशी विहित केले आहेत अशा स्वरूपाच्या धोक्याच्या प्रसंगाची की ज्यामुळे शारीरिक इजा, असमर्थता उद्भवणारी असो किंवा नसो, कारखान्याच्या व्यवस्थापकाने विहित केले असेल अशा अधिकाऱ्यांना अशा नमुन्यात आणि अशा वेळेत त्याची नोटीस पाठविली पाहिजे.

८९. विवक्षित रोगासंबंधी नोटीस देणे – (१) कारखान्यांतील कोणत्याही कामगारास अनुसूचित विनिर्दिष्ट केलेला कोणताही रोग झाल्यास त्या कारखान्याच्या व्यवस्थापकाने त्याबद्दलची नोटीस विहित करण्यात येईल अशा प्राधिकाऱ्याकडे आणि अशा नमुन्यात आणि अशा मुदतीत पाठविली पाहिजे.

(२) जर एखाद्या कारखान्यात कामावर लावलेल्या किंवा लावण्यात आलेल्या व्यक्तीवर कोणताही वैद्यक व्यवसायी औषधोपचार करीत असेल आणि [१][तिसऱ्या] अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेला कोणताही रोग त्या व्यक्तीला झालेला असेल किंवा झाला आहे असे वैद्यक व्यवसायीला वाटेल तर त्या वैद्यक व्यवसायीने विनाविलंब पुढील बाबी नमूद केलेले लेखी प्रतिवृत्त मुख्य निरीक्षकाकडे पाठविले पाहिजे.

(अ) रोग्याचे नाव आणि त्याचा पोस्टाचा पत्ता–

(ब) रोग्याला जो रोग आहे असे त्यास वाटत असेल त्या रोगाचे नाव; आणि–

(क) जेथे रोगी कामावर असेल किंवा शेवटी कामावर होता त्या कारखान्याचे नाव आणि पत्ता.

(३) उक्त व्यक्तीला [१][तिसऱ्या] अनुसूचित विनिर्दिष्ट केलेला रोग झाला आहे अशा अर्थाच्या प्रमाणक शल्य-चिकित्सकाने दिलेल्या प्रमाणपत्रावरून अन्यथा मुख्य निरीक्षकाची खात्री होईल अशा रीतीने पोट-कलम (२) खालील प्रतिवृत्तास पुष्टी मिळत असेल त्याबाबतीत त्याने, वैद्यक व्यवसायीस विहित करण्यात येईल असे शुल्क दिले पाहिजे, आणि अशा रीतीने भरलेली शुल्क-रक्कम कारखान्यांतील उपर्युक्त रोग झाला असेल त्या कारखान्याच्या कब्जेदाराकडून जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल.



(४) जर पोट-कलम (२) च्या उपबंधाचे पालन करण्यात एखादा वैद्यक व्यवसायी कसूर करील तर, तो रुपये [१][एक हजार] पर्यंतच्या दंडाच्या शिक्षेस पात्र राहील.

[१][(५) केंद्र शासनाने, शासकीय राजपत्रात अधिसूचित करून तिसऱ्या सूचीत आधिक्य किंवा फेरफार करावा आणि असा आधिक्यास किंवा फेरफार जणू काही या अधिनियमात झाल्याप्रमाणे त्यास परिणाम राहील.

९०. अपघाताच्या किंवा रोगाच्या प्रकरणांची चौकशी करण्याबद्दल निदेश देण्याची शक्ती – (१) [४][राज्य] शासनास, तसे करणे इष्ट आहे असे वाटल्यास, एखाद्या कारखान्यात लागलेल्या कोणत्याही अपघाताच्या कारणाची किंवा [११][तिसऱ्या] अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेला रोग कारखान्यात झाला आहे अथवा झाला असल्याची शंका येत असेल अशा कोणत्याही प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सक्षम व्यक्ती नेमता येईल आणि त्याला अशा चौकशीच्या वेळी न्याय सहाय्यक म्हणून काम करण्यासाठी कायद्याचे विशेष ज्ञान असलेली एक किंवा अधिक व्यक्ती नेमता येतील.

(२) या कलमान्वये चौकशी करण्यासाठी नेमलेल्या व्यक्तीस, साक्षीदारांना हजर राहण्यास भाग पाडण्याच्या आणि दस्तऐवज आणि महत्त्वाच्या वस्तू सादर करण्यास सक्ती करण्याच्या प्रयोजनासाठी, दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ (सिव्हिल प्रोसिजर कोड १९०८); (१९०८ चा क्रमांक ५) अन्वये दिवाणी न्यायालयात असलेल्या सर्व शक्ती असतील आणि तसेच चौकशीच्या प्रयोजनासाठी आवश्यक असेल तेथवर या अधिनियमान्वये निरीक्षकाच्या कोणत्याही शक्तींचा त्यास वापर करता येईल आणि चौकशी करणारी व्यक्ती कोणतीही माहिती हजर करण्याविषयी जिला फर्मावील ती प्रत्येक व्यक्ती भारतीय दंड संहिता १८६० (१८६० चा क्रमांक ४५) (इंडियन पीनल कोड) याचे कलम १७६ च्या अर्थानुसार तसे करण्यास कायदेशीर रीतीने बांधलेली आहे असे समजले जाईल.

(३) या कलमान्वये चौकशी करणाऱ्या व्यक्तीने, यथास्थिति, अपघाताची अथवा रोगाची कारणे आणि तदनुषंगिक कोणतीही परिस्थिती नमूद करून आणि स्वतःस किंवा कोणत्याही न्याय्य सहाय्यकास देणे योग्य वाटेल असे अभिप्राय जोडून एक प्रतिवृत्त [४][राज्य] शासनाकडे पाठविले पाहिजे.

(४) [४][राज्य] शासनास त्यास योग्य वाटल्यास, या कलमान्वये दिलेले कोणतेही प्रतिवृत्त किंवा त्यातील कोणतेही उतारे प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करता येईल.

(५) या कलमाखालील चौकशीच्या कामकाजाचे विनियमन करण्यासाठी *[ राज्य ] शासनाला नियम करता येईल.

९१. नमुने घेण्याची सत्ता – (१) निरीक्षकास, कारखान्याच्या नेहमीच्या कामाच्या वेळेच्या दरम्यान, केव्हाही, कारखान्याच्या कब्जेदारास किंवा व्यवस्थापकास किंवा त्यावेळी कारखाना ज्याच्या स्वाधीन आहे असे समजण्यात येत असेल त्या इतर व्यक्तीस कळविल्यानंतर, कारखान्यात उपयोग करण्यात येत असलेल्या किंवा उपयोग करण्याचा हेतु असलेल्या कोणत्याही पदार्थाचा पुरेसा नमुना, यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने घेता येईल.

परंतु अशा उपयोगामुळे–

(अ) या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या उपबंधाचे उल्लंघन होत आहे; किंवा

(ब) कारखान्यातील कामगारास शारीरिक इजा होण्याचा किंवा त्याच्या आरोग्यास अपाय होणे संभवनीय आहे, असे निरीक्षकास वाटले पाहिजे.

(२) निरीक्षक पोट कलम (१) अन्वये नमुना घेईल त्याबाबतीत त्या पोट कलमान्वये जिला त्याने कळविले असेल ती व्यक्ती हेतुपुरस्सर गैरहजर राहिली नसेल, तर उक्त व्यक्तीच्या समक्ष त्याने त्या नमुन्याचे तीन भाग केले पाहिजेत आणि त्याला परिणामकारक रीतीने मुद्रा लावली पाहिजे व त्यावर योग्य वर्णनाची खूण केली पाहिजे. तसेच, त्याने अशा व्यक्तीस आपली स्वतःची मुद्रा लावण्यास व त्यावर खूण करण्यास परवानगी दिली पाहिजे.

(३) वर नमूद केल्याप्रमाणे जिला कळविण्यात आले असेल त्या व्यक्तीने, निरीक्षकाने तशी मागणी केली असता, या कलमान्वये घेण्यात आलेल्या नमुन्याचे भाग पाडण्यासाठी ते मुद्रांकित करण्यासाठी, व त्यावर खूण करण्यासाठी आवश्यक ती साधने पुरविली पाहिजेत.

(४) निरीक्षकाने–

(अ) पोट कलम (१) अन्वये जिला कळविण्यात आले आहे त्या व्यक्तीस नमुन्याचा एक भाग तात्काळ दिला पाहिजे.

(ब) दुसरा भाग विश्लेषणासाठी व त्यासंबंधात प्रतिवृत्त देण्यासाठी तात्काळ शासकीय विश्लेषकाकडे पाठविला पाहिजे.

(क) ज्या न्यायालयापुढे त्या पदार्थाच्या संबंधात कार्यवाही, कोणतीही असल्यास, दाखल करण्यात आली असेल त्या न्यायालयात सादर करण्यासाठी तिसरा भाग आपल्याजवळ ठेवला पाहिजे.

(५) या कलमान्वये विश्लेषणासाठी व त्यावरील प्रतिवृत्त देण्यासाठी



शासकीय विश्लेषकाकडे पाठविलेल्या कोणत्याही पदार्थासंबंधीचा, अशा कोणत्याही शासकीय विश्लेषकाची स्वाक्षरी असलेले प्रतिवृत्त म्हणून समजण्यात येणारा कोणताही लेख, त्या पदार्थाच्या संबंधात दाखल करण्यात आलेल्या कोणत्याही कार्यवाहीत पुरावा म्हणून वापरता येईल.

९१-अ) केंद्र शासनाचे व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षा यांची पाहणी– (१) मुख्य निरीक्षक किंवा कारखाना सल्लागार सेवाचे मुख्य संचालक आणि कामगार संस्था किंवा आरोग्य सेवाचे मुख्य संचालक किंवा अशा इतर व्यक्तींनी या संबंधात राज्य शासनाने किंवा मुख्य निरीक्षक किंवा कारखाना सल्लागार सेवाचे मुख्य संचालक आणि कामगार संस्था किंवा आरोग्य सेवाचे मुख्य संचालक यांनी कारखान्यात नियमाचे कामाचे वेळी किंवा त्यांना आवश्यक वाटेल त्या कोणत्याही वेळी, कारखान्याच्या कब्जेदारास किंवा व्यवस्थापकास किंवा प्रचलित काळी कारखान्यास जबाबदार असणाऱ्या कोणत्याही इतर इसमास तसे कळविल्या नंतर व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षा यांच्या पाहणीचे काम करावे आणि अशा कब्जेदाराने, व्यवस्थापकाने किंवा इतर व्यक्तीने पाहणीचे कामात सर्व सोयी–सुविधा देऊ केल्या पाहिजेत. यात प्लँट व यंत्र सामग्रीची पाहणी व परीक्षण आणि त्याचे नमुने घेणे व इतर पाहणीशी प्रस्तुत असणारी माहिती घेणे यांचा समावेश होतो.

(२) पोट कलम (१) खाली पाहणीच्या सोयी सुविधांच्या कारणास्तव प्रत्येक कामगाराने, पाहणी करणाऱ्या व्यक्तीस जर आवश्यकता वाटली तर अशी वैद्यकीय तपासणी जशी इसमास आवश्यक वाटेल त्या प्रमाणे करून घेण्यासाठी स्वतःने उपस्थित राहिले पाहिजे. आणि पाहणीस प्रस्तुत असेल व त्याच्या ताब्यात असेल अशी सर्व माहिती दिली पाहिजे.

(क) वैद्यकीय तपासणीसाठी किंवा पोटकलम (२) खाली माहिती देण्यासाठी कामगाराने जो कोणताही वेळ खर्च केला असेल तो वेतनाच्या आणि अतिकालीन बाबा वेतनाच्या गणनेच्या कारणास्तव, त्याने कारखान्यात काम केले असल्याचे समजले गेले पाहिजे.

स्पष्टीकरण – या कलमाच्या कारणास्तव, काही असेल तो अहवाल पोट कलम (१) खाली पाहणी करणाऱ्या इसमाने राज्य शासनास दाखल केला असेल तो या अधिनियमाखाली निरीक्षकास दाखल केल्याचे समजले गेले पाहिजे.

*अॅडॉप्टेशन ऑफ लॉज, ऑर्डर १९५०
१. सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये
२. सन १९८७ चा क्रमांक २० अन्वये

## प्रकरण १०

## शास्ती आणि कार्यपद्धती

९२. अपराधाबद्दल सर्वसाधारण शास्ती – या अधिनियमात अन्यथा स्पष्ट शब्दात उपबंधित केलेल्या बाबी सोडून आणि कलम ९३ च्या उपबंधास अधीन राहून, जर कोणत्याही कारखान्यात किंवा कारखान्याच्या संबंधात, या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या कोणत्याही उपबंधाचा किंवा तदन्वये दिलेल्या कोणत्याही लेखी आदेशाचा, भंग करण्यात आला असेल तर, त्या कारखान्याचा कब्जेदार आणि व्यवस्थापक यांना दोषसिद्धीनंतर असा प्रत्येक अपराधाबाबत [1][ दोन वर्षांपर्यंत ] वाढविता येईल इतक्या मुदतीची कारावासाची किंवा [1][ एक लाख ] रुपये पर्यंतच्या दंडाची शिक्षा किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील आणि अशी कसूरी करणे चालू असेल त्याबाबतीत अशा प्रत्येक दिवसाकरिता पत्राहत्तर रुपयेपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा देण्यात येईल.

[1][ परंतु असे की प्रकरण ४ च्या किंवा त्याखाली केलेल्या नियमाच्या किंवा कलम ८७ खालील कोणत्याही तरतुदीचे जेव्हा उल्लंघन असे होईल त्याचे परिणाम मृत्यू घडून आल्याच्या किंवा शारीरिक गंभीर दुखापतीच्या अपघातात झाले तर ह. पंचवीस हजारापेक्षा कमी नाही इतक्या दंडाची मृत्यू घडल्याच्या अपघाताचे बाबतीत आणि शारीरिक गंभीर दुखापत झाल्याच्या अपघाताचे बाबतीत रुपये पाच हजारांपेक्षा कमी नाही इतका दंड केला पाहिजे.

स्पष्टीकरण – या कलमात आणि कलम ९४ यांत 'गंभीर शारीरिक दुखापत' याचा अर्थ असा की जी दुखापत अशी की सर्वसाधारणे शारीरिक काम दुखापत करण्यास काचनाचा निकामी झाला आहे, कायमचा नष्ट झाला आहे, किंवा दृष्टी वापरण्यास कायमचा निकामी झाली आहे, शरीरातील हाड, हाताचे किंवा पायाचे शिवाय पञ्चेंद्रिय कायमचे निकामी झाले आहे पण शरीराचे हाड किंवा हाड मोडल्यामुळे तो भाग कायमचा निकामी झाला आहे पण शरीराचे हाड किंवा कमीत एक हाडापेक्षा किंवा दाताऐवजी जास्त नाही ते वगळून.

[2][ ९३. विवक्षित परिस्थितीत जागेच्या मालकाचे दायित्व – (१) जेव्हा कोणत्याही जागेतील निरनिराळ्या इमारती निरनिराळे कारखाने म्हणून निरनिराळ्या कब्जेदारांना पट्ट्याने दिलेल्या असतील तेव्हा त्या जागेचा मालक, पोचमार्ग जलनिस्सारण, पाणी पुरवठा, दिवाबत्ती आणि स्वच्छता यांसारख्या सामान्य सोयी आणि सेवा यांची तरतूद करण्याकरिता आणि त्या सुस्थितीत ठेवण्याकरिता जबाबदार राहील.



(२) मुख्य निरीक्षकास, [*][ राज्य ] शासनाच्या नियंत्रणास अधीन राहून, पोट कलम (१) चे उपबंध अमलात आणण्याच्या संबंधात, जागेच्या मालकास आदेश देण्याची शक्ती असेल.

(३) कोणत्याही जागेतील स्वतंत्र किंवा फ्लॅट्स् निरनिराळ्या कब्जेदारांना स्वतंत्र कारखाने म्हणून वापरण्याकरिता पट्ट्याने दिले असतील तेथे जागेचा मालक हो जणू कारखान्याचा कब्जेदार किंवा व्यवस्थापक असल्याप्रमाणे–

(एक) शौचकूप, मुतारी आणि धुण्याच्या सोयी ह्या प्रयोजनासाठी जेथवर

(दोन) मालकाची मालकी असलेल्या आणि विशेषतः कब्जेदारास त्याच्या अभिरक्षेत ठेवण्यासाठी किंवा वापर करण्यासाठी स्वाधीन करण्यात न आलेल्या यंत्र सामग्रीला व संयंत्राला कुंपण घालणे–

(तीन) मजले किंवा फ्लॅट्स् यांकडे जाण्यासाठी सुरक्षित साधने आणि जिने आणि सर्वांसाठी असलेले जाण्या-येण्याचे मार्ग हे सुस्थितीत आणि स्वच्छ ठेवणे.

(चार) आणि लागणाऱ्या प्रसंगी बाळंतपणाची सावधगिरी,

(पाच) उच्चालनयंत्रे आणि (लिफ्ट) उद्वाहने सुस्थितीत ठेवणे आणि–

(सहा) या जागेमध्ये तरतूद केलेल्या इतर कोणत्याही सामाईक सुखसोयी चालू ठेवणे या संबंधातील या अधिनियमाच्या उपबंधाच्या कोणत्याही उल्लंघनाबद्दल जबाबदार असेल.

(४) मुख्य निरीक्षकास, [*][ राज्य ] शासनाच्या अधीन राहून पोट-कलम (३) चे उपबंध अमलात आणण्याच्या संबंधात, जागेच्या मालकाला आदेश देण्याची शक्ती असेल.

(५) मालकाच्या दायित्वासंबंधातील पोटकलम (३) चे उपबंध, कोणत्याही जागेत सामाईक शौचकूप, मुतारी व धुण्याच्या सोयी असलेल्या स्वतंत्र खोल्या निरनिराळे कारखाने म्हणून वापरण्याकरिता निरनिराळ्या कब्जेदारांना पट्ट्याने दिलेल्या असतील तेथे लागू होतील.

परंतु असे, की शौचकूप, मुतारी आणि धुण्याच्या सोयी यांची तरतूद करण्याच्या व त्या सुस्थितीत ठेवण्याच्या संबंधातील आवश्यक गोष्टींचे पालन करण्यासाठीही मालक जबाबदार असेल.

(६) मुख्य निरीक्षकास, [*][ राज्य ] शासनाच्या नियंत्रणाच्या अधीन राहून कलम ४६ किंवा कलम ४८ चे उपबंध अमलात आणण्याच्या संबंधात, पोट-कलम (५) मध्ये निर्दिष्ट केलेल्या जागेच्या मालकाला आदेश देण्याची शक्ती असेल.

(७) कोणत्याही जागेतील खोली किंवा छपरी यांचे भाग, स्वतंत्र कारखाने म्हणून करण्याकरिता निरनिराळ्या इसमांना पट्ट्याने दिले असतील तेथे, त्या जागेचा मालक, पुढील उपबंधांच्या कोणत्याही उल्लंघनाबद्दल जबाबदार असेल.

(एक) कलमे २२, २३, २७, ३४, ३५ व ३६ खेरीज करून प्रकरण ४, परंतु असे, की कलमें २४ व ३२ यांच्या उपबंधांच्या संबंधात, मालकाचे दायित्व त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या गोष्टींना असे उपबंध जेथवर लागू असतील, त्या मर्यादेपर्यंतच चालेल.

परंतु पुढे असे की कब्जेदार हा त्याच्या मालकीचे किंवा त्याने पुरवठा केलेले संयंत्र आणि आणि यंत्रसामग्री यांच्या संबंधात, प्रकरण ४ च्या उपबंधाचे पालन करण्यासाठी जबाबदार असेल.

(तीन) कलम ४२.

(८) मुख्य निरीक्षकास, *[ राज्य ] शासनाच्या अधीन राहून, पोट-कलम (७) चे उपबंध अमलात आणण्याच्या संबंधात जागेच्या मालकास आदेश देण्याची शक्ती असेल.

(९) पोटकलमे (५) आणि (७) यांच्या संबंधात, या अधिनियमाच्या उपबंधापैकी कोणत्याही उपबंधाच्या प्रयोजनार्थ कामावर लावलेल्या कामगारांच्या एकूण संख्येची गणना करताना, संपूर्ण जागा एकच कारखाना असल्याचे समजण्यात येईल.]

¹९४. पूर्वीच्या दोषसिद्धीनंतर वाढविलेली शास्ती – ज्या कोणत्याही व्यक्तीस कलम ९२ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल अशी व्यक्ती त्याच उपबंधाच्या उल्लंघनाचा अंतर्भाव असलेला अपराध केल्याबद्दल पुन्हा दोषी ठरेल तर त्या व्यक्तीस त्यानंतरच्या दोष सिद्धीनंतर [ तीन वर्षेपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा आणि रुपये दहा हजारापेक्षा कमी नाही पण दोन लाख ] पर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा करण्यात येतील.

[ परंतु असे की न्यायालयाने कोणतेही पुरेसे आणि विशेष कारण निकाल-पत्रात नमूद करून, रुपये दहा हजारपेक्षा कमी नाही इतका दंड करावा. ]

परंतु पुढे असे, की प्रकरण ४ च्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या किंवा कलम ८७ च्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करी झाले असेल, की त्याचे पर्यवसान मृत्यू झाल्याच्या किंवा गंभीर शारीरिक इजा झाल्याच झाले असेल तर दंड रुपये पस्तीस हजारपेक्षा कमी नाही इतका दंड मृत्यू घडल्याच्या अपघाताच्या



बाबतीत आणि रुपये दहा हजारापेक्षा कमी नाही इतका दंड गंभीर शारीरिक इजा झाल्याच्या अपघाताच्या बाबतीत केला पाहिजे.

(२) पोटकलम (१) चे प्रयोजनासाठी ज्या अपराधाला शिक्षा देण्यात येत असेल तो अपराध घडण्याआधी दोन वर्षांपेक्षा अधिक मुदतीपूर्वी असलेल्या कोणत्याही दोषसिद्धीची कोणतीही दखल घेतली जाता कामा नये.

९५. निरीक्षकास अडथळा केल्याबद्दल शास्ती – जी कोणतीही व्यक्ती या अधिनियमाद्वारा किंवा तदन्वये निरीक्षकास प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही शक्तीचा वापर करताना निरीक्षकास हेतुपुरस्सर अडथळा करील किंवा या अधिनियमान्वये किंवा तदन्वये केलेल्या नियमान्वये ठेवण्यात आलेल्या त्याच्या ताब्यातील कोणत्याही नोंदवह्या किंवा इतर लेख, निरीक्षकाने मागितले असता, सादर करण्यात कसूर करील, किंवा कारखान्यातील कोणत्याही कामगार, निरीक्षकापुढे हजर राहू नये म्हणून त्यास लपवील किंवा निरीक्षकाकडून त्याची तपासणी केली जाण्यास प्रतिबंध करील तर तिला *[ सहा महिने ] पर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा किंवा रुपये पाचशेपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा करण्यात येतील.

९६. कलम ९१ खालील विश्लेषणाचा निष्कर्ष सदोष रीत्या जाहीर केल्याबद्दल शास्ती – जी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमान्वये शिक्षापात्र अशा कोणत्याही अपराधाबद्दल खटला भरण्याच्या प्रयोजनाबाबत जेवढे आवश्यक असेल ते खेरीज करून कलम ९१ अन्वये केलेल्या विश्लेषणाचा निष्कर्ष प्रसिद्ध करील किंवा कोणत्याही व्यक्तीजवळ प्रकट करील तर, तिला *[ सहा ] महिनेपर्यंत वाढविता येईल इतकी कारावासाची शिक्षा किंवा पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा करण्यात येतील.

*[ ९६ अ–कलम ४१ ब, ४१ क आणि कलम ४१ ह च्या तरतुदींच्या उल्लंघनाबद्दल शिक्षा – (१) कलम ४१ ब, कलम ४१ क आणि कलम ४१ ह च्या कोणत्याही तरतुदींच्या किंवा त्या खाली केलेल्या नियमाच्या तरतुदींची जो कोणी पूर्तता करण्यास चुकेल किंवा, उल्लंघन करील त्यास अशा चुकारपणाच्या किंवा उल्लंघनाच्या संबंधात, सात वर्षेपर्यंत वाढविता येईल इतक्या तुरुंगवासाच्या आणि रुपये दोन लाखपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडास आणि चुकारपणा किंवा उल्लंघन चालू राहील त्या बाबतीत चुकारपणा किंवा उल्लंघन चालू राहील त्या कालावधीतील प्रत्येक दिवसासाठी, अशा पहिल्या चुकारपणाच्या किंवा उल्लंघनाच्या दोषसिद्धीनंतर रुपये पाच हजारपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र राहील.

[1] (२) पोटकलम (१) मध्ये निर्देश केलेला चुकारपणा किंवा उल्लंघन; दोषसिद्धीच्या तारखेनंतर एक वर्षाच्या काळामध्ये मोलांडूनही चालू राहील तर अपराधी वहा वर्षेपर्यंत वाढविता येईल इतक्या तुरुंगवासाच्या शिक्षेस पात्र राहील.]

९७. कामगारांनी केलेले अपराध – (१) कलम १११ च्या उपबंधास अधीन राहून, जर कारखान्यात लावलेला कोणताही कामगार, कामगारावर कोणतेही दायित्व किंवा कर्तव्य लादणाऱ्या, या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या किंवा आदेशाच्या कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करील तर त्यास रुपये [2][पाचशे] पर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा करण्यात येईल.

(२) कोणताही कामगार, पोटकलम (१) अन्वये शिक्षापात्र अपराध केल्याबद्दल दोषी ठरेल, त्याबाबतीत, कारखान्याचा कब्जेदार किंवा व्यवस्थापक हा, त्या अपराधाला प्रतिबंध करण्यासाठी सर्व वाजवी उपाय योजण्यात त्याने कसूर केली होती असे सिद्ध करण्यात आले नसेल तर, त्या उल्लंघनाच्या संबंधातील अपराधाबद्दल दोषी आहे असे समजण्यात येणार नाही.

९८. खोटया स्वास्थ्य प्रमाणपत्राचा उपयोग केल्याबद्दल शास्ती – जी कोणतीही व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीस कलम ७० अन्वये देण्यात आलेल्या स्वास्थ्य प्रमाणपत्राचा स्वतःच्या कामासाठी आपणास देण्यात आलेले प्रमाणपत्र म्हणून जाणूनबुजून उपयोग करील किंवा उपयोग करण्याचा प्रयत्न करील किंवा जी कोणतीही व्यक्ती असे प्रमाणपत्र मिळवून त्या प्रमाणपत्राचा जाणूनबुजून दुसऱ्या व्यक्तीस उपयोग करू देईल किंवा उपयोग करू देण्याचा प्रयत्न करू देईल, तर तिला दोन महिनेपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा रुपये एक हजारपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा किंवा या दोन्हीही शिक्षा करण्यात येतील.

९९. मुलाला दोन ठिकाणी कामावर लावण्यास परवानगी दिल्याबद्दल शास्ती – जर एखादे मूल ज्या कोणत्याही दिवशी त्याने दुसऱ्या कारखान्यात यापूर्वीच काम केले असेल त्याच दिवशी एखाद्या कारखान्यात काम करील तर, त्या मुलाची माता किंवा वडील किंवा पालक किंवा त्याच्यावर ताबा किंवा नियंत्रण असणारी किंवा त्याच्या वेतनातून कोणताही प्रत्यक्ष फायदा मिळविणारी व्यक्ती, त्या मुलाने अशा मातेच्या, पित्याच्या, पालकाच्या किंवा व्यक्तीच्या संमतीने किंवा त्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे अशा रीतीने काम केले असल्याचे न्यायालयास पटले तर त्यांना रुपये [3][एक हजारपर्यंत] वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

[1][१०० – × × ×]



१०१. विवक्षित बाबतीत कब्जेदाराला किंवा व्यवस्थापकास दायित्वातून सूट – एखाद्या कारखान्याच्या कब्जेदारावर किंवा व्यवस्थापकावर या अधिनियमान्वये शिक्षापात्र अपराध केल्याचा आरोप करण्यात येईल त्या बाबतीत, त्यास त्याने योग्य रीतीने तक्रार केल्यावर आणि तसे करण्याच्या आपल्या हेतूसंबंधीची तीन दिवसांहून कमी नाही इतक्या दिवसांची अभियोक्त्यास लेखी नोटीस दिल्यावर, ज्या दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीवर प्रत्यक्ष गुन्हेगार म्हणून तो आरोप करीत असेल त्यास, आरोप सुनावणीच्या नेमलेल्या वेळी, न्यायालयासमोर आणविण्याचा हक्क असेल आणि जर, अपराध घडल्याचे सिद्ध करण्यात आल्यावर, यथास्थिति कारखान्याचा कब्जेदार किंवा व्यवस्थापक, न्यायालयाची खात्री होईल अशा रीतीने असे सिद्ध करून देईल, की–

(अ) या अधिनियमाची अंमलबजावणी करण्याच्या कामी आपण वाजवी दक्षता घेतली होती, आणि

(ब) उक्त दुसऱ्या व्यक्तीने, आपल्या माहितीशिवाय, संमतीशिवाय किंवा आपण दुर्लक्ष केल्याशिवाय, प्रस्तुत अपराध केला आहे.

तर, ती दुसरी व्यक्ती, त्या अपराधाबद्दल दोषी ठरविली जाईल आणि ती जणू कारखान्याचा कब्जेदार किंवा व्यवस्थापक असल्याप्रमाणेच तशा शिक्षेस पात्र होईल आणि यथास्थिति, कब्जेदार किंवा व्यवस्थापक अशा अपराधाच्या संबंधातील या अधिनियमाखालील कोणत्याही दायित्वातून मुक्त होईल.

परंतु असे, की वर म्हटल्याप्रमाणे सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत असताना, यथास्थिति, कारखान्याच्या कब्जेदाराची किंवा व्यवस्थापकाची शपथेवर तपासणी करता येईल आणि त्याची व त्याच्या पुष्ट्यर्थ तो बोलावील अशा कोणत्याही साक्षीदारांची साक्ष, ज्या व्यक्तीवर तो प्रत्यक्ष गुन्हेगार म्हणून आरोप करील त्या व्यक्तीच्या वतीने आणि अभियोक्त्याकडून उलट तपासणी केली जाण्यास पात्र असेल.

परंतु पुढे असे, की कब्जेदाराकडून किंवा व्यवस्थापकाकडून, प्रत्यक्ष गुन्हेगार म्हणून आरोप करण्यात नेमलेल्या वेळेस न्यायालयापुढे हजर करता येत नसेल तर, न्यायालयाने तीन महिन्यांपेक्षा अधिक नाही इतक्या कालावधीकरिता सुनावणी वेळोवेळी तहकूब केली पाहिजे आणि उक्त मुदतीच्या अखेरीस सुद्धा प्रत्यक्ष गुन्हेगार म्हणून आरोप करण्यात आलेली व्यक्ती न्यायालयापुढे आणता येत नसेल, तर न्यायालयाने कब्जेदार किंवा व्यवस्थापक यांच्या विरुद्ध असलेल्या आरोपाच्या सुनावणीचे काम सुरू केले पाहिजे आणि आरोप सिद्ध झाल्यास कब्जेदारास किंवा व्यवस्थापकास दोषी ठरविले पाहिजे.

**१०२. आदेश देण्याची न्यायालयाची शक्ती** – (१) जेव्हा कारखान्याचा कब्जेदार किंवा व्यवस्थापक या अधिनियमान्वये शिक्षापात्र अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आला असेल तेव्हा न्यायालयास कोणतीही शिक्षा देताना स्वाक्षरीवरुन लेखी आदेशाद्वारे, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत (ही मुदत न्यायालयास योग्य वाटल्यास आणि त्या बाबतीत अर्ज करण्यात आल्यास वेळोवेळी वाढविता येईल.) ज्या गोष्टींच्या संबंधात तो अपराध घडला असेल त्या गोष्टींची सुधारणा करण्यासाठी अशा रीतीने विनिर्दिष्ट करण्यात येतील असे उपाय योजण्यास त्यास भाग पाडता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये आदेश देण्यात आला असेल त्याबाबतीत यथास्थिति, कारखान्याचा कब्जेदार किंवा व्यवस्थापक हा, न्यायालयाने दिलेल्या अगर वाढविलेल्या मुदतीत, कोणतीही असल्यास, अपराध चालू राहिल्याबद्दल या अधिनियमान्वये जबाबदार असणार नाही, परंतु यथास्थिति, अशी मुदत किंवा वाढविलेली मुदत संपल्यावर, जर न्यायालयाच्या आदेशाचे पूर्णपणे पालन करण्यात आले नसेल तर, यथास्थिति, कब्जेदाराने किंवा व्यवस्थापकाने आणखी अपराध केला असल्याचे समजण्यात येईल आणि त्यास त्याबद्दल सहा महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीची काराबासाची किंवा अशी मुदत संपल्यावर असा आदेश अमलात न आणलेल्या प्रत्येक दिवसासाठी शंभर रुपये दंडाची शिक्षा देता येईल किंवा वर सांगितलेली अशा काराबासाची शिक्षा भोगण्याबाबत आणि असा दंडही भरण्याबाबत, न्यायालयास आदेश देता येईल.

**१०३. कामावर लावण्यासंबंधीची धारणा** – जर कोणतीही व्यक्ती भोजनाच्या किंवा विश्रांतीच्या मध्यंतराखेरीज काम चालू असता किंवा यंत्र सामग्री चालू असता, कोणत्याही वेळी कारखान्यात दिसून येईल तर, ती एतद्विरुद्ध सिद्ध होईपर्यंत, या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या नियमांच्या प्रयोजनासाठी त्यावेळी त्या कारखान्यात कामावर लावलेली व्यक्ती असल्याचे समजण्यात येईल.

**१०४. वय सिद्ध करण्याचा भार** – (१) जेव्हा कोणतीही कृती किंवा अकृती ही, एखादी व्यक्ती विवक्षित वयाच्या आतील असतील तर या अधिनियमान्वये शिक्षापात्र अपराध ठरली असती आणि अशी व्यक्ती सकृत् दर्शनी, अशा वयाच्या आतील आहे असे न्यायालयाचे मत असेल तेव्हा अशी व्यक्ती अशा वयाच्या आतील नाही हे सिद्ध करण्याचा भार आरोपीवर राहील.

(२) प्रमाणक शल्य चिकित्सकाने लेखी प्रतिज्ञापत्र करुन, त्या प्रतिज्ञापत्रात एखाद्या कामगाराला मी जातीने तपासले आहे व तो प्रतिज्ञापत्रात दाखल



केलेल्या वयाच्या आतील आहे असे मला वाटते ... अधिनियमाच्या व तदन्वये केलेल्या नियमांच्या प्र... यथार्थतेचा पुरावा म्हणून ग्राह्य ठरेल.

*[१०४ अ) व्यवहारतः काय आहे याची मर्यादा सिद्ध ... या अधिनियमाच्या किंवा त्या खाली केलेल्या कोणत्याही ... कामकाजात काही करणे आवश्यक असणाऱ्या पूर्वतेच्या कर्तव्य ... केल्यास असा चुकारपणा केल्याचा आरोप असणाऱ्या इसमाने, ते ...: अशक्य होते किंवा व्यवहारतः शक्य होते की सर्व उपाययोजनांची कर्तव्ये किंवा आवश्यकता केल्याचे सिद्ध केले पाहिजे.]

**१०५. अपराधाची दखल घेणे** – (१) कोणत्याही न्यायालयाने, निरीक्षकाने तक्रार केलेली असल्याशिवाय किंवा त्याने आगाऊ लेखी मंजुरी दिल्याशिवाय या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची दखल घेता कामा नये.

(२) इलाखा शहर दंडाधिकाऱ्याच्या किंवा प्रथम श्रेणी दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापेक्षा कमी दर्जाच्या कोणत्याही न्यायालयाने या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेता कामा नये.

**१०६. खटल्याची अवधी** – या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला जो कोणताही अपराध करण्यात आला आहे असे अभिकथन केलेले असेल तो घडल्याची माहिती निरीक्षकास मिळाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत त्याबद्दल तक्रार करण्यात आलेली नसेल तर कोणत्याही न्यायालयाने अशा अपराधाची दखल घेता कामा नये.

परंतु असे की तो अपराध निरीक्षकाने दिलेल्या लेखी आदेशाचे पालन न केल्याबाबतचा असेल त्या बाबतीत ज्या तारखेस अपराध घडला असे अभिकथन केलेले असेल त्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत त्याबाबत तक्रार करता येईल.

स्पष्टीकरण – या कलमाच्या प्रयोजनार्थ –

(अ) गुन्हा चालू असण्याच्या बाबतीत गुन्हा चालू राहील या कालावधीतील निर्देशित प्रत्येक क्षणाचे मुदतीने गणन केले पाहिजे.

(ब) जेव्हा कोणतेही काम करण्यासाठी समय मंजूर केला असेल किंवा कारखान्याच्या कब्जेदाराने किंवा व्यवस्थापकाने समय वाढविण्यासाठी अर्ज केला असेल तर अशा मंजूर केलेला समय किंवा वाढविलेला समय संपुष्टात आल्यानंतरच्या तारखेपासून मुदतीच्या कालावधीचे गणन केले पाहिजे.

**१०६. अ) कामकाज दाखल करुन घेण्याची न्यायालयाची अधिसत्ता** – कोणत्याही न्यायालयाच्या अधिसत्तेचे निश्चितीकरण करण्याच्या कारणास्तव

**१०२. आदेश देण्याची न्यायालयाची शक्ती** – (१) जेव्हा कारखान्याचा कब्जेदार किंवा व्यवस्थापक या अधिनियमान्वये शिक्षापात्र अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आला असेल तेव्हा न्यायालयास कोणतीही शिक्षा देताना त्याबरोबरच लेखी आदेशाद्वारे, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत ( ही मुदत न्यायालयास योग्य वाटल्यास आणि त्या बाबतीत अर्ज करण्यात आल्यास वेळोवेळी वाढविता येईल. ) ज्या गोष्टीच्या संबंधात तो अपराध घडला असेल त्या गोष्टीची सुधारणा करण्यासाठी अशा रीतीने विनिर्दिष्ट करण्यात येतील असे उपाय योजण्यास त्यास भाग पाडता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये आदेश देण्यात आला असेल त्याबाबतीत यथास्थिति, कारखान्याचा कब्जेदार किंवा व्यवस्थापक हा, न्यायालयाने दिलेल्या अगर वाढविलेल्या मुदतीत, कोणतीही असल्यास, अपराध चालू राहिल्याबद्दल या अधिनियमान्वये जबाबदार असणार नाही. परंतु यथास्थिति, अशी मुदत किंवा वाढविलेली मुदत संपल्यावर, जर न्यायालयाच्या आदेशाचे पूर्णपणे पालन करण्यात आले नसेल तर, यथास्थिति, कब्जेदाराने किंवा व्यवस्थापकाने आणखी अपराध केला असल्याचे समजण्यात येईल आणि त्यास त्याबद्दल सहा महिनेपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा अशी मुदत संपल्यावर असा आदेश अमलात न आणलेल्या प्रत्येक दिवसासाठी शंभर रुपये दंडाची शिक्षा देता येईल किंवा वर सांगितलेल्या अशा कारावासाची शिक्षा भोगण्याबाबत आणि अशा दंडही भरण्याबाबत, न्यायालयास आदेश देता येईल.

**१०३. कामावर लावण्यासंबंधीची धारणा** – जर कोणतीही व्यक्ती भोजनाच्या किंवा विश्रांतीच्या मध्यंतराखेरीज काम चालू असता किंवा यंत्र सामग्री चालू असता, कोणत्याही वेळी कारखान्यात दिसून येईल तर, तो तत्प्रतिकूल सिद्ध होईपर्यंत, या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या नियमाच्या प्रयोजनासाठी त्यावेळी त्या कारखान्यात कामावर लावलेली व्यक्ती असल्याचे समजण्यात येईल.

**१०४. वय सिद्ध करण्याचा भार** – (१) जेव्हा कोणतीही कृती किंवा अकृती ही, एखादी व्यक्ती विवक्षित वयाच्या आतील असतील तर या अधिनियमान्वये शिक्षापात्र अपराध ठरली असती आणि अशी व्यक्ती मजूर दर्शनी, अशा वयाच्या आतील आहे असे न्यायालयाचे मत असेल तेव्हा अशी व्यक्ती अशा वयाच्या आतील नाही हे सिद्ध करण्याचा भार आरोपीवर राहील.

(२) प्रमाणक शल्य चिकित्सकाने लेखी प्रतिज्ञापन करून, त्या प्रतिज्ञापत्रात एखाद्या कामगारास मी पाहिले तपासले आहे व तो प्रतिज्ञापत्रात दाखल



केलेल्या वयाच्या आतील आहे असे मला वाटते असे लिहून दिल्यास ते प्रतिज्ञापत्र, अधिनियमाच्या व तदन्वये केलेल्या नियमाच्या प्रयोजनासाठी त्या कामगाराच्या वयाबाबतचा पुरावा म्हणून ग्राह्य ठरेल.

[१०४-अ) **व्यवहारतः काय आहे याची मर्यादा सिद्ध करण्याची जबाबदारी** – या अधिनियमाच्या किंवा त्या खाली केलेल्या कोणत्याही उल्लंघनाच्या कोणत्याही कामकाजात काही करणे आवश्यक असणाऱ्या पूर्ततेच्या कर्तव्यात चुकारपणा केल्यास असा चुकारपणा केल्याचा आरोप असणाऱ्या इसमाने, ते व्यवहारतः अशक्य होते किंवा व्यवहारतः शक्य होते ती सर्व उपाययोजनाची कर्तव्ये किंवा आवश्यकता केल्याचे सिद्ध केले पाहिजे. ]

**१०५. अपराधाची दखल घेणे** – (१) कोणत्याही न्यायालयाने, निरीक्षकाने तक्रार केलेली असल्याशिवाय किंवा त्याने प्रमाणक लेखी मंजुरी दिल्याशिवाय या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची दखल घेता कामा नये.

(२) इलाखा शहर दंडाधिकाऱ्याच्या किंवा प्रथम श्रेणी दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाच्या कनिष्ठ दर्जाच्या कोणत्याही न्यायालयाने या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेता कामा नये.

**१०६. खटल्याचा अवधी** – या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला जो कोणताही अपराध करण्यात आला आहे असे अभिकथन केलेले असेल तो घडल्याची माहिती निरीक्षकास मिळाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत त्याबद्दल तक्रार करण्यात आलेली नसेल तर कोणत्याही न्यायालयाने अशा अपराधाची दखल घेता कामा नये.

परंतु असे की तो अपराध निरीक्षकाने दिलेल्या लेखी आदेशाचे पालन न केल्याबाबतचा असेल त्या बाबतीत ज्या तारखेस अपराध घडला असे अभिकथन केलेले असेल त्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत त्याबाबत तक्रार करता येईल.

स्पष्टीकरण – या कलमाच्या प्रयोजनासाठी –

(अ) गुन्हा चालू असण्याच्या बाबतीत गुन्हा चालू राहील या कालावधीतील निर्देशित प्रत्येक क्षणाचे मुदतीत गणन केले पाहिजे.

(ब) जेव्हा कोणतेही काम करण्यासाठी समय मंजूर केला असेल किंवा कारखान्याच्या कब्जेदाराने किंवा व्यवस्थापकाने समय वाढविण्यासाठी अर्ज केला असेल तर असा मंजूर केलेला समय किंवा वाढविलेला समय संपुष्टात आल्यानंतरच्या तारखेपासून मुदतीच्या कालावधीचे गणन केले पाहिजे.

**१०६. अ) कामकाज दाखल करून घेण्याची न्यायालयाची अधिसत्ता** – कोणत्याही न्यायालयाच्या अधिसत्तेचे नियतीकरण करण्याच्या कारणास्तव

या अधिनियमाखालील किंवा त्याखाली केलेल्या नियमांखालील कोणत्याही प्लँटच्या कार्यकृतीशी निगडीत असणाऱ्या गुन्ह्याच्या संबंधात प्लँट प्रचलित काळी जेथे असेल ते ठिकाण गुन्ह्याचे ठिकाण असल्याचे समजले गेले पाहिजे.

× अॅडॉप्टेशन ऑफ लॉज ऑर्डर १९५०
१. सन १९८७ चा क्रमांक २० अन्वये
२. कारखाने (सुधारीत) अधिनियम १९५४ अन्वये
३. सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये; कलमांच्या क्रमांकात फेरफार केले.
४., ५., ६. } सन १९८७ चा क्रमांक २० अन्वये
७. सन १९७६ चा क्रमांक ९४ अन्वये.

भाष्य – (कलमे ९२ ते १०६ अ) या प्रकरणात गुन्हा घडल्यास त्याकरिता शिक्षा देण्याची तरतूद आहे. सुधारीत तरतुदींने पूर्वीच्या शिक्षेत वाढ केली आहे. गुन्हेगाराच्या कृत्याचे गांभीर्य व त्यापासून होणारे परिणाम लक्षात घेऊन ही वाढ करण्यात आल्याचे स्पष्ट दिसते.

---

## प्रकरण १०

## अनुपूरक उपबंध

१०७. आव्हाने (अपीले) – (१) ज्याच्यावर निरीक्षकाने या अधिनियमाच्या उपबंधान्वये लेखी आदेश बजावला आहे अशा कारखान्याच्या व्यवस्थापकास किंवा कारखान्याच्या कब्जेदारास, आदेश बजावल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत त्या आदेशाविरुद्ध विहित प्राधिकाऱ्याकडे आव्हान करता येईल आणि अशा प्राधिकाऱ्याला, ×[राज्य] शासनाने याबाबत केलेल्या नियमास अधीन राहून, तो आदेश कायम करता येईल, त्यात फेरबदल करता येईल किंवा तो फिरविता येईल.

(२) या संबंधात (न्याय्य सहाय्यकांच्या मदतीने सुनावणी करता येणार नाही अशा आव्हानांचे वर्ग असल्यास विहित करता येईल असा) × [राज्य] शासनाकडून करण्यात आलेल्या नियमास अधीन राहून, आव्हान प्राधिकाऱ्यास, न्याय्य सहाय्यकांच्या मदतीने अपीलाची सुनावणी करता येईल किंवा आव्हानाच्या अर्जात तशी मागणी करण्यात आल्यास, त्याने सुनावणी घेतली पाहिजे. उक्त न्याय्य सहाय्यकांपैकी एक न्याय्य सहाय्यक आव्हान प्राधिकाऱ्याने व दुसरा, विहित



करण्यात येईल त्याप्रमाणे, संबंधित उद्योगधंद्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मंडळाने नेमलेला असेल.

परंतु असे, की आव्हानाच्या सुनावणीसाठी ठरविण्यात आलेल्या वेळेपूर्वी अशा मंडळाने कोणताही न्याय्य सहाय्यक नेमला नसेल तर अथवा अशा रीतीने नेमलेला न्याय्य सहाय्यक अशा सुनावणीच्या वेळी हजर राहाण्यास कसूर करील तर, आव्हान प्राधिकाऱ्याला, पुरेशा कारणामुळे हजर राहाता आले नाही याबद्दल त्याची खात्री झाली नसल्यास असा, न्याय्य सहाय्यकाच्या मदतीवाचून आव्हानाच्या सुनावणीचे काम चालविता येईल किंवा त्यास ते तसे करणे योग्य वाटल्यास, कोणत्याही न्याय्य सहाय्यकाच्या मदतीवाचून आव्हानाचे काम चालविता येईल.

(३) × [राज्य] शासन या बाबत जे नियम करील त्या नियमांस अधीन राहून आणि आव्हान प्राधिकाऱ्यास कोणत्याही प्रकरणात अंशतः पालन करण्याच्या अथवा तात्पुरते उपाय योजण्याच्या संबंधात, ज्या शर्ती लावणे योग्य वाटेल त्या शर्तींस अधीन राहून आव्हान प्राधिकाऱ्यास, योग्य वाटेल तर आव्हानाचा निकाल होईपर्यंत ज्या आदेशाविरुद्ध आव्हान करण्यात आले असेल तो आदेश तहकूब करता येईल.

१०८. नोटिसा लावणे – (१) या अधिनियमाद्वारा किंवा तदन्वये कोणत्याही कारखान्यात लावणे आवश्यक असलेल्या नोटिसांच्या व्यतिरिक्त, विहित करण्यात येईल असा या अधिनियमाचा व तदन्वये केलेल्या नियमांचा गोषवारा अंतर्भूत असलेली आणि निरीक्षक व प्रमाणक शल्यचिकित्सक यांची नावे व पत्ते सुद्धा देण्यात आलेली एक नोटीस प्रत्येक कारखान्यात लावण्यात आली पाहिजे.

(२) या अधिनियमाद्वारा अथवा तदनुसार कारखान्यात ज्या नोटिसा लावणे आवश्यक असेल अशा सर्व नोटिसा इंग्रजीत आणि कारखान्यातील बहुसंख्य कामगारांना अवगत असलेल्या भाषेत असल्या पाहिजेत आणि त्या कारखान्याच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ कोणत्याही प्रमुख व सोयीस्कर ठिकाणी लावण्यात आल्या पाहिजेत आणि त्या सर्व नोटिसा स्वच्छ व सुवाच्य स्थितीत ठेवल्या पाहिजेत.

(३) मुख्य निरीक्षकास, कोणत्याही कारखान्याच्या व्यवस्थापकावर बजावलेल्या लेखी आदेशाद्वारे कारखान्यातील कामगारांचे आरोग्य, सुरक्षितता किंवा कल्याण या संबंधातील कोणतीही इतर नोटीस किंवा भित्तीपत्रक कारखान्यांत लावण्याबद्दल सांगता येईल.

१०९. नोटीसा बजावणे – × [राज्य] शासनास, कारखान्याच्या मालका-

वर कब्जेदारांवर किंवा व्यवस्थापकावर, या अधिनियमाखालील आदेश ज्या रीतीने बजावण्यात आले पाहिजेत ती रीत विहित करणारे नियम करता येतील.

११०. विवरणे ×[ राज्य ] शासनास, या अधिनियमाच्या प्रयोजनास्तव आवश्यक वाटतील अशी प्रासंगिक किंवा नियतकालिक विवरणे सादर करण्याबद्दल कारखान्याचे मालक, कब्जेदार किंवा व्यवस्थापक यांस भाग पाडण्यासंबंधात नियम करता येतील.

१११. कामगारांची बंधने – ( १ ) कारखान्यातील कोणत्याही कामगाराने–

( अ ) कारखान्यातील कामगारांच्या आरोग्यासाठी, सुरक्षिततेसाठी किंवा स्वास्थ्यासाठी कारखान्यात तरतूद करून ठेवलेल्या कोणत्याही उपबंधात, सुख-सोयींच्या साधनात किंवा इतर वस्तूंत जाणूनबुजून हस्तक्षेप करता कामा नये किंवा त्यांचा दुरुपयोग करता कामा नये.

( ब ) आपल्या स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या जीविताला ज्या योगे धोका निर्माण होईल असे कोणतेही कृत्य जाणून बुजून आणि रास्त कारणावाचून करता कामा नये; आणि

( क ) कारखान्यातील कामगारांच्या आरोग्यासाठी किंवा सुरक्षिततेसाठी कारखान्यात तरतूद करून ठेवलेल्या कोणत्याही उपबंधाचा किंवा इतर वस्तूंचा वापर करण्याचे जाणून बुजून टाळता कामा नये.

( २ ) कारखान्यात कामावर ठेवलेला कोणताही कामगार या कलमाच्या किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या उपबंधापैकी कोणत्याही उपबंधाचे किंवा आदेशाचे उल्लंघन करील तर त्यास तीन महिनेपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा रुपये शंभरपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा करण्यात येतील.

[ १११. अ. कामगारांचे हक्क इ – प्रत्येक कामगारास हा हक्क राहील.

( अ ) कामगाराचे कामावरील आरोग्य व सुरक्षा या संबंधीची माहिती कब्जेदाराकडून मिळविणे.

(ब) शक्य असेल तेथे कारखान्यांत शिक्षण घेणे किंवा शिक्षण देण्यासाठी कब्जेदाराने घेतले पाहिजे असे जेथे कामगारांना आरोग्याचे व सुरक्षेचे कामाचे शिक्षण दिले जाईल असे, मुख्य निरीक्षकाने संमत केलेले शिक्षण केंद्र किंवा संस्था करून घेणे.

( क ) कारखान्यात त्यांच्या आरोग्याच्या व सुरक्षेच्या संरक्षणाबद्दलच्या अपूर्णत्वाचे प्रतिनिधित्व प्रत्यक्षतः निरीक्षकाकडे करणे किंवा त्याबाबतीत त्यांच्या प्रतिनिधी मार्फत करणे– ]



११२. नियम करण्याची सर्व साधारण शक्ती – ×[ राज्य ] शासनास, या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधान्वये विहित करणे असलेल्या किंवा विहित करता येईल अशा किंवा या अधिनियमाची प्रयोजने अमलात आणण्यासाठी इष्ट म्हणून समजण्यात येईल अशा कोणत्याही बाबीची तरतूद करण्यासाठी नियम करता येतील.

११३. निदेश देण्याच्या केंद्रशासनाच्या शक्ती – केंद्र शासनास, या अधि-नियमाच्या उपबंधाची अंमलबजावणी करण्यासाठी ×[ राज्य ] शासनास निदेश देता येईल.

११४. सवलती व सुखसोयी यांबद्दल आकार न घेणे – कलम ४६ च्या उपबंधास अधीन राहून, या अधिनियमाच्या उपबंधान्वये, कब्जेदाराने तरतूद करावयाच्या कोणत्याही व्यवस्थेबद्दल किंवा सवलतीबद्दल किंवा पुरवावयाच्या कोणत्याही साधनाबद्दल किंवा उपकरणाबद्दल कोणत्याही कामगाराकडून कोणतेही शुल्क किंवा आकार वसूल करता कामा नये.

११५. नियम प्रसिद्ध करणे – ¹(१) [ या अधिनियमान्वये केलेले सर्व नियम शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केले जातील आणि ते पूर्वप्रकाशनाच्या शर्तीस अधीन असतील. आणि सन १८९७ चा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम (१८९७ चा क्रमांक दहा) याचे कलम २३, खंड (३) अन्वये विहित करावयाची तारीख, प्रस्तावित नियमांचा मसुदा ज्या तारखेस प्रसिद्ध करण्यात आला असेल त्या तारखेपासून ²[ पंचेचाळीस दिवसांपेक्षा ] कमी नाही अशी असली पाहिजे.

³[ (२) ×[ राज्य ] शासनाने या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर लौकरात लौकर राज्य विधिमंडळापुढे ठेवला पाहिजे. ]

११६. शासकीय कारखान्यांस अधिनियम लागू होणे – अन्यथा उपबंधित केले नसेल तर, हा अधिनियम, केंद्र शासनाच्या किंवा कोणत्याही शासनाच्या मालकीच्या कारखान्यास लागू असेल.

११७. या अधिनियमान्वये करणाऱ्या व्यक्तींचे संरक्षण – या अधिनियमान्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा हेतू असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कार्यवाही दाखल करता येणार नाही.

११८. माहिती प्रकट करण्यावर निर्बंध – (१) कोणत्याही निरीक्षकाने, सेवेत असतांना किंवा सेवानिवृत्तीनंतर, या अधिनियमाच्या अंमलबजावणीसंबंधात किंवा या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता असेल ते खेरीजकरून, अन्यथा, आपली

पार्पित कर्तव्ये करीत असताना त्यास माहीत होईल अशी कोणतीही वस्तुनिर्माण-विषयक किंवा व्यापारविषयक संस्थासंबंधीची किंवा कोणत्याही चालू प्रक्रियेसंबंधीची कोणतीही माहिती उघड करता कामा नये.

(२) पोटकलम (१) मधील कोणतीही गोष्ट, अशा संस्थेच्या किंवा प्रक्रियेच्या मालकाकडून लेखी संमती घेऊन किंवा या अधिनियमास अनुसरून असलेल्या कोणत्याही वैध कार्यवाहीच्या (न्याय समाविष्ट) किंवा या अधिनियमास अनुसरून किंवा अन्वये करता येईल अशा कोणत्याही फौजदारी कार्यवाहीच्या प्रयोजनाकरिता किंवा वर म्हटल्याप्रमाणे अशा कार्यवाहीच्या कोणत्याही प्रतिवृत्ताच्या प्रयोजनाकरिता, उघड केलेल्या कोणत्याही माहितीस, लागू होणार नाही.

(३) कोणताही निरीक्षक पोटकलम (१) च्या उपबंधाचे उल्लंघन करील, तर त्यास सहा महिनेपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा दंड एक हजार पर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा किंवा दोन्हीही शिक्षा देण्यात येतील.

¹[११८. अ–माहितीचे प्रकटनावर निर्बंध – (१) प्रत्येक निरीक्षकाने उगम या अधिनियमाखालील तरतुदींच्या उल्लंघनासंबंधीच्या कोणत्याही तक्रारीचा उगम प्रत्येक निरीक्षकाने गोपनीय असल्याचे समजले पाहिजे.

(२) या अधिनियमाखाली निरीक्षण करीत असताना, निरीक्षकाने तक्रार मिळाल्याच्या पुष्टयर्थ निरीक्षण केल्याची माहिती कब्जेदारास किंवा व्यवस्थापकास किंवा त्यांच्या प्रतिनिधीस प्रकटित करता कामा नये.

परंतु असे की कोणत्या प्रकरणी तक्रार करणाऱ्याने त्याचे नाव प्रकटित करण्यास संमति दिली आहे त्यास लागू केले जाईल असे काही या कलमांत नाही. ]

²[ ११९. १९७० चा क्रमांक ३७ यात काहीही नमूद असले तरी हा अधिनियम अमलात राहील – या अधिनियमाच्या तरतुदी कंत्राटी कामगार (नियमन आणि संपुष्टन) अधिनियम १९७० यांत [ किंवा प्रचलित काळी अमलात असणाऱ्या दुसऱ्या कोणत्याही अधिनियमात ] विसंगत असे काहीही नमूद असले तरी अमलात राहील.

१२०. निरसन आणि व्यावृत्ती – या कलमास जोडलेल्या कोष्टकात दिलेल्या अधिनियमांतील याद्वारे निरसित झाल्या आहेत.

परंतु असे की हा अधिनियम त्यावेळी अमलात आला असता तर त्यान्वये जी कोणतीही गोष्ट करता आली असती अशी, उक्त अधिनियमांतीलअन्वये केलेली कोणतीही गोष्ट, ही अधिनियमान्वये करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल.



* ॲडॉप्टेशन ऑफ लॉज ऑर्डर १९५० अन्वये

१. सन १९८७ चा क्रमांक २० अन्वये, २. वरीलप्रमाणे, ३. वरीलप्रमाणे, ४. वरीलप्रमाणे

निरसित केलेल्या अधिनियमांची

कारखाने अधिनियम १९३४, कारखाने (दुरुस्ती) अधिनियम १९४४ कारखाने (दुरुस्ती) अधिनियम १९४६ कारखाने (दुरुस्ती) अधिनियम १९४७

---

**कारखाने (सुधारित) अधिनियम १९८७ क्र. २०-१९८७**

**अंमलबजावणी दि. २९ ऑक्टोबर १९८७**

**अधिसूचना**

एस. ओ. ९६१ (ई) कारखाने (सुधारित) अधिनियम १९८७ (२०/१९८७) कलम १ पोट कलम (२) अन्वये प्रदानित केलेल्या शक्तींचा वापर करून केंद्र शासन असे जाहीर करीत आहे, की

(१) दि. १ डिसेंबर १९८७ पासून कलमे २, ३, ४, ( नवीन कलम ७ अ शी संबंधित ) ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २० (नवीन कलमे ४१ अ, ४१ ब, ४१ क, ४१ ड, ४१ इ, ४१ ग, व ४१ ह यांशी संबंधित) २१, २२, २३, २४, २५, २६, २७, २८, २९ ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४५ (पहिली सूची यांशी संबंधित ) आणि ४६.

(२) दि. १ जून १९८८ पासून कलमे ४ (नवीन कलम ७ ब यांशी संबंधित) २०, ( नवीन कलम ४१ फ, निर्देशित सूची समाविष्ट) आणि ४५ (दुसरी सूची यांशी संबंधित)

अमलात आणण्यात आले आहेत.

अनुसूची

( कलमे ८९ आणि ९० पहा )

## अधिसूचित करावयाच्या रोगांची यादी

१. शिशापासून तयार केलेल्या कोणत्याही पदार्थामुळे किंवा शिशाच्या कोणत्याही संयुगामुळे होणारी विषबाधा अथवा तज्जन्य विकार धरून शिशापासून विषबाधा.

२. शिशाच्या टेट्रा-इथिलपासून विषबाधा.

३. फॉस्फरसपासून विषबाधा किंवा तज्जन्य विकार.

४. पाऱ्यापासून विषबाधा किंवा तज्जन्य विकार.

५. मॅंगेनीझपासून विषबाधा किंवा तज्जन्य विकार.

६. आर्सेनिकपासून विषबाधा किंवा तज्जन्य विकार.

७. नायट्रसच्या धूमापासून विषबाधा.

८. कार्बन डायसल्फाईडपासून विषबाधा.

९. बेंझिनच्या कोणत्याही समानधर्मी पदार्थामुळे किंवा त्यांच्या नैट्रोयुक्त किंवा अमिडोयुक्त पदार्थामुळे होणारी विषबाधा, किंवा तज्जन्य विकार धरून बेंझिनपासून विषबाधा.

१०. क्रोमपासून झालेला व्रण किंवा तज्जन्य विकार.

११. काळपुळी

१२. सिलीकोसिस

१३. क्षारज पदार्थापासून ( हॅलोजेन ) किंवा तैलवर्गीय हैड्रोकार्बनच्या क्षारज पदार्थापासून विषबाधा.

१४. (अ) रेडियम किंवा इतर किरणोत्सर्गी पदार्थ (ब) क्ष किरणे यामुळे दिसून येणारी विकृतिचिकित्साविषयक लक्षणे

१५. त्वचेचा प्राथमिक एपिथेलिओमेट्स कॅन्सर

१६. विषयुक्त रक्तक्षय

१७. विषारी पदार्थामुळे झालेली विषयुक्त कावीळ.

१८. स्निग्ध-पुरळ, त्वचा दाह, खनिज तेल आणि खनिज स्निग्ध मिश्रण आधारीत विषबाधा.

१९. बायसीनोसिस फुफ्फुस विकार.

२०. ॲसबेस्टोसीस फुफ्फुस विकार.

२१. रासायनिक द्रव्य, रंग रोगण यांच्या संसर्गामुळे होणारे त्वचा रोग व इतर रोग, प्राथमिक दाहक आणि ॲलर्जीनिमित रोग.

२२. ध्वनी प्रदूषण-उद्भव कर्ण रोग.

२३. बेरीलियममुळे होणारी विषबाधा.

२४. कार्बन मोनोक्साईड प्रदूषण.

२५. कोळसा खाणीत निर्माण होणारे न्यूमोकोनियोसिस.

२६. फॉस्जीन प्रदूषण.

२७. व्यवसाय उद्भव कॅन्सर.

२८. आयसोसायनिड प्रदूषण.

२९. टॉक्सिनमुळे होणारा मूत्रपिंड रोग.



# महाराष्ट्र कारखाने नि

## प्रकरण १

## प्रारंभिक

१. संक्षिप्त संबोधन आणि व्याप्ती – ( १ ) ह्या नियमांस, ' महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ ' असे संबोधिले जाईल.

( २ ) यांची व्याप्ती संपूर्ण महाराष्ट्र राज्य राहील.

२. व्याख्या – संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमांत–

( अ ) ' अधिनियम ' म्हणजे कारखाने अधिनियम १९४८.

( ब ) ' परिशिष्ट ' म्हणजे, या नियमांना जोडलेले परिशिष्ट

(क) ' कृत्रिम आर्द्रीकरण ' म्हणजे, वस्तुनिर्माण प्रक्रियेमुळे प्रत्यक्षतः वातावरणात जे बाष्प किंवा जी पाण्याची वाफ सुटणे अपरिहार्य असते त्या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारच्या कृत्रिम साधनद्वारा एखाद्या खोलीतील हवेत ओलावा निर्माण करणे असा होतो. परंतु त्या खोलीचे तपमान ८०° किंवा त्यापेक्षा जास्त असेल त्यावेळी दारे किंवा खिडक्या यांवर ओल्या करून लावलेल्या चटया किंवा पडदे यांच्यामधून थेट बाहेरील हवा आत येणे हे कृत्रिम आर्द्रीकरण समजले जाणार नाही.

(ड) ' पट्टा ' म्हणजे, गतिवर्धक चामड्याचा पट्टा किंवा दोरखंड

( इ ) ' अंश ' (तपमान) म्हणजे, फॅरेनहाइट मापन यंत्रावर दर्शविणारा अंश

( फ ) जिल्हा दंडाधिकारी ' म्हणजे, राज्य शासन त्या बाबतीत नियुक्त करील अशा इतर कोणत्याही अधिकाऱ्याचा त्यात समावेश होतो.

( ग ) ' नमुना ' म्हणजे, या नियमास जोडलेला नमुना.

( ह ) ' धूम ' म्हणजे, वायू अथवा बाष्प.

( आय ) ' आरोग्य अधिकारी ' म्हणजे, नगर पालिका आरोग्य अधिकारी किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी किंवा त्या बाबतीत राज्य शासन नियुक्त करील असा इतर कोणताही अधिकारी.

(ज) ' आर्द्रता मापक ' म्हणजे, आर्द्रता मापकाची बनावट आणि ते सुस्थितीत राखणे याबाबत विहित केलेल्या शर्तीशी अनुरूप असलेले यंत्रयुक्त आर्द्र- आणि शुष्क कुप्यांचे आर्द्रता मापक.

२. शिशाच्या टेट्रा-इथिलपासून विषबाधा.

३. फॉस्फरसपासून विषबाधा किंवा तज्जन्य विकार.

४. पाऱ्यापासून विषबाधा किंवा तज्जन्य विकार.

५. मँगॅनीजपासून विषबाधा किंवा तज्जन्य विकार.

६. आर्सेनिकपासून विषबाधा किंवा तज्जन्य विकार.

७. नायट्रसच्या धुरापासून विषबाधा.

८. कार्बन बायसल्फाईडपासून विषबाधा.

९. बेंझिनच्या कोणत्याही समानधर्मी पदार्थामुळे किंवा त्याच्या नैट्रोयुक्त किंवा अमिडोयुक्त पदार्थांमुळे होणारी विषबाधा, किंवा तज्जन्य विकार धरून बेंझिनपासून विषबाधा.

१०. क्रोमपासून झालेला व्रण किंवा तज्जन्य विकार.

११. काळपुळी

१२. सिलीकोसिस

१३. क्षारज पदार्थापासून ( हॅलोजेन ) किंवा तैलवर्गीय हैड्रोकार्बनच्या क्षारज पदार्थापासून विषबाधा.

१४. (अ) रेडियम किंवा इतर किरणोत्सर्गी पदार्थ (ब) क्ष किरणे यामुळे बिघून येणारी विकृतिचिकित्साविषयक लक्षणे.

१५. त्वचेचा प्राथमिक एपिथेलिओमेटस कॅन्सर

१६. विषयुक्त रक्तक्षय

१७. विषारी पदार्थांमुळे झालेली विषयुक्त कावीळ.

१८. स्निग्ध-पुरळ. स्वचा दाह, खनिज तेल आणि खनिज स्निग्ध मिश्रण आधारीत विषबाधा.

१९. बायसीनोसिस फुफ्फुस विकार.

२०. अॅसबेस्टॉसीस फुफ्फुस विकार.

२१. रासायनिक द्रव्य, रंग रोगण यांच्या संसर्गामुळे होणारे त्वचा रोग व इतर रोग, प्राथमिक वाहक आणि अंतर्जीवनिर्मित रोग.

२२. ध्वनी प्रदूषण-उद्भव कर्ण रोग.

२३. बेरीलियममुळे होणारी विषबाधा.

२४. कार्बन मोनॉक्साईड प्रदूषण.

२५. कोळसा खाणीत निर्माण होणारे न्युमोकोनियोसिस.

२६. फॉस्जीन प्रदूषण.

२७. व्यवसाय उद्भव कॅन्सर.

२८. आयसोसायनिट प्रदूषण.

२९. टॉक्सिकमुळे होणारा मूत्रपिंड रोग.

# महाराष्ट्र कारखाने नियम १९६३

## प्रकरण १

### प्रारंभिक

**१. संक्षिप्त संबोधन आणि व्याप्ती** – ( १ ) ह्या नियमांस, 'महाराष्ट्र कारखाने नियम १९६३' असे संबोधिले जाईल.

( २ ) याची व्याप्ती संपूर्ण महाराष्ट्र राज्य राहील.

२. व्याख्या – संदर्भानुसार दुसरा अर्थ अन्यथा अपेक्षित नसेल तर, या नियमांत–

( अ ) 'अधिनियम' म्हणजे कारखाने अधिनियम १९४८.

( ब ) 'परिशिष्ट' म्हणजे, या नियमांस जोडलेले परिशिष्ट.

( क ) 'कृत्रिम आर्द्रीकरण' म्हणजे, वस्तुनिर्माण प्रक्रियेमुळे प्रत्यक्षतः वातावरणात जे बाष्प किंवा जी पाण्याची वाफ सुटणे अपरिहार्य असते त्या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारच्या कृत्रिम साधनाद्वारा एखाद्या खोलीतील हवेत ओलावा निर्माण करणे असा होतो. परंतु त्या खोलीचे तापमान ८०° किंवा त्यापेक्षा जास्त असेल त्यावेळी धारे किंवा जिवयथा छावर ओलसा टाकून लावलेल्या पडद्या किंवा पडदे यांच्यापासून थेट बाहेरील हवा आत येणे हे कृत्रिम आर्द्रीकरण समजले जाणार नाही.

( ड ) 'पट्टा' म्हणजे, गतिवर्धक चामड्याचा पट्टा किंवा दोरखंड.

( ढ ) 'अंश' (तपमान) म्हणजे, फॅरेनहीट मापन यंत्रावर दर्शविणारा अंश.

( फ ) 'जिल्हा दंडाधिकारी' म्हणजे, राज्य शासन त्या बाबतीत नियुक्त करील असा इतर कोणत्याही अधिकाऱ्याचा त्यात समावेश होतो.

( ग ) 'नमूना' म्हणजे, या नियमास जोडलेला नमूना.

( ह ) 'धूम' म्हणजे, वायु अथवा बाष्प.

( आय ) 'आरोग्य अधिकारी' म्हणजे, नगर पालिका आरोग्य अधिकारी किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी किंवा त्या बाबतीत राज्य शासन नियुक्त करील असा इतर कोणताही अधिकारी.

( ज ) 'आर्द्रता मापक' म्हणजे, आर्द्रता मापकाची बनावट आणि ते सुस्थितीत राखणे याबाबत विहित केलेल्या शर्तीशी अनुरूप असलेले बिनचूक आर्द्र-आणि शुष्क फुग्याचे आर्द्रता मापक.

(फ) 'निरीक्षक' म्हणजे, या अधिनियमानुसार नियुक्त केलेला कोणताही निरीक्षक त्यांत मुख्य निरीक्षक, कारखाने व जिल्हा दंडाधिकारी यांचा समावेश आहे.

(ब) 'सुस्थितीत ठेवलेले' म्हणजे, कार्यक्षम स्थितीत, कार्यक्षम काम करण्याच्या स्थितीत व योग्य प्रकारे दुरुस्त केलेल्या स्थितीत ठेवलेले.

(भ) 'व्यवस्थापक' म्हणजे या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी कारखान्याच्या कामकाजाबाबत भोगवटादाराला जबाबदार असणारी व्यक्ती.

(म) 'कलम' म्हणजे, या अधिनियमाचे कलम.

**नियम ३ ते ११ हे कलम ६ पोटकलम (१) अनुसार विहित केलेले नियम**

३. नकाशांना मान्यता – (१) ज्या जागेवर कारखाना उभारावयाचा असेल त्या जागेसाठी पूर्वपरवानगी मिळविण्यासाठी आणि एखादा कारखाना बांधण्यासाठी किंवा त्याचा विस्तार करण्यासाठी कारखान्यांच्या मुख्य निरीक्षकाकडे अर्ज केला पाहिजे.

अशा परवानगीसाठी नमुना १ मध्ये अर्ज केला पाहिजे आणि त्या सोबत खालील दस्तऐवज जोडले पाहिजेत–

[ (अ) वस्तुनिर्माण प्रक्रियेचे, तिच्या निरनिराळ्या अवस्थांतील संक्षिप्त वर्णनासह क्रमदर्शक आरेखन, वापरलेल्या कच्च्या मालाची नावे, अंतःस्थित उत्पादने, प्राणघातक विषारी वायू मिश्रित इ. अंतिम उत्पादने, उपउत्पादने त्यांची परिमाणे, साठवणीच्या पद्धती आणि हाताळणी, परिवहनातील धारकरण अशी व्यवसाय धोक्याच्या आणि उत्सर्जनाच्या विल्हेवाटीच्या व्यवस्थेचा तपशील, संभाव्य धोका आणि आपत्तीवर नियंत्रण ठेवण्याच्या पद्धती. ]

(ब) पुढील बाबी दर्शविणारे आणि प्रमाण घेऊन काढलेली आरेखने, म्हणजेच–

(एक) कारखान्याची जागा आणि लगतच्या इमारती व इतर संरचना रस्ते, गटारे वगैरे धरून लगतचा परिसर,

(दोन) नैसर्गिक उजेड, हवा खेळती ठेवण्याची सोय, आणि आगीच्या वेळी सुटकेचे मार्ग यासंबंधीचा सर्व आवश्यक तपशील दर्शवून निरनिराळ्या इमारतींचा नकाशा, उंची व आवश्यक ते स्तरच्छेद तसेच व यंत्रसामग्री मुख्य चालनाचे पार्श्वभाग, व जाण्या-येण्याचे मार्ग यांची जागा देखील या नकाशात दाखविली पाहिजे आणि–

(तीन) मुख्य निरीक्षकास आवश्यक वाटेल असा इतर तपशील.



[परंतु असे की जेथे एखाद्या कारखान्यात चालावयाच्या कोणत्याही प्रक्रियेत कोणत्याही रीतीने पेट्रोलियम, तेलबियांपासून किंवा इतर कोणत्याही पदार्थांपासून तेल गाळण्यासाठी कोणताही ज्वालाग्राही विद्रावक वापरावयाचा असेल, हाताळावयाचा असेल किंवा त्यावर कोणत्याही प्रकारे प्रक्रिया करावयाची असेल किंवा तसे करण्याचा उद्देश असेल तेथे अशा प्रस्तावित कारखान्याच्या जागेच्या संबंधात संबंधित स्थानिक प्राधिकाऱ्याचे आणि याबाबत राज्य शासनाने त्या क्षेत्राचे प्रभारी अधिकारी म्हणून नियुक्त केलेल्या नगररचना संचालनालयातील नगर रचनाकाराच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडले पाहिजे.]

(२) हे नकाशे या अधिनियमाच्या आवश्यकतानुरूप आहेत अशी मुख्य निरीक्षकाची खात्री झाल्यास त्याला विनिर्दिष्ट करता येईल अशा शर्तींच्या अधीन राहून, त्यावर स्वाक्षरी करून तो मान्यता देईल व प्रत्येक नकाशाची एक प्रत अर्जदारास परत देईल किंवा अशा प्रकारची मान्यता देणे शक्य व्हावे यासाठी त्याला आवश्यक वाटणारा इतर तपशील मागवता येईल.

[परंतु असे की मुख्य निरीक्षक कारखाने यांनी संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्याने जातीने कारखान्याची जागा पाहिली नसेल व ती मान्य केली नसेल तर पोट-नियम (१) च्या परंतुकात उल्लेख केलेल्या कोणत्याही कारखान्याच्या जागेच्या संबंधात अशी मान्यता देणार नाही आणि संयंत्राच्या स्थानाच्या संबंधात त्या प्राधिकाऱ्यांमध्ये काही मतभेद असल्यास ती बाब निर्णयासाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल.]

परंतु आणखी असे की अर्जदारास त्याचे म्हणणे ऐकून घेण्याची संधी दिल्याखेरीज आणि मुख्य निरीक्षकाने किंवा यथास्थिती राज्य शासनाने त्या बाबतीत कारणे नमूद केल्याखेरीज कोणतीही जागा अमान्य ठरविली जाणार नाही.

[३ अ. स्थैर्यतेचे प्रमाणपत्र – कारखान्याच्या कोणत्याही जागेत, बांधलेल्या, पुन्हा बांधलेल्या, विस्तार केलेल्या कोणत्याही जागेत किंवा कारखाना किंवा त्याचा भाग म्हणून वापरात असलेल्या कोणत्याही जागेत, सक्षम अधिकाऱ्याने नमुना १ अ मध्ये अभियंत्रिय स्थापत्याच्या संबंधात स्थैर्यतेचे प्रमाणपत्र दिल्याशिवाय ते कारखाना मुख्य निरीक्षकाकडे आणि कब्जेदाराने पाठविल्याशिवाय व त्याने ते संमत केल्याशिवाय, वस्तु निर्माण प्रक्रियेचे काम करता कामा नये.

परंतु असे, की नियमाच्या अधिसूचनेच्या तारखेस अस्तित्वात असणाऱ्या कारखान्यासाठी नमुना १ अ मध्ये असलेले स्थैर्यतेचे प्रमाणपत्र, अधिसूचनेच्या तारखेपासून ३ महिन्यांत कारखाना निरीक्षकाकडे पाठवावे.

परंतु पुढे, की एकदा मिळाल्यानंतर प्रत्येक ५ वर्षांच्या कालावधीत किंवा अभियंतत्व स्थापत्यात फेरफार, दुरुस्ती, वृद्धी केल्यानंतर किंवा यंत्रसामग्रीत वाढ वा पुनःप्रस्थापन केल्यानंतर सक्षम अधिकाऱ्याकडून नमुना १ अ यात स्थैर्यत्व प्रमाणपत्र नवीन मिळवून ते कारखाना मुख्य निरीक्षकाकडे पाठविल्याशिवाय वस्तू निर्माण प्रक्रियेचे काम केले जाता कामा नये.

परंतु, शिवाय असे की वरील तरतुदी अशा आहेत की त्यामुळे कारखाने अधिनियमाच्या कलम ३९ व ४० च्या तरतुदींना बाधा आणणाऱ्या नाहीत.

स्पष्टीकरण – (१) या नियमाच्या प्रयोजनासाठी ' सक्षम व्यक्ती ' म्हणजे–

(i) नागरी अभियंता संस्थेचा सदस्य किंवा सहयोगी सदस्य किंवा–

(ii) स्थापत्य अभियंता संस्थेचा सदस्य

(iii) अभियंता संस्था (भारत) यांतील नागरी किंवा स्थापत्य अभियंता शाखेतील पूर्ण सदस्य किंवा सहयोगी सदस्य

(iv) कार्यकारी अभियंत्याच्या श्रेणीपेक्षा कमी श्रेणी नाही असा पब्लिक वर्क्सचा नागरी अभियंता.

[स्पष्टीकरण (२) ' स्थापत्य अभियंत्रिकी कार्य ' म्हणजे कोणतीही इमारत, टाकी, छत, मिनार, फलाट, चुराडे, पूल, भिंतींना पुष्टी देणारे बांधकामाचे कार्य, किंवा कोणतेही बांधकाम.]

× (महाराष्ट्र शासन राजपत्र भाग १ ला (विशेष) १९–७–८४ पृ. १९७)

४. कारखाना म्हणून जागेचा वापर – कब्जेदाराने कारखान्याच्या कोणत्याही भागाचा वापर करता कामा नये, असे असल्याशिवाय–

(१) कारखान्याच्या मुख्य निरीक्षकाने नकाशे मंजूर केलेले किंवा कारखान्याच्या संबंधात उपमुख्य निरीक्षकाने जसे असेल तसे खालील बाबतीत–

(अ) जेथे कारखाना उभा करावयाचा ती जागा–

(ब) वस्तु–निर्माण प्रक्रियेच्या वापराच्या कारणासाठी असणारी इमारत आणि विस्तारण–

(क) पाणी आणि मळे यांत करण्याच्या मार्गाची, पत्रव्या मार्गाची व उपउत्पादने काढण्याची कोही समाविष्ट यांचे आरेखन–

(ड) निर्मिती प्रक्रियेतील पूर्ण वा भागशः कोणतेही दृश्य.

(२) कारखाना इमारत, विस्तारण, प्रक्रियन आणि यंत्रांचे आरेखनाचे नियतीकरण, मंजूर नकाशासह–



(३) ज्यासाठी नकाशा मंजूर झाला आहे त्याच्या अटींच्या पूर्ततेसह–

(४) कारखाना मुख्यनिरीक्षक यांजकडून नियम ६ खाली मिळविलेला किंवा उपमुख्य निरीक्षकाकडून नियम ८ खाली मिळविलेला नूतनीकरण परवाना आणि प्रस्तुत काळी हा परवाना नियमान्वित आहे.

स्पष्टीकरण – या पोट नियमाच्या कारणास्तव, परवाना नियमान्वित असल्याचे समजले गेले पाहिजे, जर–

(अ) शुल्क, अधिक्य शुल्कासह, आवश्यक असेल तसे, भरलेली आहे.

(ब) ज्याच्यासाठी परवाना मंजूर झालेला आहे ती कामगारांची नियुक्ती विख्यात वाढ झालेली नाही.

(क) ज्याच्यासाठी परवाना मंजूर झालेला आहे त्या प्रस्थापित शक्तीच्या मर्यादेत वाढ झालेली नाही.

(५) नियम २२ खाली आवश्यक ती प्रमाणपत्रे मिळविली आहेत.

(६) ज्याच्यासाठी परवाना मंजूर झाला आहे किंवा त्याचे नूतनीकरण केले आहे जसे असेल तसे, त्याच्या अटींची पूर्तता केली आहे.

× महाराष्ट्र शासन राजपत्र भाग १ ल. ३–२–८३ पृ. ६९९

शासकीय अधिसूचना दि. २१–५–८६

शासकीय अधिसूचना दि. २१–५–८४

नोंदणी करण्यासाठी व परवाना मंजूर होण्यासाठी अर्ज–

[ कारखान्याच्या नोंदणीसाठी नमुना १ मध्ये अर्ज आणि त्याखाली तीन वर्षांपेक्षा जास्त नाही अशा कालावधीसाठी परवाना मंजूर होणेसाठी अर्ज ]

५. नोंदणीसाठी व अनुज्ञप्ती मिळवण्यासाठी अर्ज – (१) हा अधिनियम अमलात आल्यानंतर त्याच्या कक्षेत येणाऱ्या प्रत्येक कारखान्याच्या व्यवस्थापक किंवा कब्जेदार मुख्य निरीक्षकास तीन वर्षांच्या पेक्षा जास्त नाही इतक्या काळाच्या वर्षासाठी परवाना मंजूर होण्यासाठी कारखान्याच्या नोंदणीकरता नमुना २ मधील अर्जाच्या तीन प्रती अनुज्ञप्ती मिळवण्यासाठी नमुना ३ मधील एका अर्जासह सादर करील.

परंतु असे, की अधिनियमाच्या कलम ८५ खालील अधिसूचनेद्वारा ज्या जागेला अधिनियमाचे उपबंध लागू केले आहेत अशा जागेचा कब्जेदार किंवा व्यवस्थापक हा अधिसूचनेच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत अर्ज सादर करील.

अनुसूची

वर्षातील कोणत्याही दिवशी, कामावर लावावयाच्या व्यक्तींची कमाल संख्या

(सर्व कारखाने–शक्तिजनित्रस्थानक व विद्युत् उपस्थानक व व्यतिरिक्त)

| यंत्राची कमाल अश्वशक्ती | २० पर्यंत | २१ ते ५० पर्यंत | ५१ ते १२० पर्यंत | १०१ ते २५० पर्यंत | २५१ ५०० पर्यंत | ५०१ ते ७५० पर्यंत | ७५१ ते १००० पर्यंत | १००१ ते १५०० पर्यंत | १५०१ ते २००० पर्यंत | २००१ ते त्यावर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. |
| काही नाही | ४० | ७५ | १५० | ३७५ | ६०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ३५०० |
| १० पर्यंत | ७५ | २२५ | ३७५ | ६०० | ९०० | १६०० | २००० | ३००० | ४००० | ५००० |
| १० पेक्षा जास्त, ५० पेक्षा कमी | १५० | ३७५ | ६०० | ९०० | १२०० | २५०० | ३००० | ४००० | ५००० | ६००० |
| ५० पेक्षा जास्त, १०० पेक्षा कमी | ३७५ | ४७५ | ९०० | १२०० | १८७५ | ३००० | ४००० | ५००० | ६००० | ७००० |
| १०० पेक्षा जास्त, २५० पेक्षा कमी | ४७५ | ७५० | १२०० | १८७५ | २२५० | ४००० | ५००० | ६००० | ७००० | ८००० |
| २५० पेक्षा जास्त, ५०० पेक्षा कमी | ७५० | ११२५ | १५०० | २२५० | ३००० | ५००० | ६००० | ७००० | ८००० | ९००० |
| ५०० पेक्षा जास्त, ७५० पेक्षा कमी | ११२५ | १५०० | २२५० | ३००० | ३३५० | ६००० | ७००० | ८००० | ९००० | १०००० |
| ७५० पेक्षा जास्त, १००० पे. कमी | १३०० | २२५० | ३००० | ३७५० | ४५०० | ७००० | ८००० | ९००० | १०००० | ११००० |
| १००० पेक्षा जास्त | २२५० | ३००० | ३७५० | ४५०० | ४९५० | ८००० | ९००० | १०००० | ११००० | १२००० |



(२) अशा प्रत्येक अर्जासोबत खालीलअनुसूचित विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजना-साठी १-१-८६ पासून परिणामित विहित केलेले शुल्क भरण्याकरिता यथास्थिती कोषागार पावती किंवा धनादेश किंवा भारतीय डाकखेव किंवा पुस्तक समाधो त्याचे बीजक जोडलेले असले पाहिजे–

## सूची ब (जनित्र शक्ती स्थानक)

| मेगॅवॅटची सर्वसाधारण क्षमता | कामगारांची संख्या १०० पर्यंत | १०१ ते ५०० पर्यंत | ५०० ते १००० पर्यंत | १००० पेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. | रु. |
| २० मेगॅवॅट पर्यंत | ५०० | ७५० | १००० | १५०० |
| २० पेक्षा जास्त ५० पर्यंत | ७०० | १००० | १५०० | २००० |
| ५० पेक्षा जास्त १०० पर्यंत | १००० | १५०० | २००० | २५०० |
| १०० पेक्षा जास्त २५० पर्यंत | १५०० | २००० | २५०० | ३००० |
| २५० पेक्षा जास्त ५०० पर्यंत | २००० | २५०० | ३००० | ३५०० |
| ५०० पेक्षा जास्त ७५० पर्यंत | २५०० | ३००० | ३५०० | ४००० |
| ७५० पेक्षा जास्त १००० पर्यंत | ३००० | ३५०० | ४००० | ५००० |
| २००० पेक्षा जास्त | ३५०० | ४००० | ५००० | ६००० |

## सूची क (विद्युत उपस्थानक इ.)

| क्षमतेचे प्रमाणदर | ९ कामगारांपेक्षा जास्त |
|---|---|
| २० MVA पर्यंत | रु. १००–०० |
| २० MVA पेक्षा जास्त, ५० MVA पर्यंत | रु. २५०–०० |
| ५० MVA पेक्षा जास्त, १०० MVA पर्यंत | रु. ५००–०० |
| १०० MVA पेक्षा जास्त, २५० MVA पर्यंत | रु. ७५०–०० |
| २५० MVA पेक्षा जास्त, ५०० MVA पर्यंत | रु. १०००–०० |
| ५०० MVA पेक्षा जास्त, ७५० MVA पर्यंत | रु. १२५०–०० |
| ७५० MVA पेक्षा जास्त, १००० MVA पर्यंत | रु. १५००–०० |
| २००० MVA पेक्षा जास्त, | रु. २०००–०० |

परंतु असे की,

(एक) खालील वर्गाच्या कारखान्याकरिता आकारावयाचे शुल्क जर ते एका कॅलेंडर वर्षामध्ये एकूण १८० दिवसांपेक्षा अधिक दिवस चालू राहात नसतील, तर किमान रु. ५–०० च्या अधीन वर विनिर्दिष्ट केलेल्या शुल्काच्या अर्धे शुल्क असेल.

(अ) कापूस वटणी व दाबणी कारखाने.
(ब) गूळ कारखाने
(क) तंबाखू संस्करण जर्दा कारखाने,
(ड) काजू कारखाने,
(इ) भुईमुगाच्या शेंगा फोडण्याचे कारखाने,
(फ) तांदुळाच्या गिरण्या

(दोन) वर्षाच्या एखाद्या भागाकरिताच काम करणाऱ्या व १ जुलै रोजी किंवा त्यानंतर कामास सुरुवात करणाऱ्या इतर कारखान्याच्या बाबतीत पहिल्या वेळी आकारावयाचे शुल्क किमान रु. ५–०० च्या अधीन पूर्वोक्त अनुसूचित विनिर्दिष्ट केलेल्या शुल्काच्या अर्धे असेल;

परंतु पुढे असे, की परवान्यासाठी केलेल्या अर्जाचा कालावधी जर एक किंवा अधिक वर्षांचा, पण तीन वर्षांपेक्षा जास्त नाही असा असेल तर त्यासाठी देय असणारे शुल्क दर वर्षासाठी या पोटनियमात विनिर्दिष्ट केलेल्या दराप्रमाणे शुल्क असेल.

(३) १९८१ वर्षासाठी परवाना मिळण्यासाठी किंवा नूतनीकरण करण्यासाठी जेव्हा शुल्क १ जानेवारी १९८१ पूर्वी भरलेले असेल आणि असे भरलेले शुल्क पोटनियम (२) मधील सूचीत विहित केलेल्या देय शुल्कापेक्षा कमी असेल, तर ३१ मार्च १९८१ रोजी किंवा त्यापूर्वी परवानाधारकाने फरकाची रक्कम भरली पाहिजे. जर ३१ मार्च १९८१ रोजी किंवा त्यापूर्वी परवानाधारक शुल्क भरण्यास कसूर करील तर देय असणाऱ्या दिनांकाच्या संपुष्टनानंतर त्याने शुल्क भरल्याचे समजले पाहिजे आणि फरकाच्या २५ प्रतिशत अतिरिक्त शुल्क त्याला देय असले पाहिजे.

६. अनुज्ञप्ती देणे – (१) मुख्य निरीक्षकाकडे नियम ५ च्या पोट नियम (१) अनुसार अर्ज केल्यानंतर व त्या नियमाच्या पोट नियम (२) अनुसार विहित शुल्क भरल्यानंतर आणि केलेल्या अर्जाप्रमाणे अनुज्ञप्ती देण्यास कोणतीही हरकत नसल्याची त्याची खात्री झाल्यावर त्याला कारखान्याची नोंदणी करता येईल आणि अर्जात विनिर्दिष्ट असतील अशा जागांचा कारखाना म्हणून वापर करण्यासाठी



आणि अनुज्ञप्तीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींचे पालन करण्याच्या अटीवर नमुना ४ मध्ये अर्जदाराला अनुज्ञप्ती देता येईल.

परंतु असे की, कलम ६ पोट कलम (३) च्या अनुबंधाच्या अधीन राहून, जर मुख्य निरीक्षकाची अशी खात्री पटली, की –

(एक) अर्जासोबत–
(अ) जेथे कारखाना उभा करावयाचा त्या जागेचे आणि
(ब) कारखान्याच्या बांधकामासाठी किंवा विस्तारासाठी नकाशे जोडले नाहीत.

(दोन) असे सादर केलेले नकाशे मुख्य निरीक्षकाकडून मान्य केलेले नाहीत.

(तीन) मुख्य निरीक्षकाने मान्य केलेल्या नकाशानुसार किंवा ज्या शर्तींच्या अधीन नकाशे मान्य करण्यात आले त्याचे पालन करून कारखाना बांधण्यात आलेला नाही.

(चार) नियम ११८ च्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संबंधित उपबंधांच्या मजकुराच्या आवश्यकतेचे संबंधित कारखान्याच्या बाबतीत पालन करण्यात आलेले नाही.

(पाच) स्फोटक किंवा ज्वालाग्राही धूळ, धूम किंवा वायू यामुळे कारखान्यातील कामगारांच्या जीवाला निकटवर्ती धोका असून तो धोका टाळण्यासाठी त्याच्या मते प्रभावी उपाय-योजना करण्यात आलेली नाही, तर त्यास कारखान्याची नोंदणी करण्यास किंवा अनुज्ञप्ती देण्यास नकार देता येईल.

[(सहा) कच्चा माल, अंतःस्थ उत्पादने, पक्क्या मालाची उत्पादने, परीक्षण, साठवणीची पद्धत, धोका, सुरक्षा साधने, व्यवसायजनाशके व प्रदूषणे यांच्या विल्हेवाटीची व्यवस्था, संभाव्य धोका व त्याच्या विल्हेवाटीची पद्धत इ. तपशील, स्पष्ट केलेला नाही.

(२) अशी प्रत्येक अनुज्ञप्ती निलंबनाच्या व ती फिरवण्याच्या संबंधातील यापुढे अंतर्भूत असलेल्या उपबंधांना अधीन राहून आणि नियम ८ अनुसार तिचे आधीच नूतनीकरण केलेले नसेल तर पुढे येणाऱ्या ३१ डिसेंबरपर्यंत अमलात राहील व नंतर समाप्त होईल.

७. अनुज्ञप्तीची दुरुस्ती (१) नियम ६ अनुसार दिलेल्या अनुज्ञप्तीची दुरुस्ती मुख्य निरीक्षकाला किंवा याबाबत राज्यशासनाने प्राधिकृत केलेल्या उप-मुख्य निरीक्षकाला करता येईल.

(२) कारखान्याच्या नावात बदल झाल्यास किंवा ज्या जागेत कारखाना उभारला असेल त्या जागेत बदल झाल्यास किंवा ज्या कारखान्याला अनुज्ञप्ती दिलेली असेल त्या कारखान्यात अनुज्ञप्तीमध्ये विनिर्दिष्ट केलेली अश्वशक्ती अथवा तेथे कामावर लावलेल्या लोकांची संख्या यांच्या मर्यादेत वाढ झाल्यास अनुज्ञप्तिधारकास आपल्या अनुज्ञप्तीमध्ये दुरुस्ती करण्यास भाग पाडले जाईल. ज्यांच्या अनुज्ञप्तीमध्ये दुरुस्ती करावयाची आहे अशा अनुज्ञप्तिधारकाने ती अनुज्ञप्ती, दुरुस्तीचे स्वरूप आणि कारणे नमूद करून एका अर्जासह मुख्य निरीक्षकाकडे किंवा पोटनियम (१) अन्वये प्राधिकृत केलेल्या उप-मुख्य निरीक्षकाकडे सादर केली पाहिजे.

मात्र, कामगारांच्या संख्येत किंवा अश्वशक्तीमध्ये किंवा दोन्हींमध्ये करावयाच्या बदलाबद्दल अनुज्ञप्तीसाठी किंवा तिच्या नवीकरणासाठी अधिक फी द्यावी लागणार असेल तर अशा बदलाच्या बाबतीत अनुज्ञप्तीत दुरुस्ती करणे आवश्यक असणार नाही.

(३) जेव्हा पोटनियम (२) अनुसार अनुज्ञप्तीत दुरुस्ती करणे आवश्यक असेल तेव्हा अशा दुरुस्तीसाठी भरावयाची फी, कामगारांची अधिक संख्या व अधिक अश्वशक्ती यांच्या आधारे देय होणारी अनुज्ञप्ती फी किंवा नवीकरण फी आणि त्या वर्षाकरिता किंवा त्याच्या भागाकरिता यापूर्वीच भरलेली अनुज्ञप्ती फी किंवा तिच्या नवीकरणाची फी यांमधील फरकाइतकी असेल.

**अनुज्ञप्तीचे नवीकरण** – (१) अनुज्ञप्तीच्या नवीकरणाचा नमुना ३ मधील अर्ज मुख्य निरीक्षकाकडे, किंवा याबाबत राज्यशासनाने प्राधिकृत केलेल्या उप-मुख्य निरीक्षकाकडे त्यासोबत नियम ५ ला जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेली फी भरल्याबद्दल यथास्थिती कोषागार पावती किंवा धनादेश किंवा डाक-ड्राफ्ट किंवा पुस्तक समायोजनासाठी बीजक जोडून, ज्या तारखेस अनुज्ञप्तीची मुदत संपत असेल त्या तारखेपूर्वी दोन महिन्यांहून अधिक होणार नाही अशा मुदतीत त्याला पोहोचेल अशा रीतीने पाठविला पाहिजे.

मात्र जर एखाद्या वर्षी एखाद्या कारखान्याचे काम १ नोव्हेंबर रोजी किंवा त्यानंतर सुरू होत असेल तर अनुज्ञप्तीच्या नवीकरणाचा अर्ज पुढील १ जानेवारी किंवा तत्पूर्वी केला पाहिजे.

(२ क) पोटनियम (१) अनुसार अर्ज मिळाल्यानंतर अनुज्ञप्तीच्या नवीकरणास कोणतीही हरकत नाही अशी मुख्यनिरीक्षकाची किंवा पोटनियम (१) अन्वये प्राधिकृत केलेल्या उप मुख्यनिरीक्षकाची खात्री झाल्यास तीन वर्षांपेक्षा अधिक नाही इतक्या मुदतीपर्यंत त्याला तिचे नवीकरण करता येईल किंवा नियम



६ पोटनियम (१) मधील परंतुकात विनिर्दिष्ट केलेल्या कारणांपैकी कोणत्याही कारणासाठी तिच्या नवीकरणास नकार देता येईल.

(ब) अधिनियमाच्या उपबंधाचे किंवा नियमांचे किंवा दोहोंचे वारंवार उल्लंघन केल्याबद्दल अर्जदाराला दोषी ठरविण्यात आले किंवा अर्जदाराने ती अनुज्ञप्ती कपटाने किंवा दुर्व्यपदेशाने मिळविली आहे; या कारणावरून देखील मुख्य निरीक्षकास अनुज्ञप्तीच्या नवीकरणास नकार देता येईल.

परंतु खंड (अ) किंवा (ब) खाली येणाऱ्या कोणत्याही बाबतीत कोणत्याही अनुज्ञप्तीस नकार देण्यापूर्वी, अनुज्ञप्तीस नकार का देण्यात येऊ नये याचे कारण दाखविण्याची अर्जदारास संधी दिली गेली पाहिजे.

परंतु पुढे असे की जर ज्यासाठी अनुज्ञप्तीसाठी केलेला अर्ज एक वर्ष मुदतीचा असेल किंवा त्यापेक्षा जास्त मुदतीचा पण तीन वर्षांपेक्षा जास्त नाही–असेल तर या पोटनियमाखाली देय असणारे शुल्क दरवर्षासाठी नियमाखाली सूचीत स्पष्ट केल्याप्रमाणे देय असेल.

परंतु पुढे असे, की अनुज्ञप्तीच्या नूतनीकरणाचा अर्ज या पोटनियमात स्पष्ट केलेली मुदत संपल्यानंतर केला तर आधिक्य श्रेणीचे शुल्क सूची सदर २ मध्ये दर्शविलेल्या प्रतिशतप्रमाणे अनुज्ञप्तीच्या नूतनीकरणासाठी विलंब झाला म्हणून सदर १ मध्ये असेल ती देय असेल.

## सूची

( नियम ( खालील सूची )

| विलंब कालावधी | शुल्क प्रतिशत |
|---|---|
| १ महिन्यापर्यंत | ५ प्रतिशत |
| २ महिन्यांपर्यंत | १० प्रतिशत |
| ३ महिन्यांपर्यंत | १५ प्रतिशत |
| ४ महिन्यांपर्यंत | २० प्रतिशत |
| ५ महिने वा त्यापेक्षा जास्त | २५ प्रतिशत |

९. अनुज्ञप्ती देण्यात आली किंवा तिचे नवीकरण झाले असे केव्हा समजावे ?

अनुज्ञप्ती देण्यासाठी किंवा तिच्या नवीकरणासाठी या नियमानुसार यथोचितरीत्या अर्ज केला असेल तेव्हा ज्या कारखान्याच्या बाबतीत यथास्थिती अनुज्ञप्ती द्यावयाची किंवा तिचे नवीकरण करावयाचे त्या कारखान्यास, अशी अनुज्ञप्ती दिली जाईपर्यंत किंवा तिचे नवीकरण होईपर्यंत किंवा अनुज्ञप्ती देण्याचे

किंवा तिचे नवीकरण करण्याचे नाकारण्यात आल्यासंबंधी सूचना कळवली जाई-पर्यंत तो कारखाना यथोचितपणे अनुज्ञाधीन आहे असे समजले जाईल.

स्पष्टीकरण – या नियमाच्या प्रयोजनासाठी, अनुज्ञप्ती देण्यासाठी किंवा तिच्या नवीकरणासाठी दिलेला अर्ज विहित नमुन्यात असेल आणि त्यात सर्व संबंधित तपशील भरलेला असेल आणि तसेच नियम ५ ला जोडलेल्या अनुसूची-नुसार फी भरल्याबद्दल त्यासोबत यथास्थिती कोषागार पावती किंवा धनादेश किंवा पुस्तक समायोजनासाठी बीजक जोडलेले असेल तरच तो यथोचितरीत्या करण्यात आला आहे असे समजले जाईल.

९. अ. अनुज्ञप्ती रद्द करणे – मुख्य निरीक्षकाने किंवा नियम ८ चा पोट नियम (१) खाली प्राधिकृत केलेल्या उप-मुख्य निरीक्षकाने, ज्यासाठी अनुज्ञप्ती मंजूर केली असेल किंवा नूतनीकरण केले असेल ती मुदत संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी, नियम ६ चा पोटनियम (१) खालील परंतुक या नियम ८ पोट नियम (२) खंड (ब) यात स्पष्ट केलेल्या कारणास्तव अनुज्ञप्ती रद्द करावी.

परंतु असे, की अनुज्ञप्ती रद्द करण्यापूर्वी अनुज्ञप्ती-धारकास, अनुज्ञप्ती रद्द का करू नये याची कारणे दाखविण्याची संधी दिली पाहिजे.

१०. अनुज्ञप्तिधारकाच्या मृत्यूनंतरची किंवा असमर्थतेनंतरची कार्यपद्धती – जर एखादा अनुज्ञप्तिधारक मरण पावला किंवा नादार झाला तर अशा अनुज्ञप्ति-धारकाचा धंदा चालवणारी व्यक्ती, मूळ अनुज्ञप्तीच्या न संपलेल्या मुदतीसाठी नियम ७ अनुसार ती अनुज्ञप्ती स्वत:च्या नावे करण्याबद्दलच्या दुरुस्तीसाठी तिला अर्ज करणे शक्य होण्यास जी वाजवी वेळ लागेल अशा वेळात अनुज्ञप्तिधारकास त्या अनुज्ञप्तीद्वारे दिलेल्या शक्तींचा वापर करण्याबद्दल त्या अधिनियमानुसार कोणत्याही शास्तीस पात्र असणार नाही.

११. अनुज्ञप्ती हरवणे – (१) या नियमानुसार दिलेली अनुज्ञप्ती हरवल्यास किंवा नष्ट झाल्यास ५ रु. फी भरल्यानंतर तिची दुसरी प्रत देता येईल.

(२) जर मूळ अनुज्ञप्ती विरूपित किंवा खराब झाली तर, अनुज्ञप्ति-धारकाला ५ रु. भरून तिची दुसरी प्रत मिळविण्यास मुख्य निरीक्षकास सांगता येईल :

परंतु, फी न आकारता अनुज्ञप्तीची दुसरी प्रत देण्यास योग्य व पर्याप्त कारणे आहेत अशी मुख्य निरीक्षकाची खात्री पटल्यास त्याला तसे करता येईल.

१२. शुल्क भरण्याची पद्धती – (१) या नियमानुसार केलेल्या प्रत्येक अर्जा-सोबत 'बत्तीस-संकीर्ण, सामाजिक व विकासविषयक संघटना ('सामाजिक व



विकासविषयक सेवा' विभागातील) कारखाने अधिनियम, १९४८ अनुसार वसूल झालेली फी" या लेखा शीर्षाखाली स्थानिक कोषागारात फीची योग्य ती रक्कम भरण्यात आली आहे हे दर्शविणारी कोषागार पावती किंवा मुख्य निरीक्षकाच्या नावे फीच्या योग्य त्या रकमेचा काढलेला रेखीत धनादेश किंवा रेखीत भारतीय डाकप्रेष जोडण्यात आला पाहिजे.

परंतु, बृहन्मुंबईतील कारखान्यांच्या बाबतीत, अर्जासोबत नेहमी रेखीत धनादेश किंवा रेखीत भारतीय डाकप्रेष जोडला पाहिजे.

आणखी असे की, सरकारी कारखान्यांच्या बाबतीत योग्य अशा फीची रक्कम सामान्यत: एका सरकारी विभागाकडून दुसऱ्या विभागाला देय असलेल्या रकमा ज्या रीतीने भरल्या जातात त्याच रीतीने भरली पाहिजे.

(२) जर अनुज्ञप्ती मिळविण्यासाठी, तिच्या नवीकरणासंबंधी किंवा दुरुस्ती साठी केलेला अर्ज फेटाळण्यात आला तर, भरलेली फी अर्जदाराला परत केली पाहिजे.

(३) जेथे अशा प्रकारचा अर्ज मान्य करण्यात आला असेल तेथे अर्जदाराने विहित फीपेक्षा अधिक भरलेली कोणतीही रक्कम, अशा मान्यतेच्या तारखेपासून एक वर्ष संपल्यानंतरच केवळ परतावायोग्य होईल किंवा पुढील वर्षाकरिता देय होणाऱ्या कोणत्याही शुल्काचा भरणा करण्यासाठी ती समायोजित करता येईल.

१३. अनुज्ञप्तिधारकाच्या विनंतीवरून अनुज्ञप्तीचे निलंबन – (१) जर कोणत्याही वर्षी ३१ ऑक्टोबर पूर्वी, कब्जेदार, ज्या जागेसाठी अनुज्ञप्ती दिलेली असेल तिचा वापर पुढील वर्षी कारखान्यात कामासाठी करण्यात येणार नाही असा आपला उद्देश मुख्य निरीक्षकास किंवा याबाबत राज्य शासनाने प्राधि-कृत केलेल्या उपमुख्य निरीक्षकास लेखी अधिसूचित करीत असेल तर मुख्य निरीक्षकास किंवा याबाबत राज्यशासनाने प्राधिकृत केलेल्या उप-मुख्य निरीक्षकास अशा कारखान्याच्या बाबतीत दिलेली अनुज्ञप्ती निलंबित करता येईल.

(२) पोटनियम (१) खालील निलंबित अनुज्ञप्ती तिच्या नवीकरणाकरिता नमुना २ मधील अर्ज अनुज्ञप्तीसहित मिळाल्यावर आणि या नियमात विनिर्दिष्ट केलेल्या फीच्या भरीला १० टक्के अधिभार भरल्यानंतर वर्षाच्या उर्वरित भागा-साठी पुन्हा चालू करता येईल.

१४. कब्जाची नोटीस – कब्जाची नोटीस नमुना २ मध्ये असली पाहिजे.

१५. व्यवस्थापक बदलल्याची नोटीस – व्यवस्थापक बदलण्याची नोटीस नमुना ५ मध्ये असली पाहिजे.

---

## प्रकरण २

## निरीक्षक कर्मचारीवर्ग

१६. निरीक्षकांची नियुक्ती – कोणत्याही व्यक्तीची निरीक्षक म्हणून नियुक्ती करते वेळी जर तिच्याजवळ अशा निरीक्षकांसाठी मुंबई नागरी सेवा वर्गीकरण व सेवाप्रवेश नियमातील विहित अर्हता नसेल तर, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी तिची तशी नियुक्ती केली जाणार नाही.

१७. निरीक्षकांच्या शक्ती – या अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनासाठी निरीक्षकास खालील सर्व किंवा त्यांपैकी कोणतीही गोष्ट करण्याची शक्ती असेल त्या म्हणजे. (अ) कोणत्याही कामगाराचे छायाचित्र घेणे, कोणतीही इमारत किंवा खोली, कोणतेही संयंत्र; यंत्रसामग्री, उपयंत्र किंवा उपकरणसंच; कोणतीही नोंदवही किंवा दस्तऐवज किंवा कारखान्यात कामावर लावलेल्या कामगारांचे आरोग्य, सुरक्षितता किंवा कल्याण साध्य करण्याच्या प्रयोजनासाठी तरतूद केलेली कोणतीही गोष्ट यांची तपासणी करणे; परीक्षण करणे, मोजणी करणे, प्रतिलिपी करणे, छायाचित्र घेणे, कपरेषा आखणे किंवा यथास्थिती चाचणी घेणे

(ब) एखादा निरीक्षक हा यथोचित अर्हता असलेला वैद्यक व्यवसायी असल्यास त्याच्या बाबतीत या अधिनियमानुसार त्याच्या कर्तव्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा वैद्यकीय परीक्षा पार पाडणे.

(क) या अधिनियमानुसार किंवा निरीक्षक या नात्याने आपली कर्तव्ये पार पाडताना उद्भवणारी कोणतीही तक्रार किंवा अन्य कार्यवाही न्यायालयापुढे दाखल करणे, चालवणे किंवा त्यात बचाव करणे.

परंतु, जिल्हा दंडाधिकारी आणि अपर निरीक्षक म्हणून नेमलेले असे इतर सरकारी अधिकारी यांच्या शक्ती कलम ८ च्या पोटकलम (५) खालील अधिसूचनेमध्ये अन्यथा स्पष्टपणे उपबंधित केले नसेल तर खाली नमूद केलेल्या बाबी संबंधात कारखान्यांची तपासणी करण्यापुरत्याच मर्यादित राहतील.

स्वच्छता (कलम ११), अतिगर्दी (कलम १६), प्रकाशयोजना (कलम १७) पिण्याचे पाणी (कलम १८), शौचकूपे व मुताऱ्या (कलम १९), थुंकदाने (कलम २०), आगीच्या प्रसंगी बाळगावयाची सावधगिरी (कलम ३८), सुखसोई (प्रकरण ५), प्रौढ व्यक्तींचे कामाचे तास (प्रकरण ६ कलम ६२ च्या परंतुकाखालील माफी देण्याची शक्ती सोडून) तरुण व्यक्तींना कामावर लावणे (प्रकरण ७), वार्षिक वेतनी रजा (प्रकरण ८) व नोटिसा लावणे (कलम १०८).



आणखी असे की–

(एक) जिल्हा दंडाधिकारी या अधिनियमाच्या कलम ११, १७ व ३८
अनुसार कोणतेही मूळ आदेश किंवा अभिप्राय देणार नाही. मात्र त्याचे त्या
कलमाखालील आदेश किंवा अभिप्राय हे पूर्णकालिक कारखाने निरीक्षकाने
कारखान्याच्या व्यवस्थापकाचे किंवा यथास्थिती भोगवटादाराचे लक्ष ज्या मुद्द्या-
कडे अगोदरच वेधलेले असेल त्या पुरतेच मर्यादित किंवा सीमित असतील.

(दोन) जिल्हा दंडाधिकारी संरीक्षणकरून सर्व अपर निरीक्षकांनी उप-
रोल्लेखित कलमांच्या आवश्यकतांचे पालन करण्यास भाग पाडण्यासाठी आढळून
आलेले दोष व सुचवलेल्या उपाययोजना मुख्य निरीक्षकास कळवल्या पाहिजेत.
त्यानंतर मुख्य निरीक्षक प्रत्येक बाबतीत अंतिम आदेश देईल.

१८. प्रमाणक शल्यचिकित्सकाची कर्तव्ये – (१) स्वास्थ्य प्रमाणपत्र
मिळवण्याची ज्यांची इच्छा आहे अशा तरुण व्यक्तींच्या तपासणीच्या व प्रमाण-
पत्राच्या प्रयोजनांसाठी प्रमाणक शल्यचिकित्सकाने अशा व्यक्तींनी उपस्थित
राहावयाची योग्य वेळ व ठिकाण यांची व्यवस्था केली पाहिजे. आणि अशा
व्यवस्थेची लेखी पूर्वसूचना त्याला नेमून दिलेल्या स्थानिक मर्यादेच्या आत
असलेल्या कारखान्यांच्या व्यवस्थापकांना दिली पाहिजे.

(२) प्रमाणक शल्यचिकित्सकाने आपली प्रमाणपत्रे नमुना ६ मध्ये दिली
पाहिजेत. मूळप्रत व स्थळ प्रत भरली पाहिजे. आणि ज्याच्या नावाने ते प्रमाणपत्र
दिले असेल त्या व्यक्तीच्या डाव्या हाताच्या अंगठ्याची निशाणी त्यावर घेतली
पाहिजे. त्यात केलेल्या नोंदीच्या बिनचूकपणाबद्दल आणि तपासणी केलेल्या
व्यक्तीच्या स्वास्थ्याबद्दल खात्री झाल्यावर त्याने मूळ प्रतीवर सही आणि स्थळ-
प्रतीवर आद्याक्षरी केली पाहिजे आणि ज्याच्या नावाने प्रमाणपत्र दिले असेल त्या
व्यक्तीला मूळप्रत दिली पाहिजे. अशाप्रकारे देण्यात आलेली मूळप्रत कलम ६९
अनुसार देण्यात आलेले स्वास्थ्य प्रमाणपत्र असेल. प्रमाणपत्र दिल्यानंतर शल्यचिकि-
त्सकाने कमीत-कमी २ वर्षांच्या मुदतीपर्यंत सर्व स्थळप्रती राखून ठेवल्या पाहिजेत.

(३) जर एखाद्या तरुण व्यक्तीस देण्यात आलेले स्वास्थ्य प्रमाणपत्र हरवले
तर त्याची दुसरी प्रत देण्यासाठी केलेला अर्ज मिळाल्यावर प्रमाणक शल्यचिकि-
त्सकास, त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर त्याची दुसरी प्रत देता येईल.
असा अर्ज, ती तरुण व्यक्ती जेथे कामावर असेल त्या कारखान्याच्या भोगवटादारा
मार्फत सादर करण्यात आला पाहिजे.

(४) (अ) पोटनियम (२) अनुसार देण्यात येणाऱ्या प्रत्येक स्वास्थ्य
प्रमाणपत्रामागे १० रु. फी देय होईल व ती भोगवटादाराला भरावी लागेल.

(ब) पोटनियम (१) अनुसार प्रमाणपत्राच्या दिलेल्या प्रत्येक दुसऱ्या प्रतीमागे १० रु. फी देय होईल व ती भोगवटादाराला भरावी लागेल.

(५) प्रमाणक शल्यचिकित्सकाने, मुख्य निरीक्षकाच्या विनंतीवरून ज्या कोणत्याही कारखान्यात किंवा ज्या वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्यात—

(अ) आजाराची प्रकरणे घडली असतील व ती तेथे चालू असलेल्या वस्तुनिर्माण प्रक्रियेच्या स्वरूपामुळे किंवा तेथे प्रचलित असलेल्या कामाच्या इतर परिस्थितीमुळे घडली असतील असे समजणे वाजवी असेल किंवा,

(ब) चालू असलेल्या वस्तुनिर्माण प्रक्रियेत किंवा त्या प्रक्रियेत वापरलेल्या पदार्थात कोणताही बदल केल्यामुळे किंवा एखादी नवीन वस्तुनिर्माण प्रक्रिया हाती घेतल्यामुळे किंवा एखाद्या वस्तुनिर्माण प्रक्रियेत वापरण्यासाठी एखादा नवीन पदार्थाचा अवलंब केल्यामुळे त्या वस्तुनिर्माण प्रक्रियेत कामावर लावलेल्या कामगारांच्या आरोग्याला हानी पोचण्याचा संभव असेल, किंवा

(क) ज्यामुळे आरोग्याला हानी पोहोचणे संभवनीय आहे अशा कोणत्याही कामावर तरुण व्यक्तींना लावले असेल किंवा लावावयाचे असेल त्यांच्या बाबतीत तो (मुख्य निरीक्षक) सुचवील अशी तपासणी केली पाहिजे. आणि सुचवील असे प्रतिवेदन प्रस्तुत केले पाहिजे.

(६) धोक्याच्या कामासंबंधीच्या नियमात वर्णन केलेल्या प्रक्रियेमध्ये कामावर लावलेल्या व्यक्तींच्या तपासणीच्या प्रयोजनासाठी, प्रमाणक शल्यचिकित्सकाने, अशा धोक्याच्या कामासंबंधीच्या नियमाद्वारे विहित केले असेल अशा अंतरा-अंतराने त्यास नेमून दिलेल्या स्थानिक मर्यादेतील कारखान्यास भेट दिली पाहिजे.

(७) अशा भेटीच्यावेळी प्रमाणक शल्यचिकित्सकाने अशा प्रक्रियामध्ये कामावर लावलेल्या व्यक्तींची तपासणी केली पाहिजे आणि आरोग्य नोंदवही म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नमुना ७ मधील नोंदवहीत आपल्या तपासणीच्या निष्कर्षांची नोंद केली पाहिजे. ही नोंदवही कारखान्याच्या व्यवस्थापकाकडून ठेवली जाईल व प्रमाणक शल्यचिकित्सकास त्याच्या प्रत्येक भेटीच्या वेळी प्रस्तुत केली जाईल.

(८) जर प्रमाणक शल्यचिकित्सकास आपल्या तपासणीचा निष्कर्ष म्हणून असे आढळून येईल की अशा प्रक्रियेत कामावर लावलेली एखादी व्यक्ती वैद्यकीय कारणासाठी त्या प्रक्रियेत काम करण्यास यापुढे योग्य नाही तर त्याने त्यास योग्य वाटेल अशा मुदतीपर्यंत त्या व्यक्तीस त्या प्रक्रियेत काम करण्यापासून निलंबित केले पाहिजे आणि निलंबनानंतर कोणत्याही व्यक्तीस प्रमाण शल्यचिकित्सकाच्या आरोग्य नोंदवहीमधील लेखी मंजुरीशिवाय त्या प्रक्रियेत कामावर लावता कामा नये.



(९) ज्या प्रक्रियेत, एखाद्या व्यक्तीस कामावर लावले असेल किंवा कामावर घेण्याचा संभव असेल अशा कोणत्याही प्रक्रियेची तपासणी करण्यास कारखान्याच्या व्यवस्थापनाने प्रमाणक शल्यचिकित्सकास सवलती दिल्या पाहिजेत.

(१०) कारखान्याच्या व्यवस्थापकाने प्रमाणक शल्यचिकित्सक कारखान्यात करू इच्छीत असलेल्या कोणत्याही वैद्यकीय तपासणीच्या प्रयोजनासाठी (तपासणीच्या वेळी केवळ त्याच्याच वापरासाठी) एका खोलीची तरतूद केली पाहिजे. ही खोली योग्यप्रकारे स्वच्छ केलेली हवेची व प्रकाशाची भरपूर व्यवस्था असलेली आणि एक पडदा, (लेखनसामग्रीसह) एक टेबल व खुर्च्या यांनी सुसज्ज अशी असली पाहिजे.

---

## प्रकरण ३

## आरोग्य

१९. भिंती आणि छते यांची स्वच्छता – अधिनियमाचे कलम पोटकलम (१) खंड (ड) हा यासोबत जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्यास किंवा कारखान्याच्या भागास लागू होणार नाही.

परंतु ते पुसून, धाडून अथवा साफ करून, धूळ झटकून किंवा निर्वात स्वच्छता पद्धतीचा वापर करून किंवा इतर परिणामकारक स्वच्छ स्थितीत ठेवले पाहिजेत :

आणखी असे की उक्त खंड (ड) हा

(एक) उक्त अनुसूचीच्या भाग अ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारखान्याच्या किंवा कारखान्याच्या भागाच्या संबंधात जेथे कामावर लावलेल्या प्रत्येक व्यक्तीसाठी खोलीत नेमून दिलेली घनाकार जागा १५ घनमीटरपेक्षा कमी असेल अशा कामाच्या खोल्यांस;

(दोन) उक्त अनुसूचीच्या भाग बमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारखान्याच्या किंवा कारखान्याच्या भागाच्या संबंधात जेथे कामावर लावलेल्या प्रत्येक व्यक्तीसाठी खोलीत नेमून दिलेली घनाकार जागा ७५ घनमीटरपेक्षा कमी असेल अशा कामाच्या खोल्यांस;

(तीन) इंजीनघरे, ओतणीकामाच्या जागा, जेवणाच्या खोल्या, आहारगृहे, विसाव्याच्या जागा, शिशुगृहे, प्रसाधनकक्ष व विश्रांतीच्या खोल्या व धुण्याच्या जागा यांना आणि;

(चार) जमीन व जिने यापासून ९ मीटरपेक्षा कमी अंतरावर असतील असे भिंतीचे भाग, जाण्यायेण्याचे मार्ग व जिने यांच्या बाजूंना व वरच्या भागांना लागू असण्याचे चालू राहील.

(२) कारखान्याच्या ज्या कोणत्याही भागास पोटनियम (१) च्या आधारे उपखंड (अ) चा कोणताही उपबंध लागू होत असेल किंवा पोटनियम (१) द्वारे फेरफार झाल्याप्रमाणे लागू होत असेल असा कोणताही भाग स्वच्छ स्थितीत ठेवला जात नाही असे मुख्य निरीक्षकास दिसून आल्यास, तो भोगवटादाराला त्या भागास सफेती करण्यास, रंगसफेती करण्यास, धुण्यास, रंगलेपन करण्यास किंवा रोगण लावण्यास भाग पाडण्यासाठी लेखी नोटीस देऊ शकेल. आणि नोटिशीच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत अशा आवश्यक गोष्टींचे पालन करण्यास भोगवटादाराने कसूर केल्यास, मुख्य निरीक्षकाने अन्यथा ठरवले नसेल तर, कारखान्याच्या अशा भागास पोट नियम (१) लागू असण्याचे बंद होईल.

अनुसूची भाग – अ

स्रोत भट्टी

जेथे काचरोगण न लावलेल्या विटा आणि कौले तयार केली जातात अशा विटा आणि कौले तयार करण्याच्या कर्मशाळा

सिमेंटची कर्मशाळा, रसायन शाळा, तांब्याच्या गिरण्या, वायुशाळा, लोखंड व पोलाद गिरण्या, दगड, पाटीचा दगड आणि संगमरवरी दगड कर्मशाळा कारखान्याचे खालील भाग–

फक्त वस्तू साठवण्यासाठीच वापरात यावयाच्या खोल्या. ज्या खोल्यांच्या भिंती किंवा छते यांसाठी जललेपित लोखंड काचरोगण लावलेल्या विटा, काच, पाटीचा दगड, ॲस्बेस्टॉस, जाबू अथवा गवत यांचा वापर केला असेल अशा खोल्या.

जेथे प्रक्रियेमध्ये गरम वाफ सतत निर्माण होते असे भाग कुंचले तयार करण्याच्या कर्मशाळा व्यतिरिक्त, जेथे डांबर किंवा डांबरतेल किंवा तत्सम इतर सामान तयार केले जाते किंवा बऱ्याच्या प्रमाणावर वापरले जाते असे भाग काच घर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काच कारखान्याचे भाग. जेथे ठिसूळ शिसे तयार केले जाते किंवा एखाद्या प्रक्रियेसाठी बऱ्याच्या प्रमाणावर वापरले जाते अशा खोल्या.

जेथे दगडी कोळसा, कोक ऑक्साईड किंवा लोखंड, गेरू, चुना किंवा दगड जमिनीवर भरडला जातो असे भाग

जमिनीपासून निदान ७ मीटरवर असलेले खोल्यांच्या भिंतीचे भाग, विमानने, छते किंवा वरचे भाग.

तेल गिरण्यामधील जमिनीच्या सपाटीपासून १.५ मीटरपेक्षा कमी उंचीच्या आतल्या भिंती चर्मसंस्करणीत ( टॅनरीज ) जेथे आर्द्र प्रक्रिया चालू असेल तेथे जमिनीच्या सपाटीपासून १.५ मीटरपेक्षा कमी उंचीच्या आतील भिंती.



भाग ब

यागे आणि मोटारीचे साठे तयार करण्याच्या कर्मशाळा, बीज निर्मिती किंवा बीजपरिवर्तन केंद्रे.

अभियांत्रिकी कर्मशाळा.

ज्या कारखान्यांत साखर शुद्ध केली जाते किंवा तयार केली जाते असे कारखाने.

पितळीचे ओतकाम चालू असलेल्या ओतशाळा खेरीज करून इतर ओतकाम.

गुळाचे कारखाने, जहाजे बांधण्याचे कारखाने.

कारखान्याच्या ज्या भागात न रंगविलेले किंवा रोगण न लावलेले लाकूड तयार केले जाते ते भाग.

२०. सफेती देणे वगैरेंची नोंद – सफेती देणे, रंगसफेती देणे, रोगण लावणे इत्यादी कामे ज्या तारखांस पार पाडण्यात आली असतील त्या तारखांची नोंद नमुना ८ मधील नोंदवहीत केली पाहिजे.

२१. आवार स्वच्छ ठेवणे – प्रत्येक कारखान्याच्या भोवतालचे आवार कचरा, घाण किंवा दगड-मातीचे ढिगारे यापासून मुक्त अशा आरोग्यकारक व स्वच्छ स्थितीत ठेवले पाहिजेत.

२२. व्यापार व्यवसायातील गाळसाळ व नि:सृते यांची विल्हेवाट लावणे – (१) जलनि:सारणपद्धती सार्वजनिक मलप्रणाल पद्धतीशी जोडण्याचे ठरविले असेल त्या कारखान्याच्या बाबतीत करावयाच्या व्यवस्थेसाठी स्थानिक प्राधिकाऱ्याची पूर्वमान्यता मिळवली पाहिजे.

(२) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या कारखान्यांखेरीज इतर कारखान्यांच्या बाबतीत व्यापार व्यवसायातील गाळसाळ व नि:सृते यांची विल्हेवाट लावण्याकरिता करावयाच्या व्यवस्थेसाठी आरोग्य अधिकाऱ्याची पूर्वमान्यता मिळविली पाहिजे.

सूची

| शुष्क गोलक हवामान सेल्सियस | आर्द्र गोलक हवामान सेल्सियस |
|---|---|
| ३०° ते ४३° | २९° |
| ३५° ते ३९° | २८-५° |
| ४०° ते ४४° | २८° |
| ४५° ते ४७° | २७-५° |

परंतु असे की ड्राईहून काळ्या चढईचे वेष्टन असलेल्या १५ सेंटीमीटर परिघाच्या गोकळ गोलकातील हवामान मोजकाने जर हवामानाचे गणन केले आणि २० मिनिटांपेक्षा कमी नाही येथपर्यंत बेघळणीय स्थितीत ठेवले तर शुष्क गोलकातील हवेचे तपमान वाढते. असे हवामान मोजकातील गणन केलेले हवामान शुष्क गोलकातील जागेत ठेवले पाहिजे.

(३) पोट नियम (१) यात नमूद केलेल्या व्यतिरिक्त इतर कारखान्याच्या संबंधात व्यवसायातील वाळवाळ व निःपुते यांची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करण्यापूर्वी आरोग्याधिकारी यांना पूर्वसंमती मिळविली पाहिजे.

२९. अ. हवामान आणि तपमान (१) हवामान आणि तपमान यांच्या मर्यादा – कोणत्याही कारखान्यात कार्यकक्षेतील कमाल भूपातळीपेक्षा १.५ मीटर उंचीवरील सार्द्र गोलक उष्णतामान ३०° सेल्सियसपेक्षा जास्त असता कामा नये आणि पुरेसे हवामान निदान दर मिनिटाला ३० मीटर असले पाहिजे आणि शुष्क गोलक उष्णतामानाच्या बाबतीत, अशा कार्यकक्षेत अशा उंचीवरील सार्द्रगोलक उष्णतामानाच्या सूचीत दर्शविल्यापेक्षा अधिक असता कामा नये किंवा शुष्क गोलकातील उष्णतामान मोजण्याच्या बाबतीत त्या दोन शुष्क गोलकांत उंचीवर असेल ते परंतु पुढे असे की सार्द्र गोलकाच्या बाहेरील वेष्टनाचे तपमान २७° सेल्सियसपेक्षा जास्त गणन असेल तेव्हा शुष्क गोलकातील सूचीत दिलेले मान्य तपमान तत्समान वाढलेले असते.

परंतु पुढे असे की नविनियमाच्या कलम १५ खाली लागू असणाऱ्या कारखान्याच्या संबंधात आणि कलम १३ चे पोटकलम (i) चे पोट सदर (ii) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अतिरिक्त उष्णतामानात कारखान्याने काम केले जाते किंवा वस्तुउत्पादन होते की जेथे कामगाराला एक तासापेक्षा जास्त अथवा अन्यथा नियमात नमूद केल्यापेक्षा जास्त भोवतालच्या पुरेशा हवामानात मध्यंतराशिवाय काम करावे लागते अशा कारखान्यांसंबंधात, या आवश्यकता लागू केल्या जाता कामा नयेत.

आणखी असे की मुख्यनिरीक्षकाने कामगारांच्या आरोग्याकडे लक्ष देऊन विशेष किंवा अपवादात्मक परिस्थितीत, लेखी आदेश देऊन, कोणताही कारखाना किंवा त्या कारखान्याचा भाग त्याने स्पष्ट केलेल्या असतील त्या अटींच्या अधीन, आधीच्या तरतुदींपासून मुक्त करावा.

(२) थर्मामीटरच्या तरतुदी – (अ) निरीक्षकास जर असे आढळले की कोणत्याही कारखान्यात, कामकक्षेत हवेचे तपमान पुरेशा उंचीवर आणि पोटनियम (१) मध्ये विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त होणे संभवनीय आहे तर त्याने



| शुष्क फुगा (१) | आर्द्र फुगा (२) | शुष्क फुगा (३) | आर्द्र फुगा (४) | शुष्क फुगा (५) | आर्द्र फुगा (६) |
|---|---|---|---|---|---|
| ६०.० | ५८.० | ७७.० | ७५.० | ९४.० | ८६.० |
| ६१.० | ५९.० | ७८.० | ७६.० | ९५.० | ८७.० |
| ६२.० | ६०.० | ७९.० | ७७.० | ९६.० | ८७.५ |
| ६३.० | ६१.० | ८०.० | ७८.० | ९७.० | ८८.० |
| ६४.० | ६२.० | ८१.० | ७९.० | ९८.० | ८८.५ |
| ६५.० | ६३.० | ८२.० | ८०.० | ९९.० | ८९.० |
| ६६.० | ६४.० | ८३.० | ८०.५ | १००.० | ८९.५ |
| ६७.० | ६५.० | ८४.० | ८१.० | १०१.० | ९०.० |
| ६८.० | ६६.० | ८५.० | ८२.० | १०२.० | ९०.० |
| ६९.० | ६७.० | ८६.० | ८२.५ | १०३.० | ९०.५ |
| ७०.० | ६८.० | ८७.० | ८३.० | १०४.० | ९०.५ |
| ७१.० | ६९.० | ८८.० | ८३.५ | १०५.० | ९१.० |
| ७२.० | ७०.० | ८९.० | ८४.० | १०६.० | ९१.० |
| ७३.० | ७१.० | ९०.० | ८४.५ | १०७.० | ९१.५ |
| ७४.० | ७२.० | ९१.० | ८५.० | १०८.० | ९१.५ |
| [illegible] | [illegible] | ९२.० | ८५.५ | १०९.० | ९२.० |

[illegible] किंवा जेथे कार्यकक्षेच्या जागेत आवश्यक हवामानाच्या उपाययोजनेच्या आवश्यकतेची जास्त १८ मीटर उंचीवर किंवा कामाच्या पातळीवरील हवामानाच्या मीटरपेक्षा जास्त उंचीवर किंवा कार्यकक्षेतील हवामान घडणे पुरेशा उंचीवर असल्याबद्दल निरीक्षकाचे मत झाले आणि ते पोट नियम (१) मध्ये विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त असणे संभवनीय असेल, तर यांत्रिकीकरणाने अधिक हवा वेळोविळाने करावे.

(क) तापमान यांत्रिकीकरणाची मूद केलेली हवा कार्यकक्षेतील पर्याप्त क्षमतेच्या मदत पट असली पाहिजे आणि मृत वायू विरघळीशिवाय बाहेरच्या बकालीला विपरीतता न आणता संपूर्ण कार्यकक्षेत तिचे प्रसारण करता आले पाहिजे.

(ड) जेव्हा केव्हा उन्हाळ्यात (१५ मार्च ते १५ जुलै) शुष्क गोलकाचे छायाखालील हवामान, दिवसाच्या जास्त वेळेत ३३ सेल्सियसपेक्षा जास्त होईल आणि त्याच वेळी सार्द्र गोलकाचे हवामान २५ किंवा कमी राहील तेव्हापासून आणि कारखान्याच्या कार्यकक्षेत निर्मिती प्रक्रिया चालू असेल त्या काळात, गोलकातील सार्द्रतेच्या संबंधात पररानित उष्णता ५ प्रतिशत किंवा अधिक असेल तर निरीक्षकाने कारखान्याच्या व्यवस्थापकावर जलफवाऱ्यांच्या मदतीने चालवावी- करणारून किंवा जेथे बाहेरील हवेचा पुरवठा [illegible] केला जातो तेथे [illegible]

परंतु असे की वाहेरून काळ्या चटईचे वेष्टन नसलेल्या १५ सेंटीमीटर परिघाच्या पोकळ गोलकातील हवामान मोजकाने तर हवामानाचे मापन केले आणि २० मिनिटांपेक्षा कमी नाही एवढ्या वेळेपर्यंत वेष्टणीय स्थितीत ठेवले तर शुष्क गोलकातील हवेचे तपमान वाढते. असे हवामान मोजकातील मापन केलेले हवामान शुष्क गोलकातील जागेत ठेवले पाहिजे.

(३) पोट नियम (१) यात नमूद केलेल्या व्यतिरिक्त इतर कारखान्याच्या संबंधात व्यवसायातील वाळवाळ व निःसृते यांची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करण्यापूर्वी आरोग्याधिकारी यांची पूर्वसंमती मिळविली पाहिजे.

२२. अ. हवामान आणि तपमान (१) हवामान आणि तपमान यांच्या मर्यादा – कोणत्याही कारखान्यात कार्यकक्षेतील कमाल भूपातळीपेक्षा १.५ मीटर उंचीवरील शुष्क गोलक उष्णतामान ३०° सेल्सियसपेक्षा जास्त असता कामा नये आणि पुरेसे हवामान निवान दर मिनिटास ३० मीटर असले पाहिजे आणि शुष्क गोलक उष्णतामानाच्या बाबतीत, अशा कार्यकक्षेत अशा उंचीवरील आर्द्रगोलक उष्णतामानाचा सूचीत दर्शविल्यापेक्षा अधिक असता कामा नये किंवा शुष्क गोलकातील उष्णतामान मोजण्याच्या बाबतीत त्या दोन शुष्क गोलकात उंचीवर असेल ते परंतु पुढे असे की आर्द्र गोलकाच्या बाहेरील वेष्टणाने तपमान २७° सेल्सियसपेक्षा जास्त मापन असेल तेव्हा शुष्क गोलकातील सूचीत दिलेले मान्य तपमान ततापान वाढलेले असते.

परंतु पुढे असे की अधिनियमाच्या कलम १५ खाली लागू असणाऱ्या कारखान्याच्या संबंधात आणि कलम १२ चे पोटकलम (i) चे पोट सदर (ii) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अतिरिक्त उष्णतामानात कारखान्याचे काम केले जाते किंवा वस्तुउत्पादन होते की जेथे कामगारास एक तासापेक्षा जास्त अथवा अन्यथा नियमात नमूद केल्यापेक्षा जास्त चोवतालच्या पुरेशा हवामानात मध्यंतराशिवाय काम करावे लागते अशा कारखान्यासंबंधात, या आवश्यकता लागू केल्या जाता कामा नयेत.

आणखी असे की मुख्यनिरीक्षकाने कामगारांच्या आरोग्याकडे लक्ष देऊन विशेष किंवा अपवादात्मक परिस्थितीत, लेखी आदेश देऊन, कोणताही कारखाना किंवा त्या कारखान्याचा भाग त्याने स्पष्ट केल्या असतील त्या अटींच्या अधीन, खालील तरतुदींपासून मुक्त करावा.

(२) थर्मामीटरच्या तरतुदी – (अ) निरीक्षकास जर असे आढळले की कोणत्याही कारखान्यात, कामकक्षेत हवेचे तपमान पुरेशा उंचीवर आणि पोटनियम (१) मध्ये विहित केलेल्या मर्यादांपेक्षा जास्त होणे संभवनीय आहे तर त्याने



कारखाना व्यवस्थापकावर लेखी आदेश बजावून हायग्रोमीटरची पुरेशी यंत्रे किंवा हायग्रोमीटरच्या कोणत्याही प्रकाराची तरतूद करण्यास भाग पाडावे आणि अशा प्रत्येक कार्यकक्षेतील आर्द्र गोलक व शुष्क गोलक यांचे तपमानाची, निरीक्षक संमत करील त्याप्रकारे नोंद करण्याकरिता व्यवस्थापकाने खास नामनिर्देशन केलेल्या व निरीक्षकाने मान्य केलेल्या व्यक्तीकडून केली जावी असा आदेश द्यावा.

(ब) कार्यकक्षेतील भिंतीपासून, छतापासून किंवा इतर भोवताली आतील पोकळीत भरपूर उष्णता वाढली असल्याबद्दल विश्वासार्ह कारण असल्याचे जर निरीक्षकास वाटेल तर त्याने पोट नियम (१) च्या पहिल्या परंतुकात निर्देशिलेल्या उष्णतामापक गोलक (थर्मामीटर) एक किंवा अधिक पुरविण्याबाबत व्यवस्थापकास भाग पाडावे आणि त्याने स्पष्ट केलेल्या ठिकाणी उष्णतामापके ठेवण्याबाबत आणि जागादर्शक हवामान–पुस्तकात हवामानाची हवामान घेतल्या वेळेची नोंद करण्यास भाग पाडावे.

(३) (अ) प्रत्येक कारखान्यात, पोट नियम (ब) अनुसार आवश्यक असणारे यांत्रिक हवामानापेक्षा, तळक्षेत्रातील हवामान १५ प्रतिशतपेक्षा कमी असणार नाही इतके पुरविले असेल त्या व्यतिरिक्त खेळती हवेची द्वारे उघडी असली पाहिजेत व अशाप्रकारे खेळती हवा चालू राहिली पाहिजे.

परंतु असे, की या एकूण खेळत्या हवेच्या क्षेत्रापैकी उंबरठ्याच्या उंचीची पातळी तळपातळीच्या एक मीटरपेक्षा जास्त नाही इतके वातावरणातील हवामान द्वारांची उपर्युक्त १० प्रतिशत समान असली पाहिजे.

परंतु पुढे असे की जर निरीक्षकाची अशी खात्री झाली की कारखान्याची क्षेत्रीय परिस्थिती, कार्यकक्षाची पूर्व दिशा, खिडक्या–छताची उंची आणि तेथे चालू असणारी निर्मिती प्रक्रिया हे लक्षात घेऊन कामाचे जास्त वेळेत कार्यकक्षेत शुद्ध हवेचा पुरेसा पुरवठा होत आहे तर द्वारांच्या उघडिपीबद्दलची आवश्यकता त्याने शिथिल करावी.

परंतु असेही की अधिनियमाच्या कलम १५ खालील तरतुदी लागू असणाऱ्या कार्यकक्षांच्या बाबतीत किंवा ज्यामध्ये हवामान आणि आर्द्रता यावर वातानुकूल आणि शीतकरण किंवा दोन्ही यामुळे नियंत्रित केले असेल त्याबाबतीत या आवश्यकता लागू केल्या जाता कामा नयेत.

(ब) जेव्हा कोणत्याही कारखान्यात छोट इमारत किंवा अंतर्गत आडकाठ्या असे झडपा इ. अशा विशेष परिस्थितीमुळे इमारतीची उंची किंवा

जमिनीपासून पातळी सदर (ब) खालील हवामानाच्या उपविधीच्या आवश्यकतांची पूर्तता कोणत्याही कार्यकक्षेत किंवा जेथे कार्यकक्षेच्या जागेत आवश्यक हवामानाच्या पूर्तता कोणत्याही कार्यकक्षेत किंवा कामाच्या पातळीवरील हवामानाच्या छप्पा १ अथवा १८ मीटर उंचीवर किंवा कामाच्या पातळीवरील हवामान छप्पा पुरेशा उंचीवर मीटरपेक्षा जास्त उंचीवर किंवा कार्यकक्षेतील हवामान छप्पा पुरेशा उंचीवर असल्याबद्दल निरीक्षकाचे मत झाले आणि ते पोट नियम (१) यात विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त असणे संभवनीय असेल, तर यांत्रिकीकरणाने अधिक हवा खेळविण्याचे करावे.

(क) त्यांत यांत्रिकीकरणाची शुद्ध खेळती हवा कार्यकक्षेतील व्यूहिक क्षमतेच्या वहा पट असली पाहिजे आणि मृत वायु विभाग्यांशिवाय वाऱ्याच्या वकातील विपरीतता न आणता संपूर्ण कार्यकक्षेत तिचे प्रसारण करता आले पाहिजे.

(ड) जेव्हा उन्हाळ्यात (१५ मार्च ते १५ जुलै) शुष्क गोलकाचे छपराबाहेरील हवामान, दिवसाच्या जास्त वेळेत ३२ सेल्सियसपेक्षा जास्त होईल आणि त्याच वेळी आर्द्र गोलकाचे हवामान २५ किंवा कमी राहील सेल्सियस आणि आणि त्याच वेळी सर्व गोलकाचे हवामान २५ किंवा कमी राहील त्या जागेत, पोटकलमांतील कारखान्याच्या कार्यकक्षेत निर्मिती प्रक्रिया चालू असेल त्या जागेत, पोटकलमांतील आर्द्रतेच्या संबंधात परवानगी उष्णता ५ प्रतिशत किंवा अधिक असेल तर निरीक्षकाने कारखान्याच्या व्यवस्थापकावर जलफवारणीच्या नळ्यांतून जलबाष्पी-करणातून किंवा जेथे बाहेरील हवेचा पुरवठा नाही पद्धतीच्या यांत्रिकीकरणातून केला जातो तेथे धुळाई भोवऱ्यांतून केंद्रित थंड हवेचा पुरेसा पुरवठा करण्याबाबत आदेश बजावावा.

२३. कृत्रिम आर्द्रीकरण केव्हा अनुमत नसेल — कापसाच्या सूतकताईच्या किंवा विणाईच्या कारखान्यातील कोणत्याही खोलीत—

(अ) त्या खोलीचे शुष्क फुगा उष्णतामान ८९° पेक्षा अधिक असेल अशा कोणत्याही वेळी पाण्याचा उपयोग करून कृत्रिम आर्द्रीकरण करू नये.

(ब) जेव्हा आर्द्रतामापकाचे आर्द्र फुगावाचन हे त्याच वेळच्या आर्द्रता-मापकाच्या शुष्क फुगा वाचनाच्या संबंधाने खालील अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या वाचनाहून अधिक असेल अशा कोणत्याही वेळी किंवा त्या अनुसूचीमध्ये लागोपाठ विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही दोन फुगा वाचनादरम्यानच्या शुष्क फुगा वाचनाच्या वाचनांत, शुष्क फुगा वाचन हे आर्द्र फुगा वाचनाहून या दोन शुष्क फुगा वाचनांपैकी कमी असलेल्या वाचनाच्या संबंधात विनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा अधिक होत असेल अशा कोणत्याही वेळी कृत्रिम आर्द्रीकरण करता कामा नये.



| शुष्क फुगा (१) | आर्द्र फुगा (२) | शुष्क फुगा (३) | आर्द्र फुगा (४) | शुष्क फुगा (५) | आर्द्र फुगा (६) |
|---|---|---|---|---|---|
| ६०.० | ५८.० | ७७.० | ७५.० | ९४.० | ८६.० |
| ६१.० | ५९.० | ७८.० | ७६.० | ९५.० | ८७.० |
| ६२.० | ६०.० | ७९.० | ७७.० | ९६.० | ८७.५ |
| ६३.० | ६१.० | ८०.० | ७८.० | ९७.० | ८८.० |
| ६४.० | ६२.० | ८१.० | ७९.० | ९८.० | ८८.५ |
| ६५.० | ६३.० | ८२.० | ८०.० | ९९.० | ८९.० |
| ६६.० | ६४.० | ८३.० | ८०.५ | १००.० | ८९.५ |
| ६७.० | ६५.० | ८४.० | ८१.० | १०१.० | ९०.० |
| ६८.० | ६६.० | ८५.० | ८२.० | १०२.० | ९०.० |
| ६९.० | ६७.० | ८६.० | ८२.५ | १०३.० | ९०.५ |
| ७०.० | ६८.० | ८७.० | ८३.० | १०४.० | ९०.५ |
| ७१.० | ६९.० | ८८.० | ८३.५ | १०५.० | ९१.० |
| ७२.० | ७०.० | ८९.० | ८४.० | १०६.० | ९१.० |
| ७३.० | ७१.० | ९०.० | ८४.५ | १०७.० | ९१.५ |
| ७४.० | ७२.० | ९१.० | ८५.० | १०८.० | ९१.५ |
| ७५.० | ७३.० | ९२.० | ८५.५ | १०९.० | ९२.० |
| ७६.० | ७४.० | ९३.० | ८६.० | ११०.० | ९२.० |

परंतु, जेव्हा संबंधित विभागातील आर्द्रतामापकाने दर्शविलेले आर्द्रफुगा उष्णतामान आणि बाहेर सावलीत आर्द्रतामापकाने घेतलेले आर्द्रफुगा उष्णतामान यांतील फरक ३.५ अंशापेक्षा कमी असेल तेव्हा खंड (ब) लागू होणार नाही.

२४. आर्द्रतामापकाची तरतूद — कापसाच्या, सूतकताईच्या व विणकामाच्या गिरण्यांतील ज्या विभागात कृत्रिम आर्द्रीकरणाचा वापर करण्यात येत असेल अशा सर्व विभागात आर्द्रतामापकांची तरतूद केली जाईल. आणि निरीक्षकाने मान्यता दिल्याप्रमाणे ती सुस्थितीत राखण्यात येईल. आर्द्रतामापकांची संख्या खालील प्रमाणात विनियमित केली जाईल—

(अ) विणाई विभाग ५०० पेक्षा कमी माग असलेल्या विभागासाठी एक आर्द्रतामापक आणि ५०० हून अधिक असणाऱ्या प्रत्येक ५०० मागांसाठी किंवा ५०० मागांच्या भागासाठी एक जादा आर्द्रतामापक.

(ब) इतर विभाग ८५०० घन मीटरांहून कमी समावेश क्षमता असलेल्या

प्रत्येक खोलीत एक आर्द्रतामापक, आणि याहून अधिक क्षमता असणाऱ्या ५६०० घनमीटरसाठी किंवा त्याच्या भागासाठी आणखी एक आर्द्रतामापक.

(क) जेथे कृत्रिम आर्द्रीकरणाचा वापर केला जात असेल अशा प्रत्येक कापसाच्या, सूतकताईच्या व विणाईच्या कारखान्याबाहेर एक जादा आर्द्रतामापकाची तरतूद करून आर्द्रतामापकाचे सावलीच्या बागेतील वाचन घेण्यासाठी निरीक्षक मान्य करील त्यारीतीने ते सुस्थितीत ठेवले पाहिजे.

२५. आर्द्रतामापक ठेवण्यापासून सूट – नियम २३ ला जोडून असलेल्या अनुसूचीद्वारे ठरवलेल्या आर्द्रीकरणाच्या मर्यादा कधीही ओलांडल्या जात नाहीत असे मुख्य निरीक्षकाची खात्री होईल तेव्हा त्यास विणाई विभागाखेरीज इतर कोणत्याही विभागाला आर्द्रतामापक ठेवण्यापासून सूट देता येईल. निरीक्षकांनी अशी सूट केली नमूद केली पाहिजे.

२६. नियम २३ ला जोडून असलेल्या अनुसूचीची प्रत प्रत्येक आर्द्रतामापकाजवळ लावणे – नियम २३ ला जोडून असलेल्या अनुसूचीची एक सुवाच्य प्रत प्रत्येक आर्द्रतामापकाजवळ लावली पाहिजे.

२७. प्रत्येक आर्द्रतामापकाजवळ उष्णतामानाची नोंद ठेवणे – नियम २४ अनुसार ठेवलेल्या प्रत्येक आर्द्रतामापकाजवळ आर्द्र फुगा आणि शुष्क फुगा उष्णतामानाची अचूक नोंद व्यवस्थापनाने नामनिर्देशित केलेल्या व निरीक्षकाने मान्यता दिलेल्या सक्षम व्यक्तींनी दररोज खिळीच्या मध्यंतराच्या वेळाखेरीज करून कामाच्या तासात घेतली पाहिजे. उष्णतामानाची नोंद ७ म. पू./म. उ ते ९ म. पू./म. उ च्या दरम्यान ११ म. पू./म. उ ते २ म. पू./म. उ च्या दरम्यान ४ म. पू./म. उ ते ५-३० म. पू./म. उ च्या दरम्यान जर या तासात कारखाना चालू असेल तर घेतली पाहिजे. अपवादात्मक परिस्थितीत, निरीक्षकास विनिर्दिष्ट करता येईल अशा तासात अधी अधिक वाचने घेतली पाहिजेत. कारखान्यात, ठेवण्यात आलेल्या नमुना ९ मधील आर्द्रता नोंदवहीत उष्णतामानाची नोंद केली पाहिजे. प्रत्येक महिन्याच्या शेवटी वाचने घेतली असतील अशा व्यक्तींनी या नोंदवहीत सही केली पाहिजे आणि केलेल्या नोंदी अचूक असल्याबद्दल प्रमाणित केले पाहिजे. निरीक्षकाच्या तपासणीसाठी ही नोंदवही नेहमी उपलब्ध असली पाहिजे.

२८. आर्द्रतामापकाचे विनिर्देश – (१) प्रत्येक आर्द्रतामापकात, ठराव्या बनावटीचे आर्द्रफुगा व शुष्कफुगा असलेली आणि आकार, प्रमाण व प्रमाणविभाग समान असलेली २ पाऱ्याची उष्णतामापके अंतर्भूत असली पाहिजेत आणि ती आत पाण्याचा साठा असलेल्या योग्य पात्रासहित चौकटीवर बसविलेली असली पाहिजेत.



(२) आर्द्रफुगा मलमलीच्या एकेरी कापडाने घट्ट आच्छादिला पाहिजे, आणि त्या कापडाला एक वात जोडून ती पात्रात ठेवलेल्या पाण्यात बुडवून ते ओले ठेवण्यात यावे. या प्रयोजनासाठी मलमलीच्या कापडाचे आच्छादन आणि वात स्वच्छ व मळ किंवा चीज न लावलेली असली पाहिजे.

(३) आर्द्र फुग्याचा कोणताही भाग शुष्क फुग्यापासून ७५ मि. मि. पेक्षा कमी अंतरावर असता कामा नये. व पाण्याचे पात्र त्याच्या खाली शुष्क फुग्याच्या उलट बाजूस व त्यापासून दूर असले पाहिजे.

(४) फुगे गोलाकार आणि योग्य परिमाणाचे असले पाहिजेत आणि सर्व बाजूंनी खोलीतील हवा मोकळेपणे त्यास लागली पाहिजे.

(५) नलिकांची भोके अशी असावीत की, पाऱ्याच्या स्तंभाचा अवघी वरचा भाग ५० सें. मी अंतरावर तात्काळ ओळखता येईल.

(६) प्रत्येक उष्णतामापकावर अंशरेखन केलेले असावे म्हणजे ५० पासून १२० अंशापर्यंत उष्णतामानाची अचूक वाचने घेता येतील.

(७) ५० अंशापासून १०० अंशापर्यंतचा प्रत्येक अंश अंशनळीवर आडव्या रेषा काढून स्पष्ट दाखविला पाहिजे आणि प्रत्येक ५ वा व १० वा अंश त्यामधील अंशाच्या खुणाहून अधिक लांब खूण करून दाखविला पाहिजे. आणि प्रत्येक दहाव्या अंकासमोर म्हणजे ५०, ६०, ७०, ८०, ९०, १००, ११० आणि १२० या समोर उष्णतामानाची खूण केलेली असली पाहिजे.

(८) वर सांगितलेल्या खुणा बिनचूक असल्या पाहिजेत, म्हणजे ५० ते १२० अंश दरम्यानच्या कोणत्याही उष्णतामानाच्या वेळी दर्शविलेल्या वाचनात एका अंशाच्या दोन दशांशाहून अधिक चूक येता कामा नये.

(९) व्यवच्छेदक आकडा पुसला जाणार नाही अशा रीतीने उष्णता मापकावर चिन्हित केला पाहिजे.

(१०) प्रत्येक उष्णतामापक बिनचूक असल्याबद्दल लंडन येथील नॅशनल फिजिकल लॅबोरेटरीने किंवा मुख्य निरीक्षकाने नेमलेल्या कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणपत्र दिलेले असले पाहिजे. आणि असे प्रमाणपत्र आर्द्रता नोंदवहीस जोडलेले असले पाहिजे.

२९. उष्णतामापके कार्यक्षम स्थितीत ठेवणे – प्रत्येक उष्णतामापक कामाच्या मुदतीत सर्वेळी बिनचूक आकडे दर्शवील अशा कार्यक्षम चालू स्थितीत ठेवला पाहिजे आणि विशेषत–

(अ) आर्द्र नलिकेची वात आणि मलमलीचे आच्छादन आठवड्यातून एकदा नव्याने बदलण्यात आले पाहिजे.

(ब) पात्रात पाणी भरलेले असले पाहिजे आणि ते दिवसातून एकदा संपूर्णपणे बदलण्यात आले पाहिजे. विवक्षित वस्तीतील कोणत्याही विशिष्ट विरणीत किंवा गिरण्यात, विशुद्ध जलाचा किंवा पावसाच्या पाण्याचा वापर करण्याबाबत मुख्यनिरीक्षक आदेश देऊ शकेल.

(क) कामाच्या मुदतीत वातीवर किंवा आच्छादनावर प्रत्यक्षपणे पाणी टाकता कामा नये.

३०. नवीन प्रमाणपत्राशिवाय चुकीचे उष्णतामापक न वापरणे – निरीक्षकाने उष्णतामापक चिनचूक नसल्याबद्दल केव्हा नोटीस दिल्यास, अशा नोटिशीच्या तारखेपासून एक महिन्यानंतर जोपर्यंत विहित केल्याप्रमाणे त्याची पुन्हा तपासणी करून नवीन प्रमाणपत्र मिळविले जात नाही, तोपर्यंत ते बिनचूक आहे असे समजले जाणार नाही. हे प्रमाणपत्र आर्द्रता नोंदवहीस जोडून ठेवले पाहिजे.

३१. आर्द्रतामापक; लाकडी कडी लावून सुरक्षित केल्याशिवाय, भिंतीला लावणे – (१) कोणतेही आर्द्रतामापक भिंतीपासून, खांबापासून किंवा इतर पृष्ठभागापासून निदान अर्धा इंच लांब आणि प्रत्येक उष्णतामापकाच्या फुग्यापासून निदान १ इंच अंतरावर असलेल्या लाकडी पट्टीने किंवा इतर अवाहक पदार्थाने संरक्षित केले नसेल तर ते अशा भिंतीला, खांबास किंवा पृष्ठभागास लावता कामा नये.

(२) कोणतेही आर्द्रतामापक जमिनीपासून उष्णतामापकाच्या नळीच्या वरील टोकापर्यंत १३० सेंटी मिटराहून अधिक उंचीवर किंवा पंखा खिडकी किंवा हवा खेळण्याची खुली जागा यातून वाऱ्याचा सरळ झोत लागेल अशा रीतीने लावता कामा नये.

३२. पाणी बदलल्यापासून पंधरा मिनिटांच्या आत कोणतेही वाचन न घेणे पात्रातील पाणी बदलल्यापासून पंधरा मिनिटांच्या आत, नोंद करून घेण्यासाठी कोणत्याही आर्द्रतामापकावरील वाचन घेता कामा नये.

३३. आर्द्रीकरणासाठी वाफ कशी सोडावी? – ज्या कोणत्याही खोलीतील हवेच्या कृत्रिम आर्द्रीकरणाच्या प्रयोजनासाठी वाफ सोडण्याकरिता वाफेच्या नळांचा वापर केला जातो त्या खोलीला खालील उपबंध लागू होतील.

(अ) अशा नळाचा व्यास ५५ मि. मि. हून अधिक असता कामा नये. व दिनांक १ जानेवारी १९५० नंतर बसविण्यात आलेल्या नळांच्या बाबतीत त्यांचा व्यास २५ मि. मि. हून अधिक असता कामा नये.

(ब) असे नळ व्यवहारीत्या शक्य असेल तितके लांबून असले पाहिजेत.



(क) अशा नळांना आधार देणारे सर्व आलंबक (हँगर्स) निदान १५ मि. मि. जाडीचे कार्यक्षम विसंवाहक (इन्सुलेटर) घालून उघड्या नळांपासून अलग ठेवण्यात आले पाहिजेत.

(ड) अशा नळांवर अनाच्छादित असा कोणताही फवारा कोणत्याही आच्छादनाच्या बाहेरील भागाच्या पलीकडे १०० मि. मि. हून जास्त पुढे येता कामा नये.

(इ) वाफेचा दाब शक्य तितकाच कमी असला पाहिजे. व प्रत्येक चौरस सेंटीमीटरमागे ५ कि. ग्रॅमहून अधिक असता कामा नये.

(फ) हवेत वाफ सोडण्यासाठी एखाद्या विभागात वापरलेला नळ, निरीक्षक मान्य करील अशा अवाहक पदार्थाने परिणामकारक रीतीने झाकला पाहिजे.

३४. प्रकाश योजना नियम लागू करणे व त्यांची सुरुवात – ह्या नियमात तरतूद केल्याप्रमाणे अधीन राहून ज्या कारखान्यात एखाद्या वस्तुनिर्माण प्रक्रियेत किंवा प्रक्रियेत कामगारांना नियमितपणे ४८ तासांहून जास्त वेळ किंवा पाळीने कामावर लावण्यात येत असेल अशा कारखान्यांना नियम ३४ ते ३८ लागू होतील. परंतु, या नियमातील कोणत्याही गोष्टींमुळे मुख्य निरीक्षकाच्या मते जेथे विनिर्दिष्ट प्रमाणाइतक्या प्रकाश योजनेच्या तरतुदीचे पालन करणे व्यवहारीत्या व्यवहार्य होणार नाही अशा रीतीने बांधण्यात आलेल्या कोणत्याही इमारतीत किंवा संरचनेत अशा प्रकारची तरतूद करणे आवश्यक समजले जाणार नाही.

(२) नियम ३४ ते ३८ हे, कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्याच्या संबंधात, राज्यशासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे याबाबत नेमील अशा तारखेस अमलात येईल.

३५. आतील भागातील प्रकाशयोजना – (१) कारखान्याच्या ज्या कोणत्या भागात व्यक्तींना नियमितपणे कामावर लावण्यात येते तेथील सर्व साधारण प्रकाश जमिनीपासून ९० से. मी उंचीच्या पातळीवर समांतर पातळीत मोजलेल्या ३० प्रमाण दीपाहून कमी असता कामा नये;

परंतु, जेथे प्रकाशसाधनांची किंवा सर्वसाधारण प्रकाशाची जमिनीपासून मोजलेली जास्तीत–जास्त उंची ७.५ मिटरहून अधिक असेल किंवा जेथे खोलीची बांधणी किंवा कायम बसविलेली यंत्रसामग्री किंवा संयंत्र यांचे ठिकाण किंवा त्यांची रचना यामुळे हे प्रमाण समान ठेवणे शक्य होत नसेल, तेथे, उक्त पातळीवरील सर्वसाधारण प्रकाश १० प्रमाणदीपाहून कमी असता कामा नये आणि जेथे काम प्रत्यक्ष चालू आहे तेथील प्रकाश ३० प्रमाणदीपाहून कमी असता कामा नये.

(२) कारखान्याच्या ज्या भागात कामावर लावलेल्या व्यक्ती जात येत असतील अशा सर्व आतील भागातील सर्वसाधारण प्रकाश जेव्हा तेथून एखादी व्यक्ती जात येत असेल तेव्हा जमिनीच्या पातळीवर ५ प्रमाणदीपाहून कमी असता कामा नये.

(३) कापूस वटन गिरणीच्या आतील भागात कृत्रिम प्रकाशयोजनेची आवश्यकता असेल व सामान्यतः ती वापरात असेल त्या त्या वेळी पुढील प्रमाणास अनुसरून कृत्रिम प्रकाश योजनेची तरतूद करण्यात आली पाहिजे व तिचा वापर करण्यात आला पाहिजे.

(एक) विद्युत वापर करताना, निरीक्षकाची खात्री होईल अशा रीतीने, प्रत्येक ६ वटन यंत्रांसाठी ज्याची शक्ती २५ मेणवत्त्यांहून कमी नाही असा एक दिवा किंवा,

(दोन) निरीक्षकाने मान्यता दिलेल्या नमुन्याच्या काचेच्या कंदिलाचा मेणबत्त्या ठेवून वापर करताना प्रत्येक २ वटन यंत्रांसाठी अशा प्रकारचा किमान एक कंदील.

(४) या नियमात विनिर्दिष्ट केलेले प्रमाण, कामाच्या स्वरूपासाठी पुरेसा व योग्य प्रकाश मिळावा यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही जादा प्रकाशाची तरतूद करण्यास त्यामुळे बाध येणार नाही असे असले पाहिजे.

३६. प्रकाशाचा झोत येण्यास प्रतिबंध – (१) कारखान्यातील कृत्रिम प्रकाशाचे कोणतेही साधन जमिनीच्या पातळीपासून ५ मिटरपेक्षा कमी उंचीवर असेल तेव्हा, प्रकाशसाधनाचा किंवा प्रकाशयोजनेसाठी वापरलेल्या जोडकामाचा ५ लॅवर्टहून अधिक चकाकी असलेला कोणताही भाग, डोळ्यापासून, प्रकाशाच्या साधनापर्यंतचा किंवा यथास्थिती जोडकामाच्या भागापर्यंत उंचीचा कोन २०° पेक्षा अधिक असेल ते खेरीज करून प्रकाशाच्या साधनापासून ३० मीटरच्या आत नेहमी प्रमाणे कामावर असलेल्या व्यक्तींना दिसता कामा नये.

(२) कोणत्याही प्रकाशाच्या, म्हणजे विशेषकरून एखादा कामगार किंवा एकमेकांजवळ काम करणाऱ्या कामगारांचा लहान गट, यांच्या कामाची जागा किंवा त्या जागेचा एखादा भाग प्रकाशित करण्याकरिता असलेल्या कृत्रिम प्रकाशाच्या बाबतीत, प्रकाशाचा झोत येण्यास प्रतिबंध करण्याकरिता योग्य असे अपारदर्शक वस्तूचे छायक (शेड) किंवा नेहमीच्या काम करण्याच्या जागेवर कामावर लावलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या डोळ्यासमोर प्रकाशसाधन पूर्णपणे राहील अशा इतर परिणामकारक उपायांची तरतूद केली पाहिजे किंवा ते अशा रीतीने ठेवले पाहिजे की, त्याचा झोत अशा कोणत्याही व्यक्तीच्या डोळ्यांवर येणार नाही.



३७. मुख्य निरीक्षकाची सूट देण्याची शक्ती – कोणत्याही विवक्षित कारखान्यासंबंधात किंवा त्याच्या भागासंबंधात किंवा कामाच्या खोलीच्या किंवा प्रक्रियेच्या कोणत्याही प्रकारासंबधात नियम ३४ ते ३६ यातील कोणतीही आवश्यक गोष्ट अयोग्य आहे किंवा वाजवी रीतीने व्यवहार्य नाही अशी मुख्य निरीक्षकाची खात्री झाल्यास त्याला, लेखी आदेशाद्वारे त्या कारखान्यास किंवा त्याच्या भागास किंवा कामाच्या खोलीच्या किंवा प्रक्रियेच्या प्रकारास अशा आवश्यक गोष्टींपासून तो विनिर्दिष्ट करू शकेल त्या अवधिपर्यंत व त्या शर्तींच्या अधीन राहून सूट देता येईल.

३८. नियम ३५ पासून सूट – (१) नियम ३५ मधील कोणतीही गोष्ट, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या पहिल्या भागात विनिर्दिष्ट केलेल्या कारखान्याच्या भागास लागू होणार नाही.

(२) नियम ३५ चा पोटनियम (१) यामधील कोणताही मजकूर, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या दुसऱ्या भागात विनिर्दिष्ट केलेल्या कारखान्याच्या भागास लागू होणार नाही.

३९. पिण्याच्या पाण्याचे परिमाण – प्रत्येक कारखान्यात कामगारांना पुरवावयाच्या पिण्याच्या पाण्याचे परिमाण, प्रत्येक कामगारामागे दररोज कमीत-कमी ५ लिटर इतके असले पाहिजे आणि हे पिण्याचे पाणी कामाच्या तासात सर्व वेळा चटकन मिळण्याजोगे असले पाहिजे.

४०. पाणी पुरवठ्याचे मार्ग – पिण्यासाठी तरतूद करण्यात येणाऱ्या पाण्याचा पुरवठा–

(अ) सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेत जोडण्यात आलेल्या तोट्यांतून किंवा

(ब) आरोग्य अधिकाऱ्याने लेखी मान्यता दिलेल्या इतर मार्गांपासून केला पाहिजे.

४१. पाण्याचा साठा – जर सतत चालू असलेल्या सार्वजनिक पाणीपुरवठा-योजनेत जोडण्यात आलेल्या तोट्यांतून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात नसेल तर असे पाणी सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था असलेल्या सावलीच्या जागेत उंच चबुतऱ्यावर तोट्या लावलेल्या व फुटू जाणार नाही अशा रीतीने बंद केलेल्या योग्य भांड्यांमध्ये ठेवले पाहिजे. अशी भांडी नेहमी अत्यंत काळजीपूर्वक स्वच्छ राखली पाहिजेत. व त्यात रोज निदान एकदा नवीन पाणी भरले पाहिजे. जेथे नलिकाकूपांतून पाणी काढण्यात येत असेल तेथे असे पाणी पुरवठ्याच्या तोट्यांतून परस्पर भांड्यात नेता येईल.

४२. विहिरी किंवा जलाशय यांची स्वच्छता – (१) कोणतीही उपवी

विहीर किंवा जलाशय रासायनिक द्रव्ये, जंतू आणि इतर अशुद्ध द्रव्ये यामुळे पाणी दूषित होण्याच्या शक्यतेपासून मुक्त राहील अशा रीतीने बांधलेला, अशा जागी असलेला, सुरक्षित केलेला व सुस्थितीत ठेवलेला नसेल तर, त्यामधून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करू नये. करता कामा नये.

(२) जेथे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, अशा विहिरीतून अथवा जलाशयातून केला जात असेल तेथे आठवड्यातून एकदा किंवा निरीक्षक लेखी आदेशाद्वारे तसे करण्यास सांगेल तर त्यातील पाणी वारंवार निर्जंतुक केले पाहिजे. ज्या तारखेस पाणी निर्जंतुक करण्यात आले असेल त्या तारखेची नोंद ठेवली पाहिजे.

परंतु, कोणत्याही विहिरीतील किंवा जलाशयातील पाण्याच्या वापरासाठी पुरवठा करण्यात येण्यापूर्वी आरोग्य अधिकाऱ्याची खात्री होईल, अशारीतीने ते गाळून घेतले असेल व त्यावर संस्कार केले असतील तर, ही आवश्यक बाब अशा कोणत्याही विहिरीला किंवा जलाशयाला लागू होणार नाही.

४३. आरोग्य अधिकाऱ्याकडील अहवाल – निरीक्षकास लेखी आदेशाद्वारे तो निदेश देईल अशा वेळी किंवा अशा मुदतीने कामगारांना पुरविलेले पाणी मानवी वापरासाठी योग्य असण्याबद्दलचा आरोग्य अधिकाऱ्याचा अहवाल मिळ-विण्यास आणि प्रत्येक बाबतीत असा अहवाल आरोग्य अधिकाऱ्याकडून मिळताच त्याची एक प्रत निरीक्षकाकडे सादर करण्यास व्यवस्थापकाला निदेश देता येईल.

४४. पाणी केंद्रे – सामान्यतः जेथे २५० हून अधिक कामगार कामावर असतील अशा कारखान्यात–

(अ) कामगारांना पुरविले जाणारे पिण्याचे पाणी दरवर्षी १ मार्चपासून ३० नोव्हेंबरपर्यंत बर्फाचा वापर करून किंवा इतर परिणामकारक पद्धतीने थंड केलेले असले पाहिजे.

मात्र, पिण्याच्या पाण्यात बर्फ टाकलेला असल्यास तो स्वच्छ केलेला व आरोग्यदायक असला पाहिजे. आणि आरोग्य अधिकाऱ्याने लेखी मान्यता दिलेल्या ठिकाणाहूनच आणलेला असला पाहिजे.

(ब) (एक) थंड केलेले पिण्याचे पाणी, आहारगृहे, जेवणाच्या खोल्या आणि विश्रांतीच्या खोल्या यांमध्ये तसेच संपूर्ण कारखान्यात, या नियमाच्या प्रयोजनासाठी ज्यांना पाणी केंद्रे म्हणून संबोधण्यात येईल, अशा सोईस्कर व सुगम ठिकाणी पुरविण्यात आले पाहिजे.

(दोन) कारखान्यात एकापेक्षा अधिक मजले असल्यास प्रत्येक मजल्यावर कमीत कमी एक पाणी केंद्र असावे.



(क) पाणी केंद्रे हवेपासून सुरक्षित असली पाहिजेत आणि तेथे सांडपाणी वाहून जाण्याची पुरेशी सोय असली पाहिजे.

(ड) (एक) तरतूद करावयाच्या पाणी केंद्रांची संख्या, कारखान्यात कोणत्याही एका वेळी कामावर लावलेल्या प्रत्येक १५० कामगारांमागे किंवा त्याच्या भागामागे एक 'पाणी केंद्र' अशी असली पाहिजे.

परंतु, जेथे कामावर लावलेल्या कामगारांची संख्या ४५० हून अधिक असेल अशा कारखान्यांच्या बाबतीत वर म्हटल्याप्रमाणे पहिल्या ४५० पर्यंत प्रत्येक १५० कामगारांसाठी एक आणि त्यानंतर प्रत्येक ४५० कामगारांसाठी किंवा त्याच्या भागासाठी एक 'पाणी केंद्र' असल्यास पुरेसे होईल. आणि कामगारांची संख्या मोजताना दिवसातून कोणत्याही वेळेस काम करीत असलेल्या कामगारांची जास्तीत जास्त संख्या विचारात घेतली पाहिजे.

(दोन) जेथे पिण्याच्या पाण्याची तरतूद, तोट्यांपासून किंवा कारंज्यातून (ड्रिंकींग फौंटेन्स) केली जात असेल तेथे प्रत्येक पाणी केंद्राला अशा कमीत-कमी ६ तोट्या किंवा कारंजी असली पाहिजेत. तोट्या किंवा कारंजी यामध्ये निदान ६० सें. मी. अंतर असले पाहिजे. आणि सांडलेले पाणी वाहून जाण्यासाठी खळगे असले पाहिजेत. तोटीजवळचे खळगे, भिंती आणि चबुतरे झिलईदार फरशीचे बनविलेले असले पाहिजेत.

परंतु, ज्या कारखान्यात ठिकठिकाणी कारंजी लावलेल्या यांत्रिक प्रशीतकांची तरतूद केली असेल तेथे उपखंड (१) मध्ये विहित केलेल्या संख्येत पाणी केंद्रांची तरतूद केली असली तर, जोपर्यंत तरतूद केलेल्या कारंज्यांची एकूण संख्या विहित प्रमाणानुसार असेल तोपर्यंत पाणी केंद्रांची संख्या वरील उपखंड (१) मध्ये विहित केलेल्या प्रमाणानुसार नसली तरी चालेल.

(इ) (एक) प्रत्येक 'पाणी केंद्र' स्वच्छ आणि सुस्थितीत ठेवले पाहिजे.

(दोन) प्रत्येक 'पाणी केंद्र' योग्य व्यक्तीच्या ताब्यात असले पाहिजे आणि त्या व्यक्तीने पाण्याचे वाटप केले पाहिजे आणि कामावर असताना त्याला स्वच्छ कपडे पुरविण्यात आले पाहिजेत.

मात्र, ज्या कारखान्यात यांत्रिक प्रशीतकांची व तोट्यांची तरतूद, मुख्य निरीक्षकाची खात्री होईल अशा रीतीने करण्यात आली असेल अशा कारखान्यांच्या संबंधात, व्यवस्थापकाने अर्ज केल्यानंतर त्याला योग्य वाटतील अशा शर्तींवर उप-खंड (१) च्या तरतुदींपासून सूट देता येईल.

४५. शौचकूपांची सोय – प्रत्येक कारखान्यात खालील प्रमाणात शौचकूपांची सोय केली पाहिजे.

(अ) जेथे स्त्रिया कामावर लावलेल्या असतील तेथे प्रत्येक २५ स्त्रियांसाठी एक शौचकूप असला पाहिजे.

(ब) जेथे पुरुष कामावर लावलेले असतील तेथे प्रत्येक २५ पुरुषांसाठी एक शौचकूप असला पाहिजे. परंतु, कामावर लावलेल्या पुरुषांची संख्या १०० पेक्षा अधिक असेल तेथे पहिल्या १०० पुरुषांपर्यंत प्रत्येक २५ पुरुषांसाठी एक आणि त्यानंतरच्या प्रत्येक ५० पुरुषांसाठी एक शौचकूप असला तरी पुरेसे होईल.

या नियमान्वये आवश्यक असलेल्या शौचकूपांची संख्या मोजताना यथास्थिती २५ किंवा ५० पेक्षा कमी कामगारांची कोणतीही विषमसंख्या २५ किंवा ५० म्हणून प्रगण्यात येईल. आणि विचारात घ्यावयाची कामगारांची संख्या ही दिवसा कोणत्याही वेळी कामावर लावलेल्या कामगारांची कमाल संख्या असेल.

४६. शौचकूप आडोशाच्या जागी असणे – प्रत्येक शौचकूप झाकलेला असला पाहिजे आणि आडोसा निर्माण होईल अशा रीतीने विभाजित केलेला असला पाहिजे. तसेच त्यास योग्य दरवाजे आणि फिळण्या बसविलेल्या असल्या पाहिजेत.

४७. फलक लावणे – जेथे स्त्री आणि पुरुष कामगार कामावर लावलेले असतील तेथे प्रत्येक शौचकूपाबाहेर बहुसंख्य कामगारांना समजेल अशा भाषेत, यथास्थिती 'फक्त स्त्रियांकरिता' किंवा 'फक्त पुरुषांकरिता' असा फलक लावला पाहिजे. अशा सूचनाफलकावर यथास्थिती पुरुषाची किंवा स्त्रीची आकृती असली पाहिजे.

४८ मुताऱ्यांची सोय – एकाच वेळी कामावर लावलेल्या ५० पुरुष कामगारांकरिता किंवा त्यांच्या भागा करिता निदान एक मुती असली पाहिजे. परंतु जेथे कामावर लावलेल्या पुरुषांची संख्या ५०० पेक्षा अधिक असेल तेथे पहिल्या ५०० पर्यंत प्रत्येक ५० कामगारांकरिता एक मुती व त्यापुढील प्रत्येक १०० कामगाराकरिता किंवा त्यांच्या भागाकरिता एक मुती असली तरी पुरेसे होईल.

४९ सार्वजनिक आरोग्याच्या आवश्यकतेनुरूप शौचकूप व मुत्र्या – कार्यक्षम रीतीने पाणी वाहून नेणाऱ्या मलप्रवाह पद्धतीशी जोडलेले शौचकूप व मुत्र्या सोडून, इतर शौचकूप व मुत्र्या ह्या सार्वजनिक आरोग्य प्राधिकाऱ्यांनी ठरविलेल्या आवश्यकतेनुरूप असल्या पाहिजेत.

५० विवक्षित शौचकूप व मुत्र्या मलप्रवाह पद्धतीशी जोडलेल्या असणे – जेथ एखाद्या नगरपालिकेत कोणत्याही विशिष्ट वसतिस्थानाकरिता निश्चित पाणी पुरवठा असलेल्या भूमिगत सार्वजनिक मलप्रवाह पद्धतीची तरतूद केलेली असेल,



तेथे अशा व अतीव असलेल्या कारखान्यांतील सर्व शौचकूप व ... कारखाना विद्यमान मलप्रवाहापासून ३० मीटरच्या आत असलेला ... मलप्रवाह पद्धतीशी जोडलेल्या असल्या पाहिजेत.

५१ शौचकूप व मुत्र्या यांची सफेती, रंगसफेती – प्रत्येक शौचकूप व मुत्री यांच्या भिंती, छते आणि विभाजन यांना सफेती व रंग सफेती केली पाहिजे आणि प्रत्येक चार महिन्यांतून कमीत कमी एकदा पुन्हा नवी सफेती व रंगसफेती केली पाहिजे. सफेती किंवा रंगसफेती ज्या तारखांस केली असेल त्या तारखांची नोंद नमुना ८ मधील विहित नोंद वहीत केली पाहिजे.

परंतु असे, की ज्या शौचकूपाच्या व मुत्र्यांच्या भिंती, छते किंवा विभाजने ही त्यांच्या पृष्ठभाग गुळगुळीत झिलईदार व अभेद्य असावा म्हणून झिलई दिलेल्या फरशीची केलेली असतील किंवा अन्य रीतीने तयार केलेली नसतील तर अशा शौचकूपांना व मुत्र्यांना हा नियम लागू असणार नाही आणि तो पृष्ठभाग स्वच्छ करणाऱ्या किंवा जंतुनाशक अशा योग्य पदार्थांनी प्रत्येक चार महिन्यांच्या मुदतीत निदान एकदा धुतली पाहिजेत.

५२. गटारे बांधणे व ती सुस्थितीत ठेवणे – केरकचरा किंवा सांडपाणी वाहून नेणारी सर्व गटारे चिरेबंदी किंवा इतर अभेद्य सामग्रीने बांधली असली पाहिजेत आणि त्यांतून नियमितपणे जोराने पाणी सोडले पाहिजे आणि अशी गटारे जलनिःसारण व्यवस्थेशी जोडून सांडपाण्याची विल्हेवाट लावली पाहिजे.

परंतु असे की जेथे अशा प्रकारची जलनिःसारणाची व्यवस्था नसेल, तेथे सांडपाणी विसंक्रमित आणि निष्प्रदर्श करून नंतर आरोग्य अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा योग्य प्रकारे त्याची विल्हेवाट लावली पाहिजे.

५३. शौचकूपांकरिता पाण्याच्या तोट्या – अशा शौचकूपाच्या जागेत किंवा त्या जागेजवळ सोयीस्करपणे जाता येईल अशा ठिकाणी पाण्याच्या तोट्यांची तरतूद केली पाहिजे. प्रत्येक १० शौचकूपांसाठी किंवा त्याच्या भागासाठी कमीत कमी एक तोटी असली पाहिजे. कामगारांना कारखान्यात असताना कामाच्या तासांत सर्व वेळी या तोट्यांचे पाणी मिळू शकेल अशा रीतीने या तोट्या नगरपालिका पाणीपुरवठ्यास किंवा वर पुरेशा प्रमाणात पाण्याचा साठा असलेल्या टाकीस जोडलेल्या असल्या पाहिजेत.

५४. थुंकपात्रांची संख्या व स्थान – तरतूद करावयाच्या थुंकपात्रांची संख्या व स्थाने निरीक्षकाचे समाधान होईल असे असले पाहिजे. अशी थुंकपात्रे ९० सें. मी. उंचीच्या तिपाईवर किंवा तिफाटण्यावर ठेवली पाहिजेत.

(अ) जेथे स्त्रिया कामावर लावलेल्या असतील तेथे प्रत्येक २५ स्त्रियांसाठी एक शौचकूप असला पाहिजे.

(ब) जेथे पुरुष कामावर लावलेले असतील तेथे प्रत्येक २५ पुरुषांसाठी एक शौचकूप असला पाहिजे. परंतु, कामावर लावलेल्या पुरुषांची संख्या १०० पेक्षा अधिक असेल तेथे पहिल्या १०० पुरुषांपर्यंत प्रत्येक २५ पुरुषांसाठी एक आणि त्यानंतरच्या प्रत्येक ५० पुरुषांसाठी एक शौचकूप असला तरी पुरेसे होईल.

या नियमान्वये आवश्यक असलेल्या शौचकूपांची संख्या मोजताना यथास्थिती २५ किंवा ५० पेक्षा कमी कामगारांची कोणतीही विषमसंख्या २५ किंवा ५० म्हणून धरण्यात येईल. आणि विचारात घ्यावयाची कामगारांची संख्या ही दिवसा कोणत्याहीवेळी कामावर लावलेल्या कामगारांची कमाल संख्या असेल.

४६. शौचकूप आडोशाच्या जागी असणे – प्रत्येक शौचकूप झाकलेला असला पाहिजे आणि आडोसा निर्माण होईल अशा रीतीने विभाजित केलेला असला पाहिजे. तसेच त्यास योग्य दरवाजे आणि खिळण्या बसवलेल्या असल्या पाहिजेत.

४७. फलक लावणे – जेथे स्त्री आणि पुरुष कामगार कामावर लावलेले असतील तेथे प्रत्येक शौचकूपाबाहेर बहुसंख्य कामगारांना समजेल अशा भाषेत, यथास्थिती 'फक्त स्त्रियांकरिता' किंवा 'फक्त पुरुषांकरिता' असा फलक लावला पाहिजे. अशा सूचनाफलकावर यथास्थिती पुरुषाची किंवा स्त्रीची आकृती असली पाहिजे.

४८ मुताऱ्यांची सोय – एकाच वेळी कामावर लावलेल्या ५० पुरुष कामगारांकरिता किंवा त्यांच्या भागा करिता निदान एक मुतारी असली पाहिजे. परंतु जेथे कामावर लावलेल्या पुरुषांची संख्या ५०० पेक्षा अधिक असेल तेथे पहिल्या ५०० पर्यंत प्रत्येक ५० कामगारांकरिता एक मुतारी व त्यापुढील प्रत्येक १०० कामगारांकरिता किंवा त्यांच्या भागाकरिता एक मुतारी असली तरी पुरेसे होईल.

४९. सार्वजनिक आरोग्याच्या आवश्यकतेनुरूप शौचकूप व मुताऱ्या – कार्यक्षम रीतीने पाणी वाहून नेणाऱ्या मलप्रवाह पद्धतीशी जोडलेले शौचकूप व मुताऱ्या सोडून, इतर शौचकूप व मुताऱ्या हुया सार्वजनिक आरोग्य प्राधिकाऱ्यांनी ठरविलेल्या आवश्यकतेनुरूप असल्या पाहिजेत.

५० विवक्षित शौचकूप व मुताऱ्या मलप्रवाह पद्धतीशी जोडलेल्या असणे – जेव्हा एखाद्या नगरपालिकेत कोणत्याही विशिष्ट वसतिस्थानाकरिता निर्विघ्न पाणी पुरवठा असलेल्या भूमिगत सार्वजनिक मलप्रवाह पद्धतीची तरतूद केलेली असेल,



तेथे अशा व अतीव असलेल्या कारखान्यांतील सर्व शौचकूप व मुताऱ्या जर तो कारखाना विद्यमान मलप्रवाहापासून ३० मीटरच्या आत वसलेला असेल तर त्या मलप्रवाह पद्धतीशी जोडलेल्या असल्या पाहिजेत.

५१ शौचकूप व मुताऱ्या यांची सफेती, रंगसफेती – प्रत्येक शौचकूप व मुतारी यांच्या भिंती, छते आणि विभाजन यांना सफेती व रंग सफेती केली पाहिजे आणि प्रत्येक चार महिन्यांतून कमीत कमी एकदा पुन्हा अशी सफेती व रंगसफेती केली पाहिजे. सफेती किंवा रंग सफेती ज्या तारखांस केली असेल त्या तारखांची नोंद नमुना ८ मधील विहित नोंद वहीत केली पाहिजे.

परंतु असे, की ज्या शौचकूपाच्या व मुताऱ्याच्या भिंती, छते किंवा विभाजने, ही त्यांच्या पृष्ठभाग गुळगुळीत झिलईदार व अभेद्य असावा म्हणून झिलई दिलेल्या फरशींनी केलेली असतील किंवा अन्य रीतीने तयार केलेली असतील तर अशा शौचकूपांना व मुताऱ्यांना हा नियम लागू असणार नाही आणि तो पृष्ठभाग स्वच्छ करणाऱ्या किंवा जंतुनाशक अशा योग्य पदार्थांनी प्रत्येक चार महिन्याच्या मुदतीत निदान एकदा धुतली पाहिजेत.

५२. गटारे बांधणे व ती सुस्थितीत ठेवणे – मैलकचरा किंवा सांडपाणी वाहून नेणारी सर्व गटारे चिरेबंदी किंवा इतर अभेद्य सामग्रीने बांधली असली पाहिजेत आणि त्यांतून नियमितपणे जोराने पाणी सोडले पाहिजे आणि अशी गटारे जलनिःसारण व्यवस्थेशी जोडून सांडपाण्याची विल्हेवाट लावली पाहिजे.

परंतु असे की जेथे अशा प्रकारची जलनिःसारणाची व्यवस्था नसेल, तेथे सांडपाणी निर्गंधित आणि निरुपद्रवी करून नंतर आरोग्य अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा योग्य प्रकारे त्याची विल्हेवाट लावली पाहिजे.

५३. शौचकूपाकरिता पाण्याच्या तोट्या – अशा शौचकूपाच्या जागेत किंवा त्या जागेजवळ सोयीस्करपणे जाता येईल अशा ठिकाणी पाण्याच्या तोट्यांची तरतूद केली पाहिजे. प्रत्येक १० शौचकूपांसाठी किंवा त्यांच्या भागासाठी कमीत कमी एक तोटी असली पाहिजे. कामगारांना कारखान्यात असताना कामाच्या तासांत सर्व वेळी या तोट्यांचे पाणी मिळू शकेल अशा रीतीने या तोट्या नगरपालिका पाणीपुरवठ्यास किंवा वर पुरेसा प्रमाणात पाण्याचा साठा असलेल्या टाकीस जोडलेल्या असल्या पाहिजेत.

५४. थुंक पात्रांची संख्या व स्थान – तरतूद करावयाच्या थुंकपात्रांची संख्या व स्थाने निरीक्षकाचे समाधान होईल असे असले पाहिजे. अशी थुंकपात्रे ९० सें. मी. उंचीच्या तिपाईवर किंवा तिकाटण्यावर ठेवली पाहिजेत.

५५. थुंकदाण्यांचे प्रकार – थुंकदाणे खालीलपैकी कोणत्याही एका प्रकारची असली पाहिजेत–

(अ) निमुळते, वाडग्याच्या आकाराचे, झाकण असलेले, जस्त विलेपित, लोखंडी पात्र अशा पात्रात जंतुनाशक द्रवाचा थर नेहमी असला पाहिजे. किंवा,

(ब) कोरडी स्वच्छ वाळू भरलेले आणि ब्लीचिंग पावडरच्या थराने व्याप्त असे पात्र; किंवा.

(क) मुख्य निरीक्षकाने मान्य केलेले इतर कोणत्याही प्रकारचे पात्र.

५६. थुंकदाण्यांची स्वच्छता – नियम ५५ च्या खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेली थुंकदाणे दिवसातून निदान एकदा तरी रिकामी केली पाहिजेत व जंतुनाशक पदार्थांनी स्वच्छ केली पाहिजेत. नियम ५५ च्या खंड (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेली थुंकदाणे जितक्या वेळा आवश्यक वाटेल तितक्या वेळा किंवा दिवसातून एकदा तरी वरच्या वाळूचा थर पूर्णपणे काढून टाकून स्वच्छ केली पाहिजेत.

---

## प्रकरण ४

## सुरक्षितता

५७. सुरक्षिततेसाठी जादा सावधगिरी – यंत्रांना कुंपण घालण्यासंबंधी कलम २१ च्या पोटकलम (१) च्या उपबंधांना हानी न पोचविता या सोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली जादा सावधगिरी प्रत्येक अनुसूचीत नमूद केलेल्या यंत्रांच्या बाबतीत लागू केली पाहिजे.

### अनुसूची १

(सुती, रेशमी किंवा कोणताही कृत्रिम धागा व ताग वस्त्रनिर्माण)

१ कॉटन ओपनर्स, स्कचर्स, एकत्र केलेले ओपनर्स आणि स्कचर्स, स्कचर आणि लॅप यंत्रे, हार्ड वेस्ट ब्रेकर्स इ. (१) सर्व कॉटन ओपनर्स, स्कचर्स एकत्र केलेले ओपनर्स, आणि स्कचर्स, स्कचर आणि लॅप यंत्रे, हार्ड वेस्ट ब्रेकर्स आणि तत्सम यंत्रे स्वतंत्र मोटरद्वारे किंवा पट्ट्या व बैल कप्प्या आणि कार्यक्षम अशी पट्टा बदलण्याची साधने ज्यांस लावलेली आहेत अशा वेगळ्या काउंटर शाफ्टद्वारे चालविण्यात आली पाहिजेत.

(२) सर्व ओपनर्स, एकत्र केलेले ओपनर्स आणि स्कचर्स, स्कचर लॅप यंत्रे, हार्ड वेस्ट ब्रेकर्स आणि तत्सम यंत्रे, बिटर कव्हर्स, व यंत्राच्या कोणत्याही धोक्याच्या



भागात जाण्याची दारे यांना परिणामकारक अशी आतून कुलूप बंद करण्याची व्यवस्था करण्यात आली पाहिजे व त्यायोगे–

(अ) यंत्र चालू असताना कव्हर किंवा दारे उघडली जाणे, किंवा

(ब) कव्हर्स व दारे बंद होईपर्यंत यंत्र चालू होणे यास प्रतिबंध झाला पाहिजे.

परंतु असे, की जर आतून कुलूप बंद करण्याची परिणामकारक व्यवस्था केली नसेल तर बाणीदारे यांखेरीज करून इतर ओपनिंगची दारे यांना यंत्राच्या कोणत्याही धोक्याच्या भागात जाण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने कुलूप घातले पाहिजे.

(३) सर्व ओपनर्स, एकत्र केलेले ओपनर्स व स्कचर्स, स्कचर्स आणि स्कचर लॅप यंत्रे, हार्ड वेस्ट ब्रेकर्स आणि तत्सम यंत्रे, डस्ट चेंबरकडे जाणाऱ्या ओपनिंग्ज यांना कायम स्वरूपाने कुंपण घालण्यात आले पाहिजे. या कामगाराच्या शरीराच्या कोणत्याही भागाचा बिटरबाबत यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क येण्यास प्रतिबंध झाला पाहिजे.

२. एकत्र केलेले ओपनर्स आणि स्कचर्स, स्कचर, लॅप, सिल्व्हर लॅप, यंत्रे, दर्वा वलर्स आणि रिबन यंत्रे – (१) लॅप बनविण्याच्या रोलर्सना, बेटेड रॅकखाली असेपर्यंत, लॅप रोलर व फ्लटेड रोलरच्या दरम्यान कापून जाण्यास प्रतिबंध होईल असा गार्ड किंवा कव्हर जोडलेला असला पाहिजे, किंवा

(२) गार्ड किंवा कव्हर यास, यंत्र थांबण्यात येईपर्यंत ते वर उचलण्यात येणार नाही व गार्ड किंवा कव्हर बंद करण्यात येईपर्यंत यंत्र चालू करण्यात येणार नाही अशा रीतीने कुलूप लावण्यात आले पाहिजे.

३. कापूस पिंजण्याची यंत्रे – सर्व सिलिंडर दारांना, सिलिंडर फिरणे थांबेपर्यंत दार उघडण्यास प्रतिबंध होईल व दार बंद होईपर्यंत यंत्र पुन्हा चालू करणे अशक्य होईल अशा प्रकारचे आपोआप कुलूप लागून बंद करणारे साधन बसवून ती सुरक्षित केली पाहिजेत.

४. स्पीड-फ्रेम ड्रेड स्टॉकसना, यंत्र चालू असताना गॅंकबॉक्स व्हील्सकडे जाण्याची दारे बंद करण्यात येईपर्यंत यंत्र पुन्हा चालू करणे अशक्य होईल अशा प्रकारचे आपोआप कुलूप लागून बंद करणारे साधन जोडलेले असले पाहिजे.

५. स्वयंचलित म्यूल्स – पक्क्या व ढिल्या कप्प्या व कार्यक्षम अशी पट्टा बदलण्याची साधने लावलेल्या काउंटर शाफ्टद्वारे (स्वयंचलित म्यूल्सना) गती देण्यात आली पाहिजे.

६. कॅलेंडरिंगची यंत्रे वगैरे– कॅलेंडरिंगची यंत्रे, मॅंगल्स व तत्सम यंत्रे यांच्या बाबतीत, अशा सर्व यंत्रांना चालवण्या प्रत्येक जोडीच्या व तत्सम भागांच्या इन्टेक बाजूवरील सबंध लांबीवर चावलासा 'निप' गार्ड असवण्याची तरतूद केली पाहिजे आणि रोलर्स किंवा बोल्स हे फिरत असताना रोलर्स किंवा बोल्स यांच्या कन्टॅक्ट पॉईंटजवळ कोणतीही व्यक्ती जाऊ शकणार नाही अशा रीतीने उक्त गार्ड बसवून सुस्थितीत ठेवण्यात आला पाहिजे.

## अनुसूची २ (कापसाची सरकी काढणे)

लाईन शॅफ्ट – कापसाची सरकी काढण्याच्या कारखान्यातील लाईन [शॅफ्ट किंवा सेकंड मोशन जमिनीच्या पातळीच्या खाली असेल तेव्हा, त्या भोवती एक अखंड भिंत बांधली पाहिजे किंवा चढता येणार नाही असे कुंपण घातले पाहिजे आणि सरकी काढण्यासाठी, साफसूफ करण्यासाठी व तेल देण्यासाठी उक्त शॅफ्टकडे जाण्यास आवश्यक इतकेच फक्त सुळे मार्ग ठेवले पाहिजेत आणि अशा सुरंगा जाण्यास आवश्यक इतकेच फक्त खुले मार्ग ठेवले पाहिजेत आणि अशा मार्गात दरवाजे किंवा दारे ठेवून ते दरवाजे किंवा ती दारे कुलूप लावून बंद ठेवली पाहिजेत.

## अनुसूची ३ (लाकूड कामाची यंत्रसामग्री)

१. व्याख्या – या अनुसूचीच्या प्रयोजनाकरिता–

(अ) लाकूड कामाचे यंत्र म्हणजे, लाकूड किंवा तत्सम वस्तूंवर काम करण्यासाठी असलेली वर्तुळाकार करवत, पट्ट्यासारखी करवत, रंधा करण्याचे यंत्र, चेन मॉर्टिझिंग यंत्र किंवा व्हर्टीकल स्पिंडल मोल्डिंग यंत्र.

(ब) वर्तुळाकार करवत या संज्ञेचा अर्थ, (रॅक बेंचवरील) बेंचमध्ये बसवलेली वर्तुळाकार करवत असा होतो; परंतु तीत, लाकूड कापण्यासाठी लाकडाकडे सरकणाऱ्या टेबलाच्या किंवा तत्सम करवतीचा समावेश होत नाही.

(क) पट्ट्यासारखी करवत या संज्ञेचा अर्थ, ज्या करवतीचा कापणारा भाग अखंड रेषेत फिरतो ती पट्ट्यासारखी करवत असा होतो; परंतु ठोंब ओंडका कापण्याची करवत किंवा लाकूड पुन्हा कापण्याचे पट्ट्यासारखे यंत्र यांचा समावेश होत नाही.

(ड) रंधा करण्याचे यंत्र या संज्ञेचा अर्थ असा, की ओव्हरहेड प्लेनिंग किंवा जाडी आणणे यासाठी किंवा दोन्ही कामांसाठी असणारे यंत्र.

२. यंत्र थांबवण्याची व सुरू करण्याची योजना – लाकूड कामाच्या प्रत्येक यंत्राला ते थांबवण्याचे व सुरू करण्याचे कार्यक्षम साधन जोडण्यात आले पाहिजे.



या साधनावर नियंत्रण ठेवण्याची व्यवस्था अशा ठिकाणी असली पाहिजे की, यंत्र ताब्यात असणाऱ्या व्यक्तीस त्यावर सहज व सोयीस्करपणे काम करता येईल.

३. यंत्राच्या सभोवतालची जागा – चालू असलेल्या लाकूड कामाच्या प्रत्येक यंत्राच्या सभोवतालची जागा अडथळा होणार नाही अशा रीतीने मोकळी ठेवली पाहिजे.

४. जमिनी – लाकूड कामाच्या प्रत्येक यंत्राच्या सभोवतालची जमीन चांगल्या व सपाट केलेल्या स्थितीत राखली पाहिजे आणि ती निसरडी होऊ देता कामा नये व शक्य असेल तेथवर तीत, ढलप्या किंवा इतर सुटे सामान पडू देता कामा नये.

५. प्रशिक्षण व पर्यवेक्षण – (१) कोणत्याही व्यक्तीला, तिला त्या वर्गाच्या यंत्रावर काम करण्याचे पुरेसे प्रशिक्षण मिळाले नसेल तर किंवा ज्या व्यक्तीस यंत्राच्या कामाचे संपूर्ण ज्ञान असेल त्या व्यक्तीच्या पुरेशा पर्यवेक्षणाखाली ती व्यक्ती काम करीत नसेल तर लाकूड कामाच्या यंत्रावर काम करण्यासाठी लावता कामा नये.

(२) ज्या व्यक्तीस लाकूड कामाच्या यंत्रावर काम करण्यासाठी प्रशिक्षण दिले जात असेल त्या व्यक्तीस यंत्रातील धोक्यासंबंधी व यंत्राचे काम सुरक्षितपणे चालण्यासाठी घ्यावयाच्या खबरदारीसंबंधी पूर्णपणे व काळजीपूर्वक सूचना दिल्या पाहिजेत.

६. वर्तुळाकार करवती – प्रत्येक वर्तुळाकार करवतीस पुढील प्रकारे कुंपण घातले पाहिजे–

(अ) करवतीच्या मागे व तिच्या सरळ रेषेत एक गुळगुळीत मजबूत, ताठ व सहज बसविता येईल असा एक चीर पाडणारा चाकू असला पाहिजे व तो पुढील बर्तीस अनुसरून असला पाहिजे.

(१) करवतीजवळच्या चाकूच्या कडेची बेंचवर वापरण्यात येणाऱ्या सर्वांत मोठ्या करवतीच्या त्रिज्येहून अधिक नाही इतक्या त्रिज्येच्या वर्तुळाची कमान बनली पाहिजे.

(२) त्यावेळेस करावयाच्या कामाचे स्वरूप लक्षात घेऊन चाकू शक्य तितक्या करवतीच्या जवळ ठेवण्यात आला पाहिजे आणि बेंच टेबलाच्या पातळीजवळ चाकूची पुढील कडा व करवतीचे दाते यामधील अंतर १० मि. मी. पेक्षा जास्त असता कामा नये.

६

(३) ६० सें. मी. पेक्षा कमी व्यास असणाऱ्या करवतीकरिता चाकू बेंच टेबलापासून करवतीच्या जवळ वरच्या भागाच्या २५ मि. मी. च्या आत वरच्या बाजूस असला पाहिजे व ६० सें मी. किंवा त्यापेक्षा जास्त व्यास असलेल्या करवती करिता बेंच टेबलापासून निदान २५.५ सें. मी. तरी वरच्या बाजूस असला पाहिजे.

(ब) करवतीच्या वरच्या भागाला मजबूत व सहज बसवता येण्याजोग्या गार्डने आच्छादन असले पाहिजे व त्यासोबत करवतीच्या बाजूला कुठणापासून दूर अंतरावर फ्लान्ज असला पाहिजे. गार्ड अशा रीतीने बसविला असला पाहिजे की उक्त फ्लान्ज करवतीच्या दात्याच्या मुळाच्या खालपर्यंत गेला पाहिजे. गार्ड हा चीर पाडण्याच्या चाकूच्या वरच्या भागापासून शक्य तितका खाली म्हणजे करवतीच्या कापण्याच्या कडेपर्यंत असला पाहिजे.

(क) बेंच टेबलाखालील करवतीचा भाग धातूच्या किंवा इतर योग्य सामानाच्या दोन प्लेट्सनी करवतीच्या दोन्ही बाजूस एक एक प्लेट अशा प्रकारे सुरक्षित करण्यात आला पाहिजे. अशा प्लेट्स १५ सें. मी. पेक्षा जास्त अंतरावर असता कामा नयेत व त्या करवतीच्या आसापासून करवतीच्या दात्याच्या पलीकडे पाच सें. मी हून कमी नाही इतक्या अंतरावर बाहेरच्या बाजूला असल्या पाहिजेत. धातूच्या प्लेट्सची जाडी त्या जर बिडाच्या नसतील तर निदान २.५ मि. मी. किंवा बिडाच्या असतील तर निदान १.२४ मि. मी तरी असली पाहिजे.

७. पुश स्टिक्स – अनावश्यक धोका टाळून काम करणे शक्य होण्यासाठी प्रत्येक वर्तुळाकार करवत व प्रत्येक व्हर्टीकल स्पिंडल मोल्डिंग यंत्र यांना उपयोग करण्यासाठी एका पुश स्टिकची किंवा इतर योग्य उपयंत्राची तरतूद केली पाहिजे.

८. पट्टयासारख्या करवती – प्रत्येक पट्टयासारखी करवत पुढील प्रमाणे सुरक्षित केली पाहिजे.

(अ) खालच्या कप्पीच्या दोन्ही बाजू पत्र्याने किंवा धातूच्या विस्तारीत तक्त्याने किंवा इतर योग्य साधनाने आच्छादिल्या पाहिजेत.

(ब) सर्वांत वरच्या कप्पीचा पुढील भाग पत्र्याने किंवा धातूच्या विस्तारीत तक्त्याने किंवा इतर योग्य साधनाने आच्छादिला पाहिजे.

(क) पात्याच्या सर्व भागास, बेंच टेबल व वरचा गाईड या मधील पात्याचा भाग सोडून, कुंपण घातले पाहिजे. किंवा ते इतर रीतीने खात्री-लायकरीत्या सुरक्षित करण्यात आले पाहिजे.

९. रंधा करण्याची यंत्रे – (१) (यांत्रिक रीतीने मालाचा पुरवठा होणारी रंधा करण्याची यंत्रे सोडून इतर) रंधा करण्याच्या यंत्राला नळकांड्या-



सारखा कटर ब्लॉक बसवलेला नसेल तर, ते ओव्हरहेड प्लेनिंगसाठी वापरता कामा नये.

(२) ओव्हरहेड प्लेनिंगसाठी वापरलेल्या अशा प्रत्येक यंत्राला बेंचमधील कापण्याच्या भेगेची संपूर्ण लांबी व रुंदी खालील व ऊर्ध्व व समांतर रेषेत सहज-पणे बसवता येईल अशा रीतीने बांधलेल्या 'ब्रिज गार्ड' ची तरतूद करण्यात आली पाहिजे.

(३) ओव्हरहेड प्लेनिंग व जाडी आणणे यासाठी केलेली यंत्रे सोडून जाडी आणण्यासाठी वापरलेल्या प्रत्येक रंधा करण्याच्या यंत्राच्या फीडरोलरला कार्यक्षम गार्डची तरतूद करण्यात आली पाहिजे.

१०. व्हर्टीकल स्पिंडल मोल्डिंग यंत्र – (१) प्रत्येक व्हर्टीकल स्पिंडल मोल्डिंग यंत्राचा कटर करण्यात येत असलेल्या कामाचे स्वरूप लक्षात घेऊन अत्यंत कार्यक्षम गार्ड बसवून सुरक्षित केला पाहिजे.

(२) व्हर्टीकल स्पिंडल मोल्डिंग यंत्राने आकार देण्यात येत असलेले लाकूड शक्य असेल तर कामगारास असलेला अपघाताचा धोका शक्यतो कमी होईल अशा यांत्रीच्या जिगमध्ये किंवा होल्डरमध्ये धरले पाहिजे.

११. चेन मॉर्टिझिंग यंत्र – प्रत्येक मॉर्टिझिंग साखळीस व्यापोने कटरी वाढती वर वाकले जातील अशा तऱ्हेची गार्डची तरतूद केली पाहिजे.

१२. गार्ड जागच्या जागी बसवणे व ते सुस्थितीत राखणे – या अनुसूची-अन्वये आवश्यक असलेले गार्ड व इतर उपयंत्रेही–

(अ) कार्यक्षम स्थितीत राखली पाहिजेत.

(ब) यंत्र चालू असताना सतत एका जागी ठेवली असली पाहिजेत; व

(क) अनावश्यक धोका टाळून काम करणे शक्य होईल अशा रीतीने जागच्या जागी बसवलेली असली पाहिजेत.

१३. सूट – परिच्छेद ६, ८, ९ व १० हे ज्या लाकूड कामाच्या यंत्राच्या बाबतीत या अनुसूचीत ठरविलेल्या रीतीने यंत्राचे संरक्षण करण्यात आले असते तर ज्याप्रमाणे ते यंत्र सुरक्षित झाले असते त्याचप्रमाणे ते सुरक्षित करणाऱ्या संरक्षणाच्या साधनांची तरतूद करण्यात आली आहे, ती सुस्थितीत राखण्यात आली आहेत व वापरण्यात आली आहेत असे सिद्ध करण्यात येईल, त्या लाकूड कामाच्या कोणत्याही यंत्रास लागू असणार नाहीत.

## अनुसूची ४ – रबराची व प्लास्टिकची गिरणी

व्याख्या – (एक) 'रबराची व प्लास्टिकची गिरणी' याचा अर्थ रबर किंवा रबरी माल आणि प्लास्टिक किंवा प्लास्टिकचा माल मोडून टाकणे, फोडणे, घुणे, घासून बारीक तुकडे करणे, मिसळणे, शुद्ध करणे व गरम करणे यासाठी वापरलेली रोलरयुक्त यंत्रे, असा होतो.

(दोन) 'कॅलेंडर' या संज्ञेचा अर्थ रबर किंवा रबराची आणि प्लास्टिक किंवा प्लास्टिकची संयुगे चालणे, त्याचे चपटे तुकडे पाडणे, त्यावर थर देणे व ती बंद करणे यासाठी वापरलेली रोलयुक्त यंत्रे, असा होतो.

(१) यंत्रे बसविणे – पुढच्या रोलचा वरचा भाग जमिनीच्या किंवा चालू पातळीच्या १ मीटरपेक्षा अधिक वर असणार नाही अशा रीतीने रबराची आणि प्लास्टिकची गिरणी बसविली पाहिजे. परंतु बसविलेल्या विद्यमान यंत्रसामग्रीत पुढच्या रोलचा भाग या उंचीच्या खाली असेल तेव्हा यंत्राच्या बाजूला एक मजबूत व कठीण विस्तृत बार गाडे अशा जागी बसविलेला असला पाहिजे की यंत्र चालकाला त्याच्या काम करण्याच्या नेहमीच्या जागेवरून रोलरच्या नीपपर्यंत पोहोचता येणार नाही.

(२) सुरक्षिततेची साधने – (एक) रबराची आणि प्लास्टिकची गिरणी पुढील गोष्टींनी सुसज्ज असली पाहिजे.

(अ) यंत्र चालकाचा रोलरच्या नीपशी कोणत्याही रीतीने संपर्क येणार नाही अशा रीतीने बांधलेले किंवा सुरक्षित केलेले हॅपर, किंवा

(ब) जे ढकलले किंवा खेचले असता त्यामुळे तात्काळ वीज तोडली जाईल व ब्रेक लागतील किंवा रोल मागे घेतले जातील व पुढे मागे दोन्ही बाजूस आडवे समांतर सेफ्टी ट्रीप रॉड्स किंवा चट्टू वायर केवळ रबराच्या गिरणीवरील सेफ्टी ट्रीप रॉड्स किंवा चट्टू वायर केवळ रोलरच्या तोंडाच्या संपूर्ण लांबीवर आडव्या बसवलेल्या असल्या पाहिजेत आणि त्या जमिनीच्या किंवा चालू पातळीच्या १७० सें. मीटरपेक्षा अधिक नाही इतक्या वर असल्या पाहिजेत.

(दोन) कॅलेंडर यंत्रे पुढील गोष्टींनी सुसज्ज असली पाहिजेत–

(अ) जे ढकलले किंवा खेचले असता, त्यामुळे तात्काळ वीज तोडली जाईल व ब्रेक लागतील किंवा रोल्स मागे घेतले जातील असे पुढच्या भागाच्या दोन्ही बाजूंस असलेले आडवे समांतर सेफ्टी ट्रिप रॉड्स किंवा चट्टू वायर केबल.

(ब) कॅलेंडर यंत्रावरील सेफ्टी ट्रिप रॉड्स किंवा चट्टू वायर केवळ रोलच्या तोंडाच्या संपूर्ण लांबीवर आडव्या बसवल्या असल्या पाहिजेत. आणि



त्या जमिनीच्या किंवा चालू पातळीच्या १७० सें. मीटरपेक्षा अधिक नाही, इतक्या वर असल्या पाहिजेत.

(क) सर्व कॅलेंडरांच्या प्रत्येक बाजूस व रोलच्या तोंडाच्या दोन्ही टोकांजवळ बार ट्रीपिंग यंत्ररचनेशी जोडलेली व जमिनीपासून ३० सें. मीटरच्या आंत चौकटीत चट्टू बसवलेली ऊर्ध्व रेषेतील एक चट्टू वायर केवल असली पाहिजे. या केवल रोलच्या तोंडापासून ३० सें. असली पाहिजे. या केवल्स रोलच्या तोंडापासून ३० सें. मीटरहून जास्त नाही इतक्या अंतरावर व कॅलेंडर फ्रेमपासून २५ सें. मीटरहून कमी नाही इतक्या अंतरावर बसवलेल्या असल्या पाहिजेत.

(३) सुरक्षिततेची साधने सुस्थितीत राखणे – रबराच्या सर्व गिरण्या व कॅलेंडरे यावरील सेफ्टी ट्रीप रॉड्स व चट्टू वायर केबल्स यांची व्यवस्थापकाने किंवा इतर जबाबदार व्यक्तीच्या समोर दररोज तपासणी केली पाहिजे व चाचणी घेतली पाहिजे व अशा तपासणीत किंवा चाचणीत दोष उघडकीस आल्यास असा दोष सुधारण्यात येईपर्यंत उक्त गिरणीचा उपयोग करता कामा नये.

५८. विशेषरीत्या प्रशिक्षण दिलेल्या प्रौढ कामगारांची नोंदवही – कलम २२, पोटकलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे या यंत्र सामग्रीवर काम करणाऱ्या कामगारांची नोंदवही नमुना १० मध्ये असली पाहिजे.

५९. घट्ट बसणारे कपडे – कलम २२, पोटकलम (१) अन्वये घट्ट बसणारे कपडे घालणे आवश्यक असलेल्या कामगारास, कब्जेदाराने घट्ट बसणाऱ्या विजार दोन विजारी व घट्ट बसणारा अर्ध्या बाहयांचा शर्ट किंवा बनियन असे कपडे पुरविले पाहिजेत. असे कपडे सेवा समाप्तीनंतर किंवा नवीन कपडे पुरवण्यात आल्यानंतर कब्जेदाराला परत केले पाहिजेत.

६०. बेल्ट वगैरे नियमितपणे तपासणे – सर्व बेल्टचे सांधे सुरक्षित असून त्यांचे टेन्शन योग्य प्रकारचे आहे अशी खात्री करून घेण्यासाठी सर्व बेल्ट नियमितपणे तपासण्यात आले पाहिजेत.

६१. धोक्याच्या यंत्रसामग्रीवर तरुण व्यक्तींना कामावर लावणे – पुढील यंत्रे ही, कलम २३ (१) च्या उपबंधाचे पालन करण्यात येत नसेल तर, तरुण व्यक्तींनी त्यावर काम करता कामा नये अशा धोक्याच्या स्वरूपाची यंत्रे आहेत असे समजण्यात आले पाहिजे.

हॅड्रोलिक प्रोसेस धरीज करून, पॉवर प्रेसेस,

धातूच्या व्यापारात वापरली जाणारी कंतरे पाडण्याची यंत्रे;

कागद कापण्याची यंत्रे;

वर्तुळाकार करवती
स्लेटन मुद्रण यंत्रे.

६२. उच्चालन यंत्रांची तपासणी; त्यासंबंधीचा तपशील – उच्चालन यंत्र किंवा लिफ्टच्या तपासणीचा तपशील नमूद करण्यासाठी नोंदवही ठेवली पाहिजे व तीत नमुना ११ मध्ये दर्शविलेला तपशील असला पाहिजे.

६३. विवक्षित उच्चालन यंत्रे किंवा लिफ्ट्स् यांना सूट – कलम २७, पोट कलम (४) च्या उपबंधानुसार पुढील अनुसूचीच्या पहिल्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या उच्चालन यंत्राच्या किंवा लिफ्टच्या संबंधात उक्त अनुसूचीच्या दुसऱ्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या व त्या वर्गाच्या किंवा प्रकारच्या उच्चालन यंत्राच्या किंवा लिफ्टच्यासमोर दर्शविलेल्या २८ व्या कलमाच्या आवश्यक बाबी लागू असणार नाहीत.

अनुसूची

| उच्चालन यंत्राचा किंवा लिफ्टचा वर्ग किंवा प्रकार<br>१ | लागू असणार नाहीत अशा आवश्यक बाबी<br>२ |
| --- | --- |
| ब्लास्ट फर्नेस किंवा मुख्या भट्ट्या भरण्याचे सामान उचलण्यासाठी मुख्यत्वेकरून वापरलेले उच्चालन यंत्र किंवा लिफ्ट. | खाली थांबण्याच्या ठिकाणी दरवाजाची आवश्यकता असेल तेथवर पोटकलम (१) (क) पोटकलम (१) (ड), आणि पोट कलम (१) (ई). |
| यांत्रिक शक्तीने ओढलेले नसतील व जे व्यक्तींना नेण्यासाठी वापरण्यात येत नसतील असे उच्चालन यंत्र. | उच्चालन यंत्राच्या किंवा लिफ्टच्या कोणताही भाग, व कोणतेही कायम स्वरूपाचे बांधकाम किंवा हलता भाग यांमध्ये कोणतीही व्यक्ती किंवा वस्तू सापडणार नाही अशा रीतीने उच्चालन यंत्राचा किंवा लिफ्टचा मार्ग कुंपण घालून बांधण्याची आवश्यकता असेल तेथवर, पोटकलम (१) (ब), पोट कलम (१) (ड). |

६४. उचलयंत्र, साखळदंड, दोरखंड व उचलण्याची साधने – (१) तंतुदोर किंवा तंतुदोराचे ओढकवे वगळून, कोणतेही उचल यंत्र, किंवा साखळदंड, दोरखंड किंवा उचलण्याचे साधन, याची सक्षम व्यक्तीकडून चाचणी घेतली गेली



नसेल अथवा त्याच्या सर्व भागांची पूर्णपणे तपासणी केली गेली नसेल आणि चाचणी व तपासणी करणाऱ्या व्यक्तीने सही केलेले आणि सुरक्षित कामाचा भार किंवा सुरक्षित कामाचे भार विनिर्दिष्ट करणारे अशा चाचणीचे किंवा तपासणीचे प्रमाणपत्र मिळविण्यात आले नसेल व निरीक्षणासाठी ते उपलब्ध करून दिले नसेल तर कोणत्याही कारखान्यात ते प्रथम उपयोगात आणता कामा नये.

(२) विनिर्दिष्ट केलेला तपशील अंतर्भूत असलेली, पोट नियम (१) अन्वये करण्यात आलेल्या प्रत्येक तपासणीची नोंदवही, नमुना १२ मध्ये ठेवली पाहिजे. नोंदवही तपासणीसाठी सहज मिळण्याजोगी असली पाहिजे.

(३) (अ) पारांची जिब वर किंवा खाली केल्यास सुरक्षित कामाचा बोजा कमी अधिक होईल अशा रीतीने बनवलेल्या प्रत्येक पारीला, सुरक्षित कामाच्या भाराचा स्वयंचलित दर्शक किंवा स्वयंचलित जिब कोन दर्शक आणि जिबच्या कलानुसार कल किंवा भाराच्या आकारमानानुसार सुरक्षित कामाचा भार दर्शविणारा तक्ता जोडलेला असला पाहिजे.

(ब) वापरात असलेल्या प्रत्येक प्रकारच्या आकाराच्या साखळदंडाचा किंवा उचलण्याच्या साधनाचा सुरक्षित कामाचा भार आणि बहुविध ओढकव्यांच्या बाबतीत, पायाच्या निरनिराळ्या कोनांवरील कामाचा भार दर्शविणारा तक्ता; जेथे किंवा ज्या जागेत साखळदंड, दोरखंड किंवा उचलण्याचे साधन ठेवले असेल अशा खोलीत प्रमुख ठिकाणी लावला पाहिजे; आणि उचलण्याच्या साधनाच्या बाबतीत, त्याचा सुरक्षित कामाचा भार आणि बहुविध ओढकव्यांच्या बाबतीत; पायाच्या निरनिराळ्या कोनांवरील सुरक्षित कामाचा भार स्पष्टपणे लिहिलेला नसेल तर, कोणताही दोरखंड, साखळदंड किंवा उचलण्याचे साधन कारखान्यात वापरता कामा नये.

(४) फिरती पारी ज्या रुळांवरून चालविला जात असेल असे सर्व रूळ आणि ट्रान्स्पोर्टरचा किंवा रेल्वेचा डबा ज्या मार्गावरून चालविली जात असेल असा प्रत्येक मार्ग योग्य आकाराचा, पुरेसा बळकट आणि समतल पृष्ठभागाचा असला पाहिजे. असा प्रत्येक रूळ किंवा मार्ग योग्य रीतीने घातलेला असला पाहिजे व तो सुरक्षित ठेवला पाहिजे. आणि त्याला पुरेसा आधार दिलेला असला पाहिजे.

(५) तंतुदोराच्या ओढकव्याव्यतिरिक्त इतर सर्व साखळदंड आणि उचलण्याची साधने, यांच्याबर राज्य शासनाने मान्य केल्याप्रमाणे उष्णोपचार केलेले नसतील तर, सक्षम व्यक्तीच्या देखरेखीखालील पुढील मध्यंतरानंतर परिणाम कारकरीत्या तप्तशमित केले पाहिजे.

(एक) साखळदंड, ओळकंबे, रिंग, हुक्स, शॅकल्स व स्विव्हेल्स हे द्रुतधातू किंवा द्रुतधातुमळाच्या संबंधात वापरलेले असतील किंवा अर्धा इंच लांबीने किंवा त्याहून लहान असतील तेव्हा त्यांच्या बाबतीत कमीत कमी दर सहा महिन्यांनी;

(दोन) सर्वसाधारण उपयोगात असतील असे इतर सर्व साखळदंड, रिंग्ज हुक्स, शॅकल्स आणि स्विव्हेल्स यांच्या बाबतीत कमीत कमी बारा महिन्यांनी एकदा;

परंतु असे, की वारंवार उपयोगात न येणारा साखळदंड आणि उचलण्याची साधने, मुख्य निरीक्षक, कारखाने, यांच्या मान्यतेस अधीन राहून, आवश्यक असतील तेव्हा तप्तशीतळी केली पाहिजेत आणि अशा तप्तशीतळीकरणाचा तपशील, नमुना १२ यांतील नोंदवहीत नोंदवला पाहिजे.

(६) पोट नियम (५) यांतील कोणतीही गोष्ट पुढील प्रकारचे साखळदंड आणि उचलण्याची साधने यांना लागू होणार नाही–

(एक) आघातवर्धनीय विडापासून बनवलेले साखळदंड,

(दोन) प्लेट लिंक साखळदंड,

(तीन) पोलाद किंवा इतर कोणत्याही अलोह धातूपासून बनवलेले साखळदंड, रिंग, हुक्स, शॅकल्स आणि स्विव्हेल्स,

(चार) स्प्रॉकेट किंवा पॉकेटेड व्हीलवर चालणारे लिंक साखळदंड,

(पाच) पिच्ड साखळदंड, कप्पी, ब्लॉक्स किंवा वजन यंत्रे यांना कायमच्या जोडलेल्या रिंग, हुक्स, शॅकल्स व स्विव्हेल्स.

(सहा) पेचखिळ्यासारखे आटे असलेले भाग किंवा बॉल बेअरिंग्ज किंवा इतर केस हार्डन्ड भाग असलेले हुक्स आणि स्विव्हेल्स

(सात) धातूच्या धातूच्या आवरणांनी वायर रोप्स सुरक्षित करण्यासाठी सॉकेट शॅकल्स.

(आठ) बोर्डे (Boardeau) फास्टनर्स.

(नऊ) तप्तशीतलीत करण्याऐवजी 'नॉर्मलायझिंग' नावाचे उष्णोपचार ज्यांवर करण्यात आले आहेत असे कोणतेही साखळदंड किंवा उचलण्याचे साधन. असे साखळदंड आणि उचलण्याचे साधन यांची सक्षम व्यक्तीकडून दर बारा महिन्यातून कमीत कमी एकदा तरी तपासणी करवून घेण्यात आली पाहिजे. व अशा तपासणीचा अहवाल नमुना १२ यांतील नोंदवहीत नमूद केला पाहिजे.

(७) तंतूदोर किंवा तंतूदोराचे ओळकंबे यांच्याशिवाय सांधून किंवा अन्य रीतीने ज्यांची लांबी वाढविण्यात आली असेल किंवा सुधारणा करण्यात आली



असेल किंवा दुरुस्ती करण्यात आली असेल अशी इतर सर्व उचल यंत्रे, साखळदंड, दोरखंड आणि उचलण्याची साधने यांची सक्षम व्यक्तीकडून योग्य रीतीने चाचणी व तपासणी करवून घेण्यात आली असेल, आणि ते सुरक्षित असल्याचे त्याने प्रमाणित केले नसेल तर, पुन्हा वापरता कामा नये.

(८) १८ वर्षांखालील कोणत्याही व्यक्तीस आणि जिला पुरेसे प्रशिक्षण दिलेले नाही व उचल यंत्राचे कार्य आणि यंत्राच्या धोक्यासंबंधीची माहिती करून दिलेली नाही अशा कोणत्याही व्यक्तीस उचल यंत्राचा चालक म्हणून, जर असे यंत्र यांत्रिक शक्तीवर किंवा अन्य रीतीने चालवले जात असेल किंवा चालकास सिग्नल देण्यासाठी म्हणून, कामावर लावता कामा नये.

कलम ३१, पोटकलम (२) आणि कलम ११२ खाली विहित केलेले नियम

६५. दाब संयंत्र – (१) कारखान्यात उपयोग करण्यात येत असलेल्या मुख्यतः विनकामाच्या चालू सिलिंडर व्यतिरिक्त असणारे आणि वातावरणाच्या दाबापेक्षा अधिक दाबावर चालविण्यात येणारे प्रत्येक संयंत्र किंवा यंत्रसामग्री–

(अ) चांगल्या बनावटीची, चांगल्या सामानाची, पुरेशी मजबूत आणि कोणत्याही उघड दोषापासून मुक्त असली पाहिजे.

(ब) योग्य रीतीने सुरक्षित ठेवलेली असली पाहिजे.

(क) (एक) पात्राचा कमाल अनुज्ञेय कामाचा दाब अधिक होणार नाही याची खात्री करून घेण्यासाठी (अशा संयंत्रास किंवा यंत्रसामग्रीस) सुरक्षा झडप किंवा इतर परिणामकारक साधन,

(दोन) सर्व वेळी, दर चौरस सेंटीमीटरमागे किलोग्रॅममध्ये अचूक आंतर्गत दाब दर्शवील असे आणि ज्यावर पात्राचा सुरक्षित दाब लाल रंगाने दाखविला असेल असे योग्य व सहज दिसण्याजोगे दाब मापक,

(तीन) ज्यामुळे पात्र किंवा पात्र योजना, इतर पात्रापासून किंवा दाबाचा पुरवठा होणाऱ्या मार्गापासून विभक्त होईल अशा तऱ्हेची विराम झडप,

(चार) संघनित द्रवपदार्थ वाहून जाण्यासाठी पात्राच्या अगदी खालच्या बाजूस एक निस्सारण तोटी किंवा झडप, जोडलेली असली पाहिजे.

(ड) सक्षम व्यक्तीकडून–

(एक) पात्राच्या सर्वसाधारण स्थितीबद्दल आणि त्याच्या जोडण्या चालू असल्याबद्दल खात्री करून घेण्यासाठी दर सहा महिन्यांनी एकदा बाहेरून, आणि–

(दोन) पात्राच्या आतील तसेच बाहेरील भिंती, जोड आणि यांची स्थिति-समबंध, पात्राच्या भागाची वळकटी आणि झिजेमुळे होणारे परिणाम याची खात्री

करून घेण्यासाठी दर बारा महिन्यांनी एकदा, आतून संपूर्णपणे तपासणी करवून घेतली पाहिजे.

पात्राच्या विशिष्ट बनावटीमुळे संपूर्ण अंतर्गत तपासणी करणे शक्य नसेल तर त्या ऐवजी जलविषयक चाचणी करता येईल. ही जलविषयक चाचणी दर दोन वर्षांनी घेण्यात आली पाहिजे. त्या शिवाय, जी अखंड प्रक्रियेतील पात्रे वारंवार उघडणे शक्य नसते, अशा वेळी अंतर्गत तपासणीचा कालावधी चार वर्षां-पर्यंत वाढविता येईल.

(तीन) चार वर्षांपेक्षा अधिक नाही इतक्या मध्यंतरांनी जलविषयक चाचणी घेऊन संपूर्ण तपासणी करवून घेतली पाहिजे; परंतु सालक्षिम सिलिंडर-सारख्या तांब्याच्या किंवा इतर अलोह धातूपासून बनविलेल्या पात्राच्या बाबतीत; खंड (११) मधील आवश्यक गोष्टी परिपूर्ण करण्यात आल्या असतील तर त्या शर्तीवर नियतकालीन जलविषयक चाचणी माफ करता येईल.

परंतु असे की, सुरक्षा झडप, दाब मापक विरामझडप किंवा योग्य असे इतर स्वयंचलित साधन पात्राच्या अगदी जवळ असलेल्या पाईप लाईनवर बसविलेले असेल तर खंड (अ) च्या प्रयोजनासाठी ते पुरेसे होईल आणि जेव्हा एकाच दाबावर काम चालविले जात असेल अशा संयंत्रामध्ये दोन किंवा त्याहून अधिक सारख्या पात्रांची रांग असेल तेव्हा, बसविलेल्या गोष्टी त्या कोणत्याही पात्रापासून वेगळ्या होऊ शकत नसतील तर त्यांचा एकच संच जोडावा लागेल.

(२) मुळातील जनकाच्या वातावरणाव्यतिरिक्त वातावरणाच्या दाबाहून अधिक दाबावर चालणाऱ्या आणि मूळ दाब जेथून निर्माण होतो त्या ठिकाणच्या जास्तीत जास्त कामाच्या दाबापुढे किंवा अन्य कोणत्याही दाब पुरवठ्याशी पात्र जोडणाऱ्या पाईपमधून मिळू शकणाऱ्या कमाल दाबापुढे सुरक्षितपणे टिकू शकेल अशा बना-वटीचे नसलेल्या प्रत्येक पात्राला त्याचा सुरक्षित कामाचा दाब वाढण्यास प्रतिबंध व्हावा यासाठी योग्य अशी दाब कमी करणारी झडप किंवा इतर योग्य स्वयंचलित साधन बसविले पाहिजे.

(३) प्रक्रियेच्या स्वरूपामुळे किंवा पात्रातील वस्तूच्या क्रियेमुळे दाबमापक किंवा सुरक्षा झडप यांचे किंवा या दोन्हींचे काम विश्वसनीयरीत्या होऊ शकत नसेल अशा बाबतीत, पुरेशा मोठ्या प्रमाणावर आकडे असणारा व ज्यावर पात्रा-तील किंवा पायरोमीटर यांतील किंवा रप्चर डिस्क यांतील अनुज्ञेय किमान तपमान स्पष्टपणे दर्शविले जाईल असा, दाब मापक व सुरक्षा झडप यांच्याशिवाय आणखी एक चाचणी केलेला आणि विदवासार्ह काम देणारा तपमापक मुख्य निरीक्षक निदेश देईल अशा रीतीने जोडण्यात येईल.



(४) तपासणीमध्ये, या नियमांमध्ये तरतूद केलेली दुसरी तपासणी होई-पर्यंत पात्राचे कार्य सुरक्षितपणे चालण्याविषयी शंका निर्माण झाल्यास सक्षम व्यक्तीने, पात्राचा दाब कमी करण्यास अधीन राहून किंवा त्याची वारंवार तपासणी करण्यास अधीन राहून किंवा या दोन्ही आवश्यक गोष्टीस अधीन राहून; पात्राचे काम पुढे चालू करण्यासंबंधी विहित नोंदवहीत सकारण निवेदनाची नोंद केली पाहिजे.

(५) ज्यांच्यात फेरबदल किंवा दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत अशा कोणत्याही पात्राचा, सक्षम व्यक्तीने त्याची संपूर्ण तपासणी केली नसेल तर, वापर करता कामा नये.

(६) केलेल्या प्रत्येक तपासणीचा अहवाल नमुना १३ मध्ये पूर्ण केला पाहिजे आणि तपासणी करणाऱ्या व्यक्तीने त्यावर सही केलेली असली पाहिजे आणि हा अहवाल पात्राचे कार्य चालू असताना कोणत्याही वेळी किंवा मुख्य निरीक्षक मान्यता देईल अशा कोणत्याही रीतीने, निरीक्षकाच्या अवलोकनासाठी उपलब्ध करून दिला पाहिजे.

(७) कोणत्याही कारखान्यात ज्याचा प्रथम एकदा वापर करण्यात आला आहे असे कोणतेही पात्र, या नियमानुसार त्याची तपासणी होईपर्यंत व त्याबद्दल अहवाल तयार होईपर्यंत वापरता कामा नये आणि कोणतेही नवीन पात्र, ते बनवणाऱ्याकडून किंवा सक्षम व्यक्तीकडून पात्राचा कमाल अनुज्ञेय कामाचा दाब विनिर्दिष्ट करणारे आणि पात्र व त्याच्या जोडण्या (कोणत्याही असल्यास) त्याच्या घेतलेल्या चाचणीचे स्वरूप नमूद करणारे प्रमाणपत्र मिळाले नसेल, तर वापरात आणता कामा नये आणि निरीक्षकाच्या अवलोकनासाठी ते उपलब्ध केले नसेल आणि प्रमाणपत्र ज्या पात्रासंबंधी असेल ते पात्र ओळखणे शक्य होईल अशा रीतीने पात्रावर खूण केलेली नसेल तर वापरता कामा नये.

(८) या नियमाखालील कोणत्याही तपासणीच्या अहवालात पात्राच्या सुरक्षित कार्यासंबंधी शर्ती विनिर्दिष्ट केल्या असतील अशा बाबतीत, या शर्तीं-नुसार असेल ते खेरीज करून पात्राचा वापर करता कामा नये.

(९) या नियमाखालील कोणत्याही तपासणीचा अहवाल देणाऱ्या सक्षम व्यक्तीने, तपासणी पूर्ण झाल्यापासून सात दिवसांच्या आत, कमाल अनुज्ञेय कामाचा दाब कमी केला असेल किंवा तात्काळ किंवा विनिर्दिष्ट वेळात विवक्षित दुरुस्त्या करण्यात आल्याखेरीज, ती भाग चाचणीच्या विनिर्दिष्ट वेळात विवक्षित दुरुस्त्या करण्यात आल्याखेरीज, ती भाग सुरक्षितपणे वापरण्याचे चालू ठेवणे शक्य होणार नाही असे तपासणीवरून दिसून येईल अशा प्रत्येक बाबतीतील अहवालाची एक प्रत निरीक्षकाकडे पाठविली पाहिजे.

करून घेण्यासाठी दर बारा महिन्यांनी एकदा, आतून संपूर्णपणे तपासणी करवून घेतली पाहिजे.

पात्राच्या विशिष्ट बनावटीमुळे संपूर्ण अंतर्गत तपासणी करणे शक्य नसेल तर त्या ऐवजी जलविषयक चाचणी करता येईल. ही जलविषयक चाचणी दर दोन वर्षांनी घेण्यात आली पाहिजे. त्या शिवाय, जी अखंड प्रक्रियेतील पात्रे वारंवार उघडणे शक्य नसते, अशा वेळी अंतर्गत तपासणीचा कालावधी चार वर्षां-पर्यंत वाढविता येईल.

(तीन) चार वर्षांपेक्षा अधिक नाही इतक्या मध्यंतरांनी जलविषयक चाचणी घेऊन संपूर्ण तपासणी करवून घेतली पाहिजे; परंतु सायक्लिक सिलिंडर-सारख्या तांब्याच्या किंवा इतर अलोह धातूपासून बनविलेल्या पात्रांच्या बाबतीत; खंड (११) मधील आवश्यक गोष्टी परिपूर्ण करण्यात आल्या असतील तर त्या खालील नियतकालीन जलविषयक चाचणी माफ करता येईल.

परंतु असे की, सुरक्षा झडप, दाब मापक विरामझडप किंवा योग्य असे इतर स्वयंचलित साधन पात्राच्या अगदी जवळ असलेल्या पाईप लाईनवर बसविलेले असेल तर खंड (अ) च्या प्रयोजनासाठी ते पुरेसे होईल आणि जेव्हा एकाच दाबावर काम चालविले जात असेल अशा संयंत्रामध्ये दोन किंवा त्याहून अधिक सारख्या पात्रांची रांग असेल तेव्हा, बसविलेल्या गोष्टी त्या कोणत्याही पात्रापासून वेगळ्या होऊ शकत नसतील तर त्यांचा एकच संच जोडावा लागेल.

(२) मुलतःच अनकाच्या आभ्यासिक्त वातावरणाच्या दाबाहून अधिक दाबावर चालणाऱ्या आणि मुक्त वाफ घेऊन निर्माण होतो त्या ठिकाणच्या वास्तविक जास्त कामाच्या दाबापुढे किंवा अन्य कोणत्याही दाब पुरवठ्याशी दाब जोडणाऱ्या पाईपमधून भिन्न ठकणाऱ्या [illegible]



(४) तपासणीमध्ये, या नियमांमध्ये तरतूद केलेली दुसरी तपासणी होई-पर्यंत पात्राचे कार्य सुरक्षितपणे चालण्याविषयी शंका निर्माण झाल्यास सक्षम व्यक्तीने, पात्राचा दाब कमी करण्यास अधीन राहून किंवा त्याची वारंवार तपासणी करण्यास अधीन राहून किंवा या दोन्ही आवश्यक गोष्टीस अधीन राहून; पात्राचे काम पुढे चालू करण्यासंबंधी विहित नोंदवहीत सकारण निवेदनाची नोंद केली पाहिजे.

(५) ज्याच्यात फेरबदल किंवा दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत अशा कोणत्याही पात्राचा, सक्षम व्यक्तीने त्याची संपूर्ण तपासणी केली नसेल तर, वापर करता कामा नये.

(६) केलेल्या प्रत्येक तपासणीचा अहवाल नमुना १३ मध्ये पूर्ण केला पाहिजे आणि तपासणी करणाऱ्या व्यक्तीने त्यावर सही केलेली असली पाहिजे आणि हा अहवाल पात्राचे कार्य चालू असताना कोणत्याही वेळी किंवा मुख्य निरीक्षक मान्यता देईल अशा कोणत्याही रीतीने, निरीक्षकाच्या अवलोकनासाठी उपलब्ध करून दिला पाहिजे.

(७) कोणत्याही कारखान्यात ज्याचा प्रथम एकदा वापर करण्यात आला आहे असे कोणतेही पात्र, या नियमानुसार त्याची तपासणी होईपर्यंत व त्याबद्दल अहवाल तयार होईपर्यंत वापरता कामा नये आणि कोणतेही नवीन पात्र, ते बनवणाऱ्याकडून किंवा सक्षम व्यक्तीकडून पात्राचा कमाल अनुज्ञेय कामाचा दाब विनिर्दिष्ट करणारे आणि पात्र व त्याच्या जोडण्या (कोणत्याही असल्यास) त्यांच्या घेतलेल्या चाचणीचे स्वरूप नमूद करणारे प्रमाणपत्र मिळवले नसेल, तर वापरात आणता कामा नये आणि निरीक्षकाच्या अवलोकनासाठी व उपलब्ध केले नसेल आणि प्रमाणपत्र ज्या पात्रासंबंधी असेल ते पात्र ओळखणे शक्य होईल अशा रीतीने [illegible] नमूद केलेली नसेल तर वापरता कामा नये.

[illegible] कोणत्याही तपासणीच्या अहवालात पात्राच्या [illegible]

(१०) या नियमातील आवश्यक गोष्टींमुळे इतर कोणताही अधिनियम; नियम अथवा विनियम यांतील आवश्यक गोष्टींचे अल्पीकरण न होता त्या त्यांच्या भरीला म्हणून राहतील.

(११) (अ) (एक) शक्य असेल तेथवर, ज्याचे बाहेरील कवच तांब्याच्या पत्र्याचे किंवा इतर कोणत्याही अलोह सामग्रीचे बनविलेले आहे अशा, ८ एप्रिल १९५० पूर्वी वापरात असलेल्या प्रत्येक सार्वाक्षिग सिलिंडरच्या बाबतीत, व्यवस्थापकाने निरीक्षकास आणि सक्षम व्यक्तीस असे सिलिंडर ज्या तारखेस कारखान्यात प्रथम उपयोगात आणले असेल ती तारीख आणि ते नवे उपयोगात आणले त्यावेळच्या कवचाच्या जाडीसंबंधीचा तपशील दर्शविणारी माहिती उपलब्ध करून दिली पाहिजे. असा सिलिंडरचा कारखान्यात प्रथम वापर करण्यात आला असेल त्यावेळी त्याच्या निर्मात्याने शिफारस केलेल्या सुरक्षित कामाच्या दाबासंबंधीचीही माहिती उपलब्ध करून दिली पाहिजे.

(दोन) पूर्ववर्ती पोटनियमात सांगितल्याप्रमाणे माहिती उपलब्ध न झाल्यास सिलिंडरचे वय दर्शविणारा इतर कोणताही सबळ पुरावा व्यवस्थापकाने सादर केला पाहिजे. मुख्य निरीक्षक, त्याजकडे व्यवस्थापक प्रस्तुत करील अशा लेखी किंवा तोंडी पुराव्यावरून किंवा निरीक्षक दाखल करील अशा कोणत्याही इतर पुराव्यावरून सिलिंडरचे वय ठरवील आणि अशा रीतीने ठरविलेले वय, या नियमाच्या प्रयोजनासाठी त्या सिलिंडरचे वय आहे असे समजले जाईल.

(ब) (एक) सार्वाक्षिग सिलिंडरच्या कवचाची किमान जाडी जतजशी शक्य होईल तसतशी प्रत्यक्ष मोजली पाहिजे.

(दोन) जर सार्वाक्षिग सिलिंडरच्या चालू स्थितीतील काळात त्याच्या कवचाला कोणत्याही वेळी छिद्र पडून ती छिद्र पडलेला भाग बंद करण्यासाठी सिलिंडरची दुरुस्ती करणे आवश्यक असेल तर, जेथे असे छिद्र किंवा भोक पडले असेल तेथील अशा छिद्राच्या किंवा भोकाच्या जवळील कवचाच्या पत्र्याची जाडी ही एखाद्या सक्षम व्यक्तीकडून मोजली गेली पाहिजे आणि नमुना १३ मध्ये त्याची नोंद ठेवली पाहिजे.

(क) (एक) कोणत्याही सार्वाक्षिग सिलिंडरचा कामाचा दाब ते कारखान्यात प्रथम उपयोगात आणले असेल त्यावेळी त्याच्या निर्मात्याने शिफारस केलेल्या कामाच्या दाबापेक्षा अधिक असता कामा नये.

(दोन) पाचपेक्षा अधिक वर्षांपासून जे वापरात आहे अशा एखाद्या सार्वाक्षिग सिलिंडरचा सुरक्षित कामाचा दाब पुढील तीन पद्धतींनी मोजला पाहिजे



आणि तीन पैकी ज्या कोणत्याही पद्धतीने सर्वांत कमी आकडा येईल तो आकडा सार्वाक्षिग सिलिंडरचा सुरक्षित कामाचा दाब असल्याचे समजले पाहिजे.

(अ) सार्वाक्षिग सिलिंडरचा सुरक्षित कामाचा दाब आणि ती प्रथम वापरात आणला गेला असेल त्यावेळचा मूळ सुरक्षित कामाचा दाब यामधील प्रमाण, प्रथम वापराच्या वेळी त्याच्या कवचाच्या पत्र्याची मूळ जाडी आणि त्यानंतर कोणत्याही वेळी प्रत्यक्ष मोजलेली कवचाच्या पत्र्याची किमान जाडी यामधील प्रमाणाएवढेच असले पाहिजे.

(ब) प्रत्यक्ष मोजलेल्या किमान जाडीच्या आधारे सार्वाक्षिग सिलिंडरचा सुरक्षित कामाचा दाब मोजला पाहिजे म्हणजे कवचातील ताणाचा जोर कवचाच्या पत्र्याकरिता ठरविलेल्या सुरक्षित कामाच्या ताणापेक्षा अधिक होणार नाही. पर कवच तांब्याचे केलेले असेल तर कामाचा ताणाचा जोर दर चौरस सेंटी मीटरला २५० किलो ग्रॅमहून अधिक धरता कामा नये.

(क) सार्वाक्षिग सिलिंडर वापरण्यास सुरवात केल्यापासून पहिल्या पाच वर्षांनंतर, दरवर्षी सार्वाक्षिग सिलिंडरचा सुरक्षित कामाचा दाब मूळच्या कामाच्या दाबाच्या ४ प्रतिशतनी कमी केला पाहिजे

(ड) कोणतेही सार्वाक्षिग सिलिंडर, ते प्रथम वापरात आणल्यापासून पंचवीस वर्षांपेक्षा अधिक कालावधीपर्यंत वापरण्याचे चालू ठेवता कामा नये.

परंतु आणखी असे, की मुख्य निरीक्षक, कारखाने यास, दुरुस्ती करण्यात आल्यानंतर आणि सिलिंडरचा वापर सुरक्षितपणे करणे शक्य आहे असे दर्शविणारे त्याचे समाधान होईल असे आणखी तपशील उपलब्ध असतील तर, सार्वाक्षिग सिलिंडरचा २५ वर्षांनंतर, आणखी पाच वर्षे वापर करण्याचा अधिकार देता येईल.

(ई) निरीक्षकास, लेखी आदेश काढून, ज्या कारखान्यात सिलिंडर वापरात आहे अशा कारखान्यात कर्मचारी नाही अशा व्यक्तीकडून सिलिंडरच्या तपासणीचा नमुना १३ यांतील अहवाल, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत हजर करण्याचा व्यवस्थापकास निदेश देता येईल.

(११अ) (एक) जेथे कोणत्याही कारखान्यात पेंडीपासून तेलबियांपासून किंवा इतर कोणत्याही पदार्थांपासून तेल गाळण्यासाठी ज्वालाग्राही विद्रावक वापरले जातात, हाताळले जातात किंवा त्यावर कोणत्याही प्रकारे प्रक्रिया केली जाते अशा ठिकाणी सक्षम व्यक्तीने, या प्रक्रियेसंबंधातील माहीत असलेल्या सर्वोत्तम पद्धतीनुसार संयंत्र, यंत्रसामग्री किंवा इतर साधनसामग्री बनविलेली आहे,

तयार केली आहे आणि उभारली आहे असे प्रमाणित केल्याशिवाय संयंत्राचे काम सुरू करता कामा नये.

(दोन) ज्या यंत्रचालकांनी संयंत्र चालवण्याचे प्रशिक्षण घेतलेले आहे व ज्यांना त्याची पूर्ण माहिती करून देण्यात आलेली आहे आणि ज्यांना सक्षम व्यक्तीने ते संयंत्र, यंत्रसामग्री किंवा साधनसामग्री ताब्यात घेण्यास योग्य व्यक्ती म्हणून प्रमाणित केले आहे अशा यंत्रचालकांच्याच केवळ ताब्यात ते संयंत्र, यंत्रसामग्री किंवा साधनसामग्री असली पाहिजे आणि दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीस संयंत्र यंत्रसामग्री किंवा साधनसामग्री चालविण्यास परवानगी देता कामा नये. हे यंत्रचालक कब्जेदाराचे नियमित कर्मचारी असतील व कोणत्याही बाबतीत हे कंत्राटी कामगार म्हणून कामावर लावलेले असणार नाहीत.

(तीन) संयंत्रातील कोणताही कमजोरपणा किंवा झीज, तूट निर्धारित करण्यासाठी प्रत्येक बारा महिन्यांतून एकदा त्याची सक्षम व्यक्तीकडून तपासणी केली जाईल. नंतर ती सक्षम व्यक्ती हे संयंत्र कामाच्या दृष्टीने सुरक्षित स्थितीत आहे किंवा नाही, आणि संयंत्र व साधनसामग्री कारखान्यातील कामगारास निर्धोकपणे वापरता येईल याची खात्री करण्यासाठी त्याच्या मते करणे आवश्यक असतील अशा कोणत्याही उपाय योजना व अशा उपाय योजना केव्हा करावयाच्या तो कालावधी या संबंधीच्या आपल्या शिफारशींसह अशा तपासणीचा अहवाल निरीक्षकास प्रस्तुत करील.

(चार) अशा संयंत्रावर काम करणाऱ्या कामगाराच्या जीवाला किंवा सुरक्षिततेला निकटवर्ती धोक्यास कारणीभूत होणारा किंवा कारणीभूत होण्याची शक्यता असेल असा कोणताही दोष सक्षम व्यक्तीस आढळल्यास सक्षम व्यक्ती तावडतोब त्या संबंधीचा अहवाल मुख्य निरीक्षक कारखाने यांजकडे सादर करील आणि कामगारांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी त्याच्या मते आवश्यक असलेल्या उपाय योजना त्यामध्ये नमूद करील.

(पाच) पूर्वी सांगितल्याप्रमाणे संयंत्र, यंत्रसामग्री किंवा यांची कोणतीही दुरुस्ती सक्षम व्यक्तीच्या प्रत्यक्ष देखरेखीशिवाय करता कामा नये आणि तशा प्रकारची सूचना निरीक्षकास पाठवल्यानंतरच केली पाहिजे. जेव्हा आवश्यक ती दुरुस्ती केली जाईल तेव्हा संयंत्राची दुरुस्ती समाधानकारकरीत्या करण्यात आली आहे अशा सक्षम व्यक्तीने दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत निरीक्षकाकडे पाठविली पाहिजे.

(सहा) जेथे ज्वालाग्राही द्रावकाच्या मदतीने तेल गाळणे चालू असेल अशा कारखान्याच्या जागेत वापरलेल्या सर्व विद्युत मोटर्स, विद्युत तार-पद्धती, दिवे, स्विचेस, परिपथ छेदके आणि इतर विद्युत साधन सामग्री ज्वालारोधक बांधणीची असली पाहिजे. जेथे ज्वालाग्राही विद्रावक अरण्याचा संभव असेल अशा निरनिराळ्या टाक्या आणि पात्रे धरून संयंत्राचे धातूचे सर्व भाग आणि विद्युत-संचारीत करणे आवश्यक नसतील असे विद्युत साधनसामग्रीचे सर्व भाग, अशा भागाच्या संभाव्य विद्युत शक्तीत जमिनीच्या संभाव्य शक्तीच्यावर होणारी आकस्मिक वाढ टाळण्यासाठी यथोचितरीत्या जमिनीशी जोडले पाहिजेत.



(सात) जेथे ज्वालाग्राही विद्रावक उपयोगात आणले जातात अशा कारखान्यात किंवा कारखान्याच्या भागात किंवा अशा कारखान्याच्या १० मीटर परिघात कोणत्याही व्यक्तीस धूम्रपान करण्यास किंवा आगपेटी किंवा अनावृत्त ज्योत किंवा विस्तव नेण्यास मुभा देता कामा नये. वर विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे ज्या क्षेत्राच्या परिघात धूम्रपान करण्यास किंवा आगपेटी किंवा अनावृत्त ज्योत किंवा विस्तव नेण्यास प्रतिबंध सूचना प्रवेशद्वारावर लावली असेल ती मर्यादा सीमांकित केली पाहिजे.

स्पष्टीकरण — या पोटनियमाच्या प्रयोजनाकरिता सक्षम व्यक्ती ही कमीत कमी भारताच्या अभियंता संस्थेची सभासद किंवा मुख्य निरीक्षक कारखाने याने मान्यता दिलेल्या जबाबदारीच्या जागेवरील दहा वर्षांच्या अनुभवासह त्या संस्थेची सहयोगी सभासद असली पाहिजे.

परंतु असे, की या पोटनियमाच्या खंड (दोन) च्या प्रयोजनासाठी तेले किंवा चरबी यांचे विशेषीकृत ज्ञान असलेला, कोणत्याही तेल गाळण्याच्या संयंत्राचा किमान पाच वर्षांचा अनुभव असलेला, रसायन अभियांत्रिकी किंवा रसायन तंत्रशास्त्र या विषयाचा पदवीधर सुद्धा सक्षम व्यक्ती म्हणून समजला जाईल.

परंतु आणखी असे की, राज्य शासनास इतर कोणतीही अर्हता, त्याच्या मते ती पूर्वी सांगितलेल्या अर्हतेच्या समतुल्य असल्यास स्वीकारता येईल.

(१२) मुख्य निरीक्षकास, तपासणी संबंधीचे उपबंध आवश्यक नाहीत किंवा व्यवहार्य नाहीत अशा तऱ्हेची पात्रांची बनावट किंवा वापर आहे असे मानण्यास सयुक्तिक कारण असेल, तर आवश्यक असतील अशी शर्ती घालून, सर्व वाग पात्रांना यांपैकी कोणत्याही किंवा सर्व नियमांपासून सूट देता येईल.

(१३) या नियमांतील कोणतीही गोष्ट

(अ) भारतीय बाष्पक अधिनियम १९२३ च्या कक्षेत येणाऱ्या कोणत्याही पात्रास,

(ब) दाबाखाली असलेल्या संपीडित वायूचा किंवा द्रवरूप केलेल्या किंवा विरघळलेल्या वायूचा साठा करण्यासाठी किंवा ते वाहून नेण्यासाठी वापरलेल्या सिलिंडरच्या धातूच्या बाटल्या यांना लागू होणार नाही.

कलम ३४, पोटकलम (२) अनुसार विहित केलेले नियम]

६६. अति वजनाचे ओझे – (१) कोणत्याही स्त्रीने किंवा तरुण व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीची मदत घेतल्याखेरीज पुढील अनुसूचित दिलेल्या कमाल वजनाच्या मर्यादेपेक्षा जास्त वजन असलेले कोणतेही सामान, वस्तू, हत्यार किंवा उपयंत्र, हाताने किंवा डोक्यावरून उचलता, वाहून नेता किंवा हलविता कामा नये.

अनुसूची

| व्यक्ती | सामान, वस्तू, हत्यार किंवा उपयंत्र यांचे कमाल वजन |
|---|---|
| (अ) प्रौढ स्त्री | ३० किलो ग्रॅम |
| (ब) पौगंड पुरुष | ३० किलो ग्रॅम |
| (क) पौगंड स्त्री | २० किलो ग्रॅम |
| (ड) मुलगा | १६ किलो ग्रॅम |
| (ई) मुलगी | १३ किलो ग्रॅम |

(२) कोणत्याही स्त्रीने किंवा पौगंड व्यक्तीने इतरांबरोबर हाताने किंवा डोक्यावरून कोणतेही सामान, वस्तू, हत्यार किंवा उपयंत्र जर त्याचे वजन ते उचलणाऱ्या, वाहून नेणाऱ्या किंवा हलविणाऱ्या व्यक्तींपैकी कोणत्याही व्यक्तीसाठी पोटनियम (१) च्या अनुसूचीवरून ठरवलेल्या सर्वांत कमी वजनास ते उचलणाऱ्या, वाहून नेणाऱ्या किंवा हलविणाऱ्या व्यक्तींच्या संख्येने गुणून जे वजन येईल त्या वजनापेक्षा जास्त असेल तर, ते उचलता, वाहून नेता किंवा हलविता कामा नये.

कलम ३५ अनुसार विहित केलेले नियम

६७. डोळ्यांचे संरक्षण – वस्तू निर्माण प्रक्रियेत किंवा प्रक्रियांच्या अगदी जवळ कामावर लावलेल्या व्यक्तींच्या संरक्षणाकरिता कार्यक्षम पडद्यांची किंवा योग्य गॉगल देण्याची तरतूद केली पाहिजे. त्या प्रक्रिया पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) प्रक्रिया चालू असतांना उडालेल्या कणांनी किंवा तुकड्यांनी डोळ्यांना अपाय होण्याचा धोका असलेल्या यासोबत जोडलेल्या अनुसूची १ यांत विनिर्दिष्ट केलेल्या प्रक्रिया.

(ब) अतिशय उजेडाकडे पाहावे लागल्यामुळे डोळ्यांना धोका पोहोचत असलेल्या यासोबत जोडलेल्या अनुसूची २ यांत विनिर्दिष्ट केलेल्या प्रक्रिया.



## अनुसूची १

(१) वीटा, दगड, कॉन्क्रीट, लोह फोड करता येईल अशी हाताने वापरावयाची, हातोडा, छिन्नी अशी हत्यारे किंवा यांत्रिक शक्तीने चालविण्याची कढीची हत्यारे आणि शुष्क घर्षण करणारी फिरती चाकी, यामुळे पूर्वीच्या प्रकरणी, सांगितल्याप्रमाणे, तुकडे पडून कामगाराकडे प्रक्रिया चालू असताना फेकले जातात–

(२) चाक, चाती यांचा पृष्ठभाग खडबडीत करणारे हाताने चालवावयाचे धातूचे शुष्क घर्षण करणारे हत्यार, यांत्रिक शक्तीने चालवावयाचे धातूचे हत्यार

(३) धातू, विटा, दगड, कॉन्क्रीट किंवा यांत्रिक शक्तीने चालणारी जलद वेगाची करवत किंवा यांत्रिक शक्तीवर चालणारी हत्यारे यामुळे प्रक्रिया चालू असताना कामगारांच्या तोंडावर धातूचे तुकडे उडणे शक्य होते.

(४) प्रक्रिया चालू असताना कामगाराचे तोंडावर, धातूचे टनिपचे वेळेस धातूचे तुकड उडणे शक्य होते.

(५) घर्षीच्या हत्याराने होणारे घर्षणाचे वेळी प्रक्रिया चालू असताना कामगाराचे तोंडावर तुकडे उडणे शक्य होते;

(६) विद्युत, ऑक्सी-ॲसीटीलिन किंवा तत्सम धातूची जोडणी, तोडणी प्रक्रिया

(७) ज्वाला जोडणीचे बर्नर किंवा हवेचा प्रकाशस्रोत आणि धातू सांधणी करणारे उष्ण पोलाद

(८) धातूचे तुकडे फेकणारे, यांत रवतं, गेटस व रायझर्स समाविष्ट आणि फेटिंग चालू असताना मेटल कास्टिंगचे फेटिंग

(९) धातूचे तुकडे करणे टोक करणे, कापणे किंवा शीत रिव्हेट, नट, बोल्ट पिन, कॉलर किंवा तत्सम वस्तू कोणत्याही बांधणीपासून किंवा पात्रापासून किंवा बांधणीच्या किंवा पात्राच्या कोणत्याही भागापासून कापून काढणारी हत्यारे जसे हातोडा छिन्नी, पंच किंवा इतर तत्सम हस्तवस्तू किंवा यांत्रिक शक्तीवर चालणारी हलकी हत्यारे,

(१०) चकरा करणे, कीस पाडणे किंवा सवले पाडणे, रंगविणे, स्केलिंग करणे, गंज काढणे, किंवा धातूच्या पृष्ठभागावरील तीव्र घर्षकापासून काढणे आणि यांत्रिक शक्तीने काढणारी टणक वा हाताने चालवावयाची हत्यारे,

(११) धातूचे तुकडे करणारी हत्यारे, जसे हातोडा किंवा यांत्रिक शक्तीवर चालणारी हत्यारे

(१२) प्रक्रिया चालू असताना कामगाराच्या डोक्यावर उडणारे धातूचे, तुकडे, भाग, अथवा

(१३) फोर्जिंग निर्मितीचे कामात किंवा अशा हातोड्यापासून काम करावे लागत नाही अशा कोणत्याही व्यक्तीचे कामात, अशा परिस्थितीत व पद्धतीत करावयाचे कामात, काम त्याच्या कामात वापरावयाचे ड्रॉप हॅमर (घण) किंवा यांत्रिक (घण) हॅमर,

(१४) धातू वितळवणापासून डोळ्यांना धोका पोहोचतो असे भट्टी-जवळील काम,

(१५) धातू वितळवणाऱ्या भर प्रवाह,

(१६) उष्ण धातूच्या केंद्रीपासून डोळ्यांना धोका पोहोचेल असे काम.

(१७) अॅक्रेलिक्स् आकाचे टर्निंग किंवा ड्रेसिंग

(१८) उघड्या पात्राची हाताळणी किंवा कवच वॉशिंगचे निर्वातक किंवा आतून निसटणारा द्रव किंवा द्रावणवस्तु आणि कृति, किंवा पात्राचे, किंवा पात्राच्या निर्वाहून कोणत्याही भागाचे की ज्यांत असे अॅसिड, द्राव, वस्तु आहेत, की जे पात्र, पात्राचे भाग धोक्यापासून प्रतिरोध अशा बांधणीचे, विलगीकरण, संकोचीकरण किंवा दाब किंवा अन्यथा तशा पद्धतीचे असे असल्याविना असतील.

(१९) इतर कोणतीही प्रक्रिया की डोळ्यांना प्रक्रिया चालू असताना धातूचे तुकडे उडून इजा होईल.

## अनुसूची २

(१) धातूची जोडणी व कापणी करणारी विद्युत, ऑक्सी–अॅसीटीलिन किंवा तत्सम प्रक्रिया.

(२) अतिरिक्त प्रकाश किंवा इन्फ्रारेडचे परीभ्रमण यामुळे धोका पोहोचेल असे भट्टी जवळील काम.

(३) अतिरिक्त प्रकाश, इन्फ्रारेडचे परिभ्रमण यामुळे धातूचे रोलिंग, कास्टिंग किंवा फोर्जिंगची धोका पोहोचेल अशी प्रक्रिया.

(४) अतिरिक्त प्रकाश किंवा अल्ट्रा–व्हायोलेट, किंवा इन्फ्रारेड परीभ्रमण यापासून डोळ्यांना इजा पोहोचेल अशी धोक्याची कोणतीही प्रक्रिया.

६८. मॅन होल्सची किमान लांबी रुंदी – ज्यात व्यक्तींना प्रवेश करावा लागेल आणि ज्यात अपायकारक धूर इतक्या प्रमाणात असेल, की त्यामुळे त्या व्यक्ती व्याकूळ होण्याचा धोका निर्माण होईल असा प्रत्येक कक्ष, टाकी, पाईप,



मोठे पिप, धुराडे किंवा इतर बंदिस्त जागा यांमधून बाहेर पडण्याची इतर परिणामकारक साधने नसतील तर तेथे काटकोनी, लांब वर्तुळाकार किंवा वर्तुळाकार मॅनहोल्सची तरतूद केली पाहिजे, आणि ती –

(अ) काटकोनी किंवा लंब वर्तुळाकार मॅनहोल्सच्या बाबतीत ४० सें. मीटरपेक्षा कमी लांब आणि ३० सें. मीटरपेक्षा कमी रुंद असता कामा नये.

(ब) वर्तुळाकार मॅनहोल्सच्या बाबतीत ४० सें. मीटर व्यासाहून कमी व्यासाची असता कामा नये.

कलम ३७ पोट कलम (५) अन्वये सूट

६९. सूट – कलम ३७, पोटकलम (४) च्या आवश्यक बाबी कोणत्याही कारखान्यात करण्यात येत असलेल्या पुढील प्रक्रियांना लागू असणार नाहीत (अ) पुढील शर्तींना अधीन राहून विद्युत सांधकामाच्या प्रक्रियेने केलेले वलयांकित वायुधारकाच्या दुरुस्तीचे काम–

(एक) वातावरणाच्या दाबापेक्षा अधिक दाबातील वेगवेगळे किंवा मिश्रित केलेले असे फक्त पुढील वायू वायुधारकामध्ये भरलेले असले पाहिजेत, ते येणे प्रमाणे–टाऊन गॅस, कोक ओव्हन गॅस, प्रोड्यूसर गॅस, ब्लास्ट फरनेस गॅस किंवा ते तयार करताना वापरलेले हवेखेरीज इतर वायू–

परंतु असे की, ज्यात अॅसेटिलीन आहे किंवा ज्यात अॅसेटिलीन हेतुपूर्वक टाकले आहे असे वायूचे मिश्रण भरलेल्या वायुधारकांना ही सूट लागू असणार नाही.

(दोन) सांधकाम हे फक्त विद्युत सांधकाम प्रक्रियेनेच केले पाहिजे. आणि ते कार्यक्षम व्यक्तीच्या सतत देखरेखीखाली अनुभव असलेल्या कामगारांनी केले पाहिजे.

(ब) उष्णतेचा उपयोग करून पोलादाच्या किंवा घडीव लोखंडाच्या मॅस-मेन्स आणि सर्व्हिस कापण्याची किंवा जोडण्याची, पुढील शर्तींस अधीन राहून केलेली कामे–

(एक) मेन किंवा सर्व्हिसेस उघड्या हवेच्या ठिकाणी असली पाहिजेत आणि त्यात वातावरणाच्या दाबापेक्षा अधिक दाबातील वेगवेगळे किंवा मिश्रित केलेले पुढील वायू असले पाहिजेत ते येणे प्रमाणे–टाऊन गॅस, कोक ओव्हन गॅस, प्रोड्यूसर गॅस, ब्लास्ट फरनेस गॅस, किंवा ते तयार करताना वापरलेले हवेखेरीज इतर वायू.

(दोन) मेन किंवा सर्व्हिसेस, अॅसिटिलिन आहे किंवा ज्यात अॅसिटिलीन हेतुपूर्वक टाकले असेल असा कोणताही वायू किंवा वायूचे मिश्रण असता कामा नये

(तीन) उक्त काम अनुभव असलेल्या व्यक्तीने किंवा व्यक्तींनी केले पाहिजे आणि (उक्त काम करीत असलेल्या व्यक्ती धरून) गॅस मेन्सच्या कामाचा अनुभव असलेल्या आणि १८ वर्षे वयावरील कमीत कमी दोन व्यक्ती काम चालू असताना हजर असल्या पाहिजेत.

(चार) काम करण्याची जागा कोणत्याही ज्वालाग्राही किंवा स्फोटक वायूपासून किंवा वाफेपासून मुक्त असली पाहिजे.

(पाच) जेव्हा एखाद्या कामाच्या संबंधात उष्णतेचे साधन म्हणून ॲसिटिलिन वायूचा उपयोग करण्यात येत असेल तेव्हा तो, नळकांड्यांत सच्छिद्र पदार्थात दाबून भरला पाहिजे; आणि

(सहा) गॅस मेन किंवा वाहिन्यांना कोणतीही ज्योत लावण्यापूर्वी गॅस मेन किंवा वाहिन्यांना छिद्र किंवा भोक पाडले पाहिजे आणि बाहेर पडणारा गॅस पेटविला पाहिजे.

(क) पुढील शर्तींना अधीन राहून कोणत्याही जहाजावर विद्युत सांधकामाच्या प्रक्रियेने टाकी दुरुस्त करण्याचे काम–

(एक) टाकीमध्ये जे काही तेल असेल त्या तेलाचा फ्लॅश पॉइंट (बंद कपात मापणी घेतल्यास) १५०° फॅरन हीटपेक्षा कमी असता कामा नये आणि सक्षम विश्लेषकाकडून त्या अर्थाचे प्रमाणपत्र मिळविले पाहिजे.

(दोन) विश्लेषकाने दिलेले प्रमाणपत्र निरीक्षकाला किंवा कामावर लावलेल्या किंवा जहाजावर काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला तपासणी करण्याकरिता उपलब्ध असले पाहिजे.

(तीन) सांधण्याचे काम, जी जागा.

(अ) तेलापासून किंवा पेट घेईल इतक्या प्रमाणात सांडलेल्या तेलापासून मुक्त असेल आणि

(ब) टाकीतील तेलाच्या पृष्ठभागापासून अगदी जवळच्या भागाखाली ३० सें. मीटरपेक्षा कमी नसेल अशा जागी टाकीच्या फक्त बाहेरच्या भागावर केले पाहिजे आणि–

(चार) सांधकाम फक्त सांधकाम पद्धतीने केले पाहिजे; आणि ते सक्षम व्यक्तीच्या सतत देखरेखीखाली अनुभव असलेल्या कामगारांनी केले. पाहिजे.

कलम ३८ पोटकलम (१) अनुसार विहित केलेले नियम.

७०. आगीच्या प्रसंगी बाहेर निघून जाण्याचे मार्ग (१) प्रत्येक कारखान्यात कामावर लावलेल्या व्यक्तीसाठी आगीच्या प्रसंगी बाहेर निघून जाण्याच्या पुरेशा



मार्गांची तरतूद केली पाहिजे. आणि वरील गोष्टींच्या सामान्यतेस हानी न पोहोचविता–

(अ) कारखान्याच्या इमारतीच्या प्रत्येक खोलीचा तिचा आकार आणि तेथे कामावर लावलेल्या व्यक्तींची संख्या लक्षात घेता, आगीच्या प्रसंगी उपयोग करण्यासाठी जरी ते अशा उपयोगापुरते मर्यादित नसले तरी प्रत्येक व्यक्तीला तिच्या कामाच्या जागेपासून बाहेर जाण्याच्या मार्गापर्यंत वाजवीरीत्या मोकळी आणि अडथळा नसलेली वाट मिळेल अशा स्थितीत असलेल्या पुरेशा बाहेर जाण्याच्या मार्गाची तरतूद करण्यात आली पाहिजे.

(ब) आगीच्या प्रसंगी उपयोग करण्यासाठी असलेला बाहेर जाण्याचा कोणताही मार्ग, ९० सें. मीटरपेक्षा कमी रुंद किंवा १९५ सें. मीटरपेक्षा कमी उंच नसला पाहिजे.

(क) एका मजल्यापेक्षा जास्त मजले असलेल्या आणि ज्यात एकावेळी वीस व्यक्तींपेक्षा कमी व्यक्ती काम करतात अशा प्रत्येक कारखान्याच्या इमारतीला किंवा कारखान्याच्या इमारतीच्या भागाला तळमजल्यावर सरळ अडथळ्याशिवाय येण्यासाठी मार्ग मिळेल अशा रीतीने इमारतीच्या आतून अगर बाहेरून कायम बसविलेला निदान एक मजबूत जिना असला पाहिजे.

(ड) ज्या कारखान्याच्या इमारतीत किंवा कारखान्याच्या इमारतीच्या भागामध्ये वीस किंवा अधिक व्यक्ती कोणत्याही एका वेळी तळमजल्याच्या पातळीच्या वरील जागेत काम करीत असतील किंवा ज्यात स्फोटक किंवा अती ज्वालाग्राही पदार्थ उपयोगात आणण्यात किंवा त्यांचा साठा करण्यात येत असेल किंवा जी तळमजल्याच्या खाली असेल अशा कारखान्याच्या इमारतीच्या किंवा कारखान्याच्या इमारतीच्या भागाच्या बाबतीत बाहेर जाण्याच्या मार्गात तळमजल्यावर अडथळ्याशिवाय सरळ येण्यासाठी मार्ग मिळेल अशा रीतीने इमारतीच्या आतून किंवा बाहेरून कायम बसविलेल्या निदान दोन स्वतंत्र व मजबूत जिन्यांच्या समावेश असला पाहिजे.

(इ) कारखान्यातील ज्या जिन्याने आगीच्या प्रसंगी बाहेर जाण्याचा मार्ग मिळतो अशा प्रत्येक जिन्यास मजबूत हातकठडा असला पाहिजे. जिन्याची एक बाजू उघडी असेल तर तो त्या बाजूला असला पाहिजे आणि जर जिन्याच्या दोन्ही बाजू उघड्या असतील तर असा हातकठडा दोन्ही बाजूला असला पाहिजे.

(२) अधिनियम संमत झाल्याच्या तारखेनंतर बांधण्यात आलेल्या किंवा कारखाना म्हणून उपयोगात आणलेल्या इमारतीच्या बाबतीत, खालील जादा आवश्यक गोष्टी लागू होतील.

(ब) तरतूद केलेल्या जिन्यांपैकी निदान एक जिना अग्निप्रतिबंधक सामानाचा असला पाहिजे.

(ड) कारखान्याच्या इमारतीच्या आतील प्रत्येक उत्थलनयंत्र मार्ग किंवा लिफ्ट मार्ग यांस आग प्रतिबंधक सामानाचे संपूर्ण कुंपण घातले पाहिजे आणि उत्थलनयंत्र किंवा लिफ्ट याकडे जाणाऱ्या सर्व मार्गांस अग्निप्रतिबंधक सामानाचे दरवाजे बसविले पाहिजेत.

परंतु असे की, अशा कोणत्याही उत्थलनयंत्र मार्गास किंवा लिफ्ट मार्गास वरच्या भागावर आगीने सहज फुटेल अशा कोणत्याही सामानाचे कुंपण घातले पाहिजे. किंवा वरच्या भागात एका दाराची व्यवस्था केली पाहिजे.

(क) आगीपासून बचाव करण्याचा कोणताही जिना समांतर रेषेपासून ४५° पेक्षा अधिक कोन होईल अशा रीतीने बांधता कामा नये.

(ड) आगीपासून बचाव करण्याचा जिना मजल्याच्या कोणताही भाग बाहेर पडण्याचा मार्ग म्हणून असेल त्या भागापासून जाण्यायेण्याच्या मार्गाच्या बाजूला ४५ मीटरच्या आत असला पाहिजे.

(इ) कोणताही जिना ९० सें. मीटरपेक्षा कमी रुंद असता कामा नये.

कलम ३८, पोट कलम (७) अनुसार विहित केलेले नियम

७१. कामगारांच्या बहुत गिरणीकरिता बाहेर पडण्याचे मार्ग – नियम ७० मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कापसाच्या बहुत गिरणीत निदान दोन सोपी-स्वार मातीचे उत्तर किंवा दोन मजल्यांमध्ये विटांच्या किंवा आगप्रतिबंधक पदार्थांच्या दोन जिन्यांची तरतूद केलेली असली पाहिजे.

७१-अ जेथे कोणत्याही प्रक्रियेत पेंडीपासून, तेलबियांपासून किंवा इतर कोणत्याही पदार्थांपासून तेल काढण्यासाठी ज्वालाग्राही विद्रावक वापरावयाचा, हाताळावयाचा किंवा त्यावर कोणत्याही प्रकारे प्रक्रिया करावयाचा उद्देश असेल त्या प्रत्येक कारखान्यात संबंधित स्थानिक प्राधिकरणाचा कोणताही मुख्य अग्निशामक दल अधिकारी असल्यास, त्याच्याशी विचारविनिमय करून जिल्हा दंडाधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या अग्निशमन उपकरण संच ठेवण्याची तरतूद केली पाहिजे.

७१-ब अग्निशमन उपकरण संच आणि पाणी पुरवठा – (१) प्रत्येक कारखान्यात पुढील अग्निशमन उपकरण संचाची तरतूद केली पाहिजे व तो सुस्थितीत ठेवला पाहिजे.



(अ) प्रत्येक मजल्यावर किमान चार बादल्या, या शर्तींच्या अधीन प्रत्येक १०० चौ. मीटर क्षेत्रफळ असलेल्या जमिनीसाठी ९ लीटरपेक्षा कमी क्षमता नसेल अशा दोन अग्निशामक बादल्या.

(ब) या पोटनियमान्वये तरतूद केलेली प्रत्येक बादली.

(एक) योग्य त्या भारतीय प्रमाण विनिर्देशाशी अनुरूप असली पाहिजे.

(दोन) निरीक्षकाने मान्यता दिलेल्या स्थितीत ठेवली पाहिजे आणि अग्निशमनाच्या प्रयोजनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी तिचा वापर करता कामा नये.

(तीन) नेहमी पाण्याने पूर्ण भरलेली असली पाहिजे.

परंतु असे, की मुख्य आगीचा धोका ज्वालाग्राही द्रवपदार्थांपासून किंवा इतर पदार्थांपासून उद्भवत असेल आणि तेथे पाण्याचा करता वापर येणे शक्य नसेल तर ती बादली स्वच्छ बारीक कोरडी वाळू दगडचुरा (स्टोनडस्ट) किंवा इतर जड पदार्थाने भरलेली असली पाहिजे.

परंतु असे, की जेव्हा निरीक्षकाचे असे मत असेल, की कारखान्याच्या इमारतीत किंवा खोलीत इतर पुरेशा अग्निशमन उपकरण संचाची तरतूद केलेली आहे, तेव्हा एक लेखी प्रमाणपत्र देऊन असे प्रमाणपत्र त्याला त्याच्या स्वेच्छा निर्णयाने रद्द करता येईल त्यात त्या इमारतीच्या किंवा खोलीच्या संबंधात वरील आवश्यक गोष्टी कोणत्या मर्यादेपर्यंत शिथिल करण्यात आल्या आहेत याचा निर्देश करता येईल.

(२) प्रत्येक कारखान्यात अग्निशमनासाठी पाणी पुरवठ्याची पुरेशी तरतूद केली पाहिजे आणि जेथे खाली उल्लेखिलेल्या सूत्रात परिगणित केलेल्याप्रमाणे प्रत्येक मिनिटाला ५५० लीटर किंवा त्याहून अधिक पाणी आवश्यक असेल तेथे विजेवर चालणाऱ्या पुरेशा क्षमतेच्या ट्रेलर पंपाची तरतूद केली पाहिजे व ते सुस्थितीत ठेवले पाहिजेत.

प्रत्येक मिनिटाला आवश्यक असलेले पाणी, लीटरमध्ये–

सूत्र (अ) कारखान्याच्या सर्व इमारतीतील गॅलरीसह सर्व मजल्यांचे एकूण क्षेत्र चौरस मीटरमध्ये

(ब) सर्व मजले, आणि ज्या ठिकाणी ज्वलनशील साधनसामग्री हाताळली जाते किंवा साठविली जाते अशा सर्व खुल्या जागांसह मोकळ्या यांचे एकूण क्षेत्र–चौरस मीटर मध्ये–

(क) अग्निशामक नळीच्या वर १५ मीटरपेक्षा अधिक असलेल्या सर्व मजल्यांचे एकूण क्षेत्र चौरस मीटरमध्ये–

(ड) अग्निरोधक बांधकाम असलेल्या मजल्याव्यतिरिक्त सर्व इमारतींच्या सर्व मजल्यांचे एकूण क्षेत्र चौरस मीटरमध्ये–

$$\text{या सूत्राप्रमाणे} = \frac{\text{अ} + \text{ब} + \text{क} + \text{ड}}{२०}$$

परंतु असे, की वेगवेगळ्या मजल्यांचे अग्निरोधक बांधकाम कोणत्याही आगविषयक संस्थेने किंवा आग विमा कंपनीने अशा रीतीने प्रमाणित केले असले पाहिजे; परंतु ज्या क्षेत्रात आग लागली असता पाण्याचा वापर करण्याची आवश्यकता नसेल अशी ब, क, किंवा ड, खालील क्षेत्रे परिगणनेच्या प्रयोजनासाठी निम्मे म्हणून मोजता येतील.

परंतु आणखी असे, की जेथे ब, क, किंवा ड, खालील क्षेत्रे ही कोणत्याही आगविषयक संस्थेद्वारे किंवा आग विमा कंपनीद्वारे मान्यता मिळालेल्या कायम अशा स्वयंचलित अग्निशामक संच मांडणीद्वारे संरक्षित केलेले असतील तेथे अशी क्षेत्रे परिगणनेच्या प्रयोजनासाठी निम्मे म्हणून मोजता येतील.

परंतु आणखी पुन्हा असे, की जेथे कारखाना हा प्रस्थापित शहर किंवा नगर अग्निशमन सेवेपासून ३ कि. मी पेक्षा अधिक नाही इतक्या अंतरावर असेल तेथे वरील सूत्रानुसार येणाऱ्या पाण्याच्या प्रमाणावर आधारलेली पाणी खेचण्याची क्षमता २५ % ने कमी करता येईल. परंतु पोटनियम (७) अन्वये आवश्यक असलेल्या पाणी पुरवठ्याची परिगणना करताना ही घट हिशेबात धरली जाणार नाही.

(३) प्रत्येक ट्रेलर पंपाबरोबर अनुसूची 'अ' अनुसार साधनसामग्री पुरविली पाहिजे. अशी साधनसामग्री जे भारतीय मान्य विनिर्देश अस्तित्वात असतील त्यांच्याशी जुळती असली पाहिजे.

(४) ट्रेलरपंप हे वेगळ्या छपरीत ठेवले पाहिजेत ही छपरी कारखान्याच्या मुख्य धोक्याच्या जागेच्या जवळपास असलेल्या पाणी पुरवठ्याच्या मुख्य मार्गाजवळ असली पाहिजे.

(५) ज्या कारखान्यातील क्षेत्र, ट्रेलरपंप वाजवी वेळात माणसांनी ओढून नेणे शक्य नाही अशा प्रकारचे असेल तेथे दर चार ट्रेलर पंपाकरिता एक या प्रमाणात खेचण्याचे साधन जोडलेले असेल असे करून ठेवले पाहिजे. किमानपक्षी एक तरी वाहन नेहमीच उपलब्ध असले पाहिजे.

(६) पोटनियम (२) मध्ये आवश्यक असल्याप्रमाणे निदान १०० मिनिटे पाण्याचा सतत झोप चालू राहाण्यासाठी पाणी पुरवठ्याची तरतूद केली पाहिजे.



या पाणी पुरवठ्यापैकी निदान ५० टक्के किंवा ४५,००० लीटर, यांपैकी जे कमी असेल, तितका पाणी पुरवठा करण्यासाठी, पुरेशा क्षमतेची, (प्रत्येकी किमान ४५००० लीटर) टाकी, कारखान्यातील आगीच्या संभाव्य धोक्याच्या जागा लक्षात घेऊन कारखान्याच्या भोवती कायम बांधलेली असली पाहिजेत. जेथे नळामधून पाणी पुरवठ्याची तरतूद केली असेल तेथे मुख्य नळाचा व्यास १५ सें. मी. पेक्षा कमी असता कामा नये आणि त्याची ०.७ कि. चौ. सें. पेक्षा कमी नाही इतक्या दाबाखाली दर मिनिटास ४५००० लीटर इतका पाणी पुरवठा करण्याची क्षमता असली पाहिजे.

(७) (एक) ज्या कारखान्यातील जमिनीचे क्षेत्रफळ १०० चौरस मीटरपेक्षा जास्त आहे आणि जेथे ज्वालाग्राही द्रवपदार्थ, विद्युत् साधनसामग्री व ज्वलनक्षम धातू यांखेरीज इतर दहनशील पदार्थांमुळे आग लागण्याचा संभव असेल तेथे अंकित किंवा तशाच स्वरूपाच्या हस्तचाही अग्निनिर्वापक यांची तरतूद केली पाहिजे. अशी अग्निनिर्वापके प्रत्येक ५०० चौ. मीटर क्षेत्रफळासाठी एक या प्रमाणात ३० मीटरहून अधिक नाही अशा अंतरा-अंतराने ठेवली पाहिजेत; मात्र, पोटनियम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे आग विझवण्यासाठी ठेवलेल्या बादल्यांव्यतिरिक्त किमान एका अग्निनिर्वापकाची तरतूद करणे आवश्यक आहे.

(दोन) ज्या कारखान्यात ज्वालाग्राही द्रव पदार्थ वंगण किंवा रंगलेप यांमुळे आग लागण्याचा संभव असेल, तेथे खंड (अ) मध्ये ठरवून दिलेल्या प्रमाणात तरतूद करावयाच्या अग्निनिर्वापकामध्ये फोम कार्बन टेट्राक्लोराईड, ड्राय पावडर, कार्बन डाय ऑक्साईड, क्लोरोब्रोम मिथेन या योग्य असेल असा इतर तत्सम पदार्थ असला पाहिजे. (पाण्यात विरघळणाऱ्या ज्वालाग्राही द्रव पदार्थांच्या बाबतीत, अग्निनिर्वापक अल्कोहोल टाईप फोमच्या स्वरूपात असतील.)

(तीन) ज्या कारखान्यात विद्युत साधनसामग्रीमुळे आग लागण्याचा संभव असेल तेथे खंड (एक) मध्ये दिलेल्या प्रमाणानुसार तरतूद करावयाच्या अग्निनिर्वापकात कार्बन-डाय-ऑक्साईड, ड्राय पावडर, कार्बन टेट्राक्लोराईड किंवा तत्सम प्रकारचा पदार्थ असला पाहिजे.

(चार) ज्या कारखान्यात मॅग्नेशियम, ॲल्युमिनियम किंवा झिंक डस्ट किंवा इतर ज्वलनक्षम धातूंच्या किसामुळे आगी लागण्याचा संभव असेल तेथे द्रव पदार्थ, कार्बन-डाय-ऑक्साईड आणि फोमच्या स्वरूपातील निर्वापकाचा वापर करण्यास मनाई असली पाहिजे आणि अशी आग विझवण्यासाठी स्वच्छ बारीक कोरडी वाळू, दगड चुरा किंवा इतर जड पदार्थ यांचा पुरेसा पुरवठा तयार ठेवला पाहिजे.

(पाच) प्रत्येक प्रकारचे हस्तवाही निर्वापक निरीक्षकाने मान्य केलेल्या स्थितीत भरून ठेवले पाहिजे.

परंतु असे, की कारखान्याच्या इमारतीत किंवा खोलीत कोणत्याही मान्यता प्राप्त अग्निसंस्थेने किंवा आग विमा कंपनीने मान्यता दिलेल्या इतर पुरेशा अग्निशमन उपकरणसामग्री किंवा कायम स्वरूपाच्या स्वयंचलित अग्निशमन यंत्र मांडणीची तरतूद केलेली आहे असे मुख्य निरीक्षकाचे मत असेल तर, त्याला त्या इमारतीच्या किंवा खोलीच्या संबंधात वरील आवश्यक असलेल्या गोष्टी किती मर्यादेपर्यंत शिथिल करण्यात आल्या आहेत हे विनिर्दिष्ट करणारे लेखी प्रमाणपत्र देता येईल. (असे प्रमाणपत्र त्याला त्याच्या स्वेच्छानिर्णयाने रद्द करता येईल.)

(८) (अ) पोटनियम (७) अन्वये तरतूद करावयाचा प्रत्येक हस्तवाही अग्निशामक-

(एक) भारतीय मानक विनिर्देशांशी जुळता असला पाहिजे.

(दोन) तो प्रभारीत करून (चार्ज) वापरासाठी तयार ठेवला पाहिजे. निरीक्षकाने मान्यता दिलेल्या स्थितीत चढवून ठेवला पाहिजे व त्यासोबत ते वनविणाऱ्यांनी त्याच्या वापरासंबंधी दिलेल्या छापील सूचना असल्या पाहिजेत.

(तीन) बनविणाऱ्याच्या शिफारशीनुसार त्यांची ठराविक काळाने तपासणी केली पाहिजे. चाचणी घेतली पाहिजे. किंवा तो विप्रभारित केला पाहिजे.

(ब) प्रत्येक कारखान्याच्या व्यवस्थापकाने कारखान्यात तरतूद केलेल्या प्रत्येक प्रकारच्या अग्निनिर्वापकासाठी पुरेसा संवेष्ठ जादा प्रभरणे ठेवली पाहिजेत व ती सुस्थितीत राखली पाहिजेत; मात्र प्रत्येक कारखान्यात कमीत कमी १२ प्रभरणे नेहमी संग्रही असली पाहिजेत आणि तत्काळ मिळण्याजोगी असली पाहिजेत.

(९) प्रत्येक कारखान्यात सर्व अग्निशमन साधनसामग्री योग्य स्थितीत ठेवण्यास व त्यांची निगा राखण्यास जबाबदार राहील अशा एका प्रशिक्षित अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली पाहिजे.

(१०) कोणत्याही कारखान्याच्या किंवा कारखान्याच्या भागाच्या संबंधात असे अपुरा पाणी पुरवठा, उत्पादन प्रक्रिया क्वचित प्रसंगी खंडित होणे किंवा लेखी नमूद करण्याची इतर कारणे यासारख्या अपवादात्मक परिस्थितीमुळे नियमाच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही अटी कामगारांच्या संरक्षणासाठी लेखी आदेशाद्वारे (जो त्याच्या स्वेच्छानिर्णयाने त्यास रद्द करता येईल) विहित करील अशा शर्तींस अधीन राहून त्याला अशा आदेशाद्वारे या नियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदीपासून अशी कारखान्यास किंवा त्याच्या भागास सूट देता येईल.



## अनुसूची ३

### ट्रेलर पंपासाठी साधन सामग्री

(अ) लहान ट्रेलर पंपासाठी – (६८० लिटर / मिन) रिचसह ९ मीटर लांबीचे आरमर्ड सक्शन होस –

(ब) मोठ्या ट्रेलर पंपासाठी – (१८०० लिटर / मिन) रिचसह ९ मीटर लांबीची आरमर्ड सक्शन होस –

| अनुक्रम | साधन सामग्री | वरील नमूद केलेल्या "अ" साठी नग | वरील नमूद केलेल्या "ब" साठी नग |
|---|---|---|---|
| १ | धातूचे सक्शन स्ट्रेनर | १ | १ |
| २ | बास्केट स्ट्रेनर | १ | १ |
| ३ | सक्शन कलेक्टिंग हेड | टू-वे १ | थ्री. वे १ |
| ४ | सक्शन ॲडॉप्टर | १ | १ |
| ५ | विवक रिलीज कपलिंगसह २५ मीटर लांबीच्या अनलाइण्ड ७५ मि. मी. डिलीव्हरी होस- | १० | १४ |
| ६ | डिव्हाइडिंग ब्रीचींग पीस | १ | १+१ कलेक्टींग ब्रीचींग पीस |
| ७ | १५ मि. मी. नोझेलस ब्रँच पीसह | २ | २५ मि. मी. चे एक २० मि. मी.ची दोन व डिफ्युझक नोझल असलेले ब्रँच पाईप्स एफ-एम ४ |
| ८ | ब्लँक कॅपसह स्टॅण्ड पाईप | १ | २ |
| ९ | हैड्रन्ट की | १ | २ |
| १० | पटीच्या कॅम्प्रहसच्या बावल्या | ४ | ६ |
| ११ | कटिंग गेजसह फायर हुक (डिव्हेडर) | १ | १ |
| १२ | एक लिटर क्षमतेचे सी. टी. सी. निर्वापक | १ | १ |
| १३ | २५ मि. मी. चा ३० मीटर लांबीचा मॅनिलादोर | १ | ५० मि. मी. चा-१ ३० मीटर लांबीचा |

| अनुक्रम | साधन सामग्री | "अ" साठी नग | "ब" साठी नग |
|---|---|---|---|
| १४ | ९ मीटरपर्यंत वाढवता येईल अशी शिडी | १ | १ |
| १५ | रबरी हातमोजे | १ जोड | १ जोड |
| १६ | मोठी कुऱ्हाड | १ | १ |
| १७ | फावडे मोठे | १ | १ |
| १८ | कुदळ | १ | १ |
| १९ | पहार | १ | १ |
| २० | करवत | १ | १ |
| २१ | कंदील | १ | १ |
| २२ | बॅटरी | १ | १ |

टीप – जर मुख्य निरीक्षक, कारखाने, यांस असे आढळून येईल, की कोणत्याही कारखान्यात श्वसन–उपकरण–संचाची तरतूद करणे आवश्यक आहे तर त्यास लेखी आदेशाद्वारे कब्जेदारास लहान ट्रेलर पंप किंवा यथास्थिति मोठा ट्रेलर पंप यांच्या साधनसामग्रीबरोबरच योग्य श्वसन–उपकरण–संच पुरवण्यास फर्मावता येईल.

कलम ४१ अनुसार विहित केलेले नियम

७२. शिड्या – पट्टे बदलण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सर्व शिड्या, त्या कामासाठी खास तयार केलेल्या व त्या कामासाठी राखून ठेवलेल्या असल्या पाहिजेत व त्यांना गळ किंवा जेणे करून घसरणार नाही असे परिणामकारक साधन लावण्याची तरतूद केली पाहिजे. ज्या शिड्यांना गळांची तरतूद केलेला असेल त्या शिड्यांना गळ अशा सोयीस्कर बसवलेले असले पाहिजेत, की ते गळ शिडीचे खालचे टोक जमिनीवर टेकून ठेवलेले असेल, तेव्हा वापटवर धरू शकतील.

७३. मूलगतिजनकावर काम करणाऱ्या कामगारांना संरक्षण – (१) प्रत्येक कारखान्यात, मूलगतिजनकाला तेल देण्याचे किंवा मूलगतिजनक चालवण्याचे काम करण्यासाठी ज्यास प्राधिकृत करण्यात आले असेल आणि ज्याचे नांव नमुना १० मध्ये ठेवलेल्या नोंदवहीत नोंदवलेले असेल, अशा फक्त विशेषरीत्या प्रशिक्षित प्रौढ पुरुष कामगारानेच असे काम केले पाहिजे.

(२) अशा प्रत्येक कामगाराने मूलगतिजनकाला तेल देत असताना किंवा त्यावर काम करीत असताना घट्ट बसणारे कपडे घातले पाहिजेत.

(३) पोट नियम (२) अन्वये घट्ट बसणारे कपडे घालणे आवश्यक असलेल्या कामगाराला, कब्जेदाराने, कपडे पुरविण्याची तरतूद केली पाहिजे आणि



त्यामध्ये निदान घट्ट बसणाऱ्या लांडया चड्ड्यांची एक जोडी, कर्या बाह्यांचे सदरे किंवा बंड्या यांची एक जोडी अंतर्भूत असली पाहिजे. असे कपडे कब्जेदारास नोकरीच्या संपुष्टनानंतर किंवा नवीन कपडे पुरविताना परत केले पाहिजेत.

७३. (अ) सलबंधित वायुधारकाची सुरक्षितता – (१) या नियमात, वायुधारक या संज्ञेचा अर्थ ज्याची साठवण क्षमता १४० घन मीटरपेक्षा जास्त नाही असे पात्र आणि ज्यामध्ये साठ्याच्या पात्राच्या स्थिर व हलत्या भागातील सलबंधामुळे नियंत्रित दाबाने वायू साठविला जातो असे ज्वालाग्राही वायूचा साठा करण्यासाठी वापरले जाणारे पात्र, असा होतो. आणि त्यात मुख्य निरीक्षक, अशा पात्रांजवळ काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या नियमाचे उपबंध ज्यास लागू होतील असे जाहीर करील अशा लहान आकाराच्या पात्राचाही समावेश होतो.

(२) प्रत्येक वायुधारक –

(अ) चांगल्या बांधणीचा, बळकट साहित्याचा पुरेसा मजबूत आणि कोणत्याही उघड दोषांपासून मुक्त असला पाहिजे, आणि

(ब) योग्य तऱ्हेने सुस्थितीत ठेवला पाहिजे.

(३) (अ) वायुधारकासंबंधीची तपशीलवार माहिती नमुना १३ अ यातील नोंदवहीत नोंदल्याशिवाय–

(ब) त्याच्या अंतर्गत आणि बाह्य तपासणीचे नमुना १३ यातील प्रमाणपत्र कारखानदाराकडून किंवा अशी तपासणी करण्यास सक्षम असलेल्या व्यक्तीकडून मिळवल्या शिवाय, आणि–

असे प्रमाणपत्र कब्जेदाराच्या ताब्यात असल्याशिवाय कोणत्याही कारखान्यामध्ये कोणत्याही वायुधारकाचा प्रथम वापर करता कामा नये.

(४) कोणत्याही कारखान्यात दोन किंवा अधिक वायुधारक बसवलेले असतील अशा बाबतीत प्रत्येक वायुधारकांवर विभेदक क्रमांक किंवा अक्षरे ठळक रीतीने लिहिलेली असली पाहिजेत. कोणत्याही वायुधारकास दोन किंवा अधिक लिफ्ट असल्यास, अशा लिफ्टवरही विभेदक क्रमांक किंवा अक्षर लिहिलेले असले पाहिजे.

(५) वायुधारकाची कोणतीही लिफ्ट अंतिम अधिसूचनेच्या तारखेपूर्वी १० वर्षाहून अधिक काळापासून उपयोगात असेल, तर अशा प्रत्येक वायुधारकाची–

(अ) जर त्याची मागील दोन वर्षात तपासणी केली असेल तर, दोन वर्षांच्या आंत;

(ड) जर उपरोक्त तारखेपूर्वी मागील दोन वर्षांत तपासणी केली नसेल तर, एक वर्षाच्या आत, अंतर्गत आणि बाह्य तपासणी केली पाहिजे.

(६) प्रत्येक वायुधारकाची दर बारा महिन्यांच्या कालावधीमध्ये एकदा, तपासणी करण्यास सक्षम असलेल्या व्यक्तीकडून बाह्यतः परिपूर्णपणे तपासणी करून घेतली पाहिजे.

(७) प्रत्येक वायुधारकाची चार वर्षांच्या कालावधीमध्ये निदान एकदा तरी, अशी तपासणी करण्यास सक्षम असलेल्या व्यक्तीकडून अंतर्गत तपासणी करून घेतली पाहिजे.

स्पष्टीकरण – (अ) या पोट नियमाच्या प्रयोजनासाठी वायुधारकाच्या अंतर्गत तपासणीमध्ये वायुधारकाच्या बाजू आणि शिरोभाग यांसह त्याच्या पत्र्यांच्या जोडांची इलेक्ट्रॉनिक साधनांनी आणि इतर अचूक साधनांनी केलेल्या तपासणीचा समावेश होतो.

(ब) इलेक्ट्रॉनिक साधने उपलब्ध नाहीत याबद्दल मुख्य निरीक्षकाची खात्री झाल्यास त्यास वायुधारकाच्या बाजू व शिरोभाग यांचा पत्रा कापून तो नमुना म्हणून घेण्याची परवानगी देता येईल.

परंतु असे की हे नमुने प्रातिनिधिक नमुने आहेत याबद्दल निरीक्षकाची खात्री झाली नाही तर, त्यास त्याची खात्री होईपर्यंत आणखी नमुने कापण्याचा निदेश देता येईल.

(क) खंड (ब) अनुसार नमुना म्हणून कापलेल्या प्रत्येक तबकडीवर, कापल्याची तारीख आणि वायुधारकाच्या कोठल्या भागापासून कापण्यात आली हे दर्शवून ओळख पटण्यासाठी ती यथोचितरीत्या चिन्हांकित केली पाहिजे. असे नमुने पुढील निरीक्षणाचे वेळी सदृश तबकड्या पुन्हा कापून घेईपर्यंत निरीक्षणासाठी, चटकन उपलब्ध होतील अशा रीतीने ठेवले पाहिजेत.

(८) संरचना ढासळण्याच्या, वायूच्या स्फोटाच्या आणि वायूमुळे व्यक्ती गुदमरून जाण्याच्या धोक्याबाबत घ्यावयाच्या आवश्यक त्या सावधगिरीसंबंधीचे आपले ज्ञान, अनुभव आणि प्रशिक्षण यामुळे अशा कामावर देखरेख करण्यास जी व्यक्ती सक्षम असेल त्या व्यक्तीची या कामावर देखरेख असल्याखेरीज, कोणताही वायुधारक दुरुस्त करता कामा नये किंवा पाडून टाकता कामा नये.

(९) कब्जेदाराने किंवा व्यवस्थापकाने योग्य रीत्या सही केलेली, नमुना १३ ब यातील एक कायमची नोंदवही वायुधारकाच्या बनावटीचा तपशील दर्शविणाऱ्या रेखाचित्रासह ठेवली पाहिजे.



(१०) वायुधारकाची तपासणी करण्यास सक्षम असलेल्या व्यक्तींच्या अहवालाची प्रत नमुना १३ ब मध्ये ठेवली पाहिजे.

७३. (ब) पोलिमरायझिंग किंवा क्युरिंग यंत्र – इमल्शन टेक्निक कापडावर छपाई करताना जेव्हा पोलिमरायझिंग किंवा क्युरिंग यंत्रामधून प्रक्रिया केली जाते तेव्हा खालीलप्रमाणे सावधगिरी बाळगिली पाहिजे.

(एक) छापील वस्त्रे, पोलिमरायझिंग यंत्रातून जाऊ देण्यापूर्वी वस्त्रे सुकविण्याच्या हवेद्वारे किंवा उष्ण धूममार्गातून किंवा इतर तितक्याच परिणामकारक साधनाद्वारे पूर्णपणे कोरडी केली पाहिजे.

(दोन) निष्कासन झडप किंवा वातनियंत्रक यावर छिद्राची किंवा द्वाराची तरतूद केली पाहिजे. त्यामुळे त्याचा निदान दोन तृतीयांश भाग नेहमी उघडा राहील.

(तीन) छपाई चालू असताना यंत्राचे अवरक्त किरण तापक (इन्फ्रारेड रे हिटर) बंद केले पाहिजेत.

(चार) विद्युत तापक स्वतंत्र परिपथास (सेपरेट सर्किट) जोडले पाहिजेत आणि संकटकाळी ते पूर्णपणे बंद पडले आहेत याची खात्री करून घेण्यासाठी त्यावर आवरोलिखन स्विचची तरतूद केली पाहिजे.

(पाच) बहिःसर्जक पंख्याची गती मुख्य यंत्राच्या गतीशी अशा तऱ्हेने गुंतविली पाहिजे, की जर बहिःसर्जक मोटर थांबली तर तापन साधना सह यंत्र-सुद्धा थांबेल.

(सहा) तपमान विनियमित करण्यासाठी विद्युत तापकास उष्णतामान (थर्मोस्टार) असला पाहिजे त्यामुळे उष्णतामानपूर्वी ठरविलेल्या मूल्याहून (प्री सेट व्हॅल्यू) अधिक वाढल्यास तापक आपोआप बंद होतील.

(सात) स्फोट झाल्यास उघडतील व धूम बाहेर जाईल याकरिता यंत्राच्या माथ्यावर पुरेशा झडपांची तरतूद केली पाहिजे.

(आठ) फिल्टर गॉझ आठवड्यातून निदान एकदा तरी स्वच्छ केला पाहिजे.

(नऊ) बहिःसर्जक वाहिनी आठवड्यातून एकदा तरी स्वच्छ केली पाहिजे.

(दहा) यंत्राच्या वही बेल्ट ड्राईव्हचा ताण प्रत्येक आठवड्याला तपासला पाहिजे.

(२) कब्जेदाराने किंवा व्यवस्थापकाने नियुक्त केलेल्या व स्फोटाच्या धोक्याबाबत घ्यावयाच्या आवश्यक त्या सावधगिरीसंबंधी अनुभव व ज्ञान यामुळे देखरेख करण्यास योग्य असलेल्या जबाबदार व्यक्तीच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली यंत्र तपासले पाहिजे.

(३) पोटनियम (२) अन्वये केलेल्या निरनिराळ्या तपासणीचा तपशील असणारी एक नोंदवही ठेवली पाहिजे तीमध्ये आणि तपासणीची नोंद केली पाहिजे आणि ती मध्ये केलेल्या प्रत्येक नोंदीवर तपासणी करणाऱ्या व्यक्तीची सही असली पाहिजे.

७३. (क) ज्या कारखान्यात ज्वालाग्राही पदार्थ असलेली साधनसामग्री किंवा नळमार्ग चालविण्यात येतात अशा कारखान्यातील सुरक्षिततेच्या उपाययोजना – जेव्हा कोणत्याही कारखान्यात ज्वालाग्राही द्रवपदार्थ किंवा वायू असलेली साधनसामग्री किंवा नळमार्ग उघडण्याचे काम करावयाचे असते तेव्हा पुढील तरतुदींचे पालन केले पाहिजे. त्या तरतुदी पुढीलप्रमाणे–

(एक) अशा कामासंबंधीचा परवाना देण्याची पद्धत सुरू केली पाहिजे आणि अशी साधनसामग्री किंवा नळमार्ग यांत ज्वालाग्राही वायू किंवा द्रवपदार्थ नाही असे प्रमाणित केल्या खेरीज कोणत्याही व्यक्तीस त्यात प्रवेश करण्यास किंवा ते उघडण्यास परवानगी देता कामा नये.

(दोन) अशी साधनसामग्री किंवा नळमार्ग उघडण्याचे काम, पुढील कामे पूर्ण केल्याशिवाय आणि कारखान्याच्या प्रक्रिया विभागाच्या प्रभारी पर्यवेक्षकाने ती तपासल्याशिवाय, सुरू करता कामा नये.

(एक) बंद करण्याचे कार्य–दुरुस्तीसाठी किंवा परीक्षणासाठी उघडावयाच्या साधनसामग्रीत किंवा नळमार्गात दुरुस्तीचे किंवा परीक्षणाचे काम चालू असताना कोणत्याही परिस्थितीत कोणताही ज्वालाग्राही वायू किंवा द्रवपदार्थ शिरणार नाही अशा रीतीने ती साधनसामग्री किंवा नळमार्ग बंद करण्यात आला पाहिजे. प्रक्रिया विभागाच्या पर्यवेक्षकाने ही कामे जातीने तपासली पाहिजेत व त्यानुसार प्रमाणपत्र दिले पाहिजे.

(दोन) वहूप्रावनाची कामे (पर्जिंग ऑपरेशन्स) – प्रक्रिया विभागाचा पर्यवेक्षक, साधन सामग्रीतून किंवा नळमार्गातून सर्व ज्वालाग्राही पदार्थ काढून टाकण्यात आला आहे याची खात्री करून घेण्यासाठी साधन सामग्री किंवा नळमार्ग वाफ सोडण्याची किंवा जोराने पाणी सोडून धुण्याची प्रक्रिया पार पाडील व तसा अवचि प्रमाणपत्र देईल.

(तीन) (१) साधनसामग्री उघडणे – अशी साधनसामग्री किंवा नळमार्ग उघडण्याचे काम ज्याच्याकडे आहे किंवा अशी साधनसामग्री किंवा नळमार्ग ज्वालाग्राही पदार्थापासून मुक्त असल्याबद्दल ज्याला प्रक्रिया विभागाच्या पर्यवेक्षका कडून प्रमाणित करून घ्यावयाचे आहे अशा कारखान्याच्या अभियांत्रिकी विभागाचा पर्यवेक्षक ही दोन्ही कामे पूर्ण झाल्याबद्दल स्वतःची खात्री करून घेईल आणि प्रक्रिया विभागाच्या पर्यवेक्षकाने दिलेल्या कामाच्या परवान्यावर सही करील.



(२) कारखाना व्यवस्थापनाच्या सुरक्षाविषयक सूचनानुसार अशा कामाच्या ठिकाणास हॉट लाईन्स असल्यास, त्या योग्य प्रकारे झाकलेल्या आहेत हे तपासून खात्री करून घेणे ही प्रक्रिया विभागाचा पर्यवेक्षक व अभियांत्रिकी विभागाचा पर्यवेक्षक यांची संयुक्त जबाबदारी राहील. कामाच्या परवान्यात या कामासंबंधीची एक विशिष्ट नोंद करण्यात येईल व त्यावर दोन्ही पर्यवेक्षक सही करतील.

(चार) साधन सामग्री किंवा नळमार्ग उघडण्याच्या दृष्टीने सुरक्षित आहे याची खात्री करून घेण्यासाठी जबाबदार व्यक्तीने वायू चाचणी घेतल्यावरीच चालू स्थितीतील साधन सामग्रीचा किंवा नळमार्गाचा कोणताही भाग उघडता कामा नये.

(पाच) ज्या कामगाराच्या कपड्यास ज्वालाग्राही पदार्थाचा संसर्ग पोहोचला आहे अशा कोणत्याही कामगारास चालू स्थितीतील साधनसामग्री किंवा नळमार्ग उघडण्याचे काम चालू असेल अशा ठिकाणी काम करण्यास परवानगी देता कामा नये.

(सहा) सुरक्षा अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी, रितसर कामाच्या परवान्याच्या आधारावर स्वैर तपासणीची पद्धती अनुसरतील आणि कोणत्याही गंभीर स्वरूपाच्या उणिवा उघड कारखान्याच्या व्यवस्थापकास कळवतील.

(सात) अशा साधनसामग्रीचे किंवा नळमार्गाचे सर्व निचऱ्याचे प्रणाल, ज्वालाग्राही द्रव किंवा वायू कोणत्याही प्रकारे उडू नये म्हणून वदारात चालतेले राहातील.

(आठ) साधनसामग्री उघडण्याची किंवा सुरू करण्यापूर्वी अग्निशमन कार्याचे प्रशिक्षण घेतलेली विशिष्ट व्यक्ती उपलब्ध राहील याबद्दल खात्री करून घेतली पाहिजे आणि साधनसामग्री उघडण्याचे कार्य चालू राहील तोपर्यंत ती व्यक्ती तेथेच हजर राहील याबद्दल खात्री करून घेतली पाहिजे.

७३. ड वायू निर्मितीच्या कामातील सावधगिरीच्या उपाययोजना – ज्या कोणत्याही कारखान्यात कोळसा, तेल किंवा इतर कोणत्याही तत्सम पदार्थाच्या कार्बीकरणाद्वारे ज्वालाग्राही वायू निर्माण केला जात असेल तेथे पुढील उपबंधांचे पालन केले पाहिजे.

(एक) ज्यातून सामान्यपणे वायू वाहू दिला जातो असा साधनसामग्रीचा कोणताही नळ, झडप किंवा आवरण हे, त्या साधनसामग्रीला वायुदे वातावरणाच्या दाबापेक्षा अधिक दाबाखाली कोणत्याही ज्वालाग्राही किंवा स्फोटक वायूचा पुरवठा केला जात नाही याची खात्री झाल्याशिवाय उघडता कामा नये.

(दोन) (वायुधारक नसलेले) वायु-निर्मितीचे कोणतेही संयंत्र किंवा यंत्र-सामग्री यांच्या कोणत्याही भागाशी जोडलेला कोणताही नळमार्ग, झडप, किंवा इतर कोणतीही साधनसामग्री याची प्रत्येक प्रकारची दुरुस्ती हाती घेण्यापूर्वी, ज्या ठिकाणी असा नळ, झडप किंवा साधनसामग्री ही, कोणतीही बोल्ट व नट काढून किंवा ते एकतर यांत्रिक साधनाने किंवा उष्णतेचा उपयोग करून कापून उघडण्यात येतात, तेथे, दाबाखालील वायू पोहोचणार नाही आणि असा नळमार्ग, झडप किंवा साधनसामग्री ही वायुधारकापासून किंवा वायू उत्पन्न करणाऱ्या कोणत्याही साधनसामग्रीपासून अशा रीतीने वेगळी ठेवली पाहिजे की दाबाखालील वायू दुरुस्तीच्या ठिकाणी पोहोचणार नाही याची खात्री करून घेतली पाहिजे.

(तीन) कोणत्याही वायु निर्मितीच्या कारखान्यांतील कोणताही नळमार्ग, झडप किंवा साधनसामग्री याचे बोल्ट व नट ढिले करण्यापूर्वी किंवा असा नळमार्ग वगैरे कापण्यापूर्वी, दुरुस्तीच्या ठिकाणी दाबाखाली वायू पुरविला जाणार नाही याची खात्री करून घेण्यासाठी, त्याची सक्षम व्यक्तीकडून निश्चित पाहणी करून घेतली पाहिजे. घेतलेल्या पाहणीचा तपशील प्रमाणपत्रात नमूद केला पाहिजे आणि त्यावर सक्षम व्यक्तीने सही केली पाहिजे आणि अशा दुरुस्तीच्या कामावर लावलेल्या प्रत्येक कामगाराला त्याने मागणी केली असता वाचण्यास उपलब्ध करून दिली पाहिजे.

(चार) अशा दुरुस्तीच्या कामावर लावलेल्या आणि कोणताही नळमार्ग, झडप किंवा साधनसामग्री उघडली जात असताना त्याच्या जवळ काम करणाऱ्या प्रत्येक कामगाराला मुखावरण आणि दुरुस्तीच्या टोकापासून दूर असलेल्या दुसऱ्या टोकाकडून शुद्ध हवेचा पुरवठा होणारे श्वसनयंत्र पुरवले पाहिजे. दुरुस्तीच्या जागे-जवळ काम करताना कामगाराने श्वसनयंत्र घातलेले आहे याची खात्री करून घेतली पाहिजे.

(पाच) दुरुस्तीच्या जागेजवळ वापरल्या जाणाऱ्या विजेच्या तारा किंवा (विद्युत सांधकामाची साधनसामग्री नसलेली) इतर कोणतीही साधनसामग्री, जमिनीवर कोणतेही ट्रेलिंग केबल राहाणार नाही अशा रीतीने बसवलेली असली पाहिजे. सर्व विद्युत साधनसामग्री ज्वालारोधक प्रकारची असली पाहिजे.

परंतु असे, की या नियमाचे उपबंध उघड्या जागेत उभारलेली मेन्स व सव्हिसेस, संयंत्रे किंवा यंत्रसामग्री यांना, पुढील शर्तींस अधीन राहून, लागू होणार नाहीत–

(अ) मेन किंवा सव्हिसेस उघड्यावर असली पाहिजेत, आणि त्यात वाता-



वरणाच्या दाबापेक्षा अधिक दाबाखाली वेगवेगळे किंवा मिश्रित केलेले खालील वायू असले पाहिजेत. ते येणे प्रमाणे–

टाऊनगॅस, कोक ओव्हन गॅस, प्रोड्युसर गॅस, ब्लास्ट फरनेस गॅस, किंवा ते तयार करताना हवेखेरीज वापरलेले इतर वायू.

(ब) मेन किंवा सव्हिसमध्ये असेटिलीन किंवा ज्यात हेतुपूर्वक असेटिलीन टाकलेले आहे असा कोणताही वायू किंवा वायूचे मिश्रण असता कामा नये.

(क) हे काम एका किंवा अधिक अनुभवी व्यक्तींनी केले पाहिजे. (हे काम करणाऱ्या व्यक्तीसह) गॅसमेनच्या कामाचा अनुभव असलेल्या निदान दोन व्यक्ती काम चालू असताना तेथे हजर असल्या पाहिजेत.

(ड) हे काम करण्याची जागा, कोणत्याही ज्वालाग्राही किंवा स्फोटक वायु किंवा बाष्प यापासून मुक्त असली पाहिजे.

(इ) जेथे एखाद्या कामाच्या संबंधात असेटिलिन वायूचा उष्णतेचे साधन म्हणून वापर करण्यात येत असेल तेथे तो संपीडित करून सिलिंडरमध्ये सच्छिद्र, पदार्थांच्या आत ठेवला पाहिजे.

(फ) गॅसमेनला किंवा सव्हिसला कोणतीही ज्योत लावण्यापूर्वी, त्यास भोक किंवा छिद्र पाडले पाहिजे व बाहेर पडणारा वायू पेटविला पाहिजे.

स्पष्टीकरण – दाबाखालील वायूचा मार्ग आणि दुरुस्तीचे ठिकाण यामध्ये फुगविलेल्या पिशव्या (इन्फ्लेटेड ब्लॅडर) हाच केवळ अडथळा असेल तर, दाबा-खालील वायू–दुरुस्तीच्या ठिकाणी पोचण्याचे थांबविण्यासाठी ही उपाययोजना परिणामकारक आहे असे समजण्यात येणार नाही.

परंतु असे की, जेथे वायू झडपाची तरतूद करणे शक्य नसेल तेथे जर खाली दर्शविलेल्या प्रमाणापेक्षा अधिक नसलेल्या वायूच्या दाबाऐवजी फक्त फुगवलेल्या पिशव्या वापरल्यास, दुरुस्तीच्या ठिकाणी वायूचा दाब थांबविण्यासाठी ती एक परिणामकारक योजना असल्याचे समजण्यात येईल.

| गॅसमेन व्यास (इंचामध्ये) | जलमापनीचा दाब (इंचामध्ये) |
| --- | --- |
| ४ पर्यंत व ४ धरून | १० |
| ५ ते १० | ८ |
| ११ ते १७ | ६ |
| १८ ते २४ | ५ |
| २४ च्यावर | ३ |

आणि काम चालू असताना वर निर्दिष्ट केलेल्या मर्यादित दाबावर सतत लक्ष व नियंत्रण ठेवण्यासाठी सक्षम व्यक्ती ठेवण्यात येईल.

अशा पिचकाऱ्यांची त्या मजबूत आहेत किंवा कसे याबद्दल तेथेच चाचणी घेतली पाहिजे व त्या ठिकाणी निदान दोन बादल्यांच्या पिशव्या उपलब्ध असल्या पाहिजेत.

(२) या नियमाच्या प्रयोजनासाठी कारखान्याचा मुख्य अभियंता किंवा मुख्य अभियंत्याने सक्षम व्यक्ती म्हणून लेखी प्रमाणित केलेली व्यक्ती, ही सक्षम व्यक्ती असेल.

## प्रकरण ५

**कलम ४२, पोटकलम ( २ ) अनुसार विहित केलेले नियम–**

७४. **धुण्याच्या सोयी** – (१) प्रत्येक कारखान्यामध्ये कामावर लावलेल्या कामगारांच्या उपयोगासाठी पुरेशा व योग्य प्रकारच्या धुण्याच्या सोयींची तरतूद केली पाहिजे व त्या सुस्थितीत ठेवल्या पाहिजेत. त्यात साबण, नखे साफ करण्यासाठी कुंचले किंवा स्वच्छतेसाठी योग्य अशा इतर साधनांचा समावेश असला पाहिजे. अशा सोयी केलेल्या जागेत सोयीस्कर रीतीने जाता आले पाहिजे. आणि आणि त्या जागा स्वच्छ व सुव्यवस्थित ठेवल्या पाहिजेत आणि अशा सोयी शौचकूपे आणि मुताऱ्या यांच्या जवळपास असता कामा नयेत.

ज्या कारखान्यामध्ये १६ डिसेंबर १९५४ रोजी किंवा तत्पूर्वी धुण्याच्या सोयींची तरतूद करण्यात आली असेल अशा कारखान्या व्यतिरिक्त, जेथे जेवणाच्या अथवा विश्रांतीच्या खोल्यांची तरतूद करणे आवश्यक झाले असेल अशा कारखान्यात अशा जेवणाच्या खोल्या किंवा विश्रांतीच्या खोल्या यांच्या जवळ सोयीस्कर ठिकाणी अशा धुण्याच्या सोयी केलेल्या असल्या पाहिजेत. धुण्याच्या सोयीत एकान्त मिळेल अशा रीतीने कुंपण घातले पाहिजे, किंवा आडोसा केला पाहिजे.

परंतु असे, की जेथे पूर्ण उंची असलेली कायम बांधलेली संडास व मुताऱ्या यांपासून स्वतंत्र अशी भिंत असेल तेथे धुण्याच्या सोयींच्या ठिकाणाबाबतीत आवश्यक पूर्तता केली असल्याचे समजले जाईल.

(२) पूर्ववर्ती उपबंधाच्या सामान्यतेस हानी न पोहोचविता, धुण्याच्या सोयीत खालील गोष्टींचा समावेश असला पाहिजे.

( अ ) ६० सें. मी पेक्षा अधिक नाही इतक्या अंतरावर तोट्या किंवा फवारा तोट्या बसलेल्या पाण्याच्या डोण्या, किंवा

( ब ) तोट्या जोडण्यात आलेली मार्जन पात्रे (वॉशबेसिन्स) किंवा,

( क ) उभ्या नळांना स्टॅण्ड पाईप्सना जोडलेल्या तोट्या, किंवा



( ड ) नळांनी नियंत्रित केलेल्या तुषारनलिका ( शॉवर्स ) किंवा

( इ ) कारंजासारखी वर्तुळाकृती डोणी.

परंतु असे की निरीक्षकास कामगारांच्या गरजा व सवयी लक्षात घेऊन उपरोल्लेखित प्रकारच्या सोयी ज्या प्रमाणात केल्या पाहिजेत ते प्रमाण निश्चित करता येईल.

(३) (अ) प्रत्येक डोणीचा किंवा पात्राचा पृष्ठभाग गुळगुळीत व जलाभेद्य असला पाहिजे व त्याला सांडपाणी वाहून नेणारे नळ आणि वहुधा जोडलेला असला पाहिजे.

| कामगार संख्या | तोट्यांची संख्या | कामगार संख्या | तोट्यांची संख्या |
|---|---|---|---|
| २० पर्यंत | १ | २१ ते ३५ पर्यंत | २ |
| ३६ ते ५० पर्यंत | ३ | ५१ ते १५० पर्यंत | ४ |
| १५१ ते २०० पर्यंत | ५ | २०० पेक्षा अधिक ५०० पेक्षा कमी | ५ अधिक प्रत्येक ५० किंवा त्याच्या भागाकरिता एक तोटी. |

५०० पेक्षा जास्त – ११ अधिक प्रत्येक १०० किंवा त्याच्या भागाकरिता एक तोटी–

( ५ ) जर स्त्री कामगार कामावर लावले असतील तर त्यांच्यासाठी धुण्याच्या स्वतंत्र सोयी केल्या पाहिजेत आणि पुरुष कामगार जेथे काम करीत असतील किंवा तेथून जात येत असतील तेथून अंतर्भाग दिसणार नाही अशा रीतीने तेथे कुंपण किंवा पडदा घातला पाहिजे. अशा धुण्याच्या सोयींच्या प्रवेशद्वारावर बहुसंख्य कामगारांना समजणाऱ्या भाषेत 'फक्त स्त्रियांसाठी' अशा अर्थाची ठळक नोटीस लावली पाहिजे तसेच ही बाब चित्रांकितही केली पाहिजे.

(६) धुण्याच्या सोयींसाठी केला जाणारा पाणीपुरवठा कारखान्यात कामावर असलेल्या प्रत्येक कामगारामागे दिवसाला निदान २० लीटर इतका असला पाहिजे आणि आरोग्याधिकाऱ्याने लेखी मान्यता दिलेल्या ठिकाणापासून तो केलेला असला पाहिजे.

परंतु असे, की असा पुरवठा करणे शक्य होणार नाही अशी मुख्य निरीक्षकाची खात्री होईल, तर त्यास लेखी प्रमाणपत्राद्वारे, कारखान्यास कामावर

लावलेल्या प्रत्येक व्यक्तीमागे प्रत्येक दिवशी ५ लीटरहून कमी नाही इतक्या प्रमाणात पाण्याचा पुरवठा करण्याची परवानगी देता येईल.

कलम ४३ आणि कलम ११२ अनुसार विहित केलेले नियम

**७५. कपडे ठेवण्यासाठी व सुकविण्यासाठी सोयी**–येथे जोडलेल्या अनुसूचीत उल्लेखिलेल्या सर्व वर्गाच्या कारखान्यात, कामाच्या तासाच्या वेळी वापरण्यात न येणारे कपडे ठेवण्यासाठी व ओले कपडे सुकविण्यासाठी योग्य सोय असली पाहिजे अशा सोयीत स्वतंत्र कोठ्या, खुंट्या, कुलपाचे खण अथवा मुख्य निरीक्षकाने मान्य केलेल्या इतर व्यवस्थेचा समावेश असला पाहिजे.

## अनुसूची

| | |
|---|---|
| अग्निप्रतिरोधकी कर्मशाळा | लोखंड व पोलाद कर्मशाळा |
| तेल गिरण्या | रासायनिक कारखाने |
| मोटार घरे | चर्म संस्करणी |

कलम ४५, पोटकलम ( १ ) अनुसार विहित केलेले नियम

**७६. प्रथमोपचाराची साधने** – प्रथमोपचाराच्या पेट्या किंवा कपाटे यांना पांढरा रंग देऊन त्यावर ठळकपणे लाल रंगाने फुली काढली पाहिजे आणि त्यात पुढील वस्तू असल्या पाहिजेत.

( अ ) ज्या कारखान्यात कामावर लावलेल्या कामगारांची संख्या दहापेक्षा अधिक नसेल किंवा ( ज्या कारखान्यात यांत्रिक शक्तीचा वापर केला जात नाही अशा कारखान्याच्या बाबतीत ) कामगार संख्या ५० पेक्षा अधिक नसेल अशा कारखान्याच्या बाबतीत प्रत्येक प्रथमोपचार पेटीत किंवा कपाटात पुढील कोष्टकात दर्शविलेल्या वस्तू असल्या पाहिजेत.

( ब ) जेथे यांत्रिक शक्ती वापरली जाते आणि ज्यात कामावर लावलेल्या कामगारांची संख्या १० पेक्षा अधिक पण ५० पेक्षा अधिक नाही, अशा कारखान्यासाठी प्रत्येक प्रथमोपचाराच्या पेटीत किंवा कपाटात पुढील कोष्टकात दर्शविलेली सामग्री असली पाहिजे.

( क ) पन्नासपेक्षा अधिक कामगार कामावर असलेल्या कारखान्यासाठी प्रत्येक प्रथमोपचार पेटीत किंवा कपाटात पुढील कोष्टकात दर्शविलेली सामग्री असली पाहिजे.



| अनु-क्रमांक | सामग्री | "अ" साठी | वर नमूद केलेल्या "ब" साठी | "क" साठी |
|---|---|---|---|---|
| १ | निर्जंतुक करण्यात आलेल्या व्रणोपचार पट्ट्या – लहान आकाराच्या | ६ | १२ | २४ |
| २ | " " मोठ्या आकाराच्या | ३ | ६ | १२ |
| ३ | " " मध्यम आकाराच्या | ३ | ६ | १२ |
| ४ | भाजलेल्या भागावर लावावयाच्या निर्जंतुक केलेल्या व्रणोपचार पट्ट्या मोठ्या आकाराच्या | ३ | ६ | १२ |
| ५ | ( एक टक्का ) सेंट्रीमाईड विद्रावाची किंवा योग्य प्रतिपूतिक विद्रावाची ६० मी. मी. ची बाटली | १ | १२० मी.मी.ची १ | २०० मी.मी.ची १ |
| ६ | पाण्यात मिसळलेल्या ( २ टक्के ) मरक्युरी क्रोम विद्रावाची बाटली ६० मी. मी. ची | १ | १२० मी.मी.ची १ | २०० मी.मी.ची १ |
| ७ | खूण चिठ्ठीवर डोस आणि देण्याची पद्धती यांचा निर्देश असलेली सॅल–व्होलॅटाईलची बाटली | २० मी.मी.ची १ | ६० मी.मी.ची १ | १२० मी.मी.ची १ |
| ८ | निर्जंतुक कॉटन वूलची – १५ ग्रॅमची पाकिटे | — | ६ | १२ |
| ९ | कात्री | १ | १ | १ |
| १० | (२ सें. मी. × १ मी.) चिकट पट्टयाची गुंडाळी | १ | २ | ६ सें.×१ मी. ची १<br>२ सें×१ मी. ची २ |
| ११ | वेगळ्या सीलबंद पाकिटांत निर्जंतुक केलेले रोळ्यांच्या आवरणाचे तुकडे | ६ | २ | १२ |

| अनु-क्रमांक | सामग्री | वर नमूद केलेल्या "अ" साठी | "ब" साठी | "क" साठी |
|---|---|---|---|---|
| १२ | ॲस्पीरीनच्या किंवा इतर कोणत्याही वेदनाशामक औषधाच्या प्रत्येकी ५ ग्रेनच्या १०० गोळयांची बाटली | १ | १ | १ |
| १३ | भाजलेल्या भागावर लावावयाची मलमाची डबी | १ | १ | १ |
| १४ | डोळे धुण्यासाठी पॉलीथीनची बाटली ५०० सी. सी. | १ | १ | १ |
| १५ | सर्पदंशासाठी नश्तर (लॅन्सेट) | १ | १ | १ |
| १६ | पोटॅशियम परमॅंगनेटची ३० मि. लि. ची बाटली | १ | १ | १ |
| १७ | डायरेक्टोरेट जनरल ऑफ फॅक्टरी, ॲडव्हाईस सर्व्हिस ॲंड लेबर इन्स्टिट्यूट्स गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, मुंबई यांनी प्रकाशित केलेल्या प्रथमोपचार पर्णकाची प्रत | १ | १ | १ |
| १८ | रक्तरोधक बंध | १ | १ | १ |
| १९ | सेफ्टी पिना | — | १ | १ |
| २० | किडनी ट्रे | — | १२ | २ पाकिटे |
| २१ | १० से. मी. रुंदीच्या व ५ से. मी. रुंदीच्या मलमपट्टीच्या | — | — | १ |
| | गुंडाळ्या प्रत्येकी | — | — | १२ |
| २२ | त्रिकोणी आकाराच्या मलमपट्ट्या | — | — | ६ |



परंतु असे, की बाब १४ ते २१ वरील सामग्री –

(अ) जेथे योग्य रीतीने सुसज्ज केलेली उपचार खोली असेल, तेथे

(ब) अशा वस्तू असलेली किमान १ पेटी कलम ४५ च्या तरतुदीस सुस्थितीत ठेवली असेल तर

(क) बाब १ ते २ खाली आवश्यक असलेल्या व्रणोपचार पट्ट्यांऐवजी कारखान्यांच्या मुख्य निरीक्षकाने मान्य केलेल्या चिकट व्रणोपचार पट्ट्या आणि कारखान्यांच्या मुख्य निरीक्षकाला वेळोवेळी आवश्यक वाटलेली व त्याने शिफारस केलेली इतर सामग्री किंवा औषधे ठेवता येतील.

७७. प्रथमोपचारासंबंधीची नोटीस – प्रथमोपचाराचे प्रशिक्षण घेतलेल्या व प्रथमोपचाराच्या पेट्या किंवा कपाटे ज्यांच्या प्रभाराखाली आहेत अशा कारखान्याच्या प्रसीमांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींची नावे असलेली एक नोटीस प्रत्येक कारखान्यात ठळक जागी आणि प्रथमोपचार पेट्या व कपाटे यांच्या जवळ लावली पाहिजे. उक्त व्यक्ती जेथे भेटू शकेल अशी कामाची खोलीही नोटीस द्वारे दर्शविण्यात आली पाहिजे. उक्त नोटीसमध्ये नजिकच्या रुग्णालयाचे नाव व व दूरध्वनी क्रमांकही ठळकपणे नमूद करण्यात आला पाहिजे.

कलम ४५ पोट कलम (३) अनुसार विहित केलेले नियम

७८. उपचार खोली – (१) उपचार खोली किंवा दवाखाना हा अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीच्या प्रभाराखाली असला पाहिजे व त्याच्या मदतीस कमीत कमी एक परिचारिका व मुख्य निरीक्षक निदेश देईल असा दुय्यम कर्मचारी वर्ग असला पाहिजे.

(२) उपचार खोलीत किंवा दवाखान्यात प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव, पत्ता आणि त्याचा दूरध्वनी क्रमांकही उक्तनोटीसमध्ये ठळकपणे नमूद केला पाहिजे.

(३) उपचार खोली किंवा दवाखाना हा कारखान्याच्या इतर भागांपासून अलग असला पाहिजे आणि त्याचा उपयोग केवळ प्रथमोपचार व विश्रांती यासाठीच करण्यात आला पाहिजे. त्याचे क्षेत्र २४ घन मीटर असले पाहिजे आणि त्याच्या भिंती व जमिनी गुळगुळीत, टणक व अभेद्य असल्या पाहिजेत. या खोलीत किंवा दवाखान्यात नैसर्गिक व कृत्रिम या दोन्ही साधनांनी पुरेशी हवा खेळण्याची व उजेड येण्याची व्यवस्था केली पाहिजे. आरोग्यकारक अशा पिण्याच्या पाण्याचा पुरेसा प्रमाणात पुरवठा केला पाहिजे आणि खोलीत किमान पुढील गोष्टी तरी असल्या पाहिजेत.

| अनु-क्रमांक | सामग्री | वर नमूद केलेल्या "अ" साठी | "ब" साठी | "क" साठी |
|---|---|---|---|---|
| १२ | ॲस्पीरीनच्या किंवा इतर कोणत्याही वेदनाशामक औषधाच्या प्रत्येकी ५ ग्रेनच्या १०० गोळ्यांची बाटली | १ | १ | १ |
| १३ | भाजलेल्या भागावर लावावयाची मलमाची डबी | १ | १ | १ |
| १४ | डोळे धुण्यासाठी पॉलीथीनची बाटली ५०० सी. सी. | १ | १ | १ |
| १५ | सर्पदंशासाठी नस्तर (लॅन्सेट) | १ | १ | १ |
| १६ | पोटॅशियम परमँगनेटची ३० मि. लि. ची बाटली | १ | १ | १ |
| १७ | डायरेक्टोरेट जनरल ऑफ फॅक्टरी, ॲडव्हाईस सर्व्हिस अँड लेबर इन्स्टिट्यूट्स गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, मुंबई यांनी प्रकाशित केलेल्या प्रथमोपचार पर्णकाची प्रत | १ | १ | १ |
| १८ | रक्तरोधक यंत्र | — | १ | १ |
| १९ | सेफ्टी पिना | — | १२ | २ पाकिटे |
| २० | किडनी ट्रे | — | — | १ |
| २१ | १० सें. मी. रुंदीच्या व ५ सें. मी. रुंदीच्या मलमपट्टीच्या गुंडाळ्या प्रत्येकी | — | — | १२ |
| २२ | त्रिकोणी आकाराच्या मलमपट्ट्या | — | — | ६ |



परंतु असे, की बाब १४ ते २१ वरील सामग्री –

(अ) जेथे योग्य रीतीने सुसज्ज केलेली उपचार खोली असेल, तेथे

(ब) अशा वस्तु असलेली किमान १ पेटी कलम ४५ च्या तरतुदीस सुस्थितीत ठेवली असेल तर

(क) बाब १ ते २ खाली आवश्यक असलेल्या व्रणोपचार पट्ट्यांऐवजी कारखान्यांच्या मुख्य निरीक्षकाने मान्य केलेल्या चिकट व्रणोपचार पट्ट्या आणि कारखान्यांच्या मुख्य निरीक्षकास वेळोवेळी आवश्यक वाटलेली व त्याने शिफारस केलेली इतर सामग्री किंवा औषधे ठेवता येतील.

७७. प्रथमोपचारासंबंधीची नोटीस – प्रथमोपचाराचे प्रशिक्षण घेतलेल्या व प्रथमोपचाराच्या पेट्या किंवा कपाटे ज्यांच्या प्रभाराखाली आहेत अशा कारखान्याच्या प्रसीमांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींची नावे असलेली एक नोटीस प्रत्येक कारखान्यात ठळक जागी आणि प्रथमोपचार पेट्या व कपाटे यांच्या जवळ लावली पाहिजे. उक्त व्यक्ती जेथे भेटू शकेल अशी कामाची खोलीही नोटीस द्वारे दर्शविण्यात आली पाहिजे, उक्त नोटीसमध्ये नजिकच्या रुग्णालयाचे नाव व व दूरध्वनी क्रमांकही ठळकपणे नमूद करण्यात आला पाहिजे.

कलम ४५ पोट कलम ( ३ ) अनुसार विहित केलेले नियम

७८. उपचार खोली – ( १ ) उपचार खोली किंवा दवाखाना हा अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीच्या प्रभाराखाली असला पाहिजे व त्याच्या मदतीस कमीत कमी एक परिचारिका व मुख्य निरीक्षक निदेश देईल असा दुय्यम कर्मचारी वर्ग असला पाहिजे.

( २ ) उपचार खोलीत किंवा दवाखान्यात प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव, पत्ता आणि त्याचा दूरध्वनी क्रमांकही उक्त नोटीसमध्ये ठळकपणे नमूद केला पाहिजे.

( ३ ) उपचार खोली किंवा दवाखाना हा कारखान्याच्या इतर जागेपासून अलग असला पाहिजे आणि त्याचा उपयोग केवळ प्रथमोपचार व विश्रांती यासाठीच करण्यात आला पाहिजे. त्याचे क्षेत्र २४ घन मीटर असले पाहिजे आणि त्याच्या भिंती व जमिनी गुळगुळीत, टणक व अभेद्य असल्या पाहिजेत. या खोलीत किंवा दवाखान्यात नैसर्गिक व कृत्रिम या दोन्ही साधनांनी पुरेशी हवा खेळण्याची व उजेड येण्याची व्यवस्था केली पाहिजे. आरोग्यकारक अशा पिण्याच्या पाण्याचा पुरेसा प्रमाणात पुरवठा केला पाहिजे आणि खोलीत किमान पुढील गोष्टी तरी असल्या पाहिजेत.

(१) गरम व थंड पाणी नेहमी मिळेल अशी सोय असलेली झिलई दिलेली कुंडी

(२) गुळगुळीत पृष्ठभाग असलेले १८० सें. मी × १०५ सें. मी. चे टेबल

(३) उपकरणे निर्जंतुक करण्याची साधने

(४) एक कोच

(५) दोन कुच्चपट

(६) घट्ट झाकणाच्या दोन वाडग्या किंवा पात्रे

(७) गरम पाण्याच्या दोन रबरी पिशव्या

(८) किटली व स्पिरीटचा स्टोव्ह किंवा पाणी उकळण्याचे योग्य असे इतर साधन

(९) ९०० मी. मी. × १०० मी. मी. × ६ मी. मीच्या वाड्या १२ लाकडी फाळ्या

(१०) ३५० मि. मी. × ७५ मी. मी. × ६ मी. मी. च्या साच्या १२ लाकडी फाळ्या

(११) २५० मी. मी. × ५० मी. मी. × १२ मी. मी. च्या साच्या ६ लाकडी फाळ्या

(१२) ६ गरम ब्लँकेट्स

(१३) स्मेलिंग सॉल्ट (६० ग्रॅम)

(१४) मध्यम आकाराचे दोन स्पंज

(१५) ड्रमन्यांत लावावयाचे ३ चिमटे

(१६) स्पिरीटस् अमोनियाक ॲरोमॅटिकसची (१२० मिली लीटरची) एक बाटली.

(१७) सहा टॉवेल

(१८) चार किडनी ट्रे

(१९) टॉयलेट साबणाच्या, विशेषत: प्रतिपूतिक साबणाच्या चार वड्या

(२०) दोन काचेचे पेले व दोन मद्याचे पेले.

(२१) दोन चमचमापके

(२२) दोन चहाचे चमचे

(२३) दोन मापरेखीत मापग्लास

(२४) दोन मिनीमम माप ग्लास

(२५) डोळे धुण्यासाठी एक १०० सी. सी. धुण्याची बाटली.

(२६) २० भागात एक भाग या प्रमाणात कारबॉलिक द्रावाची (एक लीटर) १ बाटली

(२७) तीन कुबड्या

(२८) एक पडदा

(२९) एक बॅटरी

(३०) कलम ६३ (क) अन्वये विहित केलेल्या प्रमाणानुसार चार प्रथमोपचाराच्या पेट्या किंवा कपाटे

(३१) धनुर्वात प्रतिबंधक टॉक्साॅइडचा पुरेसा पुरवठा

(३२) मॉर्फिया, पेथिडीन, ॲट्रोपिन, ॲड्रेनलिन, कोरॅमिन, नोव्हेकेन या प्रत्येकाची सहा इंजेक्शने

(३३) ६० मिली लीटर द्रवरूप कोरॅमिन

(३४) ॲंटिहिस्टॅमिनिक, ॲंटीस्पॅस्मॉडिक, (प्रत्येकी) २५ गोळ्या

(३५) २ सी. सी., ५ सी. सी., ५० सी. सी. सुयांसह सिरींजेस

(३६) शस्त्रक्रियेच्या तीन कात्र्या



(३७) निडल होल्डर

(३८) स्युचरिंग सुया आणि साधने

(३९) तीन (विच्छेदन करावयाच्या) डिसेक्टींग फॉरसेप्स

(४०) व्रणोपचाराचे तीन चिमटे

(४१) स्कालपेल्स तीन

(४२) एक स्टेथोस्कोप

(४३) एक स्फिग्मोमॅनोमीटर (रक्तदाब मोजण्याचे साधन)

(४४) रबर बँडेज, प्रेशर बँडेज

(४५) आवश्यक त्या जोडण्यांसह प्राणवायूचे सिलिंडर

(४) हे नियम ज्यास लागू आहेत अशा प्रत्येक कारखान्याच्या कब्जेदाराने अपघाताच्या किंवा आजाराच्या गंभीर रुग्णांना हलविण्याच्या प्रयोजनासाठी रुग्णालयातून वाहन मिळण्याची व्यवस्था केलेली नसेल, तर कारखान्याच्या आवारात योग्य अशा वाहनाची तरतूद केली पाहिजे व ते सुस्थितीत ठेवले पाहिजे.

(५) खोलीमध्ये उपचार करण्यात आलेल्या सर्व अपघाताच्या किंवा आजाराच्या रुग्णांचे अभिलेख ठेवले पाहिजे आणि निरीक्षक किंवा प्रमाणक शल्यचिकित्सक मागणी करील तेव्हा ते हजर केले पाहिजेत.

स्पष्टीकरण – या नियमाच्या प्रयोजनासाठी 'अर्हताप्राप्त, वैद्यक व्यवसायी' म्हणजे भारतीय वैद्यकीय पदवी अधिनियम, १९१६ च्या अनुसूचीमध्ये किंवा भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ च्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकाऱ्याने मंजूर केलेली अर्हता धारण करणारी व्यक्ती–

७९. आहारगृहे – (१) जेथे सर्वसामान्यत: २५० पेक्षा अधिक कामगार कामावर लावण्यात आले आहेत आणि राज्य शासनाने या बाबतीतील अधिसूचनेद्वारे जो विनिर्दिष्ट केला आहे अशा प्रत्येक कारखान्याच्या कब्जेदाराने कारखान्यात अथवा कारखान्याजवळ, नियमात विहित केलेल्या प्रमाणानुसार पुरेसा आहारगृहाची तरतूद केली पाहिजे. हे आहारगृह अशा अधिसूचनेच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत कामगारांना वापरण्यासाठी उपलब्ध करून दिले पाहिजे.

परंतु असे, की पुरेसा कारणासाठी वेळोवेळी लेखी आदेश देऊन कोणत्याही विनिर्दिष्ट कारखान्याच्या संबंधात, उक्त मुदतीत वाढ करता येईल.

(२) कारखान्याच्या व्यवस्थापकाने, आहारासाठी बांधावयाच्या किंवा फेरफार करावयाच्या इमारतीचे व जागेचे नकाशे मुख्य निरीक्षकाच्या मान्यतेसाठी दोन प्रतीत सादर केले पाहिजेत.

(३) आहारगृहाची इमारत, शौचकूपे, मुताऱ्या, बाष्पक गृहे, कोळशाच्या राशी, राखेच्या राशी आणि धूळ, धूर किंवा अपायकारक धूम निर्माण होणाऱ्या इतर कोणत्याही जागेपासून १५ मीटरपेक्षा कमी नाही इतक्या अंतरावर असली पाहिजे.

परंतु असे, की मुख्य निरीक्षकास, कोणत्याही विशिष्ट कारखान्याच्या बाबतीत या पोटनियमाचे उपबंध, त्या परिस्थितीत वाजवी असतील तेथपर्यंत शिथिल करता येतील आणि या पोटनियमाचे आवश्यक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अंगीकारावयाच्या उपाययोजना करण्यास भाग पाडता येईल.

(४) आहारगृहाची इमारत, मुख्य निरीक्षकाने मान्य केलेल्या नकाशानुसार बांधली पाहिजे व तीत किमान भोजनगृह, स्वयंपाकगृह, साठवणाची खोली, कोठी आणि कामगारांकरिता व भांडी धुण्याकरिता स्वतंत्र धुण्याची जागा यांची सोय केलेली असली पाहिजे.

(५) आहारगृहाची जमीन व जमिनीपासून १२० सें. मी. उंचीपर्यंतच्या आतील भिंती गुळगुळीत व जलाभेद्य साहित्यापासून बनविलेल्या असल्या पाहिजेत

(६) आहारगृहाचे दरवाजे आणि खिडक्यांची बांधणी मक्षिकारोधक असली पाहिजे आणि त्याद्वारा भरपूर खेळती हवा राहिली पाहिजे.

(७) कोणत्याही व्यक्तीस आहारगृहात वाता येईल अशा सर्व वेळी आहारगृहात भरपूर उजेड असला पाहिजे.

(८) प्रत्येक आहारगृहात-

(एक) खोल्यांच्या आतील सर्व भिंती आणि सर्व छते तसेच आण्यायेण्याचे सर्व मार्ग व जिने यांना शेवटी चुना किंवा रंग दिल्याच्या तारखेपासून निदान वर्षातून एकदा किंवा बदाशिवती, तीन वर्षातून एकदा तरी चुना दिला पाहिजे किंवा रंग दिला पाहिजे.

(दोन) सर्व लाकडी सामानास शेवटी रोगण किंवा रंग दिला असेल त्या तारखेपासून तीन वर्षांनी एकदा तरी रोगण लावले पाहिजे किंवा रंग दिला पाहिजे.

(तीन) (अ) कारखान्यातील सर्व लोखंडी व पोलादी संरचनात्मक सामानाला शेवटी रंग दिल्याच्या किंवा रोगण लावण्यात आलेल्या तारखेपासून तीन वर्षांच्या आत, रंग दिला पाहिजे किंवा रोगण लावले पाहिजे.

परंतु असे, की स्वयंपाकगृहाच्या आतील भिंतीना चार महिन्यातून एकदा चुना लावलेला असला पाहिजे.

(ब) ज्या तारखेस चुना, रंग, रोगण, तैलरंग लावण्यात आला असेल त्या तारखांच्या नोंदी नमुना ८ मधील विहित नोंदवहीत केल्या पाहिजेत.

(९) आहारगृहाच्या प्रसीमा स्वच्छ व आरोग्यकारक स्थितीत राखल्या पाहिजेत. योग्य अशा झाकलेल्या गटारातून सांडपाणी दूर काढून लावले पाहिजे व त्याचा उपद्रव होईल अशा रीतीने ते साचू देता कामा नये. केरकचरा साठवण्यासाठी व त्याची विल्हेवाट लावण्यासाठी योग्य अशी व्यवस्था केली पाहिजे.



८०. भोजनगृह (१) एकाचवेळी कामावर असलेल्या कामगारांच्या किमान ३०% कामगारांची भोजनगृहात एकाच वेळी सोय झाली पाहिजे.

परंतु असे, की कोणत्याही विशिष्ट कारखान्याच्या बाबतीत किंवा कोणत्याही विशिष्ट वर्गाच्या कारखान्यांच्या बाबतीत, राज्य शासनाला या बाबतीतील अधिसूचनेद्वारे सोय करावयाच्या कामगारांच्या टक्केवारीत बदल करता येईल.

(२) जेवणाचे पदार्थ मिळण्याची (सर्व्हिस काउंटर) टेबले व खुर्च्या यांच्यातिरिक्त इतर फर्निचर वगळून, भोजनगृहाच्या जमिनीचे क्षेत्र, पोटनियम (१) मध्ये विहित केल्याप्रमाणे सोय करावयाच्या प्रत्येक जेवणाऱ्या व्यक्तीमागे १ चौरस मीटरपेक्षा इतके असले पाहिजे.

परंतु असे, की अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस अस्तित्वात असलेल्या ज्या कारखान्यामध्ये प्रत्येक व्यक्तीस एक चौरस मीटर इतक्या जागेची तरतूद करणे जागेच्या अभावी असंभवनीय होत असेल अशा कारखान्यांच्या बाबतीत प्रत्येक व्यक्तीमागे मुख्य निरीक्षक ठेवी मान्यता देईल इतक्या कमी केलेल्या जागेची तरतूद केली पाहिजे.

(३) भोजनगृहाचा भाग आणि पदार्थ मिळण्याची जागा यांच्यामध्ये विभाजन घातले पाहिजे व असा विभक्त भाग स्त्री कामगारांच्या संख्येच्या प्रमाणात त्यांच्यासाठी राखून ठेवण्यात आला पाहिजे. स्त्रियांसाठी धुण्याच्या जागा स्वतंत्र असल्या पाहिजेत आणि एकान्त मिळेल अशा रीतीने तेथे आडोसा केला पाहिजे.

(४) पोट नियम (१) मध्ये विहित केल्याप्रमाणे, सोय करावयाच्या जेवणारांसाठी पुरेशी टेबले, तिपाई, खुर्च्या व बाक उपलब्ध केले पाहिजेत.

८१. सामग्री – (१) आहारगृह कार्यक्षमतेने चालविण्यासाठी भांडी, चिनी मातीची भांडी, चाकू, सुऱ्या, फर्निचर आणि इतर आवश्यक सामग्री यांची तरतूद केली पाहिजे व ती सुस्थितीत राखली पाहिजे. आहारगृहात काम करणाऱ्या कामगारांसाठी योग्य असा स्वच्छ कपड्यांची तरतूद केली पाहिजे आणि ते व्यवस्थित ठेवले पाहिजेत.

(२) फर्निचर, भांडीकुंडी व इतर सामग्री स्वच्छ व आरोग्यकारक स्थितीत राखली पाहिजे. जर अन्नपदार्थ मिळण्याच्या जागेची सोय केलेली असेल तर तिचा पृष्ठभाग गुळगुळीत व जलाभेद्य सामानाचा असला पाहिजे. भांडीकुंडी व इतर सामग्री स्वच्छ राखण्यासाठी गरम पाणी व इतर योग्य सोयींची तरतूद केली पाहिजे.

(३) ज्या आहारगृहाची व्यवस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदणी केलेल्या किंवा नोंदणी केल्याचे मानण्यात आलेल्या सहकारी संस्थेमार्फत पाहिली जात असेल, त्या आहारगृहाच्या कब्जेदाराने, त्या आहारगृहासाठी सुरुवातीला, आवश्यक असणारी सामग्री पुरवली पाहिजे आणि असे आहारगृह चालविण्यासाठी त्यानंतर आवश्यक असलेली कोणतीही सामग्री अशा सहकारी संस्थेमार्फत पुरविण्यात येईल अशी हमी दिली पाहिजे.

८२. **किमती प्रदर्शित करणे** – आहारगृहात पुरविण्यात येणाऱ्या अन्न सामग्रीच्या प्रत्येक भागाबद्दलचा, पेयाबद्दलचा व इतर कोणत्याही बाबीबद्दलचा आकार आहारगृहात ठळकपणे प्रदर्शित करण्यात आला पाहिजे.

८३. लेखा – (१) लेख्याची सर्व पुस्तके, नोंदवह्या व आहारगृह चालविण्यासंबंधात वापरलेली इतर कोणतीही कागदपत्रे, मागणी केली असता, निरीक्षकास पुरविण्यात आली पाहिजेत.

(२) आहारगृहासंबंधीचे लेखे, नोंदलेल्या लेखापालाकडून व लेखा परीक्षकाकडून दर बारा महिन्यांनी एकदा तपासून घेतले पाहिजेत. उपरोक्त लेखा परीक्षकांनी तयार केलेला ताळेबंद, तपासलेले लेखे बंद केल्यापासून दोन महिन्याहून उशिरा नाही इतक्या मुदतीत आहारगृह व्यवस्थापन समितीकडे सादर केले पाहिजेत.

परंतु असे, की स्वतःचे लेखा विभाग असणाऱ्या सरकारी कारखान्यातील आहारगृहासंबंधीच्या लेख्यांची तपासणी अशा विभागामार्फत करता येईल.

परंतु आणखी असे, की ज्या आहारगृहाची व्यवस्था महाराष्ट्र सहकारी संस्था १९६०, अन्वये नोंदलेल्या किंवा नोंदली असल्याचे मानण्यात आलेल्या सहकारी संस्थेमार्फत पाहिली जात असेल अशा आहारगृहाच्या संबंधातील लेखे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या उपबंधानुसार तपासता येतील.

८४. व्यवस्थापन समिती (१) व्यवस्थापकाने एका व्यवस्थापन समितीची नेमणूक केली पाहिजे व पुढील गोष्टींसंबंधी वेळोवेळी तिचा सल्ला घेतला पाहिजे.

(अ) आहारगृहात पुरवावयाच्या अन्न-पदार्थांचा दर्जा व प्रमाण

(ब) उपाहारगृहाची व्यवस्था,

(क) आहारगृहातील जेवणाच्या वेळा, आणि

(ड) समिती निर्देश देईल अशा आहारगृहासंबंधातील इतर कोणतीही गोष्ट

परंतु असे, की ज्या आहारगृहाची व्यवस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदलेल्या किंवा नोंदणी केली असल्याचे मानण्यात आलेल्या

१००० [illegible]

बेटी ५ पेक्षा अधिक [illegible]

(३) व्यवस्थापनाने, [illegible] आहारगृह व्यवस्थापन समितीची निवडणूक [illegible] ठेवली पाहिजे.

(४) आहारगृह व्यवस्थापन समितीची दर दोन वर्षांनी पुनर्रचना करण्यात आली पाहिजे व पूर्वीच्या व्यवस्थापन समितीने नवीन समिती कार्यभार स्वीकारीपर्यंत अधिकारपदावर असले पाहिजे.

८५. पुरवावयाची अन्नसामग्री व आकारावयाच्या किमती – (१) अन्नसामग्रीपैकी कोणत्याही पदार्थास सर्वसाधारण मागणी आहे याबद्दल मुख्य निरीक्षकाची खात्री झाल्यास, त्यास लेखी आदेशाद्वारे असा पदार्थ आहारगृहामध्ये पुरवण्यात यावा असा व्यवस्थापकास निदेश देता येईल. अशा आदेशात, खाण्यासाठी पुरवण्याच्या प्रत्येक वस्तूचा आकार, मिळू शकतील अशा वस्तू व दर आठवड्यास खाण्याचा विशिष्ट पदार्थ किती वेळा पुरविता येईल हे विनिर्दिष्ट केले पाहिजे. तसेच अशा आदेशात, ज्या कालावधीत आदेशाचे पालन करण्यात येईल तो कालावधीही विनिर्दिष्ट केला पाहिजे.

(२) आहारगृहात पुरविण्यात येणारे अन्न, पेये व इतर पदार्थ 'ना नफा' या तत्त्वावर विकण्यात आले पाहिजेत आणि अन्न, पेये व इतर पदार्थांच्या किमती ठरविताना खालील गोष्टींची किंमत त्यात विचारात घेता कामा नये.

(अ) जागेचे व इमारतीचे भाडे;

(३) ज्या आहारगृहाची व्यवस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम
१९६० अन्वये नोंदणी केलेल्या किंवा नोंदणी केल्याचे मानण्यात आलेल्या सहकारी
संस्थेमार्फत पाहिली जात असेल, अशा आहारगृहाच्या कंत्राटदाराने, अशा आहार-
गृहासाठी सुरुवातीला, आवश्यक असणारी सामग्री पुरवली पाहिजे आणि असे
आहारगृह चालविण्यासाठी त्यानंतर आवश्यक असलेली कोणतीही सामग्री अशा
सहकारी संस्थेमार्फत पुरविण्यात येईल अशी हमी दिली पाहिजे.

८२. किमती प्रदर्शित करणे — आहारगृहात पुरविण्यात येणाऱ्या अन्न
सामग्रीच्या प्रत्येक भागाबद्दलचा, पेयाबद्दलचा व इतर कोणत्याही बाबीबद्दलचा
आकार आहारगृहात ठळकपणे प्रदर्शित करण्यात आला पाहिजे.

८३. लेखा — (१) लेखाची सर्व पुस्तके, नोंदवह्या व आहारगृह चालविण्या-
संबंधात वापरलेली इतर कोणतीही कागदपत्रे, मागणी केली असता, निरीक्षकास
पुरविण्यात आली पाहिजेत.

(२) आहारगृहासंबंधीचे लेखे, नोंदलेल्या लेखापालाकडून व लेखा
परीक्षकाकडून दर बारा महिन्यांनी एकदा तपासून घेतले पाहिजेत. उपरोक्त लेखा
परीक्षकांनी तयार केलेला ताळेबंद, तपासलेले लेखे बंद केल्यापासून दोन महिन्या-
हून उशिरा नाही इतक्या मुदतीत आहारगृह व्यवस्थापन समितीकडे सादर केले
पाहिजेत.

परंतु असे, की स्वतःचे लेखा विभाग असणाऱ्या सरकारी कारखान्यातील
आहारगृहासंबंधीच्या लेखांची तपासणी अशा विभागामार्फत करता येईल.

परंतु आणखी असे, की ज्या आहारगृहाची व्यवस्था महाराष्ट्र सहकारी
संस्था १९६०, अन्वये नोंदलेल्या किंवा नोंदली असल्याचे मानण्यात आलेल्या
सहकारी संस्थेमार्फत पाहिली जात असेल अशा आहारगृहाच्या संबंधातील लेखे
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या उपबंधांनुसार तपासता येतील.

८४. व्यवस्थापन समिती (१) व्यवस्थापकाने एका व्यवस्थापन समितीची
नेमणूक केली पाहिजे व पुढील गोष्टींसंबंधी वेळोवेळी तिचा सल्ला घेतला पाहिजे.

(अ) आहारगृहात पुरवावयाच्या अन्न-पदार्थांचा दर्जा व प्रमाण

(ब) उपहारगृहाची व्यवस्था,

(क) आहारगृहातील जेवणाच्या वेळा, आणि

(ड) समिती निर्देश देईल अशा आहारगृहासंबंधातील इतर कोणतीही गोष्ट

परंतु असे, की ज्या आहारगृहाची व्यवस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधि-
नियम १९६० अन्वये नोंदलेल्या किंवा नोंदणी केली असल्याचे मानण्यात आलेल्या



सहकारी संस्थेमार्फत पाहिली जात असेल अशा आहारगृहाच्या बाबतीत आहारगृह व्यवस्थापन समिती नियुक्त करण्याची आवश्यकता नाही.

(२) आहारगृह व्यवस्थापन समितीमध्ये, कब्जेदाराने नामनिर्देशित केलेल्या व्यक्ती आणि मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम १९४६ अन्वये एखादी संयुक्त समिती स्थापन करण्यात आली असेल किंवा कारखान्याचा मालक व कामगार यांचे प्रतिनिधी समाविष्ट करून त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही इतर विधी अन्वये इतर कोणतीही संस्था स्थापन करण्यात आली असेल अशा बाबतीत, अशा संयुक्त समितीच्या किंवा कामगारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अशा इतर समितीच्या सदस्यांनी आणि इतर बाबतीत कामगारांनी स्वतःच निवडून दिलेल्या व्यक्ती यांची समान संख्या असली पाहिजे.

निवडून दिलेल्या कामगारांची संख्या कारखान्यात कामावर लावलेल्या दर १००० कामगारांमागे १ या प्रमाणात असली पाहिजे. परंतु समितीत कोणत्याही वेळी ५ पेक्षा अधिक किंवा २ पेक्षा कमी कामगार असता कामा नयेत.

(३) व्यवस्थापनाने, असल्यास, संयुक्त समितीच्या सदस्यांच्या सल्ल्याने आहारगृह व्यवस्थापन समितीची निवडणूक पद्धती ठरविली पाहिजे व देखरेख ठेवली पाहिजे.

(४) आहारगृह व्यवस्थापन समितीची दर दोन वर्षांनी पुनर्रचना करण्यात आली पाहिजे व पूर्वीच्या व्यवस्थापन समितीने नवीन समिती कार्यभार स्वीकारी-पर्यंत अधिकारपदावर असले पाहिजे.

८५. पुरवावयाची अन्नसामग्री व आकारावयाच्या किमती — (१) अन्न-सामग्रीपैकी कोणत्याही पदार्थास सर्वसाधारण मागणी आहे याबद्दल मुख्य निरीक्षकाची खात्री झाल्यास, त्यास लेखी आदेशाद्वारे असा पदार्थ आहारगृहा-मध्ये पुरवण्यात यावा असा व्यवस्थापकास निदेश देता येईल. अशा आदेशात, खाण्यासाठी पुरवण्याच्या प्रत्येक वस्तूचा आकार, मिळू शकतील अशा वस्तु व दर आठवड्यात खाण्याचा विशिष्ट पदार्थ किती वेळा पुरविता येईल हे विनिर्दिष्ट केले पाहिजे. तसेच अशा आदेशात, ज्या कालावधीत आदेशाचे पालन करण्यात येईल तो कालावधीही विनिर्दिष्ट केला पाहिजे.

(२) आहारगृहात पुरविण्यात येणारे अन्न, पेये व इतर पदार्थ 'ना नफा' या तत्त्वावर विकण्यात आले पाहिजेत आणि अन्न, पेये व इतर पदार्थांच्या किमती ठरविताना खालील गोष्टींची किंमत त्यात विचारात घेता कामा नये.

(अ) जागेचे व इमारतीचे भाडे;

बनविलेल्या असल्या पाहिजेत व ती जलरोधक असली पाहिजे. शिशुगृहाची जमीन आणि खालील भिंती यांचा पृष्ठभाग गुळगुळीत व जलाभेद्य होईल अशा रीतीने बांधलेला किंवा झिलई दिलेला असला पाहिजे.

(३) इमारतीतील खोल्यांची उंची जमिनीच्या पातळीपासून छपराच्या खालील भागापर्यंत ३.७५ मीटरहून कमी नाही इतकी असली पाहिजे. आणि प्रत्येक भरती करावयाच्या मुलासाठी २ चौरस मीटरहून कमी नाही इतके जमिनीचे क्षेत्र असले पाहिजे.

परंतु असे, की हा नियम अमलात आल्याच्या तारखेस अस्तित्वात असलेल्या इमारतींच्या ज्या खोल्या शिशुगृह म्हणून वापरण्यात येत असतील अथवा वापरावयाचा उद्देश असेल अशा खोल्यांच्या बाबतीत मुख्य निरीक्षकास त्याच्या मते या स्थितीत वाजवी वाटेल अशा कमी उंचीच्या खोल्यांना त्यास इष्ट वाटतील अशा शर्तींवर मान्यता देता येईल.

(४) शिशुगृहाच्या प्रत्येक विभागात ताजी हवा फिरती ठेवून पुरेशा प्रमाणात हवा खेळती ठेवण्यासाठी परिणामकारक व योग्य तरतूद केलेली असली पाहिजे.

(५) शिशुगृह पुरेशा साधनांनी व फर्निचरने सुसज्ज असले पाहिजे आणि विशेषतः प्रत्येक मुलासाठी आवश्यक असा बिछाना असलेल्या एका खाटेची किंवा पाळण्याची तरतूद केलेली असली पाहिजे; परंतु दोन वर्षांवरील वयाच्या मुलांसाठी फक्त बिछाना उपलब्ध करून दिल्यासही पुरेसे होईल. तसेच मुलांना पाजते वेळी किंवा त्यांच्यावर लक्ष ठेवते वेळी उपयोगात आणण्यासाठी प्रत्येक मातेसाठी निदान एक खुर्ची किंवा बसण्याची तत्सम व्यवस्था केलेली पाहिजे. आणि मोठ्या मुलांना खेळण्यासाठी योग्य त्या खेळण्यांचा पुरवठा केलेला पाहिजे.

(६) मोठ्या मुलांना खेळण्यासाठी योग्य रीतीने कुंपण घातलेल्या व सावली येईल अशा खुल्या क्रीडांगणाची सुद्धा तरतूद केलेली पाहिजे. परंतु कोणत्याही कारखान्यात अशा क्रीडांगणासाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही अशी मुख्य निरीक्षकाची खात्री झाल्यास, त्यास लेखी आदेशाद्वारे, अशा कोणत्याही कारखान्यास या पोटनियमाचे पालन करण्यापासून सूट देता येईल.

८८. धुण्याच्या खोल्या – प्रत्येक शिशुगृहात किंवा त्याला लागून मुलांना आंघोळ घालण्यासाठी आणि त्यांचे कपडे धुण्यासाठी योग्य अशी धुण्याची खोली असली पाहिजे. अशी खोली खालील वर्णनानुसार असली पाहिजे –

(अ) जमीन व ९० सेंटीमीटर उंचीपर्यंतच्या आतील भिंती, त्यांचा पृष्ठभाग गुळगुळीत व जलाभेद्य होईल अशा रीतीने बांधलेला किंवा झिलई दिलेला



असला पाहिजे. या खोलीत भरपूर उजेड आणि हवा खेळती पाहिजे, आणि सांडपाणी योग्य प्रकारे वाहून जाईल अशा प्रकारची जमीन असली पाहिजे व ती नीटनेटकी ठेवली पाहिजे.

(ब) कोणत्याही एक वेळी शिशुगृहात भरती केलेल्या प्रत्येक चार मुलांना, शक्य झाल्यास, आरोग्य अधिकाऱ्याने मान्य केलेल्या ठिकाणापासून तोटयांतून पुरविलेल्या पाण्याच्या पुरवठ्यासह, निदान एक तरी मार्जन-पात्र किंवा तत्सम टब असले पाहिजे. अशा ठिकाणापासून प्रत्येक मुलाला दिवसाला किमान २५ लीटर पाणी मिळाले पाहिजे.

(क) प्रत्येक मूल शिशुगृहात असेपर्यंत त्याला स्वच्छ कपडे, साबण आणि स्वच्छ टॉवेल्स यांचा पुरेसा पुरवठा उपलब्ध करून दिला पाहिजे.

८९. दूध आणि अल्पोपहाराचा पुरवठा – प्रत्येक दिवशी शिशुगृहात असणाऱ्या प्रत्येक मुलास निदान ३०० मिली लीटर स्वच्छ आणि शुद्ध दूध उपलब्ध झाले पाहिजे आणि अशा मुलाच्या मातेला, तिच्या दैनिक कामाच्या वेळात मुलाला पाजण्यासाठी, निदान १५ मिनिटांची दोन मध्यंतरे ( कलम ५५ अन्वये अनुमत असतील त्या खेरीज) अनुमत केली पाहिजेत. दोन वर्षांवरील मुलांसाठी या व्यतिरिक्त, पुरेसा सत्वयुक्त अल्पोपहाराची तरतूद केली पाहिजे.

९०. शिशुगृहातील कर्मचारी वर्ग – प्रत्येक शिशुगृहासाठी एका प्रभारी स्त्रीची आणि तिला मदत करण्यासाठी पुरेशा इतर स्त्री परिचरांची नेमणूक केली पाहिजे. शिशुगृहातील कर्मचारी वर्ग कामावर असेपर्यंत, त्यांना योग्य अशा स्वच्छ कपड्यांचा पुरवठा केला पाहिजे.

९१. प्रभारी स्त्रीची अर्हता (१) पोटकलम (२) मध्ये केलेल्या तरतुदी खेरीज करून, मुंबई परिचारिका, प्रसाविका व आरोग्य प्रचारक, अधिनियम १९५४ अन्वये विहित केलेली किंवा राज्यातील कोणत्याही भागात तत्सम अधिनियमाप्रमाणे अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधीअन्वये विहित केलेली अर्हता असल्याविना किंवा मुख्य निरीक्षकाने मान्यता दिलेल्या रुग्णालयात किंवा प्रसूतिगृहात किंवा शुश्रूषागृहात निदान १८ महिन्यांपेक्षा कमी नाही इतक्या मुदतीचे प्रशिक्षण घेतल्याबद्दलचे प्रमाणपत्र हजर केल्याशिवाय किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या संस्थेत पूर्व प्राथमिक शिक्षकाचे प्रशिक्षण घेतल्याबद्दलचे प्रमाणपत्र हजर केल्याशिवाय, नियम ९० अन्वये कोणत्याही स्त्रीची शिशुगृहाची प्रभारी अधिकारी म्हणून नेमणूक करता कामा नये.

(२) हे नियम अमलात येण्याच्या लगतपूर्वी, कारखान्यातील शिशुगृहाचा प्रभार ज्या स्त्रीकडे असेल अशा स्त्रीच्या बाबतीत पोटनियम (१) चे उपबंध

लागू होणार नाहीत आणि हे नियम अमलांत येण्यापूर्वी शिशुगृहाच्या अशा प्रभारी स्त्रीच्या अर्हतेच्या बाबतीत जे नियम प्रचलित होते, तेच तिला लागू होतील.

कलम ५० च्या खंड (अ) अनुसार विहित केलेले नियम

९२. कलम ४८ च्या तरतुदीपासून सूट – राज्य शासनाला राजपत्रांतील अधिसूचनेद्वारे, ज्या कारखान्यात कामावर लावलेल्या विवाहित स्त्रियांची किंवा विधवांची संख्या वीसपेक्षा जास्त नसेल अशा कोणत्याही कारखान्यास, अशा कारखान्यात लावलेल्या विवाहित स्त्रियांची किंवा विधवांची संख्या वर सहा महिन्यांनी कारखान्याच्या मुख्य निरीक्षकास कळविण्याच्या शर्तीस अधीन राहून, कलम ४८ च्या व त्या अन्वये केलेल्या नियमांच्या उपबंधापासून सूट देता येईल.

---

## प्रकरण ६

## प्रौढ व्यक्तींचे कामाचे तास

कलम ५३ पोटकलम (२) अनुसार विहित केलेले नियम

९३. भरपाई सुट्या – (१) तांत्रिक कारणामुळे संपूर्ण दिवसभर काम चालू ठेवणे भाग असेल अशा प्रकारचे काम करणाऱ्या कामगाराव्यतिरिक्त, कलम ५३ च्या पोटकलम (१) अनुसार द्यावयाच्या भरपाई सुट्यांमध्ये, एका आठवड्यात दोनपेक्षा अधिक सुट्या देणार नाहीत अशा रीतीने अंतर असले पाहिजे.

(२) कारखान्याच्या व्यवस्थापकाने, ज्या महिन्यातील सुट्या प्रकट होत्या असतील तो महिना संपल्यावर किंवा तत्पूर्वी ज्या ठिकाणी कलम ६१ खालील कामाच्या मुदतीसंबंधीची नोटीस लावण्यात आली असेल त्या ठिकाणी, पुढील महिन्यात ज्यांना भरपाई सुट्या अनुमत करण्यात आल्या असतील त्या कामगारांच्या संबंधांत व त्या सुट्यांच्या तारखांच्या संबंधांत नोटीस लावली पाहिजे. कोणत्याही भरपाई सुटी संबंधांतील नोटीसमध्ये नंतर करावयाचा बदल, त्या सुटीच्या तारखेपूर्वी तीन दिवसांपेक्षा कमी नाही इतक्या मुदतीत केला पाहिजे.

(३) कामगारास, जी कोणतीही भरपाई सुटी किंवा सुट्या मिळण्याचा हक्क असेल ती सुटी किंवा सुट्या त्यास कार्यमुक्त करण्यापूर्वी किंवा बडतर्फ करण्यापूर्वी देण्यात आल्या पाहिजेत व त्या, कार्यमुक्त करण्यापूर्वी किंवा बडतर्फ करण्यापूर्वी देणे आवश्यक असलेल्या नोटिशीच्या कोणत्याही मुदतीचा भाग म्हणून मोजता कामा नये.

(४) (अ) व्यवस्थापकाने, नमुना १४ मध्ये एक नोंदवही ठेवली पाहिजे.



परंतु असे, की मुख्य निरीक्षकाचे मते, कारखान्याच्या नित्य कामाचा भाग म्हणून व्यवस्थापकाने ठेवलेल्या कोणत्याही हजेरी पत्रकांत किंवा नोंदवहीत किंवा करावयाच्या विवरणात, कारखान्यातील कोणत्याही किंवा सर्व कामगारांच्या संबंधांत, कलम ५३ च्या अमलबजावणीसाठी आवश्यक असलेला तपशील दिलेला असेल तर त्यास त्या त्या कारखान्यासाठी या नियमान्वये आवश्यक असलेल्या नोंदवहीऐवजी किंवा विवरणाऐवजी असे हजेरीपत्रक किंवा नोंदवही किंवा विवरण हे, त्सम मर्यादेपर्यंत ठेवले पाहिजे, असा निदेश लेखी आदेशाद्वारे देता येईल.

(ब) खंड (अ) अन्वये ठेवण्यात आलेली नोंदवही, तीमध्ये अखेरची नोंद केली असेल त्या तारखेपासून तीन वर्षेपर्यंत जतन केली पाहिजे आणि निरीक्षकाने मागणी केल्यावर ती प्रस्तुत केली पाहिजे.

कलम ५८ पोटकलम (२) आणि कलम ११२ अनुसार विहित केलेले नियम

९४ कलम ५८ अन्वये सूट देण्यात आलेले कारखाने – (१) वृत्तपत्राच्या कार्यालयाशी संलग्न असलेल्या मुद्रणालयांना, पुढील शर्तींच्या अधीन कलम ५८, पोटकलम (१) च्या उपबंधापासून सूट देण्यात येईल.

अशा मुद्रणालयामध्ये–

(एक) बदली गटाचे कामगार दुसऱ्या बदली गटाच्या कामगारांपासून ओळखता यावेत म्हणून प्रत्येक बदली गटाच्या कामगारांनी भिन्नभिन्न रंगाचा बिल्ला लावला पाहिजे.

(दोन) कलम ६१ च्या पोट कलम (१) अन्वये प्रदर्शित करणे व योग्य प्रकारे सुस्थितीत ठेवणे आवश्यक असलेल्या कामाच्या मुदतीच्या नोटीसमध्ये आणि उपरोक्त कलमाच्या पोटकलम (९) आणि (१०) अन्वये निरीक्षकास पाठवावयाच्या नोटिशीच्या प्रतीत प्रत्येक बदली गटाच्या कामगारांनी लावावयाच्या बिल्ल्याचा रंग विनिर्दिष्ट केला पाहिजे.

(तीन) प्रत्यक्षपणे कामाकरिता असलेल्या कोणत्याही बदली गटाच्या कामगारांनी लावावयाच्या बिल्ल्याच्या रंगासारखा रंग असलेले निशाण किंवा दिवा संबंधित विभागामध्ये एक किंवा त्यापेक्षा अधिक बदली गटाच्या प्रत्यक्ष कामाच्या वेळी लावण्यात आला पाहिजे.

(चार) पद्धतशीरपणे पाळ्यांनुसार चालविलेल्या कामात कामावर लावलेल्या प्रत्येक कामगाराजवळ ओळखपत्र असले पाहिजे. कामगारास हे ओळखपत्र कारखान्याच्या व्यवस्थापनातर्फे मोफत पुरविण्यात आले पाहिजे आणि त्यावर

कामगाराचे छायाचित्र, त्याचे संपूर्ण नाव, त्याची स्वाक्षरी अथवा अंगठ्याची निशाणी व ओळख पटण्याची दृश्य खूण आणि व्यवस्थापकाची स्वाक्षरी असली पाहिजे.

(२) परळ येथील सेंट्रल रेल्वे लोकोमोटिव्ह वर्कशॉप्सना कलम ५८, पोट कलम (१) च्या तरतुदीपासून सूट देण्यात आली पाहिजे.

कलम ५९, पोट कलम (४) अनुसार विहित केलेले हजेरीपत्रक

९५. सूट दिलेल्या कारखान्यासाठी हजेरीपत्रक –

(अ) कलम ६५ अन्वये ज्यास सूट दिली आहे; किंवा

(ब) कलम ६४ किंवा कलम ६५ अन्वये ज्यातील कामगारांना कलम ५१ किंवा कलम ५४ च्या उपबंधापासून सूट दिलेली आहे, अशा प्रत्येक कारखान्याच्या व्यवस्थापकाने, कारखान्यातील सूट दिलेल्या सर्व कामगारांचा उक्त्या कामाचा सर्वसाधारण वेतनदर किंवा ताशी वेतन दर दर्शविणारे एक हजेरीपत्रक नमुना १५ मध्ये ठेवले पाहिजे. या हजेरीपत्रकांत, प्रत्येक कामगाराने अतिकालिक काम किती केले ते व त्या कामासंबंधातील अर्जन व अर्जनाची रक्कम दिल्याच्या तारखा यांची बिनचूक नोंद केली पाहिजे. नमुना १५ मधील हजेरी पत्रक नेहमी उपलब्ध असले पाहिजे व निरीक्षक मागणी करील तेव्हा ते प्रस्तुत करण्यात आले पाहिजे.

९६. अतिकालिक कामासंबंधीच्या चिठ्ठ्या – एखाद्या कामगाराने कामाच्या विनिर्दिष्ट मुदतीपेक्षा अधिक केलेल्या कोणत्याही कामाची नोंद अतिकालिक कामाच्या चिठ्ठीत करण्यात आली पाहिजे. या चिठ्ठीच्या दोन प्रती असल्या पाहिजेत. तसेच कामगाराने प्रत्यक्षात किती अतिकालिक काम केले ती मुदत तीत दर्शविली पाहिजे. व्यवस्थापकाने किंवा त्याने या बाबतीत योग्य रीतीने प्राधिकृत केलेल्या एखाद्या व्यक्तीने योग्य रीत्या स्वाक्षरी केलेली, अशा अतिकालिक कामासंबंधीच्या चिठ्ठीची एक प्रत, कामगाराचे अतिकालिक काम पूर्ण झाल्यानंतर लगेच त्याला देण्यात आली पाहिजे.

परंतु असे, की कारखान्यात चालवल्या जाणाऱ्या कामाच्या स्वरूपामुळे कामगारांना दररोज चिठ्ठ्या देणे शक्य नाही अशी मुख्य निरीक्षकाची खात्री झाल्यास, त्यास साप्ताहिक चिठ्ठ्या देण्यास परवानगी देता येईल.

कलम ६० अनुसार विहित केलेले नियम

९७. कामगारांना दोन ठिकाणी कामावर लावणे – (अ) प्रौढ कामगारास एका आठवड्यास अठ्ठेचाळीस तासांहून जास्त नाही इतके तास काम करण्याची परवानगी देण्यात आली आहे आणि कलम ५२ प्रमाणे साप्ताहिक सुट्टया अनुमत



करण्यात आल्या आहेत याबद्दल निरीक्षकाची खात्री पटल्यास, त्यात प्रौढ कामगारास, एकाच दिवशी एकापेक्षा अधिक कारखान्यांत काम करण्यास मंजुरी देता येईल.

(ब) एकापेक्षा अधिक कारखान्यांत काम करण्याची परवानगी दिलेल्या अशा कामगाराच्या नोंदवहीतील शेऱ्याच्या स्तंभात, निरीक्षकाने आपल्या सहीच्या आद्याक्षरासह नोंद केली पाहिजे.

कलम ६१, पोटकलम (८) अनुसार विहित केलेली नोटीस

९८. प्रौढ कामगाराच्या कामाच्या मुदतीची नोटीस – प्रौढ कामगाराच्या कामाच्या मुदतीची नोटीस नमुना १६ मध्ये असली पाहिजे.

कलम ६२, पोटकलम (२) अनुसार विहित केलेली नोंदवही

९९. प्रौढ कामगाराची नोंदवही – प्रौढ कामगारांची नोंदवही नमुना १७ मध्ये असली पाहिजे. अशी नोंदवही प्रत्येक वर्षी नव्याने लिहिली पाहिजे व ती १२ महिनेपर्यंत जतन केली पाहिजे.

कलम ६४ (५) च्या तरतुदीनुसार आणि शासकीय अधिसूचना दि. ९-१-१९७६ प्रमाणे नियम १००, नियम १०१ व नियम १०२ दि. ८-११-९७८ पासून अमलात नाहीत.

---

## प्रकरण ७

## तरुण व्यक्तींना कामावर लावणे

कलम ७३ पोटकलम (३) अनुसार विहित केलेली नोटीस

१०३. कामगार मुलांकरिता कामाच्या मुदतीची नोटीस – नमुना १८ मध्ये असली पाहिजे.

कलम ७३ पोटकलम (१) अनुसार विहित केलेली नोंदवही

१०४. कामगार मुलांची नोंदवही – कामगार मुलांची नोंदवही नमुना १९ मध्ये असली पाहिजे. ही नोंदवही प्रत्येक वर्षी नव्याने लिहिली पाहिजे आणि ती बारा महिनेपर्यंत जतन करून ठेवली पाहिजे.

---

## प्रकरण ८

## वार्षिक वेतनी रजा

कलम ८० (३) आणि ८३ अनुसार विहित केलेले नियम १०५-११३

**१०५. वेतनी रजेची नोंदवही – (१)** व्यवस्थापकाने नमुना २० मध्ये यापुढे जिला 'वेतनी रजेची' नोंदवही म्हणून संबोधिले आहे अशी एक नोंदवही ठेवली पाहिजे.

परंतु असे, की कारखान्याच्या नित्यक्रमाचा भाग म्हणून ठेवण्यात आलेले कोणतेही हजेरी पत्रक किंवा नोंदवही किंवा व्यवस्थापकाने तयार केलेले विवरण यांत, कारखान्यांतील सर्व किंवा कोणत्याही कामगाराच्या संबंधात, अधिनियमाचे प्रकरण ८ अमलात आणण्यास आवश्यक असलेला तपशील दिला आहे असे मुख्य निरीक्षकाचे मत असेल तर, त्यास लेखी आदेशाद्वारे हजेरीपत्रक किंवा नोंदवही विवरण, हे तसाच नयनिर्देश, त्या कारखान्याच्या संबंधात त्या नियमान्वये आवश्यक असलेल्या नोंदवहीच्या किंवा विवरणाच्या ऐवजी ठेवले पाहिजे व ते नियम नियमान्वये आवश्यक असलेली नोंदवही किंवा विवरण मानले पाहिजे, असा निदेश देता येईल.

(२) वेतनी रजेच्या नोंदवहीत शेवटची नोंद केल्यानंतर ती तीन वर्षेपर्यंत जपून ठेवली पाहिजे आणि निरीक्षकाने मागणी केल्यावर त्याच्यापुढे प्रस्तुत केली पाहिजे.

**१०६. रजापुस्तक – (१)** व्यवस्थापकाने, एका कॅलेंडर वर्षात रजेस पात्र झालेल्या प्रत्येक कामगारास, पुढील कॅलेंडर वर्षाच्या २८ फेब्रुवारीच्या आत नमुना २१ मधील एक पुस्तक (यापुढे रजा पुस्तक असे संबोधिले आहे) दिले पाहिजे. हे रजापुस्तक कामगारांची मालमत्ता असेल आणि व्यवस्थापकाने किंवा त्याच्या प्रतिनिधीने, सुट्टयाच्या तारखा किंवा सेवेतील खंड यांच्या योग्य त्या नोंदी करण्या-व्यतिरिक्त ते मागता कामा नये आणि एका वेळी एका आठवड्यापेक्षा अधिक दिवस जवळ ठेवता कामा नये.

परंतु असे की एखाद्या कामगाराला, वर्षाच्या अवधीत सेवेतून कार्यमुक्त किंवा बडतर्फ करण्यात आले असेल त्या बाबतीत, व्यवस्थापकाने, यथास्थिती, कार्यमुक्त किंवा बडतर्फ करण्याच्या तारखेपासून एका आठवड्याच्या आत वेतनी रजेच्या नोंदवहीतून (नमुना २०) गोषवारा दिला पाहिजे.

(२) जर एखाद्या कामगाराचे रजा-पुस्तक हरवले असेल, तर वहा पैसे भरल्यानंतर व्यवस्थापकाने पंधरा दिवसांचे आत त्याची दुसरी प्रत त्याला दिली पाहिजे आणि आपल्या अभिलेखावरून ती पूर्ण केली पाहिजे.



**१०७. वैद्यकीय प्रमाणपत्र** – जर एखादा कामगार कामावर गैरहजर राहिला असेल आणि कलम ७९, पोटकलम (७) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे आजाराचा अवधी समाविष्ट होईल अशी त्याला देय असलेली वेतनी रजा घ्यावयाची असेल तर त्याने व्यवस्थापकाकडून तसे सांगितले गेल्यास, नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीने किंवा नोंदणीकृत किंवा मान्यताप्राप्त वैद्याने किंवा हकिमाने सही केलेले प्रमाणपत्र दाखल केले पाहिजे. आणि त्यांत गैरहजेरीचे कारण व अशा वैद्यक व्यवसायीच्या, वैद्याच्या किंवा हकिमाच्या मते तो कामगार आपले काम पाहण्यास जितके दिवस असमर्थ असेल ती मुदत नमूद केलेली असली पाहिजे.

परंतु असे की, एखाद्या गावात नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी किंवा नोंदणीकृत किंवा मान्यताप्राप्त वैद्य किंवा हकीम नसेल तर ग्रामपंचायतीचा सरपंच किंवा त्या गावाचा प्रमुख यांचे प्रमाणपत्र या नियमाच्या प्रयोजनासाठी पुरेसे मानले पाहिजे.

१०८. अपरिहार्य कामबंदीची निरीक्षकास नोटीस – व्यवस्थापकाने, शक्य तितक्या लोकर, करार किंवा संविदा याद्वारे किंवा स्थायी आदेशानुसार अनुज्ञेय असल्याप्रमाणे कामगारांच्या अपरिहार्य कामबंदीच्या प्रत्येक प्रकरणाची निरीक्षकास नोटीस दिली पाहिजे आणि तीत अशा कामगारांची संख्या व अपरिहार्य काम-बंदीचे कारण नमूद केले पाहिजे.

संबंधित प्रत्येक कामगाराबाबतच्या वेतनी रजेच्या नोंदवहीत व रजा-पुस्तकात त्याप्रमाणे नोंदी करण्यात आल्या पाहिजेत.

१०९. कामगाराद्वारे नोटीस – प्रत्येक कॅलेंडर वर्षापूर्वी किंवा त्याच्या शेवटी कामगारास, पुढील वर्षी त्याला देय होणारी वार्षिक वेतनी रजा न घेण्याच्या आपल्या उद्देशाची नोटीस व्यवस्थापकास देता येईल. व्यवस्थापकाने संबंधित कामगाराच्या वेतनी रजेच्या नोंदवहीत आणि रजापुस्तकात त्याप्रमाणे नोंद केली पाहिजे.

११०. व्यवस्थापकाद्वारे नोटीस – व्यवस्थापकाने, ज्यांची जमेस धरलेली रजा कलम ७९ च्या पोटकलम (५) च्या पहिल्या परंतुकानुसार अनुमत असलेल्या कमाल मर्यादेपर्यंत पोहोचली आहे अशा सर्व कामगारांची नावे देऊन एक नोटीस प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या पहिल्या तिमाहीत शक्य तितक्या लोकर प्रदर्शित करण्याची व्यवस्था केली पाहिजे. या नोटीसमध्ये, जास्तीची रजा जमेस धरता येणार नाही आणि नोटीसच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत रजेसाठी अर्ज करण्यात आला पाहिजे, असे नमूद केले जाईल. नोटीसची प्रत संबंधित प्रत्येक कामगाराला देण्यात आली पाहिजे. एक प्रत निरीक्षकाच्या कार्यालयासही पाठविली पाहिजे.

१११. रजेची पद्धती – (१) परिस्थितीनुसार शक्य असेल तर नवरा, बायको आणि मुले मिळून असलेल्या एकाच कुटुंबाला एकाच तारखेत रजा घेण्यास मुभा दिली पाहिजे.

(२) कामगारास चार आठवड्यांची नोटीस दिल्यानंतरच व्यवस्थापक रजेच्या ठरविलेल्या तारखांत बदल करू शकेल.

(३) कामगाराला, व्यवस्थापकाच्या मान्यतेच्या अधीन आपल्या रजेच्या मुदतीची दुसऱ्या कामगाराच्या रजेच्या मुदतीबरोबर अदलाबदल करता येईल.

११२. कामगार मरण पावल्यास वेतन रजावेतन प्रदान करणे – कलम ८१ च्या उपबंधानुसार आगाऊ वेतन देण्यास पात्र नसलेला एखादा कामगार कामावर परत रुजू होण्यापूर्वी मृत्यू पावल्यास, रजेच्या मुदतीची देय होणारी त्याच्या वेतनाची शिल्लक रक्कम, त्या कामगाराच्या मृत्यूची माहिती मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत, त्याच्या नामनिर्देशित व्यक्तीस किंवा अशा नामनिर्देशित व्यक्तीच्या अभावी त्याच्या वैध प्रतिनिधीस देण्यात आली पाहिजे. नामनिर्देशित नमुना २२ मध्ये असला पाहिजे. आणि त्यावर कामगाराची स्वाक्षरी असली पाहिजे व दोन साक्षीदारांकडून ते साक्षांकित केले असले पाहिजे.

११३. कलम ८४ खालील सुट्टीच्या बाबतीत ठेवावयाची नोंदवही – (१) कलम ८४ अन्वये सूट देण्यात आली असेल, त्याबाबतीत व्यवस्थापकाने, देय रजा घेतलेली रजा व दिलेले वेतन यासंबंधात प्रत्येक कामगाराची माहिती दर्शविणारी एक नोंदवही ठेवली पाहिजे.

(२) त्याने कारखान्यात वेतनी रजेकरिता ठरविलेल्या पद्धतीची संपूर्ण तपशील दर्शविणारी सूचना, कारखान्याच्या मुख्य प्रवेशद्वारावर लावली पाहिजे. आणि तिची एक प्रत निरीक्षकाकडे पाठविली पाहिजे.

(३) नियम ८४ अन्वये सूट देण्याच्या वेळी राज्य शासनाने मान्य केलेल्या योजनेत त्याच्या पूर्वमंजुरीशिवाय कोणताही बदल करता कामा नये.

---

## प्रकरण ९

## विशेष उपबंध

कलम ८७ अनुसार विहित केलेले नियम

११४. धोक्याची कामे – (१) जेव्हा कोणत्याही कारखान्यात खालील कामे चालविली जातात तेव्हा ती कलम ८७ अनुसार धोक्याची कामे म्हणून घोषित करण्यात येतात.



(१) वातित पेय निर्मिती आणि तदनुषंगिक प्रक्रिया

(२) क्रोमिक ॲसिड वा इतर क्रोमियम संयौगिक असलेल्या इलेक्ट्रोलाईटचा उपयोग करून धातूच्या वस्तूवर केले जाणारे इलेक्ट्रोलिटिक प्लेटिंग किंवा ऑक्सिडेशन

(३) विद्युत संचायकांची निर्मिती आणि दुरुस्ती

(४) काच निर्मिती

(५) धातू घासणे किंवा त्यास झिलई देणे

(६) शिसे व शिसाची काही संयुगे निर्माण करणे व त्यावर प्रक्रिया करणे.

(७) पेट्रोलियम अधिनियम १९३४ चे कलम (२) चा खंड (ब) यात दिलेल्या व्याख्येप्रमाणे घातक पेट्रोलियमपासून वायू निर्माण करणे.

(८) वाळूचा फवारा, मेटलशॉट किंवा ग्रीट किंवा संपीडित हवेच्या किंवा वाफेच्या स्रोताने चालणारा अन्य घर्षक पदार्थ वापरून वस्तू साफ करणे किंवा मुळमुळीत करणे.

(९) चक्का कातडयास व चामडयास चुना लावणे व ती कमावणे व तदनुषंगिक प्रक्रिया

(१०) क्रोमिक ॲसिड तयार करणे किंवा सोडियम किंवा पोटॅशियम किंवा अमोनियम यांचे डायक्रोमेट तयार करणे किंवा ते परत मिळविणे.

(११) नायट्रो किंवा अमिनो संयुगे तयार करणे किंवा हाताळणे.

(१२) मारक पदार्थ हाताळणे

(१३) चलचित्राची फिल्म आणि ॲसिटीन टेट्राक्लोरेथीन आणि इतर विषारी व ज्वालाग्राही विद्रावक यापासून बांधण्या व इतर वस्तू तयार करणे.

(१४) कार्बनडाय सल्फाईड आणि हेड्रोजन सल्फाईड यांची निर्मिती, वापर किंवा उद्‌भव अंतर्भूत असलेल्या प्रक्रिया

(१५) घातक कीटक-नाशकाची निर्मिती आणि हाताळणी.

(१६) विद्युत विघटनाच्या प्रक्रियेद्वारे उत्पादित प्राणवायूचे व उज्जवायूचे संपीडन

(१७) ॲसबेस्टॉसची निर्मिती आणि हाताळणी

(१८) मॅंगनीज व त्याचे संमिश्रण यांची निर्मिती व निर्वाहन

(१९) कार्बन डायसल्फाईड पात्रे

(२०) क्रेन क्रेन

(२) या सोबत जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेले उपबंध, जेथे प्रत्येक अनुसूचीत विनिर्देशित अशी धोक्याची कामे केली जातात अशा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्यास लागू होतील.

(३) हा नियम, जेथे उक्त कामे केली जातात अशा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या कारखान्याच्या बाबतीत राज्य शासन शासकीय राजपत्रात अधिसूचनेद्वारे या संबंधात नेमील अशा तारखेस अमलात येईल.

## अनुसूची १

नाशिय पेय निर्मिती व तदनुषंगिक प्रक्रिया

**१. पंजास कुंपण घालणे** – बाटल्या किंवा वक्रनलिका भरणारी सर्व यंत्रे, फुटणाऱ्या बाटलीचा किंवा वक्रनलिकेचा एखादा तुकडा कारखान्यात कामावर लावलेल्या कोणत्याही व्यक्तीस आपटणार नाही अशा बनावटीची, अशा ठिकाणी ठेवलेली किंवा कुंपण घातलेली असली पाहिजे.

**२. मुखरक्षके आणि हस्तरक्षके** – (१) कब्जेदाराने बाटल्या किंवा वक्रनलिका भरण्यासाठी कामावर लावलेल्या सर्व व्यक्तींच्या उपयोगासाठी–

(अ) तोंड, मान व गळा यांचे संरक्षणासाठी योग्य मुखरक्षके, आणि

(ब) सर्व हात व बाहू यांचे संरक्षणासाठी, दोन्ही हातांसाठी योग्य हस्तरक्षके पुरविली पाहिजेत व ती सुस्थितीत ठेवली पाहिजेत.

(एक) परंतु फुटणाऱ्या बाटलीचा एकही तुकडा बाहेर पडू शकणार नाही अशा रीतीने बनवलेल्या स्वयंचलित यंत्राच्या सहाय्याने जेथे बाटल्या भरण्यात येतात तेथे परिच्छेद २ (१) लागू होणार नाही; आणि

(दोन) जेव्हा यंत्र अशा रीतीने तयार करण्यात आले असेल, की त्यावर काम करीत असलेल्या बाटल्या भरणाऱ्या व्यक्तीचा एकच हात फक्त धोक्यात असेल, तेव्हा धोक्यात नसलेल्या हातासाठी हस्तरक्षक पुरविण्याची जरुरी नाही.

(२) बाटल्या किंवा वक्रनलिका यांचे कॉकिंग, कार्कनिंग, स्टूईंग, वायरिंग, फॉयलिंग, कॅपस्युलिंग, साईटिंग, लेबलिंग या कामावर असलेल्या सर्व व्यक्तींच्या उपयोगासाठी कब्जेदाराने–

(अ) तोंड, मान गळा यांच्या संरक्षणासाठी योग्य मुखरक्षके आणि–

(ब) बाहू व निदान पंजाचा अर्धा भाग आणि अंगठा, तर्जनी यामधील भागाचे संरक्षणासाठी ज्याचा दोन्ही बाहूसाठी योग्य हस्तरक्षके यांची तरतूद केली पाहिजे. व ती सुस्थितीत ठेवली पाहिजेत.

**३. मुखरक्षके व हस्तरक्षके घालणे** – परिच्छेद २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रक्रियांपैकी कोणत्याही प्रक्रियेच्या कामावर लावलेल्या सर्व व्यक्तींनी अशा प्रक्रियेची कामे करताना उक्त परिच्छेदाच्या उपबंधानुसार पुरविण्यात आलेली मुखरक्षके व हस्तरक्षके घातली पाहिजेत.

## अनुसूची २

**क्रोमिक किंवा इतर क्रोमियम कंपोऊंड्स असलेल्या इलेक्ट्रोलाईटचा उपयोग करून धातूच्या वस्तूवर केले जाणारे इलेक्ट्रोलिटिक प्लेटिंग किंवा ऑक्सिडेशन.**



**१. व्याख्या** – या अनुसूचीच्या प्रयोजनासाठी (अ) 'इलेक्ट्रोलिटिक क्रोमियम प्रक्रिया' याचा अर्थ क्रोमिक ॲसिड किंवा इतर क्रोमियम कंपोऊंड्स असलेल्या इलेक्ट्रोलाईटचा उपयोग करून धातूच्या वस्तूवर इलेक्ट्रोलिटिक प्लेटिंग करणे किंवा ऑक्सिडेशन करणे; असा होतो.

(ब) 'बाथ' याचा अर्थ इलेक्ट्रोलिटिक क्रोमियमच्या प्रक्रियेसाठी किंवा कोणत्याही नंतरच्या प्रक्रियेसाठी वापरलेले कोणतेही भांडे, असा होतो.

(क) 'कामावर लावलेला' याचा अर्थ, या अनुसूचीच्या परिच्छेद ५, ७, ८ व ९ मध्ये बाथमधील द्रवाशी संबंध येणाऱ्या कोणत्याही प्रक्रियेत कामावर लावलेला, असा होतो.

(ड) 'निलंबन' याचा अर्थ, कोणत्याही बाथमधील द्रव पदार्थाशी संबंध येणाऱ्या कोणत्याही प्रक्रियेत कामावर असलेल्या सर्व व्यक्तींच्या संबंधात, निलंबनाची शक्ती असलेल्या प्रमाणक वैद्य चिकित्सकाने सही केलेल्या आरोग्य नोंदवहीतील केवळ प्रमाणपत्रावरून अशा कोणत्याही प्रक्रियेतील कामावरून निलंबन, असा होतो.

**२. बहिःसर्जक हवेचा झोत** – ज्या भांड्यात इलेक्ट्रोलिटिक क्रोमियमची प्रक्रिया करण्यात येते त्या प्रत्येक भांड्यात एक कार्यक्षम बहिःसर्जक हवेचा झोत लावण्यात आला पाहिजे. अशा झोताची तरतूद यांत्रिकी साधनांद्वारा करण्यात आली पाहिजे व तो झोत अशा प्रक्रियेतून निघणाऱ्या वाफेवर किंवा फवाऱ्यावर, जेथून वाफ किंवा फवारा उत्पन्न होतो त्या जागेच्या शक्य तितक्या जवळ, चालू असला पाहिजे. जेथे काम चालले असेल अशा कोणत्याही खोलीत किंवा जागेत वाफ किंवा फवारा शिरणार नाही अशा रीतीने बहिःसर्जक हवेच्या झोत साधनाची रचना करण्यात आली पाहिजे, आणि ते व्यवस्थित ठेवण्यात आले पाहिजे.

**३. स्त्रिया व तरुण व्यक्ती यांच्या बाबत मनाई** – कोणतीही स्त्री, तरुण व्यक्ती किंवा मूल यास बाथच्या जागी कामावर लावता कामा नये किंवा काम करण्यास परवानगी देता कामा नये.

**४. कामाच्या खोल्यांची जमीन** – बाथ असलेल्या प्रत्येक खोलीची जमीन जलाभेद्य असली पाहिजे. ही जमीन चांगली व समतल स्थितीत ठेवली पाहिजे व ती दिवसातून निदान एकदा धुतली पाहिजे.

**५. संरक्षक कपडे** – (१) कारखान्याच्या कब्जेदाराने, ज्या कोणत्याही प्रक्रियेत कामावर लावलेल्या व्यक्तीचा बाथमधून येणाऱ्या द्रव पदार्थाशी संबंध येतो त्या व्यक्तीच्या उपयोगासाठी पुढील संरक्षक कपड्यांची तरतूद केली पाहिजे.

४. विवक्षित प्रक्रियांचे विघटीकरण – पुढील प्रक्रियांपैकी प्रत्येक प्रक्रिया, एकमेकांपासून आणि अन्य कोणत्याही प्रक्रियेपासून परिणामकारक रीतीने अलग राहील अशा रीतीने व अशा परिस्थितीत करण्यात आली पाहिजे–

(अ) शिशाचा कच्चा ऑक्साईड हाताळणे.

(ब) पेस्टींग

(क) पेस्टेड प्लेट्स सुकवणे

(ड) शिशाच्या वळणाच्या संबंधात (टकिंग) आवश्यक केली जाणारी कृती

(इ) पेस्टेड प्लेट्स विरळवणे

(फ) ग्रीड कास्टिंग शॉप.

(५) खुली जागा – शिशावरील प्रक्रिया जेथे केली जाते अशा प्रत्येक खोलीत, तेथे कामावर लावलेल्या प्रत्येक व्यक्तीकरिता किमान १५ घन मीटर खुली जागा असली पाहिजे व ही खुली जागा मोजताना ३.५ मीटरवरील उंची जमेस धरता कामा नये.

(६) हवा खेळती ठेवणे – प्रत्येक कामाच्या खोलीत, खोलीच्या सर्व भागात परिणामकारक रीतीने हवा खेळती ठेवण्यासाठी व ती कायम राखण्यासाठी योग्य आकाराच्या हवा आत येण्याच्या व हवा बाहेर जाण्याच्या मार्गांची तरतूद केली पाहिजे.

(७) पेस्टिंग खोलीतील कामगारांमधील अंतर – प्रत्येक पेस्टिंग खोलीत कोणत्याही पेस्टरच्या कामाच्या जागेचा मध्यभाग व त्याच्या अगदी जवळ काम करणाऱ्या पेस्टरच्या जागेचा मध्यभाग यांतील अंतर १५० सेंमी. मीटरपेक्षा कमी असता कामा नये.

(८) कामाच्या खोल्यांची जमीन – (१) जेथे शिशाची प्रक्रिया चालू असते अशा प्रत्येक खोलीतील जमीन –

(अ) गुळगुळीत व जलाभेद्य होण्यासाठी सिमेंट किंवा तत्सम सामानाची असली पाहिजे.

(ब) सुस्थितीत ठेवली पाहिजे.

(क) खोलीत चालू असलेल्या प्रक्रियेसाठी आवश्यक नसलेल्या किंवा त्या प्रक्रियेत उत्पन्न न होणाऱ्या सामानापासून, संयंत्रापासून किंवा इतर अडथळ्यापासून मोकळी ठेवली पाहिजे.

(२) ग्रीड कास्टिंग शॉप खेरीज अशा सर्व खोल्यांची जमीन जेव्हा खोलीत इतर कोणतेही काम चालू नसेल अशा वेळी सर्वत्र पाणी शिंपडून रोज स्वच्छ केली पाहिजे.



(३) ग्रीड कास्टिंग शॉपची जमीन रोज स्वच्छ केली पाहिजे.

(४) पोट परिच्छेद (१), (२) व (३) च्या उपबंधास बाधा न आणता जेथे शिशाचा कच्चा ऑक्साईड हाताळला जात असेल किंवा पेस्टिंग चालू असेल तेथील जमीन –

(अ) काम चालू असताना सतत दमट ठेवली पाहिजे.

(ब) तेथे जलनिःसारणाची योग्य व पुरेशी व्यवस्था केली पाहिजे.

(९) कामाचे बाक – ज्या बाकावर शिशाची कोणतीही प्रक्रिया चालू असेल ते (अ) गुळगुळीत पृष्ठभागाचे असले पाहिजेत व ते मजबूत स्थितीत ठेवले पाहिजेत.

(ब) त्यावर चालू असलेल्या प्रक्रियेसाठी आवश्यक नसलेल्या किंवा त्या प्रक्रियेत उत्पन्न होणाऱ्या सर्व सामानापासून किंवा संयंत्रापासून मोकळे ठेवले पाहिजेत. आणि ग्रीड कास्टिंग शॉपमधील बाकाशिवाय, असे सर्व कामाचे बाक ज्यावेळी तेथे इतर कोणतेही काम करण्यात येत नसेल तेव्हा एकतर संपूर्णपणे ओलसर करून किंवा शोषण सफाई यंत्राचा वापर करून दररोज स्वच्छ ठेवले पाहिजेत आणि ग्रीड कास्टिंग शॉपमधील असे सर्व कामाचे बाक दररोज साफ केले पाहिजेत आणि पेस्टींगच्या कामासाठी वापरल्या जाणाऱ्या प्रत्येक बाकावर – शिशाच्या पत्र्याचे किंवा जलाभेद्य सामानाचे संपूर्ण आच्छादन घातले पाहिजे, त्याच्या कडा उंच असल्या पाहिजेत.

पेस्टींगचे काम चालू असताना तो सतत दमट ठेवला पाहिजे, आणि पेस्टेड प्लेट्स कातरणे, ब्रशाने साफ करणे, कानशीने घासणे या कामासाठी किंवा घर्षणाच्या किंवा कापण्याच्या इतर कोणत्याही कामासाठी वापरल्या जाणाऱ्या प्रत्येक बाकास, ज्यातून कापलेले तुकडे, कानशीने घासलेले कण किंवा उत्पन्न झालेली धूळ, पाणी असलेल्या पात्रात पडेल अशी भेग किंवा जाळी असलेला वरचा भाग बसवला पाहिजे.

१०. बहिःसर्जक हवेचा स्रोत – कार्यक्षम बहिःसर्जक हवेच्या स्रोताचा वापर केल्याशिवाय खालील प्रक्रिया चालविता कामा नये.

(अ) शिसे किंवा शिसे असलेले पदार्थ वितळवणे.

(ब) कामाच्या खोलीत धूळ जाण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने बंद केलेल्या उपकरणात केलेले असेल ते खेरीज करून, शिशाचा कच्चा ऑक्साईड हाताळणे.

(क) पेस्टींग,

(ड) धूळ उत्पन्न होईल अशा रीतीने पेस्टेड प्लेट्स कातरणे, ब्रशाने साफ करणे, कानशीने घासणे किंवा दुसऱ्या कोणत्याही पद्धतीने घासणे अथवा कापणे.

(इ) खालील प्रक्रियेखेरीज इतर रीतीने शिसे वितळणे.

(एक) फार्मेशन टाकीमधील 'टँकिंग',

(दोन) कार्यक्षम बहिःसर्जक हवेच्या झोताचा वापर करणे अव्यवहार्य होईल अशा रीतीने सेल केसेसाठी शिशाच्या लायनिंग तयार करण्यासाठी आवश्यकपणे सुरू केलेली रासायनिक ज्वलनक्रिया;

असा बहिःसर्जक हवेचा झोत यांत्रिक साधनांनी निर्माण केला पाहिजे आणि तो बाहेर पडणाऱ्या धुळीवर किंवा धुरावर, त्याच्या मूळ जागेच्या शक्य तितक्या जवळ ही धूळ किंवा धूर कामगार काम करीत असलेल्या कोणत्याही खोलीत शिरणार नाही अशा रीतीने चालविला पाहिजे.

११. वितळपात्रातून निघणारा धूर किंवा वायू – कोणतेही वितळपात्र तापवितांना ज्वलनक्रियेमुळे निर्माण होणारे पदार्थ कामगार काम करीत असलेल्या कोणत्याही खोलीत सुटून जाऊ देता कामा नये.

१२. गाळ ठेवण्याचे पात्र – प्रत्येक वितळपात्रातून जो गाळ बाहेर काढण्यात येईल त्याकरिता बट्ट झाकण असलेल्या एका योग्य पात्राची तरतूद केली पाहिजे आणि त्याचा वापर केला पाहिजे.

१३. टाकाऊ शिसे ठेवण्याचे पात्र – कामाच्या प्रत्येक खोलीत धूळ उत्पन्न करणारे जुने पत्रे आणि टाकाऊ पदार्थ साठवण्यासाठी योग्य असे एक पात्र ठेवले पाहिजे.

१४. वाळविण्याच्या खोलीतील रॅक्स व मांडण्या – कोणत्याही वाळ-विण्याच्या खोलीत पुरविण्यात आलेल्या रॅक्स किंवा मांडण्या, जमिनीपासून २४० सेंटीमीटरपेक्षा अधिक उंच किंवा ६० सेंटीमीटरपेक्षा अधिक रुंद असता कामा नयेत; पण दोन्ही बाजूंनी लावलेल्या किंवा काढलेल्या रॅक्स किंवा मांडण्या यांच्या बाबतीत, एकूण रुंदी १२० सेंटीमीटरपेक्षा अधिक असता कामा नये.

अशा रॅक्स किंवा मांडण्या स्वच्छ करण्याच्या प्रयोजनासाठी कार्यक्षम अशा शोषक सफाई यंत्राचा वापर केला जात नसेल तर, त्या संपूर्णपणे ओलसर करण्यात आल्यानंतरच स्वच्छ केल्या पाहिजेत.

१५. वैद्यकीय तपासणी – (अ) शिशाच्या प्रक्रियेत कामावर लावलेल्या प्रत्येक व्यक्तीची अशा प्रक्रियेत तिच्या प्रथम नियुक्तीच्या तारखेपूर्वी सात दिवस



आधी किंवा त्यानंतर सात दिवसांच्या आत प्रमाणक शल्यचिकित्सकाद्वारे तपासणी करण्यात आली पाहिजे आणि त्यानंतर प्रत्येक कॅलेंडर महिन्यातून एकदा किंवा मुख्य निरीक्षक लेखी विनिर्दिष्ट करील अशा अंतराने ज्याची सर्व संबंधितांना यथोचित सूचना देण्यात येईल अशा कोणत्याही दिवशी प्रमाणक शल्यचिकित्सका-कडून तपासणी करण्यात आली पाहिजे.

'प्रथम नियुक्ती' याचा अर्थ कारखान्यात किंवा कर्मशाळेमध्ये शिशाच्या प्रक्रियेत प्रथम कामावर लावणे आणि तीन कॅलेंडर महिन्यांपेक्षा अधिक मुदतीपर्यंत अशा प्रक्रियेतील नियुक्तीत खंड पडल्यानंतर, त्या कारखान्यात किंवा कर्मशाळेत शिशाच्या प्रक्रियेत पुन्हा कामावर लावणे असा होतो.

(ब) शिशाच्या प्रक्रियेत कामावर लावलेल्या सर्व व्यक्तींची नावे समाविष्ट असलेली नमुना ७ मधील आरोग्य नोंदवही ठेवण्यात आली पाहिजे.

(क) कोणत्याही व्यक्तीस, निलंबनानंतर, आरोग्य नोंदवहीत दाखल केलेल्या किंवा तीस जोडलेल्या प्रमाणक शल्यचिकित्सकाच्या लेखी मंजुरीशिवाय, शिशाच्या प्रक्रियेतील कामावर लावता कामा नये.

१६. संरक्षक कपडे – पुढील कामावर लावलेल्या सर्व व्यक्तींना संरक्षक कपडे पुरविले पाहिजेत आणि ते योग्य स्थितीत ठेवले पाहिजेत आणि अशा प्रकारचे कपडे संबंधित व्यक्तींनी घातले पाहिजेत.

(अ) शिशाचा कच्चा ऑक्साईड हाताळणे.

(ब) पेस्टींग आणि

(क) फॉर्मेशन कक्ष

संरक्षक कपड्यांमध्ये जलरोधक ॲप्रन आणि जलरोधक पादत्राणे, तसेच शिशाचा कच्चा ऑक्साईड हाताळणाऱ्यांची किंवा पेस्टींगचे काम करणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत शिरोवेष्टन यांचा समावेश होईल. शिरोवेष्टने दररोज धुतली पाहिजेत.

१७. भोजनगृह – शिशाच्या प्रक्रियेत कामावर असणाऱ्या आणि जेवणाच्या मधल्या सुटीत त्याच जागेवर राहणाऱ्या सर्व व्यक्तींच्या उपयोगासाठी,

(अ) पुरेशा टेबलांची आणि बाकांची आणि

(ब) अन्न गरम करण्याच्या पुरेशा साधनांची तरतूद केली आहे अशा एका योग्य भोजनगृहाची सोय केली पाहिजे.

हे भोजनगृह जबाबदार व्यक्तीच्या पर्यवेक्षणाखाली असले पाहिजे व ते स्वच्छ ठेवले पाहिजे.

**१८. प्रसाधन कक्ष –** शिशाच्या प्रक्रियेत कामावर असणाऱ्या सर्व व्यक्तींच्या उपयोगासाठी, (अ) कामाच्या वेळी ते कपडे काढून ठेवण्यासाठी व ते ओले असल्यास वाळविण्यासाठी पुरेशी व्यवस्था असलेल्या प्रसाधन-कक्षाची तरतूद केलेली असली पाहिजे; अशी जागा कोणत्याही भोजनगृहापासून वेगळी असली पाहिजे;

(ब) परिच्छेद १६ अनुसार पुरविण्यात आलेले संरक्षक कपडे ठेवण्याकरिता स्वतंत्र आणि योग्य व्यवस्था केलेली असली पाहिजे.

**१९. धुण्याच्या सोयी –** शिशाच्या प्रक्रियेत कामावर असणाऱ्या सर्व व्यक्तींच्या उपयोगासाठी स्वच्छ व चांगल्या दुरुस्त स्थितीत ठाकलेल्या धुण्याच्या जागेची तरतूद केलेली असली पाहिजे.

(अ) या धुण्याच्या जागेवर –

(एक) व्यवस्थितपणे [सांडपाण्याचा नळ जिला बसविलेला आहे अशी व कोणत्याही एका वेळी कामावर लावलेल्या अशा प्रत्येक पाच व्यक्तींमागे निदान ६० सेंमी. मीटर अंतर मिळेल इतक्या पुरेशा लांबीची व १० सेंमी. मीटरपेक्षा अधिक नाही इतक्या अंतरावर तोटीपासून अगर पंपापासून सतत पाण्याचा पुरवठा करणारी धुळगुळीत बलाधिक पृष्ठभागाची डोण,

(दोन) कोणत्याही एकावेळी कामावर असलेल्या अशा प्रत्येक पाच व्यक्तीमागे सांडपाण्याचे नळ बसविलेले आणि प्लग जोडलेले व सतत पाण्याचा पुरवठा करणारे कमीत कमी एक मार्जन पात्र.

(तीन) पेस्टर्स आणि शिशाचा कच्चा ऑक्साईड हाताळण्याच्या कामावर लावलेले कामगार यांच्या बाबतीत अशा प्रत्येक कामगाराकरिता स्वतंत्र सूचना केलेले टॉवेल बरून योग्य साहित्यापासून बनविलेला व दररोज नवीन ठाकवयाच्या स्वच्छ टॉवेलचा पुरेसा पुरवठा, आणि

(चार) साबण किंवा स्वच्छ करण्याचे इतर योग्य साहित्य आणि नखे साफ करण्याचे कुंचले यांचा पुरेसा पुरवठा यांची तरतूद केलेली असली पाहिजे.

(ब) या शिवाय, मुख्य निरीक्षकाकडून मिळालेल्या लेखी सूचनेवरून आवश्यक असल्यास, जेथे शिशाचा कच्चा ऑक्साइड हाताळण्याचे किंवा पेस्टींगचे काम चाललेले असेल अशा खोल्यांच्या अगदी जवळ धुण्याच्या सोयींची तरतूद केलेली असली पाहिजे.

**२०. धुण्याकरिता द्यावयाचा वेळ –** शिशाचा कच्चा ऑक्साईड हाताळण्याच्या किंवा पेस्टींगच्या कामावर असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस प्रत्येक जेवणाच्यापूर्वी आणि



दिवसाचे काम संपण्यापूर्वी, नेहमीच्या जेवणाच्या वेळेशिवाय, आणखी कमीत कमी दहा मिनिटे वेळ दिला पाहिजे.

परंतु असे, की जर अशा प्रत्येक व्यक्तीकरिता एक मार्जनपात्र किंवा ६० सेंटीमीटरची डोण असेल तर हा नियम लागू होणार नाही.

**२१. आंघोळ करण्यासाठी सोयी –** शिशाचा कच्चा ऑक्साईड हाताळण्याच्या किंवा पेस्टींगच्या कामावर लावलेल्या सर्व व्यक्तींकरिता मुख्य निरीक्षकाचे समाधान होईल अशा रीतीने आंघोळ करण्यासाठी पुरेशा जागेची व्यवस्था आणि साबणाचा व स्वच्छ टॉवेलचा पुरेसा पुरवठा करण्याची तरतूद केली पाहिजे.

**२२. कामाच्या खोलीत अन्नपदार्थ, पेये वगैरे मनाई –** कोणत्याही कामगाराने, जेथे शिशाची कोणतीही प्रक्रिया चालू असेल अशा कोणत्याही कामाच्या खोलीत अन्नपदार्थ, पेये, पानसुपारी किंवा तंबाखू यांचे सेवन केले जाता कामा नये किंवा आणता कामा नये.

**२३. शिशाच्या ऑक्साईडचा साठा करणे –** शिशाचे ऑक्साईड असलेल्या किंवा ठेवण्यात आलेल्या सर्व पिशव्या केवळ त्याच प्रयोजनाकरिता वापरल्या जाणाऱ्या बंद खोल्यात ठेवण्यात आल्या पाहिजेत.

**२४. कागदाचा किंवा कपड्याचा पुन्हा वापर करण्यास मनाई –** (अ) पेस्टेड प्लेटसच्या मागे लावण्यासाठी किंवा त्या सुकविण्यासाठी एकदा वापरलेला कागद कारखान्यात पुन्हा वापरता कामा नये.

(ब) पेस्टेड प्लेटसच्या मागे लावण्यासाठी किंवा त्या सुकविण्यासाठी एकदा वापरलेला अथवा धूळ उत्पन्न होणार नाही अशा रीतीने उत्पन्न केल्यासारखा साठविता किंवा हाताळता कामा नये.

## अनुसूची ४ (काच निर्मिती)

**१. सूट –** कोणताही कारखाना किंवा प्रक्रियेचा कोणताही प्रकार यांच्या संबंधात एखाद्या कारखान्यातील कामाच्या विशिष्ट पद्धतीमुळे किंवा विशिष्ट शर्तीमुळे किंवा अन्यथा तेथे कामावर लावलेल्या व्यक्तींना धोका न पोहोचता या अनुसूचीच्या आवश्यकतापैकी एखादी निलंबित करता येणे शक्य आहे किंवा तिच्यापासून सूट देता येणे शक्य आहे किंवा ही अनुसूची किंवा तिच्या कोणताही भाग कोणत्याही कारणाकरिता लागू करणे अव्यवहार्य आहे अशी मुख्य निरीक्षकाची खात्री झाल्यास त्यास, लेखी प्रमाणपत्राद्वारे, त्याला योग्य वाटेल अशा मुदतीकरिता आणि शर्तीवर, त्यात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अशा प्रकारचे निलंबन किंवा सूट प्राधिकृत करता येईल.

२. व्याख्या – ह्या अनुसूचीच्या प्रयोजनाकरिता (अ) 'कार्यक्षम बहिःसर्जक हवेचा स्रोत' म्हणजे, जेथे काम चालू असते अशा कोणत्याही जागेतील हवेत वायू, बाष्प, धूळ किंवा धूम जाण्याचा (नेहमी असलेल्या वातावरणाच्या स्थितीत वायू, बाष्प, धूळ किंवा धूम जाण्याचा प्रतिबंध करता यावा म्हणून तो काढून टाकण्या-जेथवर व्यवहार्य असेल तेथवर) प्रतिबंध करता यावा म्हणून तो काढून टाकण्यासाठी यांत्रिक साधनांच्या सहाय्याने घडवून आणलेली स्थल-विशिष्ट हवा खेळण्याची सोय. ज्या ठिकाणी असा वायू, बाष्प, धूळ किंवा धूम निर्माण होते, त्या मूळ ठिकाणी निर्माण झालेला धूर काढून न टाकणारा हवेचा स्रोत कार्यक्षम समजला जाणार नाही.

(ब) 'शिशाचे संयुग' म्हणजे, अशोधित शिसे, खेरीज करून, 'शिशाच्या ज्या कोणत्याही संयुगावर खाली दिलेल्या रीतीने प्रक्रिया केली असता व हायड्रो-क्लोरिक ॲसिडच्या पाण्यातील विद्रावाशी त्याचा संयोग केला असता त्यापासून शिशाचे विद्राव्य संयुग इतके मिळते, की शिशाचा मोनोक्साईड म्हणून त्याची मोजणी केली असता पृथक्करण, करण्यासाठी घेतलेल्या भागाच्या कोरड्या स्थितीतील वजनाच्या शेकडा पाच टक्क्यापेक्षा त्याचे वजन जास्त भरते, असे शिशाचे संयुग.

प्रक्रियेची पद्धती खालीलप्रमाणे असली पाहिजे – १०० सें. उष्णतामानात वाळवलेल्या विशिष्ट वजनाच्या परिमाणातील पदार्थाचे, त्यापेक्षा १००० पट वजन असलेल्या ज्यात वजनी २५ टक्के हैड्रोजन क्लोराईड आहे अशा हैड्रोक्लोरिक ॲसिड असलेल्या पाण्याच्या विद्रवात मिश्रण करावे. हे मिश्रण नेहमीच्या उष्णता-मानात एक तासपर्यंत सतत हालवावे. त्यानंतर हा विद्रव-स्थिर होऊ द्यावा व नंतर गाळावा. गाळलेल्या स्वच्छ द्रवातील शिशाचा क्षार शिशाचा सल्फाईड म्हणून तळाशी बसू द्यावा आणि शिशाचा सल्फेट म्हणून त्याचे वजन करावे.

(क) 'निलंबन' म्हणजे, परिच्छेद तीनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोण-त्याही प्रक्रियेत कामावर असलेल्या सर्व व्यक्तींच्या संबंधात निलंबनाची शक्ती असलेल्या प्रमाणक शल्य चिकित्सकाने स्वाक्षरी केलेल्या नमुना ७ मधील आरोग्य नोंदवहीतील लेखी प्रमाणपत्रावरून कोणत्याही अशा प्रक्रियेतील कामावरून निलंबन.

३. बहिःसर्जक हवेचा स्रोत – कार्यक्षम बहिःसर्जक हवेच्या स्रोताशिवाय किंवा मुख्यनिरीक्षक मान्य करील अशा इतर शर्तींच्या अनुसार असल्याशिवाय पुढील प्रक्रिया चालू ठेवता येणार नाहीत –

(अ) 'डॅच' बनविण्यासाठी कच्च्या पदार्थांचे मिश्रण करणे.

(ब) काच किंवा काचेची कोणतीही वस्तू शुष्क स्थितीत घासणे, त्यास



(क) ज्या प्रक्रियांतून हैड्रोफ्लुरिक ॲसिडचा धूर किंवा अमोनियाची वाफ बाहेर पडते अशा सर्व प्रक्रिया.

(ड) वापरलेले 'पॉट्स' भरडून किंवा त्यांचा चुरा करून भट्टयाने सांचे किंवा 'पॉट्स' तयार करण्याच्या सर्व प्रक्रिया.

(इ) शिशाच्या शुष्क संयुगाचा ज्यात उपयोग करण्यात येतो अशा सर्व प्रक्रिया.

४. स्त्रिया आणि तरुण व्यक्ती यांच्याबाबत मनाई – परिच्छेद ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कामांपैकी कोणत्याही कामावर किंवा अशी कामे ज्या जागी करण्यात येतात अशा कोणत्याही जागेवर कोणत्याही स्त्रीस किंवा तरुण व्यक्तीस कामावर लावता कामा नये किंवा काम करण्यास परवानगी देता कामा नये.

५. जमीन आणि काम करण्याची बाके – ज्या खोलीत शिशाची शुष्क-संयुगे हाताळली जात असतील किंवा सिलिका धूळ बाहेर फेकणारी कोणतीही प्रक्रिया चालू असेल अशा खोलीतील जमीन आणि कामाची बाके उभट राखली पाहिजेत आणि त्यासंबंधात खालील आवश्यकतांचे अनुपालन केले पाहिजे.

अशी जमीन–

(अ) गुळगुळीत आणि जलाभेद्य होण्यासाठी सिमेंटची किंवा त्यासारख्या इतर साहित्यापासून बनविलेली असली पाहिजे.

(ब) सुस्थितीत ठेवली पाहिजे, आणि

(क) जेव्हा खोलीत इतर कोणतेही काम करण्यात येत नसेल तेव्हा भरपूर पाणी शिंपडून दररोज स्वच्छ केली पाहिजे.

कामाच्या बाकांचा–

(अ) पृष्ठभाग गुळगुळीत असला पाहिजे आणि ती मजबूत राखली पाहिजेत आणि–

(ब) जेव्हा इतर कोणतेही काम चालू नसेल, तेव्हा ती संपूर्णपणे ओलसर करून किंवा शोषण सफाई यंत्राचा वापर करून, दररोज स्वच्छ केली पाहिजेत.

६. हैड्रोफ्लुरिक ॲसिडचा उपयोग – ज्या खोल्यांमध्ये काचेवर हाय-ड्रोफ्लुरिक ॲसिडची प्रक्रिया चालू असेल अशा खोल्यात पुढील उपबंध लागू केले पाहिजेत.

(अ) खोलीतील सर्व भागात कार्यक्षम रीतीने हवा खेळती ठेवण्याची चांगली सोय करता यावी यासाठी पुरेशा आकाराच्या आंतरमार्गांची व निर्गमन मार्गांची तरतूद असली पाहिजे.

(ब) जमीन घटावर्षाने बद्ध आच्छादली पाहिजे आणि ती झाकलेल्या गटाराकडे थोडी उतरती असली पाहिजे.

(क) कामाच्या जागांना बाहेर येणारी छपरे लावून, ज्यावर प्रक्रिया करावयाच्या असतील अशा वस्तू आत आणण्यासाठी आवश्यक असलेली दारे शक्य तितकी लहान होतील अशा रीतीने त्यांना कुंपण घातले पाहिजे; आणि

(ड) वायू खाल्याच्या बाहेर पडतील अशा रीतीने कार्यक्षम बहिःसर्जक हवेच्या झोताची योजना केली पाहिजे.

७. हैड्रोफ्लुरिक ॲसिडचा साठा करणे व त्याचे परिवहन – हैड्रोफ्लुरिक ॲसिड, शिसे किंवा गटापर्चा यापासून तयार केलेले सिलिंडर किंवा भांडे यांखेरीज अन्यथा साठविता कामा नये किंवा वाहून नेता कामा नये.

८. अन्न, पेये इत्यादी कामाच्या खोल्यांत नेण्यास मनाई – ज्या खोलीत परिच्छेद ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही प्रक्रिया किंवा कामाच्या बाबत चालू असेल अशा कोणत्याही खोलीत किंवा जागेत कोणत्याही कामगाराने कोणतेही अन्नपदार्थ, पेय, पानसुपारी किंवा तंबाखू आणता कामा नये किंवा त्यांचे सेवन करता कामा नये.

९. संरक्षक कपडे – कब्जेदाराने, परिच्छेद ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रक्रियांत कामावर असणाऱ्या सर्व व्यक्तींच्या उपयोगासाठी, कामाच्या स्वरूपाप्रमाणे योग्य संरक्षक कपडे, पादत्राणे व गॉगल्स पुरविले पाहिजेत व ते दुरुस्त व स्वच्छ स्थितीत ठेवले पाहिजेत. आणि असे कपडे, पादत्राणे इत्यादी संबंधित व्यक्तींनी घातले पाहिजेत.

१०. धुण्याच्या सोयी – परिच्छेद ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रक्रियात कामावर असलेल्या सर्व व्यक्तींच्या उपयोगासाठी स्वच्छ व चांगल्या दुरुस्त स्थितीतील धुण्याच्या जागेची तरतूद केलेली असली पाहिजे–

(अ) धुण्याच्या जागेवर पुढील गोष्टींची तरतूद केलेली असली पाहिजे–

(एक) प्लगशिवाय सांडपाण्याचा नळ बसविलेला आहे अशी व कोणत्याही एका वेळी कामावर लावलेल्या अशा प्रत्येक पाच व्यक्तींमागे निदान ६० सेंटीमीटर अंतर मिळेल इतक्या पुरेशा लांबीची आणि ६० सेंटीमीटरपेक्षा अधिक नाही इतक्या अंतरावर तोट्यांतून किंवा फवाऱ्यांतून सतत पाण्याचा पुरवठा करणारी गुळगुळीत व जलाभेद्य पृष्ठभाग असलेली डोण, किंवा

(दोन) कोणत्याही एकावेळी कामावर असलेल्या अशा प्रत्येक पाच व्यक्तींमागे सांडपाण्याचा नळ व प्लग बसविलेले व सतत पाण्याचा पुरवठा करणारे ... बसविलेले व बरोबर



वदलण्यात येणारे स्वच्छ टॉवेल तसेच साबण किंवा स्वच्छतेसाठी वापरले जाणारे इतर योग्य पदार्थ व नखे साफ करण्याचे कुंचले यांचा पुरेसा पुरवठा केला पाहिजे, आणि

(ब) तोट्या असलेले पुरेसे उभे नळ, अशा उभ्या नळांची संख्या व जागा निरीक्षकाचे समाधान होईल अशी असली पाहिजे.

११. वैद्यकीय तपासणी – (अ) परिच्छेद ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणत्याही प्रक्रियेत कामावर लावलेल्या प्रत्येक व्यक्तीची अशा प्रक्रियेत तिच्या प्रथम नियुक्तीच्या तारखेपूर्वी किंवा त्यानंतर सात दिवसांच्या आत, प्रमाणक शल्यचिकित्सकाद्वारे तपासणी करण्यात आली पाहिजे आणि त्यानंतर प्रत्येक कॅलेंडर महिन्यातून एकदा किंवा मुख्य निरीक्षक लेखी विनिर्दिष्ट करील अशा अंतराने त्याची उर्वे संबंधितांना यथोचित सूचना देण्यात येईल अशा कोणत्याही दिवशी प्रमाणक शल्य चिकित्सकाकडून तपासणी करण्यात आली पाहिजे.

(ब) परिच्छेद ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रक्रियेत कामावर लावलेल्या सर्व व्यक्तींची नावे समाविष्ट असलेली नमुना ७ मधील आरोग्य नोंदवही ठेवण्यात आली पाहिजे.

(क) कोणत्याही व्यक्तीस, निलंबनानंतर आरोग्य नोंदवहीत दाखल केलेल्या किंवा लेखी पुनः प्रमाणक शल्यचिकित्सकाच्या लेखी मंजुरीशिवाय परिच्छेद ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रक्रियेत कामावर लावता कामा नये.

## अनुसूची ५

धातू घासणे व त्यास झिलई देणे आणि तदनुषंगिक प्रक्रिया

१. व्याख्या – या अनुसूचीच्या प्रयोजनासाठी–

(अ) 'पेषण प्रस्तर' म्हणजे नैसर्गिक किंवा तयार केलेल्या वाळूच्या दगडापासून बनविलेला पेषण प्रस्तर. मात्र, ज्यात नैसर्गिक किंवा तयार केलेल्या वाळूच्या दगडाचे ठोकळे बसविलेले असतील अशा धातूच्या चाकाचा किंवा सिलिंडरचा समावेश होत नाही.

(ब) 'अपघर्षक चाक' म्हणजे, बंधित एमरीपासून किंवा तत्सम पदार्थापासून तयार केलेले चाक.

(क) 'घर्षक' म्हणजे, पेषण प्रस्तराने किंवा घर्षक चाकाने यांत्रिक शक्तीचा वापर करून धातू घासणे.

(ड) 'झिलई देणे' म्हणजे, कोणत्याही चाकाने, बफने, मॉपने किंवा ज्यास कोणताही घासण्याचा किंवा झिलई देण्याचा पदार्थ जोडलेला किंवा लावलेला

बाहे अशा तऱ्हेच्या साधनाने यांत्रिक शक्तीचा वापर करून धातू घासणे, त्यास झिलई देणे किंवा फिनिशिंग करणे.

(ई) 'रेंसिंग' म्हणजे, फिरता पेषण प्रस्तर प्रथम उपयोगात आणण्यापूर्वी कातणे, कापणे किंवा त्यास योग्य आकार देणे.

(फ) 'हॅकिंग' म्हणजे, टाकीने किंवा त्यासारख्या हत्याराने पेषण प्रस्तराचा पृष्ठभाग तासणे.

(ग) 'रौंडिंग' म्हणजे, फिरत्या पेषण प्रस्तराच्या पृष्ठभागास धातूचा रॉड, बार किंवा पट्टा लावून त्यास योग्य आकार देणे.

२. अपवाद – (१) या अनुसूचीतील कोणतीही गोष्ट, ज्या कोणत्याही कारखान्यात, त्याच्या ज्या कोणत्याही भागात एक किंवा अधिक व्यक्ती संपूर्णतः किंवा मुख्यतः धातू दळण्याच्या किंवा त्यास झिलई देण्याच्या कामावर लावलेल्या असतील तो भाग खेरीज करून, फक्त दुरुस्तीचे काम केले जात असेल त्या कारखान्यास लागू असणार नाही.

(२) त्या अनुसूचीतील परिच्छेद ४ खेरीज करून कोणतीही गोष्ट, मधून मधून केल्या जाणाऱ्या आणि जेथे कोणत्याही आठवड्यात १२ तासांपेक्षा अधिक तास कोणत्याही व्यक्तीस कामावर लावले जात नाही अशा धातू दळण्याच्या किंवा झिलई देण्याच्या कोणत्याही कामास लागू होणार नाही.

(३) मुख्य निरीक्षकास, लेखी प्रमाणपत्राद्वारे, त्यात त्यास विनिर्दिष्ट करता येतील अशा शर्तीस अधीन राहून जर कामाच्या विशिष्ट पद्धतीमुळे किंवा अन्यथा, कामावर लावलेल्या व्यक्तींच्या आरोग्यास अथवा सुरक्षिततेस धोका न पोहोचविता, कोणत्याही कारखान्याच्या बाबतीत या अनुसूचीचे कोणतेही उपबंध शिथिल करणे किंवा रद्दबातल करणे व्यवहार्य असेल तर असे उपबंध शिथिल किंवा रद्दबातल करता येईल.

३. धूळ काढून टाकण्यासाठी साधन सामग्री – कोणत्याही प्रकारचे रेंसिंग, शुष्क स्थितीतील घर्षण किंवा झिलई देणे हे काम पुढील गोष्टींशिवाय करता कामा नये.

(अ) बाहेर फेकली जाणारी धूळ चांगल्याप्रकारे मध्येच अडवली जाईल अशा रीतीने बनविलेला, व्यवस्थित लावलेला व सुस्थितीत ठेवलेला टप किंवा इतर उपबंध, आणि–

(ब) योग्य आकाराची, हवाबंद व धूळ दूर वाहून नेऊ शकेल अशा रीतीने रचना केलेली एक नाली, ही नाली अडथळ्यापासून मोकळी ठेवली पाहिजे



आणि तिच्या तपासणीसाठी ती काढून स्वच्छ करण्यासाठी योग्य मार्गाची तरतूद केलेली असली पाहिजे आणि शक्य असेल तेथे या नालीतील हवेचा दाब निश्चित करण्यासाठी आवश्यक असे कोणतेही उपकरण तिला जोडणे निरीक्षकास शक्य व्हावे, म्हणून पंख्यापासून दूर असलेल्या टोकाला जोडणीची तरतूद केलेली असली पाहिजे; आणि

(क) धूळ बाहेर काढून टाकण्यासाठी पंखा किंवा हवेचा पुरेसा झोत निर्माण करणारे इतर कार्यक्षम साधन.

परंतु असे, की मुख्य निरीक्षकाचे मत, धूळ अडविण्यास, काढून टाकण्यास किंवा तिची विल्हेवाट लावण्यास टप, नाली व पंखा यांच्या इतकेच परिणामकारक दुसरे कोणतेही साधन असेल तर त्यास, त्याचा स्वीकार करता येईल.

४. घर्षणाच्या कामावर नियुक्त करण्यावरील निर्बंध – पेषण प्रस्तर, घर्षक चक्र किंवा झिलईचे उपबंध यावर घर्षणाची किंवा झिलई देण्याची प्रत्यक्ष प्रक्रिया एका वेळी एकापेक्षा अधिक व्यक्तींनी करता कामा नये.

मात्र, या परिच्छेदामुळे, अशा कोणताही पेषण प्रस्तर, घर्षण चक्र किंवा झिलईचे उपबंध यांच्या जवळ वजनदार किंवा अवजड वस्तू हाताळण्याच्या कामावर मदत करण्यासाठी व्यक्ती कामावर लावण्यास प्रतिबंध होणार नाही.

५. झिलई देणे – पेषण प्रस्तरावरील आर्द्रघर्षणाच्या आनुषंगिक प्रक्रिया खेरीज करून झिलई देण्याची प्रक्रिया किंवा इतर प्रक्रिया, ज्या खोलीत पेषण प्रस्तरावर आर्द्र घर्षणाची प्रक्रिया केली जात असेल अशा कोणत्याही खोलीत करता कामा नये.

६. हॅकिंग व रौंडिंग – हॅकिंगची किंवा रौंडिंगची प्रक्रिया, ती चालू असताना,

(अ) पेषण प्रस्तराच्या वरील पृष्ठभागास पाण्याचा पुरेसा पुरवठा केलेला नसेल, तर किंवा

(ब) धूळ मध्येच अडविण्यासाठी तिसऱ्या परिच्छेदाच्या आवश्यकतानुसार पुरेशा साधनाची तरतूद करण्यात आली नसेल तर, करता कामा नये.

७. धूळ काढण्याच्या साधन सामग्रीची तपासणी – (अ) धूळ बाहेर काढून टाकण्यासाठी किंवा ती वाहून टाकण्यासाठी असलेल्या साधनसामग्रीची, सक्षम व्यक्तीने दर सहा महिन्यांनी निदान एकदा तपासणी केली पाहिजे व चाचणी घेतली पाहिजे आणि तपासणीत व चाचणीत आढळून आलेला कोणताही दोष शक्य तितक्या लौकर सुधारला पाहिजे.

(ड) अशा तपासणीचा व चाचणीचा तपशील असलेली नोंदवही, मुख्य निरीक्षकाने मान्यता दिलेल्या नमुन्यात ठेवली पाहिजे.

## अनुसूची ६

### शिसे व शिशाची काही संयुगे तयार करणे व त्यावर प्रक्रिया करणे

१. सूट – कामावर असलेल्या व्यक्तींच्या संरक्षणासाठी व या अनुसूचीतील सर्व किंवा कोणत्याही उपबंधाची आवश्यकता नाही अशी जर मुख्य निरीक्षकाची खात्री झाली, तर त्यास त्यानुसार लेखी प्रमाणपत्राद्वारे, तो त्यास विनिर्दिष्ट करील अशा शर्तींस अधीन राहून, कोणत्याही कारखान्यास अशा सर्व किंवा कोणत्याही उपबंधापासून सूट देता येईल.

२. व्याख्या – या अनुसूचीच्या प्रयोजनासाठी,

(अ) 'शिशाचे संयुग' म्हणजे, अशोधित शिसे धरून, शिशाच्या ज्या कोणत्याही संयुगावर खाली दिलेल्या रीतीने प्रक्रिया केली असता व हायड्रोक्लोरिक ॲसिडच्या पाण्यातील विद्रावाशी त्याचा संयोग केला असता त्यापासून शिशाचे विद्राव्य-संयुग इतके मिळते, की शिशाचा मोनॉक्साईड म्हणून त्याची मोजणी केली असता पृथक्करण करण्यासाठी घेतलेल्या भागाच्या कोरड्या स्थितीतील वजनाच्या शेकडा पाच %पेक्षा त्याचे वजन जास्त भरते असे शिशाचे संयुग. रंग व तत्सम पदार्थ, तेल किंवा चरबीयुक्त इतर मिश्रणे यांच्या बाबतीत 'कोरड्या स्थितीतील वजन' म्हणजे, तेल, चरबी, रोगण किंवा इतर माध्यमे काढून टाकण्यासाठी त्या पदार्थाचे योग्य त्या विद्रावक पदार्थांशी पूर्णपणे मिश्रण किंवा त्यावर त्यांचा संस्कार केल्यावर बाकी राहिलेल्या पदार्थाचे कोरड्या स्थितीतील वजन. प्रक्रियेची पद्धती पुढीलप्रमाणे राहील. १०० सेंमी उष्णतामानात वाळविलेल्या विशिष्ट वजनाच्या परिमाणातील पदार्थाचे, त्यापेक्षा १०० पट वजन असलेल्या व ज्यात वजनी २५% हैड्रोजन क्लोराइड आहे अशा हैड्रोक्लोरिक ॲसिड असलेल्या पाण्याच्या विद्रावात मिश्रण करावे. हे मिश्रण नेहमीच्या उष्णतामानास एक तासपर्यंत सतत हलवावे. त्यानंतर हा विद्राव एक तास स्थिर होऊ द्यावा व नंतर गाळावा. गाळलेल्या स्वच्छ द्रवातील शिशाचा क्षार शिशाचा सल्फाइड म्हणून तळाशी बसू द्यावा आणि शिशाचा सल्फेट म्हणून त्याचे वजन करावे.

(ब) 'कार्यक्षम बहिःसर्जक हवेचा स्रोत' म्हणजे, जेथे काम चालू असते अशा कोणत्याही जागेतील हवेत वायू, वाफ, धूळ किंवा धूम जाण्यास (नेहमी असलेल्या वातावरणाच्या स्थितीत जेथवर व्यवहार्य असेल तेथवर) प्रतिबंध करता यावा म्हणून तो काढून टाकण्यासाठी उष्णता किंवा यांत्रिक साधने यांच्या सहाय्याने घडवून आलेली स्थलविशिष्ट हवा खेळविण्याची सोय. ज्या ठिकाणी



असा वायू, वाफ, धूम किंवा धूळ निर्माण होते त्या मूळ ठिकाणी निर्माण झालेला धूर काढून न टाकणारा हवेचा स्रोत कार्यक्षम समजला जाणार नाही.

३. प्रयुक्ती – ज्या कारखान्यात पुढील कामांपैकी कोणतेही काम करण्यात येत असेल अशा सर्व कारखान्यांस किंवा कारखान्याच्या भागात ही अनुसूची लागू असेल.

(अ) जस्त किंवा अशोधित शिसे यात घट करण्याचे किंवा त्यावरील संस्करणाचे महत्त्वाचे काम.

(ब) शिसेयुक्त राख हाताळणे, त्यावर प्रक्रिया करणे किंवा शिसाचा थर करणे. शिशाचे डिसिल्व्हराईझिंग करणे या शिशाची किंवा धातूची मोड वितळविणे.

(क) दहा टक्क्यांपेक्षा अधिक शिसे असलेला धातू किंवा मिश्रधातू तयार करणे.

(ड) शिशाचे कोणतेही ऑक्साइड, कार्बोनेट, सल्फेट, क्रोमेट, ॲसिटेट, नायट्रेट किंवा सिलिकेट तयार करणे.

(इ) लेड टेट्रा-एथिल हाताळणे किंवा त्याचे मिश्रण करणे.

(फ) शिशाच्या संयुगाचा ज्यात उपयोग करावा लागतो असे इतर कोणतेही काम.

(ग) जेथे उपरोक्त कामांपैकी कोणतीही कामे करण्यात येतात त्या कामाच्या खोल्या स्वच्छ करणे.

४. स्त्रिया व तरुण व्यक्ती यांच्याबाबत मनाई – परिच्छेद ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कामांपैकी कोणत्याही कामावर कोणत्याही स्त्रीस अथवा तरुण व्यक्तीस, लावता कामा नये किंवा काम करण्यास परवानगी देता कामा नये.

५. पालन करावयाच्या आवश्यक गोष्टी – परिच्छेद ६ ते १४ यातील तरतुदींचे पालन केल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस ज्या प्रक्रियेत शिशाच्या संयुगांचा वापर करावा लागतो अशा कोणत्याही प्रक्रियेत, ती प्रक्रिया, शिसे वा शिशाच्या संयुगामुळे धूळ किंवा धूम निर्माण होतो किंवा त्यात कामावर लावलेल्या व्यक्तीच्या अंगावर, त्या काम करीत असताना, शिशाच्या कोणत्याही संयुगाचे, शिंतोडे उडण्याचा संभव आहे अशा स्वरूपाची असेल तर, कामावर लावता कामा नये.

६. बहिःसर्जक हवेचा स्रोत – जेव्हा प्रक्रियेत धूळ, धूम, वायू किंवा वाफ उत्पन्न होत असेल तेव्हा ती उत्पन्न होण्याच्या मूळ ठिकाणाच्या शक्य तितक्या निकट वापरता येईल. अशाप्रकारे योजलेल्या कार्यक्षम बहिःसर्जक हवेच्या स्रोताने ती धूळ, धूम, वायू किंवा वाफ काढून टाकण्यासाठी तरतूद केली पाहिजे.

७. **स्वास्थ्य प्रमाणपत्र** – परिच्छेद ८ अनुसार वैद्यकीय तपासणी झाल्यानंतर कामासाठी योग्य ठरलेल्या व्यक्तीस प्रमाणक शल्यचिकित्सकाने नमुना २३ मधील स्वास्थ्य प्रमाणपत्र दिले पाहिजे आणि असे प्रमाणपत्र कारखान्याच्या व्यवस्थापकाच्या ताब्यात असले पाहिजे. कोणत्याही निरीक्षकाच्या तपासणीसाठी तात्काळ मिळेल अशा रीतीने हे प्रमाणपत्र ठेवले पाहिजे आणि असे प्रमाणपत्र मिळालेल्या व्यक्तीने, काम करीत असताना अशा प्रमाणपत्राच्या उल्लेख करणारे, चिन्ह जवळ बाळगले पाहिजे.

८. **वैद्यकीय तपासणी** (१) अशा प्रकारे कामावर लावलेल्या व्यक्तीची अशा प्रक्रियेतील त्याच्या प्रथम नियुक्तीपासून १४ दिवसांच्या आत प्रमाणक शल्य चिकित्सकाने वैद्यकीय तपासणी केली पाहिजे आणि त्यानंतर प्रमाणक शल्यचिकित्सकाने तीन महिन्यांपेक्षा अधिक नाही इतक्या अंतराने त्याची तपासणी केली पाहिजे आणि अशा तपासणीची नोंद, प्रमाणक शल्यचिकित्सकाने परिच्छेद ७ अनुसार देण्यात येणाऱ्या विशेष प्रमाणपत्रांत केली पाहिजे.

(२) जर कोणत्याही वेळी प्रमाणक शल्यचिकित्सकाच्या मते, कोणतीही व्यक्ती त्या प्रक्रियेत सतत कामावर राहिल्याने आरोग्यास विशेष धोका होईल या कारणावरून यापुढे कामावर राहाण्यास पात्र नसेल तर त्याने त्या व्यक्तीचे विशेष प्रमाणपत्र रद्द केले पाहिजे.

(३) विशेष स्वास्थ्य प्रमाणपत्र रद्द करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस, प्रमाणक शल्य चिकित्सकाने पुन्हा तपासणी करून त्या प्रक्रियेत ती काम करण्यास योग्य असल्याचे प्रमाणपत्र दिल्याखेरीज कामावर लावता कामा नये.

९. **काम करण्याच्या खोल्यांत अन्नपदार्थ, पेये वगैरेस मनाई** – कोणत्याही कामगारास, ज्या खोलीत प्रक्रिया चालू असते अशा कोणत्याही कामाच्या खोलीत अन्नपदार्थ, पेय, पानसुपारी किंवा तंबाखू आणता कामा नये किंवा सेवन करता कामा नये आणि कोणत्याही व्यक्तीने, जेवणाच्या किंवा विश्रांतीच्या मधल्या सुट्टीत अशा कोणत्याही खोलीत असता कामा नये.

१०. **संरक्षक कपडे** – कारखान्याच्या कब्जेदाराने योग्य ते संरक्षक पायजमे आणि शिरोवेष्टने पुरविली पाहिजेत व सुस्थितीत आणि स्वच्छ राखली पाहिजेत आणि कामावर असणाऱ्या व्यक्तींनी कामावर असताना असे पायजमे व शिरोवेष्टने घातली पाहिजेत.

११. **कामाच्या खोल्या, हत्यारे वगैरेंची स्वच्छता** – ज्या खोल्यांत व्यक्ती कामावर असतील अशा कामाच्या खोल्या आणि त्यांनी वापरावयाची सर्व हत्यारे व उपकरणे स्वच्छ ठेवली पाहिजेत.



१२. **धुण्याच्या सोयी** – (१) कब्जेदाराने कामावर असलेल्या सर्व व्यक्तींच्या उपयोगासाठी योग्य त्या धुण्याच्या सोयींची तरतूद केली पाहिजे व त्यात पुढील गोष्टींचा समावेश असला पाहिजे.

(अ) पलगसिवाय, सांडपाण्याचा नळ जिला बसवलेला आहे अशी व कोणत्याही एका वेळी कामावर लावलेल्या अशा प्रत्येक १० व्यक्तीमागे निदान ६० सेंटीमीटर अंतर मिळेल इतक्या पुरेशा लांबीची आणि वरच्या बाजूला ६० सेंटीमीटरपेक्षा अधिक नाही इतक्या अंतरावर, तोट्यांतून किंवा फवाऱ्यांतून पाण्याचा सतत पुरवठा करणारी, गुळगुळीत व जलाभेद्य पृष्ठभाग असलेली दोण, किंवा

(ब) कोणत्याही एक वेळी कामावर असलेल्या प्रत्येक दहा व्यक्तीमागे, पलग व सांडपाण्याचा नळ बसविलेले आणि सतत स्वच्छ पाण्याचा पुरवठा करणारे कमीत कमी एक मार्जन पात्र.

दोहोपैकी एका बाबतीत, नखे साफ करण्याचे कुंचले, साबू आणि स्वच्छ करण्याचे इतर साहित्य व स्वच्छ टॉवेल यांचा पुरेसा पुरवठा

(२) अशा प्रकारे करण्यात आलेल्या सोयी जबाबदार व्यक्तीच्या प्रभाराखाली असल्या पाहिजेत व त्या स्वच्छ ठेवल्या पाहिजेत.

१३. **भोजनगृह किंवा आहारगृह** – कब्जेदाराने, कामावर लावलेल्या व्यक्तींना जेवण घेण्यासाठी योग्य आणि पुरेशी व्यवस्था केली पाहिजे व ती सुस्थितीत ठेवली पाहिजे. या व्यवस्थेमध्ये काम करण्याच्या कोणत्याही खोलीपासून वेगळ्या असलेल्या आणि पुरेशी टेबले व बाके, तसेच गरम जेवण पुरविणाऱ्या आहारगृहाची तरतूद केलेली असेल तर अन्न गरम ठेवण्याची पुरेशी साधने यांनी सुसज्ज असलेल्या खोलीचा समावेश होईल. या खोलीत ताजी हवा खेळण्याची पुरेशी व्यवस्था केली पाहिजे आणि ती खोली जबाबदार व्यक्तीच्या प्रभाराखाली ठेवून स्वच्छ राखली पाहिजे.

१४. **प्रसाधन कक्ष** – कब्जेदाराने कामावर लावलेल्या व्यक्तींच्या उपयोगासाठी, कामाच्या वेळी घालण्यात न येणारे कपडे ठेवण्यासाठी आणि ओले कपडे सुकविण्यासाठी योग्य जागेची तरतूद केली पाहिजे व ती सुस्थितीत ठेवली पाहिजे.

## अनुसूची ७

पेट्रोलियम अधिनियम, १९३४ कलम २ खंड (ब) यात व्याख्या केल्याप्रमाणे घातक पेट्रोलियमपासून वायू निर्माण करणे.

१. **स्त्रिया आणि तरुण व्यक्ती यांच्या बाबतीत मनाई** – कोणत्याही स्त्रीस किंवा तरुण व्यक्तीस, ज्या इमारतीत, पेट्रोलियम अधिनियम १९३४, कलम २

खंड (ब) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे घातक पेट्रोलियमपासून वायू निर्माण करण्याचे काम चालू असेल त्या इमारतीत कामावर लावता कामा नये, काम करण्यास परवानगी देता कामा नये किंवा प्रवेश करू देता कामा नये.

२. फ्लेम ट्रॅप्स – पेट्रोलियम अधिनियम, १९३४ कलम २ खंड (ब) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे घातक पेट्रोलियमपासून वायू निर्माण करण्याचे संयंत्र आणि त्याबरोबर येणारे नळ आणि जोडण्या यांना कोणत्याही ज्वलनामधून संयंत्राकडे परतीचा धक्का होण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने बनवलेले आणि सुस्थितीत ठेवलेले कमीत कमी दोन कार्यक्षम फ्लेम ट्रॅप्स जोडले पाहिजेत. ह्या ट्रॅप्सपैकी एक ट्रॅप संयंत्राच्या अगदी जवळ जोडला पाहिजे. संयंत्र, सर्व नळ व जोडण्या गळणार नाहीत अशा रीतीने बसविले पाहिजेत व सुस्थितीत ठेवले पाहिजेत.

३. वायू निर्माण इमारती किंवा खोली – अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेले उपबंध अमलात आल्यानंतर, पेट्रोलियम अधिनियम १९३४ कलम २ खंड (ब) यात व्याख्या केल्याप्रमाणे घातक पेट्रोलियमपासून वायू निर्माण करण्याकरिता उभारलेली सर्व संयंत्रे, प्रत्यक्ष कारखान्याच्या इमारतीच्या बाहेर, हवा खेळती राहण्याची उत्तम सोय केलेल्या एका स्वतंत्र इमारतीत, (यापुढे 'वायू निर्माण इमारत' असा निर्देश केला आहे.) उभारली पाहिजेत. या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेले उपबंध अमलात येण्यापूर्वी उभारलेल्या अशा संयंत्राच्या बाबतीत, ज्या ठिकाणी असे संयंत्र उभारण्यात आले असेल अशी खोली (यापुढे 'वायू निर्माण खोली' असा निर्देश केला आहे) आणि कारखान्याच्या इमारतीचा बाकीचा भाग यात प्रत्यक्ष दळणवळण असता कामा नये. व्यवहार्य असेल तितक्या अशा सर्व वायू निर्माण खोल्या अग्निरोधक साहित्याच्या बांधल्या पाहिजेत.

परंतु असे, की राज्य शासनाची कोणत्याही कारखान्याचे बाबतीत अशी खात्री होईल की, पेट्रोलियम अधिनियम १९३४ कलम २ खंड (ब) यात व्याख्या केल्याप्रमाणे घातक पेट्रोलियमपासून वायू निर्माण करण्याकरिता असलेले संयंत्र विशेष सावधगिरी बाळगल्यामुळे किंवा अशा संयंत्राकरिता वापरण्यात आलेल्या विशेष यंत्रणामुळे (कन्ट्रक्शनमुळे) अशा कारखान्यात कामावर लावलेल्या कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही शारीरिक दुखापतीचा गंभीर धोका निर्माण होण्याचा संभव नाही अशा प्रकारचे आहे तर, राज्य शासन शासकीय राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून, अशा कारखान्यास, राज्यशासन विनिर्दिष्ट करील अशा मुदतीकरिता आणि अशा शर्तींवर या उपनियमापासून पूर्णपणे किंवा अंशतः सूट देऊ शकेल.

४. अग्नि-निर्वापके – पेट्रोलियम अधिनियम, १९३४ चे कलम २ खंड (ब) यात व्याख्या केल्याप्रमाणे घातक पेट्रोलियमपासून वायू निर्माण करण्याच्या संयंत्रा-



जवळ सहज पोहोचता येईल अशा ठिकाणी पेट्रोलपासून लागलेली आग विझविण्याचे कार्यक्षम साधन सुस्थितीत ठेवले पाहिजे.

५. मुख्य निरीक्षकाने संयंत्रास मान्यता देणे – पेट्रोल वायू निर्माण करणाऱ्या ज्या संयंत्राचे संकल्पचित्र आणि बांधणी, मुख्य निरीक्षकाने मान्य केली असेल असा संयंत्र खेरीज, इतर संयंत्रावर पेट्रोल वायू तयार करता कामा नये.

६. पेट्रोल वाहून जाणे – कोणत्याही सांडपाण्याच्या मार्गातून किंवा गटारातून पेट्रोल वाहून जाण्यास प्रतिबंध करण्यासाठी परिणामकारक उपाययोजना केली पाहिजे.

७. धूम्रपान वगैरे करण्यास मनाई – कोणत्याही व्यक्तीने धूम्रपान करता कामा नये किंवा आगपेटी, विस्तव वा खुली ज्योत किंवा ठिणगी किंवा खुली ज्योत निर्माण करणारी इतर साधने, वायू-निर्माण खोलीत किंवा इमारतीत, धूम्रपानास आणि आगपेट्या, विस्तव किंवा खुली ज्योत निर्माण करणारी इतर साधने नेण्यास मनाई करणारी एक सावधगिरीची सूचना बहुसंख्य कामगारांना समजेल अशा भाषेत कारखान्यात लावली पाहिजे.

८. पेट्रोलजवळ किंवा पेट्रोल पात्राजवळ जाणे – कोणत्याही अनधिकृत व्यक्तीस, पेट्रोलजवळ किंवा पेट्रोल असणाऱ्या किंवा प्रत्यक्ष पेट्रोल असलेल्या पात्राजवळ जाता येणार नाही.

९. विद्युत जोडण्या – सर्व विद्युत जोडण्या, ज्वालारोधक बनावटीच्या असल्या पाहिजेत आणि सर्व विद्युत वाहके धातूच्या नळ्यांत बंद केलेली किंवा शिसाचे आच्छादन घातलेली असली पाहिजेत.

१०. दारांची रचना – वायु-निर्माण खोलीतील किंवा इमारतीतील सर्व दारे बाहेरच्या बाजूस उघडतील किंवा सरकतील अशी असली पाहिजेत आणि वायु निर्माण होत असताना व कोणतीही व्यक्ती वायु निर्माण खोलीत किंवा इमारतीत काम करीत असताना, कोणतेही दार, आतील बाजूने सहज व तत्काळ उघडता येणार नाही अशा रीतीने कुलूप लावून बंद केलेले किंवा ते बांधून ठेवलेले असता कामा नये.

११. पात्रांची दुरुस्ती – ज्या पात्रात पेट्रोल ठेवलेले असेल असे कोणतेही पात्र वायु-निर्माण खोलीत किंवा इमारतीत दुरुस्त करता कामा नये आणि पात्रात गरम वाफ सोडलेली असल्याशिवाय आणि आतील भागातील वाफ संपूर्णपणे बाहेर निघून जाईपर्यंत किंवा त्यात पेट्रोल किंवा ज्वालाग्राही वाफ मुळीच राहिलेली

नाही याची खात्री करून देण्यासाठी त्यासारखी अन्य परिणामकारक उपाययोजना करण्यात येईपर्यंत असे पात्र दुरुस्त करण्याचे काम हाती घेता कामा नये.

## अनुसूची ८

वाळूचा फवारा, मेटल शॉट किंवा ग्रीट संपीडित हवेच्या किंवा वाफेच्या स्रोताने चालणारा अन्य घर्षक पदार्थ याद्वारे वस्तू साफ करणे किंवा गुळगुळीत करणे किंवा खरवडीत करणे.

### ब्लास्टिंग विनिमय

१०. व्याख्या (१) 'ब्लास्टिंग' म्हणजे, वाळूचा फवारा मेटलशॉट किंवा ग्रीट किंवा संपीडित हवेच्या किंवा वाफेच्या स्रोताने चालणारा अन्य पदार्थ या सारख्या एखाद्या घर्षकाचा उपयोग करून एखादी वस्तू साफ करणे किंवा गुळगुळीत करणे किंवा खरवडीत करणे किंवा कोणत्याही वस्तूच्या पृष्ठभागाचा एखादा भाग काढून टाकणे.

(२) 'ब्लास्टिंग एन्क्लोजर' म्हणजे, ब्लास्टिंगचे काम करण्यासाठी तयार केलेला बंद कक्ष; पिप, कोष्ठ किंवा इतर कोणतीही जागा.

(३) 'ब्लास्टिंग चेंबर' – म्हणजे, जेथे कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही कामाच्या संबंधात किंवा अन्य कोणत्याही वेळी प्रवेश करता येतो असे ब्लास्टिंग एन्क्लोजर.

(४) जेथे 'कास्टिंगची सफाई' धातूचे ओतकाम करण्याच्या संबंधातील अनुषंगिक किंवा पूरक प्रक्रिया म्हणून केली जाते तेथे त्याचा अर्थ, चिकटलेली वाळू किंवा इतर पदार्थ यापासून कास्टिंग वेगळे करणे असा होतो आणि त्यात, जेथे कास्टिंग वेगळे करण्याची प्रक्रिया केली जाते तेथे कास्टिंगच्या आतील भाग बाहेर काढणे व कास्टिंग गुळगुळीत करणे या प्रक्रियांचाही समावेश होतो. परंतु त्यात धातू तापवून गरम केल्यामुळे किंवा उष्णोपचारामुळे उत्पन्न होणारा गंज या पासून कास्टिंग वेगळे करण्याच्या प्रक्रियेचा समावेश होत नाही.

२. सँड ब्लास्टिंगच्या कामास मनाई – वाळू किंवा फ्री-सिलिका असलेला कोणताही इतर पदार्थ घर्षक म्हणून कोणत्याही उपकरण संचात घालता कामा नये किंवा ब्लास्टिंगसाठी त्याचा वापर करता कामा नये.

परंतु असे, की हा खंड या विनियमाच्या प्रारंभीच्या तारखेपासून दोन वर्षांनंतर अमलात आणला पाहिजे.

३. ब्लास्टिंग प्रक्रियेच्या संबंधात बाळगावयाची सावधगिरी–



(१) ब्लास्टिंग एन्क्लोजरमध्ये करावयाचे ब्लास्टिंग – ब्लास्टिंग एन्क्लोजर खेरीज इतर ठिकाणी ब्लास्टिंगचे काम करता कामा नये आणि ब्लास्टिंगशिवाय इतर कोणतेही काम, तसेच त्या कामाशी अगदी अनुषंगिक असे कोणतेही काम आणि एन्क्लोजर व त्यामधील संयंत्रे व उपकरण संच स्वच्छ करण्याचे व त्यांच्या दुरुस्तीचे काम ब्लास्टिंग एन्क्लोजरमध्ये केले जाता कामा नये. ब्लास्टिंगचे काम चालू असताना ब्लास्टिंग एन्क्लोजरचे प्रत्येक दार, छिद्र व जोड हे बंद करून ती जागा हवाबंद ठेवली पाहिजे.

(२) ब्लास्टिंग एन्क्लोजर सुस्थितीत ठेवणे – ब्लास्टिंग एन्क्लोजर हे नेहमी चांगल्या स्थितीत ठेवले पाहिजे आणि अशा एनक्लोजरमधून किंवा त्यास जोडलेल्या कोणत्याही उपकरण संचामधून बाहेर पडणारी धूळ कोणत्याही खोलीतील हवेत मिसळू नये यासाठी परिणामकारक उपाययोजना केली पाहिजे.

३ पृथक्करण उपकरण संचाची तरतूद – ब्लास्टिंगसाठी ज्या घर्षकाचा वापर केला जाणार आहे तो, ब्लास्टिंगच्या क्रियेमुळे उत्पन्न होणारी धूळ व इतर पदार्थांचे कण यांपासून वेगळा करण्यासाठी, प्रत्येक ब्लास्टिंग एन्क्लोजरच्या संबंधात, शक्य असेल तेथवर कार्यक्षम उपकरण संचाची तरतूद केली पाहिजे व तो सुस्थितीत ठेवला पाहिजे. आणि अशा प्रकारे घर्षक वेगळा करण्यात येईपर्यंत तो कोणत्याही ब्लास्टिंग उपकरण संचात घालता कामा नये आणि ब्लास्टिंगसाठी त्याचा वापर करता कामा नये.

ज्या खोल्यामध्ये लोक काम करतात तेथील हवेत धूळ जाणार नाही अशा रीतीने आणि विशेष पद्धतीने ती धूळ काढून टाकण्यासाठी बहिःसर्जक हवेच्या स्रोताची व्यवस्था पृथक्करण उपकरण संचामध्ये केली पाहिजे.

परंतु असे, की अशा उपकरण संचाची तरतूद करणे व्यावहारिक दृष्ट्या व्यवहार्य नाही असे मुख्य निरीक्षकाचे मत असेल तर ब्लास्टिंग चेंबर व्यतिरिक्त, ही अनुसूची अमलात येण्यापूर्वी जे ब्लास्टिंग एन्क्लोजर बांधण्यात किंवा उभारण्यात आले असेल, त्याला हा खंड लागू होणार नाही.

(४) हवा खेळविण्याच्या संबंधासाठी तरतूद–ब्लास्टिंग एन्क्लोजरमध्ये उत्पन्न झालेली धूळ यांत्रिक साधनाद्वारे चालणाऱ्या बहिःसर्जक हवेच्या स्रोताने काढून टाकण्यासाठी अशा प्रत्येक एन्क्लोजरच्या संबंधात हवा खेळविण्याच्या संयंत्राची तरतूद केली पाहिजे. व ते सुस्थितीत ठेवले पाहिजे. अशा रीतीने काढून टाकलेली धूळ कोणत्याही खोलीतील हवेत जाणार नाही, अशा पद्धतीने व रीतीने तिची विल्हेवाट लावली पाहिजे आणि जर हवा खेळविण्याची व्यवस्था असलेल्या एन्क्लोजरनजीक ज्या खोलीत कापडी पिशवी किंवा इतर फिल्टरींग किंवा सेटलिंग

कामावर किंवा त्याच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही कामावर किंवा असे चेंबर स्वच्छ करण्याच्या कामावर लावलेल्या असतील, त्यांना वापरण्यासाठी मुख्य निरीक्षकाने प्रमाणपत्र देऊन मान्यता दिलेली संरक्षक शिरस्त्राणे पुरविली पाहिजेत व ती सुस्थितीत ठेवली पाहिजेत आणि अशा प्रत्येक व्यक्तीने चेंबरमध्ये काम करीत असताना वापरण्यासाठी पुरविलेल्या शिरस्त्राणाचा वापर केला पाहिजे आणि चेंबरच्या बाहेर येईपर्यंत ते काढता कामा नये.

(२) प्रत्येक संरक्षक शिरस्त्राणावर, ज्या व्यक्तीने ते वापरावयाचे ती व्यक्ती निर्दिष्ट करणारे विभेदक चिन्ह असले पाहिजे आणि कोणत्याही व्यक्तीस, तिचे चिन्ह नसलेले शिरस्त्राण वापरण्यास किंवा एका व्यक्तीने वापरलेले संरक्षक शिरस्त्राण पूर्णपणे निर्जंतुक केल्याशिवाय दुसऱ्या व्यक्तीला वापर करण्यास परवानगी देता कामा नये किंवा भाग पाडता कामा नये.

(३) प्रत्येक संरक्षक शिरस्त्राण वापरात असेल तेव्हा त्यात प्रत्येक मिनिटाला ६ घन फुटांपेक्षा कमी नसेल इतक्या प्रमाणात हवेचा पुरवठा केला पाहिजे. पुरविलेली हवा ही थंड व खनिज तेलाचा धूम किंवा वाफ यांपासून मुक्त असली पाहिजे.

(४) ब्लास्टिंगचे काम करणाऱ्या किंवा ब्लॉस्टिंगच्या कामात सहाय्य करणाऱ्या सर्व व्यक्तींच्या वापरासाठी योग्य हस्तरक्षके, ओव्हररॉल्स, धूळीरोधक मोजे व बूट पुरविले पाहिजेत आणि अशा रीतीने कामावर असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, पुरविलेली हस्तरक्षके व ओव्हररॉल्स घातली पाहिजेत.

६. स्वच्छ करण्याच्या व इतर कामांच्या संबंधात घ्यावयाची खबरदारी – (१) कोणताही ब्लॉस्टिंग उपकरणसंच किंवा ब्लॉस्टिंग एन्क्लोजर किंवा सेपरेटिंग उपकरणसंच किंवा त्याच्याशी जोडलेला कोणताही उपकरण संच किंवा हवा खेळवण्याचे संयंत्र किंवा त्याच्या आतील भाग स्वच्छ करण्याच्या कामावर किंवा कोणताही ब्लॉस्टिंग उपकरण संच किंवा कोणतेही ब्लॉस्टिंग एन्क्लोजर किंवा त्याच्याशी जोडलेला उपकरण संचाच्या किंवा हवा खेळवण्याच्या संयंत्राच्या संबंधातील इतर कोणत्याही कामावर कोणतीही व्यक्ती नेमलेली असेल आणि जर ब्लॉस्टिंगपासून उत्पन्न होणारी धूळ श्वसनाबरोबर आत जाण्याचा तिला धोका असेल तेथे अशा श्वसनास प्रतिबंध करणाऱ्या सर्व व्यवहार्य उपयोजना केल्या पाहिजेत. श्वासाबरोबर धूळ आत जाण्यास प्रतिबंध व्हावा म्हणून शुद्ध हवेचा पुरवठा केलेली संरक्षक शिरस्त्राणे, ओव्हररॉल्स पुरविले पाहिजेत.

(२) विनियम ५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही स्वच्छ करण्याच्या कामाच्या संबंधात आणि फिल्टरिंग व सेटलिंग साधनामधून धूळ काढून



साधन यावर काम करणाऱ्या व्यक्तीखेरीज इतर व्यक्ती काम करतात अशा खोलीत असलेले प्रत्येक फिल्टरींग किंवा सेटलिंग साधने, हे त्या खोलीच्या सर्व साधारण हवेपासून पूर्णतः अलग केले पाहिजे.

(५) हवा खेळवण्याच्या संयंत्राचे कार्य – परिच्छेद ४ च्या खंड (२) च्या प्रयोजनासाठी तरतूद केलेले हवा खेळवण्याचे संयंत्र हे जेव्हा ब्लॉस्टिंग एन्क्लोजर वापर करण्यात येईल तेव्हा सतत चालू ठेवले पाहिजे मग तेथे प्रत्यक्ष ब्लॉस्टिंग होत असो अगर नसो आणि ब्लॉस्टिंग चेंबरच्या बाबतीत, ते चेंबर स्वच्छ करण्याच्या प्रयोजनासाठी एखादी व्यक्ती त्याच्या आत असली तरीही चालू ठेवले पाहिजे.

४. निरीक्षण व तपासणी – (१) एन्क्लोजरचा आणि किंवा चेंबरचा ज्या आठवड्यात ब्लॉस्टिंगसाठी वापर करण्यात येतो त्या प्रत्येक आठवड्यात निदान एकदा त्याचे कोठे गळती आहे किंवा काय हे शोधून काढण्यासाठी सक्षम व्यक्तीकडून खास निरीक्षण केले पाहिजे. ब्लॉस्टिंग एन्क्लोजर, त्यास जोडलेला उपकरण संच आणि हवा खेळवण्याचे संयंत्र यांची संपूर्णपणे तपासणी केली पाहिजे आणि हवा खेळवण्याच्या संयंत्राची चाचणी, सक्षम व्यक्तीने दर तीन महिन्यांनी निदान एकदा घेतली पाहिजे.

(२) अशा प्रत्येक निरीक्षणाच्या, तपासणीच्या व चाचणीच्या निकालाचा तपशील एका नोंदवहीत तात्काळ नमूद केला पाहिजे. ही नोंदवही मुख्य निरीक्षकाने मान्य केलेल्या नमुन्यामध्ये असली पाहिजे. आणि ती कारखान्यात ब्लॉस्टिंगच्या कामावर असलेल्या किंवा ब्लॉस्टिंगशी संबंधित असलेल्या कोणत्याही कामगारास निरीक्षणासाठी उपलब्ध व्हावी पाहिजे. अशा प्रकारे निरीक्षण किंवा तपासणी केल्यावर किंवा चाचणी घेतल्यावर कोणताही दोष आढळून आला तर, असे निरीक्षण, तपासणी किंवा चाचणी करणाऱ्या व्यक्तीने कब्जेदारास, व्यवस्थापकास किंवा इतर योग्य व्यक्तीस त्याबद्दल ताबडतोब कळविले पाहिजे आणि त्या अनुसूचीच्या पूर्ववर्ती आवश्यकतांना बाध न येता, तो दोष विलंब न लावता दूर केला पाहिजे.

(३) प्रत्येक ब्लॉस्टिंग चेंबर, सेपरेटिंग उपकरण संच, आणि हवा खेळवण्याचे संयंत्र यांची ते व्यवस्थित चालू राहण्यामध्ये काही दोष आहे किंवा हे शोधून काढण्यासाठी दर ६ महिन्यांनी पूर्णपणे तपासणी केली पाहिजे आणि अशा रीतीने निदर्शनास आलेले दोष तात्काळ दुरुस्त केले पाहिजेत.

५. संरक्षक शिरस्त्राणे, हस्तरक्षके आणि ओव्हररॉल्स यांची तरतूद – ब्लॉस्टिंग चेंबरमध्ये कामावर असलेल्या सर्व व्यक्ती, मग त्या ब्लॉस्टिंगच्या

टाकण्याच्या संबंधात ती धूळ कोणत्याही खोलीतील हवेत मिसळणार नाही अशा रीतीने सर्व व्यवहार्य उपाययोजना केल्या पाहिजेत. स्वच्छ करण्याच्या या कामासाठी व्हॅक्यूम क्लीनर्सची तरतूद केली पाहिजे व त्याचा वापर केला पाहिजे.

७. संरक्षक कपडे ठेवण्यासाठी जागेची व्यवस्था – विनियम ५ अन्वये तरतूद करणे आवश्यक असलेली शिरस्त्राणे, हस्तरक्षके व ओव्हररॉल्स ठेवण्यासाठी प्रत्येक ब्लास्टिंग एन्क्लोजरच्या बाहेर आणि सोयीस्करपणे जवळ पुरेशी व योग्य जागेची व्यवस्था केली पाहिजे. व अशी जागा स्वच्छ ठेवली पाहिजे. शिरस्त्राणे, हस्तरक्षके व ओव्हररॉल्स प्रत्यक्ष वापरात नसतील तेव्हा ती त्या जागेत ठेवली पाहिजेत.

८. संरक्षक कपड्यांचे परिरक्षण व ते स्वच्छ ठेवणे – या अनुसूचीच्या प्रयोजनासाठी पुरवावयाची व पालावयाची सर्व शिरस्त्राणे, हस्तरक्षके व ओव्हररॉल्स आणि इतर संरक्षक साधने किंवा कपडे हे चांगल्या स्थितीत ठेवले पाहिजेत व ज्या आठवड्यात ते वापरण्यात येतील त्या प्रत्येक आठवड्यातील एका दिवशी स्वच्छ केले पाहिजेत. असे संरक्षक कपडे किंवा साधने स्वच्छ करताना उडणारी धूळ श्वासावाटे आत जाण्याची शक्यता असेल तेव्हा त्यास प्रतिबंध व्हावा म्हणून सर्व उपाययोजना केल्या पाहिजेत. अशा कपड्यांमधून धूळ काढताना व्हॅक्यूम क्लीनर्सचा उपयोग केला पाहिजे. आणि कोणत्याही कपड्यांमधून धूळ काढण्यासाठी संपीडित हवेचा वापर करता कामा नये.

९. व्हॅक्यूम क्लीनिंग संयंत्राचे परिरक्षण – या अनुसूचीच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येणारे व्हॅक्यूम क्लिनिंग संयंत्र हे सुस्थितीत ठेवले पाहिजे.

१०. स्त्रिया व तरुण व्यक्ती यांना कामावर लावण्या संबंधात मनाई – कोणत्याही स्त्रीस किंवा १८ वर्षे वयाखालील तरुण व्यक्तीस ब्लास्टिंगच्या कामावर किंवा ब्लास्टिंगच्या कामात मदत करण्याच्या कामावर किंवा कोणत्याही ब्लास्टिंग चेंबरमध्ये किंवा एखादा ब्लास्टिंग उपकरण संच किंवा ब्लास्टिंग एन्क्लोजर किंवा त्यास जोडलेला कोणताही उपकरण संच किंवा हवा खेळवण्याचे संयंत्र स्वच्छ करण्याच्या कामावर लावता कामा नये किंवा अशा उपकरण संच, एन्क्लोजर किंवा संयंत्र परिरक्षण किंवा यांचे दुरुस्ती करण्याच्या कामावर लावता कामा नये.

(२) कोणत्याही स्त्रीस किंवा १८ वर्षे वयाखालील तरुण व्यक्तीस, कोणतेही ब्लास्टिंग एन्क्लोजर खोलीत नसेल आणि तो / ती एन्क्लोजरमधून येणाऱ्या धुळीपासून अगदी अलग अशा ठिकाणी खोलीच्या बाहेर नसेल तर अशा ब्लास्टिंग एन्क्लोजरपासून २० फूट अंतराच्या आत नियमितपणे कामावर लावता कामा नये.



११. वैद्यकीय तपासणी – (१) ब्लास्टिंगमध्ये कामावर लावलेल्या किंवा ब्लास्टिंगच्या कामात किंवा कोणत्याही ब्लास्टिंग चेंबरमध्ये किंवा कोणत्याही ब्लास्टिंग उपकरण संच किंवा कोणतेही एन्क्लोजर किंवा त्यास जोडलेला कोणताही उपकरण संच किंवा हवा खेळवण्याचे संयंत्र साफ करण्याच्या कामात मदत करणाऱ्या किंवा असा उपकरण संच एन्क्लोजर किंवा संयंत्र सुस्थितीत ठेवण्याच्या किंवा त्यांच्या दुरुस्तीच्या कामावर लावावयाच्या व्यक्तीची तिच्या पहिल्या नियुक्तीपासून ३० दिवसांच्या आत वैद्यकीय निरीक्षक, कारखाने/प्रमाणक शल्य चिकित्सक याने वैद्यकीय तपासणी केली पाहिजे, आणि अशा तपासणीची नोंद नमुना क्रमांक ७ मध्ये केली पाहिजे, आणि उक्त प्रक्रियेत काम करण्यास ती योग्य असल्याचे आढळून आले तर, तिला वैद्यकीय निरीक्षक, कारखाने / प्रमाणक शल्य चिकित्सक याने नमुना क्रमांक २१ मध्ये स्वास्थ्य प्रमाणपत्र दिले पाहिजे.

(२) पहिल्या वैद्यकीय तपासणीनंतर, अशा रीतीने तपासणी केलेल्या व्यक्तीची, दर बारा महिन्यांनी प्रमाणक शल्य चिकित्सकाने तपासणी केली पाहिजे आणि अशा तपासणीची नोंद प्रमाणक शल्य चिकित्सकाने नमुना क्रमांक ७ मध्ये केली पाहिजे.

(३) जर वैद्यकीय निरीक्षक, कारखाने / प्रमाणक शल्य चिकित्सकाचे असे मत असेल की उक्त प्रक्रियेत कामावर लावलेल्या व्यक्तीची अर्हता प्राप्त क्ष-किरण शास्त्रज्ञाकडून क्ष-किरणशास्त्र दृष्ट्या तपासणी करण्यात यावी, तर त्याला कब्जेदारास त्याच्या स्वतःच्या खर्चाने अशा तपासणीची व्यवस्था करण्याबाबत आणि नंतर कामगाराच्या छातीचे प्रमाण आकाराचे क्ष-किरण छायाचित्र वैद्यकीय निरीक्षक, कारखाने / प्रमाणक शल्य चिकित्सक यास सादर करण्याबाबत निदेश देता येईल.

(४) जर कोणत्याही वेळी प्रमाणक शल्यचिकित्सक / वैद्यकीय निरीक्षक-कारखाने, याचे मते कोणतीही व्यक्ती त्या प्रक्रियेत सतत कामावर राहिल्याने तिच्या आरोग्यास विशेष धोका पोचेल या कारणावरून यापुढे कामावर राहिल्यास पात्र नसेल तर त्याने त्या व्यक्तीचे नमुना क्रमांक २३ मध्ये असलेले विशेष स्वास्थ्य प्रमाणपत्र रद्द केले पाहिजे व त्याची नमुना क्रमांक ७ मध्ये नोंद केली पाहिजे.

(५) नमुना क्रमांक २३ मधील विशेष स्वास्थ्य प्रमाणपत्र रद्द करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस प्रमाणक शल्य चिकित्सकाने पुन्हा तपासणी करून त्या प्रक्रियेत ती काम करण्यास योग्य असल्याचे पुन्हा प्रमाणपत्र दिल्या खेरीज, तिला कामावर लावता कामा नये किंवा कामावर लावण्याची परवानगी देता कामा नये.

(६) प्रमाणक शल्य चिकित्सकाने नमुना क्रमांक २३ मध्ये दिलेले विशेष स्वास्थ्य प्रमाणपत्र व नमुना क्रमांक ७ मध्ये त्याची केलेली नोंद, यांची नोंदवही कारखान्याच्या व्यवस्थापकाच्या ताब्यात ठेवली पाहिजे आणि ती निरीक्षकाच्या तपासणीसाठी नेहमी उपलब्ध असली पाहिजे.

१२. सूट देण्याची किंवा शिथिल करण्याची शक्ती – कोणत्याही कारखान्यात किंवा कोणत्याही कारखान्याच्या वर्गाला (धातूच्या ओतकामाशी अनुषंगिक किंवा पूरक असलेली प्रक्रिया धरून) एखाद्या विशिष्ट वस्तु-निर्मितीसाठी किंवा प्रक्रियेसाठी प्लॅस्टिकमध्ये वर्धक पदार्थ म्हणून वाळूचा किंवा धी सीलिका किंवा प्रक्रियेसाठी ... वापर करणे आवश्यक आहे आणि अशी वस्तु-अंतर्भूत असलेल्या इतर पदार्थांचा वापर करणे आवश्यक आहे आणि अशी वस्तु-निर्मिती किंवा प्रक्रिया अशा वर्धक पदार्थांना वापर केल्याशिवाय होणे शक्य नाही किंवा कामाच्या विशिष्ट परिस्थितीमुळे किंवा विशिष्ट पद्धतीमुळे किंवा अन्यथा, तेथे कामावर लावलेल्या व्यक्तींच्या आरोग्याला धोका न पोचता या अनुसूचीच्या आवश्यकतेपैकी एखादी आवश्यकता तात्पुरती किंवा कायमची रद्दबातल करणे शक्य आहे किंवा शिथिल करणे शक्य आहे किंवा या आवश्यकतेपैकी एखादी आवश्यकता कोणत्याही कारणाकरिता लागू करणे अव्यवहार्य किंवा अयोग्य आहे अशी मुख्य निरीक्षकाची खात्री झाल्यास, त्यास राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, लेखी आदेशा द्वारे, उक्त आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा मर्यादेपर्यंत व अशा शर्तींना अधीन राहून आणि अशा मुदतीपर्यंत उक्त कारखान्याला किंवा कारखान्याच्या वर्गाला अशा अनुसूचीच्या उपबंधापासून सूट देता येईल.

(२) परिच्छेद (१) अन्वये सूट देण्यात आली असेल त्याबाबतीत, आदेशाची एक प्रत कारखान्याच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळील ठळक ठिकाणी सूचना फलकावर आणि जेथे प्लॅस्टिकचे काम करण्यात येते, त्या जागेवरही लावली पाहिजे.

## अनुसूची ९

कच्च्या कातड्यास व चामड्यास चुना लावणे आणि तदनुषंगिक प्रक्रिया–

१. सावधगिरीच्या सूचना – (१) मुख्य निरीक्षक विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात काळजीबाबत सावधगिरीच्या सूचना कारखान्यात कामावर लावलेल्या व्यक्तींना त्या सहज व सोयीस्करपणे वाचता येतील अशा प्रमुख ठिकाणी लावल्या पाहिजेत.

(२) मुख्य निरीक्षकाने विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात काळजीबाबत दिलेल्या छोकाच्या सूचनेची एक प्रत कामावर लावलेल्या प्रत्येक व्यक्तीस कामावर लावते वेळी आणि जर ती नंतर कामावर असण्याचे चालू राहील तर प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या पहिल्या दिवशी देण्यात आली पाहिजे.



(३) क्रोमच्या कालांतर होणाऱ्या परिणामासंबंधीच्या सावधगिरीच्या सूचना ज्या कारखान्यात क्रोमविद्रावाचा उपयोग करण्यात येतो तथा प्रत्येक कारखान्यात प्रमुख ठिकाणी लावल्या पाहिजेत आणि अशा सूचना कामावर लावलेल्या सर्व व्यक्तींना सहज व सोयीस्करपणे वाचता येतील अशा रीतीने लावण्यात आल्या पाहिजेत.

(४) कारखान्यात प्रमुख ठिकाणी, प्रथमोपचाराची पेटी किंवा कपाट यांची जागा आणि पेटी किंवा कपाट ज्या व्यक्तींच्या ताब्यात असेल त्याचे नाव दर्शविणाऱ्या सूचना लावण्यात आल्या पाहिजेत.

(५) जर कारखान्यात कामावर लावलेली एखादी व्यक्ती निरक्षर असेल तर परिच्छेद (१), (२) आणि (४) यात विनिर्दिष्ट केलेल्या सूचनातील मजकूर आणि कारखान्यात क्रोम विद्रावाचा उपयोग करण्यात येत असेल तर परिच्छेद (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सूचनेतील मजकूर अशा निरक्षर कामगाराला समजावून सांगण्यासाठी परिणामकारक उपाययोजना केली पाहिजे.

२. संरक्षक कपडे – कारखान्याच्या भोगवटादाराने संरक्षक कपड्यांपैकी खालील वस्तूंची तरतूद केली पाहिजे. व त्या सुस्थितीत ठेवल्या पाहिजेत.

(अ) क्रोम विद्राव तयार करण्याची प्रक्रिया व ज्यात क्रोम विद्रावाशी संबंध येतो अशा प्रक्रियात कामावर लावलेल्या व्यक्तींकरिता जलरोधक पादत्राणे, पायमोजे एप्रन्स, हातमोजे यांची तरतूद केली पाहिजे.

(ब) चुन्याच्या आवारात कामावर लावलेल्या कामगारासाठी हातमोजे, पादत्राण व केमिकल सेफ्टी गॉगल्स;

(क) खंड (अ) आणि (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रक्रिया व्यतिरीक्त इतर कातडी किंवा चामडी हाताळण्याच्या प्रक्रियात कामावर लावलेल्या कामगारासाठी संरक्षित पादत्राणे, एप्रन्स व हातमोजे,

परंतु असे की–

(एक) हातमोजे, एप्रन्स व पादत्राणे किंवा बूट रबराचे किंवा चामड्याचे असतील. मात्र, खंड (अ) आणि खंड (ब) अन्वये तरतूद करावयाचे हातमोजे व बूट हे रबराचे असले पाहिजेत.

(दोन) हाताने चामडे साफ करणाऱ्या व्यक्तीसाठी किंवा ज्यात चुना, सोडीयम सल्फाईड किंवा इतर दाहक द्रव पदार्थ यांच्या संपर्कामुळे धोका पोहोचण्याची भीती नसेल अशा प्रक्रियात कामावर लावलेल्या व्यक्तीसाठी हातमोजांची तरतूद केली जाणार नाही.

३. धुण्याच्या सोयी, भोजनगृह, आणि प्रसाधन कक्ष – कब्जेदाराने कामावर लावलेल्या व्यक्तींच्या वापरासाठी खालील गोष्टींची तरतूद केली पाहिजे आणि त्या स्वच्छ आणि चांगल्या दुरुस्त स्थितीत ठेवल्या पाहिजेत–

(अ) प्लगशिवाय सांडपाण्याचा नळ जिला बसविला आहे अशी व कोणत्याही एका वेळी कामावर असलेल्या दर सहा व्यक्तींमागे ६० सेंटीमीटर अंतर मिळेल इतक्या पुरेशा लांबीची व ६० सेंटीमीटरहून अधिक नाही इतक्या अंतरावर तोट्यातून किंवा फवाऱ्यातून सतत पाण्याचा पुरवठा करणारी गुळगुळीत व जलाभेद्य पृष्ठभागाची डोण, किंवा

(ब) कोणत्याही एका वेळी कामावर लावलेल्या अशा प्रत्येक दहा व्यक्तींमागे प्लग व सांडपाण्याचे सतत पुरवठा करणारे कमीत कमी एक मार्जन पात्र, वरील दोन्हीही बाबतीत नखे साफ करण्याचे कुंचले, साबण किंवा स्वच्छतेसाठी इतर योग्य पदार्थ व स्वच्छ टॉवेल ह्यांचा पुरवठा केला पाहिजे.

(क) जेवणाच्या सुटीत त्या जागेवर राहणाऱ्या व्यक्तींकरिता पुरेसे आणि योग्य भोजनगृह–असे भोजनगृह (अ) पुरेशी टेबले व बाके आणि (ब) अन्न गरम करण्यासाठी व पाणी उकळविण्यासाठी पुरेशी साधने यांनी सुसज्ज असले पाहिजे.

असे भोजन गृह (१) ज्या खोलीत किंवा छपरीमध्ये कातडी किंवा चामडी यांचा साठा करण्यात येतो, किंवा त्यावर संस्करण केले जाते किंवा ती हाताळली जातात अशा कोणत्याही खोलीपासून, (२) प्रसाधन कक्षापासून अलग असले पाहिजे आणि (३) जबाबदार व्यक्तीच्या प्रभाराखाली असले पाहिजे.

(ड) कामाच्या तासात काढून ठेवलेले कपडे ठेवण्यासाठी योग्य जागा आणि संरक्षक कपडे ठेवण्यासाठी वेगळी जागा आणि दोन्ही बाबतीत, कपडे ओले असतील तर ते सुकविण्यासाठी पुरेशी व्यवस्था यांची तरतूद केली पाहिजे. अशी जागा नेहमी स्वच्छ ठेवली पाहिजे. आणि ती जबाबदार व्यक्तीच्या प्रभाराखाली असली पाहिजे.

४. कामाच्या खोल्यात अन्न, पेये वगैरेस मनाई – ज्या कोणत्याही कामाच्या खोलीत किंवा छपरीत कातडी किंवा चामडी यांचा साठा करण्यात येतो किंवा त्यावर संस्करण करण्यात येते किंवा ती हाताळली जातात अशा खोलीत किंवा छपरीत कोणत्याही कामगाराने कोणत्याही प्रकारचे अन्न, पेय, पानसुपारी किंवा तंबाखू आणता कामा नये किंवा त्याचे सेवन करता कामा नये.

५. प्रथमोपचाराची व्यवस्था – कब्जेदाराने, (अ) क्रोम विद्रवाशी ज्यांचा संबंध येत असेल अशा सर्व व्यक्तींचे हात आठवड्यातून दोनदा जबाबदार



व्यक्तीकडून तपासण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(ब) कामगारांना सहजरत्या मिळू शकेल आणि फक्त मलम व पटलेप ठेवण्यासाठी उपयोग करण्यात येईल अशा पेटीतून योग्य मलम आणि जलाभेद्य व व्रणरोधक पटलेप यांचा पुरेसा पुरवठा केला पाहिजे व तो कायम राखला पाहिजे.

## अनुसूची १०

क्रोमिक ॲसिड तयार करणे किंवा सोडीयम पोटॅशियम किंवा अमोनियम यांचे डायक्रोमेट तयार करणे किंवा ते परत मिळविणे

१०. व्याख्या – या अनुसूचीच्या प्रयोजनासाठी–

(अ) 'क्रोमची प्रक्रिया' म्हणजे, क्रोमिक ॲसिड किंवा सोडीयम किंवा पोटॅशियम किंवा अमोनियम यांचे डायक्रोमेट तयार करणे किंवा ते तयार करण्याच्या संबंधात हे पदार्थ हाताळणे, त्यांची ने आण करणे किंवा त्यावरील इतर संस्करण.

(ब) 'कार्यक्षम बहिःसर्जक हवेचा स्रोत' (म्हणजे अनुसूची ६ खंड २ उपखंड 'ब' पहा. तीच व्याख्या येथे आहे.)

(क) 'निलंबन' म्हणजे, कोणत्याही क्रोम प्रक्रियेत कामावर लावलेल्या सर्व व्यक्तींच्या संबंधात निलंबनाची शक्ती असलेल्या प्रमाणक शल्यचिकित्सकाने सही केलेल्या नमुना ७ मधील आरोग्य नोंदवहीतील केलेली प्रमाणपत्राद्वारे अशा कोणत्याही प्रक्रियांतील कामावरून निलंबन.

२. स्त्रिया व तरुण व्यक्ती यांच्या बाबतीत मनाई – कोणत्याही स्त्रीस किंवा तरुण व्यक्तीस कोणत्याही क्रोमच्या प्रक्रियेत कामावर लावता कामा नये किंवा काम करण्यास परवानगी देता कामा नये.

३. कार्यक्षम बहिःसर्जक हवेचा स्रोत – पुढील क्रोमच्या प्रक्रिया कार्यक्षम हवेच्या स्रोताचा वापर केल्याखेरीज चालविता कामा नयेत–

(अ) दळणे (ब) चाळणे

(क) बॅग भिसळणे (ड) संकेंद्रण

४. विवक्षित प्रक्रिया अलग करणे – क्रोमच्या पुढील प्रक्रिया, उदाहरणार्थ (अ) कच्चे सामान दळणे व (ब) कच्चे सामान चाळणे इतर कोणत्याही प्रक्रियापासून अगदी अलग राहातील अशा रीतीने व अशा शर्तीअन्वये करण्यात आल्या पाहिजेत.

धुण्याच्या सोयी (१) जेथे ॲसिडी फिकेशन, सल्फेट सेटलिंग किंवा बॉयलिंग कॉन्सेनट्रेशन क्रिस्टलायझेशन, सेंट्रीफ्यूगेशन, किंवा पॅकिंग ही कामे केली जातात तेथील प्रत्येक कामगाराच्या जागेजवळ पुढील तरतुदी केल्या पाहिजेत.

(ब) वाहत्या पाण्यात वारंवार हात व पाय धुण्यासाठी धुण्याच्या जागेची सोय; आणि

(क) सोडीयम बाय सल्फेट किंवा तीव्रता कमी करणारा इतर कोणताही योग्य पदार्थ यांचा १० % मिश्रण कमीत कमी ५०० मिलीमीटर धारण करणारे एक पात्र.

(२) आच्छादन असलेल्या धुण्याच्या जागेची तरतूद केली पाहिजे. व ती जागा स्वच्छ व दुरुस्त स्थितीत ठेवली पाहिजे आणि तेथे खाली दर्शविलेल्या प्रमाणात साबण व टॉवेल यांचा पुरेसा पुरवठा केला पाहिजे.

कामावर लावलेल्या दर दहा कामगारांसाठी निदान एक तोटी किंवा नळ (स्टॅण्ड पाईप) ही तोटी किंवा उभा नळ यामध्ये १२० सें. मीटरपेक्षा कमी नाही इतके अंतर असले पाहिजे.

टीप – या नियमाच्या प्रयोजनाकरिता आवश्यक असलेल्या एकूण तोट्या मोजताना खंड ५ (१) (ब) अनुसार आवश्यक असलेल्या तोट्या किंवा उभे नळ जमेस धरले पाहिजेत.

६. धुण्यासाठी द्यावयाची वेळ – क्रोमच्या प्रक्रियेत कामावर असलेल्या प्रत्येक व्यक्तीस प्रत्येक भोजनापूर्वी व संपूर्ण दिवसाचे काम संपण्यापूर्वी, जेवणाच्या मेहुनीच्या वेळेव्यतिरिक्त आणखी निदान दहा मिनिटे तरी, धुण्याकरिता वेळ दिला पाहिजे.

७. जमीन – कामाच्या प्रत्येक खोलीची जमीन (अ) गुळगुळीत व जलाभेद्य होण्यासाठी सीमेंटची किंवा त्याकारख्या इतर साहित्यापासून बनविलेली असली पाहिजे. व तेथे योग्य उताराची व सांडपाण्याची सोय असली पाहिजे. (ब) मजबूत स्थितीत ठेवली पाहिजे व दररोज स्वच्छ राखली पाहिजे.

८. वैद्यकीय सोयी – (१) कारखान्याच्या कब्जेदाराने, अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीची नेमणूक केली पाहिजे. आणि त्याने, त्या जागेतील सर्व कामगारांची, क्रोम व्रणासंबंधात संबंधात आठवड्यापासून निदान तीनदा तपासणी केली पाहिजे व त्यावर उपचार केले पाहिजेत. अशा तपासणीची व उपचाराची नोंद कारखान्याच्या मुख्य निरीक्षकाने मान्यता दिलेल्या नमुन्यात ठेवली पाहिजे. आणि निरीक्षकाला तपासणीसाठी ती उपलब्ध झाली पाहिजे. अशा तपासणीसाठी आणि उपचारासाठी आवश्यक अशी औषधे, व्रणपट्ट्या किंवा इतर सामग्री कारखान्याच्या कब्जेदाराने पुरविली पाहिजे.

(२) या व्यतिरिक्त कब्जेदाराने प्रथमोपचाराचे शिक्षण घेतलेल्या व्यक्तीची नेमणूक केली पाहिजे आणि त्याने कामावर असलेल्या सर्व व्यक्तींच्या हाताची व



पायाची दररोज तपासणी केली पाहिजे. आणि अशा तपासणीची नोंद, या प्रयोजनासाठी कारखान्याच्या मुख्य निरीक्षकाने मान्यता दिलेल्या नमुन्यातील नोंदवहीत ठेवली पाहिजे.

(३) तसेच कब्जेदाराने कामगारास तात्काळ मिळू शकेल अशा व फक्त मलम व पट्टेच ठेवण्याच्या कामाकरिताच वापरण्यात येणाऱ्या एका स्वतंत्र पेटीतून योग्य मलमाचा व जलरोधक पट्ट्यांचा पुरेसा पुरवठा केला पाहिजे व तो कायम राखला पाहिजे.

९. संरक्षक साधन सामग्री (१) कब्जेदाराने पुढील प्रक्रियात कामावर असलेल्या व्यक्तींच्या उपयोगासाठी निर्देशित वस्तूंची तरतूद केली पाहिजे व त्या सुस्थितीत ठेवल्या पाहिजेत–

(अ) कच्चे पदार्थ दळणे, चाळणे किंवा मिसळणे ह्या प्रक्रियात (प्रत्येक व्यक्तीसाठी वेगळी) पुरेशी व योग्य अशी श्वसनयंत्रे. या यंत्राचे गाळण्याचे साहित्य दररोज बदलले पाहिजे.

(ब) भाजण्याच्या प्रक्रियेत, योग्य पादत्राणे.

(क) ॲसिडीफिकेशन, सेटलिंग, कॉन्सेन्ट्रेशन, क्रिस्टलायझेशन, सेंट्रिफ्युगेशन किंवा पॅकिंग या प्रक्रियांत योग्य ॲप्रन्स व हात व पाय यासाठी संरक्षक आच्छादने.

(२) कब्जेदाराने प्रत्येक दिवसाचे काम संपते वेळी सर्व संरक्षक साधन सामग्रीच्या तपासणीची, स्वच्छ करण्याची आणि आवश्यक असेल तेव्हा ती दुरुस्त करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

१०. संरक्षक साधन सामग्रीचा वापर – क्रोमच्या प्रक्रियेत कामावर लावलेल्या प्रत्येक व्यक्तीने नियम ९ अनुसार पुरविण्यात आलेल्या संरक्षक साधन सामग्रीचा वापर केला पाहिजे.

११. प्रसाधन कक्ष – कोणत्याही क्रोम प्रक्रियेत कामावर लावलेल्या सर्व व्यक्तींच्या उपयोगासाठी खालील गोष्टींची तरतूद केली पाहिजे. व त्या नेहमी स्वच्छ व दुरुस्त स्थितीत ठेवल्या पाहिजेत.

(अ) बाहेर वापरावयाचे कपडे कामाच्या वेळी काढून ठेवण्यासाठी आणि जर कपडे ओले असतील तेव्हा ते सुकविण्यासाठी योग्य प्रसाधन कक्ष अशी जागा कोणत्याही भोजनगृहापासून अलग असली पाहिजे;

(ब) परिच्छेद ९ अनुसार पुरविण्यात आलेले संरक्षक कपडे ठेवण्यासाठी योग्य आणि स्वतंत्र व्यवस्था.

१२. भोजनगृह – (१) भोजनाच्या मध्यंतरात आणि त्याच जागेत

तरतूद केली पाहिजे
राहणाऱ्या सर्व कामगारांना जेवण घेण्याकरिता भोजनगृहाची आणि ही कायम राखली पाहिजे. या भोजनगृहात प्रत्येक कामगारामागे १ चौ. मीटर या प्रमाणात जागा उपलब्ध असली पाहिजे व तेथे

(एक) पुरेशी टेबले आणि खुर्च्या वा बाके.

(दोन) भांडी धुण्याची सोय.

(तीन) अन्न गरम करण्यासाठी पुरेशी साधने यांची सोय असली पाहिजे.

(२) भोजनगृह जबाबदार व्यक्तीच्या प्रभाराखाली असले पाहिजे आणि ते स्वच्छ स्थितीत ठेवले पाहिजे.

१३. अन्न पेये इ. काम करण्याच्या खोलीत नेण्यास मनाई – कोणत्याही कामाच्या कामगाराने ज्या खोलीत कोमची प्रक्रिया चालू असेल अशा कोणत्याही खोलीत अन्नपदार्थ, पेये, पान–सुपारी किंवा तंबाखू आणता कामा नये किंवा सेवन करता कामा नये आणि कोणत्याही व्यक्तीने जेवणासाठी किंवा विश्रांतीसाठी असलेल्या मध्यंतरात अशा कोणत्याही खोलीत असता कामा नये.

१४. वैद्यकीय तपासणी – (१) कोमच्या प्रक्रियेत कामावर असलेल्या प्रत्येक व्यक्तीची, प्रमाणक शल्यचिकित्सकाकडून प्रत्येक कॅलेंडर महिन्यातून एकदा मुख्य निरीक्षक लेखी विनिर्दिष्ट करील अशा मध्यंतराने सर्व संबंधितांना ज्याची बाजवी नोटीस दिली जाईल अशा एखाद्या दिवशी तपासणी केली गेली पाहिजे व अशी तपासणी कारखान्याच्या जागेतच करण्यात आली पाहिजे.

(२) खंड (१) मधील तरतुदीनुसार, प्रत्येक व्यक्तीने स्वतः वैद्यकीय तपासणीसाठी प्रमाणक शल्यचिकित्सकासमोर नेमलेल्या वेळी हजर झाले पाहिजे.

(३) क्रोम प्रक्रियेत कामावर असलेल्या सर्व व्यक्तींची नावे समाविष्ट असलेली नमुना ७ मधील एक आरोग्य नोंदवही ठेवली पाहिजे.

(४) कामावरून निलंबित करण्यात आल्यानंतर कोणत्याही व्यक्तीस आरोग्य नोंदवहीतील, प्रमाणक शल्यचिकित्सकाच्या लेखी मंजुरीखेरीज, क्रोमच्या प्रक्रियेत कामावर लावता कामा नये.

१५. पात्रांस कुडण घालणे – कोणताही अपायकारक पदार्थ असलेले व कामावर लावलेल्या व्यक्तीच्या शरीराचा कोणताही भाग अपघाताने त्यात जाण्याचा सर्व बाजूंनी धोका नाहीसा होईल अशा रीतीने आच्छादन न केलेले, प्रत्येक कायम बसविलेले पात्र, मग ते भांडे, थाळी, मोठे पिप असो वा इतर संरचित वस्तू असो–यास पुढीलप्रमाणे कुडण घातले पाहिजे.



(अ) अशा प्रत्येक पात्रास, त्याची कडा लगतच्या जमिनीच्या किंवा ओटयाच्या वर निदान १ मीटर नसेल, तर त्यास अशा लगतच्या जमिनीच्या किंवा ओटयाच्या वर निदान ९० सेंटीमीटर उंचीपर्यंत मजबूत कुडण घातले पाहिजे.

(ब) कोणतीही पळी किंवा मार्गिका (गंगवे)

(एक) निदान ४५ सेंटीमीटर रुंद नसेल, आणि

(दोन) ९० सेंटीमीटर उंचीपर्यंत वर व खाली कठडे घालून किंवा त्या-सारख्याच इतर परिणामकारक साधनांनी दोन्ही बाजूस तिला मजबूत कुडण घातले नसेल तर, अशा कोणत्याही पात्रावर किंवा त्याच्या भरतल्या बाजूस ठेवता कामा नये.

(क) जर अशी कोणतीही पात्रे एकमेकांजवळ असतील व भिंतींचे किंवा इतर कोणतेही बांधकाम नाही अशी त्यामधील जागा–

(एक) ४५ सेंटीमीटरपेक्षा कमी रुंद असेल, आणि

(दोन) ४५ सेंटीमीटर किंवा त्यापेक्षा अधिक रुंद असेल, परंतु निदान ९० सेंटीमीटर उंचीवर तिला दोन्ही बाजूंस मजबूत कुडण घातले नसेल तर त्यांच्या मधून कोणत्याही रीतीने जाण्या–येण्यास प्रतिबंध होण्याकरिता मजबूत कुडण घातले पाहिजे.

१६. सावधगिरीची सूचना – मुख्य निरीक्षकाने विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्या-तील व कामावर लावलेल्या कामगारांपैकी बहुसंख्य कामगारांच्या भाषेत छापलेली सावधगिरीची सूचना, कारखान्यात ती कामगारास सहज व सोयीस्करपणे वाचता येईल अशा प्रमुख जागी लावली पाहिजे.

१७. सूट – जर कोणत्याही कारखान्याच्या संबंधात मुख्य निरीक्षकाची अशी खात्री झाली, की अपवादात्मक परिस्थितीमुळे किंवा प्रक्रिया बारंबार केली जात नसल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे अशा कारखान्यात कामावर असलेल्या व्यक्तींच्या संरक्षणाकरिता या अनुसूचीतील उपबंधांपैकी सर्व किंवा कोणताही उपबंध आवश्यक नाही तर त्यास लेखी प्रमाणपत्राद्वारे अशा कार-खान्यास, अशा प्रमाणपत्रात तो विनिर्दिष्ट करील अशा शर्तींवर त्या प्रमाणपत्रात वर्णिलेल्या सर्व किंवा कोणत्याही उपबंधापासून सूट देता येईल. कोणतीही कारणे विनिर्दिष्ट न करता कोणत्याही वेळी असे प्रमाणपत्र त्यास रद्द करता येईल.

## अनुसूची ११

नायट्रो किंवा ॲमिनो संयुगे निर्माण करणे किंवा हाताळणे.

१. प्रयुक्ती – ही अनुसूची, जेथे नायट्रो किंवा अॅमिनो संयुगे निर्माण केली जातात किंवा हाताळली जातात अशा सर्व कारखान्यांच्या किंवा त्यांच्या कोणत्याही भागाच्या संबंधात (या पुढे उक्त वस्तू निर्माण प्रक्रिया म्हणून निर्देशिले आहे.) लागू होईल.

परंतु असे की, परिशिष्ट (ब) (यापुढे उक्त वस्तू निर्माण प्रक्रिया 'ब' म्हणून निर्देशिले आहे) मध्ये नमूद केलेल्या संयुगाची निर्मिती किंवा हाताळणी अंतर्भूत असलेल्या प्रक्रियेलाच फक्त खंड परिच्छेद २५ ते २६ लागू होतील.

भाग १

२. व्याख्या – (अ) या अनुसूचीच्या प्रयोजनासाठी 'नायट्रो किंवा अॅमिनो संयुग' म्हणजे, खास जोडलेल्या 'अ' किंवा 'ब' परिशिष्टात नमूद केलेल्या अॅरोमॅटिक हैड्रोकार्बन्सची, नायट्रेटेड किंवा अॅमिनेटेड संयुग.

(ब) 'मान्यता दिलेले' म्हणजे, मुख्य निरीक्षकाने मान्यता दिलेले.

(क) 'प्रथम नियुक्ती' म्हणजे उक्त वस्तू निर्माण प्रक्रियेच्या कामावर प्रथम नियुक्ती किंवा सतत तीन कॅलेंडर महिन्यांपेक्षा अधिक मुदतीपर्यंत अशा नोकरीत कोणताही खंड पडल्यावर अशा प्रक्रियेच्या कामावरील पुनर्नियुक्ती.

(ड) 'कार्यक्षम बहि:सर्जक हवेचा स्रोत' म्हणजे (अनुसूची १० मधील खंड १ उपखंड 'ब' पहा. तीच व्याख्या येथे आहे.)

(इ) 'हाताळणे' यात, नायट्रो किंवा अॅमिनो संयुगाचे मिश्रण करणे, संमिश्रण करणे, ते भरणे, रिकामे करणे, दळणे, चाळणे, वाळविणे, आवेष्टित करणे, झाडणे, हाताने ने–आण करणे, वापरणे किंवा त्यावर रासायनिक प्रक्रिया करणे यांचा समावेश होईल.

(फ) 'हवा श्वसन यंत्र' (एअरलाईन रेस्पिरेटर) म्हणजे, ज्याचा वापर केला जाता एखाद्या व्यक्तीला विषारी किंवा शोषक वातावरणात नेहमीप्रमाणे श्वासोच्छ्वास करता येतो असे आवश्यक ती जोडणी बसविलेले शिरस्त्राण किंवा मुख्य यंत्र किंवा मुख्य निरीक्षकाने लेखी मान्यता दिलेले अन्य कोणतेही योग्य उपकरण.

३. सावधगिरीचा सूचना फलक – या अनुसूचीला जोडलेल्या परिशिष्ट 'क' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात आणि कामावर लावलेल्या बहुसंख्य कामगारांना समजेल अशा भाषेत छापलेला सावधगिरीचा सूचना फलक कारखान्यात कामगार जेथून वारंवार ये–जा करतात अशा प्रमुख ठिकाणी त्यांना सहज व सोयीस्करपणे वाचता येईल अशा रीतीने लावला पाहिजे आणि उक्त वस्तू निर्माण प्रक्रियेत



कामावर असलेल्या सर्व कामगारांना कब्जेदाराने सावधगिरीच्या सूचना फलकावरील मजकुरासंबंधी ठराविक मुदतीनंतर माहिती करून देण्याची व्यवस्था केली पाहिजे.

३. अ जोखीमबाबत सूचना – प्रथम नियुक्तीनंतर प्रत्येक कामगारास, त्याने हाताळावयाचे असतील त्या रासायनिक मालमत्तेबाबत आणि त्यांच्या कामातील धोक्याबाबत पूर्ण सूचना दिल्याबाबत तसेच उक्त निर्मितीत उद्भवणाऱ्या कोणत्याही निकडीच्या प्रसंगी काम करताना त्याने घ्यावयाच्या काळजीबाबतसुद्धा सूचना दिल्या पाहिजेत.

४. स्त्रिया व तरुण व्यक्ती यांस कामावर लावण्यास मनाई – कोणत्याही स्त्रीस किंवा तरुण व्यक्तीस, जेथे उक्त वस्तु-निर्माण प्रक्रिया केली जात असेल किंवा नायट्रो किंवा अॅमिनो संयुग साठविले जात असेल अशा कोणत्याही खोलीत कामावर लावता कामा नये किंवा काम करण्यास परवानगी देता कामा नये.

५. हवेची जागा – जेथे उक्त वस्तुनिर्माण प्रक्रिया केली जाते अशा प्रत्येक खोलीत यंत्रे, साधनसामग्री किंवा कोणतीही इतर वस्तू यांनी व्यापलेली कोणतीही जागा सोडून तेथे कामावर असलेल्या प्रत्येक व्यक्तीसाठी कमीत कमी १५ घनमीटर हवेची जागा असली पाहिजे आणि ही हवेची जागा मोजताना ४.२५ मीटरवरील उंची हिशेबात धरता कामा नये.

६. कार्यक्षम बहि:सर्जक हवेचा स्रोत – धूळ किंवा धूम उत्पन्न होणार नाही अशा रीतीने उक्त निर्माण प्रक्रिया पूर्णपणे झाकलेली नसेल तर, नायट्रो किंवा अॅमिनो संयुग हे जेव्हा–

(अ) टाकी, हॉपर, पंप किंवा पात्र यात सोडले असेल किंवा पाइपद्वारे भरले असेल, किंवा

(ब) दळले, चरडले, मिसळले, चाळले किंवा संमिश्रित केले असेल, तेव्हा कार्यक्षम बहि:सर्जक हवेच्या स्रोताचा वापर केल्याशिवाय ती प्रक्रिया केली जाता कामा नये.

७. कामाच्या खोल्यांची जमीन – जेथे उक्त वस्तुनिर्माण प्रक्रिया केली जात असेल अशा प्रत्येक कामाच्या खोलीची जमीन (अ) गुळगुळीत व जलाभेद्य असली पाहिजे, मात्र ही जमीन तयार करताना अस्फाल्ट किंवा डांबर यांचा वापर केलेला असता कामा नये. (ब) मजबूत स्थितीत ठेवली पाहिजे; (क) ती उतरती असली पाहिजे आणि गटाराची तरतूद केलेली असली पाहिजे. (ड) रोज धुवून नळाने स्वच्छ केली पाहिजे. व सांडपाणी बंद गटारातून मलप्रणालीत सोडले पाहिजे.

८. कामाची बाके – ज्यावर नायट्रो किंवा ॲमिनो संयुग हाताळले जात असेल अशा कापाच्या बाकाचा (अ) पृष्ठभाग स्टेनलेस स्टीलचा, गुळगुळीत व अभेद्य असला पाहिजे. आणि (ब) त्यावर इतर कोणतेही काम चालू नसेल तेव्हा, खरी मळाने किंवा सफाई शोषण यंत्राच्या सहाय्याने ती संपूर्णपणे स्वच्छ केली पाहिजेत.

९. टाकाऊ वस्तू – (१) नायट्रो किंवा ॲमिनो संयुगामुळे खराब झालेले कपडे, कागद किंवा इतर साहित्य यांसारख्या टाकाऊ वस्तू टाकण्यासाठी अशोषक साहित्यापासून बनविलेल्या आणि घट्ट झाकण असलेल्या पात्राची तरतूद केली पाहिजे आणि वापर केला पाहिजे.

(२) असे सर्व दूषित टाकाऊ साहित्य आठवड्यातून निदान एकदा जाळून नष्ट करण्यात आले पाहिजे.

१०. रिकामी पात्रे – परिशिष्ट (अ) खाली दिलेले संयुग ठेवण्यासाठी वापरण्यात आलेली रिकामी पात्रे फेकून देण्यापूर्वी संपूर्ण स्वच्छ केली पाहिजेत आणि त्यासाठी रसायनिक साहित्य निष्क्रिय करणाऱ्या वस्तूंचा वापर केला पाहिजे.

परिशिष्ट 'ब' खाली समावेश केलेली संयुगे ठेवण्यासाठी वापरण्यात आलेली ज्वालाग्राहक साहित्यापासून बनविलेली रिकामी पात्रे जाळण्यात आली पाहिजेत. धातूच्या पात्रातील उर्वरित वस्तू जाळून टाकल्या पाहिजेत.

११. खड्डे, टाक्या इ. निर्दूषित करणे – (अ) नायट्रो किंवा ॲमिनो संयुग ठेवलेल्या टाक्यात, डेगेत, खड्ड्यात किंवा कोणत्याही मर्यादित जागेत कामगाराने प्रवेश करण्यापूर्वी त्या संपूर्ण धुतल्या पाहिजेत आणि निर्दूषित करण्यात आल्या पाहिजेत.

(ब) नायट्रो किंवा ॲमिनो संयुग असलेल्या संयंत्राचा कोणताही भाग त्यातून असे संयुग काढून टाकून तो संपूर्णपणे स्वच्छ अथवा निर्दूषित केल्याखेरीज दुरुस्त करता कामा नये किंवा दुरुस्तीसाठी उघडता कामा नये.

(क) अशा प्रक्रियेची नोंद, मुख्य निरीक्षकाने मान्यता दिलेल्या नोंदवहीत घेतली पाहिजे. आणि ही नोंदवही निरीक्षकाला तपासणीसाठी उपलब्ध करून दिली पाहिजे.

१२. प्रत्यक्ष हाताळणी – लांब दांडा असलेल्या पळीचा वापर केल्याशिवाय, नायट्रो किंवा ॲमिनो संयुग, मिसळण्यास, भरण्यास, रिकामे करण्यास किंवा हाताळण्यास भाग पाडता कामा नये किंवा परवानगी देता कामा नये. ही पळी दररोज पूर्ण स्वच्छ केली पाहिजे.



१३. संरक्षक कपडे – कारखान्याच्या कब्जेदाराने खालील कोष्टकात विनिर्दिष्ट केलेले संरक्षक कपडे आणि इतर सामग्री यांची तरतूद केली पाहिजे. ती स्वच्छ आणि दुरुस्त स्थितीत ठेवली पाहिजे.

**कोष्टक**

| प्रक्रिया | संरक्षक कपडे व इतर साहित्य |
| --- | --- |
| परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केलेली संयुगे हाताळण्यासाठी | (अ) लांब विजारी व शर्ट किंवा ओव्हररॉल्स व शिरोवेष्टने, शर्ट किंवा ओव्हररॉल्स घातल्यानंतर मान झाकली गेली पाहिजे.<br>(ब) रबरी मोजे, रबरी गमबूट, रबरी ॲप्रन व हवा घेण्याची श्वसन यंत्रे. |
| परिशिष्ट 'ब' मध्ये नमूद केलेली संयुगे हाताळण्यासाठी | (क) पांढरे स्वच्छ शर्ट, कुडते व वर (ब) मध्ये दिलेली संरक्षक सामग्री याशिवाय वर (अ) मध्ये नमूद केलेले पांढरे स्वच्छ कपडे,<br>(ड) पांढरा लांब हाताचा ॲप्रन. |

१४. वैद्यकीय सोयी – (१) कारखान्याच्या कब्जेदाराने मुख्य निरीक्षकाच्या मान्यतेच्या अधीन अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायाची नियुक्ती केली पाहिजे. अशा रीतीने नेमणूक करण्यात आलेला अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायी नियुक्त डॉक्टर म्हणून संबोधण्यात येईल.

(२) कब्जेदाराने (अ) नियुक्त डॉक्टरच्या इच्छेप्रमाणे कारखान्याच्या जागेत कामगारांच्या वैद्यकीय तपासणीसाठी केवळ त्याच्या वापरासाठी एका खोलीची तरतूद केली पाहिजे आणि ही खोली योग्य प्रकारे स्वच्छ केलेली, हवा खेळण्याची व प्रकाशाची पुरेशी सोय असलेली आणि एक पडदा, (लेखन साहित्य) एक टेबल, खुर्ची आणि अशा तपासणीसाठी लागणाऱ्या सोयी व उपकरणे यांनी सुसज्ज केलेली असली पाहिजे. (ब) प्राणवायू व तो देण्यासाठी अर्हताप्राप्त कर्मचारी वर्ग यांची तरतूद केली पाहिजे.

१५. वैद्यकीय तपासणी – (१) (अ) कोणत्याही व्यक्तीला तिची नियुक्त डॉक्टरने उचित परीक्षांद्वारे तपासणी केलेली असल्याखेरीज आणि त्याला ती

व्यक्ती उक्त वस्तु-निर्माण प्रक्रियेसाठी योग्य आढळून आल्याखेरीज कामावर लावता कामा नये. अशा तपासणीचे निष्कर्ष मुख्य निरीक्षकाने मान्यता दिलेल्या नोंदवहीत दाखल केले पाहिजेत. उक्त वस्तुनिर्माण प्रक्रिया 'अ' 'ब' 'क' यामध्ये कामावर लावलेल्या व्यक्तींची नावे या नोंदवहीत वेगवेगळी दाखविली पाहिजेत.

(ब) उप-परिच्छेद (१) (अ) चे पालन करून तपासणी केलेल्या व्यक्तींची नियुक्त डॉक्टरने तीन महिन्यांपेक्षा अधिक नाही इतक्या अंतराने किंवा मुख्य निरीक्षक देखील आदेश देईल अशा अंतराने परत तपासणी केली पाहिजे व अशा तपासणीच्या नोंदी उक्त उप-परिच्छेदान्वये तरतूद केलेल्या नोंदवहीत ठेवल्या पाहिजेत.

(क) जर कोणत्याही वेळी उक्त डॉक्टराचे असे मत असेल की कोणतीही व्यक्ती वस्तुनिर्माण प्रक्रियेत सतत काम करीत राहिल्यास तिच्या आरोग्यास विशेष धोका होण्याचा संभव असल्यामुळे त्या प्रक्रियेत काम करण्यास मुळीच योग्य नाही, तर त्याने आपले निष्कर्ष उक्त नोंदवहीत नोंदवले पाहिजेत आणि उक्त व्यक्ती उक्त वस्तुनिर्माण प्रक्रियेत काम करण्यास अयोग्य आहे असे व्यवस्थापकास लेखी कळविले पाहिजे.

(ड) नियुक्त डॉक्टरला अशा प्रकारे अयोग्य आढळून आलेल्या व्यक्तीस व्यवस्थापकाने नियुक्त डॉक्टरच्या अहवालासह प्रमाणक शल्यचिकित्सकाकडे पाठविले पाहिजे. प्रमाणक शल्यचिकित्सकास, तपासणीनंतर उक्त व्यक्तीला उक्त वस्तु-निर्माण प्रक्रियेत काम करण्यापासून निलंबित करता येईल.

(२)-(अ) उक्त वस्तु-निर्माण प्रक्रियेत कामावर लावलेल्या व्यक्तीची वैद्यकीय तपासणी अशा प्रक्रियेतील तिच्या प्रथम नियुक्तीपासून ३० दिवसांच्या आत प्रमाणक शल्यचिकित्सकाने केली पाहिजे आणि जर ती उक्त प्रक्रियेत कामावर लावण्यासाठी योग्य आढळून आली तर प्रमाणक शल्यचिकित्सकाने तिला नमुना क्रमांक २३ मधील स्वास्थ्य प्रमाणपत्र दिले पाहिजे. असे प्रमाणपत्र देण्यात आलेल्या व्यक्तीने कामावर असताना, अशा प्रमाणपत्राने निर्देशक चिन्ह बाळगल्याबरोबर बाळगले पाहिजे.

(ब) अशा प्रकारे पहिली तपासणी करण्यात आलेल्या व्यक्तीची, प्रमाणक शल्य चिकित्सकाने १२ महिन्यांपेक्षा अधिक नाही इतक्या अंतराने परत [तपासणी केलेली पाहिजे आणि अशा तपासणीची नोंद प्रमाणक शल्यचिकित्सकाने नमुना २३ मधील विशेष स्वास्थ्य प्रमाणपत्रात केली पाहिजे.

(क) जर कोणत्याही वेळी प्रमाणक शल्यचिकित्सकाचे असे मत असेल की कोणतीही व्यक्ती (उक्त प्रक्रियेत) सतत काम करीत राहिल्यास तिच्या आरोग्यास



विशेष धोका होण्याचा संभव असल्यामुळे त्या कामावर लावण्यास योग्य नाही तर त्याने त्या व्यक्तीचे नमुना क्रमांक २३ मधील विशेष स्वास्थ्य प्रमाणपत्र रद्द केले पाहिजे.

(ड) ज्या व्यक्तीचे नमुना क्रमांक २३ मधील विशेष स्वास्थ्य प्रमाणपत्र रद्द करण्यात आलेले आहे अशा व्यक्तीची प्रमाणक शल्यचिकित्सकाने परत तपासणी केली व ती उक्त प्रक्रियेत कामावर लावण्यास योग्य आहे असे त्याने प्रमाणित केल्याखेरीज तिला कामावर लावता कामा नये. किंवा काम करण्यास परवानगी देता कामा नये.

(३) उप-परिच्छेद (१) (अ) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे नियुक्त डॉक्टरकडून आलेली तपासणीच्या निष्कर्षांची नोंदवही आणि प्रमाणक शल्यचिकित्सकाने दिलेले नमुना क्रमांक २३ मधील विशेष स्वास्थ्य प्रमाणपत्र कारखान्याच्या व्यवस्थापकाच्या अभिरक्षेत असले पाहिजे आणि निरीक्षकाला तपासणीसाठी तात्काळ उपलब्ध होईल असे ठेवले पाहिजे.

(४) जिला प्रमाणक शल्य चिकित्सकाकडून नमुना क्रमांक २३ मधील विशेष स्वास्थ्य प्रमाणपत्र देण्यात आले आहे आणि जिने वर उप-परिच्छेद (२) (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेले चिन्ह बाळगले आहे अशा व्यक्तीखेरीज कोणत्याही व्यक्तीस उक्त वस्तु-निर्माण प्रक्रिया चालू असलेल्या कोणत्याही कामाच्या खोलीत काम करण्यास परवानगी देता कामा नये.

१६. धुण्याच्या आणि आंघोळीच्या सोयी – (१) उक्त वस्तु-निर्माण प्रक्रियेत कामावर लावलेल्या व्यक्तींच्या उपयोगासाठी खालील धुण्याच्या आणि आंघोळीच्या सोयींची तरतूद केली पाहिजे आणि त्या स्वच्छ व दुरुस्त स्थितीत ठेवल्या पाहिजेत.

(अ) स्वच्छ टॉवेल, साबण व नखे साफ करण्याचे कुंचले आणि कोणत्याही एका वेळी कामावर लावलेल्या दर पाच व्यक्तींमागे पाण्याचा सतत पुरवठा करणारा कमीत कमी एक उभा नळ असलेली आच्छादित धुण्याची जागा.

(ब) वरील खंड (१) खालील तरतुदीनुसार पुरविण्यात आलेल्यापैकी ५० % उभे नळ म्हणजे वरात असले पाहिजेत. आणि त्या द्वारा कारखान्याच्या कामाच्या वेळात व त्यानंतर एक तास गरम आणि थंड पाण्याचा सतत पुरवठा करण्यात आला पाहिजे.

(क) उक्त वस्तु-निर्माण प्रक्रिया ज्या भागात केली जात असेल त्यापासून १५ मीटर त्रिज्येच्या आत धुण्याच्या आणि आंघोळीच्या सोयी असल्या पाहिजेत.

(इ) निरीक्षकाने आदेश दिला असेल तर प्रत्येक कामगारास एक याप्रमाणे स्वच्छ टॉवेल पुरविण्यात आले पाहिजेत.

(ई) वाव (अ) खाली विनिर्दिष्ट केलेल्या तोटयांव्यतिरिक्त प्रत्येक मजल्यावर गरम पाण्यासाठी एक उभा नळ पुरविण्यात आला पाहिजे.

(२) कारखान्यातील मनोरेत कपडे दररोज धुण्याची आवश्यक ती व्यवस्था केली पाहिजे.

१७. धुणे आणि आंघोळ – (अ) भोजन घेण्यापूर्वी किंवा कारखान्यातून बाहेर पाडण्यापूर्वी, उक्त वस्तु-निर्माण प्रक्रियेत कामावर असलेल्या कामगारांनी आपले हात आणि चेहरा काळजीपूर्वक धुतले पाहिजेत.

(ब) आंघोळीची नोंदवही–उक्त वस्तु-निर्माण प्रक्रियेत कामावर असलेल्या कामगारांनी दररोज कारखान्याच्या आतील आंघोळ केली पाहिजे आणि त्याची खूण म्हणून आंघोळीच्या नोंदवहीत आपली नावे लिहिली पाहिजेत.

१८. अन्न, पेये, इ. कामाच्या खोलीत नेण्यास मनाई – ( अनुसूची १० मधील खंड १३ पहा. तीच तरतूद येथे आहे. काहीही फरक नाही. )

१९. प्रसाधनकक्ष – उक्त वस्तु-निर्माण प्रक्रियेत कामावर असलेल्या सर्व व्यक्तींच्या उपयोगासाठी पुढील गोष्टींची तरतूद केली पाहिजे व त्या स्वच्छ व चांगल्या स्थितीत ठेवल्या पाहिजेत–

(अ) बाहेर वापरावयाचे कपडे आणि कारखान्यात वापरावयाचे कपडे ठेवण्यासाठी दोन कुलुपाचे खण असलेला प्रसाधन कक्ष.

(ब) परिच्छेद १३ अनुसार पुरविण्यात आलेली संरक्षक सामग्री ठेवण्यासाठी कुलुपाचे खण असलेल्या खोलीपासून आणि भोजनगृहापासून, वेगळी जागा, अशा प्रकारे तरतूद करण्यात आलेली जागा जबाबदार व्यक्तीच्या ताब्यात असली पाहिजे आणि ती स्वच्छ ठेवली पाहिजे.

२०. भोजनगृह – ( अनुसूची ३ यांतील खंड १७ पहा. तीच तरतूद येथे आहे. काहीही फरक नाही. )

२१. धुण्यासाठी द्यावयाची वेळ – उक्त वस्तुनिर्माण प्रक्रियेत कामावर असलेल्या प्रत्येक व्यक्तीस प्रत्येक जेवणापूर्वी व दिवसाचे काम संपण्यापूर्वी, नेहमीच्या मध्यंतराव्यतिरिक्त कमीत कमी १० मिनिटे धुण्याकरिता वेळ दिला पाहिजे.



२२. वाळविण्याचे स्टोव्ह – (१) अशा स्टोव्हमुळे निर्माण होणारी गरम हवा कोणत्याही कामाच्या खोलीत शिरणार नाही अशा रीतीने प्रत्येक वाळवण्याच्या स्टोव्हभोवती बाहेरील हवा खेळती ठेवली पाहिजे.

(२) कोणत्याही स्टोव्हमधून यांत्रिक साधनाद्वारे हवेचा मोकळा प्रवाह सोडण्यात येईपर्यंत त्यांतील वस्तू काढून टाकण्यासाठी कोणत्याही व्यक्तीने, त्यात प्रवेश करता कामा नये.

२३. ठिणगी निर्माण न करणारी हत्यारे – यंत्रसामग्री स्वच्छ किंवा दुरुस्त करण्यासाठी किंवा जेथे नायट्रोग्लिसरीनच्या वाफेचा संबंध येतो अशी कोणतीही प्रक्रिया चालविण्यासाठी ठिणगी निर्माण न करणारी हत्यारे पुरविण्यात आली पाहिजेत.

२४. वातावरणाची तपासणी वगैरे – जेथे वस्तुनिर्माण प्रक्रिया चालू असेल अशा खोलीच्या हवेतील एमाइल्सचा आठवड्यातून एकदा अंदाज घेतला पाहिजे, आणि अशा अंदाजाच्या निष्कर्षाची नोंद, निरीक्षकाला आवश्यक वाटेल तेव्हा उपलब्ध करून दिली पाहिजे.

## भाग २

२५. प्रक्रियांचे पृथक्करण – उक्त वस्तुनिर्माण प्रक्रिया 'ब' ही ज्या खोल्यांचा संबंध बाहेरच्या वातावरणाशी पूर्णपणे खुल्या असलेल्या मार्गाखेरीज इतर कोणत्याही खोल्यांशी येणार नाही अशा खोल्यांमध्ये केली गेली पाहिजे.

२६. उक्त प्रक्रियेसंबंधातील मर्यादा – (१) हा नियम अमलात येण्याच्या तारखेनंतर पहिल्या वेळी ४० वर्षे वया खालील कोणत्याही कामगारास कारखान्यात उक्त वस्तुनिर्माण प्रक्रियेत कामावर लावता कामा नये.

(२) उक्त वस्तुनिर्माण प्रक्रिया 'ब' मध्ये कामावर असलेल्या प्रत्येक कामगारास, परिच्छेद १९ खाली द्यावयाची वेळ धरून, दिवसाचे काम संपण्यापूर्वी कमीत कमी एक तास आंघोळ करण्यासाठी दिला पाहिजे.

२७. सूट – ( अनुसूची १०, यांतील खंड १७ पहा. त्यात व यात काहीही फरक नाही. )

## परिशिष्ट अ

( परिच्छेद २, १०, १३ आणि १५ पहा )

एकदा किंवा अनेकदा नत्रीकरण झालेले बेंझिन्स, टॉल्युईन्स, झाइलिन्स (नैट्रोक्लिसिट्रो आणि ट्रिनिट्रो बेन्झिन व त्याचे सजातीय पदार्थ) आणि त्यांची

क्लोरोनीटेड संयुगे, एकदा किंवा अनेकदा नत्रीकरण झालेले नॅप्थालीन्स, अनिलीन आणि यांचे सजातीय पदार्थ ( टोल्युडीन, झायलिडीन, क्युमिडीन ) ॲनिसिडीना फेनेटिडीन आणि त्यांची क्लोरिनेटेड, नैट्रेटेड, आणि ॲल्किलेटेड संयुगे डिमेथायलाॅनिलिन, टोल्युलेण्डा, थामिन टोलुडीन, फिनिलहायड्राझिन, टोल्युइलहायड्राझिन. )

## परिशिष्ट ब

( परिच्छेद २, १३, १५, २५ आणि २६ पहा )

| | | |
|---|---|---|
| अल्फा–नेप्थीलेमिन | बीटानेप्थीलेमिन | बेंझेडीन व त्याचे क्षार |
| डायनिसिडीन | टोलिडीन | डिक्लोरोबेन्झिडीन |

## परिशिष्ट क

( परिच्छेद ३ पहा )

सावधगिरीचा सूचना फलक – कामगारांस सल्ला–

(१) नायट्रो आणि ॲमिनो संयुगे किंवा ॲरोमॅटिक हायड्रोकार्बन हे धोकादायक आहेत. ह्या कारखान्यात तुम्हाला ती वारंवार हाताळावयाची आहेत.

(२) तुमच्या आरोग्याच्या दृष्टीने पुरविण्यात आलेल्या सर्व संरक्षक कपड्यांचा वापर करावा.

(३) सर्व वेळी काटेकोरपणे स्वच्छता राखा. भोजनापूर्वी हात आणि पाय स्वच्छ धुवा. कारखान्यातून बाहेर पडण्यापूर्वी स्नान करणे आवश्यक आहे आणि डोके नीट धुण्याची दक्षता घ्या.

(४) जर एखादे रसायन तुमच्या शरीरावर सांडले तर ते तात्काळ साबणाने व पाण्याने धुऊन काढा. नायनोटिक नायट्रो किंवा ॲमिनो संयुगाने तुमचे कपडे खराब झाले तर ते तात्काळ बदला. नियुक्त डॉक्टरांची तात्काळ भेट घ्या.

(५) उघड्या हातांनी कोणतेही नायट्रो किंवा ॲमिनो संयुग हाताळू नका. लांब दांड्याच्या पळीचा वापर करा.

(६) मद्यार्कयुक्त पेये पिण्याचे शक्य तो टाळा. कारण त्यापासून विषबाधा होण्याचा धोका आहे.

(७) आजारी पडल्यास कारखान्याच्या व्यवस्थापकास किंवा नियुक्त डॉक्टरास भेटा.

(८) कामाच्या खोलीत किंवा हात खराब असताना काहीही चघळू नका, खाऊ नका, पिऊ नका किंवा धूम्रपान करू नका. कामाच्या जागेपासून अन्न आणि पेय दूर ठेवा.



(९) जर तुम्ही बिटानॅप्थोलेमिन किंवा बेन्झिन किंवा त्यांचे क्षार अल्फा-नॅप्थीलेमिन किंवा डायनिसिडीन हे पदार्थ घेऊन काम करीत असाल तर–

(अ) तुमचे शरीर, कपडे, यंत्रसामग्री आणि हत्यारे संपूर्णपणे स्वच्छ ठेवण्याची तुम्ही काळजी घेतली नाही तर काही वर्षांनंतर त्याचे गंभीर परिणाम होतील हे लक्षात ठेवा.

(ब) भोजनाच्या वेळी चेहरा व हात, त्यावरील रसायने काढून टाकण्यासाठी साबणाने व पाण्याने दोनदा सर्व धुवा, जेवताना लांब हाताचा स्वच्छ ॲप्रन वापरा.

(क) कारखान्यातून बाहेर पडण्यापूर्वी साबण आणि पाणी दोनदा वापरून स्नान करा, त्यानंतर तुमचे घरी जाण्याचे कपडे घाला.

## अनुसूची १२

क्षारक पदार्थ हाताळणे आणि हाताने तयार करणे

१. व्याख्या – या अनुसूचीच्या प्रयोजनासाठी–

(अ) 'क्षारक पदार्थ' म्हणजे, गंधकाम्ल, नत्राम्ल, हायड्रोक्लोरिक आम्ल, हायड्रोफ्लुरिक आम्ल, किंवा कार्बोलीक आम्ल, फॉस्फोरीक आम्ल, लिक्विड क्लोरीन, लिक्विड ब्रोमिन, अमोनिया किंवा हायड्रस लिक्विड अमोनिया, सोडीयम हायड्रोऑक्साईड, किंवा पोटॅशियम हायड्रोऑक्साईड किंवा त्यांची मिश्रणे किंवा राज्यशासन शासकीय राजपत्रात अधिसूचनेद्वारा क्षारक पदार्थ म्हणून विनिर्दिष्ट करील असे इतर क्षारक पदार्थ.

(ब) 'क्षारक कामे' म्हणजे, कारखान्यात कोणताही क्षारक पदार्थ तयार करणे, साठवणे, हाताळणे, त्यावर प्रक्रिया करणे तो आवेष्टित करणे किंवा त्याचा वापर करणे.

२. जमीन – ज्या कारखान्यास ही अनुसूची लागू होते अशा कारखान्यातील प्रत्येक कामाच्या खोलीची जमीन अभेद्य, क्षारण आणि आग प्रतिबंधक सामानाची बनवली पाहिजे आणि क्षारक पदार्थ जमा होण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने तिची रचना केली पाहिजे. अशा जमिनीचा पृष्ठभाग गुळगुळीत असला पाहिजे व तो शक्य तो वारंवार धुवून स्वच्छ केला पाहिजे व सुस्थितीत ठेवला पाहिजे.

३. संरक्षक साधन सामग्री – (अ) कब्जेदाराने, कोणत्याही क्षारक कामावर लावलेल्या सर्व व्यक्तींच्या उपयोगासाठी योग्य अशी संरक्षक हस्तावरणे व पादत्राणे, योग्य ॲप्रन्स, मुखावरणे, रसायनापासून संरक्षक गॉगल्स आणि योग्य

(ङ) 'धूम प्रक्रिया' म्हणजे, ज्या प्रक्रियेत कार्बन डायसल्फाईड किंवा हैड्रोजन सल्फाईड निर्माण केला जातो, वापरला जातो, अथवा बाहेर काढला जातो अशी कोणतीही प्रक्रिया.

(च) 'प्राणरक्षक पट्टा' म्हणजे, जो त्यास जोडलेल्या, योग्य लांबीच्या दोरामुळे शरीराभोवती सुरक्षितपणे बांधला जाऊ शकतो व दोर किंवा प्रत्येक माणसाचे वजन सांभाळण्याइतका पुरेसा मजबूत आहे असा, चामडे किंवा इतर योग्य साहित्य वापरून बनविलेला पट्टा.

(ग) 'निलंबन' म्हणजे, प्रमाणक शल्यचिकित्सकाने सही केलेल्या नमुना ७ मधील आरोग्य नोंदवहीतील लेखी प्रमाणपत्रावरून कोणत्याही धूम प्रक्रियेच्या कामावरून निलंबित करणे. प्रमाणक शल्यचिकित्सकास अशा कोणत्याही प्रक्रियेत कामावर असलेल्या सर्व व्यक्तीस निलंबित करण्याची शक्ती असेल.

२. स्त्रिया आणि तरुण व्यक्ती यांना कामावर लावण्याबाबत मनाई – (अनुसूची ४, खंड ४ यातील तरतूद व येथील तरतूद सारखीच आहे.)

३ कार्यक्षम बहिःसर्जक हवेचा स्रोत आणि शुद्ध हवेचा पुरवठा – कोणतीही मापणी उघडली असता कामाच्या खोलीतील कार्बन डायसल्फाईडचे संकेंद्रण हे दर दशलक्षामागे २० भागापेक्षा जास्त होणार नाही अशा रीतीने कार्यक्षम बहिःसर्जक हवेचा स्रोत, त्यिच्यात अगोदर सोडलेली असेल तर, मापणी उघडता कामा नये आणि मापणीमधील कार्बन डायसल्फाईड धूमाचे संकेंद्रण दर दशलक्षामागे २० आणि त्यापेक्षा कमी भाग नसेल आणि कामगार किंवा त्याचे डोके मापणीमध्ये असेतोपर्यंत तीमधील कार्बन डायसल्फाईडचे संकेंद्रण दर दशलक्षामागे २० किंवा त्यापेक्षा कमी भागापर्यंत घटेल अशा रीतीने बहिःसर्जक हवेच्या स्रोताची व्यवस्था केलेली नसेल तर, त्या कामगारास मापणीमध्ये डोकावू देता कामा नये किंवा प्रवेश करू देता कामा नये.

(२) जेथे धूम प्रक्रिया चालू असेल अशा कोणत्याही खोलीत बाहेर पडलेला हैड्रोजन सल्फाईड, किंवा कार्बन डायसल्फाईड कार्यक्षम बहिःसर्जक हवेच्या स्रोताने काढून टाकला पाहिजे.

(३) जेव्हा खंड (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रक्रियेच्या संबंधात नेहमीच्या आवश्यक असलेल्या हवा खेळवण्याच्या उपकरणात बिघाड झाला असेल किंवा कोणत्याही प्रयोजनाकरिता ते बंद केले असेल तेव्हा, उक्त खोलीतील [illegible] परवानगीशिवाय यांत्रिकरीत्या चालविलेल्या वायुवाहिन्याद्वारे कोणतेही [illegible] कामगाराला अशा



तितक्या लौकर पण कोणत्याही परिस्थितीत १५ मिनिटांच्या आत ती खोली सोडावयास लावली पाहिजे.

परंतु असे की श्वसन उपकरण अंग घातलेल्या कोणत्याही व्यक्तीस उक्त खोलीत राहण्याची मुभा देता येईल.

स्पष्टीकरण – व्यवस्थापकाने यथायोग्य रीत्या केलेल्या प्रत्यावेदनावरून एखाद्या विशिष्ट प्रकरणात, नेहमीच्या हवा खेळवण्याच्या उपकरणात कोणत्या गोष्टींचा समावेश होतो हे मुख्य निरीक्षकास ठरविता येईल.

(४) जेथे एखादी प्रक्रिया चालू असता श्वसनक्षोभक किंवा दुर्गंधयुक्त धूम बाहेर पडत असेल अशा कोणत्याही खोलीत, ताज्या हवेचा पुरवठा होण्यासाठी त्या खोलीत योग्य ठिकाणी पुरेसा आकाराची प्रवेशद्वारे ठेवली पाहिजेत.

४. हवेचे विश्लेषण – (१) जेथे धूम प्रक्रिया चालू असेल अशा ठिकाणी कार्बन डायसल्फाईड व हैड्रोजन सल्फाईड याचे संकेंद्रण मोजण्यासाठी दर आठ तासांनी किंवा मुख्य निरीक्षक निदेश देईल अशा अंतराने हवेचे विश्लेषण केले पाहिजे आणि अशा विश्लेषणाचा निष्कर्ष, त्यासाठी ठेवलेल्या विनिर्दिष्ट नोंदवहीत नोंदविला पाहिजे.

(२) जर कार्बन डायसल्फाईडचे किंवा हैड्रोजन सल्फाईडचे संकेंद्रण दर दशलक्षामागे २० भागापेक्षा अधिक होत असेल तर व्यवस्थापकाने झालेले संकेंद्रण आणि अशा संकेंद्रणाच्या अवधी वाढीच्या दर्शविणारा अहवाल मुख्य निरीक्षकाकडे पाठविला पाहिजे व अशा वाढीची कारणे अहवालात नमूद केली पाहिजेत.

(३) अशी माहिती मिळाल्यावर मुख्य निरीक्षकास, तो त्याबाबत विनिर्दिष्ट करील अशा प्रकारची उपाययोजना करण्याचा व्यवस्थापकास निदेश देता येईल आणि अशा निदेशाचे पालन करणे हे व्यवस्थापकाचे कर्तव्य राहील.

५. कताई खोली सोडून कार्बन डायसल्फाईड धूम प्रक्रिया खोलीतील विजेचे जोडणीकाम – जेथे कार्बन डायसल्फाईड निर्माण करणारी धूम प्रक्रिया चालू असेल अशा कताई खोलीव्यतिरिक्त खोलीतील विजेचे सर्व जोडणी काम ज्वालारोधक बनावटीचे असले पाहिजे आणि विजेचे सर्व वाहक एकतर धातूच्या नळ्यात बंद केलेले असले पाहिजेत किंवा त्यावर शिशाचे आवरण घातलेले असले पाहिजे.

६. धुण्याच्या तोटी – धूम प्रक्रियेत कामावर लावलेल्या सर्व व्यक्तींच्या उपयोगासाठी कब्जेदाराने आच्छादन घातलेल्या धुण्याच्या जागेची तरतूद केली पाहिजे आणि ती स्वच्छ व सुस्थ स्थितीत ठेवली पाहिजे. या जागेवर प्रत्येक पाच व्यक्तींसाठी स्वच्छ पाण्याचा सतत पुरवठा करणारी कमीत कमी एक तोटी किंवा

(इ) 'धूम प्रक्रिया' म्हणजे, ज्यामुळेप्रक्रियेत कार्बन डायसल्फाईड किंवा हैड्रोजन सल्फाईड निर्माण केला जातो, वापरला जातो, अथवा बाहेर काढला जातो अशी कोणतीही प्रक्रिया.

(फ) 'प्राणरक्षक पट्टा' म्हणजे, जो त्यास जोडलेल्या, योग्य लांबीच्या दोरामुळे शरीराभोवती सुरक्षितपणे बांधला जाऊ शकतो व दोर किंवा प्रत्येक माणसाचे वजन सांभाळण्याइतका पुरेसा मजबूत आहे असा, चामडे किंवा इतर योग्य साहित्य यापासून बनविलेला पट्टा.

(ग) 'निलंबन' म्हणजे, प्रमाणक शल्यचिकित्सकाने सही केलेल्या नमुना ७ मधील आरोग्य नोंदवहीतील लेखी प्रमाणपत्रावरून कोणत्याही धूम प्रक्रियेच्या कामावरून निलंबित करणे. प्रमाणक शल्यचिकित्सकास अशा कोणत्याही प्रक्रियेत कामावर असलेल्या सर्व व्यक्तींस निलंबित करण्याची सक्ती असेल.

२. स्त्रिया आणि तरुण व्यक्ती यांना कामावर लावण्याबाबत मनाई – (अनुसूची ४, खंड ४ यांतील तरतूद व येथील तरतूद सारखीच आहे.)

३ कार्यक्षम बहि:सर्जक हवेचा स्रोत आणि शुद्ध हवेचा पुरवठा – कोणतीही मापणी उघडली असता कामाच्या खोलीतील कार्बन डायसल्फाईडचे संकेद्रण हे दर दशलक्षामागे २० भागांपेक्षा जास्त होणार नाही अशा रीतीने कार्यक्षम बहि:सर्जक हवेचा स्रोत, तिच्यात बसविलेला नसेल तर, मापणी उघडता कामा नये आणि मापणीमधील कार्बन डायसल्फाईड धूमाचे संकेद्रण दर दशलक्षामागे २० आणि मापणीमध्ये किंवा त्यापेक्षा कमी भाग नसेल आणि कामगार किंवा त्याचे डोके मापणीमध्ये अलीकडील खोलीतील कार्बन डायसल्फाईडचे संकेद्रण दर दशलक्षामागे २० किंवा त्यापेक्षा कमी भागापर्यंत घटेल अशा रीतीने बहि:सर्जक हवेच्या स्रोताची व्यवस्था केलेली नसेल तर, त्या कामगारास मापणीमध्ये डोकावू देता कामा नये किंवा प्रवेश करू देता कामा नये.

(२) जेथे धूम प्रक्रिया चालू असेल अशा कोणत्याही खोलीत बाहेर पडलेला हैड्रोजन सल्फाईड, किंवा कार्बन डायसल्फाईड कार्यक्षम बहि:सर्जक हवेच्या स्रोताने काढून टाकला पाहिजे.

(३) जेव्हा खंड (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रक्रियेच्या संबंधात नेहमीच्या आवश्यक असलेल्या हवा खेळविण्याच्या उपकरणात बिघाड झाला असेल किंवा कोणत्याही प्रयोजनाकरिता ते बंद केले असेल तेव्हा, उक्त खोलीतील कोणत्याही व्यक्तीच्या उपस्थितीशिवाय यांत्रिकरीत्या चालविले जाणारे कोणतेही काम केले जाता कामा नये आणि अशी घटना घडल्यानंतर कामगाराला शक्य



तितक्या लौकर पण कोणत्याही परिस्थितीत १५ मिनिटांच्या आत ती खोली सोडावयास लावली पाहिजे.

परंतु असे की श्वसन उपकरण अंग घातलेल्या कोणत्याही व्यक्तीस उक्त खोलीत राहण्याची मुभा देता येईल.

स्पष्टीकरण – व्यवस्थापकाने यथायोग्य रीत्या केलेल्या प्रत्यावेदनावरून एखाद्या विशिष्ट प्रकरणात, नेहमीच्या हवा खेळविण्याच्या उपकरणात कोणत्या गोष्टींचा समावेश होतो हे मुख्य निरीक्षकास ठरविता येईल.

(४) जेथे एखादी प्रक्रिया चालू असता क्षोभक किंवा दुर्गंधयुक्त धूम बाहेर पडत असेल अशा कोणत्याही खोलीत, ताज्या हवेचा पुरवठा होण्यासाठी त्या खोलीला योग्य ठिकाणी पुरेशा आकाराची प्रवेशद्वारे ठेवली पाहिजेत.

४. हवेचे विश्लेषण – (१) जेथे धूम प्रक्रिया चालू असेल अशा ठिकाणी कार्बन डायसल्फाईड व हैड्रोजन सल्फाईड यांचे संकेद्रण मोजण्यासाठी दर आठ तासांनी किंवा मुख्य निरीक्षक निदेश देईल अशा अंतराने हवेचे विश्लेषण केले पाहिजे आणि अशा विश्लेषणाचा निष्कर्ष, त्यासाठी ठेवलेल्या विशिष्ट नोंदवहीत नोंदविला पाहिजे.

(२) जर कार्बन डायसल्फाईडचे किंवा हैड्रोजन सल्फाईडचे संकेद्रण दर दशलक्षामागे २० भागांपेक्षा अधिक होत असेल तर व्यवस्थापकाने झालेले संकेद्रण आणि अशा संकेद्रणाच्या वेळची कार्यवाहीचा अहवाल मुख्य निरीक्षकाकडे पाठविला पाहिजे व अशा बाबींची कारणे अहवालात नमूद केली पाहिजेत.

(३) अशी माहिती मिळाल्यावर मुख्य निरीक्षकास, तो त्याबाबत विनिर्दिष्ट करील अशा प्रकारची उपाययोजना करण्याचा व्यवस्थापकास निदेश देता येईल आणि अशा निदेशांचे पालन करणे हे व्यवस्थापकाचे कर्तव्य राहील.

५. कताई खोली सोडून कार्बन डायसल्फाईड धूम प्रक्रिया खोलीतील विजेचे जोडणीकाम – जेथे कार्बन डायसल्फाईड निर्माण करणारी धूम प्रक्रिया चालू असेल अशा कताई खोलीव्यतिरिक्त खोलीतील विजेचे सर्व जोडणी काम ज्वालारोधक बनावटीचे असले पाहिजे आणि विजेचे सर्व वाहक एकतर धातूच्या नळ्यात बंद केलेले असले पाहिजेत किंवा त्यावर शिशाचे आवरण घातलेले असले पाहिजे.

६. धुण्याच्या तोटी – धूम प्रक्रियेत कामावर लावलेल्या सर्व व्यक्तींच्या उपयोगासाठी कब्जेदाराने आच्छादन घातलेल्या धुण्याच्या जागेची तरतूद केली पाहिजे आणि ती स्वच्छ व दुरुस्त स्थितीत ठेवली पाहिजे. या जागेवर प्रत्येक पाच व्यक्तींसाठी स्वच्छ पाण्याचा सतत पुरवठा करणारी कमीत कमी एक तोटी किंवा

११. वीज संच मांडणी संबंधीची सावधगिरी – सर्व वीजसंच मांडणी व जोडण्या अनिरोधक प्रकारच्या असल्या पाहिजेत.

१२. कामाच्या खोल्यांची जमीन – (अनुसूची ३ खंड ८ मधील उपखंड (१) चा (अ), (ब), (क) व उपखंड (२) चा (१) फक्त ही तरतूद येथे घ्यावी.

१३. धुण्यासाठी द्यावयाचा वेळ – (अनुसूची १० खंड (६) यातील तरतूद (ब) या अनुसूचीतील या खंडातील तरतूद सारखी आहे- तीच येथे घ्यावी.)

१४. धुण्याच्या सोयी – (अनुसूची ३ खंड १९ यातील (ब) सोडून सर्व तरतूद व या अनुसूचीतील तरतूद सारखी आहे.)

१५. स्नानासाठी सोयी – मुख्य निरीक्षकाला, उक्त वस्तु-निर्माण प्रक्रियात किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रक्रियेत कामावर असलेल्या सर्व व्यक्तींसाठी स्नानाची पुरेशी जागा तसेच साबण व स्वच्छ टॉवेल यांची पुरेशी तरतूद करण्यास कोणत्याही भोगवटादारास भाग पाडता येईल.

१६. प्रसाधन कक्ष – (अनुसूची १० खंड ११ यातील तरतूद व या अनुसूचीतील तरतूद सारखीच आहे.)

१७ अन्न, पेये इ. कामाच्या खोल्यांत नेण्यास मनाई – अनुसूची ९, खंड ४ यातील तरतूद व या अनुसूचीतील ही तरतूद सारखी आहे.

१८. भोजनगृह – (अनुसूची ११ खंड २० यातील तरतूद आणि या अनुसूचीतील येथील तरतूद सारखीच आहे.)

१९. अग्निशामक उपाय – (१) कोणत्याही एकावेळी खोलीतील सेल्युलाईडचे प्रमाण लक्षात घेऊन प्रत्येक कामाच्या खोलीजवळ आग विझवण्याच्या पुरेशा साधनांची सतत तरतूद केलेली असली पाहिजे.

(२) अग्निशामक उपाय सुस्थितीत ठेवली पाहिजेत आणि ती सुलभतेने उपलब्ध होतील अशा जागी ठेवली पाहिजेत.

२०. आग लागल्यास बाहेर पडण्याची साधने – जेथे चलच्चित्र फिल्म हाताळली जाते, वापरली जाते किंवा साठविली जाते अशा प्रत्येक खोलीत, आग लागल्यास बाहेर पडण्याच्या पुरेशा साधनांची तरतूद केलेली असली पाहिजे, आणि जर –

(अ) अशा प्रत्येक खोलीत कमीतकमी दोन वेगळ्या निर्गमन मार्गांची तरतूद नसेल आणि कारखान्यात कामावर लावलेल्या सर्व व्यक्तींना त्या इमारतीत बाहेर पडण्यास दोन सुरक्षित मार्ग उपलब्ध नसतील, आणि



(ब) बाहेर पडण्याच्या साधनांना लावलेले सर्व दरवाजे व खिडक्या चटकन बाहेरच्या बाजूस उघडतील अशा रचनेच्या नसतील, तर बाहेर जाण्याची साधने पुरेशी आहेत असे मानले जाणार नाही.

२१. सावधगिरीच्या सूचना – (एक) उक्त वस्तुनिर्माण प्रक्रियांपैकी कोणतीही प्रक्रिया चालू असताना कामगारांना जे धोके पत्करावे लागतील त्याचा खुलासा करणाऱ्या सावधगिरीच्या सूचना कारखान्यात कामावर लावलेल्या कामगारांना सहज व सोयीस्कर रीत्या वाचता येतील अशा ठळक ठिकाणी लावल्या पाहिजेत. उक्त सूचना कारखान्यात कामावर लावलेल्या बहुसंख्य कामगारांना समजेल अशा भाषेत छापलेल्या असल्या पाहिजेत.

(दोन) जर कारखान्यात कामावर लावलेली कोणतीही व्यक्ती निरक्षर असेल तर अशा निरक्षर व्यक्तीस त्या सूचनेतील मजकूर काळजीपूर्वक स्पष्ट करून सांगण्याची उपाययोजना केली पाहिजे.

२२. धूर – (अनुसूची १० खंड १७ यातील तरतूद जशीच्या तशी येथे आहे. काहीही फरक नाही.)

## अनुसूची १४

कार्बनडाय सल्फाईड आणि हैड्रोजन सल्फाईड यांची निर्मिती वापर किंवा उद्‌भव अंतर्भूत असलेल्या प्रक्रिया–

१. व्याख्या–या अनुसूचीच्या प्रयोजनासाठी – (अ) (एक) 'श्वसन उपकरण' म्हणजे, ज्यामुळे त्याचा वापर करणारी व्यक्ती विषारी, श्वासावरोधक किंवा क्षोभक वातावरणात नेहमीची हवा घेऊ शकते असे आवश्यक जोडणीसह असलेले शिरोवेष्टन किंवा मुखावरण, किंवा.

(दोन) मुख्य निरीक्षकाने लेखी मान्यता दिलेले इतर कोणतेही योग्य उपकरण.

(ब) 'मायणी' म्हणजे, ज्यात तयार सेल्युलोसच्या लगद्यावर कार्बन डायसल्फाईडची प्रक्रिया करण्यात येते असे भांडे.

(क) 'उमिंग' म्हणजे कार्बन डायसल्फाईड निर्माण करण्याच्या प्रक्रियेत सल्फरपोस्टपासून वितळविलेले गंधक काढून टाकणे.

(ड) 'कार्यजन बहिःसर्जक हवेचा स्रोत' म्हणजे, (अनुसूची १०, खंड १ याच्या (अ) पहा तीच व्याख्या येथे आहे.)

असेल तर, शिरोरेखन यांची तरतूद केली पाहिजे. पुरविण्यात आलेली ही शिले-वेष्टने दररोज धुतली गेली पाहिजेत.

६. हवा खेळती ठेवणे – जेथे चलच्चित्र फिल्म किंवा विषारी आणि ज्वालाग्राही विद्रावक यांचा किंवा दोन्हीही गोष्टींचा वापर केला जातो किंवा त्या हाताळल्या जातात अशा प्रत्येक खोलीत कामाच्या वेळांत त्या खोलीच्या सर्व भागात हवा कायम खेळती राहील अशा रीतीने पुरेशा आकाराच्या प्रवेशद्वारांची व निर्गमन मार्गांची तरतूद केली पाहिजे.

परंतु असे, की चलच्चित्र फिल्म आणि विषारी व ज्वालाग्राही विद्रावक यापासून 'सिलिंडर' तयार करणे, हे सिलिंडर कापून बांगड्या तयार करणे आणि अशा बांगड्यांवर उपरोपचार करणे ही कामे, मुख्य निरीक्षकाने खास सूट दिलेली नसेल, तर वहन झाकलेल्या कुलपा जागेत केली गेली पाहिजेत.

७. चलच्चित्र फिल्म वाळवणे – (१) चलच्चित्र फिल्म पेटेल किंवा विघटित होईल अशा रीतीने ती कोणतेही उघडलेले साधन किंवा तापलेला पृष्ठभाग यांच्या संपर्कात किंवा सान्निध्यात येण्यास प्रतिबंध होण्याजोगी परिस्थिती असल्याखेरीज चलच्चित्र फिल्म वाळवण्याचे काम करता कामा नये.

(२) न गुंडाळलेली मोकळी चलच्चित्र फिल्म वाळवीत असताना तिचा स्फोट झाल्यास, त्यापासून त्या खोलीत काम करणाऱ्या व्यक्तींचे रक्षण होईल अशा रीतीने ती बंद केली पाहिजे.

(३) सुरक्षित ॲसिटेट फिल्मखेरीज इतर न गुंडाळलेल्या मोकळ्या चलच्चित्र फिल्मकरिता वाळविण्याच्या बंद जागेच्या कोणत्याही भागातील उष्णतामान कोणत्याही वेळी १६० फॅ. पेक्षा अधिक असता कामा नये. जेथे असे वाळवण्याचे काम चालते त्या प्रत्येक खोलीत उपलब्ध होईल असे एक उष्णतामापक ठेवले पाहिजे.

(४) कच्ची फिल्म धुतली किंवा इतर रसायनासह उकळण्याचे किंवा बांगड्या व फिल्मपासून तयार केलेल्या इतर वस्तू तापवण्याचे काम खुल्या जागेत केले गेले पाहिजे.

(५) जेथे बांगड्यांवर उपरोपचार केले जातात त्या जागेजवळ पाण्याने भरलेल्या बादल्यांची पुरेशा संख्येत तरतूद केली पाहिजे.

८. कच्चा माल साठवणे – (एक) उक्त वस्तुनिर्माण प्रक्रियेपैकी कोणत्याही प्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या चलच्चित्र फिल्मची प्रत्येक गुंडाळी किंवा तुकडे, चालू असलेल्या कामाकरिता उघडणे आवश्यक असेल त्या वेळीच काढून, एका



वेगळ्या मीट बंद असलेल्या धातूच्या किंवा इतर मान्य धातूच्या बनविलेल्या पेटीत ठेवली पाहिजे.

(दोन) चलच्चित्रपट नियम १९४८, नगरपालिका नियम आणि अमलात असणारे नियम यांस बाधा न पोचविता, प्रत्यक्ष वापरली किंवा हाताळली न जाणारी चलच्चित्र फिल्म एका खोलीत किंवा कपाटात किंवा मुख्य निरीक्षकाने मान्य केलेल्या तत्सम बंद जागेत ठेवली गेली पाहिजे. विषारी व ज्वालाग्राही विद्रावकांचा साठा मान्य जागेत किंवा पात्रात ठेवला पाहिजे.

९. टाकाऊ फिल्मची विल्हेवाट – (एक) टाकाऊ चलच्चित्र फिल्म व तिचे सर्व तुकडे दिवसातून वारंवार गोळा केले पाहिजेत. आणि ज्याचे झाकण आपोआप बंद होते. आणि ज्याच्यावर "टाकाऊ फिल्म" असे स्पष्ट लिहिण्यात आले आहे, अशा धातूच्या मजबूत भांड्यात ठेवले पाहिजेत.

(दोन) या भांड्यात आपोआप पेट घेणारी कोणतीही सामग्री किंवा चलच्चित्र फिल्म पेटवू शकणारी किंवा विघटित करू शकणारी कोणतीही वस्तु ठेवता कामा नये.

(तीन) प्रत्येक दिवसाचे काम संपल्यावर टाकाऊ फिल्म व तिचे तुकडे, एकतर सामान ठेवण्याच्या खोलीत हलविण्यात आले पाहिजेत किंवा कारखान्याच्या जागेतून दुसरीकडे हलविण्यात आले पाहिजेत.

(चार) टाकाऊ फिल्म आणि तिची कात्रणे उघड्या जागेत योग्य ती खबरदारी घेऊन जाळून नष्ट करण्यात आली पाहिजेत. कारखान्याच्या जागेत किंवा त्या जवळपास ती फेकण्यास किंवा पसरविण्यास मनाई केली पाहिजे.

१०. धूम्रपान करण्यास मनाई – (एक) कोणत्याही व्यक्तीस, ज्या खोलीत चलच्चित्र फिल्म हाताळली जाते, वापरली जाते किंवा साठविली जाते अशा खोलीत धूम्रपानास मनाई केली पाहिजे.

(दोन) जेथे चलच्चित्र फिल्म किंवा विषारी आणि ज्वालाग्राही विद्रावक किंवा दोन्हीही साठवले जातात, अशा कोणत्याही खोलीत, उघडा दिवा, दिवा किंवा कोणतेही धूम्रपान साहित्य किंवा आगकाड्या किंवा ज्यामुळे चलच्चित्र फिल्म पेटण्याची किंवा विघटित होण्याची शक्यता आहे. अशी कोणतीही वस्तू आणू देता कामा नये.

परंतु असे, की मुख्य निरीक्षकास, बांगड्यांवरील उपरोपचारासाठी तो लेखी विनिर्दिष्ट करील अशा पद्धतीच्या यथोचित कोळशाची शेगडी वापरण्यास परवानगी देता येईल.

(क) स्फोटक पदार्थ साठवण्यासाठी किंवा ते वाहून नेण्यासाठी वापरावयाचे वीस लीटर किंवा त्यापेक्षा अधिक साठवण क्षमता असलेले आणि पाईप लाईन, व्हॉल्व्ह आणि जोडण्या असलेले प्रत्येक पात्र, त्यामधील कोणताही दोष शोधून काढण्यासाठी दरवर्षी संपूर्णपणे तपासले पाहिजे आणि दोष त्वरित दूर केले पाहिजेत. अशा प्रत्येक तपासणीकरिता एक नोंदवही ठेवली पाहिजे आणि आवश्यक असेल तेव्हा ती निरीक्षकापुढे सादर केली पाहिजे.

११. अग्निनिर्वापके – (फायर एक्स्टिंग्विशर्स) कारखान्यात कोणत्याही जागी साठा केलेल्या रसायनांचे स्वरूप लक्षात घेऊन अशा प्रत्येक जागेच्या जवळ योग्य प्रकारची पुरेशी अग्निनिर्वापके किंवा इतर अग्निशामक साधनसामग्री ठेवली पाहिजे आणि अशा अग्निनिर्वापकांची व अग्निशामक साधनसामग्रीची नेहमी चाचणी घेतली पाहिजे आणि ती परत भरली पाहिजेत. अग्निनिर्वापके किंवा इतर साधन-सामग्री यांचा वापर कसा करावा यासंबंधीच्या स्पष्ट सूचना कामावर लावलेल्या बहुसंख्य कामगारांना समजेल अशा भाषेत मुद्रित करून, प्रत्येक अग्निनिर्वापका-जवळ किंवा इतर साधनसामग्रीजवळ लावल्या पाहिजेत. पुरेशा संख्येतील काम-गारांना अग्निशमनाच्या कामाचे प्रशिक्षण दिले पाहिजे.

१२ सूट – (अनुसूची १० खंड १७ पहा. तीच तरतूद यासाठी येथे आहे. काहीही फरक नाही.)

अनुसूची १९–चलच्चित्राची फिल्म आणि विषारी व ज्वालाग्राही विद्रावक यांपासून बांगड्या व इतर वस्तू तयार करणे –

१. व्याख्या – या अनुसूचीच्या प्रयोजनासाठी (अ) विषारी आणि ज्वाला-ग्राही विद्रावक, म्हणजे– (एक) अॅसिटोन, टेट्राक्लोरिथिन, मद्यार्क, विप्रकृत स्पिरिट, फेनॉल, अॅमिलासायट्रेट, ब्यूटिल अॅसिटेट, डायसेटोन यांसारखे विद्रावक आणि मुख्य निरीक्षकाचे मते जे विषारी आणि ज्वालाग्राही आहेत असे पदार्थ.

(दोन) बांगड्या व सेल्यूलस फिल्मच्या इतर वस्तू तयार करण्यासाठी वापरले जाणारे 'बांगड्यांचे पॉलिश' व "बांगडीचे मिश्रण' अशाच प्रकारचे इतर विद्रावक, मग त्यांचे व्यापारी नाव कोणतेही असो.

(ब) 'निलंबन' म्हणजे ज्या प्रक्रियेत विषारी आणि ज्वालाग्राही विद्रावक वापरले जातात अशा कोणत्याही प्रक्रियेत कामावर लावलेल्या सर्व व्यक्तींना निलंबित करण्याची शक्ती असलेल्या प्रमाणक शल्यचिकित्सकाने आरोग्य नोंदवहीत सही केलेल्या प्रमाणपत्राद्वारे अशा कोणत्याही प्रक्रियेतील कामावरून निलंबन.

(क) 'मान्यता दिलेले' म्हणजे, मुख्य निरीक्षकाने मान्यता दिलेले.



(ड) 'प्रथम नियुक्ती' म्हणजे, या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या कोण-त्याही वस्तु–निर्माण प्रक्रियेतील नियुक्ती आणि अशा वस्तु–निर्माण प्रक्रियेत, सतत तीन कॅलेंडर महिन्यांच्या मुदतीकरिता नियुक्तीत खंड पडल्यानंतर पुन्हा नियुक्ती.

२. प्रयुक्ती – जेथे चलच्चित्राच्या फिल्मपासून किंवा विषारी व ज्वालाग्राही पदार्थांपासून किंवा दोन्हींपासून बांगड्या व इतर वस्तू तयार करण्याची प्रक्रिया (यापुढे उक्त वस्तुनिर्माण प्रक्रिया म्हणून निर्देश केला आहे.) चालविली जाते त्या सर्व कारखान्यांना किंवा त्यांच्या कोणत्याही भागाला ही अनुसूची लागू होईल.

३. स्त्रिया आणि तरुण व्यक्ती यांना कामावर लावण्यासंबंधीत मनाई– (अनुसूची ११ खंड ४ यात जी तरतूद आहे तीच येथे आहे.)

४. वैद्यकीय तपासणी – (१) कोणत्याही व्यक्तीला, तिच्या प्रथम नियुक्तीच्या पूर्वी सात दिवसांच्या आत प्रमाणक शल्यचिकित्सकाकडून तपासणी करण्यात आली नसेल आणि उक्त वस्तु–निर्माण प्रक्रियांपैकी कोणत्याही प्रक्रियेत कामावर लाव-ण्यास ती व्यक्ती योग्य आहे असे प्रमाणित करण्यात आले नसेल तर अशा प्रक्रियेत कामावर लावता कामा नये.

(२) कोणत्याही व्यक्तीला, प्रत्येक कॅलेंडर महिन्यातून कमीत कमी एकदा किंवा मुख्य निरीक्षक जेव्हा विनिर्दिष्ट करील अशा अंतराने तिची प्रमाणक शल्य-चिकित्सकाकडून पुन्हा तपासणी झाली नसेल तर, उक्त वस्तु–निर्माण प्रक्रियांपैकी कोणत्याही प्रक्रियेत कामावर लावता कामा नये.

(३) प्रमाणक शल्यचिकित्सकाने उक्त वस्तु–निर्माण प्रक्रियांपैकी कोणत्याही प्रक्रियेत कामावर असलेल्या व्यक्तींची तपासणी सर्व संबंधितांना आगाऊ सूचना देऊन केली पाहिजे.

(४) उक्त वस्तु–निर्माण प्रक्रियांपैकी कोणत्याही प्रक्रियेत कामावर लावलेल्या व्यक्तींची नावे अंतर्भूत असलेली नमुना ७ मधील एक आरोग्य नोंदवही ठेवण्यात आली पाहिजे.

(५) कोणत्याही व्यक्तीस, निलंबनानंतर, आरोग्य नोंदवहीत दाखल केलेल्या किंवा तिला बोलण्यात आलेल्या प्रमाणक शल्यचिकित्सकाच्या लेखी मंजुरीशिवाय कामावर लावले जाणार नाही.

५. संरक्षक कपडे – कब्जेदाराने, कारखान्यात कामावर असलेल्या सर्व कामगारांच्या उपयोगासाठी संरक्षक कपडे पुरविले पाहिजेत आणि ते चांगल्या स्थितीत ठेवले पाहिजेत आणि संबंधित कामगारांनी त्यांचा वापर केला पाहिजे. संरक्षक कपड्यात योग्य अॅप्रन आणि मुख्य निरीक्षकाच्या मतानुसार आवश्यक

स्वसन यंत्रे यांची तरतूद केली पाहिजे आणि ती दुरुस्त व स्वच्छ स्थितीत ठेवली पाहिजेत.

(ब) पुरविण्यात आलेली संरक्षक साधनसामग्री कोणतेही क्षारक काम करावयास लावलेल्या प्रत्येक व्यक्तीने वापरली पाहिजे.

४. पाण्याच्या सोयी – जेथे कोणतेही क्षारक काम करण्यात येत असेल, अशा कामाच्या जागेच्या शक्य तितक्या जवळ २ मीटर उंचीवर २५ मि. मीटर व्यासाच्या व त्वरित काम देणारा हॉल्व्ह जोडलेल्या नळाद्वारे पाणी पुरवठ्याची किंवा लांबी २०० से मी; रुंदी १२९ सें. मी व खोली ६० सें. मी. पेक्षा कमी नसेल अशा आकाराची किंवा मुख्य निरीक्षक, कारखाने याने मान्यता दिलेल्या आकाराची, स्वच्छ पाण्याने भरलेली सुरक्षा टाकी जमिनीच्या पातळीस ठेवण्याची तरतूद केली पाहिजे. त्यामुळे एखाद्या कामगारास कोणत्याही क्षारक पदार्थामुळे इजा झाल्यास इजा झालेल्या भागावर पाण्याचा भरपूर मारा करता येईल.

५. सावधगिरीची सूचना – खाली विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात व कारखान्यात कामावर लावलेल्या बहुसंख्य कामगारांना समजेल अशा भाषेत छापलेली एक सावधगिरीची सूचना कोणतीही क्षारक कामे चालू असतील अशा जागेजवळ, कामगारास सहज व सोयीस्करपणे वाचता येईल अशा ठळक ठिकाणी लावली पाहिजे. जर एखादा कामगार निरक्षर असेल, तर त्यास अशा लावलेल्या सूचनेतील मजकूर काळजीपूर्वक समजावून देण्यासाठी परिणामकारक उपाययोजना केली पाहिजे.

[सावधगिरीची सूचना धोका–

क्षारक पदार्थामुळे त्वचा भाजून फार मोठी इजा होते आणि त्याची वाफ अतिशय धोक्याची असते. संरक्षक आवरणे वापरा.

क्षारक पदार्थास स्पर्श झाल्यास तात्काळ त्या इजा झालेल्या भागावर निदान १५ मिनिटे भरपूर पाणी सोडा. त्वरित वैद्यकीय मदत घ्या.]

६. वाहतूक – (अ) क्षारक पदार्थ पात्राशिवाय, अन्यथा भरता कामा नयेत, हलविता कामा नयेत किंवा वाहून नेता कामा नयेत आणि जेव्हा ते वाहून न्यावयाचे असतील तेव्हा पात्रे निर्धोक बांधणीच्या आणि पुरेशा मजबूत असलेल्या पेटीत ठेवलेली असतील.

(ब) १० किंवा त्यापेक्षा अधिक लीटर क्षारक पदार्थ ज्यात राहू शकतात अशी पात्रे एका भांड्यात किंवा पेटीत ठेवली पाहिजेत आणि ही वाहून नेण्याकरिता रबराची चाके असलेली गाडी वापरण्यात येत नसेल तर एकाहून अधिक व्यक्तींनी कमरेपेक्षा कमी उंचीवरून वाहून नेली पाहिजेत.



(क) क्षारक पदार्थांच्या पात्रांवर तथा स्पष्ट खुण–चिठ्ठया लावल्या पाहिजेत.

७. क्षारक पदार्थ हाताळण्याकरिता साधने – (अ) क्षारक पदार्थ असलेले खुजे किंवा मोठ्या बाटल्या आणि इतर पात्रे रिकामी करण्याकरिता योग्य अशा कललेल्या किंवा उचलत्या साधनांचा वापर केला पाहिजे.

(ब) क्षारक पदार्थ उघड्या हाताने हाताळता कामा नयेत. ते हाताळताना लांब दांडीच्या पळीचा वापर केला पाहिजे.

८. व्हॉल्व्हज् उघडणे – क्षारक पदार्थ असलेल्या पात्रांना जोडलेले जे व्हॉल्व्हज् सुरळीत चालत नसतील ते व्हॉल्व्हज् जोर करून उघडता कामा नयेत. ह्या प्रयोजनाकरिता योग्य प्रशिक्षण घेतलेल्या कामगाराकडूनच ते उघडण्यात आले पाहिजेत.

९. टाक्या, ऊर्ध्वपातन यंत्रे वगैरे साफ करणे – (अ) क्षारक पदार्थ ठेवण्यासाठी वापरलेली ऊर्ध्वपातन यंत्रे किंवा इतर मोठ्या कोठ्या साफ करताना किंवा त्यातील उर्वरित भाग काढून टाकताना असिन्युरेटेड हैड्रोजन (आर्सीन) निर्माण होण्यास प्रतिबंध व्हावा यासाठी लाकडी साधने वापरली पाहिजेत.

(ब) जेव्हा जेव्हा कोणत्याही कामगारास क्षारक पदार्थ साठवण्यासाठी वापरलेल्या कोठ्या किंवा टाक्या यासारख्या बंदिस्त जागेत, साफसफाईसाठी किंवा परिरक्षणाच्या अन्य कामासाठी प्रवेश करावयाचा असेल तेव्हा तेव्हा त्या कामगाराच्या सुरक्षिततेसाठी अधिनियमाच्या कलम ३६ खाली आवश्यक असलेल्या शक्य त्या सर्व सावधगिरीच्या उपाययोजना केल्या गेल्या पाहिजेत.

(क) ज्या साधनातून क्षारक पदार्थ हाताळले गेले असतील अशा साधनाच्या कोणत्याही भागाची दुरुस्ती हाती घेण्यापूर्वी असे साधन किंवा त्याचा कोणताही भाग यांना चिकटलेला क्षारक पदार्थ यथोचित पद्धतीने काढून टाकला पाहिजे.

१०. साठवण – ज्यांची क्षारक पदार्थावर जबरदस्त प्रतिक्रिया होईल किंवा ज्यांच्या आकस्मिक मिश्रणामुळे विषारी धूम किंवा वायू निर्माण होईल अशी इतर रसायने, उदाहरणार्थ– टर्पेन्टाईन, कार्बाइड्स, धातूची भुकटी, ज्वालाग्राही पदार्थ, सायनाईड क्षार, क्षारक पदार्थाबरोबर त्याच खोलीत साठवता कामा नये.

(ब) उपरी–टाक्या, पात्रे, मोठी पिंपे, आणि इतर पात्रे भरणे किंवा पंपाने उपसून काढणे यांची अशा तऱ्हेने व्यवस्था केली पाहिजे, की त्यामुळे क्षारक पदार्थ वाहून जाण्याची व कोणत्याही व्यक्तीस इजा पोहोचण्याची शक्यता असणार नाही.

क्लोरोनीटेड संयुगे, एकदा किंवा अनेकदा नवीकरण झालेले नेप्थालीन्स, अनिलीन आणि यांचे सजातीय पदार्थ (टोल्युडीन, झायलिडीन, क्युमिडीन) अॅनिसिडीना फेनेटिडीन आणि त्यांची क्लोरिनेटेड, नैट्रेटेड, आणि अॅल्किलेटेड संयुगे डिमेथायलाॅनिलिन, टोल्यूलेन्या, वामिन टोल्युडीन, फिनिलहायड्रॉमिन, टोल्युइलहायड्रॉमिन.)

## परिशिष्ट ब

(परिच्छेद २, १३, १५, २५ आणि २६ पहा)

अल्फा–नेप्थीलेमिन बीटानेप्थीलेमिन बेंझेडीन व त्याचे क्षार डायनिसिडीन टोलिडीन डिक्लोरोबेन्झिडीन

## परिशिष्ट क

(परिच्छेद ३ पहा)

सावधगिरीचा सूचना फलक – कामगारांस सल्ला–

(१) नायट्रो आणि अॅमिनो संयुगे किंवा अॅरोमॅटिक हायड्रोकार्बन हे धोकादायक आहेत. ह्या कारखान्यात तुम्हाला ती वारंवार हाताळावयाची आहेत.

(२) तुमच्या आरोग्याच्या दृष्टीने पुरविण्यात आलेल्या सर्व संरक्षक कपड्यांचा वापर करावा.

(३) सर्व वेळी काळजीपूर्वक स्वच्छता राखा. भोजनापूर्वी हात आणि पाय स्वच्छ धुवा. कारखान्यातून बाहेर पडण्यापूर्वी स्नान करणे आवश्यक आहे आणि डोके-नीट धुण्याची दक्षता घ्या.

(४) जर एखादे रसायन तुमच्या शरीरावर सांडले तर ते तात्काळ साबणाने व पाण्याने धुऊन काढा. तायनोटिक नायट्रो किंवा अॅमिनो संयुगाने तुमचे कपडे खराब झाले तर ते तात्काळ बदला. नियुक्त डॉक्टरांची तात्काळ भेट घ्या.

(५) उघड्या हातांनी कोणतेही नायट्रो किंवा अॅमिनो संयुग हाताळू नका. लांब दांड्याच्या पळीचा वापर करा.

(६) मद्यार्कयुक्त पेये पिण्याचे शक्य तो टाळा. कारण त्यापासून विषबाधा होण्याचा धोका आहे.

(७) आजारी पडल्यास कारखान्याच्या व्यवस्थापकास किंवा नियुक्त डॉक्टरास भेटा.

(८) कामाच्या खोलीत किंवा हात खराब असताना काहीही चघळू नका, खाऊ नका, पिऊ नका किंवा धूम्रपान करू नका. कामाच्या जागेपासून अन्न आणि पेय दूर ठेवा.



(९) जर तुम्ही बिटानॅप्थोलेमिन किंवा बेन्झिन किंवा त्याचे क्षार अल्फा-नेप्थीलेमिन किंवा डायनिसिडीन हे पदार्थ घेऊन काम करीत असाल तर–

(अ) तुमचे शरीर, कपडे, यंत्रसामग्री आणि हत्यारे संपूर्णपणे स्वच्छ ठेवण्याची तुम्ही काळजी घेतली नाही तर काही वर्षांनंतर त्याचे गंभीर परिणाम होतील हे लक्षात ठेवा.

(ब) भोजनाच्या वेळी चेहरा व हात, त्यावरील रसायने काढून टाकण्यासाठी साबणाने व पाण्याने दोनदा सर्व धुवा, जेवताना लांब हाताचा स्वच्छ ब्रश वापरा.

(क) कारखान्यातून बाहेर पडण्यापूर्वी साबण आणि पाणी दोनदा वापरून स्नान करा, त्यानंतर तुमचे घरी जाण्याचे कपडे घाला.

## अनुसूची १२

स्फोटक पदार्थ हाताळणे आणि हाताने तयार करणे

१. व्याख्या – या अनुसूचीच्या प्रयोजनासाठी–

(अ) ' क्षारक पदार्थ ' म्हणजे, गंधकाम्ल, नत्राम्ल, हायड्रोक्लोरिक आम्ल, हायड्रोफ्लुरिक आम्ल, किंवा कार्बोलिक आम्ल, फॉस्फोरीक आम्ल, लिक्विड क्लोरीन, लिक्विड ब्रोमिन, अमोनिया किंवा हायड्रस लिक्विड अमोनिया, सोडीयम हायड्रोक्सिाईड, किंवा पोटॅशियम हायड्रोक्सिाईड किंवा त्यांची मिश्रणे किंवा राज्यशासन शासकीय राजपत्रात अधिसूचनेद्वारा क्षारक पदार्थ म्हणून विनिर्दिष्ट करील असे इतर क्षारक पदार्थ.

(ब) ' क्षारक कामे ' म्हणजे, कारखान्यात कोणताही क्षारक पदार्थ तयार करणे, साठवणे, हाताळणे, त्यावर प्रक्रिया करणे तो आवेष्टित करणे किंवा त्याचा वापर करणे.

२. जमीन – ज्या कारखान्यास ही अनुसूची लागू होते अशा कारखान्यातील प्रत्येक कामाच्या खोलीची जमीन जलाभेद्य, क्षारण आणि आग प्रतिबंधक सामानाची बनवली पाहिजे आणि क्षारक पदार्थ जमा होण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने तिची रचना केली पाहिजे. अशा जमिनीचा पृष्ठभाग गुळगुळीत असला पाहिजे व ती शक्य ती वारंवार धुवून स्वच्छ केला पाहिजे व सुस्थितीत ठेवला पाहिजे.

३. संरक्षक साधन सामग्री – (अ) कब्जेदाराने, कोणताही क्षारक कामावर लावलेल्या सर्व व्यक्तींच्या उपयोगासाठी योग्य अशी संरक्षक हस्तावरणे व पादत्राणे, योग्य अॅप्रन्स, मुखावरणे, रसायनापासून संरक्षक गॉगल्स आणि योग्य

उभा नळ असला पाहिजे. अशा तोटया किंवा उभे नळ एकमेकांपासून १२० सेंटीमीटरपेक्षा कमी नाही इतक्या अंतरावर असले पाहिजेत. तसेच साबण व स्वच्छ टॉवेल यांचा पुरेसा पुरवठा केला पाहिजे.

७. संरक्षक साधनसामग्री (१) खालील तक्त्यात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे कब्जेदाराने संरक्षक कपडे व इतर साधनसामग्री यांची तरतूद केली पाहिजे व ती स्वच्छ आणि दुरुस्त स्थितीत ठेवली पाहिजे.

तक्ता

| प्रक्रिया | संरक्षक कपडे व इतर साधन सामग्री |
|---|---|
| (१) | (२) |
| (१) रमिंग | ओव्हरॉल, मुखावरणे, योग्य साहित्यापासून बनवलेले हातमोजे आणि पादत्राणे. |
| (२) कताई | योग्य अॅप्रन आणि हातमोजे |
| (३) विस्फोटक द्रव्यांशी संबंधित अथवा संवेष्ट पॅक करणाऱ्या प्रक्रिया | योग्य हातमोजे व पादत्राणे |
| (४) कोणतीही इतर प्रक्रिया | मुख्य निरीक्षकाने लेखी आदेशाद्वारे विनिर्दिष्ट केलेले संरक्षक कपडे व साधन सामग्री. |

(२) कब्जेदाराने, प्रत्येक दिवसाचे काम संपण्याचे वेळी, सर्व संरक्षक साधनसामग्री तपासण्याची व ती स्वच्छ करण्याची व आवश्यक असेल तेव्हा, ती दुरुस्ती करण्याची किंवा बदलण्याची व्यवस्था केली पाहिजे.

८. संरक्षक साधनसामग्रीचा वापर – परिच्छेद ७ अनुसार पुरविण्यात आलेल्या संरक्षक साधनसामग्रीचा प्रत्येक व्यक्तीने वापर केला पाहिजे.

९. संरक्षक साधनसामग्रीची साठवण – कामगारांना पुरविण्यात आलेली सर्व संरक्षक साधनसामग्री साठविण्यासाठीच केवळ एखादी खोली, खोल्या किंवा कुलपाचे खण यांची तरतूद केली पाहिजे. आणि अशा प्रकारची साधनसामग्री ठेवण्यासाठी दिलेली खोली, खोल्या किंवा कुलपाचे खण या व्यतिरिक्त इ. अन्य कोणत्याही ठिकाणी ठेवता कामा नये.

१०. भोजनगृह – (१) जेवणाच्या मध्यंतरात कारखान्याच्या आतील राहणाऱ्या सर्व व्यक्तींच्या उपयोगासाठी, दरडोई कमीत कमी १०,००० चौरस



सेंटीमीटर जागेची सोय असेल अशा योग्य भोजनगृहाची तरतूद केलेली असली पाहिजे. आणि तेथे खालील सोयी असल्या पाहिजेत.

(अ) पुरेशी टेबले व खुर्च्या किंवा पाठ टेकण्याची सोय असलेली बाके.

(ब) भांडी व हात धुण्याची सोय, आणि—

(क) अन्न गरम करण्याची पुरेशी साधने,

(२) भोजनगृह हे जबाबदार व्यक्तीच्या प्रभाराखाली असले पाहिजे आणि ते स्वच्छ ठेवला पाहिजे.

११. कार्बन डायसल्फाईड धूम प्रक्रिया खोलीत धूम्रपान इत्यादीबाबत मनाई– जेथे कार्बन डायसल्फाईड निर्माण करणारी धूम प्रक्रिया केली जात असेल अशा खोलीत कोणत्याही व्यक्तीने धूम्रपान करता कामा नये किंवा आगपेटी, विस्तव किंवा उघडा दिवा किंवा खुला प्रकाश किंवा ठिणगी निर्माण करणारे कोणतेही साधन बरोबर नेता कामा नये आणि धूम्रपान करण्यास व आगपेट्या, विस्तव किंवा खुला दिवा किंवा खुला प्रकाश किंवा ठिणगी निर्माण करणारे इतर साधन अशा खोलीत बरोबर नेण्यास मनाई करणारी एक सूचना बहुसंख्य कामगारांना समजेल अशा भाषेत, कारखान्यात लावली पाहिजे.

परंतु असे की विस्तव, खुला दिवा किंवा खुला प्रकाश किंवा ठिणगी निर्माण करणारे इतर साधन हे, जेव्हा त्या प्रक्रियेसाठीच आवश्यक असेल तेव्हाच फक्त अर्हताप्राप्त पर्यवेक्षकाच्या निर्देशानुसार अशा खोलीत बरोबर नेता येईल.

१२. धूम प्रक्रिया खोलीत राहण्यास मनाई – जेथे धूम प्रक्रिया चालू असेल अशा खोलीत कोणत्याही व्यक्तीने आपल्या भोजनाच्या किंवा विश्रांतीच्या मध्यंतरात राहता कामा नये.

१३. वैद्यकीय तपासणी – (१) धूम प्रक्रियेत कामावर असलेल्या प्रत्येक व्यक्तीची वैद्यकीय तपासणी कारखान्याच्या वैद्यकीय अधिकाऱ्याकडून दर सहा महिन्यांतून एकदा आणि प्रमाणक शल्य चिकित्सकाकडून बारा महिन्यांतून एकदा तरी किंवा मुख्य निरीक्षक लेखी विनिर्दिष्ट करील त्या अंतराने, अशा सर्व व्यक्तींना बाबची सूचना दिलेल्या तारखेस किंवा तारखांना घेतली गेली पाहिजे. आणि अशी तपासणी कारखान्याच्या आतीलच घेतली पाहिजे.

(२) धूम प्रक्रियेत कामावर असलेल्या प्रत्येक व्यक्तीने अशा तपासणीसाठी नेमलेल्या वेळी हजर राहिले पाहिजे.

(३) धूम प्रक्रियेत कामावर असलेल्या सर्व व्यक्तींच्या नावाची नोंद असलेली आरोग्य नोंदवही नमुना ७ मध्ये राखली पाहिजे.

(४) निलंबनानंतर, आरोग्य नोंदवहीतील प्रमाणक शल्यचिकित्सकाच्या लेखी मंजुरीशिवाय कोणत्याही व्यक्तीची धूम प्रक्रियेत पुनर्नियुक्ती करता कामा नये.

१४. श्वसन उपकरण संच आणि उपाय – (१) जेथे धूम प्रक्रिया चालू असेल अशा प्रत्येक कारखान्यात खालील वस्तूंची तरतूद करून त्यांचा पुरेसा पुरवठा केला पाहिजे.

(अ) श्वसन उपकरणसंच,

(ब) प्राणवायु आणि तो वापरण्याची योग्य साधने आणि

(क) आपरक्षक पट्टे.

(२) (एक) श्वसन उपकरण संच आणि इतर उपयंत्रे, ही–

(अ) सुस्थितीत ठेवली पाहिजेत आणि ती उपचार खोलीत किंवा सहज मिळू शकतील अशा जागी ठेवली पाहिजेत.

(ब) कब्जेदाराने लेखी नियुक्त केलेल्या सक्षम व्यक्तीद्वारे करण्यात आली पाहिजे.

(२) श्वसन उपकरण संच आणि इतर उपयंत्रे यांच्या स्थिती संबंधीची नोंद त्या प्रयोजनासाठी पुरविण्यात आलेल्या पुस्तकात केली पाहिजे आणि निरीक्षकास आवश्यक वाटेल तेव्हा त्यांच्या तपासणीसाठी प्रस्तुत केली पाहिजे.

(३) श्वसन उपकरणसंच व श्वसन यंत्रे यांचा वापर करणे आणि कृत्रिम श्वासोच्छ्वास करणे याबाबतचे प्रशिक्षण आणि नियतकालिक उजळणी पाठ्यक्रम पुरेशा कामगारांना देण्यात आले पाहिजे, म्हणजे कारखान्याच्या कामाच्या तासात सर्व वेळी प्रत्येक धूम प्रक्रिया खोलीत अशा प्रकारच्या कमीत कमी दोन प्रशिक्षित व्यक्ती उपलब्ध होतील.

(४) श्वसन यंत्रे ही स्वच्छ, कोरड्या आणि प्रकाशरोधक कपाटात योग्य नामपत्रिका लावून ठेवली पाहिजेत आणि जर त्यावर धुमाचा परिणाम होण्याची शक्यता असेल तर ती योग्य पात्रात ठेवून संरक्षित केली पाहिजेत. वापरल्यानंतर श्वसनयंत्रे कोरडी केली पाहिजेत व ठराविक काळाने निर्जंतुक केली पाहिजेत.

१५. सावधगिरीचा सूचना फलक – मुख्य निरीक्षकाने विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यातील व कामावर लावलेल्या बहुसंख्य कामगारांना समजेल अशा भाषेत छापलेल्या सावधगिरीचा सूचनाफलक कारखान्यातील कामगारांना सहज व सोयिस्करपणे वाचता येईल अशा प्रमुख ठिकाणी लावला पाहिजे आणि कब्जेदाराने



धूम प्रक्रियेत कामावर असलेल्या सर्व कामगारांना तेथील त्यांच्या कामामुळे आरोग्याला होणारे धोके आणि त्यांनी स्वतःच्या संरक्षणासाठी योजण्याचे सर्वोत्तम प्रतिबंधक उपाय व पद्धती यांची ठराविक मुदतीने माहिती करून देण्याची व्यवस्था केली पाहिजे.

१८. सूट – (अनुसूची १२ खंड १२ पहा. त्यातील तरतूद व ही तरतूद सारखीच आहे.)

**अनुसूची १५ घातक कीटक नाशकांची निर्मिती व हाताळणी–**

१. व्याख्या – या अनुसूचीच्या प्रयोजनासाठी –

(अ) 'कीटक नाशके' म्हणजे, घातुक जीवजंतू नष्ट करण्यासाठी किंवा त्यांची वाढ किंवा संख्यावाढ रोखण्यासाठी वापरली जाणारी कारणे.

(ब) 'घातक कीटकनाशके' म्हणजे कीटकनाशके किंवा मिश्रणे किंवा या अनुसूचीला जोडलेल्या परिशिष्ट १ मध्ये घातक कीटकनाशकांच्या सूचीमध्ये समाविष्ट केलेली कीटकनाशके आणि मुख्य निरीक्षकाने घातक कीटकनाशक म्हणून जाहीर केलेली कोणतीही इतर विशिष्ट वस्तू–

(क) 'निलंबन' म्हणजे,–(अनुसूची १४ खंड (१) व्याख्या यातील उपखंड (ग) 'निलंबन' ही व्याख्या पहा. तीच व्याख्या येथे घ्यावी.)

(ड) 'प्रथम नियुक्ती' म्हणजे–(अनुसूची १३ खंड (१) व्याख्या यातील उपखंड (ड) पहा– तीच व्याख्या येथे घ्यावी.)

(इ) 'कार्यक्षम बहि:सर्जन हवेचा स्रोत' म्हणजे, (अनुसूची १४ खंड १ व्याख्या उपखंड (ग) पहा तीच व्याख्या येथे घ्यावी.)

(फ) 'हाताळणे' म्हणजे, एखादे घातक कीटकनाशक मिसळणे, संनिश्चित करणे, भरणे, रिकामे करणे, आवेष्टित करणे, त्याची ने-आण करणे किंवा वापरणे.

२. प्रयुक्ती – (अनुसूची १३ खंड २ पहा–तीच तरतूद या अनुसूचीला अनुसरून व त्या संदर्भात येथे घ्यावी.)

३. सावधगिरीचा सूचना फलक – अनुसूची १४ खंड १५ यातील तरतूद व यातील तरतूद सारखीच आहे.)

४. स्त्रिया व तरुण व्यक्ती यांना कामावर लावण्यास मनाई – (अनुसूची १३ खंड ३ यातील तरतूद व तेथील तरतूद सारखीच आहे.)

५. हवेची जागा – जेथे उक्त वस्तुनिर्माण प्रक्रिया चालविली जाते अशा प्रत्येक खोलीत, यंत्रसामग्री किंवा इतर कोणत्याही वस्तू यांनी व्यापलेली कोणतीही जागा सोडून, तेथे कामावर लावलेल्या कोणत्याही व्यक्तीकरिता कमीतकमी १५

घनमीटर हवेची जागा असली पाहिजे आणि या जागेची गणना करताना ३.५ मीटरवरील उंची हिशेबात धरता कामा नये.

६ कार्यक्षम बहिःसर्जक हवेच्या स्रोताशिवाय उक्त वस्तुनिर्माण प्रक्रियेस मनाई – उक्त वस्तु निर्माण प्रक्रिया जेव्हा –

(अ) घातक कीटकनाशक ठेवलेले पात्र रिकामे केले जाते, किंवा

(ब) घातक कीटकनाशक पात्रात, टाकीत, हॉपरमध्ये किंवा यंत्रामध्ये सोडले जाते. किंवा लहान आकाराच्या पुडक्यात भरले जाते, किंवा

(क) घातक कीटकनाशकापासून भुकटी किंवा द्रव तयार केला जातो, किंवा

(ड) घातक कीटकनाशकाचे संमिश्रण केले जाते तेव्हा कार्यक्षम बहिःसर्जक हवेच्या स्रोताचा वापर केल्याशिवाय चालविला जाता कामा नये.

७. कामाच्या खोलीची जमीन – जेथे उक्त वस्तुनिर्माण प्रक्रिया चालविली जाते अशा प्रत्येक कामाच्या खोलीची जमीन –

(अ) गुळगुळीत आणि जलाभेद्य होण्यासाठी सिमेंटची किंवा त्यासारख्या इतर साहित्यापासून बनविली पाहिजे.

(ब) सुस्थितीत ठेवली पाहिजे.

(क) उताराची असली पाहिजे आणि सांडपाणी वाहून जाण्यासाठी पुरेशी गटारे असली पाहिजेत आणि

(ड) रबरी नळीचा वापर करून दररोज संपूर्णपणे धुतली पाहिजे.

८. कामे करण्याची बाके – ज्यावर घातक कीटकनाशक हाताळले जाते अशी कामाची बाके–

(अ) गुळगुळीत पृष्ठभाग असलेली आणि अशोषक साहित्यापासून विशेषतः स्टेनलेस स्टीलपासून बनविलेली असली पाहिजेत; आणि

(ब) दररोज स्वच्छ केली पाहिजेत.

९. टाकाऊ पदार्थ – (अ) घातक कीटकनाशकाने भरलेले कपडे, कागद किंवा इतर साहित्य साठवण्यासाठी घट्ट झाकण असलेल्या एका योग्य पात्राची तरतूद केली पाहिजे.

(ब) अशा प्रकारचे सर्व दूषित टाकाऊ पदार्थ आठवड्यातून एकदा जाळून नष्ट करण्यात आले पाहिजेत.

१०. घातक कीटकनाशकांसाठी – वापरण्यात आलेली रिकामी पात्रे–अशी पात्र नष्ट केली पाहिजेत. किंवा त्यातील पदार्थ संपूर्णपणे धुवून स्वच्छ केली पाहिजेत आणि टाकून देण्यापूर्वी त्यातील पदार्थ निष्क्रिय करणाऱ्या वस्तूचा वापर केला पाहिजे.



११. प्रत्यक्ष हाताळणी – लांब दांड्याच्या पळीखेरीज घातक कीटकनाशका-बाबत हाताचा वापर करण्यास सांगता कामा नये किंवा परवानगी देता कामा नये.

१२. संरक्षक कपडे – (१) सर्व कामगारांना संरक्षक कपडे पुरविले पाहिजेत आणि ते सुस्थितीत ठेवले पाहिजेत आणि असे कपडे संबंधित कामगाराने अंगावर घातले पाहिजेत. संरक्षक कपड्यांत खालील कपड्यांचा समावेश असेल–

(अ) लांब विजारी, लांब हाताचे शर्ट, किंवा ओव्हरऑल्स आणि शिरोवेष्टने-

(ब) रबरी हातमोजे, गम बूट, रबरी ॲप्रन, रसायनापासून संरक्षक गॉगल आणि श्वसन यंत्रे, कीटकनाशकांत तेल असेल तेव्हा रबरी हातमोजे, बूट आणि ॲप्रन ही कृत्रिम रबराचे असले पाहिजेत.

(२) कामगारास–

(अ) जेथे फॉस्फरस किंवा निकोटीन अंतर्भूत असलेले घातक कीटकनाशक हाताळावे लागते तेथे संरक्षक कपडे आतून आणि बाहेरून स्वच्छ केले पाहिजेत. आणि उप-परिच्छेद (१) च्या खंड (अ) मध्ये नमूद केलेले कपडे अशा कीटक-नाशकांनी खराब झाले तर ते तात्काळ बदलण्यात आले पाहिजेत.

(ब) फॉस्फरस किंवा निकोटीन नसलेले घातक कीटकनाशक हाताळावे लागते तेव्हा, उपपरिच्छेद (१) च्या खंड (अ) मध्ये नमूद केलेले संरक्षक कपडे वारंवार धुतले पाहिजेत.

१३. वैद्यकीय तपासणी – (अनुसूची १३ खंड ४ पहा. ती तरतूद व येथील तरतूद सारखी आहे.)

१४. वैद्यकीय सोयी – (१) कब्जेदाराने घातक कीटकनाशके हाताळणाऱ्या कामावर अत्यधिक शोषणाचे होणारे परिणाम टाळण्यासाठी जो त्यांची आठवड्या-तून कमीत कमी एकदा तपासणी करील व आवश्यक असेल तर कारखान्याच्या जागेतच त्यांच्यावर उपचार करील अशा अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीची नेमणूक केली पाहिजे. निकडीच्या प्रकरणात अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायी त्वरित उपलब्ध व्हावा म्हणून कब्जेदाराने आवश्यक ती व्यवस्था केली पाहिजे.

(२) घातक कीटकनाशकांच्या अत्यधिक शोषणावरील उपचारासाठी आवश्यक असलेले उतारे आणि इतर सामग्री यांचा समावेश असलेल्या औषधांची तरतूद कब्जेदाराने केली पाहिजे.

(३) अशा प्रकारे करण्यात आलेल्या तपासणीची आणि उपचारांची नोंद, मुख्य निरीक्षकाने मान्यता दिलेल्या नमुन्यात ठेवली पाहिजे आणि ती निरीक्षकास तपासणीसाठी उपलब्ध करून दिली पाहिजे.

१५. धुण्यासाठी टाळण्याचा वेळ – (अनुसूची १२ खंड १३ पहा. ती तरतूद व ही तरतूद सारखी आहे.)

१६. धुण्याच्या आणि स्नानाच्या सोयी – (१) कामावर लावलेल्या सर्व व्यक्तींच्या उपयोगासाठी अशा प्रत्येक ५ व्यक्तींसाठी एक या प्रमाणात पाण्याचा सतत पुरवठा असलेल्या आणि आच्छादन असलेल्या धुण्याच्या व स्नानाच्या पुरेशा जागांची तरतूद केली पाहिजे व या जागा स्वच्छ व दुरुस्त स्थितीत ठेवल्या पाहिजेत.

(२) धुण्याच्या जागी, एक मीटरपेक्षा कमी नाही अशा अंतरा-अंतराने उभे नळ असले पाहिजेत.

(३) एकूण धुण्याच्या जागांपैकी अर्ध्यापेक्षा कमी नाही इतक्या जागावर स्नानाची सोय असली पाहिजे.

(४) शोष्य साहित्यापासून बनविलेल्या पुरेशा टॉवेलांचा पुरवठा केला पाहिजे.

परंतु असे, की निरीक्षकाने तसा आदेश दिल्यास प्रत्येक कामगारास असा एकेक टॉवेल दिला पाहिजे.

(५) साबण आणि नखे साफ करण्याचे ब्रुशले यांचा पुरवठा केला पाहिजे.

१७. कामाच्या खोलीत अन्नपदार्थ, पेये वगैरेस मनाई – (अनुसूची १२ खंड १७ ची तरतूद व येथील तरतूद सारखी आहे.)

१८. प्रसाधन कक्ष – (अनुसूची १० खंड ११ यातील तरतूद व येथील तरतूद सारखी आहे.)

१९. भोजनगृह (अनुसूची ११, खंड २० यातील तरतूद आणि येथील तरतूद सारखी आहे.)

२०. सूट (अनुसूची १० खंड १७ यातील तरतूद व येथील तरतूद सारखी आहे.)

२१. (कीटनाशके) न हाताळणे – अनुसूचीच्या परिशिष्टाच्या (१) मध्ये नमूद केलेल्या कीटनाशकाहून अन्य कीटनाशके त्यांच्या घातक स्वरूपासंबंधी किंवा मुख्य निरीक्षकाकडून प्रमाणपत्र असल्याखेरीज कोणत्याही कारखान्यात हाताळता येणार नाही.



## परिशिष्ट– १

घातक कीटनाशकांची यादी–

| | | |
|---|---|---|
| | डायझिनॉन | हेक्सॉथिल टेट्राफॉस्फेट |
| पाथिऑन | | |
| टेट्राथोक पायरोफॉस्फेट | टेट्राथिल डिथ्रोओपायरो फॉस्फेट | डेमेटॉन (सिस्टॅक्स) |
| एन्ड्रान (ओ.एम्.पी.आर.) | पॅरा ऑक्सन (इ.६०९) | मेथिल पॅराथिआन |
| डिमेफॉक्स | सल्फोटेप | इपीएन |
| निकोटीन किंवा त्याची संयुगे | मरक्यूरी संयुगे | मेथिल ब्रोमाईड |
| सायनाईड्स | क्लोरडेन | एनड्रीन |
| अल्ड्रीन | डेल्ड्रीन | हेक्साफेन |
| डिनिट्रो–ओ–क्रेसॉल | आरसेनिकल संयुगे | फ्लोराईड |
| पेन्टाक्लोरोफिनॉल | | |

## परिशिष्ट–२

सावधगिरीचा सूचना फलक–

१. कीटनाशके सर्वसाधारणपणे विषारी पदार्थ असतात.

२. म्हणून, ज्या खोल्यांत ते हाताळले जातात, तेथे–

(अ) भक्षण करू नये, धाऊ नये, पिऊ नये, अथवा धूम्रपान करू नये. खाद्यपदार्थ व पेये कीटनाशकांपासून दूर ठेवावीत.

(ब) हातमोजे, ॲप्रन, कपडे, बूट इत्यादी पुरविण्यात आलेली संरक्षक आवरणे वापरावीत.

३. जेवण्यापूर्वी अथवा शरीराच्या कोणत्याही भागाचा कीटनाशकाशी संपर्क आला असल्यास, तो भाग साबू व पाण्याने स्वच्छ धुवावा.

४. कारखाना सोडण्यापूर्वी आंघोळ करावी व कपडे बदलावेत.

५. कीटनाशके ठेवण्यात आलेल्या कोणत्याही पात्राचा अन्न किंवा पेय ठेवण्यासाठी वापर करू नये.

६. कीटनाशके उघड्या हाताने हाताळू नयेत, योग्य असलेल्या पळीचा वापर करावा.

७. कीटनाशके शरीरावर, फरशीवर अथवा मेजावर सांडू देऊ नयेत.

८. तुमचे शरीर, कपडे व तुमच्या सभोवतालची जागा ही कटाक्षाने स्वच्छ ठेवावी.

९. मळमळल्यासारखे, वांती वा भोवळ आल्यासारखे वाटल्यास तसे व्यवस्थापकास कळवणे म्हणजे तो आवश्यक उपचाराची व्यवस्था करील.

अनुसूची १६–विद्युत विघटनाच्या प्रक्रियेद्वारा उत्पादित प्राणवायूचे आणि उज्जवायूचे संपीडन–

१. व्याख्या – या अनुसूचीच्या प्रयोजनासाठी 'प्राणवायू आणि उज्जवायू यांचे संपीडन', म्हणजे विद्युत विघटनाच्या प्रक्रियेद्वारा प्राणवायू आणि उज्जवायू यांच्या निर्मितीची किंवा उद्भवनाची कोणतीही प्रक्रिया.

२. प्रयुक्ती – ही अनुसूची जेथे प्राणवायू आणि उज्जवायू यांच्या संपीडनाची प्रक्रिया चालू असते अशा कारखान्यांना किंवा त्यांच्या कोणत्याही भागाला लागू होते.

३. विद्युत विघटन संयंत्र कक्षाची जागा वगैरे – विद्युत विघटन संयंत्र बसविलेला कक्ष प्राणवायू व उज्जवायू यांच्या संग्रहण व संपीडन संयंत्रापासून वेगळा असला पाहिजे. विद्युतजनित्र व विद्युत वितरण फलक बसविलेल्या कक्षांचा इतर प्रक्रिया चालू असलेल्या कोणत्याही दुसऱ्या कक्षाशी संबंध असता कामा नये.

४. ऑक्सिजन व हैड्रोजन यांच्या शुद्धतेची काळजी – (१) ऑक्सिजन आणि हैड्रोजन यांच्या शुद्धतेची चाचणी निदान प्रत्येक पाळीमध्ये सक्षम व्यक्तीने खालील मुद्यावर घेतली पाहिजे–

(i) इलेक्ट्रोलायझर कक्षात–

(ii) वायुधारकाच्या नळकाणांवर असणे–

(iii) कॉम्प्रेसरच्या जोडणीच्या शेवटी–

परंतु असे, की ऑक्सिजन व हैड्रोजनाच्या शुद्धतेची स्वयंचलित नोंदकळ घटी-प्रकाराशी इलेक्ट्रोलयझरला जेव्हा जोडलेली असेल, तेव्हा कॉम्प्रेसरच्या जोडणीच्या शेवटी केल्याप्रमाणेच फक्त वायूच्या शुद्धतेची चाचणी केली पाहिजे.

(२) चाचणी निर्णय म्हणून शुद्धतेचे अंक मिळविले असतील ते, चाचणी घेतलेल्या अशा व्यक्तीने या कारणासाठी ठेवलेल्या पुस्तकात नोंदवून स्वाक्षरी केली पाहिजे.

५. विवक्षित परिस्थितीत प्राणवायूच्या व उज्जवायूच्या संपीडनास मनाई – परिच्छेद ४ अनुसार प्राणवायूच्या आणि उज्जवायूच्या शुद्धतेची चाचणी घेतल्यानंतर ती ९८ टक्क्यांपेक्षा कमी आढळून आली तर प्राणवायूवर किंवा उज्जवायूवर संपीडनाची प्रक्रिया करणे आवश्यक असणार नाही.

६. अभावक दाबकळ याची तरतूद – कॉम्प्रेसर मोटारकळ बंद करण्यासाठी गॅसधारकांचे आतील पोकळी निकामी करणे अशक्य होईल. यांतील कार्यक्षम



अभावक दाब कळीची किंवा हैड्रोजनसाठी सक्तनमेन गॅस धारक बंद करण्यास जोडला पाहिजे आणि गॅस धारक व हैड्रोजन कॉम्प्रेसर यांचमध्ये मर्यादेपर्यंत गॅस धारक रिकामा होण्यास त्या मर्यादेपर्यंत पोकळी कारण व्हावी अशा वेळी दाबकळ बंद केली जाईल अशी तरतूद, मर्यादित कळीच्या तरतुदीबरोबर केली जाईल.

७. धोक्याची सूचना – कोणत्याही वायुधारकाची हुडी ती रिकामी असताना त्याच्या निम्नतम स्थितीपासून ३० सेंटीमीटरखाली जाऊ देता कामा नये आणि ही मर्यादा गाठली आहे, हे दर्शविण्यासाठी वायुधारकाला एक दृश्य व श्राव्य असे धोक्याची सूचना देणारे उपकरण बसविले पाहिजे.

८. कच्च्या मालाची शुद्धता – आरजल बनविण्यासाठी वापरण्यात येणारे पाणी व कॉस्टिक–सोडा हे औद्य निर्माण प्रक्रियेतील अवधिपर्यंत रासायनिक दृष्ट्या शुद्ध केलेले असले पाहिजेत.

९. विद्युत जोडणीची रचना – विद्युत विघटन यंत्राच्या घटाजवळील आणि विद्युत जनित्राच्या टोकाजवळील विद्युत जोडणीची रचना अशा रीतीने केली पाहिजे, की तीमुळे ध्रुवता बदलली जाऊन चुकीची जोडणी होण्याची शक्यता टळेल.

१०. गॅस नळ्या, गॅस धारक आणि कॉम्प्रेस्ड गॅस साठवणीचे पात्र यांचे निर्वाहन – (१) ऑक्सिजन आणि हैड्रोजन गॅस नळ्या, विसंगत रंगाने रंगविल्या पाहिजेत. हैड्रोजन गॅस नळीच्या जोडणीला, धारकाला किंवा साठवणीच्या पात्राला गळती असेल त्या किंवा कोणताही खड पडेल त्या प्रसंगी या अनुसूचीच्या खंड १३ आणि – महाराष्ट्र कारखाने नियम १९६३, नियम ७३ व आवश्यकतेच्या अनुसार, दुरुस्ती व पुनर्जोडणी नंतर नळी व साठवण यांची पद्धती, हैड्रोजन गॅसमध्ये ओतण्यापूर्वी सर्व हवा व अचेतन गॅस योग्य निर्दोष केला पाहिजे.

(२) हैड्रोजन गॅस, कोणत्याही नव्या किंवा वापरात असलेल्या प्रत्येक नळीची, गॅस धारकाच्या किंवा कॉम्प्रेस्ड गॅस पात्राच्या प्रचलित पद्धतीत, ओतण्यापूर्वी हवा व अचेतन गॅस योग्य निर्दोष केला पाहिजे.

## अनुसूची १६

खंड ११-

११. विद्युत तारबांधणी आणि आगीची इतर मूलस्थाने – जेथे हैड्रोजन गॅसचे अनिष्ट संकलन, स्वभावतः किंवा सर्व विद्युत तारबांधणी, उपकरणी आणि इतर स्थलस्थानस्थ सामग्री अग्निरोधक बांधणीसाठी असली पाहिजे. ज्वालेची सर्व मूलस्थाने वरील ठिकाणी येण्यास प्रतिबंध होईल अशी असली पाहिजेत. वरील ठिकाणी मुख्य ठळक जागी असा परिणाम घडविणारी धोक्याची सूचना लावली पाहिजे.

स्वीचफलक किंवा विद्युतजनित्राची टोके येथील चुकीच्या जोडण्यांमुळे [illegible] उद्भवल्यास त्यावेळी वीज प्रवाह खंडित करणारे एक स्वयंचलित साधन बसविण्यात आले पाहिजे.

१२. स्फोटक पदार्थ काढून टाकणे – विद्युत विघटन संयंत्र आणि वायुधारके व संपीडक यांच्या कोणत्याही भागावर सांधणी, वितळ मढवणी, झाळणी किंवा कटाई या क्रिया, त्या भागापासून कोणताही स्फोटक पदार्थ दूर करीपर्यंत किंवा अशा क्रियेसाठी तो भाग सुरक्षित करीपर्यंत, केल्या जाणार नाहीत. स्फोटाचा धोका टाळण्यासाठी वायू पूर्णपणे बंद होईपर्यंत अशा भागामध्ये कोणताही स्फोटक पदार्थ नेऊ देता कामा नये.

१३. प्रक्रिया दुरुस्ती इत्यादी यावरील निर्बंध – कोणतीही प्रक्रिया, दुरुस्ती किंवा परीक्षण यासंबंधीचे कोणतेही काम, स्फोटाच्या धोक्याबाबत घ्यावयाच्या आवश्यक त्या सावधगिरीसंबंधीचे आपले ज्ञान, अनुभव आणि प्रशिक्षण यामुळे अशा कामावर देखरेख करण्यास जी व्यक्ती सक्षम असेल तिची प्रत्यक्ष देखरेख असल्याखेरीज हाती घेता कामा नये. उभारणीनंतर किंवा दुरुस्तीनंतर कोणतेही विद्युत अनित्र, अशा प्रकारची उभारणी किंवा दुरुस्ती जिच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली केली जाते अशा कोणत्याही सक्षम व्यक्तीकडून ते सुरक्षित स्थितीत आहे आणि या नियमांद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे धुवनेसाठी दोन्ही टोकाची तपासणी करण्यात आली आहे; असे प्रमाणित करण्यात आले नसेल तर विद्युत विघटन यंत्रांना जोडता कामा नये.

१४. संयंत्रांची तपासणी – विद्युत विघटन संयंत्राच्या प्रत्येक भागाचे, वायुधारकाचे आणि संपीडकाचे निरीक्षण, तपासणी आणि दुरुस्ती, परिच्छेद १३ मध्ये उल्लेखिलेल्या सक्षम व्यक्तीच्या सूचनांना अनुसरून व्यवस्थापकाने ठेवलेल्या रीतसर अनुसूचीप्रमाणे केली पाहिजे. लक्षात आलेला प्रत्येक दोष तात्काळ दुरुस्त करण्यात आला पाहिजे.

## अनुसूची १७

१. प्रयुक्ती – ही अनुसूची, ज्या कारखान्यात पुढील प्रक्रियांपैकी कोणतीही प्रक्रिया केली जाते अशा कारखान्यास लागू होईल.

(एक) अॅस्बेस्टॉस फोडणे, भरडणे, त्याचे विघटन करणे, तो खुला करणे, दळणे, मिश्रण करणे किंवा चाळणे आणि हाताळणी करून त्यांच्याशी आनुषंगिक असलेली इतर कोणतीही प्रक्रिया

(दोन) अॅस्बेस्टॉस टेक्स्टाईल्स निर्माण करताना प्रारंभिक व अंतिम संस्कारणाच्या धरून सर्व प्रक्रिया.



(तीन) अॅस्बेस्टॉसपासून पूर्णतः वा अंशतः तयार केलेल्या इन्सुलेशन स्लॅब किंवा सेक्शन्स तयार करणे आणि तदनुषंगिक प्रक्रिया.

(चार) पूर्णतः किंवा अंशतः अॅस्बेस्टॉस असलेल्या इनस्युलेटिंग मॅट्रेसेस तयार करणे किंवा त्यांची दुरुस्ती करणे.

(पाच) अॅस्बेस्टॉसचा / पुठ्ठ्याचा कागद तयार करणे.

(सहा) अॅस्बेस्टॉस, पुठ्ठा व कागद तयार करणे.

(सात) फवारा पद्धतीने अॅस्बेस्टॉस लावणे.

(आठ) अॅस्बेस्टॉसपासून पूर्णतः किंवा अंशतः तयार झालेल्या वस्तू शुष्क किंवा स्थितीत कापणे, दळणे, कातकाम करणे, घर्षण करणे व ड्रिल देणे.

(नऊ) अॅस्बेस्टॉसची धूळ गोळा करण्यासाठी एखादी खोली, पात्र, कक्ष क्लिनर किंवा उपकरण स्वच्छ करणे.

परंतु कोणत्याही कारखान्याच्या, कर्मशाळेच्या किंवा त्याच्या भागाच्या बाबतीत जर मुख्य निरीक्षकाची अशी खात्री होईल, की अॅस्बेस्टॉसच्या निर्बंधित वापरामुळे किंवा प्रासंगिक स्वरूपाच्या कामाच्या पद्धतीमुळे किंवा अन्यथा तेथे कामावर लावलेल्या व्यक्तींच्या आरोग्यास धोका न पोहोचविता, या अनुसूचीचे सर्व किंवा कोणतेही उपबंध तहकूब करता येणे किंवा शिथिल करता येणे शक्य आहे तर त्यास योग्य वाटतील अशा शर्तीसाठी त्यास तहकुबीस किंवा शिथिलीकरणास लेखी मंजुरी देता येईल. असे प्रमाणपत्र कोणत्याही वेळेला विखंडित करता येईल.

२. व्याख्या – या अनुसूचीच्या प्रयोजनासाठी–

(एक) 'अॅस्बेस्टॉस' म्हणजे कोणतेही तंतुमय सिलिकेटखनिज आणि असे कोणतेही अशुद्ध, भरलेले किंवा खुले केलेले खनिज असलेले कोणतेही अवमिश्रण.

(दोन) 'अॅस्बेस्टॉस टेक्स्टाईल' म्हणजे, अॅस्बेस्टॉसपासून निर्माण केलेला किंवा इतर कोणत्याही पदार्थांबरोबर अॅस्बेस्टॉसचे मिश्रण करून बनवलेला धागा किंवा कापड.

(तीन) 'तयार करणे' म्हणजे, अॅस्बेस्टॉस खुला करताना भरण्याची, विघटन करण्याची व इतर कोणत्याही प्रक्रिया किंवा तदनुषंगिक प्रक्रिया.

(चार) 'मान्य केलेला' म्हणजे, निरीक्षकाने त्यावेळेपुरते लेखी मान्य केलेला.

(पाच) 'स्वच्छ उपकरणसंच' म्हणजे, ज्याचा वापर करून एखाद्या व्यक्तीला धूळ विरहित हवेत श्वासोच्छ्वास करता येतो अशी आवश्यक ती

ओठणी बसविलेले शिरस्त्राण किंवा मुख यंत्र किंवा मान्य केलेला इतर कोणताही उपकरण संच.

३. पुढील प्रयोजनासाठी – कामगार काम करीत असलेल्या खोलीतील हवेत ॲस्बेस्टॉसची धूळ मिसळली जाण्यास त्यामुळे प्रतिबंध होतो अशा यांत्रिक साधनांच्या सहाय्याने बहिःसर्जक हवेच्या स्रोताची तरतूद केली पाहिजे व तो सुस्थितीत ठेवली पाहिजे-

(अ) वस्तुनिर्मितीची आणि वाहून यंत्रसामग्री–

(एक) तयार करण्याचे, दळण्याचे व शुष्क मिश्रण करण्याचे यंत्र.

(दोन) पिंजण्याचे यंत्र, कार्ड वेस्ट एक्झ, रिंग स्पिनिंग यंत्रे व माग.

(तीन) ॲस्बेस्टॉस पुरवण्यात येणारी यंत्रसामग्री व संयंत्र.

(चार) पूर्णतः किंवा अंशतः ॲस्बेस्टॉसपासून तयार झालेल्या शुष्क स्थितीतील वस्तू कापणे, वळणे, त्यावर कातकाम करणे, घर्षण करणे व शिलाई देणे यासाठी वापरण्यात येणारी यंत्रे.

(ब) कार्डिंग यंत्राचे सिलिंडर व इतर भाग स्वच्छ करण्याची व वळणाची यंत्रे.

(क) ज्या मधून सुटा ॲस्बेस्टॉस पाठविला जातो किंवा पुढे जातो असे चेंबर्स हॉपर्स किंवा इतर स्ट्रक्चर्स.

(ड) टाकाऊ ॲस्बेस्टॉसची बांधणी करण्यासाठी किंवा ॲस्बेस्टॉसवर हाताने अन्य प्रक्रिया करण्यासाठी कामाची बाके.

(ई) ज्या ठिकाणी गोण्या, स्किप भरण्यात येतात किंवा रिकाम्या करण्यात येतात, किंवा इतर हातवाही पात्राचे वजन करण्यात येते किंवा ज्या ठिकाणी इतर तदनुषंगिक प्रक्रिया हाताने केल्या जातात, अशा जागा.

(फ) गोणी स्वच्छ करण्याची यंत्रे–

परंतु असे की, हा खंड—(एक) ज्या यंत्रामुळे किंवा इतर संयंत्रामुळे ॲस्बेस्टॉसची धूळ निर्माण होत नाही किंवा ज्या खोलीत कामगार, काम करतात त्या खोलीतील हवेत ॲस्बेस्टॉसची धूळ जाण्यास प्रतिबंध व्हावा अशा रीतीने बंद केलेली असेल अशा खोलीतील यंत्रास किंवा संयंत्रास किंवा (दोन) ॲस्बेस्टॉसची धूळ बाहेर पडू शकणार नाही. इतका तो ओला असेल किंवा त्यावर तेल किंवा इतर पदार्थाने अशी प्रक्रिया केलेली असेल तेथे किंवा (तीन) इन्सुलेटिंग मॅट्रेस करण्यास किंवा त्यांची दुरुस्ती करण्यास किंवा (चार) ॲस्बेस्टॉसचे हाताने मिश्रण किंवा संमिश्रण करण्यात लागू होणार नाही.





(१) यांत्रिक साधनाद्वारे तयार केलेल्या बहिःसर्जक हवेच्या स्रोताखेरीज ॲस्बेस्टॉसचे मिश्रण किंवा संमिश्रण हाताने करता कामा नये आणि अशा बहिःसर्जक हवेचा स्रोत अशा रीतीने तयार केला पाहिजे व सुस्थितीत ठेवला पाहिजे की प्रक्रिया चालू असताना ॲस्बेस्टॉसची धूळ शक्य तितकी दबली जाईल याची खात्री असली पाहिजे.

(२) ही अनुसूची अमलात आल्यानंतर, बांधणी किंवा पुनर्बांधणी केलेल्या जागेत ॲस्बेस्टॉसचे हाताने मिश्रण किंवा संमिश्रण जेथे सामान्यपणे इतर कोणतेही काम केले जात नाही अशा खास खोलीखेरीज किंवा जागेखेरीज अन्यत्र केले जाता कामा नये.

(३) (एक) पूर्णतः किंवा अंशतः ॲस्बेस्टॉसपासून इनश्युलेटिंग मॅट्रेस तयार करण्याचे किंवा दुरुस्त करण्याचे काम, ज्या खोलीत इतर कोणतेही काम केले जाते अशा कोणत्याही खोलीत करता कामा नये.

(दोन) ज्या खोलीत इनश्युलेटिंग मॅट्रेस करण्याचे किंवा दुरुस्त करण्याचे काम केले जाते अशा प्रत्येक खोलीत–

(अ) प्रत्येक बाबतीत मान्य करण्यात येईल अशा व्यवस्थेनुसार हवा खेळती राहण्यासाठी पुरेशा बहिःसर्जक व जावर–मार्गाची तरतूद केली पाहिजे व सुस्थितीत ठेवले पाहिजे.

(ब) गाद्या भरण्याची, ठोपटण्याची किंवा समतल करण्याची प्रक्रिया चालू असताना अशा कामावर लावलेल्या व्यक्तीखेरीज इतर कोणतीही व्यक्ती तेथे हजर राहता कामा नये आणि गाद्या भरण्याचे, ठोपटण्याचे किंवा त्या समतल करण्याचे काम झाल्यानंतर निदान दहा मिनिटे तरी त्या खोलीत परत काम चालू करता कामा नये.

(क) वरील कामामुळे निर्माण होणारी धूळ उडू नये म्हणून जमीन व बाके ओलसर ठेवली पाहिजेत आणि–

(ड) आवरणे कापल्यानंतर ती तावडतोब पुरेशी ओलसर केली पाहिजेत आणि त्यांनी भरलेल्या गाद्यांच्या बाबतीत भरण्याची, ठोपटण्याची किंवा समतल करण्याची प्रक्रिया चालू असताना ती ओलसर ठेवली पाहिजेत.

(४) (अ) ही अनुसूची अमलात आल्यानंतर, बांधणी झालेल्या किंवा पुनर्बांधणी झालेल्या जागेच्या बाबतीत सुट्या ॲस्बेस्टॉससाठी असलेले साठवण

कक्ष किंवा पात्रे (Bins) कोणत्याही कामाच्या खोलीपासून अलग वेगळी ठेवली पाहिजेत.

(ब) धूळ खाली बसण्यासाठी किंवा गाळण्यासाठी असलेले कक्ष किंवा उपकरण संच कोणत्याही कामाच्या खोलीत असू देता कामा नये.

(क) बहिःसर्जक उपकरण संचामधून बाहेर पडलेली ॲस्बेस्टॉसची धूळ उडून कोणत्याही कामाच्या खोलीतील हवेत जाण्यास प्रतिबंध करण्यासाठी व्यवस्था केली पाहिजे.

(५) ॲस्बेस्टॉस तयार करताना, दळताना वापरलेली सर्व यंत्रे, कार्डिंग व कार्ड रोलर स्वच्छ करण्याची व दळण्याची यंत्रे व गोण्या स्वच्छ करण्याची व सर्व कार्ड वेस्ट एक्स यंत्रे, आणि जाळया, एलेव्हेटर्स, च्युटस, कन्व्हेअर्स हे, व अनुसूचीच्या खंड ३ अनुसार तरतूद केलेल्या हवेच्या बहिःसर्जक अंतरद्वारे बाहेर फेकलेल्या धुळीखेरीज, ॲस्बेस्टॉस असलेली धूळ किंवा कचरा त्यांच्या कोणत्याही भागामधून बाहेर पडू शकणार नाही अशा रीतीने बसविलेले असले पाहिजेत व सुस्थितीत ठेवले पाहिजेत.

(६) (अ) कार्डिंग यंत्राचे (डोफर सिलिंडरसह) सिलिंडर हाताने स्वच्छ करण्याचे काम, ते स्वच्छ करणाऱ्या किंवा स्वच्छ करण्यास मदत करणाऱ्या व्यक्तीखेरीज इतर कोणतीही व्यक्ती हजर असल्यास, करता कामा नये.

(ब) ही अनुसूची अमलात आल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांनंतर वर म्हटल्याप्रमाणे असे स्वच्छ करण्याचे काम हँण्ड स्ट्रिकल किंवा हँण्ड टूल यांच्या साहाय्याने करता कामा नये.

परंतु असे, की निरीक्षकास किंवा मुख्य निरीक्षकास, खंड ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रक्रिया व काम करणाऱ्या कामगारांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक वाटतील अशा उपाययोजना व सावधगिरीच्या सूचना करण्याचा त्यास निदेश देता येईल.

५. (१) ज्या खोलीत, या अनुसूचीत दिलेल्या आवश्यकतांपैकी कोणतीही आवश्यकता लागू होते, अशा प्रत्येक खोलीतील–

(अ) जमीन, कामाची बाके व संयंत्र स्वच्छ स्थितीत आणि ॲस्बेस्टॉसच्या कचऱ्यापासून मोकळी ठेवली पाहिजेत, व वापरासाठी तावडतोब न लागणारा ॲस्बेस्टॉस साठवण्यासाठी योग्य ती व्यवस्था केली पाहिजे.

(ब) खोलीत चालू असलेल्या कामात ज्या कोणत्याही सामग्रीची, संयंत्रांची किंवा इतर वस्तूंची तावडतोब आवश्यकता नसेल व ज्यामुळे जमीन स्वच्छ



करण्यात अडथळा होईल अशी कोणतीही सामग्री, संयंत्र किंवा वस्तू जमिनीवर असता कामा नये, आणि–

(२) प्रत्येक खोलीत वर म्हटल्याप्रमाणे पुरेसा प्रकाश असला पाहिजे.

(६) (अ) खंड १ व खंड ४ चा उपखंड (५) चे अनुपालन करून ॲस्बेस्टॉस असलेली प्रत्येक गोष्ट हाताने झोपडून स्वच्छ करता कामा नये. ती यंत्राने स्वच्छ करावी.

(ब) कारखान्यात ॲस्बेस्टॉसच्या ने–आणीसाठी वापरावयाच्या सर्व गोण्या अभेद्य पदार्थाच्या बनविलेल्या असल्या पाहिजेत व त्या चांगल्या दुरुस्त स्थितीत असल्या पाहिजेत.

(७) (अ) या अनुसूची अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, धूळ बाहेर काढून टाकण्याच्या किंवा ती दाबून टाकण्याच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी हवा खेळविण्याची सर्व संयंत्रे सक्षम व्यक्तीने दर सहा महिन्यांनी निदान एकदा तरी पूर्णतः तपासली पाहिजेत आणि त्याची चाचणी घेतली पाहिजे आणि अशा तपासणीत व चाचणीत आढळून आलेला कोणताही दोष तावडतोब काढून टाकला पाहिजे.

(ब) अशा तपासणीचा व चाचणीचा तपशील, तसेच संयंत्राची स्थिती आणि आवश्यक आढळून आलेल्या दुरुस्त्या व (असल्यास) फेरबदल यांचा तपशील असलेली एक नोंदवही ठेवली पाहिजे व निरीक्षकाच्या तपासणीसाठी ती उपलब्ध असली पाहिजे.

(८) खालील ठिकाणी कामावर असलेल्या प्रत्येक व्यक्तीस श्वसन उपकरण संच पुरविला पाहिजे.

(अ) सुटा ॲस्बेस्टॉस असलेले कक्ष–

(ब) डस्ट सेटलिंग किंवा फिल्टरींग चेंबर्स किंवा उपकरण संच स्वच्छ करण्याच्या कामी नेमलेल्या व्यक्तीस–

(क) हँण्ड स्ट्रिकलच्या सहाय्याने कार्डिंग यंत्रातील, डोफर सिलिंडरसह सिलिंडर किंवा इतर भाग स्वच्छ करण्याच्या कामी नेमलेल्या व्यक्तीस–

(ड) इन्सुलेटिंग मॅट्रेसेस तयार किंवा दुरुस्त करताना त्या भरण्याच्या, थोपटण्याच्या किंवा समतल करण्याच्या कामी नेमलेल्या व्यक्तीस–]

(९) डस्ट सेटलिंग व फिल्टरिंग चेंबर्स, बंदिस्त मार्ग आणि शुद्ध हवा खेळती ठेवण्यासाठी असलेले नलिका मार्ग स्वच्छ करण्याच्या कामावर असलेल्या

सर्व व्यक्तींच्या उपयोगासाठी योग्य ती बोन्हरनोल व मिरस्काचे पुरविली पाहिजेत.

(१०) कोणत्याही तरुण व्यक्तीस, इन्सुलेटिंग मॅट्रेस तयार करण्याच्या कामात किंवा हाताने ॲस्बेस्टॉसचे मिश्रण किंवा संमिश्रण करण्याच्या कामात, बोऱ्या स्वच्छ करण्याच्या कामात, नस्ट मेटॉलिंग किंवा फिल्टरिंगसाठी असलेल्या चेंबर्समध्ये किंवा उपकरण संचात, सुद्धा ॲस्बेस्टॉस असलेल्या चेंबर्समध्ये किंवा कार्डिंग यंत्राच्या डॉफर सिलिंडरसह दळण्याच्या किंवा त्याच्याशी संबंधित असलेल्या प्रक्रियेत, कामावर लावता कामा नये.

११. वैद्यकीय तपासणी – (अ) कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही कारखान्यात खंड १ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रक्रियांपैकी कोणत्याही प्रक्रियेवर, तिची वैद्यकीय निरीक्षक, कारखाने किंवा प्रमाणक शल्यचिकित्सक याने तपासणी केलेली असल्याखेरीज व ती व्यक्ती त्या कामावर लावण्यास योग्य असल्याचे जाहीर करून नमुना क्रमांक २२ मध्ये योग्य प्रमाणपत्र दिले असल्याखेरीज, कामावर लावता कामा नये.

(ब) ज्या तारखेला ही अनुसूची अमलात येईल त्या तारखेला उपरोक्त प्रक्रियांपैकी कोणत्याही प्रक्रियेत कामावर लावलेल्या प्रत्येक कामगाराची कब्जेदाराच्या वतीने अर्हताप्राप्त क्ष किरण–शास्त्रज्ञाकडून क्ष किरण शास्त्रदृष्ट्या तपासणी केली पाहिजे व उक्त तारखेपासून तीन महिन्यांच्या आत प्रमाण आकाराचे छातीचे क्ष किरण छायाचित्र वैद्यकीय तपासणीसाठी वैद्यकीय निरीक्षक कारखाने, प्रमाणक शल्यचिकित्सक यास सादर केले पाहिजे.

(क) उपरोक्त प्रक्रियांपैकी कोणत्याही प्रक्रियेवर कामावर लावलेल्या प्रत्येक कामगाराची, उपखंड (अ) व (ब) अन्वये झालेल्या पहिल्या तपासणीनंतर दर बारा महिन्यांनी, वैद्यकीय निरीक्षक कारखाने / प्रमाणक शल्यचिकित्सक याने वैद्यकीय दृष्ट्या तपासणी केली पाहिजे. जर कोणत्याही वेळी वैद्यकीय निरीक्षक, कारखाने / प्रमाणक शल्यचिकित्सक याचे असे मत झाले की प्रक्रियेत कामावर लावलेल्या व्यक्तीची अर्हताप्राप्त क्ष किरण शास्त्रज्ञाकडून क्ष किरण शास्त्रदृष्ट्या तपासणी झाली पाहिजे, तर त्याला कब्जेदारास स्वतःच्या खर्चाने अशा तपासणीची व्यवस्था करण्यास व नंतर कामगाराच्या छातीचे प्रमाण आकाराचे क्ष किरण छायाचित्र वैद्यकीय निरीक्षक, कारखाने, प्रमाणक शल्यचिकित्सक यांस सादर करण्यास निदेश देता येईल.

(ड) पूर्वीच कामावर असलेल्या व वैद्यकीय निरीक्षक, कारखाने / प्रमाणक शल्यचिकित्सक याने अयोग्य म्हणून जाहीर केलेल्या कामगारास त्याची, कब्जेदाराच्या खर्चाने, अर्हताप्राप्त क्ष किरण शास्त्रज्ञाकडून प्रमाण आकाराच्या क्ष



किरण छायाचित्रासह पुन्हा तपासणी केल्याखेरीज आणि ती उक्त प्रक्रियांत परत काम करण्यास योग्य असल्याचे प्रमाणित असल्याखेरीज, त्याला खंड १ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रक्रियांपैकी कोणत्याही प्रक्रियेत काम करण्यास परवानगी देता कामा नये.

(ई) उपरोक्त प्रक्रियांपैकी कोणत्याही प्रक्रियेवर काम करण्यास अयोग्य म्हणून जाहीर केलेल्या कामगारास वैद्यकीय निरीक्षक कारखाने / प्रमाणक शल्यचिकित्सक याने सुरक्षित म्हणून मानलेल्या व तेथे कामावर लावण्याचा सल्ला दिलेल्या इतर कामावर किंवा प्रक्रियेवर लावता येईल.

परंतु असे की जर वैद्यकीय निरीक्षक, कारखाने प्रमाणक शल्यचिकित्सक, कामगार हा काम करण्यास पूर्णतः असमर्थ झालेला आहे व तो कोणत्याही प्रक्रियेत कामावर लावण्यास अयोग्य आहे असे जाहीर करील तर, अशा कामगारास कोणत्याही कामावर किंवा प्रक्रियेवर काम करण्याचे चालू ठेवण्यास परवानगी देता कामा नये.

(फ) वैद्यकीय निरीक्षक, कारखाने / प्रमाणक शल्यचिकित्सक, यास कामगाराची क्ष किरण तपासणी केली जावी किंवा त्याची विशेषज्ञाकडून आणखी तपासणी केली जावी किंवा चिकित्सालयीन विकृतिचिकित्सा विषयक किंवा इतर कोणतीही तपासणी केली जावी किंवा त्याने विनिर्दिष्ट उपचार करून घ्यावेत असा निदेश देता येईल. आणि विनिर्दिष्ट तपासणी आणि / किंवा उपचार यासाठी व्यवस्था करणे व त्याचा किंवा त्याविषयी संबंधित असलेल्या इतर बाबींचा सर्व खर्च सोसणे ही मालकाची ( कब्जेदाराची / व्यवस्थापकाची ) जबाबदारी असेल.

(ग) अशा प्रत्येक तपासणीनंतर प्रमाणक शल्यचिकित्सक, नमुना क्रमांक १२ मध्ये प्रमाणपत्र देईल.

(ह) व्यवस्थापकाने सर्व प्रमाणपत्रे योग्य नोंदवहीत किंवा फाईलमध्ये सुरक्षित ठेवली पाहिजेत. आणि निरीक्षक मागणी करील त्या त्या वेळी सर्व प्रमाणपत्रे त्याने प्रस्तुत केली पाहिजेत.

(आय) व्यवस्थापकाने नमुना क्रमांक ७ मध्ये प्रत्येक वैद्यकीय तपासणीचा तपशील ठेवला पाहिजे व ती नोंदवही निरीक्षक मागणी करील त्यावेळी त्याजकडे सादर केली पाहिजे.

## अनुसूची १८

**मॅंगेनीज व त्याचे संमिश्रण यांची निर्मिती आणि हाताळणी–**

व्याख्या – या अनुसूचीच्या प्रयोजनासाठी–

(अ) 'मँगेनीज प्रक्रिया' म्हणजे, मँगेनीजचे किंवा त्याच्या कोणत्याही संमिश्रणाचे किंवा कोणत्याही अशोधित धातूचे किंवा मँगेनीज असलेल्या कोणत्याही मिश्रणाचे संस्करण.

(ब) 'प्रथम नियुक्ती' म्हणजे मँगेनीजच्या कोणत्याही निर्माण प्रक्रियेतील प्रथम निमिती आणि यात, अशा निर्माण प्रक्रियेत सलग तीन कॅलेंडर महिन्यांच्या मुदतीपेक्षा जास्त होणाऱ्या; अंतिम सेवेनंतरची पुनर्नियुक्ती समाविष्ट.

(क) 'हाताळणी' म्हणजे, मँगेनीजच्या प्रक्रियेत मिश्रण करणे, संमिश्रण करणे, भरणे, रिकामे करणे, दळणे चाळणे, सुकविणे, आवेष्टित करणे, आवणे हलाने ने-आण करणे, वापरणे किंवा त्यावर रासायनिक प्रक्रिया करणे.

(ड) 'कार्यक्षम बहि:सर्जक हवेचा स्रोत' म्हणजे जेथे काम चालू असते अशा कोणत्याही जागेतील हवेत धूळ, धूम, वायू यांच्यात प्रतिबंध करता यावा म्हणून ती काढून टाकणे आणि यांत्रिक साधनांच्या साहाय्याने पकडून आणलेली स्वच्छ विशिष्ट हवा खेळविण्याची सोय, ज्या ठिकाणी असा वायू, वाफ, धूर किंवा धूम निर्माण होतो त्या मूळ ठिकाणी निर्माण झालेला धूर काढून न टाकणारा हवेचा स्रोत कार्यक्षम समजला जाणार नाही.

२. प्रयुक्ती – ही अनुसूची, कारखान्यात किंवा त्याच्या कोणत्याही भागात जेथे मँगेनीज प्रक्रिया चालू असते तेथे लागू राहील.

३. सूट – (अनुसूची १० मध्ये—१७ यातील 'कोणतीही कारणे विनिर्दिष्ट न करता कोणत्याही वेळी' हे शब्द वगळून सर्व तरतूद सारखी आहे.)

४. प्रक्रियांचे पृथक्करण – ज्यामुळे धूळ, वाफ, किंवा धुके मँगेनीजमध्ये मिळण्यास वाव असेल, अशी मँगेनीजची प्रत्येक प्रक्रिया पूर्णपणे बंद असेल अशा पद्धतीने केली पाहिजे किंवा अन्यथा इतर प्रक्रियेपासून दूर असेल अशा परिणाम-कारक पद्धतीने केली पाहिजे की इतर भागे, प्रक्रिया आणि कारखान्याचा कोणताही भाग आणि इतर प्रक्रियेत कामावर असलेल्या इतर व्यक्ती यावर त्यामुळे घातक परिणाम होणार नाही.

५. बहि:सर्जक हवेचा स्रोत – ज्यामध्ये कोणतीही धूळ, धूम, वाफ मँगेनीज-मध्ये असेल अशा कोणतीही प्रक्रिया, कार्यक्षम बहि:सर्जक हवेचा स्रोत असल्याशिवाय व शक्य तितक्या कामाच्या जागेच्या जवळ असल्याशिवाय केली जाता कामा नये.

६. वैद्यकीय सोयी – (१) कारखान्याच्या कब्जेदाराने अर्हताप्राप्त वैद्यकीय व्यवसायीची नियुक्ती केली पाहिजे, की ज्याची नियुक्ती मुख्य निरीक्षकाच्या पूर्तिसंस्काराधीन राहील. नियुक्त केलेल्या अर्हताप्राप्त वैद्यकीय व्यवसायीस 'नियुक्त डॉक्टर' असे संबोधिले जाईल.



(२) वैद्यकीय तपासणीच्या कारणास्तव कब्जेदाराने, कारखान्याच्या आवारात केवळ नियुक्त डॉक्टराच्याच फक्त उपयोगासाठी खोली पुरविली पाहिजे. अशी पुरविलेली खोली, योग्यरीत्या स्वच्छ पुरेसा प्रकाश, खेळती हवा आणि पडदे या सोयींनी समृद्ध असली पाहिजे. लेखन साहित्य असलेले मेज, खुर्च्या, सोयी तपास-णीची व अन्वेषणाची साधने यांनी सज्ज असली पाहिजे. अशा सोयी कारखान्याच्या वैद्यकीय निरीक्षकाच्या मान्यतेच्या अधीन असतील.

(क) मँगेनीज प्रक्रियेत काम करण्याच्या उद्देशाने नियुक्तिपूर्व वैद्यकीय तपासणी केली पाहिजे. मँगेनीज प्रक्रियेत कामावर लावलेल्या सर्व कामगारांची तीन महिन्यांपेक्षा अधिक नाही अशा कालांतराने नियुक्त डॉक्टराने वैद्यकीय तपासणी केली पाहिजे. आणि अशा तपासणीची, मुख्य निरीक्षक कारखाने यांचे संमत केल्यामुळे निर्वाहनात असलेल्या नमुन्यात नोंद केली पाहिजे मागणी केल्यावर कोणत्याही निरीक्षकास ती उपलब्ध असली पाहिजे.

(४) कारखान्याच्या कब्जेदाराने आणि नियुक्त डॉक्टरने मँगेनीजमुळे होणारे कोणतेही विकारी प्रकरण किंवा विकारी संशयास्पद प्रकरण तात्काळ मुख्य निरीक्षक कारखाने आणि कारखान्याचे वैद्यकीय निरीक्षक यांच्या लक्षात आणून दिले पाहिजे.

७. वैद्यकीय तपासणी – (१) मँगेनीज प्रक्रियेत नेमलेल्या प्रत्येक व्यक्तीने, कारखान्याचा वैद्यकीय निरीक्षक / प्रमाणक शल्यचिकित्सक यांजकडून, त्याच्या प्रथम नियुक्तीनंतर २४ दिवसांत आणि त्यानंतर सहा महिन्यांपेक्षा जास्त नाही अशा मध्यंतरात, तपासून घेतली पाहिजे.

(२) मँगेनीज प्रक्रियांवर काम करण्यास व्यक्ती तंदुरुस्त आहे असे वैद्यकीय तपासणीत आढळले, तर वैद्यकीय निरीक्षक, कारखाने / प्रमाणक शल्यचिकित्सक यांनी नमुना क्रमांक ३२ मध्ये तंदुरुस्त प्रमाणपत्र दिले पाहिजे. व ते कारखान्याच्या व्यवस्थापकाच्या ताब्यात ठेवले पाहिजे. प्रमाणपत्र जेव्हा जेव्हा कोणताही निरीक्षक मागणी करील तेव्हा तेव्हा तत्काळ सादर केले पाहिजे आणि ज्याने प्रमाणपत्र दिले असेल अशा व्यक्तीला ज्यावर प्रमाणपत्रावरील क्रमांक कोरलेला असेल असा धातूचा बिल्ला दिला पाहिजे व त्या व्यक्तीने, जेव्हा कामावर असेल तेव्हा नेहमी जवळ बाळगला पाहिजे.

(३) जर वैद्यकीय निरीक्षक, कारखाने / प्रमाणक शल्यचिकित्सक यास जर व्यक्ती मँगेनीज प्रक्रियेवर काम करण्यास पात्र नाही असे आढळले तर त्यास तसा नाकारल्याचे प्रमाणपत्र द्यावे.

) जर कारखान्याचे वैद्यकीय निरीक्षक / प्रमाणक शल्यचिकित्सक यांना

असे आढळले की ज्याच पूर्वीच्या वैद्यकीय तपासणीत तंदुरुस्त प्रमाणपत्र दिलेले आहे, असा कोणताही कामगार, मॅंगेनीजच्या कोणत्याही प्रक्रियेवर नेमला जाण्यास लायक राहिलेला नाही; तर त्याने पूर्वीचे प्रमाणपत्र रद्द करावे आणि ज्याचे प्रमाणपत्र रद्द झाले अशा व्यक्तीस मॅंगेनीजच्या कोणत्याही प्रक्रियेवर काम करू देता कामा नये. वैद्यकीय निरीक्षक कारखाने / प्रमाणक शल्यचिकित्सक यांना अशा व्यक्तीस, रद्द प्रमाणपत्रावर आणि नमुना क्रमांक ३२ मध्ये असलेल्या आरोग्य पुस्तकात त्याने स्पष्ट केलेल्या मुदतीनंतर परत नूतन वैद्यकीय तपासणी केल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यास भाग पाडावे.

(५) जर वैद्यकीय निरीक्षक कारखाने / प्रमाणक शल्यचिकित्सक यांचे असे मत झाले, की मॅंगेनीजच्या कोणत्याही प्रक्रियेत नेमली जाण्यास व्यक्ती कायमची अपात्र आहे तर त्याने प्रमाणपत्रात आणि आरोग्य पुस्तकात तशा आशयाची नोंद केली पाहिजे आणि अशा व्यक्तीस मॅंगेनीजच्या कोणत्याही प्रक्रियेवर काम करू देता कामा नये.

(६) जर वैद्यकीय निरीक्षक कारखाने / प्रमाणक शल्यचिकित्सक यांचे असे मत झाले की संशयास्पद प्रकरणी विशेष तज्ज्ञाची परीक्षा किंवा योग्य चिकित्सेसाठी चाचणीची आवश्यकता आहे, तर त्याने व्यवस्थापकास किंवा / आणि कब्जेदारास अशा विशेष तज्ज्ञाकडून अशा कामगाराची तपासणी करून घ्यावी किंवा त्याने स्पष्ट केले आहे अशी चाचणी करून घ्यावी असा आदेश द्यावा आणि व्यवस्थापक किंवा कब्जेदार यांनी यथास्थिति, असे असेल तसे, स्पष्ट केलेल्या कालावधीत दिलेल्या आदेशाची पूर्तता केली पाहिजे आणि परीक्षणाचा किंवा चाचणीचा अहवाल जसे असेल तसे, वैद्यकीय निरीक्षक कारखाने / प्रमाणक शल्यचिकित्सक यांच्या पुढे सादर केला पाहिजे.

(७) जर वैद्यकीय निरीक्षक कारखाने / प्रमाणक शल्यचिकित्सक यांचे असे मत झाले की मॅंगेनीजच्या कोणत्याही प्रक्रियेवर नेमली जाण्यास कोणतीही व्यक्ती पात्र नाही; परंतु दुसऱ्या कोणत्याही कामावर नेमली जाण्यास पात्र आहे, तर त्याने व्यवस्थापकास किंवा कब्जेदारास अशा व्यक्तीस अशा दुसऱ्या कामावर, त्यास सुरक्षित असेल अशा नेमण्याबाबत सल्ला द्यावा. वैद्यकीय निरीक्षक कारखाने / प्रमाणक शल्यचिकित्सक यांनी त्यांना आवश्यक वाटेल त्याप्रमाणे कामगारासही असा उपचार करून घेण्याबाबत सल्ला द्यावा.

(८) जर कोणत्याही व्यक्तीस, वैद्यकीय निरीक्षक, कारखाने / प्रमाणक शल्यचिकित्सक यांची चिकित्सा किंवा निर्णय याबाबत शंका वाटली, तर त्याने मुख्य निरीक्षक कारखाने यांच्याकडे आवाहन करावे आणि मुख्य वैद्यकीय निरीक्षक



कारखाने याने ते प्रकरण कारखान्याचा वैद्यकीय निरीक्षक किंवा या कारणास्तव त्याने रचित केलेल्या व वैद्यकीय निरीक्षक कारखाने हा ज्याचा सदस्य आहे अशा वैद्यकीय समितीकडे निदेश करावे. या प्रकरणी वैद्यकीय निरीक्षकाचा किंवा समितीचा, जसे असेल तसे, निर्णय अंतिम राहील.

८. व्यक्तिगत संरक्षक साधने– (१) कारखान्याच्या कब्जेदाराने ओव्हरॉल्स आणि शिरस्त्राणे मॅंगेनीजच्या कोणत्याही, प्रक्रियेवर नेमलेल्या सर्व व्यक्तींना पुरविली पाहिजेत व ती चांगल्या व स्वच्छ स्थितीत ठेवली पाहिजेत. आणि अशी ओव्हरऑल्स व शिरस्त्राणे, मॅंगेनीज प्रक्रियेवर काम करताना व्यक्तींनी ती वापरली पाहिजेत.

(२) कारखान्याच्या कब्जेदाराने, कामगारांच्या उपयोगासाठी, तातडीच्या प्रसंगी त्यांनी वापरावेत म्हणून संरक्षक श्वसन साधने श्वासोच्छ्वासातून धूळ, धूम, धूर जाऊ नये म्हणून त्यांच्या प्रतिबंधासाठी पुरविली पाहिजेत. अशा साधनांचा पूर्ण संच पुरेशा संख्येने कामाच्या ठिकाणाजवळ सतत सज्ज ठेवला पाहिजे. आणि तत्परतेने वापरता यावीत म्हणून ती साधने नेहमी चांगल्या स्थितीत ठेवली पाहिजेत व योग्य तऱ्हेने निर्वाहित केली पाहिजेत.

(३) कामावर लावलेल्या सर्व कामगारांच्या उपयोगासाठी कब्जेदाराने, व्यक्तिगत संरक्षक साधने स्वच्छ ठेवणे व निर्वाहित करणे यासाठी व चांगल्या व्यवस्थेत ठेवणे व साठवण करणे यासाठी योग्य जागा पुरविली पाहिजे.

९. स्त्रिया व तरुण व्यक्ती यांना कामावर लावण्यास मनाई – (अनुसूची १३ खंड– २ पहा. तीच तरतूद येथे आहे.)

१०. अन्न, पेये इ. कामाच्या खोल्यांत नेण्यास मनाई – (अनुसूची १२ खंड १७ पहा तीच तरतूद येथे आहे.)

११. भोजनगृह – (अनुसूची तीन खंड १७ पहा. तीच तरतूद येथे आहे.)

१२. धुण्याच्या व स्नानाच्या सोयी – (अनुसूची ११ खंड १७ यातील उपखंड (क) वगळून सर्व तरतुदी येथे आहेत.)

१३. प्रसाधन-कक्ष – (अनुसूची १३, खंड १६ यातील उपखंड (ब) वगळून इतर सर्व तरतूद येथे आहे.)

१४. सावधगिरीचा सूचना फलक – (अनुसूची १४ खंड १५ पहा. तीच तरतूद येथे आहे.

## सावधगिरीच्या सूचना

मँगेनीज व मँगेनीज संमिश्रण.

(१) मँगेनीज व त्याच्या संमिश्रणाची धूळ, धूम व धूर श्वासोच्छ्वासास विकारी आहे.

(२) कामाच्या जागेजवळ अन्नाचे सेवन, पेयपान करू नका.

(३) जेवणापूर्वी स्वच्छ स्नान करा.

(४) कामाचे ठिकाण स्वच्छ ठेवा.

(५) पुरविलेले संरक्षित कपडे व संरक्षित साधने वापरा.

(६) जेथे धूळ, धूम, धूर श्वसनात जाणे संभवनीय असेल अशा ठिकाणी काम करणे आवश्यक असेल तर त्यासाठी पुरविलेली संरक्षित श्वसन–यंत्रे वापरा.

(७) जर तुम्हा अवजड शिरस्त्राण, निद्रानाशक किंवा शरीरावर घातक स्पर्शक मिळाली असतील तर व्यवस्थापकास कळवा, की तो तुमच्या तपासणीची व उपचाराची व्यवस्था करील.

## अनुसूची १९

कार्बन डाय-सल्फाईड सामग्री–

१. प्रयुक्ती – ही अनुसूची, जेथे कार्बन डाय–सल्फाईडचे जनित्र होते त्या सर्व विद्युत भट्ट्यांना आणि जनित्रानंतर कार्बन डाय–सल्फाईडचे संकलन, शुद्धीकरण आणि साठवण होते अशा इतर सर्व पात्रांना लागू राहील.

हे नियम या अधिनियमातील व त्याखाली केलेल्या नियमात भर घालणारे असून कोणत्याही तरतुदींना अवमत करणारे नाहीत.

२. बांधणी, उभारणी व कार्यकृती – जेथे विद्युत भट्टी उभारणे असेल आणि जनित्रानंतर कार्बन डाय सल्फाईडचे संकलन व शुद्धीकरण करणे असेल ती इमारत कारखान्याच्या इतर विभागापासून अलग असली पाहिजे आणि जास्त हवा खेळती राहील अशी खुली असली पाहिजे आणि कोणत्याही एका वेळी, आगीच्या किंवा स्फोटाच्या जोखमीत कमीत कमी संख्येचे कामगार धोक्यात सापडतील अशी पात्रांची ठेवण असली पाहिजे.

(ब) प्रत्येक विद्युत भट्टी आणि ज्यात कार्बन डायसल्फाईडचे संकलन, शुद्धीकरण व साठवण केले जाते असे प्रत्येक पात्र, त्याच्या सर्व जोडण्या व साखळ्या या चांगल्या बांधकामाच्या, भक्कम सामग्रीच्या आणि भट्टी व पात्रांना पेलेल अशा



पुरेशा अंतर्गत दाबाच्या असल्या पाहिजेत आणि अशा आकाराच्या असल्या पाहिजेत की त्यांच्या नित्याच्या कामाचे वेळी कार्बन डाय सल्फाईडचा दाब व धूम बंदिस्त स्थितीत राहिला पाहिजे.

(क) भक्कम आणि पुरेशा कांक्रिटच्या किंवा इतर परिणामकारकपणे वरजा-भरता येईल अशा ठावणात विद्युत भट्टीचा तळ भरला पाहिजे.

(ड) प्रत्येक विद्युत भट्टीची बांधणी आणि तिची कार्यान्वितता निर्मात्याच्या सूचनेनुसार झाली पाहिजे आणि बांधणी व कार्यान्वितता ज्या व्यक्तीच्या प्रभारात झाली असेल त्या व्यक्तीच्या सूचनांनुसार झाली पाहिजे.

(इ) भट्टीच्या उष्णतामानाच्या, सल्फर ओघ शोध / शक्तीचा वापर आणि नियतकालीन कोळशाच्या पातळीची तपासणी याबाबतच्या सूचनांची पूर्तता कटाक्षाने झाली पाहिजे.

३. इलेक्ट्रोड्स– (अ) विद्युत–भट्टीत वापरलेली, इलेक्ट्रोड्सची वरची कडी जेव्हा स्टीलची केलेली असेल, तेव्हा सांध्याविना बांधलेले नटकाडे असले पाहिजे. आणि त्यातून सायफन पद्धतीने थंड पाणी जाईल अशी व्यवस्था केलेले इलेक्ट्रोड्स किंवा पाण्याच्या पपाच्या दाबा वाटे जाईल अशी व्यवस्था केलेली असली पाहिजे.

(ब) खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे थंड पाण्याची व्यवस्था स्वयंचलित घंटेशी जोडलेली असली पाहिजे. की इलेक्ट्रोड्समध्ये थंड पाण्याचा खंड पडत जाईल आणि नियंत्रण कक्षात दृक्-श्राव्य घंटेच्या इशारे चालू राहतील व त्याच वेळी भट्टीच्या कार्यकृतीसाठी शक्तीचा पुरवठा थांबेल. घंटेची सोय आणि दबावाची प्रेरक–युक्ती प्रत्येक दिवशी तपासली पाहिजे.

४. कोळशाच्या पातळीचे निर्वाहन – जेव्हा भट्टी कार्यरत असेल तेव्हा इलेक्ट्रोड्स कोळशाच्या आवरणाखाली झाले पाहिजेत.

५. कोळसा विलगीकरण – संकलक व नळया यामध्ये कोळशाच्या तुकड्याचे कण जाण्यात प्रतिबंध होईल अशी परिणामकारक व्यवस्था केली पाहिजे.

६. भेद्य भंजन व सुरक्षा मोहोर – (अ) पुरेशा आकाराचे निदान दोन भेद्य भंजन की दोवरा दाबहानीने फुटेल अशी तरतूद प्रत्येक भट्टीला केली पाहिजे व भट्टीच्या टोकावर बरळपणे तरी बढवले पाहिजे किंवा भट्टी लगत शक्य असेल तेथवर प्रत्येक स्वतंत्र नळीमार्फत लावले पाहिजे.

(ब) जलसुरक्षा मोहोर पुरविली पाहिजे आणि विद्युत भट्टी आणि सल्फर पृथक पासून वरील टोकावर लावली पाहिजे.

७. पिरॉमीटर आणि मॅनोमीटर – प्रत्येक विद्युत भट्टीला व्यवहारतः जितके अचूक तितके उष्णतामान दर्शविणारे भट्टीच्या निरनिराळ्या विद्युत, पुरेशा संख्येचे पिरॉमीटर्स बसविले पाहिजेत. उष्णतामानवाचक तबकडी नियंत्रण कक्षात लावली पाहिजे.

(१) सल्फर विलवीकरणापूर्वी व नंतर आणि–

(२) प्राथमिक व संकलके यातील दाब दर्शविणारे मॅनोमीटर किंवा इतर कोणतेही इशारे पुरविले पाहिजेत.

८. वायूच्या पुलप्रवाहास प्रतिबंध – कार्बन डाय सल्फाईड वाहून नेणाऱ्या सर्व नळ्या, चेक व्हॉल्व्हने, जलमोहोरने किंवा परिणामकारक दुसऱ्या साधनांनी विद्युत भट्टी बंद करताना, वायूचा पुलप्रवाह त्यात जाऊ नये, त्यास प्रतिबंध होईल अशा योग्य स्थितीत जोडले पाहिजे.

(२) पुरेशा दर्जाची उंचावरील टाकी किंवा टाक्या, जेव्हा विद्युतशक्तीचे पंजन वगैरे होईल अशा तातडीच्या प्रसंगी तत्काळ सफळ पुढची वेळसाठी पंप पाण्याचा पुरवठा अशा तऱ्हेने पुरविली पाहिजे की अशा प्रारंभीच्या शक्यतेपर्यंत निदान तो चालू असेल आणि भट्टी बंद होईल अशा कामकाज पद्धतीची पूर्तता होईपर्यंत.

९. विद्युत भट्ट्यांची तपासणी व निर्वाहन – सक्षम व्यक्तीने प्रत्येक विद्युत भट्टीची अंतर्गत तपासणी केली पाहिजे.

( i ) उभारणी झाल्यानंतर पण कार्यान्वित होण्यापूर्वी

( ii ) पुनर्बांधणी किंवा दुरुस्तीनंतर कार्यान्वित करण्यापूर्वी आणि

( iii ) नियतकालीन प्रत्येक वेळी भट्टी, स्वच्छ करण्यासाठी, राख काढण्यासाठी किंवा इलेक्ट्रोड्स बदलण्यासाठी उघडली पाहिजे.

(ब) जेव्हा स्वच्छ करण्यासाठी व राख काढण्यासाठी विद्युत भट्टी बंद असेल, तेव्हा–

१०. नोंदणीचे निर्वाहन – खालील कालनोंदणी लॉगबुकात निर्वाहित केली पाहिजे–

( i ) खंड ७ (ब) ( i ) आणि ( ii ) यांत स्पष्ट केलेल्या विद्युत मॅनोमीटरचे वाचन–

( ii ) पॅरॉमीटरने दर्शविलेले दोनचे तपमान आणि इतर सल्फर सेपरेटरच्या जवळील इतर महत्त्वाचा आणि प्राथमिक व दुय्यम संकलने



( iii ) जेव्हा इलेक्ट्रोड्समध्ये वाफकनद्वारा पाण्याचा प्रवाह व पाण्याचे तपमान मात्र वाफकनद्वारा होणारा पाण्याचा प्रवाह किमान आवश्यकतेपेक्षा निश्चितपणे वाढ देणे धार्जिणे असते तेव्हा आणि तळमजले शक्तीत घट होते तेव्हा उपलब्ध होणारी तजवीज, पाण्याचा प्रवाह असो वा नसो, तेव्हा उपखंडातील तरतूद लागू करू नये.

( iv ) वापरलेला प्राथमिक व दुय्यम दाब आणि ओघ.

११. विद्युत सामग्री, तार बांधण्या आणि जोडण्या – सर्व इमारत, की ज्यात कार्बन डायसल्फाईडचे शुद्धीकरण व साठवण होते, इलेक्ट्रिकल सामग्रीने, तार बांधणीने आणि जोडण्याने सज्ज केली पाहिजे आणि आग व स्फोट यांपासून पुरेशी संरक्षित असली पाहिजे.

१२. धूम्रपान निषेध – इमारतीत की जेथे कार्बन डायसल्फाईडचे शुद्धीकरण व साठवण होते तेथे व्यक्तीने धूम्रपान करता कामा नये, किंवा आगपेटी, सिगरेट किंवा चुली ज्योत किंवा चुली ज्योत पेटेल अशी कोणतीही वस्तू, किंवा ठिणगी नेता कामा नये आणि धूम्रपान निषेध कक्षात, आणि आगपेटी, सिगरेट, चुली ज्योत पेटेल अशी कोणतीही वस्तू किंवा ठिणगी नेण्यास प्रतिबंध अशा कक्षात बहुसंख्य कामगारांना समजेल अशा भाषेत नोटीस लावली पाहिजे.

१३. बाहेर जाण्याचा मार्ग–संकटाच्या प्रसंगी, सत्वर तितक्या लौकर सुरक्षित जागी जाणे सोयीस्कर व्हावे म्हणून बाहेर जाण्याचे पुरेसे मार्ग असले पाहिजेत. प्रत्येक इमारतीतील मजल्याच्या जागी, समोरासमोर वास्तव अंतरात निदान दोन पुरेशा रुंदीचे असले पाहिजेत. हे सर्व वेळी सर्व अडथळ्यापासून असे मुक्त असले पाहिजेत की त्यातून जाणे नेहमी सुलभ व्हावे.

१४. आगीच्या प्रसंगी सूचना – आगीच्या किंवा स्फोटाच्या प्रसंगी, विशेषतः वापरात असलेली पुरेशा तरतुदीची सूचना दिली पाहिजे आणि जेव्हा विशेष वापर करणे नसेल तेव्हा इतर कोणत्याही कार्यान्वीकरणाने दिली पाहिजे.

१५. अग्निशमन साधने – (अ) योग्य व पुरेशा संख्येने अग्निनिर्वापके किंवा अग्निनिर्वापकाची सामग्री जोखमीशी सामना देणारी, साठवलेल्या वस्तुसामग्रीचे स्वरूप व संख्या उपक्रम व अवलंबी असेल अशी सज्ज ठेवली पाहिजे.

( ब ) अग्निनिर्वापके किंवा इतर सामग्री कशी वापरावीत यासंबंधीच्या स्पष्ट सूचना बहुसंख्य कामगारांना समजेल अशा भाषेत मुद्रित करून त्या प्रत्येक निर्वापकावर किंवा इतर साधनांवर डकविल्या पाहिजेत. त्यांच्या वापरासाठी प्रशिक्षित व्यक्ती तेथे असली पाहिजे.

१६. संचयित सल्फर – (अ) संचयित सल्फरच्या साठवणीसाठी खुली किंवा भिंतीमधून वायू काढणाऱ्या इंजिनातून ठिणगी उडून धोका उद्‌भवेल अशी धोक्याची बाब विचारात घेऊन ठेवली पाहिजे. आणि ज्योत, जळती विडी/सिगारेट काड्याची पेटी किंवा आग लागेल अशी कोणतीही वस्तु, संचयित सल्फरच्या हाताळणीच्या वेळी कुठल्या लोखंडी संपर्कात होऊ नये अशी खबरदारी घेतली पाहिजे.

(ब) संचयित सल्फरच्या सर्व जोडण्या, पुरेशी जळती हवा असेल अशा, निमान धूळ बसेल अशा पक्क्या अग्निरोधक बांधकामात असल्या पाहिजेत.

(क) जोडण्यात असलेले संचयित सल्फर अशा पद्धतीने हाताळले पाहिजे, की कमीत कमी धुळीचा लोट उठवा व ज्योत जळती विडी / सिगारेट किंवा आग-पेटी किंवा इतर अग्निप्रयोगाने हाताळणीच्या प्रसंगी वापरली जाता कामा नये. या वस्तूंवर उपयोगात

(ड) कुस्तीचे वेळी, ज्योत, उष्णता किंवा हवाने या वस्तूंवर उपयोगात आणावयाची हत्यारे, जेथे संचयित सल्फरचो साठवणूक असेल तेथे, जोडण्याच्या कामी वापरता कामा नये.

१७. द्रव सल्फर – खुली ज्योत, विद्युत ठिणग्या आणि अग्नि-प्रदीपनाचा इतर उगम, धोंव धूम्रपान, आगपेटी वगैरे, वितळलेल्या सल्फरपासून दूर ठेवावेत.

१८. शिक्षण आणि पर्यवेक्षण – (अ) सर्व विद्युत भट्ट्या आणि कार्बन डाय सल्फाईडच्या शुद्धीकरणाशी, साठवणीशी संबंधित असणारी सर्व पात्रे जेव्हा भट्ट्या आणि पात्रे कार्यान्वित असतील तेव्हा सर्व वेळी पुरेसा पर्यवेक्षणाखाली असली पाहिजेत.

(ब) विद्युत भट्ट्या व पात्रे यांचे कार्यवहन व निर्वाहन ज्याच्या प्रभारा-खाली असेल अशा व्यक्तीने हायस्कूल लिव्हिंग सर्टिफिकेट परीक्षेसमान अर्हताप्राप्त केलेली असली पाहिजे आणि पुरेसे प्रशिक्षण घेतलेले असले पाहिजे.

१९. धुण्याच्या सोयी – कार्बेटरांचे, कामावर नेमलेल्या सर्व कामगारांच्या उपयोगासाठी स्वच्छ व चांगल्या दुरुस्त केलेल्या स्थितीत आच्छादन असलेली निदान एक तोटी किंवा अशा प्रत्येक पाच कामगारांना सतत पाणी पुरवठा होईल अशी धुण्याची जागा पुरविली पाहिजे. व तोटी या उभे नळ यामध्ये १२० सेंटी-मीटरपेक्षा कमी अंतर असता कामा नये व पुरेसा साबणाचा आणि स्वच्छ टॉवेलचा पुरवठा निरीक्षक आदेश देईल त्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तिगत कामगारास केला पाहिजे.

सल्फर साठवणीत, हाताळणीत आणि वितळवणीच्या कार्यकृतीत नेमलेल्या सर्व कामगारांना नखे साफ करण्याचे कुंचले पुरविले पाहिजेत.



२०. व्यक्तिगत संरक्षक साधने – (अ) योग्य गॉगल्स व खिसे नसलेले अंगावरील संरक्षित कपडे, हातमोजे, पादत्राणे, कामगारांना त्यांच्या उपयोगासाठी पुरविले पाहिजेत–

(i) जेव्हा, प्रवाहावर नियंत्रण ठवणारे व्हॉल्व्ह्ज व तोटी इ. कार्यरत असेल

(ii) सल्फर पात्रातून द्रव सल्फर काढले असेल, आणि

(iii) कोळसा किंवा सल्फर हाताळले जात असेल.

(ब) योग्य श्वासोच्छ्वासक संरक्षक साधने पुरविली पाहिजेत व अप-घातात्मक किंवा संकटाच्या प्रसंगी वापरण्यासाठी समुचित जागी ठेवली पाहिजेत.

(क) अशी सर्व संरक्षित साधने योग्य, कार्यक्षम व स्वच्छ ठेवण्याची व्यवस्था केली पाहिजे.

२१. प्रसाधन कक्ष – प्रक्रियेत कामावर लावलेल्या सर्व कामगारांच्या उप-योगासाठी कामाच्या वेळी कपडे ठेवण्यासाठी प्रसाधन कक्ष पुरविला पाहिजे आणि प्रसाधन कक्षापासून स्वतंत्र जागा कामाचे किंवा इतर कपडे ठेवण्यासाठी असली पाहिजे. वास्तव्य स्वतःच्या प्रकाराबाबी अशी जागा असली पाहिजे व ती स्वच्छ ठेवली पाहिजे.

२२. अनधिकृत व्यक्ती – फक्त दुरुस्ती व देखभाल करणारी, याच कार्य कृतीशी प्रत्यक्षतः संबंधित असणारी, आणि अशा अधिकृत व्यक्तीबरोबर असणारी व्यक्तीच फक्त जागेत प्रवेश करतील.

## अनुसूची २०

बेनझीन.

(१) बेनझीनपासून होणाऱ्या गंभीर विषबाधापासून संरक्षण व्हावे म्हणून अनुसूची आहे आणि बेनझीन किंवा बेनझीनमध्ये असलेले पदार्थ निर्मित केले जात हाताळले जातात किंवा उपयोग केला जातो, अशा कारखान्याच्या किंवा त्या भागाला लागू केले आहे.

२. व्याख्या – या अनुसूचीच्या प्रयोजनासाठी–

(अ) 'बेनझीन असलेले पदार्थ' म्हणजे, १ प्रतिशतपेक्षा अधिक असलेला पदार्थ.

(ब) 'पर्यायी' म्हणजे निरुपद्रवी किंवा बेनझीनपेक्षा कमी उप बेनझीनला पर्याय म्हणून वापरणे शक्य असेल असे रसायन.

(क) 'झाकलेली पद्धत' म्हणजे, अशी पद्धत की कामाच्या वातावरणामध्ये बेनझीनच्या धुराला बाहेर जाऊ देणार नाही.

(ड) 'कार्यक्षम बहिःसर्जक वायू' म्हणजे, (अनुसूचीची ४ व्याख्या (अ) पहा. तीच व्याख्या येथे आहे.)

३. निषेध आणि पर्याय – (अ) झोड पद्धतीने काम जेथे केले जाते तेथे, किंवा प्रक्रिया अशा पद्धतीने केली जाते की झोड पद्धतीत केली जाणारी सुरक्षा समान पद्धत असल्याचे ठरविले असेल असे असल्याशिवाय बेनझीन किंवा बेनझीन असलेले पदार्थ द्रावण म्हणून वा मिश्रण म्हणून वापरता कामा नये.

(ब) जेथे योग्य पर्याय उपलब्ध असेल, तेथे बेनझीन ऐवजी किंवा बेनझीन असलेल्या पदार्थांऐवजी ते वापरले पाहिजेत. परिशिष्ट १ मध्ये स्पष्ट केलेल्या प्रक्रियेस, ही तरतूद, काही झाले तरी, लागू करता कामा नये.

(क) राज्य शासनाच्या संमतीच्या अधीन, मुख्य निरीक्षकाने, खंड २ (अ) मध्ये असलेल्या प्रतिबंधापासूनच्या मुक्ततेस मुभा द्यावी आणि तसेच उपखंड (ब) च्या तरतुदीपासून नियोक्ता आणि संबंधित कामगार यांच्याशी सल्लामसलत करून ठरविलेल्या कालमुदतीत व परिस्थितीत तात्पुरत्या मुक्ततेस मुभा द्यावी.

४. विशुद्ध श्वासोच्छ्वासापासून संरक्षण – (अ) बेनझीनचा किंवा बेनझीन असलेल्या पदार्थांचा ज्यात वापर केला जातो अशी प्रक्रिया जास्तीत जास्त करून व्यवहार्यतः झोडपद्धतीने केली पाहिजे.

(ब) जेथे झोडपद्धतीने प्रक्रिया केली जाणे व्यवहार्य नसेल, ज्या कार्यकक्षेत बेनझीन किंवा बेनझीन असलेल्या अशा पदार्थांची प्रक्रिया केली जात असेल ती कार्यकक्षा कार्यक्षम बहिःसर्जक वायूच्या साधनांनी सज्ज केली पाहिजे किंवा कार्यकक्षातील हवेतील बाहेर जाणारा मार्ग बेनझीनच्या धुरापासून रोखला जावा की, बेनझीनचे धुराचे हवेतील केंद्रीकरण प्रति दशलक्ष २५ भागापेक्षा किंवा ८० MG/M³ वजनाने जास्त होता कामा नये.

(क) हवेतील बेनझीनच्या धुराच्या केंद्रीकरणाच्या मापनासाठी हवेचे पृथक्करण प्रत्येक ८ तासांनी केले पाहिजे किंवा बेनझीन असलेली प्रक्रिया केली जाते तेथील मुख्य निरीक्षक आदेश देईल त्याप्रमाणे केले पाहिजे आणि या कारणासाठी खास निर्वाहित केलेल्या पुस्तकात अशा पृथक्करणाचा निर्णय नोंदविला पाहिजे. जर, हवेतील बेनझीनच्या धुराचे केंद्रीकरण, हवेच्या पृथक्करणात जसे मोजले असेल तसे, प्रतिदशलक्ष २५ भागांपेक्षा किंवा वजनाने ८० MG/M³ जास्त असेल तर आवश्यकतेप्रमाणे मुख्य निरीक्षकास अशा वाढीची कारणे नमूद करून तातडीने अहवालित केले पाहिजे.



(ड) जे कामगारांवर विशेष कारणास्तव, कार्यकक्षेच्या हवेतील बेनझीनच्या केंद्रीकरणाच्यावर खंड (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कमाल वाढीमुळे धोक्यात येणे संभवनीय असेल, त्यांना योग्य श्वासोच्छ्वासाची साधने किंवा मुखवटे पुरविले पाहिजेत. अशा धोक्याचा काळ शक्य असेल तितका मर्यादित असला पाहिजे.

५. त्वचा संसर्गापासून उपाय योजना – (अ) द्रवरूप बेनझीनच्या किंवा बेनझीन असलेल्या द्रवरूप पदार्थांच्या संसर्गात जे कामगार येणे संभवनीय असेल त्यांना योग्य हातमोजे, ॲप्रन्स, बूट, आणि तोंडे रोखणे आवश्यक असेल असे वाटल्यास, बेनझीनमुळे किंवा त्याच्या धुरामुळे विघातकता येणार नाही अशी सामग्री पुरविली पाहिजे.

(ब) उपखंड (अ) यांत विनिर्दिष्ट केलेली संरक्षित साधने चांगल्या स्थितीत निर्वाहित केली पाहिजेत आणि नियमितपणे तपासली पाहिजेत.)

६. स्त्रिया व तरुण व्यक्ती यांना कामावर लावण्यास मर्यादा – (अनुसूची १ खंड २ पहा. तीच तरतूद येथे आहे.)

७. लेबलिंग – बेनझीन किंवा बेनझीन असलेला पदार्थ असलेल्या प्रत्येक डब्यावर 'बेनझीन' शब्द असेल आणि मान्य धोक्याची खूण स्पष्ट दिसेल आणि बेनझीन संसर्गाची धोक्याची माहिती असलेले आणि श्वासाद्वारेही रसायनाची सूचना देणारे लेबल लावले पाहिजे.

८. बेनझीनचा अयोग्य वापर – (अ) हात स्वच्छ करण्यासाठी किंवा कामाचे कपडे स्वच्छ करण्यासाठी कामगारांना बेनझीन किंवा बेनझीन असलेले पदार्थ वापरण्यास बंदी केली पाहिजे.

(ब) अशा अयोग्य वापरापासून होणाऱ्या संभवनीय धोक्याची कल्पना कामगारांना दिली पाहिजे.

९. कार्यकक्षेत अन्न इ. खा लेवनास मनाई – (अनुसूची ६ खंड ९ पहा; तीच तरतूद येथे आहे.)

१०. धोक्याबाबतची सूचना – बेनझीन किंवा बेनझीन असलेल्या पदार्थांच्या मालमत्तेच्या, की ज्याच हाताळणे असेल आणि ज्यापासून धोका उद्भवेल अशाची पूर्ण कल्पना प्रत्येक कामगारास त्याच्या प्रथम नियुक्तीचे वेळी त्यास दिली पाहिजे. संकटप्रसंगी त्याच्याशी काम करताना घ्यावयाची उपाय-योजनांचीही कल्पना कामगारांना दिली पाहिजे.

११. सावधगिरीची सूचना – परिशिष्ट 'ब' मध्ये स्पष्ट केलेल्या नमुन्यात

आणि बहुसंख्य कामगारांना समजेल व सहजपणे वाचता येईल अशा भाषेत, जेथे बेनझीनची निर्मिती, हाताळणी व वापर केला जातो अशा कार्यक्षेत्रातील प्रमुख ठिकाणी लावली पाहिजे.

१२. स्नानाच्या व धुण्याच्या सोयी – ( i ) अनुसूची ११ खंड १६ मधील उपखंड ( क ) व उपखंड (२) सोडून इतर सर्व तरतूद येथे घ्यावी. )

( ii ) प्रसाधन कक्ष – प्रत्येक कामगारास कपाट असलेले दोन विभाग पाडलेले; एक बाहेरील कपडे ठेवण्यासाठी व दुसरे कामाचे कपडे ठेवण्यासाठी, असे प्रसाधन कक्ष पुरविले पाहिजे.

( iii ) भोजन गृह – खाद्यगृह असेल किंवा कामगारांना जेवण घेता येईल अशी योग्य व्यवस्था असलेले, अन्न गरम करण्याची सोय असलेले, मेज व बाके यांनी सज्ज केलेले इतर आवश्यक सोयी असलेले भोजनगृह पुरविले पाहिजे.

१३. वैद्यकीय तपासणी – (अ) बेनझीन किंवा बेनझीन असलेले पदार्थ असलेल्या प्रक्रियेत नेमणूक असलेल्या कामगारांची—

(I) नियुक्तीच्या तंदुरुस्तीसाठी नियुक्ती-पूर्व कामगाराची रक्त चाचणीसह संपूर्ण वैद्यकीय वैद्यकीय तपासणी, वैद्यकीय निरीक्षक, कारखाने / प्रमाणक शल्य-चिकित्सक यांनी केली पाहिजे.

(ii) रक्त चाचणीसह व इतर प्रयोगशालेय चाचणीसह प्रत्येक ६ महिन्यांच्या अवधीतरात नियतकालीन वैद्यकीय तपासणी, कारखान्याच्या वैद्यकीय अधिकाऱ्याने, प्रयोगशाळेच्या सहाय्याने केली पाहिजे.

(ब) नियुक्ति-पूर्व आणि नियतकालीन वैद्यकीय तपासणीचे-यात रक्त चाचणी, समाविष्ट प्रमाणपत्र, नमुना क्र. ७ मधील आरोग्य पुस्तकात नोंदले पाहिजे. आणि वैद्यकीय निरीक्षक कारखाने / प्रमाणक शल्यचिकित्सक यांनी नमुना क्रमांक ३२ मध्ये दिले पाहिजे व मागणी केल्यावर निरीक्षकास सादर केले पाहिजे.

(क) जर कारखान्याचा वैद्यकीय अधिकारी यांचे परीक्षणानंतर कोणत्याही वेळी असे मत झाले, बेनझेनमुळे कोणत्याही कामगाराची लक्षणे किंवा विषाच्या विकसित झाल्या आहेत तर त्या पुस्तकात त्याची नोंद त्याने केली पाहिजे आणि व्यवस्थापकास लेखी कळविले पाहिजे.

कारखान्याच्या वैद्यकीय अधिकाऱ्याकडून माहिती मिळाल्यावर, कारखान्याच्या व्यवस्थापकाने, अशा प्रकारे व्यथित झालेल्या कामगारास वैद्यकीय निरीक्षक, कारखाने / प्रमाण शल्य-चिकित्सक यांजकडे पाठविले पाहिजे की जो, स्वतःच्या समाधानानंतर, कारखान्याच्या वैद्यकीय अधिकाऱ्याच्या निष्कर्षासह स्वतःच्या



समाधानानंतर आणि आवश्यक परीक्षण केल्यानंतर, कामगारास तात्पुरते बदलण्याचा किंवा प्रक्रियेतून कामगारास निलंबित केल्याचा आदेश देईल.

(ड) वैद्यकीय तपासणीची व्यवस्था कब्जेदाराने किंवा कारखान्याच्या व्यवस्थापकाने केली पाहिजे आणि परीक्षा केलेल्या कामगाराने त्यासाठी कोणताही खर्च करता कामा नये.

१४. सूट – ( अनुसूची १३ खंड २२ पहा. तीच तरतूद येथे आहे. यात 'राज्य शासनाने किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाचे अधीन मुख्य निरीक्षकाने' हा मजकूर अधिक आहे. )

## परिशिष्ट १

(१) बेनझेनची निर्मिती

(२) रासायनिक एकीकरणाच्या उपयोगासाठी बेनझेनचा वापर जेथे होतो-

(३) इंधन म्हणून वापरावयाचे मोटर स्पिरिट–

## परिशिष्ट २

(१) धोकादायक – ( i ) उघडपणे बेनझेन किंवा बेनझेन असलेले पदार्थ

( ii ) बेनझेन धुराच्या विलंबित व आवर्तित श्वास की ज्याचा परिणाम विषारी इजा व निश्चित विषार होतो.

( iii ) त्वचा रोगाला किंवा इतर रोगाला कारणीभूत होतो अशा त्वचेत मुरणारा बेनझीन.

(ब) प्रतिबंधक उपाय करणे ( i ) बेनझेन धुराचा श्वासोच्छ्वास टाळणे.

( ii ) बेनझेनचा त्वचेचा विलंबित व आवर्तित संपर्क टाळणे.

( iii ) बेनझेनने भिजवलेले किंवा ओले झालेले कपडे तत्काल काढून टाका.

( iv ) बेनझेनच्या धुराच्या उच्च केंद्रीकरणामुळे, विषाच्या विकासामुळे आणि लक्षणांमुळे जसे डिझिनेस, श्वासोच्छ्वासातील त्रास, अतिरिक्त उद्दीपन, आणि सावधानतेचा अभाव. जर तुम्ही व्यग्र झाला असाल तर तात्काळ तुमच्या कारखान्याच्या व्यवस्थापकाला कळवा.

( v ) बेनझेनचे सर्व डबे बंद करून ठेवा.

( vi ) बेनझीन व बेनझेन असलेले पदार्थ जमिनीवर सांडले जाऊ नयेत म्हणून काळजीपूर्वक प्रक्रिया, हाताळणी व वापर करा.

( vii ) मूहाची ठेवण चांगली निर्वाहित करा.

प्रकरण : ९

(क) संरक्षित साधनांना ... ले असा भासेल, जेथे दुतम आले आहे अशा ठिकाणी ... कार्यकक्षातील प्रमुख

(ii) संकटकाळी स्वर ... १६ यातील किंवा एअर सिलिंडर वापर

(iii) हातमोजे, ॲप्रन्स, ... विभाग आणि शरीराच्या भागाशी होण्याचे ... साठी,

(ड) बेनझेनच्या विषाची तीव्रता ... उपाय योजना केलेली असली पाहिजे–

(i) जर बेनझेनमुळे ओले झालेले कपडे अ... टाका.

(ii) द्रव बेनझेन डोळ्यात गेले तर निदान १५ मि... पाण्याने काळजीपूर्वक धुवून काढा आणि तातडीने वैद्यकीय उपच...

(iii) बेनझेन धुराच्या अचानक स्फोटाच्या प्रकरणी तातडीने (डॉक्टरला) बोलवा. तो येईपर्यंत खाली दर्शविल्याप्रमाणे करा–

जर धोक्यात असलेली व्यक्ती सावध असेल; तर–

(अ) मोकळ्या जागी खुल्या हवेत हिंडू द्या.

(ब) उशीशिवाय निजू द्या आणि गरम आणि शांत राहू द्या.

जर धोक्यात असलेली बेसावध असेल; तर

(अ) त्यास निजू द्या. विशेषतः त्याचे कुशीवर आणि डोके खाली असावे.

(ब) कृत्रिम दात, च्युइंग गम, तंबाखू किंवा अन्य इतर बाहेरील जिन्नस, जे त्याच्या तोंडात असतील ते काढून टाका.

(क) श्वासोच्छ्वासात त्रास होतो आहे असे आढळल्यास कृत्रिम श्वासोच्छ्वास त्यास द्या.

(ड) श्वासोच्छ्वास मंद होत असेल, किंवा यांवला (कानशी, ओठ, कान, बोटे, नखे, इ. निळे झाले असेल) तर त्यास ऑक्सिजन द्या किंवा ऑक्सिजन कार्बन डायऑक्साईड मिश्रण द्या. आवश्यक असल्यास कृत्रिम श्वासोच्छ्वास द्या. फक्त प्रशिक्षित व्यक्तीनेच ऑक्सिजन दिला पाहिजे. (नियम ११४ खालील सर्व अनुसूची येथे समाप्त.)

११५. अपघाताचे सूचनापत्रक – (१) येथे जोडलेल्या अनुसूचीच्या खंड (१) मधील उपखंड (१) मध्ये उल्लेख केलेला एखादा अपघात किंवा खंड २ मध्ये उल्लेखिल्याप्रमाणे एखादी घटना एखाद्या कारखान्यात घडली तर त्या कारखान्याच्या व्यवस्थापकाने अशा अपघात किंवा अशी घटना घडल्यापासून २४ तासांच्या आत त्यासंबंधीची नोटीस निरीक्षक आणि या अधिनियमानुसार अपर



निरीक्षक म्हणून नियुक्त केलेला वैद्यकीय प्रशासन अधिकारी, राज्यकामगार विमा योजना, मुंबई, यांना दूरध्वनीवरून, खास संदेश वाहकामार्फत किंवा तारेने पाठविली पाहिजे; आणि जर अपघात प्राणघातक असेल किंवा प्राणघातक ठरणे संभवनीय होईल इतक्या गंभीर स्वरूपाचा असेल तर पुढील नोटीस,

(अ) जिल्हा दंडाधिकारी अथवा उपविभागीय दंडाधिकारी आणि,

(ब) अगदी जवळच्या पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांनाही पाठविली पाहिजे.

(२) अपघात किंवा घटना घडल्यापासून १२ तासांच्या आत वर उल्लेखिलेल्या प्राधिकाऱ्यांना कारखान्याच्या व्यवस्थापनाने नमुना २४ किंवा राज्य कामगार विमा (सर्वसाधारण) विनियम, १९५० यास जोडलेल्या नमुना क्र. १६ लेखी अहवाल पाठवून अशा प्रकारे दिलेल्या नोटिशीला पुष्टी दिली पाहिजे.

(३) एखाद्या कारखान्यात उक्त खंड १, उपखंड (ब) मध्ये उल्लेखिल्याप्रमाणे किरकोळ स्वरूपाचा अपघात घडला असेल त्या बाबतीत व्यवस्थापकाने उक्त खंड (ब) मध्ये उल्लेखिलेली मुदत संपल्यानंतर २४ तासांच्या आत निरीक्षकाकडे नमुना २४ किंवा राज्य कामगार विमा (सर्वसाधारण) विनियम, १९५० यास जोडलेल्या नमुना क्र. १६ मध्ये त्यासंबंधीची नोटीस पाठवली पाहिजे.

(४) जर एखाद्या अपघाताच्या प्रकरणी त्यात इजा झालेली व्यक्ती अशा अपघातामुळे त्यानंतर लगेच मरण पावली तर तिच्या मृत्यूची वार्ता जेव्हा मिळेल तेव्हा घटना घडल्यापासून २४ तासांच्या आत व्यवस्थापकाने ती खालील अधिकाऱ्यांना दूरध्वनीवरून, खास संदेश वाहकामार्फत किंवा तारेने पाठवली पाहिजे.

(अ) निरीक्षक

(ब) वैद्यकीय प्रशासन अधिकारी, राज्यकामगार विमा योजना, मुंबई

(क) जिल्हा दंडाधिकारी किंवा उपविभागीय दंडाधिकारी, आणि

(ड) अगदी नजिकच्या पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी.

स्पष्टीकरण – या नियमाच्या प्रयोजनासाठी 'गंभीर स्वरूपाचा अपघात' म्हणजे–

(एक) शरीराच्या एखाद्या भागाची किंवा अवयवाची किंवा अवयवाच्या भागाची तात्काळ हानी होणे–

(दोन) शरीराच्या कोणत्याही भागास ज्यामुळे उघड हानी पोहोचेल अशा

(क) संरक्षित साधनाचा वापर करणे (i) जेथे बेनझेनचे केंद्रीकरण दुष्टतम झाले आहे अशा ठिकाणी संरक्षित कपडे व साधने वापरा.

(ii) संकटकाळी स्वयंजनित्याचा ऑक्सिजनक मुखरक्षक किंवा ऑक्सिजन किंवा एअर सिलिंडर वापरा.

(iii) हातमोजे, ॲप्रन, गॉगल्स आणि गम-बूट बेनझेनचा संपर्क त्वचेशी आणि शरीराच्या भागाशी होण्याचे टाळा.

(ड) बेनझेनच्या विषाची तीव्रता असेल त्या प्रकरणी प्रथमोपचाराची उपाय योजना केलेली असली पाहिजे–

(i) जर बेनझेनमुळे ओले झालेले कपडे असतील तर ते तावडतोब [illegible] टाका.

(ii) द्रव बेनझेन डोळ्यात गेले तर निदान १५ मि[illegible] पाण्याने काळजीपूर्वक धुवून काढा आणि तावडतोब वैद्यकीय उपच[illegible].

(iii) बेनझेन द्रव्याच्या अचानक स्फोटाच्या प्रकरणी तावडतो[illegible] (डॉक्टरला) बोलवा. तो येईपर्यंत खाली दर्शविल्याप्रमाणे करा–

जर धोक्यात असलेली व्यक्ती सावध असेल; तर–

(अ) मोकळ्या जागी खुल्या हवेत हिंडू द्या.

(ब) उशीशिवाय निजू द्या आणि गरम आणि शांत राहू द्या.

जर धोक्यात असलेली बेसावध असेल; तर

(अ) त्यास निजू द्या. विशेषतः डावे कुशीवर आणि डोके खाली असावे.

(ब) कृत्रिम दात, च्यूइंग गम, तंबाखू किंवा अशीच इतर बाहेरील जिनस, जे त्याच्या तोंडात असतील ते काढून टाका.

(क) श्वासोच्छ्वासात त्रास होतो आहे असे आढळल्यास कृत्रिम श्वासोच्छ्वास त्यास द्या.

(ड) श्वासोच्छ्वास मंद होत असेल, किंवा थांबला (कातडी, ओठ, कान, बोटे, नखे, इ. निळे झाले असेल) तर त्यास ऑक्सिजन द्या किंवा ऑक्सिजन कार्बन डायऑक्साईड मिश्रण द्या. आवश्यक असल्यास कृत्रिम श्वासोच्छ्वास द्या.

फक्त प्रशिक्षित व्यक्तीनेच ऑक्सिजन दिला पाहिजे. (नियम ११४ खालील सर्व अनुसूची येथे समाप्त.)

११५. अपघाताचे सूचनापत्रक – (१) येथे जोडलेल्या अनुसूचीच्या खंड (१) मधील उपखंड (१) मध्ये उल्लेख केलेला एखादा अपघात किंवा खंड २ मध्ये उल्लेखिल्याप्रमाणे एखादी घटना एखाद्या कारखान्यात घडली तर त्या कारखान्याच्या व्यवस्थापकाने असा अपघात किंवा अशी घटना घडल्यापासून २४ तासांच्या आत त्यासंबंधीची नोटीस निरीक्षक आणि या अधिनियमानुसार अपर



निरीक्षक म्हणून नियुक्त केलेला वैद्यकीय प्रशासन अधिकारी, राज्यकामगार विमा योजना, मुंबई, यांना दूरध्वनीवरून, खास संदेश वाहकामार्फत किंवा तारेने पाठविली पाहिजे; आणि जर अपघात प्राणघातक असेल किंवा प्राणघातक ठरणे संभवनीय होईल इतक्या गंभीर स्वरूपाचा असेल तर पूर्वोक्त नोटीस,

(अ) जिल्हा दंडाधिकारी अथवा उपविभागीय दंडाधिकारी आणि,

(ब) अगदी जवळच्या पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांनाही पाठविली पाहिजे.

(२) अपघात किंवा घटना घडल्यापासून १२ तासांच्या आत वर उल्लेखिलेल्या प्राधिकाऱ्यांना कारखान्याच्या व्यवस्थापकाने नमुना २४ किंवा राज्य कामगार विमा (सर्वसाधारण) विनियम, १९५० यास जोडलेल्या नमुना क्र. १६ मधील अहवाल पाठवून अशा प्रकारे दिलेल्या नोटिशीला पुष्टी दिली पाहिजे.

(३) एखाद्या कारखान्यात उक्त खंड १, उपखंड (ब) मध्ये उल्लेखिल्याप्रमाणे किरकोळ स्वरूपाचा अपघात घडला असेल त्या बाबतीत व्यवस्थापकाने उक्त खंड (ब) मध्ये उल्लेखिलेली मुदत संपल्यानंतर ६४ तासांच्या आत निरीक्षकाकडे नमुना २४ किंवा राज्य कामगार विमा (सर्वसाधारण) विनियम, १९५० यास जोडलेल्या नमुना क्र. १६ मध्ये त्यासंबंधीची नोटीस पाठवली पाहिजे.

(४) जर एखाद्या अपघाताच्या प्रकरणी त्यात इजा झालेली व्यक्ती अशा अपघातामुळे त्यानंतर लगेच मरण पावली तर तिच्या मृत्यूची बातमी जेव्हा मिळेल तेव्हा घटना घडल्यापासून २४ तासांच्या आत व्यवस्थापकाने ती खालील अधिकाऱ्यांना दूरध्वनीवरून, खास संदेश वाहकामार्फत किंवा तारेने पाठवली पाहिजे.

(अ) निरीक्षक

(ब) वैद्यकीय प्रशासन अधिकारी, राज्यकामगार विमा योजना, मुंबई

(क) जिल्हा दंडाधिकारी किंवा उपविभागीय दंडाधिकारी, आणि

(ड) अगदी नजिकच्या पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी.

स्पष्टीकरण – या नियमाच्या प्रयोजनासाठी 'गंभीर स्वरूपाचा अपघात' म्हणजे–

(एक) शरीराच्या एखाद्या भागाची किंवा अवयवाची किंवा अवयवाच्या भागाची तात्काळ हानी होणे–

(दोन) शरीराच्या कोणत्याही भागाला ज्यामुळे उघड हानी पोहोचेल अशा

जन्हेने तो भाग चिरडला जाणे किंवा त्यास गंभीर इजा होणे किंवा प्राणघातक ठरेल अशा जन्हेची कोणतीही इजा होणे.

(तीन) बेशुद्धावस्था; किंवा

(चार) जबर भाजणे किंवा रसायनामुळे, वाफेमुळे किंवा कोणत्याही इतर कारणाने पोळणे.

## अनुसूची

(१) (अ) कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूस कारण होणारे किंवा गंभीर स्वरूपाचे असणारे अपघात–

(ब) ज्या शारीरिक दुखापतीमुळे इजा झालेल्या व्यक्तीस, अपघाताच्या नंतरच्या ४८ तासांपर्यंत काम करण्यास प्रतिबंध होईल किंवा संभवेल असा प्रकारचे आघात.

(२) पुढील प्रकारच्या घटना–मग त्यामुळे शारीरिक इजा किंवा विकलांगता येत असो–नसो;

(अ) भारतीय बाष्पक अधिनियमाच्या व्याप्तीमध्ये येणाऱ्या संवाहक्यतिरिक्त, वातावरणापेक्षा अधिक दाबाने काम करण्यासाठी वापरलेल्या पात्राचा स्फोट होणे–

(ब) ध्वनी किंवा माल किंवा त्यांना एखादा भाग वर चढविणारी आणि खाली उतरविणारी पारी, हॅरीकॉम्ब, उत्थानयंत्र किंवा इतर उपयंत्रे कोसळणे किंवा बंद पडणे किंवा सारी उलटणे.

(क) जेथे व्यक्ती काम करतात अशा जागेचे किंवा खोलीचे नुकसान होईल असा स्फोट होणे किंवा आग लागणे किंवा जेथे कॉटन ओपनर चालू आहे अशा कापूस दाबणी कारखान्यातील खोल्यांना आग लागणे.

(ड) कोणताही एखादा किंवा अनेक वायू (हवा सहन) किंवा वायूच्या संपीडनामुळे निर्माण झालेला कोणताही द्रव किंवा घनपदार्थ वातावरणाच्या दाबापेक्षा अधिक दाबाखाली साठवून ठेवण्यासाठी वापरलेल्या पात्राचा (रिसीव्हर) किंवा पात्राचा स्फोट होणे.

(इ) कारखान्याचा भाग असलेला किंवा कारखान्याच्या आवारात किंवा प्रांगणात असलेला कोणताही मजला, सज्जा, छप्पर, पूल, बोगदा, बुरुजे, भिंत किंवा इमारत कोसळणे किंवा पडणे.

कलम ८९ अन्वये विहित केलेला नियम–



११६. विषबाधेची किंवा रोगासंबंधीची नोटीस – ज्या कारखान्यात शिसे, फॉस्फरस, पारा, मँगनीज, आर्सेनिक, कार्बन बाय सल्फाईड किंवा बेन्झिनची विषबाधा किंवा नायट्रसच्या धुरापासून विषबाधा किंवा क्षारज पदार्थापासून किंवा हैड्रोकार्बनच्या तैलवर्गीय पदार्थापासून झालेली विषबाधा किंवा क्रोमपासून झालेला व्रण, काळपुळी, सिलिकॉसिस, विषयुक्त रक्तक्षय, विषयुक्त कावीळ, त्वचेचा प्राथमिक एपिथेलिओमेटस कॅन्सर यापासूनची विषबाधा किंवा रेडियम किंवा इतर क्ष किरणोत्सर्गी पदार्थामुळे किंवा क्ष–किरण यांमुळे त्यातून येणारी विकृति–चिकित्साविषयक लक्षणे यासंबंधीचे एखादे प्रकरण उद्भवले असेल तर, त्या संबंधीची नमुना २९ मधील नोटीस त्या कारखान्याच्या व्यवस्थापकाकडून मुख्य निरीक्षक, वैद्यकीय निरीक्षक, कारखाने प्रमाणक शल्यचिकित्सक आणि या अधिनियमान्वये अपर निरीक्षक म्हणून नियुक्त केलेला वैद्यकीय प्रशासन अधिकारी, राज्य कामगार विमा योजना, मुंबई यांचकडे तात्काळ (परंतु, चार तासांच्या आत) पाठविण्यात आली पाहिजे.

## प्रकरण १०

## अनुपूरक उपबंध

कलम १०७ अनुसार विहित केलेले नियम

११७. अपिलासंबंधी कार्यरीती– (१) कलम १०७ अन्वये सादर करावयाचे आवाहन (अपील) मुख्य निरीक्षकाकडे किंवा ज्या आदेशाविरुद्ध आवाहन केले असेल, तो आदेश ज्या अधिकाऱ्याने दिलेला असेल, तर अशा बाबतीत राज्य शासनाकडे किंवा राज्य शासन याबाबतीत नियुक्त करील अशा प्राधिकाऱ्याकडे करण्यात आले पाहिजे आणि हे आवाहन आदेशावरील आक्षेपाची कारणे थोडक्यात नमूद करणाऱ्या ज्ञापनाच्या स्वरूपात असेल आणि मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम १९५९ मधील अनुसूची २ अनुच्छेद १३ अन्वये त्यावर न्यायालय शुल्क–मुद्रांक लावलेले असले पाहिजेत आणि ज्या आदेशाविरुद्ध आवाहन केले असेल त्या आदेशाची प्रत त्या आवाहनासोबत जोडलेली असली पाहिजे.

(२) न्यायसहायकाची नेमणूक – आवाहनाचे ज्ञापन मिळाल्यावर, आवाहन प्राधिकाऱ्याने, त्यास योग्य वाटल्यास किंवा अपीलकाने आवाहन न्यायसहायकाच्या मदतीने सुनावणीस यावे अशी विनंती केल्यास, संबंधित उद्योगाचे प्रतिनिधी म्हणून पोट नियम (३) अन्वये घोषित केलेल्या संस्थेस १४ दिवसांच्या मुदतीच्या आत न्यायसहायकाची नेमणूक करण्यास फर्माविले पाहिजे. अशा संस्थेने न्याय-

सहायक नामनिर्देशित केल्यास आवाहन प्राधिकाऱ्याने स्वतः दुसरा न्याय सहायक नेमला पाहिजे. मग त्याने आवाहनाच्या सुनावणीची तारीख ठरविली पाहिजे आणि आवाहकास व ज्याच्या आदेशाविरुद्ध आवाहन करण्यात आले आहे अशा निरीक्षकास अशा तारखेसंबंधी योग्य ती सूचना दिली पाहिजे. आणि अशा आवाहनाच्या सुनावणीत मदत करण्यासाठी दोन न्यायसहायकांस त्या तारखेस हजर राहण्यास फर्माविले पाहिजे.

(२) पोट-नियम (१) अन्वये सादर करण्यात आलेल्या ज्ञापनात आवाहकाने तो खालील एखाद्या संस्थेचा किंवा संस्थांचा सदस्य आहे किंवा काय ते नमूद केले पाहिजे. न्यायसहायकाची नियुक्ती करण्याची शक्ती प्रदान करण्यात आलेली संस्था ही–

(अ) जर, आवाहक अशा संस्थांपैकी एकीचा सदस्य असेल तर, अशी संस्था असेल, आणि–

(ब) जर तो अशा दोन संस्थांचा सदस्य असेल तर ज्या संस्थेने अशा न्यायसहायकाची नियुक्ती करावी अशी आवाहकाची इच्छा असेल, ती संस्था असेल, आणि संस्थेचा सदस्य नसेल किंवा अशा संस्थांपैकी कोणत्या संस्थेने न्याय सहायाची नियुक्ती करावी याबद्दल त्याने आपली इच्छा ज्ञापनात नमूद केली नसेल, तर आवाहन प्राधिकाऱ्यास संबंधित उद्योगाचे प्रतिनिधित्व करण्यास सुयोग्य वाटत असेल अशी जी संस्था असेल, ती संस्था असेल.

(१) धी मिलओनर्स असोसिएशन, मुंबई.

(२) धी चेंबर ऑफ कॉमर्स अँण्ड इंडस्ट्रीज, मुंबई.

(३) धी इंडियन मर्चन्ट्स चेंबर, मुंबई.

(४) धी सिल्क अँण्ड आर्ट सिल्क मिल्स, असोसिएशन, मुंबई.

(५) धी डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशन मुंबई.

(६) धी इंजिनिअरींग असोसिएशन, ऑफ इंडिया, मुंबई किंवा

(७) संबंधित उद्योगांतील मालकांच्या-असल्यास-इतर कोणत्याही संस्था

४. न्याय सहायकाचे पारिश्रमिक – पोट नियम (२) आणि (३) च्या उपबंधानुसार नियुक्त केलेल्या न्यायसहायकास, अपिलाच्या सुनावणीसाठी दिवसाला रु. ५०–०० या कमाल मर्यादेस अधीन राहून, आवाहन अधिकारी ठरवील इतके शुल्क मिळेल. तसेच त्याला प्रत्यक्ष प्रवास खर्चही मिळेल. न्यायसहायकास शुल्क व प्रवासखर्च शासनाकडून देण्यात येईल, परंतु आवाहकाच्या विनंतीवरून



न्यायसहायक नेमण्यास आले असतील आणि आवाहनाचा निर्णय संपूर्णपणे आणि अंशतः आवाहकाच्या विरुद्ध देण्यात आला असेल अशा बाबतीत आवाहन अधिकाऱ्यास, शुल्क आणि प्रवासखर्च संपूर्ण किंवा अंशतः आवाहकाने द्यावा असा निदेश देता येईल.

कलम १०८ अनुसार विहित केलेला नियम–नोटिसा–

११८. नोटिसा प्रदर्शित करणे–प्रत्येक कारखान्यात प्रदर्शित करणे आवश्यक असलेला अधिनियमाचा व नियमांचा गोषवारा हा नमुना २६ मध्ये असला पाहिजे.

कलम ११० अनुसार विहित केलेला नियम–

११२. विवरणे – प्रत्येक कारखान्याच्या व्यवस्थापकाने निरीक्षकास किंवा राज्य शासनाने याबाबत नियुक्त केलेल्या इतर अधिकाऱ्यास खालील विवरणे पुरविली पाहिजेत–

(अ) दररोज कामावर लावलेल्या कामगारांची सरासरी संख्या आणि आठवड्याचे कामाचे नेहमीचे तास–

(ब) वेतनी रजा.

(क) कार्यमुक्त किंवा बडतर्फ केलेल्या कामगारांची संख्या.

(ड) रजेऐवजीचे वेतन.

(इ) भरपाई मुद्दा.

(फ) जेथे सामान्यतः १५० पेक्षा अधिक कामगार कामावर लावलेले असतील अशा कारखान्यातील आहारगृहे.

(ग) जेथे सामान्यतः १५० पेक्षा अधिक कामगार आहेत कामावर तेथे विश्रांतीच्या खोल्या, जेवणाच्या खोल्या.

२. सहामाही विवरण – प्रत्येक वर्षाच्या १५ जुलैस किंवा त्यापूर्वी नमुना २८ मध्ये सहामाही विवरणाच्या दोन प्रती.

३. सुट्ट्यांचे वार्षिक विवरण – प्रत्येक वर्षाच्या अखेरीपूर्वी, आगामी वर्षात ज्या दिवशी कारखाना बंद ठेवण्याचा उद्देश असेल त्या सर्व दिवसांसंबंधीची नोटीस देणारे विवरण जर एखाद्या वर्षी एखादा कारखाना नव्याने सुरू झाला असेल किंवा अगोदरच्या वर्षात बंद पडल्यानंतर पुन्हा सुरू झाला असेल तर, त्या वर्षाच्या उर्वरित कालावधीचे असे विवरण असा कारखाना सुरू होण्यापूर्वी किंवा पुन्हा सुरू होण्यापूर्वी सादर केले पाहिजे.

परंतु असे की, राज्य शासनाला एखाद्या विनिर्दिष्ट कारख… कोणत्याही वर्गाच्या कारखान्याच्या किंवा विशिष्ट क्षेत्रातील कारख… तील अशा विवरणाची सूट देता येईल.

आणखी असे की–

(अ) सुट्टीचा दिवस म्हणून जे रविवार नियमितपणे पाळतात.

किंवा

(ब) जे आठवड्यातील ठराविक दिवस सुटी म्हणून नियमितप…

किंवा–

(क) जे मुख्य निरीक्षकाने संमत केलेल्या यादीनुसार सुट्ट्या पाळतात, अशा कारखान्यांना सुट्ट्यांच्या वार्षिक विवरणाची सुट्टी देण्यात यईल. कोणत्याही कारखान्याचा व्यवस्थापक वर म्हटल्याप्रमाणे अशा एखाद्या सुट्टीत किंवा सुट्टीच्या यादीत कोणत्याही प्रकारे बदल करील अशा बाबतीत मुख्य निरीक्षकास त्या संबंधी पूर्वसूचना देण्यात आली पाहिजे.

कलम १०९ अनुसार विहित केलेला नियम–

१२०. नोटीस बजावणे – कोणतीही नोटीस किंवा आदेश नोंदणीकृत लिफाफ्यातून टाकेने पाठविणे हे एखाद्या कारखान्याचा कब्जेदार, मालक किंवा व्यवस्थापक याच्यावर अशा नोटिशीची किंवा आदेशाची पुरेशी बजावणी करणे होय असे समजले जाईल.

कलम ११२ अनुसार विहित केलेले नियम १२१ ते १२४–

१२१. निरीक्षकास आवश्यक असलेली माहिती – अधिनियमाच्या कोणतेही उपबंधाचे पालन करण्यात आले आहे किंवा काय किंवा कोणत्याही आदेश किंवा निरीक्षण योग्य प्रकारे पार पाडण्यात आले आहे किंवा काय यासंबंधी स्वतःचे समाधान करून घेण्यासाठी निरीक्षकास आवश्यक असलेली कोणतीही माहिती, कारखान्याचा भोगवटादार किंवा मालक किंवा व्यवस्थापक याने पुरवली पाहिजे. एखाद्या निरीक्षकाने निरीक्षण करताना अशा कोणत्याही माहितीची मागणी केली असल्यास, अशी माहिती कारखान्यात उपलब्ध असेल तर त्वरित पुरविण्यात आली पाहिजे किंवा लेखी मागणी केली असल्यास, ती मिळाल्यानंतर सात दिवसांच्या आत पुरविण्यात आली पाहिजे.

१२२. हजेरी पत्रक – (१) प्रत्येक कारखान्याच्या व्यवस्थापकाने, कारखान्यात काम करणाऱ्या सर्व कामगारांचे नमुना २९ मध्ये हजेरी पत्रक ठेवले



पाहिजे. या पत्रकात (अ) प्रत्येक कामगाराचे नाव (ब) त्याच्या कामाचे स्वरूप आणि (क) कामगाराची दैनिक उपस्थिती याची नोंद दर्शविण्यात आली पाहिजे.

(२) हजेरी पत्रक दर महिन्यास नव्याने लिहिण्यात आले पाहिजे आणि त्यात शेवटची नोंद केल्याच्या तारखेपासून ३ वर्षेपर्यंत जतन करून ठेवण्यात आले पाहिजे.

परंतु, प्रौढ व बालकामगारांच्या दैनिक उपस्थितीची नोंद अनुक्रमे नमुना १७ आणि १९ मधील कामगारांच्या नोंदवह्यात केली असल्यास किंवा पोटनियम (१) अन्वये आवश्यक असलेल्या तपशिलाची नोंद इतर कोणत्याही नोंदवहीत केलेली असल्यास व अशा नोंदवह्या त्यात शेवटची नोंद केल्याच्या तारखेपासून ३ वर्षेपर्यंत जतन करून ठेवल्या असल्यास, पोटनियम (१) अन्वये आवश्यक असलेले हजेरी पत्रक ठेवण्याची आवश्यकता असणार नाही.

१२३. अपघाताची आणि धोक्यांच्या घटनांची नोंदवही – (१) प्रत्येक कारखान्याच्या व्यवस्थापकाने कारखान्यात होणाऱ्या अपघातांची आणि धोक्याच्या घटनांची नमुना ३० मध्ये नोंदवही ठेवली पाहिजे व त्यात खालील गोष्टी दर्शविल्या पाहिजेत :–

(अ) इजा झालेल्या व्यक्तीचे नाव (कोणतीही असल्यास)

(ब) अपघाताची किंवा धोक्याच्या घटनेची तारीख.

(क) निरीक्षकास नमुना २४ मध्ये अहवाल पाठवल्याची तारीख.

(ड) अपघाताचे किंवा धोक्याच्या घटनेचे स्वरूप.

(इ) इजा झालेली व्यक्ती परत कामावर आल्याची तारीख.

(फ) इजा झालेली व्यक्ती कामावर जितके दिवस गैरहजर राहिली असेल त्या दिवसांची संख्या.

(२) प्रत्येक कारखान्याच्या व्यवस्थापकाने दरवर्षी १५ फेब्रुवारीस किंवा त्यापूर्वी १ जानेवारीच्या लगतपूर्वीच्या वर्षासंबंधीच्या नमुना ३० मधील नोंदीची प्रत निरीक्षकास पुरवली पाहिजे.

१२४. निरीक्षण पुस्तक ठेवणे – (१) प्रत्येक कारखान्याच्या व्यवस्थापकाने ३५ सें. मी × २० सें. मी या आकाराचे बांधणी केलेले नमुना ३१ मधील एक निरीक्षण पुस्तक ठेवले पाहिजे आणि निरीक्षक किंवा प्रमाणक शल्यचिकित्सक मागील तेव्हा ते त्याला सादर केले पाहिजे.

(२) निरीक्षण पुस्तक किमान १८० पृष्ठांचे असले पाहिजे. त्याच्या प्रत्येक
तिसऱ्या पृष्ठावर लागोपाठचे क्रमांक देण्यात आले पाहिजेत. आणि लागोपाठचे
क्रमांक दिलेल्या अशी दोन पृष्ठांमधील क्रमांक न दिलेल्या पृष्ठावर २.५४ सें. मी
-च्या समासाच्या बाजूस भोके असलेली उभी सरळ रेषा असली पाहिजे.

(३) निरीक्षकाने किंवा प्रमाणक शल्यचिकित्सकाने दिलेले अभिप्राय
असलेले निरीक्षण पुस्तक हरवल्यास, कारखान्याच्या व्यवस्थापकाने त्या क्षेत्राच्या
प्रभारी निरीक्षकास निरीक्षण पुस्तक हरवल्याचे त्वरित लेखी कळवले पाहिजे व
तात्काळ नवीन निरीक्षण पुस्तक ठेवले पाहिजे.

व्यवस्थापकाने शक्य तितक्या लवकर उपलब्ध असलेल्या सर्व अभिप्रायांच्या
प्रती, आवश्यक टंक लेखन फी भरून, संबंधित कारखाना निरीक्षकाच्या कार्यालया-
तून मिळविल्या पाहिजेत.

१२५. कारखाने बंद केल्यासंबंधीची माहिती – (१) भोगवटादार व व्यव-
स्थापक हे, कारखाना किंवा त्यातील कोणतीही पाळी, त्याचा उपविभाग किंवा
विभाग बंद करण्याचा उद्देश असल्यास, तसे करण्याचे निश्चित करण्यात आल्या-
-नंतर लगेच, त्यासंबंधीची आणि कारखाना बंद करण्यापूर्वी–

(अ) उद्देशित कारखाना बंदीची तारीख;

(ब) तो बंद करण्याची कारणे;

(क) माहिती पाठविण्याच्या दिवशी कारखान्याच्या हजेरीपत्रकावरील
कामगारांची संख्या;

(ड) कारखाना बंद केल्यामुळे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या काम-
गारांची संख्या आणि

(इ) कारखाना बंद ठेवण्याचा संभाव्य कालावधी;

यासंबंधीची माहिती दोन प्रतींमध्ये निरीक्षकास पाठविण्यास संयुक्तपणे
किंवा विभक्तपणे जबाबदार राहतील.

परंतु, ज्याच्या बाबतीत मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम १९४६ किंवा
राज्याच्या कोणत्याही भागात अमलात असलेला त्या अधिनियमासारखा कोणताही
-विधी किंवा यथास्थिती, औद्योगिक सेवायोजन (स्थायी आदेश) अधिनियम,
१९४६ या अन्वये, स्थायी आदेश निश्चित किंवा प्रमाणित केले असतील अशा
कोणत्याही कारखान्याच्या संबंधात, कारखान्यात तरतूद केलेल्या सूचना-फलकावर
कारखाना किंवा त्यातील कोणतीही पाळी, त्याचा उपविभाग किंवा विभाग बंद



करण्याच्या प्रस्तावाची नोटीस लावली असेल तर अशी माहिती, अशी नोटीस ज्या
तारखेला लावली असेल त्या तारखेस निरीक्षकास देण्यात आली पाहिजे.

आणखी असे की, जर संप, यंत्रसामग्रीमधील बिघाड, विद्युत किंवा पाणी
पुरवठ्यामधील खंड यामुळे किंवा भोगवटादाराच्या किंवा व्यवस्थापकाच्या
नियंत्रणाबाहेरील इतर कोणत्याही कारणामुळे कारखाना बंद ठेवणे अपरिहार्य
झाल्यास त्याने उद्देशित कारखाना बंदीची माहिती पाठवणे आवश्यक असणार
नाही.

(२) भोगवटादार आणि व्यवस्थापक हे कारखाना किंवा त्यातील कोणतीही
पाळी, त्याचा उपविभाग किंवा विभाग प्रत्यक्ष बंद केल्यानंतर लवकरात लवकर
निरीक्षकास खालील नमुन्यात दोन प्रतींमध्ये माहिती पाठविण्यास संयुक्तपणे
किंवा विभक्तपणे जबाबदार राहतील–

| कारखान्याचे नाव आणि संपूर्ण पत्ता | उद्योगाचे नाव | कारखाना बंदीची तारीख | कारखाना बंदीची कारणे | कारखान्याला बंदीचे स्वरूप पूर्णत: की अंशत: अंशतः असेल, तर बंद केलेली खाती विभाग वा उपविभाग | कारखाना बंद केल्या वेळी कारखान्याच्या हजेरीपत्रकावरील कामगार संख्या | कारखाना बंदीमुळे बाधा पोहोचलेल्या कामगारांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

(१) सुती वस्त्र निर्माण (२) रेशमी वस्त्र निर्माण (३) लोकर वस्त्र निर्माण किंवा (४) बीज माल किंवा (५) अभियांत्री की किंवा संकार्य यापैकी कोणत्या वर्गाचा उद्योग ते नमूद केले पाहिजे.

(३) कब्जेदार आणि व्यवस्थापक हे कारखाना किंवा त्यातील कोणतीही पाळी, उपविभाग किंवा पुन्हा सुरू झाल्यानंतर लवकरात लवकर खालील नमुन्यात दोन प्रतिमध्ये निरीक्षकास माहिती पाठविण्यास संयुक्तपणे किंवा विभक्तपणे जबाबदार राहातील.

| कारखान्याचे नाव आणि संपूर्ण पत्ता | उद्योगाचे नाव | कारखाना बंदीची तारीख | कारखाना बंदीमुळे बाधा पोहोचलेल्या कामगारांची संख्या | पुन्हा सुरू झालेला कारखाना पाळी विभाग, उपविभाग | पुन्हा कारखाना सुरू झाला त्या वेळची हजेरीपत्रकावरील कामगार संख्या | पुन्हा कामावर लावलेल्या कामगारांची संख्या | नव्याने कामावर लावलेल्या कामगारांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | |

(१) सुती वस्त्र निर्माण (२) रेशमी वस्त्र निर्माण (३) लोकर वस्त्र निर्माण किंवा (४) बीज माल किंवा (५) अभियांत्री की किंवा संकार्य यापैकी कोणत्या वर्गाचा उद्योग ते नमूद केले पाहिजे.



स्पष्टीकरण – (१) या नियमाच्या प्रयोजनांसाठी बंदी म्हणजे एखादा कारखाना किंवा त्यामधील कोणतीही पाळी, उपविभाग किंवा विभाग बंद करणे किंवा भोगवटादाराकडून किंवा व्यवस्थापकाकडून पूर्णत: किंवा अंशत: काम (तात्पुरत्या स्वरूपाच्या कामाव्यतिरिक्त) निलंबित केले जाणे किंवा कारखान्याच्या भोगवटादाराने किंवा व्यवस्थापकाने कामावर लावलेल्या व्यक्तींना कामावर लावण्याचे चालू ठेवण्यास पूर्णत: किंवा अंशत: नकार देण्यामुळे कामगारांची किंवा कामगारांची शिस्तीच्या कारणे कार्यमुक्ती किंवा पदच्युती किंवा निलंबन होणार नाही अशाप्रकारे नकार देणे.

स्पष्टीकरण – (२) एखाद्या कारखान्याचा कोणताही उपविभाग किंवा विभाग बंद पडल्यामुळे कारखान्यात कामावर लावलेल्या एकूण कामगारांना बाधा पोहोचणार नसल्यास अशा बंदीस हा नियम लागू होणार नाही.

१२५. (अ) सूट देण्याची सत्ता – राज्यशासनाला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्यास आवश्यक वाटतील अशा शर्तीच्या अधीन जेथे वस्तुनिर्माण प्रक्रिया चालवली जाते आणि जी शिक्षण, प्रशिक्षण किंवा सुधारणेच्या प्रयोजनासाठी चालविण्यात येणाऱ्या एखाद्या सार्वजनिक संस्थेशी संलग्न असेल अशा कोणत्याही कर्मशाळेस किंवा कामाच्या जागेस हा नियमांमधील सर्व किंवा कोणत्याही उपबंधातून सूट देता येईल.

१२६. निरसन आणि व्यावृत्ती – या नियमाच्या प्रारंभापासून मुंबई कारखाने नियम, १९५० मध्यप्रांत आणि वऱ्हाड कारखाने नियम, १९४९ आणि हैद्राबाद कारखाने नियम, १९५२ हे, केलेल्या किंवा करावयाच्या राहून गेलेल्या गोष्टी व्यतिरिक्त, निरसित होतील.

## नमुना १ (नियम ३ प्रमाणे)

(कारखान्यासाठी कोणतीही इमारत वापरणेसाठी, बांधणेसाठी अथवा त्यात वाढ करणेसाठी परवानगी मागणेचा अर्ज)

१. अर्जदाराचे नांव
अर्जदाराचा धंदा/व्यवसाय
अर्जदाराचा पत्ता–
२. कारखान्याचे पूर्ण नांव
कारखान्याचा पोस्टाचा पत्ता
३. कारखान्याचे वास्तव्य–राज्य जिल्हा
गांव/पेठ नजिकचे पोलिस ठाणे
नजिकचे रेल्वे स्टेशन/बंदर

४. उभारावयाच्या यांत्रिकी कामाचा तपशील

कर्जदाराची सही–तारीख

सूचना–अर्जाबरोबर खालील कागद जोडावेत.

(अ) निर्मिती प्रक्रियेचा स्थूल आराखडा, प्रक्रियेचे निरनिराळे टप्पे दर्शविणाऱ्या सारांशासह

(ब) प्रमाणित नकाशा तीन प्रतीत, त्यात–

(१) कारखाना आणि आसपासच्या लागून असलेल्या इमारती, बांधकामे, रस्ते, गटारे, वगैरे आणि

(२) निरनिराळ्या इमारतींची उंची, आडवे छेद भाग आणि नैसर्गिक उजेड, हवा अग्निशामक उपलब्धता हे दर्शविलेले असावे. नकाशात यांत्रिकी साधने, यंत्रे, त्यातील वाटा हेही स्पष्ट दर्शवावे

(३) मुख्य तपासणीसास आवश्यक वाटतील ते इतर तपशील दर्शवावे

## नमुना २ (नियम ५ आणि १४ प्रमाणे)

(तीन प्रतीत सादर करावे)

(दुर्नोंदणीसाठी अर्ज आणि कलम ६ व ७ मध्ये स्पष्ट केलेल्या व्यवस्थापाची नोटिस)

१. कारखान्याचे पूर्ण नांव

कारखान्याचा परवाना क्रमांक (जर नोंदणी झाली असेल तर)

२. कारखान्याचा पत्ता व वास्तव्य –

३. कारखान्याचा पत्ता (पत्रव्यवहारासाठी असलेला)

४. निर्मिती प्रक्रियेचे / प्रक्रियांचे स्वरूप

(अ) गेल्या बारा महिन्यात कारखान्यात प्रक्रिया झाल्या आहेत –(कायदा लागू झाला त्या तारखेस कारखाना अस्तित्वात असलेल्या प्रकरणी) आणि

(ब) पुढील बारा महिन्यात कारखान्यात प्रक्रिया करणे असल्यास (इतर सर्व कारखाना प्रकरणी)

५. नावे – झालेली निर्मिती व्हावयाची निर्मिती

(अ) प्रमुख उत्पादन –

(ब) इतर उत्पादन –

६. प्रकार आणि एकूण अश्वशक्ती ( H. P. ) (जर शक्ती उभारली असेल तर )

७. वर्षातील कोणत्याही एखाद्या दिवशी नेमणेसाठी नियोजिलेली कमाल कामगार संख्या.



८. संपलेल्या बारा महिन्यांतील कोणत्याही एखाद्या दिवशी नेमलेल्या कामगारांची कमाल संख्या (कायदा लागू झाला त्या दिवशी अस्तित्वात असणाऱ्या कारखान्यांच्या बाबतीत )

९. या कायद्याच्या कारभारात कारखान्याचा व्यवस्थापक असलेल्या इसमाचे पूर्ण नाव व राहण्याचा पत्ता

१०. कब्जेदाराचे पूर्ण नाव व राहण्याचा पत्ता

(१) खासगी किंवा मालकी संस्था असेल तर कारखान्याच्या मालकाचे नाव.

(२) सार्वजनिक मर्यादित जबाबदारीची कंपनी असेल तर संचालकांची नावे.

(३) जर कार्यकारी दलाली संस्था नेमली असेल तर कार्यकारी दलालाचे आणि त्यांच्या संचालकांची नावे

(४) खासगी कंपनी असल्यास भागधारकांची नावे

(५) जर शासकीय कंपनी असेल तर किंवा कारखाना स्थानिक संस्था मालकीत असेल तर किंवा कायदेशीर निगम महामंडळ असेल तर प्रमुख प्रशासकाचे नाव

११. या कायद्याचे अधिनियम अमलात आल्यानंतर कारखाना उभारला असेल अथवा वाढ करण्यात आली असेल तर अशा प्रकरणात–

(अ) कारखान्याच्या जुन्या किंवा नव्या इमारतीचा, बांधकामाचा किंवा वाढ करण्याचा नकाशा राज्य सरकारने प्रमुख तपासनीसाने मंजूर केल्याचा संदर्भ क्रमांक व दिनांक

(ब) टाकाऊ पदार्थ व प्रदूषणे यांची विल्हेवाट करण्यासंबंधीची योजना मंजूर केली असल्यास तिचा संदर्भ क्रमांक, दिनांक व मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव

१२. आवार किंवा इमारत यांच्या मालकाचे पूर्ण नाव आणि पत्ता ( यात कलम ९३ मध्ये संबंधित असणारा परिसरही समाविष्ट आहे. )

१३. शुल्क रक्कम रु.——ट्रेझरीत भरले. चलन नंबर——जोडले आहे..

१४. शुल्क रक्कम रुपये——सोबतच्या क्रॉसचेकने; चेक नंबर—— तारीख——बँक पोस्टल ऑर्डरने, पोस्ट ऑफिस——तारीख प्रमाणे पाठविली.

१५. शुल्क रक्कम रुपये——हिशेबी पुस्तकातील नोंदीवरून वसूल घेतली ऑर्डर नं.——तारीख——

तारीख व्यवस्थापकाची सही

हुद्द्याचा शिक्का

सूचना १. हा नमुना शाईने लिहा. ठळक अक्षरात लिहा, अथवा टंकलिखित करा.

२. रकाने १ ते १५ मधील मजकुरात नंतर काही फेरबदल, दुरुस्ती करणे असेल तर तसे तावडतोब कळवा.

३. जर कारखाना, कलम १०० (१) व (२) चे तरतुदीप्रमाणे असेल तर त्या प्रकरणी, रकाना १० मधील माहिती, ज्याची नियुक्ती कब्जेदार म्हणून केली असेल त्याचेशी संबंधित अशी असावी. व नियुक्तिपत्र संचालकाच्या अथवा भागधारकांच्या सहीचे जोडावे.

४. रकाना १३ बृहन्-मुंबईतील व बृहन्-मुंबईबाहेरील शासकीय कारखाने सोडून इतर सर्व कारखान्यांसाठी आहे. रकाना १४ बृहन् मुंबईतील व बृहन्-मुंबई बाहेरील कारखान्यांच्यासाठी असून त्यांनी शुल्क रक्कम कोठे भरली किंवा पोस्टल ऑर्डरने भरावी. रकाना १५ फक्त शासकीय कारखान्यांसाठी आहे.

५. एकाच इमारतीत किंवा आवारात एकापेक्षा अधिक कारखाने असतील तर रकाना १२ भरावा.

## शुल्क रकमेचे कोष्टक

| अश्वशक्तीचे परिमाण | वर्षातील कोणत्याही दिवसाची कमाल नोकर संख्या २० पर्यंत | २१ ते ५० | ५१ते १०० | १०१ते २५० | २५१ते ५०० | ५०१ते ७५० | ७५१व अधिक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| — ० — | १० | २५ | ५० | १२५ | २५० | ३७५ | ५०० |
| १० पर्यंत | २५ | ५० | ६० | १५० | ३५० | ३५० | ६०० |
| १० पेक्षा जास्त पण ५० पेक्षा कमी | ५० | ७५ | १०० | २५० | ५०० | ७५० | १००० |
| ५० पेक्षा जास्त पण १०० पेक्षा कमी | १०० | १२५ | १५० | ३५० | ७५० | ११२५ | १५०० |
| १०० पेक्षा जास्त | १५० | २०० | २५० | ५०० | १००० | १५०० | २००० |

(पूर्वी यापेक्षा शुल्क रक्कम कमी होती. परिस्थितीनुसार यांत वेळोवेळी बदल केला जातो. बदललेल्या शुल्क रकमा गॅझेटमध्ये प्रसिद्ध केल्या जातात.)



## नमुना ३ (नियम ५, ८ आणि ११ प्रमाणे)

(कारखान्याचा परवाना किंवा परवान्याचे नूतनीकरण यासाठी करावयाचा अर्ज)

वर्ष————

१. कारखान्याचे पूर्ण नाव

२. कारखान्याचा पूर्ण पत्ता व वास्तव्य

३. पत्र व्यवहारासाठी पूर्ण पत्ता

(रकाना २ मध्ये नमूद असलेल्या पत्त्यावर पत्रव्यवहाराचा हेतु साध्य होत असेल तर हा रकाना भरू नये)

४. वर्षातील कोणत्याही दिवसाची कमाल कामगार संख्या

५. उभारलेली अश्वशक्ती

दिनांक

कारखाना कब्जेदाराची/व्यवस्थापकाची सही

हुद्द्याचा शिक्का

## नमुना ५ (नियम १५ प्रमाणे)

व्यवस्थापक बदलला असेल तर द्यावयाची नोटीस

१. कारखान्याचे पूर्ण नाव –

परवाना क्रमांक –

२. पूर्ण पत्ता–

३. जाणाऱ्या व्यवस्थापकाचे नाव–

४. नव्या व्यवस्थापकाचे नाव/राहण्याचा पत्ता/टेलिफोन नंबर–

५. नव्या व्यवस्थापकाच्या नेमणुकीची (व्यवस्थापकाच्या हुद्द्यावर) तारीख

मालकाची/कब्जेदाराची सही तारीख

नव्या व्यवस्थापकाची सही

तारीख

## नमुना ६ (नियम १८ प्रमाणे)

### निरोगी (तंदुरुस्ती) शिफारस पत्र

| | |
|---|---|
| क्र. नं. | क्र. नं |
| तारीख | तारीख |
| नाव | मी असे प्रमाणित करतो की |
| वडिलांचे नाव | मी स्वत: तपासले आहे |
| लिंग | नाव |
| राहण्याचा पत्ता | वडिलांचे नाव– |
| जन्म तारीख, (उपलब्ध असेल तर) | यांचा मुलगा/मुलगी |
| किंवा प्रमाणित वय | |
| शारीरिक तंदुरुस्ती | राहणार |
| वरीलपरीह खूणा– | |

हा कारखान्यात नोकरी करू इच्छितो आणि माझे/हिचे वय ——माझ्या तपासणीत आढळून आल्याप्रमाणे—— असल्याची खात्री आहे आणि तो/ती कारखान्यात प्रौढ/मुल म्हणून नोकरी करण्यास निरोगी आहे, त्याच्या शारीरिक खूणा—आहेत.

कारणे नमूद करा

१. शिफारसपत्र नाकारले–किंवा — — — — —

२. शिफारसपत्र रद्द केले — — — — —

डाव्या हाताचा अंगठा

डाव्या हाताचा अंगठा

प्रमाणित शल्यवैद्य

प्रमाणित शल्यवैद्याची स्वाक्षरी

सूचना–शारीरिक अक्षमतेविषयी कारणे तपशिलावार नमूद करा.



## नमुना ७ (नियम १८ (७) प्रमाणे) आरोग्य नोंदणी पुस्तक

(कलम ८९ प्रमाणे ज्या कृती धोकादायक कृती असल्याचे ठरविलेले आहे, त्या कृती करण्यासाठी नेमलेल्या नोकरांच्या बाबतीत फक्त यात नोंद करावी.)

प्रमाणित शस्त्रवैद्याचे नाव (अ) दि. पासून दि. पर्यंत (ब) दि. पासून दि. पर्यंत (क) दि. पासुन पर्यंत

| अनुक्रम नंबर | कार्य क्रमांक | कामगाराचे नाव | मागील वाढदिवस लिंग | मागील वाढदिवस वय | चालू कामाची नेमणूक तारीख | सोडल्याची किंवा दुसरीकडे बदलल्याची तारीख | व त्यांची कारणे | कामाचे किंवा कृतीचे स्वरूप | कच्चा माल / उपनिर्मिती हाताळली |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

| प्रमाणित शस्त्रवैद्य यांनी तपासण्याची तारीख / वैद्यकीय तपासणीचा निष्कर्ष | कामावरून निलंबित असेल तर निलंबन काळ / निलंबनाची सविस्तर कारणे | कामावर रजू होण्यास योग्य असल्याची शिफारस (शस्त्रवैद्याची सही) | जर अयोग्य असल्याची शिफारस असेल किंवा निलंबित केले असेल तर | प्रमाणित शस्त्रवैद्याची सही तारीख |
|---|---|---|---|---|
| ११ | १२ | १३ | १४ | १५ |

## नमुना ८ (नियम २० आणि ५१ प्रमाणे)

चुना, रंग सफेती केल्याची नोंदणी–

(शॉप्स ॲण्ड एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट [मध्ये नमुना 'फ' त्यातील नियम १९ प्रमाणे दिला आहे तोच नमुना. त्या नमुन्यात व या नमुन्यात काहीही फरक नाही).

## नमुना ९ (नियम २७ प्रमाणे) हवेतील सांद्रत्व मापन नोंदणी –

खाते– (स्पष्टता दर्शक खूण क्रमांक) सांद्रत्व मापक – (खात्यांतील जागा)

| वर्ष महिना दिनांक | हवेतील सांद्रत्व मापन (सा–सांद्र गोलक, शु–शुष्क गोलक) — स. ७ ते स. ९ (मध्यंतर किंवा विश्रांतीच्या वेळा सोडून) | | स. ११ ते दु. २ | | स. ११ ते स. २ | | दु. ४ ते ५-३० | | पहाटे ४ ते ५-३० | | सांद्रत्व नसेल तर "नाही" | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सा. | शु. | सा. | शु. | सा. | शु. | सा. | शु. | सा. | शु. | | |
| १ | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | | |
| त्याप्रमाणे ३१ पर्यंत | | | | | | | | | | | | |

वरील नोंदी बरोबर आहेत असे मी प्रमाणीत करतो.

सही — — — —

सही — — — —



## नियम २३ खालील नियम

| शुष्क गोलक Dry bulb | सांद्र गोलक Wet bulb | शुष्क गोलक Dry bulb | सांद्र गोलक Wet bulb | शुष्क गोलक Dry bulb | सांद्र गोलक Wet bulb |
|---|---|---|---|---|---|
| 60.0 | 58.0 | 77.0 | 75.0 | 94.0 | 86.0 |
| 61.0 | 59.0 | 78.0 | 6.0 | 9 .0 | 87.0 |
| 62.0 | 60.0 | 79.0 | 7.0 | 9 .0 | 87.5 |
| 63.0 | 61.0 | 80.0 | 78.0 | 97.0 | 88.0 |
| 64.0 | 62.0 | 81.0 | 79.0 | 98.0 | 88.5 |
| 65.0 | 63.0 | 82.0 | 80.0 | 99.0 | 89.0 |
| 66.0 | 64.0 | 83.0 | 80.5 | 100.0 | 89.5 |
| 67.0 | 65.0 | 84.0 | 81.0 | 101.0 | 90.0 |
| 68.0 | 66.0 | 85.0 | 82.0 | 102.0 | 90.0 |
| 69.0 | 67.0 | 86.0 | 82.5 | 103.0 | 90.5 |
| 70.0 | 68.0 | 87.0 | 83.0 | 104.0 | 90.5 |
| 71.0 | 69.0 | 88.0 | 83.5 | 105.0 | 91.0 |
| 72.0 | 70.0 | 89.0 | 84.0 | 106.0 | 91.0 |
| 73.0 | 71.0 | 90.0 | 84.5 | 107.0 | 91.5 |
| 74.0 | 72.0 | 91.0 | 85.0 | 108.0 | 91.5 |
| 75.0 | 73.0 | 92.0 | 85.5 | 109.0 | 92.0 |
| 76.0 | 74.0 | 93.0 | 86.0 | 110.0 | 92.0 |

## नमुना १० (नियम ५८ प्रमाणे)

यंत्राशी संबंधित असणाऱ्या कामगारांना कपडे दिल्याची नोंद.

| अ. नं. | कामगाराचे नाव वडिलांचे नाव | हुद्दा आणि कामाचे स्वरूप | खाते | तंग कपडे दिल्याची तारीख | कामगाराची सही अंगठा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

## नमुना ११ (नियम ६२ प्रमाणे)

१. जागेचा कब्जेदार / मालक

पत्ता -

(अ) तराफा / पाळणा (लिफ्ट) चा प्रकार,
ज्ञात क्रमांक किंवा वर्णन.

(ब) बांधकामाची किंवा पुनर्बांधणीची तारीख (जर उपलब्ध असेल तर)

२. नकाशा आणि बांधणी –

३. तराफ्याचे / लिफ्टचे सर्व भाग चांगल्या यांत्रिकी बांधणीचे, उत्तम धातूचे / वस्तूचे आणि योग्य पुरेशा शक्ती धोरणाचे आहेत ? (आकलनात्मक असेल तर)

देखभाल– (मेन्टेनन्स)

तराफ्याचे/लिफ्टचे खालील भाग योग्य प्रकारे देखभाल केले आहेत का ? तराफ्याचे/लिफ्टचे खालील भाग योग्य प्रकारे देखभाल केले आहेत का? जर नसतील तर कोणती उणीव आढळली आणि चांगल्या कार्यवाहीत आहेत का? जर नसतील तर कोणती उणीव आढळली ते नमूद करा.

(अ) तराफ्याच्या/लिफ्टच्या मार्गाची जोडणी

(ब) तराफ्याचे/लिफ्टचे दरवाजे, फूटदरवाजे

(क) तराफ्याचे/लिफ्टचे दरवाज्याचे आणि मुदरवाज्याचे आंतरटाळे किंवा आंतरचाप.

(ड) इतर दरवाज्यांच्या कड्या

(इ) पाळणा, बाहेरील जागा, जोडणी व बांधणी, दर्शनीयता, मध्य सुरक्षा (बफर) आणि तराफ्याचा/लिफ्टचा आंतर्मार्ग–

(फ) अतिरिक्त धाव निशाणी

(ग) निलंबित, दोर, साखळ्या आणि त्यांचे जोड



(ह) संरक्षणाची साधने जसे प्लॅटफॉर्म किंवा पाळणे–पिंजरे यांच्या पडण्यापासून बचावाची व्यवस्था,

मोड, खंड–वेग वगैरे–

(आय) ब्रेक्स–

(के) मागेपुढे करावयाची साधने

(एल) इतर विद्युत उपकरणे

(एम) इतर भाग

४. अयोग्य भाग, असल्यास कोणते ?

५. दुरुस्ती, नूतनीकरण किंवा फेरफार असल्यास आवश्यकता व कार्यवाहीत आणण्याचा काल.

६. रकाना ५ मध्ये असणारी दुरुस्ती, नूतनीकरण, फेरफार विचारात घेऊन सुरक्षित कामाची कमाल मर्यादा.

७. इतर काही–

मी / आम्ही ______________________________ असे प्रमाणित करतो, की

______________________________

मी / आम्ही या तराफ्याची / लिफ्टची काळजीपूर्वक तपासणी केली आणि वर नमूद केलेले निष्कर्ष बरोबर आहेत.

| | |
|---|---|
| | सही– (कौंटर सिग्नेचर) |
| सही | कंपनीने नेमला असेल तर |
| पत्ता | त्याचे पूर्ण व पत्ता |
| तारीख | तारीख– |

सूचना–दुरुस्ती किंवा नूतनीकरणाचा तपशील रकाना ५ मध्ये देणे.

## नमुना १२ (नियम ६४ प्रमाणे)

वर उचलून घ्यावयाच्या कड्या, साखळ्या, कैच्या, दोरखंडे वगैरे तपासणी विहित अहवाल तपशील

१. कारखान्याच्या कब्जेदाराचे नाव

२. कारखान्याचा पत्ता

३. सहज्ञगम्य खूण आणि वर्णन, (लिफ्ट–यंत्र, साखळी, दोर, कैची वगैरे उचलण्याची साधने )

४. लिफटीग मशीन, दोर, कैंची, साखळी कारखान्यात प्रथम उपयोगात आणल्याची तारीख

५. २९ (१) (अ) (iii) प्रमाणे प्रत्येकाची तपासणी केल्याची तारीख– तपासणी करणाराचे नाव

६. नियम ६४ (१) प्रमाणे चाचणी व तपासणी केल्याचे प्रमाणपत्र, क्रमांक आणि प्रमाणपत्र देणाराचे नाव,

७. नियम ६४ (५) प्रमाणे उपलब्धाची साखळी, कडी–अडकणी, कैंची यांना तापवून पाणी दिल्याची तारीख व हे ज्यांनी केले त्याचे नाव

८. तपासणीत काही उणीव–दोष आढळले असल्यास अथवा पाणी दिल्यानंतर काही उणीव दोष आढळले असल्यास किंवा सुरक्षित कार्यवाही चालू केल्यानंतर कोणत्याही टप्प्यात उणीव वा दोष आढळले असल्यास त्यांचा तपशील असे

मी / आम्ही ______________________

प्रमाणित करतो की, मी / आम्ही वर नमूद केलेले उपलब्ध साखळी, दोर, कैंची कडी–अडकणी यांची काळजीपूर्वक तपासणी केली आहे व त्याच्या निष्कर्षाचा अहवाल बरोबर आहे.

सही ______________ (सही कौउंटर सिग्नेचर)

पावला (कंपनीने नेमले असल्यास नाव)

तारीख तारीख

पत्ता

## नमुना १३ (नियम ६५ प्रमाणे)

## दाबाचे भांडे तपासणीचा अहवाल

१. कारखान्याचे किंवा कारखान्याच्या कब्जेदाराचे नाव.

२. कारखान्याचा ठावठिकाणा व पत्ता–

३. दाब भांड्याचे नाव, वर्णन आणि सहजनम्य क्रमांक–

४. भांडे निर्मात्याचे नाव व पत्ता–

५. उपयोग करावयाच्या प्रक्रियेचे नाव–

६. भांड्याचा तपशील–



(अ) भांडे बांधल्याची तारीख–

(ब) भांड्याची जाडी

(क) भांडे प्रथम उपयोगात आणल्याची तारीख

(ड) निर्मात्याने शिफारस केलेली दाबकामाची सुरक्षा (भोकयात दुरूस्ती नमूद करावी. आणि तपासणी करणाराने पूर्वीचा अहवाल पाहिल्याचे नमूद करावे.)

७. नलिकावाहिनीच्या चाचणीची तारीख आणि उपयोजिलेला दाब–

८. भांडे उघडे केले किंवा हवेमुळे उघडे झाले किंवा सांद्र झाले ?

९. कोणता भाग अगम्य होता ?

१०. कोणती चाचणी आणि तपासणी केली ? नलिका (बाहेरील तपासणी चाचणी घेतला असल्यास दाबाचे स्पष्टीकरण करावे.)

११. भांड्याची स्थिती– (दाब कामाच्या सुरक्षेवर परिणाम घडविणारा दोष आढळल्यास नमूद करावा. किंवा भांड्याचे सुरळीत कामकाज– )

बहिर्गत अंतर्गत–

१२. दाबभांड्यासंबंधीच्या नियमानुसार जोडणी किंवा उपकरणी यांची आवश्यकता आहे का ?

१३. सर्व जोडण्या व उपकरणे यांची योग्य देखभाल झाली आहे का ? आणि चांगल्या स्थितीत आहेत का ?

१४. दुरुस्तीची आवश्यकता आणि दुरुस्तीची काल मर्यादा व इतर स्थिती, की जी तपासणी करणारास सुरळीत चालण्याचे दृष्टीने आवश्यक वाटते ती. स्पष्ट करावे–

१५. नियमित दाबकाम अपेक्षित सुरळीत होण्यास लक्ष केंद्रीत व्हावे असे चालू तपासणीतील, दाबकामाची सुरक्षा, धातूचे मापन, जाडी, इतर तपशील नमूद करावा. (भांड्याच्या भिंतीची उंची जाडी वगैरे तपासणीत मोजावी व नमूद करावी.)

१६. कामाचा दाब नमूद करा. दुरुस्तीमुळे काही परिणाम घडविणे आवश्यक झाले का ? स्पष्ट करा.

(अ) वर रकाना १४ मध्ये स्पष्ट केलेली कालमर्यादा संपण्यापूर्वी

(ब) कालमर्यादा संपल्यानंतर आवश्यक असणारी दुरुस्ती पूर्ण झाली नाही

(क) आवश्यक दुरुस्ती पूर्ण केल्यानंतर–

१७. इतर अवलोकन–

मी ________________ असे प्रमाणित करतो, की वर नमूद केलेल्या वर्णनाचे वर नमूद असणारे दाब भांडे मी पूर्णपणे स्वच्छ केले. (त्याच्या बांधणीस धक्का लागणार नाही अशा काळजीने) तपासणीच्या सुलभतेसाठी सहजगम्य अशी चाचणी केली व त्यासाठी सर्व तपासणी काळजीपूर्वक दिनांक ________________ रोजी केली त्यांत जोडणीची अनुरूपता तपासून पाहिली व त्याप्रमाणे हा अहवाल खरा व बरोबर तयार केला.

सही

पत्ता– पात्रता

जर कंपनीने नेमले असेल तर नाव व पत्ता नमूद करणे–

(नमुना १३ अ नियम ७३ अ प्रमाणे)

वायुधारकाच्या तपशीलाच्या नोंदणीचे पुस्तक वायु (धारक–गॅससिलिंडर)

वायुधारकाच्या तपशीलाच्या नोंदणीचे पुस्तक

१. कारखान्याच्या कब्जेदाराचे नाव–

२. कारखान्याचा ठावठिकाणा व पत्ता

३. वायु धारक–नाव, वर्णन, सहजगम्य खूण अथवा अक्षर–

४. वायुधारक निर्मात्याचे नाव आणि पत्ता

५. आकारमानाचा तपशील–

(अ) कमाल धारणा–घनमीटरमध्ये

(ब) पूर्ण भरला असता बाहेर फेकणारा दाब

(क) लिफ्टच्या संख्या–त्या ओळखण्याचे नंबर किंवा अक्षरे

६. वायुधारक बांधणीचा तपशील–

टोपण–(शिखराचे प्रयंकाचे क्षेत्रफळ, उंची जाडी (बाजूच्या पत्र्याची) व टोपण–(शिखराचे दृढ शिरस्त्राण,) वापरलेल्या वस्तू पदार्थाचे वर्णन व प्रकार वगैरे.

७. बाजूच्या पत्र्याची मान्य असणारी किमान जाडी आणि वायुधारकाच्या सुरक्षित कामासाठी टोपणाची किमान जाडी–

८. निर्मात्याने वायुधारक निर्मिती बांधणीसाठी तयार केलेल्या आराखड्याचा क्रमांक तपशील वगैरे.

कब्जेदाराची / व्यवस्थापकाची सही–

निर्मात्याच्या अधिकृत इसमाची सही–



नमुना १३ ब, (नियम ७३ अ प्रमाणे)

वायु–धारक तपासणीचा अहवाल

१. तपासलेल्या वायुधारकाचा आणि वायुधारक उचलण्याच्या लिफ्टचा सम्यक्रमांक

२. तपासणी अंतर्गत की बहिर्गत होती ?

३. वायुधारकाचे भाग विद्युतीकरणाने तपासले, किंवा तर अमुक मापकाने तपासले किंवा कसे व निष्कर्ष काय ?

तपासले किंवा कसे व निष्कर्ष काय ?

४. तपासणीचा तपशील–

(अ) टोपण–झाकण

(ब) बाजूचा भाग– (पकड व धारक)

(क) यांत्रिकी दर्शन– (वाहन तोलक, दळ, खुंटी, पकड, दोर वगैरे)

(ड) पोकळी

(ई) इतर भाग असल्यास–सांध, चौकट

५. तपासणीचे वेळी लिफ्टची स्थिती कशी होती–तपशील देणे

६. तपासणीचे वेळी पोकळी व लिफ्ट यांची पातळी सुरळीत कामासाठी पुरेशी होती काय ? तपशील देणे–

७ तपासणीची तारीख व तपासणी करणाराचे नाव–

८. सर्व जोडण्या व उपकरणी यांची योग्य देखभाल केली आहे? चांगल्या स्थितीत आहेत ? आवश्यक असणारी दुरुस्ती, आवश्यक मुदतीत केली आहे का ?

९. अधिकृत इसमाच्या मतानुसार इतर आवश्यकतेची, तथा इतर परिस्थितीची पूर्तता केली आहे.

मी ________________ असे प्रमाणित करतो, की वर नमूद केलेल्या वर्णनाचा वायुधारक मी पूर्णपणे तपासला आहे आणि आवश्यक असणारी चाचणी मी घेतली आहे. व वर नमूद केलेले खरे आहे, तपासणीचा अहवाल बरोबर आहे.

नाव आणि हुद्दा

पात्रता

पत्ता

तारीख

कंपनीने नेमले असल्यास नाव आणि पत्ता–

## नमुना १४ (नियम ९३ प्रमाणे) भरपाई सुट्या नोंदणीचे पुस्तक

कारखान्याचे नांव व पत्ता –

| अनुक्रम नंबर | कामगाराचा तिकिट नंबर | कामगाराचे नांव | गट क्रमांक | मुक्त हुकूम क्रमांक तारीख | वर्ष | बुडालेले साप्ताहिक सुट्यांचे दिवस मुक्त हुकुमानुसार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | जानेवारी ते मार्च | एप्रिल ते जून | जुलै ते सप्टेंबर | ऑक्टोबर ते डिसेंबर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

| भरपाई सुट्या दिल्याच्या तारखा | | | | उरलेल्या बुडालेल्या सुट्या पुढील वर्षात ओढल्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| जानेवारी ते मार्च | एप्रिल ते जून | जुलै ते सप्टेंबर | ऑक्टोबर ते डिसेंबर | | |
| ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |





## नमुना १५ (नियम ९५ प्रमाणे) वगळलेल्या कामगारांचे, जादा तास कामाचे हजेरी पत्रक – महिना –

कारखान्याचे नाव

| रजिस्टर मधील अनुक्रम नंबर | नाव | खाते | जादा काम केल्याच्या तारखा | प्रत्येक वेळचे जादा कामाचे तास | एकूण जादा कामाची निर्मिती कामानुसार वेतन कामगाराचे बाबतीत | सर्व साधारण कामाचे तास | सर्व साधारण वेतन दर | सवलतीने मिळणाऱ्या धान्याची व इतर सवलतींची रोख रकमेत किमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

| जादा कामाच्या वेतनाचा दर (रकाना ८ व ९ नंबर | सर्व साधारण प्राप्ती | जादा कामाची प्राप्ती | एकूण प्राप्ती | जादा कामाचे वेतन अदा केल्याची तारीख | वेतन मिळाल्याबद्दलची कामगाराची सही |
|---|---|---|---|---|---|
| १० | ११ | १२ | १३ | | |

## नमुना १६ (नियम ९८ प्रमाणे)

(प्रौढ कामगारांच्या कामाच्या कालावधीची नोटीस.)

| कारखान्याचे नाव | | | | | | स्थळ | | | | | जिल्हा – | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कामाचा कालावधी गट | पुरुष कामगार कामावर लावलेल्यांची एकूण संख्या | | | | | | स्त्री–कामगार कामावर लावलेल्यांची एकूण संख्या | | | | गट वर्णन गट अक्षर कामाचे स्वरूप | शेरा |
| | अ | ब | क | ड | इ | फ | ग | ह | य | ज | | |
| पुरक कामगार | १,२,३ | १,२,३ | १,२,३ | १,२,३ | १,२,३ | १,२,३ | १,२,३ | १,२,३ | १,२,३ | १,२,३ | | |

| | |
|---|---|
| कामाचे दिवशी | अ |
| पासून – पर्यंत | ब |
| पासून – पर्यंत | क |
| भाग कामाचे दिवशी | ड |
| पासून – पर्यंत | इ |
| पासून – पर्यंत | फ |
| | ग |
| | ह |
| | य |
| | ज |

नोटीस बोर्डावर नोटीस प्रथम लावल्याची तारीख

व्यवस्थापकाची सही –



## नमुना १७ (नियम ९९ प्रमाणे) प्रौढ कामगारांचे नोंदणी पुस्तक

| अनुक्रम नंबर | नांव | वडिलांचे नांव | कामाचे स्वरूप | गट अक्षर | पाळी पद्धत असल्यास पुरक कामगार तसबा |
|---|---|---|---|---|---|

| प्रौढत्वाच्या प्रमाणपत्राचा क्रमांक व तारीख | | शेरा |
|---|---|---|
| प्रमाणपत्राचा क्रमांक व तारीख | प्रमाण पत्रास दिलेला लाक्षणिक क्रमांक | |

## नमुना १८ (नियम १०३ प्रमाणे)

मुले-कामगारांच्या कामाच्या कालावधीची नोटीस–

कारखान्याचे नाव स्थळ जिल्हा

कामाचा कालावधी मुले

गट वर्णन

नेमलेल्या मुलांची एकूण संख्या

वार

| गट | अ | | ब | | क | | गट अक्षर कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पुरक मुले | १ | २ | १ | २ | १ | २ | |

पासून अ

पर्यंत ब

क

नोटीस बोर्डावर नोटीस प्रथम लावल्याची तारीख

सही

व्यवस्थापक

## नमुना १९ (नियम १०४ प्रमाणे)

मुले – कामगारांचे रजिस्टर

| अ. नं. | नांव | वडिलांचे नांव | प्रथम नोकरीची तारीख | प्रमाण पत्राचा क्रमांक आणि तारीख | तदर्थसाठी दिलेला लाक्षणिक क्रमांक | गट अक्षर | पाळीत कामाचा असेल तर पुरक क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

## नमुना २० (नियम १०५ प्रमाणे) पगारी रजा नोंदणी पत्रक (प्रत्येक कामगारासाठी स्वतंत्र पत्रक तयार करावे)

कारखान्याचे नांव —
खाते —

भाग १ प्रौढ
भाग २ मुले

नांव—
वडिलांचे नांव—

| अ. क्र. | प्रौढ/मुल कामगाराचा क्रमांक | नेमणूक तारीख | नोकरीचे कालदर्शक वर्ष | कालदर्शक वर्षात काम केलेले दिवस | | | | | जमा असलेले पगारी रजेचे दिवस | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रत्यक्ष केलेल्या कामाचे दिवस | अपरिहार्य काम बंदीचे दिवस | प्रसुति रजेचे पगारी दिवस | पुढे ढकललेल्या पगारी रजेचे दिवस | एकूण बेरीज ५ ते ८ ची | मागील वर्षातील शिल्लक पगारी रजेचे दिवस | रकाना ४ मध्ये नमूद असलेल्या वर्षातील अर्जित पगारी रजेचे दिवस | एकूण रकाना १०+११ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |

| नाकारलेली पगारी रजा दिवस योजनाकलम ७९ (८) प्रमाणे | पुढील वर्षात नको असणारी पगारी रजा दिवस | भोगलेली रजा पासून-पर्यंत | शिल्लक रजा | वेतनाचा दर | सवलतीच्या धान्याची रोख रकमेत किंमत | पगारी रजेचा वेतन-दर काल रकाना १७+१८ | नोकरीतून काढलेला पगार | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | नोकरीतून काढल्याची तारीख | पगारी रजेचा पगार दिल्याची तारीख | |
| १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |



## नमुना २२ (नियम ११२ अन्वये)

मी. ______________________

श्री / श्रीमती ______________________ हे या

माझे / माझ्या ______________________ आहेत आणि

ते / त्या ______________________ येथे राहतात. रजा संपल्यानंतर कामावर रुजू होण्यापूर्वी मी मृत्यू पावल्यास माझ्या पगारी रजेची देय असणारी रक्कम या नियुक्तीपत्रांत नमूद केलेल्यांना दिली जावी अशी मी नियुक्ती करीत आहे.

दिनांक ________ सही / अंगठा

साक्षीदारांची नांवे (१)

(२)

साक्षीदारांच्या सह्या (१)

(२)

## नमुना २३ (नियम ११४ परिशिष्ट ६ परिच्छेद ७ प्रमाणे)

तंदुरुस्तीचे विशेष प्रमाणपत्र

(शिसे मिश्रणाच्या कृतीसाठी नेमलेल्या इसमाचे संबंधात)

अनुक्रम नंबर

दिनांक

मी ______________________ असे प्रमाणित करतो, की मी व्यक्तीशः (कामगाराचे नांव) ______________________ (कामगाराच्या वडिलांचे नांव) या कारखान्यात ________ या हुद्द्यावर ________ हे काम करण्यासाठी नोकरी करु इच्छितात. यांचे वय माझ्या तपासणीत आढळून आल्याप्रमाणे ________ वर्षे असण्याची शक्यता आहे आणि माझ्या मताप्रमाणे हे शिसे मिश्रणाच्या कृतीसाठी नोकरी करण्यास तंदुरुस्त आहेत. त्यांच्या शरीरावरील खुणांचे वर्णन ______________________ याप्रमाणे आहे.

कामगाराची सही / अंगठा

सर्टीफाईंग सर्जनची सही

| वर नमूद केलेल्या इसमास मी स्वतः तपासले तारीख | ह्रे प्रमाण पत्र —— या तारखे-पर्यंतचे आहे– | सर्टीफाईंग सर्जनची सही | शिके मिळणाऱ्या शिफारी कुणाची टिपणी – |
|---|---|---|---|

## नमुना २४ (नियम ११५ प्रमाणे)

अपघात किंवा भीषण प्रसंगाची नोटीस

(सहज सुलभ वाचनीय अक्षरात किंवा टंकलिखित लिहा)

१ कारखान्याचे / कब्जेदाराचे नाव

२ कामाचे ठिकाण/पत्ता–(जेथे अपघात-भीषण प्रसंग घडला असेल तेथील)

३ धंद्याचे स्वरूप

४ शाखा किंवा खाते, (जेथे निश्चित अपघात / भीषण प्रसंग घडला असेल तेथील)

५ जखमी इसमाचे नाव

६ पत्ता लिंग वय (मागील वाढदिवस)

धंदा

७ अपघात / भीषण प्रसंग घडल्याची तारीख वेळ

८ अपघात घडला त्या दिवशी काम सुरू केल्याची वेळ

९ (अ) अपघाताचे/भीषण प्रसंगाचे कारण व स्वरूप

(ब) यंत्रामुळे घडला असल्यास

यंत्राचे नाव यंत्राचा भाग आणि

यांत्रिकीशक्ती कार्यवाहित होती का ?

जखमी इसम अपघाताच्या वेळी निश्चित काय करीत होता ?

१० जखमांचे स्वरूप व गांभिर्य (मृत्यु, बोटे तुटली, पायाचे हाड मोडले, ओरखडा झाला हातावर हाड पिकटले–वगैरे वगैरे)



११ जर अपघात भीषण नसेल तर, जखमी ४५म ४८ तास किंवा अधिक दुर्बळ राहण्याची शक्यता आहे किंवा कसे–

१२ जखमी इसमाची देखभाल करणाऱ्या मेडिकल ऑफिसरचे नांव

मी ______________ असे प्रमाणित करतो, की वर दिलेली प्रत्येक बाबीतील माहिती माझ्या ज्ञानाप्रमाणे आणि खात्रीप्रमाणे बरोबर आहे.

व्यवस्थापकाची सही

अहवाल रवाना केल्याची तारीख

(खालील तपशील कारखाने अधिकाऱ्यांनी भरावा)

जिल्हा

मिळाल्याची तारीख

अपघात क्रमांक

उद्योग क्रमांक

नैमित्तिक क्रमांक

लिंग

इतर तपशील – (मृत्यु, जखमी, पाय मोडला, वगैरे वगैरे)

तपासाची तारीख

तपासाचा निष्कर्ष

## नमुना २५ (कलम – ८९, नियम ११६ प्रमाणे)

कारखाने अधीक्षक यांनी भरावे.

प्रकरण क्रमांक –

धंदा

विषारी / विकार यासंबंधीची नोटीस

कारखान्याचा तपशील –

१. कारखान्याचे नाव –

२. कारखान्याचा पत्ता –

३. कब्जेदाराच्या कार्यालयाचा / राहण्याचा पत्ता –

४. उद्योगाचे स्वरूप –

५. विषामुळे / विकारामुळे जेथे कामगारावर परिणाम घडून आल्याने तो रुग्णाइत झाला तेथील उपक्रमाचे नाव व पत्ता –

६. विष / विकार घडवून आणणारी वस्तु प्रक्रिया –

७. रुग्णाइताचे नाव व कामावरील क्रमांक –

८. रुग्णाइताचा पत्ता –

९. लिंग वय

१०. रुग्णाइताचा निश्चित व्यवसाय –

(अ) नोकरीचे ठिकाणचा किंवा नोकरीचे शेवटच्या ठिकाणचा –

(ब) विषामुळे / विकारामुळे कामगारावर परिणाम घडून आल्याने रुग्णाईत झालेला उपक्रम –

११. रुग्णाइत ज्यामुळे ग्रस्त झाला त्या विषाचे / विकाराचे स्वरूप –

१२. वरील रकाना ६ चे अनुसार विष / विकार घडवून आणणाऱ्या वस्तू प्रक्रियांच्या प्रारंभीचा अंदाजे दिनांक सर्वसाधारण तपशील –

१३. सर्टीफाईड सर्जनकडे प्रकरण पाठविले काय ?

तारीख – कारखान्याच्या व्यवस्थापकाची सही.

## नमुना २७ (नियम ११९ (१) प्रमाणे)

### वार्षिक तक्ता

वार्षिक तक्ता ३१ डिसेंबर १९ वर्षाअखेर

१. कारखान्याचे नाव –



कब्जेदाराचे नाव –

व्यवस्थापकाचे नाव –

२. जिल्हा – पोस्टाचा पत्ता

३. उद्योगाचे स्वरूप –

४. नेमलेल्या नोकरांच्या उपस्थितीची दररोजची सरासरी –
- पुरुष –
- स्त्रिया –
- तरुण पुरुष
- तरुण स्त्रिया
- मुले-पुल्लिंगी
- मुले स्त्रीलिंगी

५. काठवडयाचे कामाचे तास – (केलेल्या कामाचे तास)
- पुरुष
- स्त्रिया
- मुले

६. वर्षातील कामाचे दिवस

७. कलम ८८ चे व्याप्तीत कारखाना येतो का ?
कलम ९३ चे व्याप्तीत कारखाना येतो का ?

८. धोकादायक कृतीत नेमलेल्या नोकरांची दररोजची सरासरी पगारी रजा –

९. वर्षातील नेमलेल्या नोकरांची संख्या
- पुरुष
- स्त्रिया
- मुले

१०. त्या वर्षाशी संबंधित हा तक्ता आहे त्या वर्षात पगारी रजेस पात्र असणाऱ्या नोकरांची संख्या.

११. ज्यांना रजा मंजूर केली आहे अशा नोकरांची संख्या.
- पुरुष
- स्त्रिया
- मुले

१२. वर्षात रजा साठलेली असूनही रजा भोगावयाची नाही असे सूचित करणाऱ्या नोकरांची संख्या–

पुरुष
स्त्रिया
मुले

नोकरीतून काढलेल्या किंवा बडतर्फ केलेल्या नोकरांची संख्या.

१३. नोकरीतून काढलेल्या किंवा बडतर्फ केलेल्या नोकरांची संख्या.

रजेऐवजी वेतन –

१४. नोकरीतून काढलेल्या नोकरांस अदा केलेले रजेच्या बदली वेतन.

(२) रजेच्या बदली दिलेल्या वेतनाची एकूण रक्कम-भरपाईच्या मुद्द्या

१५. कारखाना कायद्याच्या कलम ५२ प्रमाणे दगडलेल्या नोकरांची संख्या

पुरुष...स्त्रिया...

१६. मुद्द्या घोषलेल्या नोकरांची संख्या.

१. त्याच महिन्यात

२. नंतरच्या महिन्यात

३. तिसऱ्या महिन्यात

१७. खाद्य गृह –

| भोजन गृहाचा प्रकार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शिजलेले अन्न व खाद्य पदार्थ विक्रि जातात. | फक्त शिजलेले अन्न दिले जाते | फक्त खाद्य पदार्थ दिले जातात. | फक्त चहा दिला जाती | दररोज वापर करणाऱ्या कामगारांची अंदाजे सरासरी | कारखान्याने सोसलेल्या खर्चाच्या बाबी, खर्चाची रक्कम मूळ किमतीपेक्षा कमी किमतीत विकलेले अन्न–खाद्य पदार्थ |
| *१(अ) | (२) | ३(क) | ४(ड) | ५ | ६ |



* माहिती भरताना ठळकवर्णक अक्षर लिहा.

१८. पाल्य गृह –

पाल्य गृहात दाखल केलेल्या मुलांची संख्या

१९. पाल्य गृहातील मुलांची दररोजची अंदाजे उपस्थिती सरासरी (अ) २ किंवा कमी वयाची (ब) २ पेक्षा जास्त वयाची–

२०. या सोयी सवलतींचा तपशील–

(अ) दूध (ब) अन्न (क) कपडे

(ड) खेळणी (ई) औषधोपचार (फ) इतर

२१. यासाठी नेमलेल्या नोकरांचा तपशील–

(१) डॉक्टर–पुरुष डॉक्टर स्त्री डॉक्टर

(२) परिचारिका

(३) शिक्षक

(४) दाई

(५) झाडूवाले–

छाया गृह, विश्रांती गृह आणि भोजन गृह–

२२. छाया गृहातील विश्रांति-गृहातील किंवा भोजन गृहातील कामगारांच्या उपस्थितीची दररोजची अंदाजे सरासरी–

२३. पिण्याच्या पाण्याच्या सवलतींचा तपशील–

२४. जागा, फर्निचर व इतर सामग्रीचा तपशील–

दिनांक– व्यवस्थापकाची सही–

(हुद्द्याचा शिक्का)

## नमुना २८ (नियम ११९ (२) प्रमाणे)

### सहामाही तक्ता

मुदत १ जानेवारी १९ पासून ३० जून १९ पर्यंत

कारखान्याचे नाव व पत्ता–

कब्जेदाराचे

व्यवस्थापकाचे नाव

जिल्हा

पोस्टाचा पत्ता–

धंद्याचे स्वरूप–

नेमलेल्या नोकरांची दररोजची सरासरी { पुरुष<br>स्त्रिया<br>तरुण पुरुष<br>तरुण स्त्रिया<br>मुले–पुल्लिंगी<br>मुले–स्त्रीलिंगी

ता. ३० जून १९ रोजी संपलेल्या सहामाहीतील कामाचे एकूण दिवस }

दिनांक– व्यवस्थापकाची सही

(कारखान्याच्या नावाचा शिक्का)

सूचना–सहामाहीतील दिवशी उपस्थित असलेल्यांच्या एकूण बेरजेस कामाचे दिवसांनी भागून येणारी संख्या म्हणजे नेमलेल्या नोकरांची दररोजची सरासरी–



[1][स्पष्टीकरण– या सदराच्या कारणास्तव कामगाराच्या संख्येच्या गणनेसाठी दिवसभरात निरनिराळ्या पाळ्यांत/विभागांत नेमलेल्या सर्व कामगारांचा अंतर्भाव केला पाहिजे. ]

(न) 'कब्जेदार' म्हणजे कारखान्याच्या व्यवहारावर ज्याचे निरंकुश नियंत्रण आहे असा कार्यकारी प्रतिनिधी, कारखान्याचा कब्जेदार समजला पाहिजे.

[1][परंतु असे की दुरुस्तीखाली असलेल्या किंवा ज्यावर देखभालीचे काम चालू असेल अशा भाड्याने देण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या गोदीतील नांगरलेल्या जहाजाच्या बाबतीत]–

(१) गोदीचा मालक हा खाली नमूद केलेल्या बाबींच्या कारणास्तव कब्जेदार असल्याचे समजले पाहिजे.

(अ) कलम ६, कलम ७, कलम ११ किंवा कलम १२,

(ब) कलम १७ गोदीत व त्याच्या परिसरात योग्य व पुरेशा प्रकाशाच्या देखभालीसाठी पुरविला जात असेल त्या संबंधात

(क) कलम १८, कलम १९, कलम ४२, कलम ४६, कलम ४७ किंवा कलम ४९ अशा दुरुस्तीच्या व देखभालीच्या कामावर नेमलेल्या कामगारांचे संबंधात–

(२) कलम १३, कलम १४, कलम १६, किंवा कलम १७ (या परंतुकातील अन्यथा तरतुदी रक्षित करून) किंवा प्रकरण ४ कलम २७ व्यतिरिक्त, किंवा कलम ४३ कलम ४४ किंवा कलम ४५, प्रकरण ६, प्रकरण ७, प्रकरण ८ किंवा कलम १०८, कलम १०९ किंवा कलम ११० हे किंवा खाली तरतुदीलेल्या, ह्या कोणत्याही बाबींच्या कारणास्तव जहाजाचा मालक, किंवा त्याचा प्रतिनिधी किंवा गुमास्ता किंवा दुसरा अधिकारी किंवा अशा मालकाबरोबर, प्रतिनिधीबरोबर, गुमास्त्याबरोबर किंवा अधिकाऱ्याबरोबर करार केलेला कोणीही इसम.

(अ) प्रत्यक्षपणे त्याने, किंवा त्याचे त्याच्या कोणाही प्रतिनिधीमार्फत नेमलेला कामगार

(ब) अशी दुरुस्ती व देखभालीच्या कामासाठी वापरात असलेली यंत्रसामग्री, प्रकल्प किंवा जागा यांचे बाबतीत–

[असा मालक, प्रतिनिधी, गुमास्ता किंवा अधिकारी असलेल्या कोणताही इसम. ]

(ओ) 'कार्यकारी प्रतिनिधी' यास इंडियन कंपनीज ॲक्ट १९१३ (सन १९१३ चा क्रमांक ७) यांत जो अर्थ आहे तो.

चालना मिळून ज्याचे परिवर्तन होते किंवा कोणत्याही यंत्राने किंवा साधनाने शक्तीचा पुरवठा होतो.

(ज) 'यंत्रणा' यांत मुख्य चलन, रूपांतर किंवा इतर कोणतेही साधन की ज्यामुळे शक्तीचे जनन, रूपांतर, परावर्तन होते किंवा लागू होते.

(के) 'निर्मिती प्रक्रिया' म्हणजे–

(i) कोणतीही वस्तू तिचा उपयोग, विनियोग विक्री व विल्हेवाट करणे या हेतूने तयार करणे, फेरफार करणे, कलाकुसर घडविणे, घासणे, स्वच्छ करणे, बांधणे, मोडणे, वितळविणे किंवा घडविणे.

[१] [(ii) तेल, पाणी, मैला आणि इतर द्रव भरणे, उपसणे, वाहून नेणे,]

(iii) शक्तीचे जनन, रूपांतर आणि वहन

[१] [(iv) छपाईसाठी मुद्रिते जुळविणे, ठसविणे, शिळा मुद्रण, छाया मुद्रण मद्रण किंवा तत्सम मुद्रण किंवा पुस्तक बांधणी ]

(v) जहाजाची बांधणी, पुनर्बांधणी दुरुस्ती, पुनर्जोडणी-सामग्री, [५] [किंवा]

[६] (vi) शीतगृहात कोणत्याही वस्तूंचे रक्षण व साठवण इत्यादी किंवा प्रक्रिया)

(न) 'कामगार' म्हणजे निर्मिति–प्रक्रियेशी निगडीत असणाऱ्या निर्मिती कार्यासाठी, तदनुषंगिक कार्यासाठी, निर्मिति–प्रक्रियेच्या जागेत, यांत्रिकी भागाचे साफ सफाईसाठी वेतनावर असो वा नसो, [७] [प्रत्यक्षपणे किंवा कोणत्याही मध्यस्थामार्फत निर्मिती प्रक्रियेच्या अधीन ] [८] [ पण केंद्रीय दल इत्यादींचा सदस्य त्यांत समाविष्ट नाही ] असा इसम.

(म) 'कारखाना' म्हणजे कोणतीही जागा, त्याच्या परिसरासह.

(i) जेथे दहा किंवा अधिक कामगार काम करतात किंवा संपलेल्या बारा महिन्यांतील कोणत्याही दिवशी काम करीत होते व शक्तीच्या सहाय्याने किंवा सामान्यपणे निर्मिती प्रक्रिया केली जाते असा कोणताही भाग, किंवा

(ii) जेथे वीस किंवा अधिक कामगार काम करतात किंवा संपलेल्या बारा महिन्यांतील कोणत्याही दिवशी काम करीत होते आणि शक्तीच्या सहाय्या-शिवाय किंवा सामान्यपणे निर्मिती प्रक्रिया केली जाते असा कोणताही भाग पण[१] [९] [खाण अधिनियम १९५२ (सन १९५२ चा क्रमांक ३५) ] च्या अधीन असणाऱ्या कार्यकृतीचा किंवा [११] [केंद्रीय इत्यादी दलाचे फिरते पथक, रेल्वेचे रनिंग, उपहार गृह किंवा खाद्यगृह यांचा त्यांत समावेश नाही.

# प्रकरण १

## प्रारंभिक

१. संक्षिप्त संबोधन, व्याप्ती आणि प्रारंभ – (१) या अधिनियमास कारखाने अधिनियम १९४८ असे संबोधण्यात येईल.

[१] [(२) सर्व भारतात याची व्याप्ती राहील.]

[२] [×××]

(३) दि. १ एप्रिल १९४९ या दिवसापासून अमलात येईल.

२. अर्थांतरण – विषयांत आणि संदर्भांत विरोध नसेल तर या अधिनियमात-

(अ) 'प्रौढ' म्हणजे, ज्याच्या वयास अठरा वर्षे पूर्ण झाली आहेत असा इसम.

(ब) 'युवक' म्हणजे ज्याच्या वयास पंधरा वर्षे पूर्ण झाली आहेत पण अठरा वर्षे पूर्ण झालेली नाहीत असा इसम.

[३] [(ब ब) 'दिनदर्शक वर्ष' म्हणजे बारा महिन्यांचा कालावधी, ज्याचा प्रारंभ कोणत्याही वर्षी जानेवारीच्या पहिल्या दिवसापासून होतो. ]

(क) 'मूल' म्हणजे ज्याचे वयाची पंधरा वर्षे पूर्ण झाली नाहीत असे मूल

(ड) 'तरुण इसम' म्हणजे जो मूल नाही व युवक नाही.

(इ) 'दिवस' म्हणजे, ज्याची सुरुवात मध्यरात्रीपासून होते असा चोवीस तासांचा कालावधी.

(फ) 'आठवडा' म्हणजे शनिवार मध्यरात्रीपासून ज्याची सुरुवात होते किंवा मुख्य कारखाने निरीक्षक यांना विशिष्ट क्षेत्रासाठी असे लेखी मान्य केले असेल अशा इतर दिवशी मध्यरात्री पासून ज्याची सुरुवात होते असा सात दिवसांचा कालावधी.

(ग) 'शक्ति' म्हणजे विद्युत–शक्ती, किंवा शक्तीचा यांत्रिक उत्पादनाचा इतर प्रकार आणि जी मानव किंवा जनावरनिर्मित नाही.

(ह) 'मूलशक्तिजनित्र' म्हणजे, कोणतेही इंजिन, मोटार किंवा इतर वहन, ज्यांमुळे शक्तीची निर्मिती किंवा पुरवठा होतो.

(आय) 'परिवर्तनीय यंत्रणा' म्हणजे, कोणतेही मूठचक्र, शर्टूडी कण्या, कण्याची योजना, संलग्नचक्र, पकड, पट्टा किंवा इतर साधनसामग्री किंवा शक्तीला

छपाई चालू आहे लौकरच प्रसिद्ध होत आहे

# मुंबई ग्रामपचायत अधिनियम १९५८

(सन १९५९ चा क्रमांक ३)

भारताचे मा. पंतप्रधान राजीव गांधी यांनी सुचविलेल्या सुधारणा व दुरुस्त्या

आणि

लोकसभेतील या विषयावरील त्यांच्या भाषणासह

गो. य. राणे प्रकाशन टिळक रोड पुणे ४११ ०३०

# कारखाने अधिनियम १९४८

२३ सप्टेंबर १९४८

कारखान्यातील मजुरांचे नियमन बळकट करणारा अधिनियम

ज्यापेक्षा, कारखान्यातील मजुरांचे नियमन अधिक दृढतर व्हावे व त्यांत सुधारणा व्हावी असे वाटल्यावरून अधिनियम करण्यात येत आहे, येणे प्रमाणे–

# अनुक्रमणिका


| प्रकरण | प्रकरणाचे नाव | कलमे | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | प्रारंभिक | १ ते ७ | १ |
| २ | निरीक्षकीय कर्मचारी | ८ ते १० | ११ |
| ३ | आरोग्य | ११ ते २० | ४१ |
| ४ | सुरक्षितता | २१ ते ४१ | २१ |
| ५ | सुखसोयी | ४२ ते ५० | ४३ |
| ६ | प्रौढ व्यक्तींचे कामाचे तास | ५१ ते ६६ | ४७ |
| ७ | तरुण व्यक्तींना कामावर लावणे | ६७ ते ७७ | ५९ |
| ८ | वार्षिक वेतनी रजा | ७८ ते ८४ | ६५ |
| ९ | विशेष उपबंध | ८५ ते ९१ | ७१ |
| १० | शास्ती आणि कार्यपद्धति | ९२ ते १०६ | ७८ |
| ११ | अनुपूरक उपबंध | १०७ ते १२० | ८६ |
| | ( पुस्तकात पान ८६ वर प्रकरण १० असे छापले आहे ते प्रकरण ११ वाचावे. ) | | |

| प्रकरण | प्रकरणाचे नाव | नियम | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | प्रारंभिक | १ ते १५ | ९३ |
| २ | निरीक्षक कर्मचारी वर्ग | १६ ते १८ | १०६ |
| ३ | आरोग्य | १९ ते ५६ | १०९ |
| ४ | सुरक्षितता | ५७ ते ७३ | १२६ |
| ५ | " | ७४ ते ८० | १६४ |
| | " | ८१ ते ९२ | १७१ |
| ६ | प्रौढ व्यक्तींचे कामाचे तास | ९३ ते १०२ | १८० |
| ७ | तरुण व्यक्तींना कामावर लावणे | १०३ ते १०४ | १८३ |
| ८ | वार्षिक वेतनी रजा | १०५ ते ११३ | १८४ |
| ९ | विशेष उपबंध | ११४ ते ११६ | १८६ |
| १० | अनुपूरक उपबंध | ११७ ते १२६ | २०९ |
| ११ | नमुने | | |